# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक १२-०७-२००१ ते २७-११-२००१**

**रजिष्टर क्र. ०४**

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद
# सर्वसाधारण सभा

| | अ. क्र. | सर्वसाधारण सभेचा दिनांक | विषय क्रमांक व ठराव | |
|---|---|---|---|---|
| | १ | १२/०७/२००१ | ४४५/१ | |
| | २ | १८/०७/२००१ | ४४६/१ ते ४६८/१६ | |
| | ३ | १३/०८/२००१ | ४६८-अ व ब | विशेष सभा |
| | ४ | २०/०८/२००१ | ४६९/१ ते ४७३/१ | |
| | ५ | ३१/०८/२००१ | ४७४/१ ते ४७५/२ | विशेष सभा |
| श्री. विकास जैन मा. महापौर | ६ | ०४/०९/२००१ | ४७६/१ ते ४७७/२ | विशेष सभा : महापौर निवड |
| | ७ | २०/०९/२००१ | ४७८/१ ते ४९४/५ | |
| | ८ | २०/१०/२००१ | ४९५/१ ते ५२६/६ | |
| प्रश्नोत्तरे सुरू | ९ | २०/११/२००१ | ५२७/१ ते ५३९/७ | प्रश्नोत्तरे प.क्र. १ ते ११ |
| | १० | २७/११/२००१ | ५४०/१ | विशेष सभा : उप-महापौर निवड |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १२-०७-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**गुरुवार, दिनांक १२/०७/२००१ रोजी मा. महापौर श्री. डॉ. भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
२) स.स.श्री. संजय पांडुरंग शिरसाठ
३) स.स.श्री. तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
४) स.स.श्री. वाणी ठकूजी रामसिंग
५) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहमद
६) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
७) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
८) स.स.श्री. शिंदे राजु रामराव
९) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१०) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
११) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१२) स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब
१३) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१४) स.स.सौ. शिंदे रुख्मीनी राधाकिसन
१५) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१६) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१७) स.स.श्री. शे. शकील पटेल शे. बुढण पटेल
१८) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१९) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२०) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२१) स.स.सौ. विजया किशोर रहाटकर
२२) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२३) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२४) स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
२५) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२६) स.स.श्री. अय्युब खान सरदार खान
२७) स.स.श्री. अ. रशिद अ. सत्तार
२८) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२९) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३०) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३१) स.स.श्री. वडागळे सुनिल बुयवेल
३२) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३३) स.स.श्री. स. मुमताज अली मोज्जम अली.

३४) स.स.श्री. नासेर खॉन सरदार खॉन
३५) स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव
३६) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३७) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३८) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३९) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४०) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४१) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४२) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४३) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४४) स.स.श्री. सुरगोणिवार नारायण चंद्रय्या
४५) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४६) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४७) स.स.श्री. अशरफ युनुस मोतीवाला
४८) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४९) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
५०) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगीरथ
५१) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५२) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
५३) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खॉन
५४) स.स.श्री. गाजी सदोद्दिन गाजी जहिर अहमद
५५) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५६) स.स.श्री. शेख ईसाक शे. जैनोद्दिन
५७) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५८) स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
५९) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
६०) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६१) स.स.श्री. अली सलामी स. मीरा सलामी
६२) स.स.सौ. कागडा बबिता सुभाष
६३) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
६४) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास
२) स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३) स.स.सौ. सलमा बनो मोहम्मद अली

स. सदस्य श्री. रतनकुमार पंडागळे यांची आई श्रीमती शांताबाई नारायणराव पंडागळे यांचे दु:खद निधन झालेले असल्याने सभगृहात ०२.०० मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र. ४४५/१ :**

सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करणे बाबत.

**चर्चा :**

मा. महापौर : आज आपण सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्यासंबंधीची सभा लावण्यात आलेली आहे. दि. २१/१२/१९९९ रोजी या सभागृहामध्ये सिडकोचे हस्तांतरण करावे आणि त्यासाठी काही अटी या सभागृहात मंजूर केलेल्या होत्या त्यावेळेसच माजी महापौर स.स. सुदाम सोनवणे यांनी (११) अकरा अटीवर सिडकोचे हस्तांतरण करावे आणि या अटीवर मान्यता मिळविण्यासाठी सिडको प्रशासन, महानगरपालिका प्रशासन, सिडकोचे सचिव, महानगरपालिकाचे पदाधिकारी तसेच मा. मुख्यमंत्री महोदय, सिडकोचे अध्यक्ष मा. जावेद खान साहेब यांच्या बरोबर वारंवार बैठका झालेल्या आहेत नंतर आपल्या शहरामध्ये ज्यावेळेस मंत्री मंडळाची बैठक झाली त्या मा. मुख्यमंत्री साहेब यांनी जाहीर केलेले होते की, सिडकोचे हस्तांतरण लवकरच करण्यात येत आहे. आणि तसे जी.आर. सुध्दा काढण्यात आलेला आहे. जी.आर. आल्यानंतर काही अटीबाबत पदाधिकाऱ्यांना आणि स. नगरसेवक यांनी सिडकोशी याबाबत चर्चा केली पाहिजे. आणि त्यावेळेस महानगरपालिकाचे सर्वपक्षीय नगरसेवक मा. मुख्यमंत्री महोदय यांना भेटावयास गेलो होतो. त्याच दिवशी सिडकोचे मुख्य सचिव मा. सिन्हा साहेब यांच्या चेंबरमध्ये महानगरपालिकाचे स. पदाधिकारी सर्वपक्षीय नगरसेवक महानगरपालिकाचे व सिडकोचे अधिकारी इत्यादींची बैठक झाली आणि त्यानंतर सुध्दा काही अटी आपल्या मान्य केलेल्या आहेत. त्यानंतर दोन दिवसानंतर मा. मुख्यमंत्री महोदयांची सिडको हस्तांतरणाबाबत स्वाक्षरी झालेली आहे. आणि तसा जी.आर. सुध्दा निघालेला आहे. कालच सिडकोचे उपसचिव यांचेशी मी चर्चा केलेली आहे व तो जी. आर. काही तासातच आपल्याकडे प्राप्त होईल. तर या सर्व बाबींवरही सिडको व सिडकोचा काही भाग विकसीत करण्यासाठी विकसित झालेला आहे. तेथे सुविधा दिलेल्या आहेत. सुविधा हस्तांतरण करणेसाठी ही सर्व साधारण सभा आयोजित केलेली आहे. या सभेसाठी मुद्यामच सिडकोचे मुख्य प्रशासन श्री. बागडे साहेब आणि प्रशासन श्री. जाधव साहेब या दोघांनाही या बैठकीत माहिती देण्यासाठी निमंत्रित केलेले आहे. जी काही प्रश्न विचारायीची आहे ते आपण विचारू शकता व तसे सिडकोचे अधिकारी उत्तरे देतील.

श्री. अशफाक सलामी : स. स. श्री. किरमानी यांनी मोहल्ला गीतानगर या भागाता पाईप लाईन वर सिडकाने भूखंड पाडले होते. तक्रार केल्यावरून सिडकोचे मुख्य प्रशासक श्री. बागेड साहेब व प्रशासक श्री. जाधव साहेब यांनी तातडीने कार्यवाही केली त्यामुळे या सभागृहात सर्वप्रथम त्यांचे अभिनंदन करावे.

मा. महापौर : ठिक आहे.

श्री. सुदाम सोनवणे : दि. २१/१२/९९ रोजी जी सर्वसाधारण सभा झालेली होती त्या बैठकीत काय निर्णय झाले. कोणऱ्या अटी व शर्ती लावण्यात आल्या त्याची सभागृहात माहिती द्यावी. व पुन्हा आज हि सभा का बोलविण्यात आली.

मा. महापौर : दि. २१/१२/९९ रोजी जी सभा झाली त्या सभेमध्ये सिडको हस्तांतरण बाबत व तत्कालीन सभागृहाने कोणत्या अटी मंजूर केलेल्या होत्या व कोणत्या नाहीत व त्यापैकी किती मान्य नाहीत व काय बदल करावयाचा या संदर्भात माहितीसाठी ही बैठक बोलाविलेली आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : सिडको हस्तांतरण बाबत आजची बैठक बोलाविण्यात आलेली आहे. या बैठकीसाठी सविस्तर इतिवृत्तात माहिती मिळणे आवश्यक आहे. मागील सभेमध्ये सिडको हस्तांतरण करण्यासाठी ज्या ११ अटी मंजूर केलेल्या होत्या त्या अटींबाबत काय झाले? अनेकवेळा सिडको प्रशासन व शासनाकडील बैठका झाल्या त्याची काय माहिती आहे. त्या सर्व घडामोडी बाबतचे इतिवृत्तात सविस्तर टिप्पणी सभागृहापुढे येणे आवश्यक आहे. नुसते सिडको हस्तांतरणाची बैठक बोलावून स. सदस्यांनी प्रश्न विचारणा करायची पुन्हा त्यावर उप प्रश्न विचारायचे हे सर्व कशासाठी. सभागृहाच वेळ वाया घालवायचा काय? त्यापेक्षा सविस्तर माहिती इतिवृत्तात द्यावयास पाहिजे होती. नाहीतर सभा आणखी दोन तास तहकूब करावी प्रशासनाला टिप्पणी तयार करण्याचे आदेश द्यावेत. या शहरातील नागरिकांचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.

मा. महापौर : ठिक आहे ठरावाच्या प्रति उपलब्ध आहेत त्या देण्यात येतील व सर्व माहिती सभागृहात देण्यात येईल.

श्री. जयवंत ओक : सिडको हस्तांतरण बाबत आजपर्यंत बऱ्याच बैठका झाल्या. प्रशासनाने त्यांच्या स्तरावरही बैठका घेतल्या सभागृहातील ठरावानुसार काही अटी लादल्या व त्या अटींनुसार कार्यवाही होते काय? सिडकोचे हस्तांतरण झाल्याचा जी. आर. काही वेळेत य ठिकाणी प्राप्त होणार आहे परंतु माझे असे म्हणणे असे आहे की, शासनाने काही अटी व शर्ती लादल्या होत्या त्या या जी. आर. मधून काढल्या असतील त्या आपणास कसे माहित होणार व सभा बोलावून आपण चर्चा करित राहणार काय? त्यावर निर्णय घेणे महत्वाचे आहे. सिडकोचा डिनोटीफाईड एरिया आहे. यामध्ये रु. १५/- कोटी वसूल करावयाचे आपल्या अंदाजपत्रकात तरतूद होती. मात्र माझ्या माहितीप्रमाणे वर्तमान पत्रातील बातमीनुसार फक्त ४ १/२ कोटी रुपये शासन देणार आहे तेंव्हा असे काही डायरेक्शन मुंबईवरून शासनकडून आलेले आहेत काय? त्याचप्रमाणे सिडकोतील मालमत्ताकर कधी पासून महानगरपालिका घेणार व वाढीव कर हा लावल्या जाईल काय? सिडको हस्तांतरानंतर प्रक्रियेबाबत या ठिकाणी माहिती मिळणे आवश्ये आहे की, मालमत्ता कर हा जुन्या दराने लावणार किंवा कसे व केव्हापासून लावणार, कारण हा सिडकोतील जनतेचा प्रश्न आहे. यासाठी सविस्तर माहिती मिळणे आवश्यक आहे. बैठकीत काय निर्णय झाला. शासनाचा काय निर्णय ते परिपत्रक सर्वांना वाटायला हवे होते.

या महापौर : यापूर्वी सुध्दा सिडको हस्तांतर बाबत बैठका वेळोवेळी झालेल्या आहेत आणि त्यामध्ये काही निर्णय घेतलेले आहेत व तशी नोंद इतिवृत्तामध्ये आलेली आहे.

श्री. संजय शिरसाठ :स.स. श्री. प्रकाश निकाळजे यांनी सभागृहात केलेल्या सूचनेनुसार सभागृहात माहिती द्यावी व तोपर्यंत सभागृह अर्ध्या तासासाठी तहकूब

करावे. याबात काहींनी कोर्टात याचिका दाखल केलेली आहे तर काहींचे प्रकरणे प्रलंबित आहेत याची माहिती द्यावी.

मा. महापौर : ठिक आहे सभा १/२ (अर्ध्या) तासासाठी तहकूब करण्यात येते व वेळेत सर्वांना माहिती पुरविल्या जाईल [वेळ दुपारी १२.०० वाजता] सभोला सुरुवात दुपारी ०१.४० वाजता.

श्री. दत्तात्रय थोरात : सिडको हस्तांतरानंतर सिडकोतील कर्मचारी आपण घेणार आहोत काय? त्यांचेवरील बोजा आपण कसा सांभाळाणार त्या कर्मचाऱ्यांबाबतीत जेष्ठता यादी आपण कशी ठेवणार याची माहिती द्यावी.

श्री. संजय शिरसाठ : सिडको हस्तांतरानंतर जे ३९ पदे महानगरपालिकाकडे समावून घ्यावे याबाबतीत मी सांगू इच्छितो की जे सिडकोतील कर्मचारी आहेत त्यांना महानगरपालिकेत सामावून घेण्याची नैतिक जबाबदारी महानगरपालिकेची नही कारण सिडको ही वेगळी संस्था आह ती त्यांच्या तत्वावर चालते. तेथील कर्मचारी हे कुठे पाठवायचा हा विषय त्यांचा आहे. तेंव्हा. सिडकोतील कर्मचाऱ्यांना आपल्या महानगरपालिकेमध्ये सामावून घेऊ नये अशी भूमिका सभागृहाने घ्यावी. ३० कर्मचारी घ्यावयाचे आहे त्यांचा विचार करावा कायमस्वरुपी घेऊ नये.

श्री. तहीहसन खॉन : सिडको हस्तांतरण बाबत अनेक वेळेस चर्चा झालेल्या आहेत या वेळी काही अटी ठेवण्यात आल्या होत्या. शासन याबाबत अंतिम परिपत्रक पाठवित आहे. तेंव्हा त्या परिपत्रकातील काही अटी व शर्ती असतील त्या सभागृहाने बदल करू शकतात असे शक्य आहे काय? तेंव्हा माझे असे मत आहे की, एकदा शासनाकडून परिपत्रक आल्यानंतर सर्वसाधारण सभेस कोणत्याही प्रकारचे अधिकार नाहीत. तर या बैठकीचा अर्थ काय?

श्री. काशिनाथ कोकाटे : सभागृहामध्ये सभा तहकूब करून शासनाच्या अध्यादेशाची प्रत व इतिवृत्ताची प्रतिची झेरॉक्स प्रती सर्व स. सदस्यांना देण्यात आली. या सभागृहामध्ये जी चर्चा झालेली आहे त्याच चर्चेचे उत्तर या सभागृहामध्ये आहे. सिडको हस्तांतरणा बाबतच्या दोन बैठका सचिवालयात झालेल्या आहे आणि त्यावर अंतिम स्वरुप प्राप्त झालेले आहे. आणि त्यानंतर आज याच संदर्भाने ही बैठक बोलाविलेली आहे. परंतु तत्पुर्वी सचिवालयामध्ये ज्या बैठक बोलाविलेली आहे. परंतु तत्पूर्वी सचिवालयामध्ये ज्या बैठका शासन, प्रशासन, सिडको महानगरपालिका व पदाधिकारी समवेत झाल्या त्या बैठकीचे इतिवृत्तांत सभागृहात प्रथमतः घ्यावे जेणे करून सिडकोचे हस्तांतर हे कोणत्या बेसिसवर होणार ते स्पष्ट होईल. याचे निवेदन सभागृहापुढे करण्यात यावे.

मा. महापौर : सभागृहामध्ये दिनांक २१/१२/९९ रोजी जो निर्णय घेण्यात आला त्याची प्रत सर्वांना दिलेली आहे. तयानंतर शासन निर्णय क्र. पीयुसी-१०९५/७५९/दिनांक १६/०३/२००१ मुख्य सचिव श्री. सिन्हा साहेब आणि सिडकोचे व महानगरपालिकाचे अधिकारी तसचे महानगरपालिकेतील पदाधिकारी यांच्या सोबत जी बैठक झाली व जो शासन निर्णय निघालेला त्याचीही प्रत सर्वांना देण्यात आलेली आहे. यामध्ये दिनांक २१-१२-९९ च्या बैठिकत सामील केले होते तेच मुद्दे या बैठकीत क्र. १ ते १० पर्यंतचे आहेत व त्यावर निर्णय काय झालेला आहे तोही दिलेला आहे. हे सर्व मुद्द आपणा सर्वांना वाचून दाखविण्यात येतील. सभागृहात स. सदस्य श्री. तकीहसन

खान यांनी सांगितले की, शासनाचे परिपत्रक प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये काही बदल करण्याचे अधिकारी आपणास आहेत काय? त्या संदर्भाने स.स. श्री. संजय शिरसाठ व अविनाश कुमावत यांनी चर्चा केली व आपले मत मांडले ते या मुद्यातील क्र. ४ मधील असून सिडकोतील ३९ माळी व ३१ कर्मचारी यांचे बाबतीततला आहे व त्याबाबत महानगरपालिका ही स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकते असे शासनाने सुचित केलेले आहे. अर्थातच हा निर्णय घेण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला आहे. या बैइीकत दि.२६/०२/२००१ रेजी मंत्रालयात जी बैठक झाली त्यात दि. २१/१२/९९ च्यच बैठकीतील मुद्दे चर्चेस होते. त्यामध्ये मुद्दा क्र. ४ बाबतचाही होता. त्यांच्यानंतर विषय क्र. १ हेता सिडकोतील प्राथमिक सुविधा अद्यायावत करून प्रत्यक्ष हस्तांतरणाचा संयुक्त करार करण्यात यावा मुद्दा क्र. ४ बाबत सभगृहात चर्चा करू शकता.

श्री. काशिनाथ कोकाटे : मंत्रालयात दोनदा बेठका झाल्या त्यामध्ये सिडको व महानगरपालिकाने ज्या चर्चे अंती विषयास मान्यता दिलेली आहे. त्याची सभागृहाला माहिती द्यावी.

मा. महापौर : महानगरपालिकेतर्फे सदरील बैठकीस महानगरपालिकाचे मुख्यलेखाधिकारी बैठकीस उपस्थित होते. त्यांनी सभागृहाला माहिती द्यावी.

श्री. जयवंत ओक : सभागृहात शासन परिपत्रकाची प्रत सदस्यांना दिली मात्र तो जी.आर. दि.१६/०३/२००१ चा आहे आता पुन्हा नवीन परिपत्रक प्राप्त झाले काय? आणि त्यानुसार सदस्यांना माहिती द्यावी.

श्री. अशफाक सलामी : शासन परिपत्रकामध्ये ३१ कर्मचारी सिडकोचे महानगरपालिकेकडे घेणे बाबतचा निर्णय हा महानगरपालिकाने घ्यावा किंवा नाही त्यांचे कक्षेतील बाबत आहे. हा स्वतंत्र निर्णय आहे. परंतु इतर जे काही मुद्दे आहेत त्यावर सभागृहात दुरुस्तीसाठी चर्चा करता येतील काय? किंवा कसे नसता शासनाचा जी.आर. आला व ही सभा बोलवली चर्चा होऊन सभा संपली असे होऊ नये. तेंव्हा इतर मुद्यांवरती निर्णय घेता येईल काय? याची माहिती द्यावी.

मा. महापौर : दि. २१/१२/९९ रोजी जी बैठक झालेली होती त्या बैठकीतील मुद्दे सभागृहाने मांडलेले होते. त्या अनुषंगाने व त्याच धरतीवरती सिडकोचे हस्तांतर व्हावे असे आपल्या सभागृहाने ठरविले होते. त्याअनुषंगाने मुद्दे उपस्थित झलेले होतेव त्याप्रमाणेच चर्चा होणार आहे. सदरील बैठकीसाठी मुख्यलेखाधिकारी हे महानगरपालिकेतर्फे उपस्थित होते. काय, काय चर्चा झाली त्यांना संपूर्णपणे माहिती आहे. त्यांनी झालेल्या मुद्यांबाबत सभागृहात माहिती द्यावी.

मुख्यलेखाधिकारी : सिडको हस्तांतर बाबत मंत्रालय मुंबई येथे जी बैठक झाली त्यामध्ये मी महानगरपालिकेचा प्रतिनिधी म्हणून उपस्थित होतो. स.स.श्री. अशफाक सलामी यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यावर मी प्रथम खुलसा करतो दिनांक २१/१२/९९ रोजी जो महानगरपालिकेने ठराव घेतलेला आहे त्या ठरावाच्या अनुषंगानेच शासन स्तरावर निर्णय घेतलेला आहे. त्या ठरावाच्या व्यतिरिक्त कोणतीही बाब शासन निर्णयात अंर्तभूत नाही. त्यामुळ २१/१२/९९ रोजी सभागृहाने जो निर्णय घेतलेला आहे तो अंतिमत: मंजुरीसाठी शासनाकडे पाठविलेला होता २१/१२/९९ च्या महानगरपालिकेच्या ठरावावर सांगोपांग चर्चा दोन ते तीन वेळेस सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक शासनाचे प्रधान सचिव, सिडकोचे मुख्य प्रशासक,

महानगरपालिकेचे आयुक्त आणि स. पदाधिकारी यांमध्ये वेळोवेही चार ते पांच वेळेस बैठका झालेल्या आहेत. आण त्यावरून अंतिमतः निर्णय मा. व्यवस्थापकीय संचालक सिडको यांच्या कार्यालयात संयुक्त बैठक महानगरपालिका अधिकारी आणि सिडको अधिकारी यांच्यामध्ये जानेवारी-२००१ मध्ये होऊन १६-०३-२००१ रोजी शासन निर्णय शासनाने जाहीर केलेला आहे. त्यामध्ये आपल्या ठरावाच्या अनुषंगाने मुद्देनिहाय चर्चा झाली व त्याची प्रत आपणाकडे प्राप्त आहेच यामध्ये १ ते १० मुद्दे त्यांनी नमूद केलेली आहे ते महानगरपालिकेने जो ठराव घेतलेला आहे त्यामध्ये सदरील मुद्दे सामाविष्ट आहेत. त्यामध्ये फक्त एकच मुद्या लिज होल्डचे फ्रि होल्ड यावर शासन स्तरावर जो निर्णय व चर्चा झाली त्यात मा. प्रधान सचिव, व्यवस्थापकीय संचालक सिडको मुख्य प्रशासन व महानगरपालिका अधिकारी व पदाधिकारी सर्व उपस्थित होते. महाराष्ट्रामध्ये सिडकोचे ज्या ज्या महानगरपालिकेमध्ये हस्तांतर झालेले आहे. त्या ठिकाणी हस्तांतर करीत असतांना लीज होल्डचे फ्रि होल्ड झालेले नाही केवळ हा मुद्दा वगळून बाकी सर्व मुद्यांवर सांगोपांग चर्चा होऊन शासन निर्णय १६/०३/२००१ रोजी घेण्यात आला होता. शासन निर्णय काढत असतांना उच्च स्तरावर जी चर्चा झाली त्यामध्ये मुद्या क्र.१ प्राथमिक सुविधा अद्यायावत करून देणे हा संयुक्त कराराबाबत त्यात औरंगाबाद महानगरपालिकेने १०.४७ कोटी रु. द्यावे असा अंतर्भव होता. परंतु सिडकोने यामध्ये त्यांच्या ज्या इमारती हस्तांतर करणार आहे. त्यानुसार ८.३३ कोटी रुपये महानगरपालिकाने सिडकोला द्यावे. हा त्यामध्ये अर्थ होतो यातील सिडकोने किंमती ठरवावी. दोन्हीही बाजूने त्यावर चर्चा करून नंतर निर्णयास्तव शासनाकडे पाठवावे फक्त (२) मुद्यांवर अटी टाकून शासनाने निर्णय काढलेला आहे. सदरील शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर महानगरपालिका अधिकारी व सिडको अधिकारी पुन्हा चर्चा झाली यामध्ये महानगरपालिकाने भूमिका मांडली की, हे हस्तातर होत आहे. त्यांचेसाठी भूतपूर्व सुविधा महानगरपालिका पुरविणार आहे. सिडकोची जी जबाबदारी होती सार्वजनिक ज्या मालमत्ता आहेत ते सिडकोने उभारायच्या त्याची किंमत महानगरपालिका देणार नाही. या मुद्यांवर जे महानगरपालिकाचे डिस्प्युट होते. सिडकोने ८.३३ कोटी रु. मागणी केलेली होती. त्यावर महानगरपालिका अधिकारी / पदाधिकारी व सिडकोचे अधिकारी यांची पुनःश्च चर्चा झाली. सिडकोने मुख्यलेखाधिकारी श्री. नलावडे हे दोन वेळेस बैठकीस येऊन गेले. त्यांचे समवेत विचार पूर्वक चर्चा झाली अंतिमतः असे ठरले की,८.३३ कोटीची जी मागणी आहे ती सिडकोने करू नये आणि विना मोबदला सिडकोच्या सर्व इमारती महानगरपालिकेस हस्तांतर करावे आणि या बाबींसाठी जे अडलेले होते. निर्णय होऊन सुध्दा हस्तांतर होत नाही. तेंव्हा या ज्या त्रुटी अंतिमतः करण्यासाठी मागील महिन्याच्या २७ तारखेला मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली आपले सर्व पक्षीय सदस्य मा. सिन्हा साहेब सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक शासनाचे मुख्य सचिव यांच्या दालनात यावर चर्चा झाली आणि अंतिम निर्णयाच्या बाबतीत त्यावेळेस जी चर्चा केली होती १०.४७ कोटी रु. सिडकोने महानगरपालिकेस द्यावे शासन निर्णय होता या रक्कमेतून सिडकोचे औरंगाबाद महानगरपालिका कामे इमारतीची

रक्कम वळती करून घ्यावी महानगरपालिकेस फक्त रु. २.४७ कोटीच अदा करणार होते. आणि १०.४७ कोटी रु. जी काढलेली होती त्यामध्ये मुळ उद्दिष्ट रु. ८.०० कोटी अनाधिकृत वस्तीसाठी मागितलेले होते. आणि २.४७ कोटी पैकी पब्लीक कॉन्ट्रीब्युटरी म्हणून १.७५ लाख सिडकोकडून आपल्याला येणे आहे. तसेच किरकोळ म्हणून मेंटेनन्ससाठी रस्ते व ड्रेनेजसाठी २.४७ कोटी दोन्हीही बाजूने मान्य केलेले आहे. राहीला प्रश्न ८.०० कोटीचा त्यावेळी मा. मुख्य सचिव यांनी असे निदर्शनास आणून दिले की, गुंठेवारी कायदा हा शासनाने नुकतेच आदेश निर्गमित केलेले आहे. त्यामुळे अनाधिकृत वसाहतींना सुविधा देण्याची जबाबदारी ना शासनाची आहे ना महानगरपालिकेची आहे. शासनाने हा सर्वांगिन विचार करून महाराष्ट्रासाठीच जिथे जिथे अनाधिकृत वस्त्या आहेत ज्या महानगरपालिका क्षेत्रात झालेल्या आहेत. तिचे हा गुंठेवारी कायदा लागू करून जो कोणी महानगरपालिका दर निश्चित करेल ते डेव्हलपमेंटसाठी त्यांना सुविधा पुरवावे. त्यामुळे महानगरपालिकाची मागणी फक्त रु.२.४७ कोटीची होती. तथापि अद्यायावत रस्ते सर्व सुविधा करून द्याव्यात या बाबींवर महानगरपालिकाने पुनःश्च सिडकोकडे मागणी केलेली होती की, चालू वर्षासाठी आपण मेंटनेन्स व किरकोळ कामासाठी बजेट सिडको प्रभागासाठी ठेवलेले आहे ते बजेट महानगरपालिकेकडे सिडकोने हस्तांतरीत करून द्यावे. कारण की, उद्या जर हस्तांतर महानगरपालिकाकडे आलेच तर महानगरपालिकेस तात्काळ मेंटनेन्स करावे लागणार आहे. त्यासाठी महानगरपालिकेकडे पैसा उपलब्ध नाही त्याच दृष्टीकोनातून या महानगरपालिकाने सिडकोकडे २.०० कोटीची मागणी केली आणि त्यानंतर २.४७ कोटीची लमसम अग्रीम रु. २.५० कोटी आणि मेंटनेन्स साठी रु. २.०० कोटी असे एकुण रु. ४.५० कोटी सिडकोने महानगरपालिकेस द्यावे. त्याबरोबरच महानगरपालिकेस सिडको क्षेत्रामध्ये स्वतः चे कार्यालय उभारण्यासाठी इमारत उपलब्ध करून द्यावे म्हणून महानगरपालिकेची मागणी होती. ती मागणी मान्य केली सध्या सिडकोची ती अस्तीत्वात इमारत कार्यालय आहे. त्याच्यातील एक विंग महानगरपालिकाचे कार्यालय सुरू करण्यासाठी देणार आहे या बाबी ह्या जी. आर. मध्ये नमूद नव्हत्या म्हणून हस्तांतर प्रक्रिया थांबलेली होती. शासन निर्णय निघाल्यानंतर यावर सांगोपांग चर्चा करून सिडको प्रशासनाकडून पुनःश्च भूमिका मांडावी आणि मागील महिण्यात २७ तारखेला जी बैठक झाली त्या बैठकीस या त्रुटीबाबत निदर्शनास आणून दिल्य की, महानगरपालिका सिडको प्रशासनाच्या इमारती बाबत पैसे देऊ शकणार नाही. महानगरपालिकेस फ्रि ऑफ कॉस्ट हि इमारत देण्यात याव्यात आणि या पध्दतीचाच आपला हा ठराव झालेला होता की, सिडको क्षेत्रातील सर्व इमारती ही महानगरपालिकेस विनामुल्य हस्तांतरीत करून द्याव्यात आपला जो २१/१२/९९ चा ठराव होता त्यातील ६ क्रमांकाची मागणी होती ती शासनाने पूर्वी मान्य केलेली नव्हती परंतु मागील महिन्यात २७ तारखेला जी बैठक झाली त्यात ती मगणी मान्य झाली या बरोबरच सिडको भागातील अनाधिकृत वसाहतीबाबत नागरी सुविधा जी महानगरपालिकेस रु. १५.०० कोटी द्यावे तो मुळ ठरावात उल्लेख होता. आता खुलासा केल्याप्रमाणे अनाधिकृत वसाहतीची जबाबदारी

महानगरपालिकाची किंवा शासनाची नसल्यामुळे त्यांनी गुंठेवारी कायदा लागू केल्याने तोही प्रश्न मिटलेला आहे. त्यामुळे ठरावातील उर्वरित बाबी ज्या आहेत जो आपण ठराव करून शासनाकडे पाठविले होते. त्यात सर्व बाबी आपल्या महानगरपालिकाचे निर्णयानुसार सर्व मान्य केलेल्या आहेत. आपण जे सिडकोचे नाट्यगृहासाठी जी जमीन मागितली होती विनामुल्या द्यावी म्हणून आपला ठरावा होता सिडकोने सुरुवातीला त्याची किंमत चार्ज केली होती. आता ती जमीन सिडको विनामुल्या हस्तांतर करीत आहेत. याशिवाय सिडकोने नाट्यगृहाच्या बांधकामासाठी रु. २५.०० लाख भरणा सिडकोकडे केली होती ती सुध्दा रु. ४.५० कोटीच्या व्यतिरिक्त ते २५.०० लाख महानगरपालिकेस परत मिळणार आहे या सर्व बाबींवर मा. प्रधान सचिव सिन्हा साहेब, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक लखिना साहेब, मा. महापौर व सर्व पदाधिकारी आणि सर्व पक्षीय १० स. नगरसेवक होते. त्यामध्ये सर्व बाबींसह ओपन स्पेसच्या जागेसह मान्य केलेले आहेत. मुद्येनिहाय बाबी विचारात घ्यावयाचे झाल्यास आपला २१/१२/९९ च्या ठरावानुसार औरंगाबाद महानगरपलिकेने सिडकोचे हस्तांतरण करतांना सिडकोने रस्ते, जलवाहिन्या, जलानि:सारण वाहिन्या अद्ययावत करून द्याव्यात याबाबत महानगरपालिका व सिडको अधिकारी यांचे सोबत संयुक्त पाहणी दौरा झालेला असून याच्यावर विचार विनिमय करून निर्णय घेतलेला आहे. यामध्ये सिडकोतील काही भागासाठी ज्या काही किरकोळ मेंटनन्स करवयाचे आहे त्यासाठी लागणारे आर्थिक बजेट ते आपल्याला देणार आहेत. ती बाब पूर्णतः आपली मान्य झालेली आहे. मुद्या क्र. २ लिज होल्डचे फ्रि होल्ड करणे बाबतही मागणी मान्य न करणेमागचा उद्देश म्हणजे महाराष्ट्रात नवी मुंबई अणि नाशिक या ठिकाणी सिडकोचे हस्तांतरण झालेले आहे. फक्त फ्रि होल्ड करता येत नाही कारण कायद्यामध्ये बदल करावा लागतो. त्यामुळे ही मागणी मान्य झालेली नाही. जर समजा शासनाने लिज होल्डचे फ्रि होल्ड करणेचा निर्णय घेतल्यास सिडकोने ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे की, आमची काही हरकत नाही यामध्ये शासनाने जर का मान्यता दिली तर याबाबत मागेपुढे होण्याची शक्यता आहे. मुद्दा क्र. ३ बाबत आपल्या ठरावातीलच मुद्या आहे. सिडकोतील अनधिकृत वसाहती आहेत त्यांना नागरी सुविधा पोटी हस्तांतरीत करतांना अनुदान देण्यात यावे. या मागणीवर शासनाने गुंठेवारी कायदा लागू केल्याने पैसे देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मुद्दा क्र.४ सिडको भागातील सर्व विकासाचे नियोजनाचे अधिकार महानगरपालिकेचा पूर्णतः असावे ते अध्यादेश मध्ये त्यांनी महानगरपालिकेची विनंती मान्य करावी याबाबत नवीमुंबई यांच्या प्राधिकृत केलेल्या प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्य बाबतीत ही कार्यवाही करणेत येणार नाही. हे शासनाने शासन निर्णयात दिलेले आहे. सिडकोतील ३९ माळी व इतर ३१ कर्मचारी हे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करावे जे कायम स्वरुपी आहेत. याबाबतचा महानगरपालिकेचा ठराव २१/१२/९९ चा आहे. या ठरावाच्या अनुषंगाने शासनाने मान्यता दिली आहे. ३१ कर्मचारी कोणते घ्यावे किंवा नाही याबाबत महानगरपालकाने स्वतंत्ररित्या निर्णय घ्यावयाचा आहे. या संदर्भात मा. आयुक्त यांचेकडे ज्या वेळेस चर्चा झाली त्यावेळी आपले कर्मचारी

यांचेवर कोणत्याही प्रकारे अन्याय होणार नाही याची दक्षता घेतलेली आहे. कारण उदा आपलेकडे सिडकोकडून एखादा लिपिक संवर्गातून कर्मचारी येत असल्यास आपलेकडे एकूण २४० लिपिक संवर्गातील कर्मचारी असतील तर येणाऱ्या कर्मचाऱ्याची जेष्ठता यादी ही २४१ अशी राहील. त्याचप्रमाणे आपलेकडे ५० कनिष्ठ अभियां असतील तर येणरा कर्मचारी हा जेष्ठतेप्रमाणे ५१ क्रमांकावर राहील सिडकोचे सेवा भरती नियम वेगळे, महानगरपालिकाचे सेवा भरती नियम वेगळे याची दक्षता घेता प्रत्येक कर्मचाऱ्यांची इच्छेनुसारच कायम असलेले कर्मचारी शुन्य जेष्ठतेवर घेण्यात येईल. जर संबंधित कर्मचाऱ्यांस आपले सेवाभरती नियम मान्य असल्यासच त्यांना हस्तांतर करून घेण्यात येईल. ज्या की महानगरपालिकाच्या सेवा भरती नियम व अटीसहच घेणेत येईल असे असेल तरच ते घेण्यात येईल. यामध्ये आपले कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही व त्याची जेष्ठता शुन्य राहिल हा मुद्या शासनाकडे मांडलेला होता तो मुद्या शासना निर्णयात मान्य झालेला आहे. पुढील मुद्या सिडकोने बांधलेल्या इमारती विनामुल्य सिडकोने हस्तांतर करावे. यामध्ये शासन निर्णय जो १६ मार्चला निघालेला होता. याच्यामध्ये सिडकोने सांगितलेले होते की कर योग्य मुल्य निश्चित करून महानगरपालिकास ती रक्कम देय आहे. या मुद्यांवर मागील महिन्याच्या २७ तारखेला मा. प्रधान सचिव यांचेकडे चर्चेला जाऊन हा मुद्याही मान्य केलेले आहे. आजच सकाळी शासनाचे सहसचिव मा. धाडगे साहेब यांनाही याचा संदर्भात फोनद्वारे विचारणा केलेली होती. मा. महापौर मुंबईला होते त्यांनीही याची विचारणा केलेलीच होती, त्यांना या संदर्भात कल्पना दिलेली होती की, याबाबत आपल्याकडे जी. आर. प्राप्त होत आहे. येत्या एक ते दोन तासांत आपल्या महानगरपालिकेस फॅक्स पाठीवत आहेत. ज्यामध्ये अंतिम निर्णय मंत्रालयात झालेले आहे. पुढील मुद्या असा आहे की, सिडको क्षेत्रातील उद्याने, नर्सरी विना अट हस्तंतरीत करावे. हि महानगरपालिकाची विनंती मान्य करण्यात आलेली आहे. सिडको क्षेत्रातील सर्व खुल्या जागांना हस्तांतरपूर्वी तारेचे कुंपन घालून द्यावे.यामध्ये सिडकोचे एकूण १६८ खुल्या जांगपैकी ७३ जागांना कुंपन घातलेले आहेत उरलेल्या खुल्या जागा ज्या आहेत त्याच स्थितीत महानगरपालिकाने ताब्यात घ्याव्यात असे शासनाने म्हटलेले आहे. गृहनिर्माण संस्थांना दिलेल्या भूखंडाचा विकास सिडकोच्या अटी व शर्तीनुसार करण्यात याव्या यामध्ये गृहनिर्माण सस्थांना बहिर्गत सेवा सिडकोने पुरिवल्या आहेत अंतर्गत सेवा संस्थांनी स्वतः विकसित करावे. ज्या पध्दतीने औरंगाबाद महानगरपालिका ले-आऊट मंजूर करतो व सेल्फ डेव्हलपमेंट मंजूर करावा. या धर्तीवरच आपण तो मान्य केलेले आहे. सिडकोने लोकवर्गणी पोटी महानगरपालिकास रु. १.७५ कोटी द्यावे असा ठराव महानगरपालिका होता तो ठराव मान्य करण्यात आला. सिडको क्षेत्रातील हस्तांतरणापासून महानगरपालिकेचा मालमत्ता कर सिडको रहिवाश्यांना लागू करण्यांत येईल ही महानगरपालिकाची विनंती मान्य करण्यात आली. सिडको नाट्यगृहाची जमीन सिडकोने महानगरपालिकेस विनामुल्य द्यावी. पूर्वीच्या जी. आर. मध्ये ते किंमत रोखीने देणार होते परंतु २७ तारखेच्या बैठकीत ते विनामुल्य देण्याचे निश्चित झालेले आहे. नाट्यगृहासाठी सिडकोला दिलेले रु. २५.००

लाख महानगरपालिकेचे परत द्यावे. महानगरपालिकाची विनंती मान्य झाली. त्यामुळे शासनाकडील बैठकीत अंतिमतः झालेल्या निर्णयानुसार रु. ४.५० कोटी मेंटनेन्स व लोकवर्गणी पोटी सिडको देणार आहे. त्याचप्रमाणे नाट्यगृहासाठी दिलेले रक्कम रु. २५.०० लाख असे एकूण रु. ४.७५ कोटी महानगरपालिकेस प्राप्त होणार आहेत. सिडको कार्यालयातील एक विंग महानगरपालिका कार्यालयासाठी विनामुल्य देण्यात येणार आहे. आणि तो जी.आर. सुध्दा आपल्याला प्राप्त होत आहे.

श्री. जयवंत ओक : आताच माहिती सांगितल्यावरून रु. ४.५० कोटी मधूनच सिडकोतील नागरी सुविधा देण्यात येणार आहेत काय? ज्या लोकांनी सिडको हस्तांतरणा पूर्वीच मालमत्ता कर भरणा केलेला आहे. त्यांचे बाबतीत आपली भूमिका काय राहणार आहे. त्यांना सुविधा कशा प्रकारचे देणार आहात. सिडकोतील घरांना मालमत्ता कर आकरणी करीत असतांना जुन्या दरानेच लावावे व जी घरे नवीन आहे त्यांना नवीन दराने कर लावावा. सिडको भागात डिनोटी फाईड एरिया आहे. त्यांना सामावून त्यांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात याव्यात. जो कर्मचारी हस्तांतरणानंतर महानगरपालिकेकडे येणार आहेत. अशा कर्मचाऱ्यांबाबत शासनाच्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही व्हावी. गुंठेवारी अंमलबजावणी उद्यापासून सुरू करा.

श्री. अशफाक सलामी : दि. २१/१२/९९ च्या प्रस्तावामध्ये जे मुद्दे होते त्यामध्ये बदल झालेले आहे. रु. १०.४७ कोटीच्या पैशाबाबत प्रशासनाने माहिती द्यावी. त्याचप्रमाणे सिडको वसाहतीमध्ये कोणत्याही प्रकारचे दुजाभाव होणार नाही याची खबरदारी घ्यावी कारण सिडकोतील जी डिनोटीफाईड एरिया आहेत त्यांच बाबतीतले धोरण स्पष्टपणे आवश्यक आहे. या शहरात सर्व्हेनुसार गुंठेवारी प्रमाणे ११४ डिनोटीफाईड भाग आहेत त्या भागसाठी रेग्युलराईलड करणेसाठी एकंदर किती उत्पन्न प्राप्त होईल व किती खर्च पडेल याची माहिती द्यावी. कारण गुंठेवारी पध्दतीनुसार जो दर निश्चित केलेला आहे शासनाने आखून दिलेला दराप्रमाणे सर्वसामान्य नागरिकांना परवडणारे आहे काय? यासाठी सिडकोतील जेवढा काही डिनोटीफाईड भाग आहे तो विकसित करणेसाठी सिडकोने जादा पैसा द्यावा अन्यथा शनाकडून पैसा मिळणेची मागणी व्हावी. मालमत्ता कराबाबत कोणत्याही प्रकारे शहर वासियांवर अन्याय झालेला आहे. याची जाणीव ठेवून सिडकोने आतापर्यंत टॅक्स भरलेला नाही. त्यामुळे सर्व जबाबदारी महानगरपालिकावर व शहरातील जनतेलाच भर्दंड होत आहे. याबाबत सिडकोकडून सुरुवातीपासूनच मालमत्ता कर भरणा करावा. जे सिडकोतील ३१ कर्मचारी महानगरपालिकेकडे घेण्यात येणार आहे. त्याबाबत चर्चा व्हावी त्याचप्रमाणे काही कर्मचारी सिडकोतील येण्यास तयार असतील पात्र जेष्ठता बाबतीत तपासणी करावे लागेल. या महानगरपालिककाकडे हस्तांतरीत करीत असतांना त्यांची जेष्ठता नवीन प्रमाणेच घ्यावी. या ठिकाणी बऱ्याच विभागात महानगरपालिका गेल्या ८-१० वर्षापासून दैनिक वेतनावर कर्मचारी कामावर आहेत. सिडको हस्तांतरण वेळेस त्यांना प्राधान्य देऊन कायम करण्याची कार्यवाही व्हावी. मागील सर्वसाधारण सभेमध्ये याच संदर्भात मी विरोध दर्शविलेला आहे. तेंव्हा सिडकोतील कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेत सामावून घेण्यात येऊ नये.

श्री. अविनाश कुमावत : ३९ व ३१ कर्मचारी घेण्याबाबत विचार करावा बाकीचे मंजूर करावे याचे नांव सिडको-हडको न ठेवता संभाजीनगर ठेवावे.

श्री. भगवान घडामोडे : सिडको विभागातील वॉर्डनिहाय पाहणी करून ज्या ज्या सुविधा पुरविण्याची आवश्यकता आहे त्याबाबतची दुरुस्ती करून द्यावी. सिडकोकडून जी महानगरपालिकेकडे रक्कम मिळणार आहे तो खर्च सिडकोतील भाग विकसित करण्यासाठी व्हावा. जे ३१ कर्मचारी महानगरपालिकाकडे हस्तांतरण होणार आहेत. त्यांचे बाबतीत कायदेशिर बाब तपासून पाहावे नंतरच निर्णय घ्यावा. सिडकोतील काही खुल्या जागा इतर संस्थांना लिजवर दिलेल्या आहेत. उदा. सिडको एन-२ सभागृह महानगरपालिकाकडे हस्तांतरण झाले पाहिजे. सिडकोकडे बरीचशी उद्याने आहेत ती हस्तांतरण व्हावे खुल्या जागा ज्या आहेत त्यावर सिडकोने तार कुंपन करून पाटी लावावे. सिडकोसाठी स्विमिंग पुल नाही तो स्वतंत्ररित्या बांधून द्यावा. मालमत्ता कर हा हस्तांतरण पूर्वीच्या जुन्या दराने लावावे.

श्री. प्रशांत देसरडा : सिडकोतील रहिवाशांचा मालमत्ता कर हा जुन्या दराने लावावा. महानगरपालिकेकडे हस्तांतरण झाल्यापासून कर आकारणी सुरू करावी. ज्या अनाधिकृत वसाहती आहेत त्यांना जोपर्यंत पी.आर. कार्ड मिळत नाही तो पर्यंत कर हा जुन्या दरानेच लावावा. सिडको हस्तांतर करणे पूर्वी सिडकोतील ज्या खुल्या जागा, गार्डन, दवाखाने, खेळांचे मैदाने, शाळा व इतर संस्थाना देण्यात येणाऱ्या भाडेपट्ट्यावरील जागा यांची महानगरपालिका व सिडकोतर्फे संयुक्त पाहणी करावी. ज्या वसाहती अनाधिकृत असतील त्यांचे सर्व्हेक्षण करून याद्या तयार करावेत. सिडको भाग हा फार मोठ्या प्रमाणात विखुरलेला असून या भागासाठी स्वतंत्ररित्या नाट्यगृह व स्विमिंग पुल बांधणेची तातडीने व्यवस्था करावी. अतिक्रमण सिडकोने काढावे.

श्री. फुलारी : सिडको भागामध्ये जवळपास ४३ गृहनिर्माण संस्था आहेत. या भागामध्ये २५% लोकवर्गणी भरून ७५% महानगरपालिकाने हिस्सा देऊन येथील भागांचा विकास करावा.

श्री. तकीहसन खॉन : सिडकोमध्ये ज्या प्रमाणे विकासाची प्रक्रिया सध्या चालू असेल त्याची प्रगती पथावरील कामे पूर्ण करावे व सिडकोतील एकूण प्रस्तावित कामाबाबत पूर्णपणे देखरेखीखाली विशेष कार्यकारी अधिकारी (ओ.एस.डी.) यांची नेमणूक करावी. जेणे करून सिडको भागातील उर्वरित कामाबाबत जाणीव राहिल. चर्चा करण्याऐवजी आता अंमलबजावणी करावी.

श्री. थोरात बाळासाहेब :महानगरपालिकेमध्ये हस्तांतर करण्यापूर्वी सिडकोने खुल्या जागावरील अतिक्रमण काढणे आवश्यक आहे व त्यावर तार कुंपन करावे तेथील शाळा व उद्याने याची पाहणी करून हस्तांतर व्हावे. किती प्रकरणे न्याय प्रविष्ट आहेत याची माहिती द्यावी.

श्री. भाऊसाहेब ताठे : सिडकोचे हस्तांतरण करित असतांना मालमत्ता कराचा हा मुळ मुद्दा आहे त्यामुळे ज्यावेळी हस्तांतर होईल तेंव्हापासूनच कर लागू व्हावा. घर मालक हा घराचा मालक होत नाही तो पर्यंत जुन्या कर लावावा. आखिव पत्रिका (पी.आर. कार्ड) देण्यात यावे. फॅसिलिटी प्लॉट देण्यात यावेत.

श्री. तायडे पांडूरंग : महानगरपालिकाकडे सिडकोचे हस्तांतरण झाल्यास सिडको नागरिकांना जुन्या दरोन कर आकारणी करावी.

श्री. भगवान रगडे : सिडकोचे हस्तांतर करणार त्यापूर्वी महापौरांसह मुंबईला गेलो होतो. या संदर्भात चर्चा पूर्ण झाली होती. त्यानुसार शासन निर्णय निर्गमित झाला आहे. त्यावेळी मांडलेले बरेच मुद्दे शासन निर्णयात आले नाही. सिडको मालमत्ता महानगरपालिकेस देण्यात यावी. १६८ खुल्या जागा आहेत सिडकोने भाजी मार्केट साठी २०० लोकांना अलॉटमेंट केलेले आहे. सर्व जागा विकल्यानंतर हस्तांतरण करणार का? यावेळी महानगरपालिका अधिकाऱ्यांनी सर्वे करायला हवे होते. जागा किती आहे, त्याचे क्षेत्र किती, किती जागेवर अतिक्रमण झालेले आहे, फक्त कागदोपत्रीच हस्तांतर होणार आहे का? सविस्तर माहिती देण्यात यावी. हस्तांतर कसे होणार आहे.

श्री. जगताप मोतिवाला : सिडको हद्दिमध्ये ज्या अनधिकृत वसाहती बसलेल्या आहेत त्यांना योग्यरित्या सुविधा मिळणे आवश्यक आहे. जो भाग अनधिकृत रित्या बसलेला आहे त्यांना स्लम घोषित करावे व रु. ४.५० कोटी सिडकोकडून येणे आहे तो सर्व खर्च या भागासाठी विकसित करणेसाठी करावे.

श्री. सुरगोणीवार, सौ. शिंदे रुख्मीणी, श्रीमती किवळेकर जयश्री : सिडकोकडून हस्तांतर झाल्यानंतर जो ४.५० कोटीचा निधी महानगरपालिकास मिळणार आहे त्या निधीचा वापर सिडकोतील ज्या भागामध्ये अपूर्ण सुविधा राहिलेल्या आहेत त्या ठिकाणी खर्च करण्यासाठी उपयोग व्हावा इतरत्र करण्यात येऊ नये. सिडकोतील नागरिकांकडून मालमत्ता कर हा सिडको हस्तांतरण झाल्यापासून व्हावा. जी सिडकोची घरे भाडे तत्त्वावर, लिजवर आहेत ती स्वतंत्र मालकी हक्काबाबत पूर्ण करावे. अशी शिफारस शासनाकडे करावी. जसे घर तसा कर हि पध्दत अवलंबविण्यात यावी.

सौ. घायतिलक लिलावती : माझ्या वॉर्डामध्ये प्राथमिक स्वरुपाच्या ज्या नागरिकांना सुविधा द्यावयास पाहिजे त्या मिळत नाही व कोणत्याही प्रकारचे दुर्लक्ष होता कामा नये. पहिला मुद्या सिडकोने सर्व सुविधा उपलब्ध करून द्यावे व पहिल्यांदाच अंमलात आणावा. प्राथमिक सुविधाकडे दुर्लक्ष होता कामा नये. ड्रेनेज, साफसफाई नही, पाणी प्रश्न आहे तसेच दिवाबत्तीचा ही प्रश्न आहे. एन-२ भागात सर्वस्वी दुर्लक्ष होत आहे जातीने लक्ष द्यावे.

श्री. किशोर तुलशीबागवाले : सिडको हस्तांतर होत असतांना शहर वासीयांवर अन्याय होता कामा नये. सिडको हस्तांतरानंतर सिडकोतील मालमत्ता कराचा प्रमुख मुद्या असून सिडकोतील घरांना चालू एन, आर. व्ही प्रमाणे मालमत्ता कर लावावे. ज्या १६८ जागा खुल्या स्वरुपातील आहेत त्यावर अनधिकृत वसाहती किंवा अतिक्रमण होता कामा नये. यावर महानगरपालिकाने हस्तांतर केल्यानंतर देखरेख ठेवावे याची सविस्तर माहिती द्यावी. १६८ पैकी ७३ जागांवर संरक्षित भिंत बांधली आहे. संपूर्ण अतिक्रमण काढून घ्यावे.

श्री. काशिनाथ कोकाटे : सिडको हस्तांतरण महानगरपालिकेकडे होत आहे. त्यामुळे विकास कामांचा मार्ग मोकळा झाला आहे. महानगरपालिकेने सिडको हस्तांतरण बाबत ज्या अटी लावलेल्या आहेत. त्यातील ८०% अटी पूर्ण होत आलेल्या आहेत. रु. ४.५० कोटी सिडकोकडून मिळणार आहेत त्या पैशामधून सिडकोतील जी अपूरे कामे आहेत त्याचे मेंटनेन्ससाठी सदरील पैशाचा विनियोग त्या त्या भागासाठी करावा. अनाधिकृत वसाहती ज्या आहेत त्याबाबतचा प्रकल्प विभागाने सर्व्हेक्षण केलेला आहे. जवळपास ११४ वसाहतींना सर्व्हेक्षण झाल्याचे यादीवरून दिसते. आणखी काही वसाहतींचा

सर्व्हेक्षण करणे बाकी आहे. तेंव्हा सिडको भागातील काही भागांचाही समावेश व्हावा. सभागृहामध्ये स.स.नी त्यांच्या त्यांच्या भागातील ज्या भागांचा सर्व्हेक्षण अद्यापही शिल्लक आहे त्या भागांचा सर्व्हेक्षण करून समावेश करावा व एकत्रितरित्या यादी तयार करून अनाधिकृत वसाहतीसाठी लागणाऱ्या सुविधांसाठी महानगरपालिकाने शासनाकडून अनुदान बाबतची मागणी करून महानगरपालिकेने सुविधा पुरविणेची व्यवस्था करावी. दिनांक २७/०६/२००१ रोजी झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत सभागृहामध्ये स. सदस्यांना दाखविणे आवश्यक आहे. सिडको हस्तांतरानंतर सिडकोतील रहिवाश्यांच्या निवासी घरांना मालमत्ता कर हस्तांतरापासूनच लावावे. सिडकोतील घरांना टॅक्स लावत असतांना चार प्रकारे वर्गवारी करून "अ,ब,क,ड" अशा टाईप मधील घरांच्या प्रकारान्वये कर लावून वसुली करावे. कारण की, सिडकोतील घरे हि वेगवेगळ्या टाईपमधील घरे तयार झालेली आहेत. काही घरे जुनी आहेत तर नव्याने बांधण्यात आलेली घरे ही नवीन पध्दतीची आहेत. त्यानुसार वर्गवारी करून मालमत्ता कर आकारावा काही घरे दुर्बल घटक या वर्गामध्ये बसत असललेल्या व्यक्तीसाठी आहेत त्यांचे त्या प्रमाणानुसारच कर आकारणी करावी. शहरातील बऱ्याच घरांना उदा. गुलमंडी, पैठणगेट, औरंगपुरा येथील निवासी घरांना जून्या एन.आर.व्ही. दरानेच मालमत्ता कर लावण्यात आलेला आहे. त्यानुसारच सिडकोतील ज्या जुन्या वसाहत आहे त्यांच्या घरांना जुन्या दरानेच कर लावावा. आता सध्या ज्या सिडकोतील इमारती आहे त्या भाडपट्ट्याने दिलेल्या असतील तर तशा इमारतींचे करार रद्द करावे. सिडको ने ज्या १६८ खुल्या जागा ठेवलेल्या आहेत. त्यावर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होऊ नयेत यासाठी सिडको व महानगरपालिका यांनी एकत्रित पाहणी करून निर्णय घ्यावा. सिडकोतील एन-२ चे खेळाचे ग्राऊंड आहे ते महानगरपालिकेकडे हस्तांतर करावे. ज्या लिजवर दिलेली घरे / जागा आहेत त्या फ्रि होल्ड करणेबाबत कार्यवाही व्हावी. सिडकोचे हस्तांतर करीत असतांना महानगरपालिकास आवश्यक कर्मचारी वर्ग नेमावे लागणार आहे. तो कर्मचारी वर्ग महानगरपालिकाने सध्या स्थित असलेल्या कर्मचाऱ्यांमधूनच करावा. सिडकोकडून कर्मचारी वर्ग घेण्यात येऊ नये. कारण सिडकोकडून येणाऱ्या कर्मचारी वर्गाची जेष्ठतेबाबत वाद तयार होईल व त्या सर्व कर्मचाऱ्यांची जेष्ठता नव्यानेच गृहित धरण्यात येईल. नियोजन व अधिकार हे समजून अधिकार सर्वस्वी महानगरपालिकेस असावे.

सौ. लोखंडे कचराबाई : शहरातील गारखेडा परिसर व न्यायमुर्ती परिसर हा डिनोटीफाईड एरिया आहे तो अधिकृत करून त्या ठिकाणी नागरिकांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात याव्यात. सिडकोकडून मिळणाऱ्या ४-५ कोटीतून रस्ते, पाणी, ड्रेनेज, लाईट ई. कामे करावी.

श्री. सुदाम सोनवणे : सिडको हस्तांतरणाबाबत डिसेंबर ९९ मध्ये ठराव झालेला आहे. शासनासही निर्णय कळविण्यात आला आहे. मागे सभागृहाने यात सहभाग घेवून महानगरपालिकेवर कोणती जाबाबदारी पडेल याबाबत चर्चा झाली. सिडकोवर प्रेम दाखवून सर्वानुमते मंजुरी दिली त्यास शासनानेही मंजुरी दिली. आपण काल मुंबईत लीज होल्ड व फ्रि होल्ड ह्या बाबतचा मुद्या कायम धरून ठेवला. सिडको संचालक मंडळाने मंजुरी दिलेली आहे. आज

ही आपण सहमत आहोत. आपण सिडकोतील प्राथमिक सुविधंसाठी १२ कोटी मागणी केली. परंतु यावर संयुक्त कमेटी करून सर्वे कराण्यात जो खर्च येईल तो मान्य करावा. सिडकोने देखभाल दुरुस्तीसाठी १.७५ कोटी ठेवली होती आता ती ४-५ कोटी मान्य करण्यात आली. सिडकोतील ३९ माळी व ३१ कर्मचारी महानगरपालिकेकडे देण्याबाबत कोणते कर्मचारी घ्यावयाचे ते महानगरपालिकेस स्वातंत्र्य राहिल. जेष्ठता सोडून येथे काम करण्यास ते तयार होणार नाही. अस्थायी आहेत त्यांचा विचार करावा व सामावून घ्यावे. सिडकोने ज्या उद्येशासाठी इमारती बांधल्या त्या ताबडतोब महानगरपालिकेस हस्तांतर करून द्यावे व जे लिजवर दिलेल्या आहेत ते देखील रिकामे करून द्यावे. एन-२ येथील मैदान सिडको शहरातील नागरिकांसाठी औरंगाबाद जिल्हा क्रिकेट असोसिएशन बरोबर केलेला करार रद्द करून महानगरपालिकेस हस्तांतर करावे. एक अट सर्व नगरसेवकांनी ठराव पारीत केला म्हणून कळवावे. सुविधा कधी देणार ते देखील सांगावे मागे सिडकोने मंजूर केलेली कामे चालू ठेवावे. मागच्या व आताच्या सभागृहाचे अभिनंदन.

श्री. जयवंत ओक : शासन निर्णयामध्ये गुंठेवारीचा उल्लेख नाही अनाधिकृत वसाहतीत खर्च करणार की नाही. आता पर्यंत मालमत्ता कर भरलेला आहे तो माफ करून पुढे लावणार. गृहनिर्माण संस्थेबाबत ठोस निर्णय घेण्यात यावा. २५% लोक वर्गणी व ७५% महानगरपालिका भरून काम करावे. एम-२ वरील क्रीडांगण महानगरपालिकेकडे हस्तांतर करून घ्यावे.

मा. महापौर : सिडकोचे मुख्य प्रसासक यांनी आपली माहिती द्यावी.

मुख्य प्रशासक सिडको (भावडे साहेब) : माझ्या सत्सदविवेक बुध्दीप्रमाणे निवेदन करीत आहे. मुळात सिडको हे मंडळ आहे. मुख्य भूमिका विकास कामे करून नवीन भाग बसावयाचा प्राथमिक सवलीत द्यावयाचे नंतर स्थानिक स्वराज्य संस्थेकडे द्यावयाचे संचालक मंडळाकडून ठरविण्यात येते. सिडकोतील जो मुख्य भाग आहे तो विकसित झाला आहे व य ठिकाणी सिडको भागातील स. नगरसेवक यांनी आपआपले मत मांडले व सविस्तर चर्चा सभागृहात केली. त्यांच्या विविध मते मांडली त्यानुसार सिडकोतर्फे हस्तांतर पूर्वी कार्यवाही होईल. सिडको हस्तांतर बाबत मुंबई येथे दि.२७/०६/२००१ रोजी जी बैठक सिडको अधिकारी महानगरपालिका अधिकारी / पदाधिकारी तसेच मंत्रालयातील अधिकारी, सचिव यांचे समवेत झालेल्या बैठकीचा वृत्तांत मुख्यलेखाधिकारी महानगरपालिका यांनी सभागृहात सादर केलेला आहे. त्यानुसार अंतिम निर्णय व्हावा. सिडको हस्तांतर प्रक्रियेला काही कालावधी लागेल. कारण सिडको अधिकारी व महानगरपालिका अधिकारी यांची संयुक्त पाहणी वेगवेगळ्या विभाग निहाय होईल. सिडको एन-२ मधील क्रिकेटचे ग्राऊंड आहे ते ११ वर्षाच्या लिजवर दिलेले आहे. महानगरपालिकेच्या काही अपेक्षा होत्या, सिडकोचे नगरसेवक, प्रशासन यांचे सहकार्य राहिले. स. सदस्यांनी वेळोवेळी सहकार्य केले. त्याबद्दल त्यांचे आभारी आहे.

श्री. स. अली सलामी : सन १९९५ च्या पूर्वीचे घरे जे आहेत त्यांना जुन्या एन.आर.व्ही प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी करावी व सन १९९५ च्या नंतरचे जी घरे आहेत त्यांना नवीन दराने कर आकारणी करावी.

मा. महापौर : सिडको हस्तांतरण या विषयावर आजच्या बैठकीत सर्व स. सदस्यांनी विस्तृत अशी चर्चा केलेली आहे व हस्तांतरण करीत असतांना सिडको वासियांवर कोणत्या प्रकारचा अन्याय होणार नाही याचीही सदस्यांनी खबरदारी घेतलेली आहे. व सर्वांनी सहकार्याची भूमिका ठेवलेली आहे. सिडको व महानगरपालिका अधिकारी यांनी सुध्दा सिडको व हडको नगरवासीयांवर कोणत्याही प्रकारे नागरी सुविधा बाबत अन्याय होणार नाही याचीही खबदारी घेतलेली आहे. सर्वप्रथम शासनाचा जो जी.आर. आपल्याकडे प्राप्त झालेला आहे. मागील महिन्यांच्या २७/०६/२००१ रोजी मंत्रालयात सिडको अधिकारी, महानगरपालिका अधिकारी तसेच पदाधिकारी व मुख्य सचिव, यांचे समवेत बैठक झालेली होती त्या बैठकीत ठरल्यानुसार कालच या मुख्यमंत्री महोदय यांची सिडको हस्तांतरण बाबत स्वाक्षरी झालेली आहे व या बाबतचा जी.आर. आजच महानगरपालिकेला प्राप्त होईल. ज्यामध्ये रु. ४.५० कोटी महानगरपालिकास मिळणार आहेत. तो सुध्दा जी. आर. आजच येणार आहे. ही सर्व माहिती सभागृहात सांगत असतांना सर्वप्रथम बैठकीतील कार्यक्रम पत्रिकेनुसार "सिडको हस्तांतर महानगरपालिकेकडे झाले" असे मी सर्व प्रथम आज जाहिर करतो.

सिडको हस्तांतरणाच्या संदर्भात सभागृहात स. सदस्यांनी चर्चेअंती जे मुद्दे मांडले त्या बाबत मी सभागृहात काही बाबी मांडू इच्छितो.

१) सिडको व महानगरपालिकेचे हस्तांतरण "करारपत्रावर" येत्या आठ दिवसात स्वाक्षऱ्या करण्यात येईल

२) सिडकोतील खुल्या जागेवरील जे अतिक्रमण किंवा अनधिकृत बांधकामे असतील ते सिडकोने काढून तारकुंपन करून महानगरपालिकेकडे हस्तांतर करावे.

३) गृहनिर्माण सोसायटी विकसित करण्यासाठी ५०% रक्कम नागरिकांकडून घेण्यात यावी व ५०% महानगरपालिकेने द्यावी.

४) रु. ४.५० कोटी सिडकोकडून महानगरपालिकेस मिळणार आहेत ते प्राथमिक सुविधा अद्ययावत करण्यासठी सिडकोतील नागरी सुविधांकरिता खर्च करावेत.

५) सिडकोतील जो अनधिकृत नोटीफाईड भाग आहे त्यावर गुंठेवारी जी.आर. नुसार कार्यवाही करून तेथील भाग विकसित करावेत.

६) सिडकोतील रहिवाशांकडून मालमत्ता कर हा सिडको हस्तांतरण झाल्यानंतर म्हणजेच आजपासून लागू करण्यात यावा. आणि मालमत्ता कर लावीत असतांना जसे घर तसा कर या प्रमाणे "अ,ब,क,ड" या नुसार जुन्या दरानेच कर आकारणी करावी. सिडकोतील घरे जुनी असल्याने घराचे वर्गीकरणानुसार कर आकारणी व्हावी.

७) या अगोदर ज्यांची मालमत्ता कराची वसुली केली आहे त्यांची पुन्हा कर आकारणी होऊ नये.

८) सिडकोतील स. नगरसेवक यांच्या पत्रानुसार सिडकोसाठी रु. ४.५० कोटी उपलब्ध होतील. त्यातूनच सिडकोमधील नागरी सुविधा पुरविण्यासाठी फक्त खर्च करावा व सिडकोतील कामे त्वरित सुरू करावी.

९) सिडको एन-२ येथील क्रिकेट ग्राऊंड ने लिजवर दिलेले आहे ते कायदेशीर सल्ला घेवून लिज रद्द करून महानगरपालिकेकडे तातडीने हस्तांतर करून घ्यावे. व कायदेशीर कार्यवाही व्हावी.

१०) सिडकोतील हस्तांतरण करीत असतांना सिडकोतील प्रॉपर्टीज, सिडकोतील कम्युनिटीज सेंटर व सिडकोतील शाळा, उद्याने, दवाखाने, खेळाचे ग्राऊंड किंवा लिजवर दिलेले सभागृह हे सर्व सिडकोने ११ महिन्याच्या करारावर दिलेले आहेत. तो या सर्वच बाबतीतला ११ महिन्याच्या लिजवर झालेला करार सिडकोने रद्द करून महानगरपालिकेकडे हस्तांतर करावे.

११) सिडकोतील हस्तांतर नंतर जे ३१ कर्मचारी सिडकोतील कायम स्वरुपी आहेत त्यांना घेण्यात येऊ नये. त्यांचे ऐवजी अस्थायी कर्मचारी महानगरपालिकाने तातडीने भरावे.

१२) सिडकोमध्ये ज्या मुलभूत सुविधा द्यावयाच्या आहेत त्या १५ ऑगस्ट २००१ पासून सुरू करण्यात येतील १५ ऑगस्टला सिडकोची मुख्य इमारत महानगरपालिकाच्या ताब्यात येईल व त्याच दिवशी त्या ठिकाणी झेंडावंदन महानगरपालिकेतर्फे होईल व कार्यालय सुरू होईल या ठिकाणी (Office on Specil duty) विशेष कार्य अधिकारी यांची नेमणूक करण्यात यावी.

१३) सिडकोतील जो भाग अनाधिकृतरित्या विकसित झालेला आहे त्या ठिकाणी गुंठेवारी पध्दतीने कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या प्रत्यक्ष चर्चेनुसार खालील अटी व शर्तीवर सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्यात यावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

१) सिडको व महानगरपालिकेचे हस्तांतरण "करारपत्रावर" येत्या आठ दिवसात स्वाक्षऱ्या करण्यात येईल

२) सिडकोतील खुल्या जागेवरील जे अतिक्रमण किंवा अनधिकृत बांधकामे असतील ते सिडकोने काढून तारकुंपन करून महानगरपालिकेकडे हस्तांतर करावे.

३) गृहनिर्माण सोसायटी विकसित करण्यासाठी ५०% रक्कम नागरिकांकडून घेण्यात यावी व ५०% महानगरपालिकेने द्यावी.

४) रु. ४.५० कोटी सिडकोकडून महानगरपालिकेस मिळणार आहेत ते प्राथमिक सुविधा अद्ययावत करण्यासाठी सिडकोतील नागरी सुविधांकरिता खर्च करावेत.

५) सिडकोतील जो अनधिकृत नोटीफाईड भाग आहे त्यावर गुंठेवारी जी.आर. नुसार कार्यवाही करून तेथील भाग विकसित करावेत.

६) सिडकोतील रहिवाशांकडून मालमत्ता कर हा सिडको हस्तांतरण झाल्यानंतर म्हणजेच आजपासून लागू करण्यात यावा. आणि मालमत्ता कर लावीत असतांना जसे घर तसा कर या प्रमाणे "अ,ब,क,ड" या

नुसार जुन्या दरानेच कर आकारणी करावी. सिडकोतील घरे जुनी असल्याने घराचे वर्गीकरणानुसार कर आकारणी व्हावी.

७) या अगोदर ज्यांची मालमत्ता कराची वसुली केली आहे त्यांची पुन्हा कर आकारणी होऊ नये.

८) सिडकोतील स. नगरसेवक यांच्या पत्रानुसार सिडकोसाठी रु. ४.५० कोटी उपलब्ध होतील. त्यातूनच सिडकोमधील नागरी सुविधा पुरविण्यासाठी फक्त खर्च करावा व सिडकोतील कामे त्वरित सुरू करावी.

९) सिडको एन-२ येथील क्रिकेट ग्राऊंड ने लिजवर दिलेले आहे ते कायदेशीर सल्ला घेवून लिज रद्द करून महानगरपालिकेकडे तातडीने हस्तांतर करून घ्यावे. व कायदेशीर कार्यवाही व्हावी.

१०) सिडकोतील हस्तांतरण करीत असतांना सिडकोतील प्रॉपर्टीज, सिडकोतील कम्युनिटीज सेंटर व सिडकोतील शाळा, उद्याने, दवाखाने, खेळाचे ग्राऊंड किंवा लिजवर दिलेले सभागृह हे सर्व सिडकोने ११ महिन्याच्या करारावर दिलेले आहेत. तो या सर्वच बाबतीतला ११ महिन्याच्या लिजवर झालेला करार सिडकोने रद्द करून महानगरपालिकेकडे हस्तांतर करावे.

११) सिडकोतील हस्तांतर नंतर जे ३१ कर्मचारी सिडकोतील कायम स्वरुपी आहेत त्यांना घेण्यात येऊ नये. त्यांचे ऐवजी अस्थायी कर्मचारी महानगरपालिकाने तातडीने भरावे.

१२) सिडकोमध्ये ज्या मुलभूत सुविधा द्यावयाच्या आहेत त्या १५ ऑगस्ट २००१ पासून सुरू करण्यात येतील १५ ऑगस्टला सिडकोची मुख्य इमारत महानगरपालिकाच्या ताब्यात येईल व त्याच दिवशी त्या ठिकाणी झेंडावंदन महानगरपालिकेतर्फे होईल व कार्यालय सुरू होईल या ठिकाणी (Office on Specil duty) विशेष कार्य अधिकारी यांची नेमणूक करण्यात यावी.

१३) सिडकोतील जो भाग अनाधिकृतरित्या विकसित झालेला आहे त्या ठिकाणी गुंठेवारी पध्दतीने कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जन गण मन" राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा. महापौरांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १८-०७-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**बुधवार, दि. १८-०७-२००१ रोजी मा. महापौर डॉ. श्री. भागवत कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी ३.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
२) स.स.श्री. संजय पांडुरंग शिरसाठ
३) स.स.श्री. किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
४) स.स.श्री. वाणी ठकूजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहमद
७) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.श्रीमती शकुंतला सांडुजी इंगळे
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
११) स.स.श्री. शिंदे राजु रामराव
१२) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१३) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१५) स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब
१६) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१७) स.स.सौ. रुख्मीनी राधाकिसन शिंदे
१८) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१९) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
२०) स.स.श्री. शे. शकील पटेल शे. बुढण पटेल
२१) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
२२) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२३) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२४) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
२५) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२६) स.स.सौ. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२७) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२८) स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
२९) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३०) स.स.श्री. अय्युब खान सरदार खान
३१) स.स.श्री. अ. रशिद अ. सत्तार
३२) स.स.श्री. जैन विकास रतनलाल
३३) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल

३४) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३५) स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान
३६) स.स.श्री. वडागळे सुनिल बुयवेल
३७) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३८) स.स.श्री. स. मुमताज अली मोज्जम अली
३९) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
४०) स.स.श्री. नासेर खॉन सरदार खॉन
४१) स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव
४२) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४३) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
४४) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४५) स.स.श्री. नुसरत बानो फिरोजखॉन
४६) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४७) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४८) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४९) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
५०) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
५१) स.स.श्री. सुरगोणिवार नारायण चंद्रय्या
५२) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
५३) स.स.श्री. अ. कदीर मौलाना सय्यद
५४) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५५) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५६) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
५७) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
५८) स.स.श्री. नासेर खान अ. रहेमान खान कुरैशी
५९) स.स.सौ. शाहीन जफर महमूद जफर
६०) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगीरथ
६१) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
६२) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
६३) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खॉन
६४) स.स.श्री. गाजी सदोद्दिन गाजी जहीर अहमद
६५) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
६६) स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन
६७) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६८) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
६९) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
७०) स.स.सौ. कागडा बबिता सुभाष
७१) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
७२) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
७३) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास
२) स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
३) स.स.श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज
४) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
५) स.स.श्री. सौ. सलमाबानो मिर मो. अली.

**चर्चा :**

श्री. सुरजितसिंग खुंगर : सर्वप्रथम श्री महापौरांचा आभारी आहे. होर्डीगचा प्रस्ताव घेतला आहे.

मा. महापौर : अगोदर विषयपत्रिका मंजूर करण्यात येईल. त्यानंतर चर्चेसाठी १ तास वेळ दिला जाईल. विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

**विषय क्र. ४४६/१ :**

दिनांक २०/०६/२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री. सोनवणे सुदाम : इतिवृत्तातील पान क्र. ३३ वर मोठे व्यवसायीकधारक काही प्रमाणात सवलतीवर व्यापारी संकूल बांधून देण्यास तयार असेल तर महानगरपालिकेला फायदा होईल या प्रमाणे ठराव करतांना त्यात उल्लेख करण्यात आलेला नाही. बोल्ट पध्दतीने करावे अशी दुरुस्ती करण्यात यावी.

मा. महापौर : दुरुस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते. याच वेळी सभागृहात तिसरी आघाडीचे व इतर काही सदस्य काळ्या रंगाचे कपडे घालून येतात. कालच्या औरंगाबाद बंदमध्ये, महापौर हे शहराचे प्रथम नागरिक असतांना शहरात अशांतता राखण्याचे प्रयत्न केले त्याबद्दल महापौर यांचे विरोधात स. सदस्य डायस जवळ मोठमोठ्याने घोषणा देतात.

मा. महापौर : हा विषय सभागृहाचा होऊ शकत नाही. आपण सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री. स. अली मिरा सलामी : दिनांक १७/०७/२००१ ची सभा का रद्द केली. मा. महापौर यांनी सूचना करूनही स. सभासद मोठमोठ्यांने घोषणा देत होते. (वेळ ३.५० वा.)

श्री. सोनवणे सुदाम , श्री. संजय सिरसाट : स. सभासद सभागृहात काळ्या रंगाचे कपडे घालून आलेले आहे. व मोठमोठ्याने घोषणा देत असून सभागृहास अशांततेचे वातावरण निर्माण केलेले आहे. अशा सभासदांचे सभासदत्व रद्द करावे.

मा. महापौर : कुणीही घोषणा देऊ नये. हा विषय सभागृहाच्या अंतर्गत येत नाही. सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे जे स. सभासद शांतता ठेवत नसतील त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात येईल.

श्री. शिरसाट संजय : १४ महिन्यामध्ये या महानगरपालिकेत १४ आयुक्त येऊन गेलेले आहे. शहरातील विकास कामे करायची आहे. नव्याने आलेले आयुक्त यांची आज

हि पहिलीच बैठक आहे. सभागृहात शांतता असावी याच वेळी घोषणा करणारे स. सभासद मा. महापौर यांचे डायस समोर बसतात. मोठमोठ्याने घोषणाबाजी करतात काहीही ऐकू येत नाही.

मा. महापौर : कुणीही स. सदस्यांनी डायस समोर बसू नये आपआपल्या जागेवर बसावे. औरंगाबादचे नांव संभाजीनगर देण्याच्या प्रकरणावरून सभागृहात वेगळी दिशा देण्यात येऊ नये. हा विषय सभागृहाचा होऊ शकत नाही जे स. सभासद घोषणा करीतील त्यांचे सभासदत्व एक दिवसासाठी रद्द करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

(मा. महापौर यांचे डायस समोर बसलेले स. सभासदांना सूचना करूनही त्यांचे जागेवर जाऊन बसत नाही.)

श्री. जयवंत ओक : जे सभासद आपल्या आदेशाचे पालन करणार नाही त्यांचे १ महिण्यासाठी सभासदत्व रद्द करावे. याच वेळी पुन्हा घोषणा देतात. काही स. सभासद मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही. डायस समोर बसलेले स. सभासद त्यांचे जागेवर जाऊन बसतात.

मा. महापौर : सभा ५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येत आहे. (वेळ दु.४.०० वाजता सभेला सुरुवात ४.१५ वा)

श्री. अंबादास दानवे : आताच सभा तहकूब होण्यापूर्वी काही स. सभासदांनी गोंधळ घालून सभागृहातील माईकची मोडतोड केली. सभागृहात अशांतता करणाऱ्या स. सभासदांचे १ महिण्यासाठी सभासदत्व रद्द करावे.

श्री. संजय सिरसाट : वृत्तपत्रात छापून आले की, ही आपली शेवटची सभा आहे. गेल्या १४ महिण्यामध्ये १४ आयुक्त येथे येऊन गेले. प्रत्येक बैठकीत आयुक्ताबाबत चर्चा होत होती. सभागृहाचे कामकाज तसेच स. सभासदांचे वर्तनाबाबत मुंबईपर्यंत चर्चा झालेली आहे. तत्कालीन आयुक्त यांनी स. सदस्यांविषयी बदनामीकारक तक्रार करून शासनास कळविले तरी सुध्दा त्यांना मोठेपणा दाखवून त्यांचा या महानगरपालिकेच्या वतीने मोठा सत्कार करण्यात आला. नव्याने आलेले आयुक्त यांना आपण किती दिवस येथे राहणार अशी विचारणा केली असता येथील वातावरणावर अवलंबून आहे असे उत्तर मिळाले. येथील स. सदस्यांच्या गैरवर्तनावरून कुणीही आयुक्त आल्यास प्रथम माहिती घेतात व याही आयुक्तांनी माहिती घेतली असेलच. औरंगाबादचे नांव संभाजीनगर देण्याबाबतचा कालाचा जो बदं होता तो कालपर्यंतच मर्यादित होता. मागील बैठकीत सुध्दा अशीच परिस्थित निर्माण झाली त्यावेळी विरोधी पक्ष नेता यांनी सांगितले की, यापुढे आता या विषयावर चर्चा होणार नाही. परंतु आताच काही स. सदस्यांनी मोठमोठ्याने सभागृहात हात वर करून पत्रकारांकडे बघून वृत्तपत्रात छापून येण्यासाठी घोषणा देतात. यामुळे महानगरपालिकेच्या बदनामीस काही स. सभासद सुध्दा जबाबदार आहे. कशासाठी हे करण्यात येते. सभागृहाच्या कामकाजामध्ये अशांतता निर्माण झाली हे काही बरोबर नाही. सभागृहनेता या नात्याने मी नम्रतेने बोलत आहे मी बोलत असतांना कुणी जर मध्ये बोलल्यास त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात यावे. सर्व लोकांचे लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही येथे निवडून आलेलो आहोत. नगरसेवक म्हणून घेण्यांची आम्हला लाज वाटते. बैठकीत असे प्रकार होतात त्याबद्दल वॉर्डातील जनता आम्हाला विचारते. काही अपवाद वगळता या सभागृहाचे नगरसेवक

समजदार व शांततप्रिय तसेच जनतेचे हित लक्षात घेऊन कार्य करणारे आहेत. कोणत्याही पक्षाचा नगरसेवक असेल परंतु आपण आपली महापौर म्हणून आपली भूमिका ही स्पष्ट व कडवट असली पाहिजे. जर कुणी शहराच्या विकासासाठी प्रश्न विचारत असेल त्यास आक्रमक होऊ द्या. तो त्यांचा हक्क आहे. त्यांचा प्रश्न हा शहराच्या विकास कामाच्या संदर्भात निगडीत असला पाहिजे. काही स. सभासदांनी सभागृहात मोठमोठ्योन घोषणाबाजी करून अशांतता पसरवली. त्यामुळे मा. आयुक्तांचे मन आणखीनच विचलित झालेले असेल. जर कुणी सभासद या सभागृहात स्वतःच्या फायद्यसाठी कामकाज चालू देत नसतील तर अशा सभासदांवर कार्यवाही केलीच पाहिजे. आम्ही यासाठी शांत आहोत की, आयुक्त विचलित झाले असते. आम्ही देखील चांगल्या प्रकारे प्रतिकार केला असता. शहराचा विकासा करायचा आहे याची सर्वांनी जाणीव ठेवावी. ज्यांनी मोठमोठ्याने या सभागृहात घोषणा दिल्या व अशांतता निर्माण केली त्या सभासदांचे १ दिवसासाठी सभासदत्व रद्द करावे, अशी मागणी सभागृहाने सुध्दा केलेली आहे.

श्री. अफसरखॉन : शहरातील नागरिकांचे हित लक्षात घेऊन कोण काय निर्णय घेतात याची जाणीव आम्हाला आहे. दि.३०/०६/२००१ रोजी आपण सभा का तहकूब केली होती. त्यांचा खुलासा करावा. आमचे म्हणणे ऐकून घ्यावे.

(याच वेळी पुन्हा काही स. सभासद मोठमोठ्याने बोलतात. घोषणा बाजी करतात.)

मा. महापौर : आपण सर्वांनी इतर विषयावर चर्चा न करता विषय क्र. १ वर चर्चा करावी. जे सभासद आदेशाचे पालन करणार नाही त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात येईल.

श्री. अफसरखॉन : आमच्यावर काय कारवाई करायची ती करावी. या सभागृहात आयुक्तांचा संदर्भ घेऊन सूचना मांडण्याचा प्रयत्न होतो. किती विकास कामे आपल्या काळात झाली याची जाणीव सर्व सदस्यांना आहे. काहीही विकास कामे आपण केलेली नाही.

श्री. स. अली सलामी मिरा सलामी : सभागृहनेता यांना बोलण्याची संधी दिली आम्हालाही आमच्या सूचना मांडू द्याव्यात.

मा. महापौर : विषय क्र. १ वर बोलावे दुसऱ्या विषयावर बोलू नये. चर्चेसाठी वेळ दिला जाईल त्यावेळी आपली सूचना मांडावी.

(यावेळी पुन्हा स. सभासद मा. महापौर यांचे डायस जवळ जाऊन मोठमोठ्याने बोलतात व आम्हाला आमची सूचना मांडून द्यावी म्हणून मागणी करतात. मोठमोठ्याने घोषणा देतात.)

श्री. अंबादास दानवे, श्री. सुदाम सोनवणे, श्री. संजय शिरसाठ : जे सभासद अशांततेचे वातावरण सभागृहात निर्माण करत असतील त्यांचे १ दिवसासाठी सभासदत्व रद्द करावे.

मा. महापौर : बऱ्याच वेळा मोठमोठ्याने बोलून सभागृहात अशांततेचे वातावरण निर्माण करू नये. घोषणा बाजी करू नये. हा विषय सभागृहाचा होत नाही अशी सूचना करून सुध्दा काही स. सभासद मोठमोठ्याने डायस जवळ येऊन बोलत आहे. कामकाज बंद करण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणून स. सभासद श्री. अफसर खॉन यासीन खॉन, श्री. स. अली मीरा सलामी, श्री. कैसर खॉन बद्रोद्दिन खॉन, श्री. स. सलीम स. युसूफ या चार स.

सभासदांचे १ दिवसासाठी सभासदत्व रद्द करण्यात येते. कृपया त्यांनी सभागृहाबाहेर जावे.

(ज्या स. सभासदांचे १ दिवसासाठी सभासदत्व रद्द केले ते सभासद सभागृहाबाहेर जात नाही.)

मा. महापौर : ज्या चार स. सभासदांचे १ दिवसासाठी सभासदत्व रद्द केलेले आहे त्यांनी सभागृहाबाहेबर जावे. सुरक्षा रक्षक यांनी त्यांना बाहेर काढावे.

श्री. अफसरखॉन : आपण आपल्या अधिकाराचा गैरवापर करून आमचे सभासदत्व रद्द केले आहे. आम्ही सभागृहाबाहेर जाणार नाही आमच्यावर काय जी कार्यवाही करायची ती करावी.

मा. महापौर : आपण विषय क्र. १ वर चर्चा चालू असतांना एकदम सभागृहात येऊन कालच्या बंदचा संदर्भ घेऊन सभागृहात घोषणाबाजी सुरू केलेली आहे. सभागृहात अशांतता पसरविण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून आपले सभासदत्व एक दिवसासाठी रद्द करण्यात आलेले आहे. विषय क्र. १ आता चर्चा करावी.

श्री. स. अली मिरा सलामी : सभागृह नेता यांना आपण बोलण्याची संधी दिली. आम्हालाही ०२ मिनिटे आमची सूचना मांडू द्यावी.

मा. महापौर : आपण चर्चा करू नये. विषय क्र. १ वर बोलावे ज्यांचे सभासदत्व रद्द केले त्यांनी सभागृहाबाहेर जावे.

याचवेळी पुन्हा काही स. सभासद मोठमोठ्याने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

आजची सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यांत येते असे मा. महापौर यांनी घोषित केले. ४.४० वाजा तहकूब झालेली सभा पुन्हा ५.१० वाजता सुरू झाली.

श्री. घोडेले नंदकुमार : मागील बैठकीत जो विषय स्थगित ठेवण्यात आलेला होता. त्यास मंजुरी देण्यात यावी. नगररचना विभागाने माहिती पाठविलेली आहे. त्याची नोंद घेवून मंजुरी द्यावी.

मा. महापौर : मागील सभेतील चर्चेनुसार याबाबतचा दुरुस्त प्रस्ताव आलेला आहे त्यावर ऐनवेळी निर्णय घेता येईल.

श्री. राधाकृष्ण गायकवाड, श्री. संजय शिरसाट : ज्यांचे सभासदत्व रद्द केले त्या स. सभासदांनी अगोदर बाहेर जावे. त्यानंतरच सभेचे कामकाज सुरू करावे. आपल्या आदेशाचे पालन होत नसेल तर अशा सदस्यांवर कार्यवाही केली पाहिजे.

मा. महापौर : ज्या स. सभासदांचे सभासदत्व रद्द केले त्यांनी सभागृहाबाहेर जावे. विषय क्र. १ वर चर्चा करावी. वरील दुरुस्त्यासह विषय क्र. १ मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

दिनांक २०/०६/२००१ च्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्तातील ... ठराव क्र. ४१४ च्या मंजुरीमध्ये न.भू.क्र. २०६६६,२८३४ व २८३३ चे क्षेत्र संपादन केल्यानंतर या भागाचा बोल्ट पध्दतीनुसार विकास करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वरील दुरुस्ती व वाढ यासह दिनांक २०/०६/२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

श्री. जयवंत ओक : ज्यांचे सभासदत्व रद्द केले ते सदस्य रद्द केले ते सदस्य सभागृहाबाहेर जात नाही आपल्या आदेशाचे पालन होत नाही. अशा सदस्यांचे १ महिण्यासाठी सभासदत्व रद्द करून सुरक्षा रक्षक, पोलिस कुमक मार्फत त्या सदस्यांना तात्काळ बाहेबर काढावे. मा. महापौर यांनी वेळोवेळी आदेश करूनही सभासदत्व रद्द केलेले सभासद सभागृहातच उपस्थित असतात. मोठमोठ्याने बोलणे चालू असते काहीही ऐकावयास येत नाही.

मा. महापौर : विषयपत्रिकेवरील विषय मंजूर करण्यात येत असून सभागृहात गोंधळ होत असल्यावे विषय क्र. २ वर चर्चा होऊ शकत नसल्याने ते पुन्हा पुढील सभेपुढे ठेवण्यात यावे. ऐनवेळचे विषयापैकी एक प्रशासनाच्या विषय एम.एस.ई.बी. ला ५० लक्ष रुपये देण्या संदर्भात असून त्यास स्वीकृतीसह मंजुरी देण्यात येते. तसेच ऐनवेळचे सर्व विषय मंजूर करण्यात येत आहे.

**विषय क्र. ४४७/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या हद्दित रस्त्याच्या कडेला दुभाजकामध्ये महानगरपालिकेच्या जागेत असलेल्या जाहिरात फलक धारकांकडून किंवा एजन्सीकडून खाजगी जागेवर १.१४ प्रति चौ. मी. प्रतिमहा व महापालिका जागेवर १.२६ प्रति चौ. मी. प्रतिमहा व ॲड पोल ३.१९ प्रति चौ. मी. प्रतिमहा या दराने जाहिरात कर वसूल करण्यात येत आहे. सदरील दर अत्यंत कमी आहे. महानगरपालिका हद्दित आत असलेल्या सिडको प्रशासनाने सिडको भागात निविदा मागविल्या आहेत. त्याच धर्तीवरच महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेच्या जागेवर रस्त्याच्या कडेला, रस्ता दुभाजकामध्ये महानगरपालिकेच्या जागेवर जाहिरात फलक, ॲड पोल, रस्ता दुभाजकामध्ये लावलेल्या ग्रीमवरील चौकोनी ३X४ आकाराच्या लोखंडी फ्रेमवर इत्यादी लावण्याची परवानगी जाहीर निविदा काढून देणे योग्य होईल. करीता जाहिर निविदा अपेक्षित आधारभूतर दर खालील प्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | जाहिरात फलक आधारभूत रक्कम (आकार २०X१० फुट) | २३००/- रु. प्रति जाहिरात फलक प्रति वर्ष |
| २ | ॲडपोलसाठी आधारभूत रक्कम | ३००/- प्रति ॲडपोल प्रति वर्ष |
| ३ | रस्त्याच्या दुभाजकामध्ये आधारभूत | ३००/- प्रति ॲडपोल प्रति वर्ष |
| ४ | विद्युत पोलवर आधारभूर रक्कम आकार २.५X३ फुट | ३००/-प्रति ॲडपोल प्रति वर्ष |
| ५ | रस्त्याच्या दुभाजकमधील चौकानी २X३ आकाराची लोखंडी ग्रीलवरील | ३००/- प्रति प्लेट ग्रीलवारील प्रति वर्ष |

उपरोक्त दर खालील अटी शर्तीच्या अधिन राहून मागविण्यात येतील.

१) जाहिरात क्षेत्रात नोंदणी असणाऱ्या जाहिरात संस्थेस अथवा व्यक्तीस प्राधान्य देण्यांत येईल.

२) जहिरात फलकासाठी अनामत रक्कम रु. १,००,०००/- (एक लाख रुपये) व रस्त्याच्या कडेला ॲडपोल, रस्ता दुभाजकामधील विद्युत पोलवरील, ग्रीलवरील चौकोनी प्लेट इ. करिता २५,०००/- (पंचवीस हजार) प्रत्येकी बिनव्याजी डिमांड

ड्राफ्टच्या स्वरुपात (राष्ट्रीयकृत बँकेचा) उप आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे नांव काढून निविदे सोबत जोडावा.

तसेच निविदेचा पाकिटावर डिमांड ड्राफ्टचा क्रमांक बँकेचे नांव, रक्कम त्याचा उल्लेख करावा, त्याशिवाय आपली निविदा स्विकारली जाणार नाही.

२) जाहिरात संस्थेला व व्यक्तीना कमीत कमी ...५० जाहिरात फलकासाठी नोंदणी करावी लागेल. तसेच रस्त्याच्या कडेचे व रस्ता दुभाजक मधील ॲडपोल करिता कमीत कमी २०० प्रत्येकी फलकाची नोंदणी करावी लागेल. यापेक्षा कमी नोंदणी केलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

३) महानगरपालिका प्रशासनाला जेंव्हा जेंव्हा जाहिरात फलक व ॲडपालेवर जाहिरात करण्यासाठी आवश्यकता भासल्यास जाहिरात संस्थातर्फे पुरविण्यात यावे व याबाबत कोणताही मोबदला देण्यात येणार नाही. मात्र ही संस्था प्रत्येक प्रकारानुसार दहा इतकी मर्यादित स्वरुपात राहील. काही जाहिरात तात्पुरत्या स्वरुपाच्या असल्यास व विशेष प्रसंगी असल्यास अल्पावधीत करता विना मोबदला द्यावे लागेल.

४) रस्त्याच्या दुतर्फा व लगत येणाऱ्या चौकास मनपाच्या जागेवर जाहिरात फलक लावता येतील.

५) फलक रस्त्यास समांतर लावावे लागेल.

६) वाहतुकीस कोणत्याही प्रकारचा अडथळा होणार नाही अशा प्रकारे जाहिरात फलक लावण्यात यावेत. तसेच दुकान व घराच्या प्रवेशद्वारासमोर जाहिरात फलक लावता येणार नाही.

७) जाहिरात संस्थेकडून कोणत्याही परिस्थितीत रहदारीस अडथळा येता कामा नये. वाहतुक शाखा, व पोलिस मुख्यालयाकडून आलेल्या सूचनाचीही अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. तसेच जाहिरात फलक उभारणे पूर्वी पोलिस मुख्यालय तथा वाहतुक नियंत्रण कार्यालयामार्फत ना हरकत प्रमाणपत्र द्यावे व त्याची प्रत महानगरपालिका कार्यालयास सादर करावी.

८) रस्त्याच्या डांबरी भागाच्या पृष्ठ भागापासून जाहिरातीच्या खालच्या भागाचे अंतर कमीत कमी ९ फुट राहील.

९) चौकाच्या मध्यापासून कमीत कमी ५० फुट अंतर असेल या करिता महानगरपालिका जाहिरात धोरणांचा अवलंब करावयाकरिता वाहतुक नियमाचे पूर्णपणे पालन करण्यात यावे.

१०) रस्ता रुंदीकरणाच्या वेळी सदर जाहिरात फलक हटवावे लागतील व त्याचा खर्च जाहिरात संस्थेस करावा लागेल.

११) महानगरपालिकेने दिलेल्या अटी व नियमांचे पालन योग्य प्रकारे होत नाही असे आढळून आल्यास लावण्यात आलेले जाहिरात फलक कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता जप्त करण्यात येतील.

१२) जाहिरात फलकामध्ये वाहन चालकांस किंवा पादचाऱ्यास अडथळा निर्माण होणार नाही. अशा पध्दतीने जाहिरात फलक लावावे लागेल.

१३) महानगरपालिकेने मंजूर केलेल्या डिझाईन (साईज) वैयक्तिक कोणताही अतिरिक्त बदल करू नये. याकरिता महानगरपालिकेतर्फे विशेष परवागनी घेणे आवश्यक आहे.

१४) वाहतुक नियमात निर्माण करणाऱ्या जाहिरात काढून टाकण्यात येईल व त्याकरिता दंड आकारण्यात येईल.

१५) थांबा, पहा, धोका इ. शब्द प्रयोग जाहिरातीत करता येणार नाही.

१६) अनामत रक्कम रु. १,००,०००/- जाहिरात फलकासाठी व २५०००/- (पंचवीस हजार) रस्त्याच्या कडेचे व दुभाजकामधील ॲडपोलसाठी ही रक्कम महानगरपालिकेकडे कार्यादेश मिळाल्यापासून करार संपेपर्यंत अनामत रक्कम म्हणून बिनव्याजी राहील या कालावधीत आपणांकडून काही नुकसान झाल्यास या अनामत रक्कमेतून त्याची भरपाई करून घेतली जाईल.

१७) अश्लील जाहिरात अथवा उत्तेजक जाहिराती किंवा कुणाची मानहानी होईल अशी जाहिरात करता येणार नाही.

१८) दर महिन्याला आपल्या जाहिरात संस्थेद्वारे करण्यात आलेली जाहिरातीची माहिती लेखी स्वरुपात महानगरपालिकेस द्यावी लागेल. लेखी स्वरुपात माहिती सादर न केल्यास जाहिरात फलक प्रतिमहा १०००/- रु. व रस्त्याच्या कडेचे व दुभाजकामधील ॲडपोल करिता प्रतिमहा ५००/- रु. दंड आकारण्यात येईल व या दंडाची रक्कम अनामत रक्कमेतून वसूल करण्यात येईल.

१९) जाहिरात फलकाची उभारणी करतांना किंवा लावतांना किंवा लावल्यानंतर होणाऱ्या मालमत्ता व जिवीत हानीस मनपा प्रशासन जबाबदार राहणार नाही. याची संपूर्ण जबाबदारी नियुक्त एजन्सीवर राहील.

२०) यापूर्वी ज्या जाहिरात संस्थेस व व्यक्तीस जाहिरात फलक लावण्याची परवानगी देण्यात आलेली होती. आजपर्यंतची थकबाकी रक्कम भरलेली नाही, त्यांनी थकीत रक्कम भरणा करून बेबाकी प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

२१) महानगरपालिका प्रशासनाने एक किंवा अनेक व्यक्तीस व संस्थेस निविदेतील सार्वाधिक दरानुसार काम विभागून देण्याचा अधिकार राहून ठेवलेले आहे.

२२) जाहिरात फलक, ॲडपोलचे काम विभागून दिलेल्या व्यक्तीस व संस्थेवर मनपाचे नियंत्रण राहिल, तसेच सम प्रमाणात विभागणी करण्याचे अधिकार मनपाचे राखून ठेवलेले आहेत.

२३) रस्ता दुभाजकामध्ये ॲडपोल फलक उभारतांना दोन विद्युत खांबामध्ये दोन्हीकडे समान अंतर ठेवून केवळ एकच जाहिरात फलक उभारता येईल.

२४) महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या आधारभूत रक्कमेपेक्षा कमी दर असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. ज्या जाहिरात संस्थेस व व्यक्तीची निविदा स्विकारण्यात येईल. संपूर्ण रक्कम निविदा अंतिम झाल्यापासून एक महिण्याच्या आत ५०% दोन आठवड्यात २५% एक महिण्यात पूर्ण भरावी लागेल, अन्यथा करार रद्द केला जाईल.

२५) ज्या जाहिरात संस्थेची व्यक्तीची निविदा १-०४-२००१ पासून स्विकारली जाईल. त्याची दरवर्षी ३१ मार्चपूर्वी मनपा कार्यालयाकडून नुतनीकरण करावे. तसेच नुतनीकरणाच्या वेळी निविदेतील रक्कम अधिक दहा टक्के भरून नवीन परवाना महानगरपालिकेकडून घ्यावा. या बाबतची संपूर्ण जबाबदारी संस्था व व्यक्तीची राहिल. ३१ मार्च पूर्वी रक्कम न भरल्यास पुढील परवाना देण्यात येणार नाही. तसेच साहित्य जप्त करण्यात येईल. तो करार फक्त तीन वर्षासाठी राहिल व करार तीन वर्षानंतर कोणतीही पूर्ण सूचना न देता रद्द होईल जर कराराचे पहिल्या व दुसऱ्या वर्षी नुतनीकरण न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. नुतनीकरामध्ये अधिकार महानगरपालिका प्रशासनाने राखून ठेवलेले आहेत.

२६) मनपा प्रशासनामार्फत देण्यात येणाऱ्या सूचनांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

२७) जाहिरात करतांना जाहिरात फलक, ॲडपोलच्या उजव्या बाजूस महानगरपालिकेने दिलेला परवानगी क्रमांक, वर्षे टाकणे बंधनकारक राहील.

२८) कोणत्याही खाजगी, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान जाहिरात फलक, ॲडपोलमुळे झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी एजन्सीधारकांवर राहील व त्यावर होणारा खर्च एजन्सीस द्यावी लागेल.

२९) केव्हाही एक महिण्याची पूर्व सूचना देऊन देऊन काही किंवा पूर्ण फलक किंवा संपूर्ण कंत्राट रद्द करणे बाबतचे अधिकार मनपा प्रशासनाचे राहील.

३०) लेखी करारनामा करून द्यावा लागेल.

उपरोक्त अटी व शर्तीच्या अधिन राहून जाहिरात फलक, ॲडपोलची जाहिर निविदा काढणे बाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव आगामी सर्वसाधारण सभेत ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४४८/३ :**

उप आयुक्त (प्र.) यांनी प्रस्ताव सादर केला की, लोटाकारंजा भागात नगरसेवक स्वेच्छा निधीतून संगणक प्रशिक्षण सुरु करण्याकरिता सर्वसाधारण सभेचा ठरव क्र. १६७/७ दिनांक १९/१२/२००० अन्वये मान्यता देण्यात आली शासन परिपत्रकक्र. एएमसी/१४२००/२२६४/प्र.क्र.१४४/नवि-२४, दिनांक २६/०२/२००१ नुसार नगरसेवक स्वेच्छा निधीतून संगणक प्रशिक्षण देणे बाबत उल्लेख नव्हता. स. नगरसेवकांच्या मागणीनुसार सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे अभिप्रायासाठी पाठविण्यांत आला. त्यास शासन नगरविकास विभागाकडील पत्र क्र. एएमसी-१४२००/२२६४/प्र.क्र.११४४ नवि-२४, दिनांक १६-६-२००१ अन्वये मान्यता दिलेली आहे.

सदर संगणक केंद्र कार्यान्वित करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १६७/७ दि. १९/१२/२००० अन्वये महानगरपालिकेने आवश्यक ते नियम व विनिमय तयार करण्यात यावेत असे ठरले त्यानुसार य संगणक केद्रासाठी खालील प्रमाणे नियमावली तयार केली असून सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

१) सदर प्रशिक्षण कंद्र लोटाकारंजा येथील सर सय्यद हॉल येथे महनगरपालकेच्य वास्तुत सुरू करण्यंत यावे.

२) सदर संगणक प्रशिक्षण केंद्र हे प्रकल्प संचालक यांच्या अधिपत्याखाली राहील.

३) संगणक केंद्रासाठी प्रशिक्षक व शिपाई हे मानधनावर राहतील मनपात कायम स्वरुपी नोकरी देण बंधनकारक राहणार त्यांची मनपा सेवा म्हणून गृहित धरली जाणार नाही. व भविष्यातही मनपा सेवेचे कोणतेही कायदे त्यांना लागू होणार नाहीत. नियुक्ती बाबत आस्था-१ व २ यांनी कार्यवाही करावी.

४) संगणक प्रशिक्षण केंद्रात महानगरपालिका हद्दितील रहिवाशी असणाऱ्या गरीब व होतकरू उमेदवाराला आयुकत ठरवतील अशी योग्य फि भरल्यानंतर योगय त्या कोर्ससाठी प्रवेश दिला जाईल.

५) संगणक प्रशिक्षण उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराला महानगरपालिकेत नोकरीसाठी कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही. व ते महानगरपालिकेवर बंधनकारक राहणार नाही. मनपा नोकरी देण्यात बांधील राहणार नाही.

६) संगणक प्रशिक्षण केंद्राकरिता मा. खासदार, मा. आमदार निधी किंवा इतर संस्थाकडून, शासनाकडून अनुदान, मदत घेता येऊ शकेल व तो योग्यरित्या खर्च करण्याचा अधिकार महानगरपालिकेला राहील.

७) संगणक केंद्राच्या विविध कोर्सचे अभ्यासक्रम तयार करणे, संगणक प्रशिक्षणाचा कालावधी ठरविणे प्रशिक्षण केंद्राच्या नवीन तंत्राज्ञानानुसार वेळोवेळी अभ्यासक्रम सुधारित करून प्रशिक्षण केंद्राचा विस्तार करणे व इतर प्रशिक्षण केंद्राच्या फी चा विचार करून त्या अनुषंगाने गरीब व होतकरू उमेदवाराला परवडेल अशी माफक फी ठरविण्याचे अधिकार आयुक्त यांचेकडे असतील.

८) प्रशिक्षण केंद्र कार्यरत ठेवण्यासाठी आवश्यक असणारी विद्यापीठ / व्यवसाय शिक्षण मंडळ / संगणक प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याबाबत असलेल्या विविध संस्थेकडून नोंदणी करून घेणे / मान्यता घेणे / प्रवेश देणे, प्रशिक्षण शुल्क वसूल करणे व केंद्राच्या प्रगती व उन्नतीसाठी पाठपुरावा करणे याची जबाबदारी प्रकल्प संचालक यांचेकडे राहील.

९) मनपा या संगणक केंद्राची कोणतीही आर्थिक खर्चाची जबाबदारी स्विकारणार नाही. सदरील केंद्र संपूर्णतः स्वयंपूर्ण राहील अपेक्षित विद्यार्थी संख्या न मिळाल्यास अथवा प्रतिसादर न मिळाल्यास सदरील केद्र काही कारणाने बंद झाल्यास सर्व साहित्य मनपाच्या ताब्यात राहील व त्याचा उपयोग महानगरपालिका इतर कामासाठी करून घेईल.

१०) या केंद्रासाठी असणारा अनुषंगिक निधी त्या प्रभागाच्या स. नगरसेवक स्वेच्छा निधीतून खर्च करण्यांत येईल.

११) सदर प्रशिक्षण केंद्राकरिता लागणाऱ्या सुखसोईसाठी व इतर खर्च नगरसेवक स्वेच्छा निधी व मिळणाऱ्या इतर अनुदानातून मदत निधीतून करण्यात येईल.

१२) इतर स. नगरसेवक यांच्या स्वेच्छा निधीतून त्यांच्या लिखित संमती नुसार या केंद्राकरिता आर्थिक मदत प्राप्त करून घेता येऊ शकेल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण ठराव क्र. १६७/७ दिनांक १९/१२/२००० अन्वये मंजूर झालेल्या संगणक केंद्रासाठी प्रस्तावातील अ.क्र. १ ते १२ च्या अटी लागू करून लोटाकारंजा भागात नगरसेवक स्वेच्छानिधीतून संगणक केंद्र सुरू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *पुरवणी विषय*

**विषय क्र. ४४९/१**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद येथे एकूण १५४ बालवाडी शिक्षिका असून त्यापैकी १८ प्रकल्प विभागात कार्यरत आहे, त्यांना महानगरपालिकेतर्फे १९८८ पासून ते १९९५ पर्यंत फक्त ३००/- रुपये मानधन देण्यात येत होते. तद्नंतर १९९५-९६ पासून त्यांना ७००/- रुपये मानधन देण्यात येते सदरील मानधनानुनच त्यांना प्रवासाचा खर्च तसेच इतर खर्च करावे लागते ते पुरेसे नाहीत.

बालवाडी शिक्षिका हे शिक्षण देण्याचे पवित्र कार्य करीत असतात त्यांना देण्यातयेणारा मानधन हा पुरेसा नसल्याने त्यांना किमान १५०० ते २००० रक्कम रुपये मानधन देण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्ताव सादर.

सुचक - श्री. किशोर तुलशीबागवाले
अनुमोदक - श्री. काशिनाथ कोकाटे,
श्री. नासेर खान कुरैशी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकूण १५४ बालावाडी शिक्षिकेपैकी प्रकल्प विभागात कार्यरत असलेल्या १८ बालवाडी शिक्षकांना देण्यात येणारे रु. ७००/- मानधन पुरेसे नसल्याने या बालवाडी शिक्षिकांना किमान रु. १५०० ते २००० मानधन देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५०/२**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र. ६४ वॉर्डात एससी, ओ.बी.सी व इतर समाज गरीब व मध्यम वर्गातील नागरिक जास्त संख्येने राहतात. त्यांचे मुला, मुली करिता लग्न व मुंजी किंवा इतर सांस्कृतिक कार्यक्रमासाठी प्रशस्त अशी महानगरपालिकेच्या जागेवर विश्वभारती कॉलनी नजीक असलेल्या निरंजन कॉलनीच्या धर्तीवर सांस्कृतिक सभागृह बांधण्यात यावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्ताव सादर.

सुचक - सौ. चंद्रभागाबाई दाणे
अनुमोदक - श्री. स. अ. सलामी स. मिरा सलामी,
श्रीमती किवळेकर जयश्री सारंग

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ६४ मधील गरीब व मध्यम वर्गातील नागरिकांसाठी विश्वभारती कॉलनी नजीक असलेल्या निरंजन कॉलनीच्या धर्तीवर प्रशस्त सांस्कृतिक सभागृह बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५१/३**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, ज्या प्रमाणे प्रभाग समित्याची स्थापना करण्यात आली आहे, तरी चारही प्रभाग समिती सभापतींना खालील सवलती व खर्ची देण्यात यावी.

१) मासिक अभ्यगंतासाठी पाहुणचार भत्ता - १०००/-
२) मासिक ३०० लिटर पेट्रोल
३) कार्यालयात दूरध्वनी व्यवस्था

तरी सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दिन
- श्री. भाऊसाहेब वाघ
अनुमोदक - सौ. विजया किशोर रहाटकर
- श्री. सय्यद सलीम सय्यद युसूफ

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चारही प्रभाग समितीच्या सभापतींना खालील सवलती व भत्ते देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) मासिक अभयगंतासाठी पाहुणचार भत्ता - १०००/-

२) मासिक ३०० लिटर पेट्रोल

३) कार्यालयात दूरध्वनी व्यवस्था

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५२/४**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र. ४५ मयुर नगर येथे नवजीवन कॉलनी शॉपिंग सेंटर येथे हायमास्ट बसविणे बाबत सदरील भागातील नागरिकांची सतत मागणी होत आहे. त्याअनुषंगाने सदर ठिकाणी मोठा चौक असून आजू बाजूला २० ते २५ हजाराची लोकवस्ती आहे सर्व वस्ती ही कामगार वस्ती असून कामगाराला न्याय व हक्क मिळावा म्ळणून या ठिकाणी हायमास्टची आवश्यकता आहे. तसेच तो मोठा चौक असून बाजूला थोड्याच अंतरावर शनिमंदिर असून या भागातील पहिले मंदिर आहे.

करिता वॉर्ड क्र. ४५ मयुरनगर येथील नवजीवन कॉलनी शॉपिंग सेंटर येथे हायमास्ट बसविणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक - श्री. भाऊसाहेब ताठे

अनुमोदक - श्री. जयश्री मोरे, श्री. राधाकृष्ण गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ४५ मयुरनगर येथील नवजीवन कॉलनी शॉपिंग सेंटर येथे हायमास्ट बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ४५३/१**

औरंगाबाद ते जायकवाडी पाणी पुरवठ्याच्या विज देयकापोटी महानगरपालिका सध्या र. रु. ७५.०० लक्ष प्रतिमाह महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ मुख्य अभियंता व अधिक्षक अभियंता यांनी पत्र क्र. २०६ दि. ०४/०४/२००१, पत्रक-१७७८, दि. १०/०४/२००१, पत्र क्र. २१३८, दि. २६/०४/२००१ अन्वये कळविले आहे की, महानगरपालिकेने चालू देयक जळवपास रु. २.०० कोटी हे नियमित भरणा करावे व उर्वरित थकबाकीच भरणा पण करण्यात यावा.

त्यानुसार दि. १९/०५/२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव विषय क्र. ३९२/४ अन्वये महानगरपालिकेतर्फे प्रतिमाह भरणा करीत असलेल्या र. रु. ७५.०० लक्ष ऐवजी र. रु. २.०० कोटी भरणा करणे बाबत व थकीत रकमेची अदाई करण्याचे मार्गदर्शनास्तव प्रस्ताव ठेवण्यात आला होता. परंतु मा. सर्वसाधारण सभेने सदरील प्रस्ताव नामंजूर करून सध्या महानगरपालिकेतर्फे जेवढी रक्कम भरणा करण्यात येते तेवढीच रक्कम म्हणजे र. रु. ७५.०० लक्ष एवढीच रक्कम प्रतिमाह महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना भरणा करण्यात यावी. तसेच महाराष्ट्र वीज नियामक आयोग यांच्याकडे वीज

पुरवठा खंडित न करणे बाबत व वीज बिलाची आकारणी योग्य दराने करणे बाबत पिटीशन दाखल करण्यात आले आहे.

दिनांक १६/०७/२००१ रोजी सदर प्रकरण वीज नियामक आयोगासमोर सुनावणीस निघाले असता महानगरपालिकेची या प्रकरणातील स्पेशल कॉन्सील श्री. व्ही. एन. कावळे, ॲडव्होकेट, मा. उप आयुक्त (महसूल), प्रभारी विधी सल्लागार व श्री. लक्ष्मीनारायण (उप अभियंता-पा.पु.) हे हजर होते.

सुनावणीच्या वेळी महाराष्ट्र विज नियामक आयोग यांनी महानगरपालिकेतर्फे सध्या भरणा करीत असलेली र. रु. ७५.०० लक्ष ही अत्यंत कमी आहे. त्यामुळे भरीव रक्कम (Substantial Amount) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना भरणा करून याबाबतची माहिती पत्राद्वारे अथवा फॅक्सद्वारे सोमवार दि. २३/०७/२००१ पूर्वी मा. महाराष्ट्र विज नियामक आयोगास कळविण्यात यावी. त्यानंतरच पुढील सुनावणीची तारीख देण्यात येईल, असे निर्देश दिले आहेत.

सध्या महानगरपालिकेला दरमहा चालू देयक जवळपास रक्कम रु. २.०० कोटी येत आहे तसेच विद्युत देयकाची मार्च-२००१ पर्यंतची थकबाकी रक्कम रु. ११६.०० कोटी इतकी झाली आहे. म्हणून भरीव रक्कम (Substantial Amount) महाराष्ट्र राज्य विज मंडळ यांना भरण्याकरिता प्रस्ताव विचार विनिमयास्तव सादर करण्यात येत आहे.

करिता मा. विज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार भरीव रक्कम (Substantial Amount) भरणार करणे बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या योग्य त्या निर्णयास्तव तथा मंजुरीस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. महापौर : सध्या महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने आयोगाच्या निर्देशानुसार देयकापेक्षा रु. ५० लाख जास्त रक्कम भरून त्याची माहिती आयोगास कळवावी. या दुरुस्तीसह प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद ते जायकवाडी पाणी पुरवठ्याच्या वीज देयकाबाबत मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडे दाखल झालेल्या प्रकरणात दि. २६/०७/२००१ रोजी सुनावणी होऊन मा. आयोगाने भरीव रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणा करण्यास निर्देश दिले आहेत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने मा. आयोगाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडे भरणा होणाऱ्या रु. ७५.०० लक्ष दरमहाचे देयकाव्यतिरिक्त रु. ५० लाखाची भरीव रक्कम भरणा करून त्याबाबतची माहिती मा. महाराष्ट्र व नियामक आयोगास कळविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५४/२**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या वाढीव हद्दिसाठी १९९१ साली मंजूर झालेल्या विकास योजनेनुसार मौजे कांचनवाडी येथील पैठण रोड लगत महानगरपालिकेच्या हद्दिस लागून व आताच्या सिडको अधिसूचित क्षेत्र गोलवाडी शिवारा लगत कांचनवाडी येथील गट क्र. ७ महानगरपालिकेच्या उत्तर हद्दिला लागून २४ मीटर रुंद विकास योजना रस्त्याची आखणी केली आहे. गट नंबर ७ च्या हद्दिनंतर

पश्चिमेला सिडको हद्दितून पुढे हा रस्ता जात आहे. फक्त गट नं. ७ च्या हद्दिपर्यंत महानगरपालिकेच्या हद्दितून हा रस्ता आहे. सिडको अधिसूचित भागासाठी शासनाने मंजूर केलेल्या विकास योजनेमध्ये वर प्रस्तावित २४ मीटर रुंद महानगरपालिका डि. पी. रोडच्या उत्तरेस सुमारे १७० मीटर अंतरावर पैठण रस्त्यावरून वरील रस्त्याला समांतर २४ मीटर रस्त्याची आखणी केलेली असून हा रस्ता पूर्णत: विकसित करून डांबरीकरणही झालेले आहे. या दोन्ही रस्त्याच्या मध्ये असलेल्या जागेमधून पुन्हा एक १८ मीटर रुंद सिडकोचा रस्ता आहे. आणिया रस्त्याला महानगरपालिकच्या हद्दिवरून येणारे उत्तर दक्षिण १५ मीटरचे दोन व १२ मीटरचा एक रस्ता जोडण्यात आलेले आहेत.

वरील परिस्थितीचा विचार करता व सिडकोने २४मीटर रस्ता विकसित केल्यामुळे इतक्या कमी अंतरावर पुन्हा २४ मीटर रस्ता करणे संयुक्तीक नाही. शिवाय महानगरपालिका खर्चिक बाब असून जनतेला त्याचा जास्त उपयोग होणार नाही. करिता गट नं. ७ मधील रस्ता वगळून निवास भागात सामिल करणे योग्य आहे. मा. संचालक नगररचना महाराष्ट्र पुणे, यांनी देखील वगळण्याबाबत शिफरस करून म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याच्या कार्यवाहीसाठी अनुकुलता दर्शविली आहे.

सबब वरील प्रमाणे म.प्रा. व न. र. अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये गट क्र. ७ मौजे कांचनवाडी येथील रस्त्याची आखणी वगळून निवास भागात सामील करण्यास व या संबंधात करावी लागणारी कार्यवाही जशी अधिसूचना काढणे, सुनावणी देणे, त्यानंतर परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देणे यासाठी सादर प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येते आहे.

सुचक - श्री. नंदकुमार घोडेले
अनुमोदक - श्री. अंबादास दानवे, श्री. भगवान घडामोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दिसाठीच्या मंजूर विकास योजनेनुसार मौजे कांचनवाडी येथील गट क्र. ७ च्या उत्तर हद्दित लागून २४ मीटर रुंद विकास योजना रस्त्याची आखणी असून या रस्त्याच्या उत्तरेला सिडको अधिसचित क्षेत्रातून १८ मीटर रुंद व २४ मीटर रुंद रस्त्याची आखणी केली असून २४ मीटर रुंद रस्ता विकसित केलेल्या असून पैठण रस्त्याला जोडण्यात आलेला असल्याने गट क्र. ७ कांचनवाडी या जमिनीतून जाणार २४ मीटर रुंद विकास योजना रस्ता हा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये वगळून निवास भागात सामिल करण्यास आणि सदर फेर बदला संबंधीची कार्यवाही अंतर्गत अधिसूचना काढणे हरकती व सूचना मागविणे, सुनावणी देणे व परिपूर्ण प्रस्ताव शासनास पाठविणे इ. कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५५/३**

गट क्र. ७२ सातारा येथील नियोजित कपिल वस्तु सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मालकीची जागा शैक्षणिक विभागातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करण्यासाठी फेरबदलाचा प्रस्ताव कार्यान्वित करणे बाबत शासनाच्या नगर विकास विभागाचे निर्देश पत्र क्र. टि.पी.एस. ३०९६/२२९/प्र.क्र.१८०/९८, नवि-९, दि.१५/०१/९८ अन्वये महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे. त्यानंतर सदर संस्थेने महानगरपालिकास दि.

१५/११/२००० रोजी पत्र देऊन कार्यवाही प्रस्तावित करणेबाबत कळविले व त्यानुसार सदर कार्यवाही प्रस्तावित केली आहे.

सदर प्रकरणांतील जागा कपिल वस्तू सहकारी गृहनिर्माण संस्था या संस्थेने १९८० साली विकत घेतली तद्‌नंतर विकास योजनेमध्ये ही जागा शैक्षणिक विभागात अंतर्भूत करण्यांत आली या संस्थेचे एकूण सदस्य ६३ असून त्यापैकी ३६ मागासवर्गीय, १३ ओबीसी, व १४ खुलासा संवर्गातील सदस्य आहेत. यांत स्वातंत्र्य सैनिक २ व माजी सैनिक ४ आहेत. या संस्थेने सदर जागा शैक्षणिक विभागातून वगळून विकास योजनेत रहिवासी क्षेत्रात दर्शविल्याबाबत शासनास विनंती केली. त्यानुसार शासनाने त्यांच्या विनंतीच्या साकल्याने विचार करून महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये कार्यवाही करणेबाबत वरील निर्देशीत पत्रांत केले आहे. सदर फेरबदल कार्यान्वित होणेबाबत अर्जदार संस्थेने लोकशाही दिनात तक्रार केली होती.

या जागेतून एक उच्च दाबांची विद्युत वाहिनी जात असून सदर जागा ८ एकर ४ गुंठे असल्याने विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार विद्युत वाहिनी पासून अनुज्ञेय अंतर सोडून रहिवास विकास परवानगी देय होते. करिता शासनाचे निर्देश विचारात घेता फेरबदलाची कार्यवाही सुरू करणे संयुक्तिक राहील. तरी संस्थेचा प्रस्ताव मान्य करून शासन निर्देशानुसार कलम ३७ ची कार्यवाही सुरू करण्याचे विचारार्थ सादर.

प्रस्तावात मंजुरी झाल्यावर कलम ३७ अन्वये फेरबदलाची कायदेशीर कार्यवाही करून प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्तांना प्रदान करण्यांत यावे. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नियोजित कपिल वस्तु सहकारी गृहिनिर्माण संस्था यांचा विनंती आणि शासनाचे नगरविकास विभागाकडील पत्र क्र. टि.पी.एस. ३०९६/२२९/ प्र.क्र.१८० /९८, नवि-९, दि.१५/०१/९८ मधील प्राप्त निर्देश यानुसार विकास योजनेतील शैक्षणिक विभागात अंतर्भूत असलेली कपिल वस्तु सहकारी गृहनिर्माण संस्थेची गट क्र. ७२ सातारा येथील जागा निवासी विभागात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. कलम ३७ अन्वये फेरबदला बाबतची कायदेशीर कार्यवाही करून प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी पाठविण्याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५६/४**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझ्या वॉर्डातील महानगरपालिकेच्या शाळेच्या आवारात शिक्षण क्षेत्रातील आदरणीय व आदर्श असे व्यक्तीमत्व "स्व. साने गुरुजी" यांचा पुतळा बसवण्यात यावा करिता सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

सुचक - श्री. साहेबराव कावडे
अनुमोदक - १) श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
२) श्री. भाऊसाहेब ताठे, ३) श्री. प्रशांत देसरडा,
४) श्री. मधुकर सावंत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ९ येथील महानगरपालिका प्रा. शाळेच्या आवारात शिक्षण क्षेत्रातील आदर्श "स्व. साने गुरुजी" यांचा पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५७/५**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नुकताच महानगरपालिका हद्दित रेल्वे स्टेशन येथे उड्डाण पुल बांधण्यात आला व त्याचे उद्घाटन सुध्दा झाले असूनया पुलावरून मुख्यत्वे करून औरंगाबाद ते पैठण या संत एकनाथ महाराजाच्या पवित्र भूमीकडे तसेच पैठण या पर्यटन स्थळाकडे जाणारी वाहतुक आहे या बाबींचा विचार करून सदरील उड्डाण पुलास संत एकनाथ महाराज उड्डानपुल असे नांव देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. नंदकुमार घोडेले,
श्री. संजय शिरसाट, श्री. काशिनाथ कोकाटे
अनुमोदक - श्री. प्रशांत देसरडा, श्री. भगवान घडामोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका हद्दितील रेल्वे स्टेशन येथे बांधण्यात आलेल्या उड्डाण पुलास "संत एकनाथ महाराज उड्डाणपुल" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५८/६**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग समिती "ब" साठी कार्यालय तयार करणे करिता मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेनुसार तसेच सर्वसाधारण सभेमध्ये पारीत झालेल्या ठरावानुसार महानगरपालिका विभाग क्र. ३ चे कार्यालय शहागंजच्या लगत असलेल्या विभाग क्र. ८ मध्ये स्थापित करावयाचे होते व विभाग क्र. ८ चे कार्यालय महानगरपालिका वाचनालय शहागंज येथे स्थालांतरीत करावयाचे होते.

तथापि सदरील जागा विभाग क्र. ८ साठी अपुरी पडत असल्याकारणाने सदरील कार्यालय व प्रभाग समिती "ब" चे कार्यालय किराडपुरा जसवंतपुरा पाण्याच्या टाकी समोरील परमवीर अब्दुल हमीद सांस्कृतिक सभागृहामध्ये स्थलांतरीत करणे बाबत मा. आयुक्त महोदय यांनी दि. १८/०७/२००१ अन्वये मा. सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा करून निर्णय घेणे बाबत आदेशित केलेले आहे. त्यानुसार विभाग क्र. ८ चे विभागीय कार्यालय व प्रभाग समिती "ब" चे कार्यालयाची व्यवस्था किराडपुरा जसवंतपुरा पाण्याच्या टाकी समोरील परमवीर अब्दुल हमीद सांस्कृतिक सभागृहात करण्याच्या प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. ८ चे विभागीय कार्यालय आणि प्रभाग समिती "ब" च्या कार्यालयाची व्यवस्था किराडपुर जसवंतपुरा पाण्याच्या टाकी समोरील परमवीर अब्दुल हमीद सांस्कृतिक सभागृहाने करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५९/७**

प्रस्ताव सादर केला की, भावसिंगपुरा सर्व्हे नं. ३१ सरकारी गायरान जमीनी १९७० पासून भिल्ल समाजाचे लोक स्मशान भूमी दफन विधी करिता वापर करतात. त्याचप्रमाणे भावसिंगपुरा भिमनगर भागात ख्रिश्चन समाजाची लोकसंख्या हि जास्त आहे. त्यांना दफन विधीची आवश्यकता असल्यामुळे भिल्ल समाजाकरिता वेगळी व ख्रिश्चन समाजाकरिता वेगळी स्मशान भूमी उपलब्ध करून द्यावी. व उर्वरित जागेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी घरकूल योजना म्हाडा व महानगरपालिका यांचेतर्फे राबविण्यात यावी.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. गणेश तांबे,
अनुमोदक - श्री. मधुकर सावंत, सौ. विजया रहाटकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा भिमनगर भागात ख्रिश्चन समाजाची लोकसंख्या जास्त असल्यामुळे भिल्ल समाजाकरिता वेगळी व ख्रिश्चन समाजाकरिता वेगळी स्मशान भूमी उपलब्ध करून देणे व उर्वरित जागेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी म्हाडा व महानगरपालिका यांचेतर्फे घरकूल योजना राबविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६०/८**

प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्र. ५४ सुराणानगर अंतर्गत बसैय्ये नगर येथे मा. खा. श्री. चंद्रकांतजी खैरे यांच्या खासदार निधीतून सांस्कृतिक सभागृह बांधण्यात येत असून या सभागृहाचा उपयोग सर्वस्तरातील नागरिकांना विविध समारंभाप्रसंगी व्हावा या उद्देशाचे हे सांस्कृतिक सभागृह बांधण्यात येत आहे. या परिसरातील रहिवाश्यांना सार्वजनिक कार्यक्रमांसाठी विवाह समारंभ इत्यादी करिता या सभागृहाचा उपयोग व्हावा अशी अपेक्षा व नागरिकांची मागणी आहे.

करिता बसैय्येनगर येथील बांधण्यात येणारे सांस्कृतिक सभागृह सर्व नागरिकांकरिता खुले ठेवण्यास तसेच सर्वांना याचा वापर करण्यास्तव आणि यापूर्वी दिनांक ११/०१/२००० रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्रमांक १६०/१३ अन्वये श्री. संताजी तिळवण तेली समाज मंडळास नाममात्र भाड्याने देण्याबाबतचा ठराव रद्द करण्याचे मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक - श्री. प्रशांत देसरडा
अनुमोदक - सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर, सौ. विजया रहाटकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ५४ अंतर्गत बसैय्ये नगर येथे खासदार निधीतून सांस्कृतिक सभागृह श्री. संताजी तिळवण तेली समाज मंडळास नाममात्र भाड्याने देणे बाबत मंजुर झालेला ठराव क्र. १६०/१३ दिनांक ११/१/२००० रद्द करण्यास आणि बसैय्ये नगर येथे बांधण्यात येणारे सांस्कृतिक सभागृह सर्व नागरिकाकरिता खुले ठेवण्यास तसेच सर्वांना याचा वापर करण्यास्तव सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६१/९**

प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दित मौजे सातारा येथे गट क्र. ५७ मधून ५० फुट व ८० फुट रुंदी डी. पी. रोड जातो. तरी सदर डी. पी. रस्त्याचे भूसंपादन कायद्याप्रमाणे जिल्हाधिकारी यांचे मार्फत किंवा खाजगी तडजोडीने भूसंपादन करण्यास व भूसंपादनासाठी येणाऱ्या संभाव्या खर्चासह मंजुरी देण्याकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. प्रकाश निकाळजे, श्री. भाऊसाहेब ताठे
अनुमोदक - श्री. राजु शिंदे, श्री. भगवान घडामोडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मौजे सातारा येथील नागरिकांसाठी सातारा गट क्र. ५७ मधील ५० फुट व ८० फुट विकास योजना रस्त्याचे भूसंपादन कायद्याप्रमाणे जिल्हाधिकारी यांचे मार्फत किंवा खाजगी तडजोडीने भूसंपादन करण्यास तसेच भूसंपादनासाठी येणाऱ्या संभाव्य खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६२/१०**

प्रस्ताव सादर केला की, माझे प्रभागात नक्षत्रवाडी येथे मा. खा. श्री. चंद्रकांतजी खैरेयांच्या आमदार निधीतून राजे संभाजी व्यायाम शाळा व मा. आमदार श्री. शालीग्रामजी बसैय्ये (बंधु) यांच्या निधीतून पुण्यश्लोक अहिल्याबाई होलकर सांस्कृतिक सभागृह बांधण्यात आलेले असून त्या दोन्ही इमारती नक्षत्रवाडी येथील सर्वोदय मित्रमंडळ नक्षत्रवाडी व नवयुवक मित्रमंडळ नक्षत्रवाडी यांचे कार्यकारिणीकडे हस्तांतरीत करून देण्याचा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यास सर्वसाधारण सभेसमारे मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. नंदकुमार घोडेले, श्री. अंबादास दानवे.
अनुमोदक - श्री. प्रशांत देसरडा, श्री. संजय शिरसाट

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नक्षत्रवाडी प्रभागात मा. खा. श्री. चंद्रकांतजी खैरे यांच्या आमदार निधीतून राजे संभाजी व्यायाम शाळा आणि मा. आमदार श्री. शालीग्राम बसैय्ये (बंधु) यांच्या आमदार निधीतून बांधण्यात आलेले पुण्यश्लोक अहिल्याबाई होलकर सांस्कृतिक सभागृह नक्षत्रवाडी येथील सर्वोदय मित्रमंडळ व नवयुवक मित्रमंडळ यांचे कार्यकारिणीकडे हस्तांतरीत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६३/११**

प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेने सुराणानगर व बसैय्येनगर या मंजूर रेखांकनातील खुल्या जागेत आमदार निधीतून व्यायाम शाळा बांधण्यात आलेली आहे. शासनाचे निर्णयानुसार अशा जागांवर प्रथमतः सदर वसाहतीतील लोकांचा हक्क असतो. व त्यांच्याच उपयोगासाठी याचा वापर होणे अपेक्षित आहे. या रेखांकनातील बांधलेली व्यायामशाळा मागील दोन तीन वर्षापासून कोणाच्याच उपयोगात नाही. व तेथील रहिवाशांनाही त्याचा उपयोग होत नाही. सदर हॉल हा तेथील जनतेचे मत विचारात न घेता इतर वसाहतीतील संघटनेला भाडेपट्ट्यावर देण्याचा निर्णय घेण्यात आला असून मागील

दोन-तीन वर्षापासून महानगरपालिकेसह त्यांचा करार ही झालेला नाही. तरी सदर वसाहतीतील जनतेचे हित लक्षात घेऊन इतर संस्थांना व्यायाम शाळा भाडेपट्ट्याने देण्याचा निर्णय रद्द करून तेथील जनतेसाठी सदरील व्यायाम शाळा खुली करून देण्यात यावी. करिता प्रस्ताव मंजुरीस्ताव सादर.

सुचक - श्री. प्रशांत देसरडा
अनुमोदक - श्रीमती डॉ. आशा बिनवडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुराणानगर व बसैय्येनगर या मंजूर रेखांकनातील खुल्या जागेत आमदार निधीतून बांधण्यात आलेली व्यायाम शाळा या वसाहतीतील जनतेचे हित लक्षात घेऊन इतर संस्थांना भाडेपट्ट्याने देण्याबाबत घेण्यात आलेला निर्णय रद्द करूनया भागातील जनतेसाठी खुली करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६४/१२**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र. २१ विश्वभारती कॉलनी अंतर्गत राजनगर येथे महानगरपालिकेच्या वतीने रुग्णालयाची इमारत बांधण्यात आलेली आहे. सदर रुग्णालयाचे इमारतीस "कै रामभाऊ म्हाळगी" रुग्णालय असे नामकरण करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक - सौ. साधना सुरडकर
अनुमोदक - श्री. प्रशांत देसरडा, सौ. विजया रहाटकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. २१ विश्वभारती कॉलनी अंतर्गत राजनगर येथे महानगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेलया रुग्णालयाच्या इमारतीचे "कै रामभाऊ म्हाळगी रुग्णालय" असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६५/१३**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सेव्हनहिल ते सुतगिरणी या रस्त्याचे "श्री. डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग" असे नामकरण करण्यात यावे तसेच जवाहर नगर पो. स्टे. व आदिनाथनगर, अशोक नगर या चौकात डॉ. शामप्रसाद मुखर्जी यांचा पुतळा बसविण्यात यावा करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्रीमती डॉ. आशा बिनवडे
अनुमोदक - १) श्री. प्रशांत देसरडा, २) सौ. साधना सुरडकर,
३) सौ. विजया रहाटकर, ४) श्रीमती जयश्री किवळेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सेव्हनहिल ते सुतगिरणी या रस्त्याचे "डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग" असे नामकरण करण्यास आणि जवाहर नगर पोलिस स्टेशन व आदिनाथनगर, अशोक नगर या चौकात "डॉ. शामप्रसाद मुखर्जी" यांचा पुतळा बसविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६६/१४**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. २१ जयविश्वभारती, शहानुरवाडी ह्या प्रभागातील शॉपिंग कॉम्प्लेक्स करिता जागा आरक्षित आहे तरी या जागेत बोल्ट पध्दतीने शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधण्यात यावे. करिता प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्ताव सादर.

सुचक - सौ. साधना सुरडकर
अनुमोदक - सौ. विजया रहाटकर, श्री. भगवान घडामोडे,
श्रीमती डॉ. आशा बिनवडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. २१ जयविश्वभारती, शहानुरवाडी येथे शॉपिंग सेंटरकरिता आरक्षित जागेवर बोल्ट पध्दतीने शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६७/१५**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र. १९ विष्णुनगर अंतर्गत नाथनगर येथे महानगरपालिकेच्या मालकीची नाल्याच्या बाजूला खुली जागा आहे. त्या जागेवर महानगरपालिकेच्या वतीने शाळेची इमारत बांधण्यात यावी. कारण माझ्या प्रभागात महानगरपालिकेची शाळा नाही त्यामुळे गरीब विद्यार्थ्यांची अत्यंत गैरसोय होत आहे. तरी नाथनगर येथील नाल्याच्या बाजूच्या खुल्या जागेवर शाळेची इमारत बांधण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्रीमती पार्वतीबाई मानकापे
अनुमोदक - श्री. मधुकर सावंत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. १९ विष्णुनगर येथील नाल्याच्या बाजूस असलेल्या मोकळ्या जागेवर महानगरपालिकाशाळेची इमारत बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४६८/१६**

प्रस्ताव सादर केला की, अजबनगर प्रभागात महानगरपालिके मार्फत सांस्कृतिक सभागृह बांधले असून हे प्रबोधनकार ठाकरे सभागृह मातृभूमी प्रतिष्ठान या पंजिकृत संस्थेने भाड्याने चालविणेस देणे बाबत मागणी केली आहे. सदर प्रतिष्ठाना मार्फत या सभागृहाचा वापर सामाजिक, सांस्कृतिक कार्यासाठी करण्यात येणार आहे. सदर सभागृह या संस्थेस चालविण्यास दिल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल तसेच संस्थेचा हेतू सफल होऊन त्याचा लाभ नागरिकांना मिळेल. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्ताव सादर.

सुचक - श्री. संजय शिरसाठ
अनुमोदक - श्री. किशोर तुलशीबागवाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अजबनगर येथे महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेले "प्रबोधनकार ठाकरे सभागृह" मातृभूमी प्रतिष्ठान या पंजिकृत संस्थेस सामाजिक, सांस्कृतिक कार्याचे वापरासाठी भाड्याने चालविण्यासाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच "जन, गण, मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक १३-०८-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**मंगळवार, दि. १३-०८-२००१ रोजी महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
२) स.स.श्री. संजय पांडुरंग शिरसाठ
३) स.स.श्री. किशोर तुलशीबागवाले
४) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.सौ. शकुंतला सांडुजी इंगळे
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
११) स.स.श्री. शिंदे राजु रामराव
१२) स.स.श्री. कावडे रावसाहेब राणुबा
१३) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४) स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब
१५) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१६) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१७) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१८) स.स.श्री. शे. शकिल पटेल शे. बुढण पटेल
१९) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
२०) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२१) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२२) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२३) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
२४) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२५) स.स.सौ. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२६) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२७) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२८) स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
२९) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३०) स.स.श्री. अय्युब खॉन सरदार खॉन
३१) स.स.श्री. अ.रशिद अ. सत्तार
३२) स.स.श्री. जैन विकास रतनलाल
३३) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३४) स.स.श्री. डॉ. भागवत किशनराव कराड

३५) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३६) स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान
३७) स.स.श्री. वडागळे सुनिल बुथवेल
३८) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३९) स.स.श्री. मुमताज अली मोज्जमअली
४०) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
४१) स.स.श्री. नासेर खॉन सरदारखान
४२) स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव
४३) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४४) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
४५) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४६) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
४७) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४८) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४९) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
५०) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
५१) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
५२) स.स.श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या
५३) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
५४) स.स.श्री. अ. कदीर मौलाना सय्यद
५५) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५६) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
५७) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५८) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
५९) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
६०) स.स.श्री. नासीर खान अ. रहेमान खान कुरैशी
६१) स.स.सौ. शाहिन जफर महमुद जफर
६२) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
६३) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
६४) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
६५) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खान
६६) स.स.श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दिन
६७) स.स.श्री. अफसरखान यासीनखान
६८) स.स.सौ. सुलताना बेगम चॉंद खॉ
६९) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
७०) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
७१) स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
७२) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
७३) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
७४) स.स.सौ. कागडा बबिता सुभाष
७५) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
७६) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास
२) स.स.श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज
३) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
४) स.स.सौ. सलमा बाना मीर मोहम्मद अली.

**विषय क्र. ४६८-अ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि "ड" प्रकरण २ चे नियम क्र. १ [ग] अन्वये उपस्थित पालिका सदस्यांपैकी एका पालिका सदस्याची सभेचे अध्यक्ष / पीठासीन अधिकारी पदी निवड करणे.

**चर्चा :**

श्री. पंडागळे रतनकुमार : आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून स. सदस्य श्री. प्रकाश निकाळजे यांची नियुक्ती करण्यात यावी.

**संवाद :**

श्री. जबिंदा दलबिरसिंग, सौ. दानवे अंबादास : यास माझे अनुमोदन आहे.

मा. नगरसचिव : आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून सभागृहात स. सदस्य श्री. प्रकाश निकाळजे यांचे एकच नाव सुचविण्यात आले असून त्यास स. सदस्य श्री. जबिंदा तसेच स. सदस्य श्री. अंबादास दानवे यांनी अनुमोदन दिले आहे. सभागृहात दुसरे नांव सुचित करण्यात आलेले नाही. सभागृहाने स.स. श्री. प्रकाश निकाळजे यांची आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड केलेली असल्याने श्री. प्रकाश निकाळजे यांनी आजच्या सभेचे अध्यक्षस्थान स्विकारावे व आसन ग्रहण करावे अशी मी त्यांना विनंती करतो.

यावेळी स. सदस्य श्री. प्रकाश निकाळजे हे आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून आसनग्रहण करतात.

**ठराव क्र. :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नियमास अधिन राहून स.स.श्री. प्रकाश निकाळजे यांची आजच्या सभेचे पिठासीन अधिकारी / अध्यक्ष म्हणून निवड करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४६८-ब :**

डॉ. भागवत कराड यांचा महापौर पदाचा राजीनामा दिनांक ३१ जुलै २००१

**संवाद :**

श्री. दानवे अंबादास : डॉ. भागवत कराड यांनी त्यांचे १५ महिण्याच्या कार्यकाळात चांगल्या प्रकारे कामे केलेली आहे. त्याचा अभिनंदनाचा ठराव सम्मत करावा.

श्री. देसरडा : यास माझे अनुमोदन आहे.

श्री. अफसर खॉन : त्यांचा महापौर पदाचा कार्यकाळ हा अडीच वर्षाचा होता. त्यांनी मध्यंतरी राजीनामा देऊन अर्धवट विकास कामे बाकी आहे. सत्कार किंवा अभिनंदन करणे योग्य होणार नाही.

श्री. कोकाटे काशिनाथ : डॉ. भागवत कराड हे सुध्दा सभेला उपस्थित आहे. त्यांनी राजीनामा का दिला याची माहिती देण्यात यावी असे त्यांनी मनोगत व्यक्त करावे. व त्यानंतर पुढील कामकाज सुरू करावे.

श्री. तकीहसन खॉन : राजीनामा का दिला कसा दिला हे सर्वांना माहित आहे. त्यांनी त्यांचे कार्यकाळात चांगली कामे केली म्हणून त्यांचे अभिनंदन करण्यास हरकत नसावी परंतु या विषयावर जास्त चर्चा न करता पुढील कामकाज सुरू करावे.

पिठासीन अधिकारी अध्यक्ष : डॉ. भागवत कराड यांनी त्यांचे कार्यकाळात चांगल्या प्रकारे विकासाची कामे केलेली आहे. त्या बद्दल त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते. यानंतर डॉ. भागवत कराड यांनी दिलेला राजीनामा नगरसचिव यांनी सभागृहाला वाचून दाखववावा.

मा. नगरसचिव : डॉ. भागवत कराड यांनी दिनांक ३१-०७-२००१ रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिलेला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(४) अन्वये महापौर यास कोणत्याही वेळी महानगरपालिकेस लेखी सूचना देवून आपल्या पदाचा राजीनामा देता येईल अशी तरतूद आहे. डॉ. भागवत कराड यांनी महानगरपालिकेस उद्देशून राजीनामा दिला आहे.

त्यांनी दिलेला राजीनामा महानगरपालिकेस अवगत करण्यात येत आहे.

जा.क्र.मनपा/महापौर/२००१ दि.३१-०७-२००१
प्रति,
मा. आयुक्त,
महानगरपालिका, औरंगाबाद.

**विषय : महापौर पदाचा राजीनामा**

महोदय,

विषयांकित प्रकरणाचे अनुषंगाने मी आज दिनांक ३१-०७-२००१ रोजी "महापौर" पदाचा राजीनामा माझ्या स्वखुशीने देत आहे.

करिता माहितीस्तव

आपला,
स्वाक्षरीत/-
[डॉ. भागवत कराड]

जा.क्र.मनपा/महापौर/२००१ दि.३१-०७-२००१
प्रति,
महानगरपालिका, औरंगाबाद.

**विषय : महापौर पदाचा राजीनामा**

महोदय,

विषयांकित प्रकरणाचे अनुषंगाने मी आज दिनांक ३१-०७-२००१ रोजी "महापौर" पदाचा राजीनामा माझ्या स्वखुशीने देत आहे.

करिता माहितीस्तव

आपला,
स्वाक्षरीत/-
[डॉ. भागवत कराड]

सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक १९(५) नुसार महापौर किंवा उपमहापौर यांच्या पदाची कोणतीही नैमस्तिक जागा रिकामी झाल्यास महानगरपालिकेने अशी जागा रिकामी झाल्यानंतर सोयीस्करपणे शक्य तितक्या लवकर अशी रिकामी झालेली जागा भरणेसाठी आपल्या पालिका सदस्यापैकी एकाची निवड केली पाहिजे. आणि अशारितीने निवडून आलेल्या प्रत्येक महापौराचे किंवा उपमहापौराचे ज्या व्यक्तीच्या जागी त्याची नेमणूक झाली असेल त्या व्यक्तीस जी जागा रिकामी झाली नसती तर जितक्या अवधी पर्यंत पद धारण करण्याचा हक्क प्राप्त झाला असता तितक्या अवधीपर्यंत पद धारण केले पाहिजे.

श्री. कोकाटे काशिनाथ : डॉ. भगवत कराड यांनी दिलेला राजीनामा हस्तलिखित किंवा टंकलेखन केलेले आहे काय? खुलासा द्यावा.

पिठासीन अधिकारी / अध्यक्ष : डॉ. भागवत कराड यांनी महापौर पदाचा राजीनाम त्यांचे लेटर पॅडवर त्यांच्या सहीनिशी टंकलेखन करून दिलेला आहे.

श्री. अफसर खॉन : डॉ. भागवत कराड हे जेंव्हा महापौर पदावर स्थानापन्न झाले त्यांचे अध्यक्षतेखाली उपमहपौर स्थायी समिती सदस्य स्विकृत सदस्य यांची निवड झाली तीही पदे रद्द होणार काय?

पिठासीन अधिकरी अध्यक्ष : या विषयावर जास्त चर्चा न करता आपल्याला नवीन महापौराची लवकरात लवकर निवडणूक घ्यावयाची आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : राजीनामा मंजूर करून घ्यावा नंतर पुढील चर्चा करावी.

पिठासीन अधिकरी / अध्यक्ष : राजीनामा हा मंजूर करावयाचा नसतो तो अवगत करायचा असतो. राजीनामा अवगत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. आता महापौर पदाची निवडणूक केंव्हा घ्यावयाची त्याबद्दल चर्चा करावी.

श्री. घडामोडे भगवान : आपण सभेचे अध्यक्ष आहात आपणंच निर्णय घ्यावा. लवकरात लवकर तारीख निश्चित करावी. २३ ऑगस्ट निश्चित करावी.

पिठासीन अधिकारी / अध्यक्ष : सचिव यांनी ७ दिवसाची नोटीस काढून येत्या २३ ऑगस्ट २००१ रोजी महापौर पदाची निवड करण्यासाठी सभा आयोजित करावी. व त्यासाठी निवडणूक कार्यक्रम घोषित करून सर्व स. सदस्यांना कळविण्यात यावे.

**ठराव :**

डॉ. भागवत कराड यांचा दिनांक ३१-०७-२००१ रोजी दिलेला महापौर पदाचा राजीनाम महानगरपालिकेस अवगत करण्यात आला असून सभागृहाने दिनांक २३-८-

२००१ रोजी महापौर पदाची निवड करण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्याचे ठरविले आहे. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर "जन,गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. पिठासीन अधिकारी /अध्यक्ष यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २०-०८-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**सोमवार, दि. २०/०८/२००१ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी १०.३० वाजता "वंदे मातरम्" गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
२) स.स.श्री. संजय पांडुरंग शिरसाठ
३) स.स.श्री. किशोर तुलशीबागवाले
४) स.स.श्री. वाणी ठकूजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.श्रीमती शकुंतला सांडुजी इंगळे
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
११) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१२) स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब
१३) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१४) स.स.सौ. लोखंडे कचराबाई उत्तमराव
१४) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
१५) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१६) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
१७) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
१८) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
१९) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२०) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२१) स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
२२) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२३) स.स.श्री. अयुब खान सरदार खान
२४) स.स.श्री. जैन विकास रतनलाल
२५) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२६) स.स.डॉ. भागवत किशनराव कराड
२७) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
२८) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
२९) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३०) स.स.श्री. नासेर खॉन सरदार खॉन
३१) स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव
३२) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास

३३) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३४) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३५) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
३६) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
३७) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
३८) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
३९) स.स.श्री. सुरगोणिवार नारायण चंद्रय्या
४०) स.स.श्री. अ. कदीर मौलाना सय्यद
४१) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४२) स.स.श्री. अशरफ युनूस मोतीवाला
४३) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४४) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४५) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
४६) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
४७) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
४८) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
४९) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खाून
५०) स.स.श्री. गाजी सदोद्दिन गाजी
५१) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५२) स.स.सौ. नफिसुन्नीसा बेगम हबीब खान
५३) स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन
५४) स.स.सौ. सुलताना बेगम चॉंद खॉ
५५) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
५६) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
५७) स.स. सलीम पटेल समशेर पटेल
५८) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
५९) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६०) स.स.सौ. कागडा बबिता सुभाष
६१) स.स.श्री. अली सलामी स. मीरा सलामी
६२) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
६३) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

५) स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
६) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
७) स.स.सौ. सलमा बनो मोहम्मद अली

**विषय क्र.४६९/१ :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ चे अनुसूचि "ड" प्रकरण २ चे नियम क्र. १ (म) अन्वये उपस्थित पालिका सदस्य पैकडे एक पालिका सदस्याची सभेचे अध्यक्ष / पिठासीन अधिकारी पदी निवड करणे.

**संवाद :**

श्री. स. अली मिरा सलामी : आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून स. सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे यांचे नांव सुचविण्यात येते.

श्री. अफसखॉन : यास माझे अनुमोदन आहे.

श्री. किशोर तुलशीबागवाले : सभेचे अध्यक्ष मतदान पध्दतीने निवडावे.

श्री. नंदकुमार घोडेले : स. सदस्य श्री. कोकाटे काशिनाथ यांचे बाजुने बहुमत आहे. त्यांनाच सभेचे अध्यक्ष करण्यात यावे.

श्री. अफसरखॉन : स. सदस्य श्री. कोकाटे काशिनाथ यांचे बाजुने बहुमत आहे. त्यांना सभेचे अध्यक्ष करण्यात यावे.

मा. नगरसचिव : विषय क्र. १ नुसार आजच्या सभेचे अध्यक्ष्य म्हणून स. सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे यांचे नांव सुचविण्यात आलेले आहे. त्यास स. सदस्य श्री. अफसरखॉन, श्री. किशोर तुलशीबागवाले यांनी अनुमोदन दिले आहे.

श्री. नंदकुमार घोडेले : आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून स. सदस्य श्री. प्रशांत देसरडा यांचे नांव सुचविण्यात येते.

श्री. अविनाश कुमावत : यास माझे अनुमोदन आहे.

मा. नगरसचिव : आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून स. सदस्य श्री. कोकाटे काशिनाथ यांचे नांव सुचविण्यात आलेले आहे. सव्र सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसून सहकार्य करावे ही विनंती. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४३ प्रमाणे साधारणत: मतदान हात वर करून घ्यावे अशी तरतूद आहे. स. सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे यांचे बाजूने ज्यांना मत द्यायचे त्यांनी डाब्या बाजूने जाऊन हात वर करून मतदान द्यावे.

श्री. सुदाम सोनवणे : गुप्त मतदान पध्दतीने मतदान घेण्यात यावे.

यावेळी सभागृहात हजर असलेल्या सदस्यांपैकी ३४ सदस्यांनी सभागृहातील व्यासापिठाच्या डाव्या बाजूला उभे राहून आजच्या सभेच्या अध्यक्ष पदासाठी श्री. काशिनाथ कोकाटे. यांच्या बाजूने हात वर करून संमती दिली व उर्वरित १६ सदस्यांनी श्री. काशिनाथ कोकाटे यांचे विरुध्द मत प्रदर्शित केले.

मा. नगरसचिव : नियम क्र. ४३ प्रमाणे हात वर करून मतदान घ्यावे असे सभागृहाने ठरवलेले आहे. त्यानुसार स. सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे यांचे बाजून बहुमत झाल्याने त्यांना आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून सभागृहाने त्यांची निवड केली असल्याने कृपया त्यांनी आसनग्रहन करावे.

याच वेळी स. सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून आसनग्रहन करतात. यावेळी विरोधी दर्शविणारे सदस्य घोषणा देत सभात्याग करतात.

**ठराव :** सभा कामकाज नियमावलीचे जादा नियम क्र. ४३ नुसार पिठासीन अधिकारी / अध्यक्ष या पदाकरिता हात वर करून झालेल्या मतदान पध्दतीनुसार स. सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे यांची आजच्या सभेचे पिठासीन अधिकारी / अध्यक्ष म्हणून बहुमताने निवड करण्यास मंजुरी देण्यात आली.

बरेच स. सदस्य मोठमोठ्याने बोलतात. काहीही स्पष्ट ऐकावयास येत नाही.

श्री. तकीहसन खॉन : शासनाकडून महापौर पदाच्या निवडणुकी संदर्भात काही आदेश आलेले आहेत. त्यावर अगोदर निर्णय व्हावा नंतर विषय पत्रिका मंजूर करावी.

मा. पिठासीन अधिकारी / अध्यक्ष : विषय पत्रिकेला सुरुवात करावी.

**विषय क्र.४७०/२ :** दिनांक १८-०७-२००१ रोजी संपन्न झालेला सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

मा. पिठासीन अधिकारी / अध्यक्ष : विषय क्र. २ दिनांक १८-०७-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. विषय पत्रिकेवरील विषय क्र. ३ व ४ स्थगित ठेवण्यात येत आहे. ऐनवेळी एक विषय प्रशासनामार्फत सादर झालेला आहे. त्यावर चर्चा करावी. सचिव यांनी विषय वाचून दाखवाव.

यावेळी सभात्या केलेले स. सदस्य परत सभागृहात येतात.

**ठराव :**

दिनांक १८-०७-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधाण सभेचे इतिवृत्त कायम करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र.४७१/३ :**

आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक /पासूस/२०००/प्र.क्र.२३/क्रा.१४७४(२) मंत्रालय मुंबई दिनांक २३-०२-२००१ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेने प्रत्येक वर्षी रु. १.५० कोटी याप्रमाणे ३ वर्षात रु. ४.५० कोटी रस्ते विकास महामंडळास उपलब्ध करून द्यावे म्हणूण शासनाने निर्णय घेतलला आहे. सदरचा निर्णय घेतांना शासनाने नमूद केले आहे की, प्रस्तावित रस्त्याची व पुलाची कामे हि औरंगाबाद शहरातील विकास आराखड्यातील असल्याने हि कामे हाती घेवून पूर्ण करणेची प्राथमिक जबाबदारी प्रामुख्याने औरंगाबाद महानगरपालिकेची आहे. तथापि या प्रकल्पात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्याची समावेश आहे. सदर प्रकल्प कालबध्द कार्यक्रम आखून पूर्ण करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिका मराठवाडा वैद्यकीय मंडळ नगरविकास विभाग तसेच औरंगाबाद शहरातील विधानसभा / विधान परिषद / संसद सदस्य यांच्याकडून निधी उपलब्ध करून घेण्यात येणार आहे.

शासनाच्या निर्णयातील मुद्दा क्र. ५(अ) प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचे प्रत्येक वर्षी र. १.५० कोटी या प्रमाणे तीन वर्षात रु. ४.५० कोटी निधी उपलब्ध करून द्यावा असा निर्णय दिलेला आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास शहर व परिसरातील रस्ते विकसित करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला प्रतिवर्ष रु. १.५० कोटीप्रमाणे तीन वर्षात रु. ४.५० कोटी निधी उपलब्ध करून देण्यास्तव महानगरपालिकेचा सन २००१-२००२ च्या सुधारित अंदाजपत्रकात तरतूद करणे तसेच पुढील दोन वर्षासाठी प्रति वर्ष रु. १.५० कोटी तरतूद अर्थसंकल्प करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.४७२/४ :**

औरंगाबाद ते जायकवाडी पाणी पुरवठ्याच्या विज देयकापोओी मा. विज नियामक आयोग यांच्या निर्देशानुसार व मा. सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ४५१/१ दि. १२-०७-२००१ अन्वये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना र. रु. ५०.०० लक्ष भरीव रक्कम (Sutstenerat amount) म्हणून भरणा करण्यात आली आहे.

मा. सचिव महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग यांनी पत्र क्र/एमईआरसी/केस क्र. ०४-२००१/९३८ दिनांक २४ जुलै २००१ अन्वये पुन्हा कळविले आहे की, दिनांक १६ जुलै २००१ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये महानगरपालिकेडे पाणीपुरठव विद्युत देयकापोटी असलेल्या थकबाकी मधून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना थकबाकीच्या १०.२०% रक्कम भरणा करण्यात यावी. व तसेच मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक मंडळास कळविण्यात यावे असे निर्देश दिले आहे.

सध्या महानगरपालिकेत पाणी पुरवठा विद्युत देयकापोटी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांची आहे. मार्च २००१ पय्रंत जवळपास र. रु. ११६ कोटी एवढी थकबाकी आहे. त्यानुसार मा. वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसासर थकबाकीच्या १०.२०% रककम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना भरणा करावयाची झाल्यास र. रु. १० कोटी ते २० कोटी दरम्यान रक्कम भरणा करावी लागेल.

करिता मा. विज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार वरील दर्शविलेल्या पैकी रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना भरणा करणे बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या योग्य त्या निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.४७३/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई कडील पत्र क्रमांक एएमसी-१४२००१/१४९८/प्र.क्र.११२/नवि-२४, दि १८-०८-२००१ अन्वये कळविण्यात आले आहे. की औरंगाबाद महानगरपालिकेचे महापौर यांची निवड करण्यासाठी दिनांक २३-०८-२००१ रोजी आयाजित केलेली विशेष सर्वसाधारण सभा आणि या सभेसाठी घोषित केलेल्या कार्यक्रमानुसार करण्यात येणारी महापौर यांची निवड दिनांक २२-०८-२००१ ते २-०९-२००१ पर्यंत शहरात साजरा होणारा गणेश उत्सव तसेच दिनांक २४-०८-२००१ रोजी घेण्यात येणारी औरंगाबाद-जालना स्थानिक स्वराज्य संस्थ, मतदान संघाची निवडणूक विचारात घेता कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने औरंगाबाद महानगरपालिकेने दिनांक २३-०८-२००१ रोजी आयाजित केलेली महापौर पदाची निवडणूक त्या दिवाशी न घेता ती पुढे ढकलण्यात येऊन सदरची निवडणूक दिनांक ०३-०९-२००१ रोजी अथवा त्यानंतर सोईस्करपणे शक्य तितक्या लवकर घेण्यात यावी असे शासनाचे निर्देश आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ अन्वये असे निर्देश देण्याचे राज्य शासनास अधिकार असून कलम ४५१ (४) अन्वये राज्य शासनाकडून कोणतेही आदेश देण्यात येतील. त्याबाबतीत अशा आदेशाचे पालन करणे हे प्रत्येक पालिका सदस्यांचव महानगरपालिकेचे व अधिकारी यांचे कर्तव्य आहे अशी तरतूद आहे.

तरी राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार महापौर निवडीसाठी दिनांक २३-०८-२००१ ऐवजी दिनाक ०३-०९-२००१ अथवा त्यानंतर सोईस्कर होईल शक्य तितक्या लवकर सभेचे आयोजन करण्यासाठी दिनांक निश्चित करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर.

**संवाद :**

श्री. किशोर तुलशीबागवाले : ऐनवेळी सादर झालेला प्रस्तावानुसार शासनाचे आदेश काय आहेत ते वाचून दाखवावे.

याचवेळी बरेच स. सदस्य मोठमोठ्याने बोलतात विषयपत्रिकेवर चर्चा होऊन विषय मंजूर करावे अशी मागणी करतात.

श्री. अविनाश कुमावत : प्रथम विषय पत्रिकेवरील विषयावर चर्चा व्हावी. त्यावर निर्णय घेण्यात यावा.

श्री. नंदकुमार घोडेले : विषय क्र. २ इतिवृत्तमध्ये दुरुस्ती सुचवायची आहे. विषय क्रमांक ४६१/९ मध्ये दुरुस्ती सुचवायची होती.

मा. पिठासीन अधिकारी / अध्यक्ष :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे आपण विषय पत्रिकेवरील विषय क्र. २ मंजूर केलेला असून विषय क्र. ३ व ४ स्थगित ठेवलेले आहे. सचिव यांनी ऐनवेळचा विषय सभागृहात वाचून दाखवावा.

श्री. नंदकुमार घोडेले, श्री. अविनाश कुमावत : सदर प्रस्तावाची प्रत सर्वांना देण्यात यावी.

सदर प्रस्तावाच्या प्रती सर्व सभासदांना वाटप करण्यात येतात. नगरसचिव प्रस्ताव सभागृहात वाचून दाखवतात.

श्री. स. अली मिरा सलामी : गणेश उत्सव असल्यामुळे महापौर पदाची निवड कररण्याच्या दिनांकात बदल करण्याबाबत आलेल्या शासनाचे आदेशास आजचे सर्व आघाडी सदस्यांची संम्मती आहे. ठराव मंजूर करून तारीख निश्चित करावी.

मा. पिठासीन अधिकारी / अध्यक्ष : गणेश उत्सव असल्याने शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. व येत्या १० सप्टेंबर २००१ रोजी महापौर पदाची निवड करण्याबाबत विशेष सर्व साधारण सभेचे आयोजन करण्यात यावे.

श्री. नंदकुमार घोडेले : शासनाने अशा प्रकारचे आदेश काढल्याबद्दल आम्ही सर्व सेना भाजप सदस्य शासनाचा धिक्कार करतो.

यावेळी सभागृहात स. सभासद मोठमोठ्याने घोषणा देतात. काहीही ऐकू येत नाही.

मा. पिठासीन अधिकारी / अध्यक्ष : महापौर पदाची निवड करण्यासाठी १० सप्टेंबर २००१ या तारखेची घोषणा झालेली आहे. यावर स. सभासदांनी हात वर करून आपआपले मत नोंदवावे.

यावेळी महापौर पदाची निवड १० सप्टेंबर २००१ या दिवशी करण्यास बहुमताने सभागृहाने संम्मती दिली.

मा. पिठासीन अधिकारी / अध्यक्ष : महापौर पदाची १० सप्टेंबर २००१ या दिवशी निवड करण्याची तारीख निश्चित करण्यास बहुमताने सभागृह मंजुरी देत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई कडील पत्र क्रमांक एएमसी १४२००१/१४९८/प्र.क्र.११२ नवि-२४ दिनांक १८-०८-२००१ अन्वये शासनाने दिलेल्या निर्देशानुसार महापौर निवडीसाठी दिनांक २३-०८-२००१ ऐवजी दिनांक १०-०९-२००१ रोजी विशेष सर्व साधारण सभेचे आयोजन करण्यास बहुमताने मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर "जन,गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. पिठासीन अधिकारी /अध्यक्ष यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ३१-०८-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**शुक्रवार, दि. ३१/०८/२००१ रोजी महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. प्रशांत सुभाश देसरडा
२) स.स.श्री. संजय पांडुरंग शिरसाठ
३) स.स.श्री. किशोर तुलशीबागवाले
४) स.स.श्री. वाणी ठकूजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
७) स.स.श्रीमती शकुंतला सांडुजी इंगळे
८) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
९) स.स.श्री. शिंदे राजु रामराव
१०) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
११) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१३) स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब
१४) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१५) स.स.सौ. रुख्मीनी राधाकिसन शिंदे
१६) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१७) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१८) स.स.श्री. शे. शकील पटेल शे. बुढण पटेल
१९) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
२०) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२१) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२२) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२३) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
२४) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२५) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२६) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२७) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२८) स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
२९) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३०) स.स.श्री. अय्युब खान सरदार खान
३१) स.स.श्री. अ. रशिद अ. सत्तार
३२) स.स.श्री. जैन विकास रतनलाल
३३) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल

३४) स.स.डॉ. भागवत किसनराव कराड
३५) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३६) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३७) स.स.श्री. वडागळे सुनिल बुयवेल
४१) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
४२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
४३) स.स.श्री. नासेर खॉन सरदार खॉन
४१) स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव
४१) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४२) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
४४) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४५) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४६) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४७) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४८) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४९) स.स.श्री. सुरगोणिवार नारायण चंद्रय्या
५०) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
५१) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५२) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५३) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
५४) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
५५) स.स.श्री. नासीर खान अ. रहेमान खॉन कुरैशी
५६) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
५७) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगीरथ
५८) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५९) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
६०) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खाून
६१) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
६२) स.स.श्री. शेख ईसाक शे. जैनाद्दिन
६३) स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन
६४) स.स.सौ. सुलताना बेगम चॉंद खॉ
६५) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६६) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
६७) स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
६८) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
६९) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
७०) स.स.सौ. कागडा बबिता सुभाष
७१) स.स.श्री. अली सलामी स. मीरा सलामी
७२) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
७३) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

६) स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास
७) स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
८) स.स.सौ. सलमा बनो मोहम्मद अली

सभागृहातर्फे शिवसेना नेते स्व. आनंद दिघे, थोर व जेष्ट लेखक स्व माडगुळकर तसेच स. सदस्य श्री. किशोर शिंदे यांचे काका या सर्वांचे दुःखद निधन झाल्याबद्दल ०२ मिनिटे सर्वांनी उभे राहून श्रध्दांजली अपर्ण केली.

**विषय क्र.४७४/१ :** मुंबई प्रांतिम महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" प्रकरण २ चे नियम क्र. १ (ग) अन्वये उपस्थित सदस्यांपकी एका पालिका सदस्यांची सभेचे अध्यक्ष / पिठासीन अधिकारीपदी निवड करणे.

**संवाद :**

श्री. किशारे तुलशिबागवाले : आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून स. सदस्य श्री. भगवान रगडे यांना करण्यांत यावे.

श्री. स. सलिम स. युसूफ : यास माझे अनुमोदन आहे.

श्री. संजय शिरसाठ, श्री. दानवे अंबादास :आजच्या सभेचे अध्यक्ष / पिठासन अधिकारी म्हणून स. सदस्य श्री. प्रशांत देसरडा यांना करण्यात यावे.

श्री. डॉ. कराड भागवत : यास माझे अनुमादेन आहे.

नगरसचिव : सभागृहास आजच्या सभेचे अध्यक्ष / पिटासन अधिकारी नियुक्त करण्यासाठी स. सदस्य श्री. भगवान रगडे तसेच स. सदस्य श्री. प्रशांत देसरडा या दोन सदस्यांची नांवे सुचविण्यात आलेली आहे. नियम क्र. ४३ नुसार हात वर करून मतदान घेण्याची पध्दत आहे. म्हणून स. सदस्य श्री. भगवान रगडे यांच्या बाजूने ज्या स. सदस्यसांना मतदान करायचे त्यांनी डाव्या बाजूला जाऊन हात वर करून मतदान करावे.

श्री. डॉ. कराड भागवत : स्विकृत सदस्यांना मतदानात भाग घेता येतो का? खुलासा करावा.

नगरसचिव : स्विकृत सदस्यांना मतदान करण्याचा अधिकार नाही. त्यांना मतदान करता येणार नाही.

यावेळी स. सदस्य श्री. भगवान रगडे यांचे बाजून एकूण २७ स. सदस्य हात वर करून मतदान करतात. व गणका मार्फत यांची गणना करण्यांत आली.

नगरसचिव : स. सदस्य श्री. भगवान रगडे यांचे बाजूने २७ स. सदस्यांनी हात वर करून मत नोंदविले आहे. तसेच आता स. सदस्य श्री. प्रशांत देसरडा यंना पिठासन अधिकारी करण्यासाठी ज्यांची संमती आहे कृपया त्यांनी उजव्या बाजूला जाऊन हात वर करून आपले मत नोंदवावे.

यावेळी स. सदस्य श्री. प्रशांत देसरडा यांचे बाजुने ३९ स. सदस्यांनी हात वर करून मतदान केले गणका मार्फत गणना करण्यात आली.

नगरसचिव : स. सदस्य श्री. भगवान रगडे यांचे बाजूने २७ तर स. सभासद श्री. प्रशांत देसरडा यांचे बाजूने ३९ स. सदस्यांनी हात वर करून मतदान केले. यावरून श्री. प्रशांत देसरडा यांना जास्त मते मिळाल्याने त्यांची आजच्या सभेने पिठासन अधिकारी म्हणून बहुमताने सभागृहाने नियुक्त केलेली आहे. कृपया त्यांनी सभेचे अध्यक्ष म्हणून आसन ग्रहन करावे. अशी त्यांना विनंती करण्यात येते.

श्री. स. अली सलामी : नियमानुसार एकदा ठराव पास केल्यानंतर ठराव पुन्हा ३ महिण्याच्या आत सभागृहाच्या मंजुरीसाठी सभासदांना ३ दिवस अगोदर कळवावे लागते. परंतु सभेच्या अगोदर ४८ तासच अगोदर कळवून सभा बोलविली आहे. व महापौर पदाच्या निवडणूकीचा दिनांक व वेळ हा निश्चित केलेला आहे. त्यानुसार आजची सभा नियम बाह्या आयोजित केलेली म्हणून आम्ही निषेध करतो. व सभात्याग करीत आहे.

याचवेळी वरील प्रस्तावात विरोध असलेले स. सभासद मोठमोठ्याने घोषणा देतात व सभात्याग करतात. पिठासन अधिकारी म्हणून स. सदस्य श्री. प्रशांत देसरडा हे आसनग्रहन करतात.

श्री. दानवे अंबादास : आघाडीचे सदस्य यांनी पिठासन अधिकारी पदाच्या निवडणूकीत भाग घेतलला आहे. यावरून त्यांना आजची बैठक आयोजित केल्याचे होत असलेले कामकाज मान्य आहे असे समजून सभेचे पुढील कामकाज चालू करावे.

**ठराव :**

सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४३ नुसार पिठासन अधिकारी/ अध्यक्ष पदाकरिता हात वर करून झालेल्या मतदानानुसार श्री. प्रशांत देसरडा यांची आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून बहुमताने निवड करण्यास मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ४७५/२ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम (५) आणि महानगरपालिका महापौर आरक्षण नियम १९९४ चे तरतूदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक ०५-०८-९९ ची अधिसूचना क्र. जीईएम-१०९९/१२४०/प्र.क्र.६६/९९/नवि-२४ प्रमाणो औरंगाबाद महानगरपालिकेचे महापौर पद नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आले आहे. त्यानुसार महापौर पदावर निवड करणे.

**चर्चा :**

मा. पिठासीन अधिकारी : नगरसचिव यांनी आजच्या सभेच्या संदर्भात सभागृहास थोडक्यात माहिती द्यावी.

नगरसचिव : डॉ. भागवत कराड यांनी दिनांक ३०-०७-२००१ रोजी महापौर पदाचा राजीनामा दिल्यामुळे आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(४) अन्वये महापौर यांस कोणत्याही वेळी महानगरपालिकेस लेखी सूचना देवून आपल्या पदाचा राजीनामा देता येईल अशी तरतूद असल्याने, महापौर पदाचा राजीनामा सर्वसाधारण सभेस अवगत

करण्यासाठी दिनांक १३-०८-२००१ रोजी विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यांत आले होते.

दिनांक १३-०८-२००१ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेने महापौर पदाची निवडणूक दिनांक २३-०८-२००१ रोजी घेण्याचा निर्णय घेतल्याने निवडणूक कार्यक्रम तयार करून वितरीत करण्यांत आला असून नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत ८ उमेदवारांनी १४ उमेदवारी अर्ज दाखल केलेले आहेत.

पोलिस आयुक्त औरंगाबाद यांचे दिनांक १३-०८-२००१ चे पत्र दिनांक १४-०८-२००१ रोजी प्राप्त झाले. त्यात त्यांनी विनंती केली होती की, गणेशोत्सव व स्थानिक स्वराज्य संस्था मतदान संघाची निवडणूक इत्यादी कारणास्तव कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास परिस्थिती नियंत्रणात ठेवणे कठीण होणार आहे. त्यामुळे दिनांक २३-०८-२००१ रोजी होणारी महापौर पदाची निवडणूक दिनांक ०३-०९-२००१ नंतर घेण्याबाबत कार्यवाही करणेस मा. आयुक्तांना कळविले आहे. या संदर्भात दिनांक १६-०८-२००१ रोजी पोलिस आयुक्तांना कळविण्यात आले आहे की, सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे निवडणूक कार्यक्रम वितरीत झालेला आहे व महापौरांनी मुदतपूर्व राजीनामा दिल्याने महापौर निवडणूकीची सभा बोलवण्याचा अधिकारी आयुक्तांना पोहचत नाही. व निवडणूकीसाठी आवश्यक तो बंदोबस्त करण्यासाठी व्यवस्था करावी, व वस्तुस्थिती बाबत शासन नगर विकास विभागास आवगत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडून दिनांक २३-०८-२००१ रोजीची महापौर निवडीबाबतची सभा दिनांक ०३-९-२००१ नंतर घेण्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार दिनांक २०-०८-२००१ रोजीच्या सर्वसाधारण सभेपुढे योग्य तो निर्णय घेण्यासाठी ऐनवेळचा विषय ठेवण्यात येऊन सभा अध्यक्षांनी/पिठासन अधिकारी यांनी दाखल करून घेतले व बहुमतांनी निर्णय घेण्यात येऊन दिनाक १०-०९-२००१ रोजी महापौर निवडी बाबत सभा घेण्याचा निर्णय घेण्यात आला व लगेचच सभा संपल्याचे सभा अध्यक्षांनी घोषित केले.

शासनाचे दिनांक १८-०८-२००१ रोजीचे आदेशास व दिनांक २०-०८-२००१ रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावास मा. उच्च न्यायालय, मंबई खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्रमांक ३२७५/२००१ व ३२८२/२००१ अन्वये आव्हान देण्यात आले. सदर प्रकरणात दिनांक २१-०८-२००१ रोजी सुनावणी होऊन निर्णय झालेला आहे. त्यानुसार शासनाचे दिनांक १८-०८-२००१ चे आदेश कायम करण्यात आले आहे. व दिनांक २०-०८-२००१ रोजीच्या ठरावा संबंधी शासनाचे आदेश कायम केले असल्यामुळे दावेदारास या ठरावा संदर्भात कार्यवाही करण्याची मुभा राहील असे निर्णयात नमूद केलेल आहे व दिनांक १०-८-२००१ ऐवजी महानगरपालिकेने महापौर निवडीसाठी सभेची पुन्हा तारीख निश्चित करावी असे आपेक्षित आहे.

मा. न्यायालयात ऐनवेळी ठेवलेला प्रस्ताव सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. (२) प्रमाणे्ा नियमात बसत नाही व तीन महिन्यात ठराव बदलता येत नाही व विषयपत्रिकेवर घेण्यात आलेला नाही असा

युक्तीवाद ही करण्यात आलेला आहे. परंतु मा. न्यायालयाने या संदर्भात दाव्यात निर्माण झालेल्या परिस्थितीनुरुप हा ठराव कायदेशीर होतो किंवा कसे याची पडताळणीत न जाता दावेदारास या संदर्भात कार्यवाही करण्याची मुभा राहिल असा निर्णय दिलेला आहे. नियम १ (२) पुढील प्रमाणे आहे.

नियम १ [२] :- महानगरपालिकेने पारीत केलेल्या कोणत्याही ठरावात, तो पारीत झाल्यानंतर तीन महिन्याच्या आत फेरबदल करता येणार नाही किंवा तो रद्द करता येणार नाही. मात्र अशा ठरावास, एकूण पालिका सदस्यापैकी कमीत कमी एक द्वितीयांश पालिका सदस्यांनी, किंवा कोणत्याही विवक्षित बाबतीत, या अधिनियमान्वये आवश्यक असेल अशा अधिक संख्येइतक्या सदस्यांनी पाठींबा दिलेल्या आणि सभेत संमत झालेल्या ठरावाने फेरबदल करता येईल किंवा तो रद्द करता येईल, खंड (ह) मधील आवश्यक गोष्टी पूर्ण करून अशा सभेची नोटीस देण्यात आली असली पाहिजे आणि अशा नोटीशीत, ज्या ठरावात अशा सभेत फेरबदल करण्याचे किंवा तो रद्द करण्याचे योजने असेल तो ठराव आणि अशा ठरावात फेरबदल करण्यासाठी किंवा तो रद्द करण्यासाठी असलेली सूचना किंवा प्रस्ताव पूर्णपणे नमूद केला पाहिजे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(५) प्रमाणे महापौरांचे नैमित्तिक जागा रिकामी झाल्यास महानगरपालिकेने अशी जागा रिकामी झाल्यानंतर सोयीस्करपणे शक्य तितक्या लवकर अशी रिकामी जागा भरण्यासाठी आपल्या पालिका सदस्यापैकी एकाची निवड केली पाहिजे अशी तरतूद आहे.

नियम १ (२) प्रमाणे आता महापौर पदाची निव्ड करण्याकरिता पूर्वी ठरविलेली तारीख बदलून पुन्हा नव्याने तारीख निश्चित करण्यासाठी एकूण पालिका सदस्यापैकी १/२ पालिका सदस्यांनी म्हणजेच मतदानाचा हक्क असलेले ८२ सदस्या पैकी ४१ सदस्यांनी पाठींबा दिल्यास सभेची दिनांक ठरविता येईल.

मा. न्यायालयाचे हे निदर्शनास आलेले आहे की, दि. १०-०९-२००१ रोजी महापौर निवडीची सभा महानगरपालिकेने घेण्याबाबत ठराव केलेला आहे. तथापि निर्णयातील परिच्छेद क्र. २१ मध्ये असे नमूद केलेले आहे की, दि. १८-०८-०१ रोजीचे शासनाचे आदेश रद्द केलेले नाही. त्यामुळे दि. २३-०८-२००१ ला महपौर निवडीची सभा घेता येणार नाही. महापौर निवडीची सभा महानगरपालिका ठरवेल अशा इतर तारखेस घेण्यात यावी. त्या अनुषंगाने दिनांक २३-०८-२००१ ला आयोजित केलेली विशेष सर्वसाधारण सभा होणार नाही असे सर्व सन्माननीय सदस्यांना कळविलेले आहे. शिवाय स्थानिक वृत्तपत्रातही याबाबत प्रसिध्दी देण्यात आलेली आहे.

दिनांक २१-०८-२००१ रोजी निवडणूक प्रक्रियेबाबत मा. न्यायालयास विधिज्ञ यांनी विनंती केली असता जी कार्यवाही पूर्ण झाली त्याच्या पुढील कार्यवाही करण्यात यावी म्हणजेच आता फक्त महापौर पदाची निवड होणाऱ्या सभेत प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी, नामनिर्देशन पत्र परत घेणे व त्यानंतर मतदान घेणे इत्यादी कार्यवाही पूर्ण होणार आहे.

प्रकरण न्यायप्रविष्ट झालेले असल्याने व दिनांक २०-०८-२००१ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठरावास आव्हान दिलेले असल्यामुळे व यास

पुन्हा आव्हान देणे देय होत असल्यामुळे भविष्यात पेच प्रसंग निर्माण होऊ नये म्हणून स्थायी समितीच्या चार सदस्यांनी लेखी मागणी केल्यावरून नियमावलीचे नियम १ (क) नुसार मा. सभापती, स्थायी समिती यांनी या विषयावर विशेष सभेचे आयोजन करण्याबाबत लेखी कळविल्यानुसार या विशेष सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. तरी सभागृहास विनंती करण्यात येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(५) अन्वये महापौर पदाची निवड करण्यासाठी कृपया सभेचा दिनांक व वेळ निश्चित करण्यात यावा.

सभांचे आयोजन करण्याबाबत सभा कामकाज नियमावलीमध्ये खालीलप्रमाणे तरतूदी आहेत.

नियम १(ड) : महापौरास किंवा इतर सांगितल्या प्रसंगी उपमहापौरांस त्यास योग्य वाटेल तेंव्हा तेंव्हा विशेष सभा बोलवता येईल. आणि त्याने पालिका सदस्यांच्या एकूण संख्येच्या कमीत कमी एक चतुर्थांश पालिका सदस्यांनी किंवा स्थायी समितीच्या कमीत कमी चार सदस्यांनी सह्या करून लेखी मागणी केल्यावर अशी विशेष सभा बोलावली पाहिजे.

नियम १ (ह) तहकूब सभे व्यतिरिक्त अन्य प्रत्येक सभेची सर्वसाधारणपणे निदान सात पूर्ण दिवसाची नोटीस दिली पाहिजे, परंतु तातडीच्या प्रसंगी अशी कोणतीही सभा, वार्षिक अर्थसंकल्पातील अंदाजावर विचार करण्याच्या प्रयोजनासाठी असेल त्या व्यतिरिक्त स्थायी समितीच्या कमीत कमी चार सदस्यांची सह्या केलेल्या लेखी मागणीनुसार तीन पूर्ण दिवसाची नोटीस दिल्यावर बोलवता येईल.

श्री. संजय शिरसाठ : महापौर निवडीची सभा बोलावण्यासाठी स्थायी समितीच्या चार सदस्यांनी मा. सभागृहास व मा. सभापती स्थायी समिती यांना लेखी पत्र दिले आहे. त्यानुसार महापौर निवडीसाठी तातडीची विशेष सर्व साधारण सभेचे दिनांक ०४-०९-२००१ रोजी आयोजन करावे.

श्री. सिध्द जगदीश : सभागृह नेता यांनी मांडलेल्या सूचनेस माझे अनुमोदन आहे.

मा. पिठासन अधिकारी : स्थायी समितीच्या ४ सदस्यांचे लेखीपत्र महानगरपालिकेस व सभापती स्थायी समिती यांना दिलेले आहे. सभागृहाने केलेल्या सूचनेप्रमाणे महापौर पदाची निवड करण्यासाठी तारीख व वेळ निश्चित करण्यात येत आहे. दिनांक ०४-०९-२००१ रोजी सकाळी ११.३० वाजता महापौर पदाची निवड करण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करून पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

श्री. प्रकाश निकाळजे : दिनांक ०४-०९-२००१ रोजी महापौर पदाची निवड करण्यासाठी तरी निश्चित केली ७ दिवसाची ३ दिवसाची नोटीस काढून कार्यवाही करावी लागते यात कायदेशीर बाबी बघूनच कार्यवाही करावी.

मा. पिठासन अधिकारी : सर्व कायदेशीर बाबी बघूनच मी निर्णय दिलेला आहे. आताच नगरसचिव यांनी माहिती दिलेली आहे.

नगरसचिव : सभांचे आयोजन करण्याबाबतचे नियम पुन्हा वाचून दाखवण्यात येत आहे. नियम क्र. १(३) ड प्रमाणे महापौरास किंवा वर सांगितलेल्या प्रसंगी उप-महापौरास त्यास योग्य वाटेल तेंव्हा तेंव्हा विशेष सभा बोलावता येईल आणि त्यांने पालिका सदस्याच्या एकूण संख्येच्या कमीतकमी एक चतुर्थांश पालिका सदस्यांनी किंवा स्थायी समितीच्या कमीत कमी चार सदस्यांनी सह्या करून

लेखी मागणी केल्यावर अशी विशेष संभा बोलवली पाहिजे, आणि महानगरपालिकेची प्रत्येक सभा, सभा बोलण्यासंबंधीच्या नोटीशीत निर्दिष्ट केलेल्या विशेष कारणांसाठी असेल त्या व्यतिरिक्त, नगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात भरवण्यात आली पाहिजे. तसेच सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. १(ह) प्रमाणे तहकूब सभेव्यतिरिक्त अन्य प्रत्येक सभेची सर्व साधारणपणे निदान सात पूर्ण दिवसाची नोटीस दिली पाहिजे. परंतु तातडीच्या प्रसंगी अशी कोणतीही सभा, वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजावर विचार करण्याच्या प्रयोजनासाठी असेल तया व्यतिरिक्त स्थायी समितीच्या कमीत कमी चार सदस्यांनी सह्या केलेल्या लेखी मागणीनुसार, तीन पूर्ण दिवसाची नोटीस दिल्यावर बोलवता येईल. तहकूब सभांच्या बाबतीत, तहकुबींचा कालावधी लक्षात घेऊन, व्यवहार्य असेल अशी आगाऊ नोटीस देण्यात आली पाहिजे.

[आय] सभेच्या प्रत्येक नोटीशीत, सभा ज्यावेळी व ज्या ठिकाणी भरावयाची असेल ती वेळ व ते ठिकाणी आणि कलम ४४ खालील प्रश्नाखेरीज अशा सभेत चालवावयाचे कामकाज निर्दिष्ट केले पाहिजे आणि अशी नोटीस महानगरपालिका सचिवाने भरपूर खप असलेल्या निदान एका स्थानिक वृत्तपत्रांतील जाहिरातीद्वारे दिली पाहिजे आणि व्यवहार्य असेल तितपत अशा नोटीशीची एक प्रत प्रत्येक पालिका सदस्यांच्या शेवटच्या माहिती असलेल्या पत्त्यावर साध्या पोष्टाने पाठविली पाहिजे.

मा. पिठासन अधिकारी : दिनांक ०४-०९-२००१ रोजी महापौर पदाची निवड करण्यासाकरिता तारीख निश्चित करण्यास उपस्थित सभागृतील ४३ सदस्यांच्या संमतीने मान्यता देण्यात येते. [ यावेळी सभागृहात २ नामनिर्देशित पालिका सदस्यासह एकूण उपस्थित ४५ आहे] मतदानाचा हक्क असलेल्या ८२ सदस्यांचे सभागृहात १/२ पेक्षा जास्त पालिका सदस्यांच्या म्हणजेच ४३ मतदानाचा हक्क असलेल्या सदस्यांच्या संमत्तीने मंजुरी देण्यात येते. यावेळी उपस्थित असलेल्या सदस्यांच्या नावाची नोंद इतिवृत्तात घेण्यात यावी, या ठरावाच्या वेळी उपस्थित असलेल्या स. सदस्यांची नांवे.

(१) सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर (२) सौ. कचराबाई उत्तमराव लोंखडे (३) सौ. कांबळे निर्मला विठ्ठल (४) श्रीमती मानकापे पार्वती लहानु (५) सौ. पवार मंदाबाई प्रभाकर (६) सौ. मैंद संगिता बाळु (७) सौ. कुलकर्णी जयश्री विजय (८) श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे (९) सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश, (१०) सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिशन (११) जैन विकास रतनलाल (१२) श्री. ओक जयवंत केशवराव (१३) सौ. रहाटकर विजया किशोर (१४) सौ. सुरडकर साधना गणेश (१५) सौ. कागडा बबिता सुभाष (१६) श्रीमती किवळेकर जयश्री सारंग (१७) श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग (१८) श्री. तनवाणी किशनचंद लेखराज (१९) श्री. घोडेले नंदकुमार राधाकिशन (२०) श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव (२१) श्री. फुलारी नंदकुमार माधवराव (२२) पंडागळे रतनकुमार नारायणराव (२३) श्री. साळवे माणिक लक्ष्मण (२४) श्रीमती दाणे चंद्रभागाबाई भगीरथ (२५) श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द, (२६) श्री. तांबे गणेश रामचंद्र (२७) श्री. सावंत मधूकर दामोधर (२८) श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव (२९) श्री. सोनवणे सुदाम रामदास (३०) श्री.

दानवे अंबादास एकनाथराव (३१) श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम (३२) श्री. शिरसाठ संजय पांडुरंग (३३) श्री. तांदुळवाडीकर आनंद विनायकराव (३४) श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण (३५) श्री. लकडे भरत श्रीपती (३६) श्री. शिंदे राजु रामदास (३७) श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक (३८) श्री. थोरात दत्तात्रय रामराव (३९) श्री. देसरडा प्रशांत सुभाष (४०) श्री. कावडे साहेबराव राणुबा (४१) श्री. डॉ. कराड भागवत किसनराव (४२) श्री. वडागळे सुनिल बुथवेल (४३) सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग व स्किवृत सदस्य (१) श्री. घडामोडे भगवान देविदास (२) कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(५)अन्वये महापौर पदावर निवड करण्यासाठी या प्रस्तावाच्या वेळी सभागृहात उपस्थित एकूण ४५ सदस्यापैकी मतदानाचा हक्क असलेल्या ४३ सदस्यांनी म्हणजेच मतदानाचा हक्क असलेल्या एकूण ८२ पालिका सदस्यांपेकी १/२ पेक्षा जास्त पालिका सदस्यांनी संमती दिल्यावरून महापौर पदाची निवड दिनांक ०४-०९-२००१ रोजी आयोजित करण्यास मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी

या बरोबर "जन,गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. पिठासीन अधिकारी /अध्यक्ष यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ०४-०९-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**मंगळवार, दि. ०४-०९-२००१ महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

५) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
६) स.स.श्री. संजय पांडुरंग शिरसाठ
७) स.स.श्री. किशोर तुलशीबागवाले
८) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
११) स.स.श्री. राजु रामराव शिंदे
१२) स.स.श्री. कावडे रावसाहेब राणुबा
१३) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४) स.स.सौ. मंदाबाई प्रभाकर पवार
१५) स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१६) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१७) स.स.सौ. रुख्मीणी राधाकिसन शिंदे
१८) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१९) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
२०) स.स.श्री. शकिल पटेल शे. बुढण पटेल
२१) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
२२) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२३) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२४) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२५) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
२६) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२७) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२८) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२९) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
३०) स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
३१) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३२) स.स.श्री. अय्युब खॉन सरदार खॉन
३३) स.स.श्री. अ.रशिद अ. सत्तार
३४) स.स.श्री. जैन विकास रतनलाल

३५) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३६) स.स.डॉ. भागवत किशनराव कराड
३७) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३८) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३९) स.स.श्री. वडागळे सुनिल बुथवेल
४०) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
४१) स.स.श्री. मुमताज अली मोज्जमअली
४२) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
४३) स.स.श्री. नासेर खॉन सरदारखान
४४) स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव
४५) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४६) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
४७) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४८) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
४९) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
५०) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
५१) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
५२) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
५२) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
५४) स.स.श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या
५५) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
५६) स.स.श्री. अ. कदीर मौलाना सय्यद
५७) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५८) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
५९) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
६०) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
६१) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
६२) स.स.श्री. नासीर खान अ. रहेमान खान कुरैशी
६३) स.स.सौ. शाहिन जफर महमुद जफर
६४) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
६५) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
६६) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
६७) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खाून
६८) स.स.श्री. गाजी सदोद्दिन गाजी जहीर अहेमद
६९) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
७०) स.स.सौ. नफिउन्नीसा बेगम हबीबखॉ
७१) स.स.श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दिन
७२) स.स.श्री. अफसरखान यासीनखान
७३) स.स.सौ. सुलताना बेगम चॉंद खॉ
७४) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
७५) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
७६) स.स. सलीम पटेल समशेर पटेल

७७) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
७८) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
७९) स.स.सौ. कागडा बबिता सुभाष
८०) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
८१) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
८२) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

८) स.स.श्री. घडामोडे भगवान देविदास
९) स.स.श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज
१०) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
११) स.स.सौ. सलमा बाना मीर मोहम्मद अली.

**विषय क्र. ४७६/१ :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि "ड" प्रकरण २ चे नियम क्र. १[ग] अन्वये उपस्थित सदस्यापैकी एका पालिका सदस्याची सभेचे अध्यक्ष / पिठासीन अधिकारी पदी निवड करणे.

**चर्चा :**

श्री. संजय शिरसाठ : पिठासीन अधिकारी पदासाठी स. स. श्री. सुदाम सोनवणे यांचे नांव सुचविण्यात येते.

डॉ.कराड भागवत : यास माझे अनुमोदन आहे.

श्री. किशोर तुलशीबागवाले :पिठासीन अधिकारी पदासाठी स.स.श्री. काशिनाथ कोकाटे यांचे नांव सुचविण्यात येते.

श्री. स. अली. सलामी : यास माझे अनुमोदन आहे.

नगरसचिव : पिठासीन अधिकारी या साठी दोन नांवे सभागृहात सुचविण्यात आलेले आहे. त्यामुळे सभा कामकाज नियमावलीतील जादा नियम क्र. ४३ अन्वये साधरणतः हात वर करून मतदान घ्यावे. अशी तरतूद आहे. त्यानुसार प्रथमतः स.स. श्री. सुदाम सोनवणे यांचे नांव पिठासीन अधिकारीसाठी सुचविण्यात आलेले असून त्यांना ज्या स. सभासदांना मते द्यावयाची असतील त्यांनी हात वर करून आपले मत नोंदवावे त्यानुसार सभागृहात ज्या सदस्यांनी हात वर केले आहेत अशा सदस्यांची गणकामार्फत गणना करण्यात आली. स. सदस्य श्री. सुदाम सोनवणे यांच्या बाजूने हात वर करून एकूण ४३ मते नोंदविण्यात आले. तर दुसरे पिठासीन अधिकारी या पदासाठी नांव सुचविण्यात आलेले स. सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे यांचे बाजूने ज्या स. सदस्यांना आपले मत नोंदवावयाचे आहे, कृपया त्यांनी हात वर करून आपले मत नोंदवावे.

याचवेळी काही स. सदस्य हे सचिव यांच्या समोर जोरजोराने ओरडत गेले व सदरील सभा अनधिकृत असल्याचे आघाडीचे नगरसेवकांनी

सांगितले. तर याचवेळी पुन्हा दोन्हीही बाजूचे स. सदस्य हे जोरजोरात बोलतात.

नगरसचिव : पिठासीन अधिकारी म्हणून स. सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे यांना ज्या स. सदस्यांना आपले मत नोंदवावयाचे आहे त्यांनी हात उंच करावे अशी विनंती करण्यात येते.

श्री. स. अली सलामी : नियमाप्रमाणे सर्व स. सदस्यांना ३ दिवस अगोदर विषयपत्रिका वितरित होणे आवश्यक आहे. आम्हा सर्व स. सदस्यांना २४ तासातच विषयपत्रिका प्राप्त झाली त्यामुळे मागील सर्वसाधारण सभा व आजची सर्वसाधारण सभा ही नियमाप्रमाणे नाही.

याचवेळी व्यासपिठासमोर पुन्हा दोन्हीही बाजूचे स. सदस्य एकमेकांसमोर येतात व जोर जोरात बोलतात.

श्री. कोकाटे काशिनाथ : मागील सभेत घेतलेले ठराव हे नियमाप्रमाणे नाही. त्यामुळे ही सभा नियमानुसार होत नाही.

श्री. अफसरखॉन : हि सभा नियमाप्रमाणे होत नाही. कोणाच्याही दडपनाखाली काम करू नये. नियमाप्रमाणे सभा होते किंवा नाही याचा खुलासा करण्यात या ा. ७२ तासाऐवजी ४८ तासापूर्वी विषय पत्रिका देण्यात आलेली आहे.

श्री. स. सलीम स. युसूफ : सभागृहात सदस्यांनी रिव्हाल्वर आणलेली आहे याबाबत शहानिशा करावी.

श्री. सुदाम सोनवणे : माझ्याकडे नेहमी रिव्हाल्वर असते. सभागृहात येतांना गेट मध्ये मला मागीतले असते तर मी जमा केले असते. [ यावेळी त्यांचे जवळील रिव्हाल्वर काढून सुरक्षा अधिकारी यांचेकडे देतात.]

श्री. कोकाटे काशिनाथ : या सभागृहात रिव्हल्वर आणने कायद्यानुसार योग्य नाही. या ठिकाणी सभागृहाची दिशाभूल होवू नये. रिव्हाल्वर सभागृहात कशी आणल्या गेली तपासणी करूनच सर्वांना सभागृहात प्रवेश देण्यांत येतो.

श्री. अफसरखॉन : सभागृहात रिव्हाल्वर आणने चुकीचे असून याबाबतचा आम्ही निषेध करतो. व या बाबतची नोंद इतिवृत्तामध्ये घेण्यात यावी.

श्री. कोकाटे काशिनाथ : सभा नियमाप्रमाणे आहे काय? सचिवांनी माहिती द्यावी.

नगरसचिव : स. सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसून घ्यावे. स. सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे रिव्हाल्वर बाबतची नोंद इतिवृत्तामध्ये घेण्यात येईल. सदरील सभा ही नियमाप्रमाणे होत असून सभेची विषयपत्रिका ही सर्व सदस्यांना वितरित झालेली आहे. सभागृहास विनंती, स. सदस्यांनी आप-आपल्या जागेवर बसून सहकार्य करावे व सभागृहात शांतता राखावी सभागृहात विनंती करण्यात येते की, स. सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे यांचे बाजूने ज्या स. सदस्यांना मत नोंदवावयाचे असेल त्यांनी सभागृहामध्ये हात वर करून आपले मत नोंदवावे. पुन्हा ऐकवेळ सभागृहास विनंती करण्यांत येते की, ज्यास पिठासीन अधिकारी म्हणून श्री. काशिनाथ कोकाटे यांच्या बाजूने मत नोंदवावयाचे असेल त्यांनी कृपया आपले हात वर करून मत नांदवावे. यावेळी स. सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे यांचे बाजून सभागृहात कुणीही हात वर करून मत नोंदवित नाही. स. सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे यांच्या बाजूने एकही मत नोंदविण्यात आले नाही.

याचवेळी पुन्हा सभागृहात व्यासपिठासमोर दोन्हीही बाजूचे स. सदस्य जोरजोरात बोलतात.

सौ. निखत अली, सौ. शाहिन जाफर : या सभागृहमध्ये बऱ्याचशा सदस्या या महिला सुध्दा आहेत. आमच्याही बॅगा तपासण्यात आल्या तसे सर्वांनी तपासणी करण्यात यावायास पाहिजे होती.

मा. आयुक्त : सर्व स. सदस्यांनी बसून घ्यावे व शांतता राखावी अशी विनंती सभागृहामध्ये करतात.

श्री. संजय शिरसाठ , श्री. दानवे अंबादास : स. सदस्य श्री. सुदाम सोनवणे यांचे नांवास बहुमताने पसंती मिळाली असून सचिवांनी त्यांना पाचारण करावे.

व्यासपिठाच्या समोर दोन्हीही बाजूचे स. सदस्य जमतात व मोठ्या आवजात बोलतात.

नगरसचिव : स. सदस्य श्री. सुदाम सोनवणेयांचे बाजूने पिठासीन अधिकारीसाठी ४३ सदस्यांनी आपले मत नोंदले आहे व स. सदस्य श्री. काशिनाथ कोकाटे यांचे बाजूने एकही मत नोंदविण्यात आले नसल्याने मी स. सदस्य श्री. सुदाम सोनवणे यांना विनंती करतो की, त्यांनी पिठासीन अधिकारी म्हणून आसन ग्रहन करावे.

याचवेळी पिठासीन अधिकारी म्हणून स. सदस्य श्री. सुदाम सोनवणे स्थानापन्न होतात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात हात वर करून प्रत्यक्ष झालेले मतदान प्रमाणे श्री. सुदाम रामदास सोनवणे यांना ४३ मते मिळाली असून त्यांची सभेचे अध्यक्ष / पिठासीन अधिकारी म्हणून निवड करण्यास बहुमतांनी मान्यता देण्यात आली.

मा. पिठासीन अधिकारी : सर्व स. सदस्यांना विनंती की, सर्वांनी सभागृहात आपआपल्या जागेवर बसून घ्यावे. व शांतात बाळगावी. स. सदस्यांनी रिव्हाल्वर संदर्भात विचारणा केल्यावरून आणले. दर मिटींगला रिव्हाल्वर माझ्या सोबत असते. आज गेट मधून सभागृहात येतांना मला कुणीही मागीतले नाही. त्यामुळे ते माझ्या सोबत राहिले होते. जबाबदार व्यक्तीकडे ठेवावे लागते. व ते मी सुरक्षा अधिकारी यांचेकडे जमा केलेली आहे.

**विषय क्र. ४७७/२ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(५) आणि महानगरपालिका महापौर आरक्षण नियम १९९४ चे तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक ०५-०८-१९९९ ची अधिसूचना क्र. जीईएम-१०९९/१२४०/प्र.क्र.६६/९९/नवि-२४ प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेचे महापौर पद नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आले आहे. त्यानुसार महापौर पदावर निवड करणे.

**संवाद :**

नगरसचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कमल १९(५) च्या तरतुदीनुसार महापौर पदाची कोणती ही नेमत्तीम जागा रिकामी झाल्यानंतर सोयीस्करपणे शक्य तितक्या लवकर अशी रिकामी झालेली जागा भरण्यासाठी आपल्या पालिका सदस्यापैकी एकाची निवड केली पाहिजे

आणि अशा रितीने निवडून आलेल्या प्रत्येक महापौरांचे ज्या व्यक्तीच्या जागी त्याची नेमणूक झाली असेल त्या व्यक्तीस ती जागा रिकामी झाली नसतील तर जितक्या अवधीपर्यंत पदधारण करण्याचा हक्क प्राप्त झाला असता तितक्याच अवधीपर्यंत पद धारण केली पाहिजे अशी तरतूद आहे.

अधिनियम कलम १९(५) अन्वये महापौर पदाची रिकामी झालेली जागा भरण्यासाठी आजची सभा आयोजित करण्यात आली आहे.

मा. पिठासीन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(५) अन्वये महापौर पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक १३-०८-२००१ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४,४५ व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १४-०८-२००१ ते १९-०८-२००१ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक १९-०८-२००१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत महापौर पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत. सभा कामकाज नियमावली नियम क्रमांक ४४ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | उमेदवारांचे नांव |
|---|---|---|
| १) | ६६ | श्री. स. सलीम स. युसूफ |
| २) | ३१ | श्री. जैन विकास रतनलाल |
| ३) | ८२ | श्री. तनवाणी किशनचंद लेखराज |
| ४) | २८ | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिशन |
| ५) | ०१ | श्री. वाणी ठकूजी रामकिशन |
| ६) | ५२ | श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या |
| ७) | ७७ | श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान |
| ८) | ६१ | श्री. नासीर खान अ. रहेमान खान कुरैशी |

मा. पिठासीन अधिकारी : आता छाननीचे काम पूर्ण झाले असून खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्र वैद्य ठरविण्यात आले आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | उमेदवारांचे नांव |
|---|---|---|
| १) | ६६ | श्री. स. सलीम स. युसूफ |
| २) | ३१ | श्री. जैन विकास रतनलाल |
| ३) | ८२ | श्री. तनवाणी किशनचंद लेखराज |
| ४) | २८ | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिशन |
| ५) | ०१ | श्री. वाणी ठकूजी रामकिशन |
| ६) | ५२ | श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या |
| ७) | ७७ | श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान |
| ८) | ६१ | श्री. नासीर खान अ. रहेमान खान कुरैशी |

मा. पिठासीन अधिकारी : वरीलपेकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांनासुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल. (नियम क्र. ४७ प्रमाणे)

सभेत सुचक किंवा अनुमोदक या पैकी एखादा उपस्थित नसेल तर इच्छुकाला या दोहोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे त्याच्या संमतीने ३० मिनिटाच्या अवधित म्हणजेच १२.३० वाजेपर्यंत आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना महापौर पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे आपले नांव १२.३० वाजेपर्यंत परत घेता येईल. मात्र वेळेनंतर महापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

मा. पिठासीन अधिकारी : आता १२:३० वाजले असून उमेदवारी अर्ज परत घेण्याची वेळ संपली आहे. महापौर पदासाठी ०८ उमेदवारी पैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

| अ.क्र. | उमेदवारी परत घेणाऱ्यांची नांवे |
|---|---|
| १) | श्री. स. सलीम स. युसूफ |
| २) | श्री. तनवाणी किशनचंद लेखराज |
| ३) | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिशन |
| ४) | श्री. वाणी ठकूजी रामकिशन |
| ५) | श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या |
| ६) | श्री. नासीर खान अ. रहेमान खान कुरैशी |

आता महापौर पदाच्या निवडणूकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| अ.क्र. | उमेदवारांची नांवे |
|---|---|
| १) | श्री. जैन विकास रतनलाल |
| २) | श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान |

मा. पिठासीन अधिकारी : मतदानाबाबत गोपनियता पाळता यावी म्हणून मतपत्रिकेच्या स्थळप्रतिवर अनुक्रमांक राहिल. मात्र मतपत्रिकेवर अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सरमिसळ करण्यात येईल. तसेच स्थळप्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही. त्यामुळे मतदानासाची गुप्तता पाळली जाईल.

मतपत्रिका १(एक) तासात तयार होतील व मतदानाला सुमारे १.३५ वाजता सुरुवात होईल. तरी मतपत्रिका तयार करून घ्यावी व त्यानंतर नगरसचिव यांनी सर्व स. सदस्यांच्या माहितीसाठी नमूना मतपत्रिका सभागृहात फलकावर लावण्याची व्यवस्था करावी.

मा. पिठासीन अधिकारी : मतपेटी जवळ नियुक्त केलेले मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहास दाखवनू द्यावे. व मतपेटीला कुलूप लावून तीची चावी माझेकडे आणून द्यावी. व मतपेटी मोहोरबंद करून घ्यावी. (पिठासीन अधिकारी स्वतः च्या सहिने मतपेटी मोहोरबदं करून घेतील.)

सभा कामकाज नियमावलचे नियम क्र. ५१ अन्वये मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वतः उपस्थित राहण्याची इच्छा नसेल तर त्यांनी मतमोजणी पाहण्याकरिता एखाद्या सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून पाठविता येईल. त्यासाठी मतदान सुरू होण्यापूर्वी म्हणजेच आता त्यांनी

त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स. सभासदांनी कृपया गर्दी करू नये.

नगरसचिव यांनी कृपया मतदानासंबंधीच्या सूचना सभागृहाच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

दोन स. सभासद निवडणुकीत उभे आहेत त्यांची नावे वाचून दाखवितात.

(१) श्री. जैन विकास रतनलाल (२) श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान

नगरसचिव : नमूना मतपत्रिका सभागृहात फलकावर लावण्यात आली आहे. मतपत्रिकेवर अ.क्र. १ ला श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान यांचे नांव असून अ.क्र. २ वर श्री. जैन विकास रतनलाल यांचे नांव आहे.

१) मतदानास प्रत्यक्ष सुरुवात करतांना प्रभागनिहाय स. सदस्यांची नांवे पुकारण्यांत येतील.
२) महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे.
३) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (आय) प्रमाणे सभासदला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना मा. पिठासीन अधिकारी यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल.
४) नियम क्र. ५० प्रमाणे कोणत्याही सभासदाला एकापेक्षा जास्त इच्छुकांना आपले मत देता येणार नाही. मतदान करतेवळी प्रत्येक सभासद मतदान पत्रिकेच्या उजव्या बाजूला ज्या इच्छुकांना मत द्यावयाचे असेल त्याच्या नावासमोर फुली करील (X)
५) सभा कामकाज नियमावलीच्या नियम क्र. ४५(जे) मधील तरतूदीनुसार खालील परिस्थितीत मतपत्रिका अवैद्य समजली जाईल.

   १) जर मत पत्रिकेवर सभासदाने आपले नांव किंवा शब्द लिहत असेल अथवा तो ओळखता येईल अशा रितेने तिच्यावर काही खूण केलेली असेल अथवा.....
   २) जी छिद्रांकित [परुोरेटेड] नसेल अथवा.....
   ३) जीच्यावर मत नोंदविले नसेल अथवा जी संदिग्धतेमुळे निरउपयोगी आहे.

श्री. कुमावत अविनाश : नियमावली दुरुस्त करण्याबाबत या पूर्वीच्या निवडणूकीच्या सभेला देखील मी सूचना केली होती.

नगरसचिव : महानगरपालिका सभा कामकाज नियमावली अद्यावत करून घेण्याची कार्यवाही करण्यात येत असून निवृत्त न्यायाधिशांची नेमणूक करून नियमावली दुरुस्त करण्याची कार्यवाही विधी विभागाकडून करण्यात येत आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : कोणता न्यायाधीश नियुक्त केलेला आहे. व त्यासाठी किती कालावधी लागणार आहे याची माहिती द्यावी.

मा. पिठासीन अधिकारी : या संदर्भात दुरुस्ती करण्याची कार्यवाही चालू आहे. सध्या निवडणूकीची प्रक्रिया सुरू असून ज्यावेळेस महापौरांच्या अध्यक्षतेखाली सभा होईल त्यावेळेस प्रश्न विचारणा करावे.

मा. पिठासीन अधिकारी : नमूना मतपत्रिका फलकावर चिकटविण्यता आलेली आहे.आता मतदानाला सुरुवात होत आहे. प्रभागनिहाय स. सभासदांची नांवे

पुकारण्यता येतील. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५(एफ) च्या अनुषंगाने मतदानासाठी एक तासाचा कालावधी देण्यात येत असून सभागृहातील घड्याळाप्रमाणे आता ०१.५० वाजले असून मतदान ०२.५० वाजता संपेल. सभेत कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५(जी) प्रमाणे मतदनाची वेळ संपल्यानंतर महापौर पदासाठी मतदान करता येणार नाही. कृपया याची सर्व स. सदस्यांनी नोंद घ्यणवी व मतदान शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यास सहकार्य करावे अशी सर्वांना विनंती आहे. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियम क्रमांक ४५ च्या तरतूदीप्रमाणे कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा - नस-२००१/६४६ दि. १७-०८-२००१, व दुरुस्ती आदेश क्र. मनपा/नस/२००१/६८१ दि. ३१-०८-२००१ अन्वये अधिकारी व कर्मचारी यांची केलेली नियुक्ती कायम करण्यात येत असून सदर आदेशाद्वारे ज्यांना ज्यांना जी कामे नेमून देण्यता आलेलली आहेत त्यांनी ती कामे जबाबदारीने पार पाडावीत. आता जनसंपर्क अधिकारी यांनी मतदानासाठी स. सदस्यांची नांव पुकारावीत.

जनसंपर्क अधिकारी : [वॉर्ड क्र. १ पासून प्रभागनिहाय स. सदस्यांनी नांवे पुकारतात.]

श्री. काशिनाथ कोकाटे : स. सदस्या नफिसुन्नीसा बेगम यांची प्रकृती ठिक नसल्याने तयांना प्रथम मतदान करण्यात आदेशित करावे.

मा. पिठासीन अधिकारी : ठिक आहे. त्याच प्रमाणे स. सदस्य श्री. घोडेले यांनी विनंती केल्यानुसार त्यांना सुध्दा अगोदर मतदान करण्यास परवानी देण्यात येते.

जनसंपर्क अधिकारी यांनी नांवे पुकारल्यानुसार खालील प्रभागनिहाय स. सदस्य मतदान करतात. (७०), (१), (२८) चे स. सदस्यांनी मतदान केले.

श्री. स. अली सलामी : जनसंपर्क अधिकारी मतदानासाठी नांवे पुकारतात त्यानुसार मतदान करण्यात येते. २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १० चे स. सदस्यांनी मतदान केले.

मा. पिठासीन अधिकारी : प्रभाग क्र. ११ चे स. सदस्या सौ. पवार मंदाबाई यांनी लेखी मागणी प्रमाणे स. सदस्य शि. शिंदे यांची मतपत्रिका फाटलेली असून त्यांना दुसरी मतपत्रिका द्यावी व फाटलेली मतपत्रिका सिल करून पिठासीन अधिकारी यांचेकडे द्यावे.

मा. पिठसीन अधिकारी : प्रभाग क्र. १४ चे स. सदस्या सौ. शिंदे यांनी मदतनिसासाठी अर्ज केलेला आहे. त्यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी मदत करावी. १५ चे स. सदस्यांची मतदान केले.

मा. पिठासीन अधिकारी : प्रभाग क्र. १४ चे स. सदस्या सौ. शिंदे यांनी मतदनीसासाठी अर्ज केलेला आहे. त्यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी मदत करावी. १५ चे स. सदस्यांनी मतदान केले.

मा. पिठासीन अधिकारी : प्रभाग क्र. १६ चे स. सदस्या सौ. कचराबाई लोखंडे यांनी मदतनीससाठी अर्ज केलेले आहे. त्यांना मुख्यलेखा सदस्यांनी परिक्षक श्री. सोनार यांनी मदत करावी. १७, १८ चे सदस्यांनी मतदान केले.

मा. पिठासीन अधिकारी : प्रभाग क्र. १९ चे स. सदस्या श्रीमती पार्वतीबाई मानकापे यांनी अर्ज दिल्यावरून त्यांना उप-आयुक्त (प्र.) यांनी मदत करावी.

२०,२१,२२, २३, २४, २५, २६, २७, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५३, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१ चे स. सदस्यांनी मतदान केले.

मा. पिठासीन अधिकारी : प्रभाग क्र. ६२ चे स. सदस्या श्रीमती शाहीन जफर यांनी मदतनीसासाठी लेखी अर्ज दिला आहे त्यांना उप-आयुक्त (म) यांनी मदत करावी. ६४, ६५, ६६, ६७, ६८, ६९, ७१, ७२ चे स. सदस्य यांनी मतदान केले.

मा. पिठासीन अधिकारी : प्रभाग क्र. ७३ चे स. सदस्य सौ. सुलताना बेगम यांनी लेखी अर्ज देवून मदत मागीतली असून त्यांना श्री. खन्ना (उप-अभियंता ड्रेनेज) यांनी मदत करावी. ७४, ७५, ७६, ७७ चे स. सदस्य यांनी मतदान केले. याच वेळी स. सदस्य श्री. शेख मुनाफ शेख यासीन यांनी मतपत्रिका दाखविली म्हणून काही युतिच्या नगरसेवकांची आक्षेप घेतला असता काही वेळ पुरता पिठासीन अधिकारी यांचे समोर काही नगरसेवक येऊन जोरजोरात बोलत होते. त्याच वेळेस पिठासीन अधिकारी यांनी स.स. श्री. शेख मुनाफ यांना मतपत्रिका मतपेटीत टाकण्याचे आदेशित केले त्याचप्रमाणे स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल यांना सुध्दा मतपत्रिका दाखविली असता आक्षेप नोंदविला मात्र पिठासीन अधिकारी यांनी तीच मतपत्रिका मतपेटीत टाकण्याचे आदेशित केले. ७८, ७९ चे स. सदस्य यांनी मतदान केले.

मा. पिठासीन अधिकारी : प्र.क्र. ८० चे स. स. सौ. बबिता कागदा यांनी लेखी अर्ज देवून मदतनीस मागितल्यावरून त्यांना उप-आयुक्त (म.) यांचे स्वी. स. यांनी मदत केली. ८१,८२ चे स. सदस्यांनी मतदान केले.

मा. पिठासीन अधिकारी : प्रभाग क्र. ८३ चे स.स. सौ. निखत परवीन ईजाज अली यांनी लेखी अर्ज देवून मदत मागितली असून त्यांना प्रभारी विधी सल्लागार श्री. शिरसाठ यांनी मदत करावी. प्रभाग क्र. ४३ चे नांव पुकारण्यात आले असता पिठासीन अधिकारी यांनी मतदान होईपर्यंत स.स. राधाकृष्ण गायकवाड यांना आसन ग्रहण करून मतदानास उठले व मतदानाचा हक्क बजाविला व पुन्हा पिठासीन अधिकारी म्हणून आपले आसन ग्रहन केले.

मा. पिठासीन अधिकारी : आता २.५० वाजले असून मतदान संपले आहे. असे मी घोषत करतो. मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका देवू नयेत. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी. उमेवारांना किंवा त्यांनी प्राधिकृत प्रतिनिधीलाच मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. इतर स. सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करू नये व सभागृहात शांतता ठेवून निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यास सहकार्य करावे हि विनंती.

श्री. जैन विकास यांचेसाठी श्री. अंबादास दानवे तर श्री. कैसरखान बद्रोद्दिन खान यांचेसाठी श्री. तकीहसन खान यांनी मतमोजणीचे वेळी प्रतिनिधी म्हणून येण्यास परवानी देण्यात येते.

पिठासीन अधिकारी यांच्या आदेशानुसार मतपेटी उघडण्यात येते. मतपत्रिका पूर्ण असल्याची खात्री करण्यात येऊन पिठासीन अधिकारी मतपत्रिकेच्या पाठीमागे सह्या करतात व त्यानंतर मतमोजणीला सुरुवात होते.

मा. पिठासीन अधिकारी : मतमोजणीचे काम पूर्ण झाले आहे.

| | | |
|---|---|---|
| एकूण मतदान | - | ८२ |
| अवैद्य मते | - | ०६ |
| वैद्य मते | - | ७६ |

उमेदवारांना पडलेली मते खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | उमेदवारांची नांवे | पडलेली मते |
|---|---|---|
| १) | श्री. जैन विकास रतनलाल | ५४ |
| २) | श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान | २२ |

मत मोजणीच्या निकालावरून मी असे घोषित करतो की, श्री. जैन विकास रतनलाल यांची महापौर पदासाठी निवड झाली असून मी त्यांचे अभिनंदन करतो व त्यांना विनंती करता`की, त्यांनी आसन ग्रहन करावे.

**ठराव :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(५) व महानगरपालिका महापौर आरक्षण नियम १९४९ चे तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक ०५/०८/१९९० ची अधिसूचना क्रमांक जी इ एन-१०९९/१२४०/प्र.क्र.-६६/९९/नवि-२४ नुसार नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गासाठी राखीव असलेल्या महापौर पदासाठी झालेल्या मतदानानुसार श्री. जैन विकास रतनलाल यांना ५४ मते मिळाली व श्री. कैसरखान बद्रोद्दिन यांना २२ मते मिळाली व ०६ मते अवैद्य ठरली. श्री. जैन विकास रतनलाल हे महापौर पदी ३२ मतांनी विजयी झाल्याचे पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

श्री. जैन विकास रतनलाल यांनी आसन ग्रहन केल्यानंतर त्यांचे स्वागत करण्यात आले त्यानंतर मा. महापौर यांनी सर्वांचे आभार मानू "जन गण मन " या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २०-०९-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**गुरुवार, दिनांक २०-०९-२००१ रोजी सकाळी ११.३० वाजता औरंगाबाद महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे मा. महापौर श्री. जैन विकास रतनलाल यांचे अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभेची "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय नगरसेवक उपस्थित होते.**

१) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
२) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
३) स.स.श्री. तुलशीबागवाले किशोर
४) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
८) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
९) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
१०) स.स.श्री. कावडे रावसाहेब राणुबा
११) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१२) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१३) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१४) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१५) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१६) स.स.सौ. लोखंडे कचराबाई उत्तमराव
१७) स.स.श्री. शे. शकिल पटेल शे. बुढण पटेल
१८) स.स.श्रीमती डॉ. बिनवडे आशा उत्तम
१९) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२०) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२१) स.स.श्री. रहाटकर विजया किशोर
२२) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२३) स.स. ॲड चंद्रात्रे सुवर्णा रमेश
२४) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२५) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२६) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२७) स.स.श्री. अय्युब खॉन सरदार खॉन
२८) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
२९) स.स.श्री. तांदुळवाडीकर आनंद विनायकराव
३०) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३१) स.स.श्री. वडागळे सुनिल बुथवेल
३२) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३३) स.स.श्री. मुमताज अली मोज्जमअली

३४) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३५) स.स.श्री. नासेर खॉन सरदारखान
३६) स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव
३७) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३८) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३९) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४०) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
४१) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४२) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४३) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४४) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४५) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४६) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४७) स.स.श्री. अ. कदीर मौलाना सय्यद
४८) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४९) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५०) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
५१) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
५२) स.स.सौ. शाहिन जफर महमुद जफर
५३) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५४) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५५) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खान
५६) स.स.श्री. गाजी सदोद्दिन गाजी जहीर अहेमद
५७) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५८) स.स.श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दिन
५९) स.स.श्री. अफसरखान यासीनखान
६०) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६१) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
६२) स.स. सलीम पटेल समशेर पटेल
६३) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
६४) स.स.श्री. सिध्द जगदीश कन्हैय्यालाल
६५) स.स.सौ. कागडा बबिता सुभाष
६६) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
६७) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
६८) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
२) स.स.श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज
३) स.स.सौ. सलमा बाना मीर मोहम्मद अली.

सभागृहातर्फे अमेरीकेत झालेल्या विमान हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांना तसेच. नाशिक महानगरपालिका महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती सौ. भोगे यांचे आणि स. सदस्य श्री. नंदकुमार घोडेले यांचे वडील स्व. राधाकिशन घोडेले यांचे दुखःद निधनाबद्दल ०२ मिनिटे सर्वांनी उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.

**संवाद :**

महापौर : आजची सभा माझ्या अध्यक्षतेखाली पहिल्यांदाच होत आहे सर्वांनी विकास कामे होण्यासाठी सहकार्य करावे अशी अपेक्षा ठेवतो.

श्री. अफसरखॉन : दिनांक १४/०२/२००० रोजी मा. आयुक्त, शिक्षणाधिकारी यांना पत्र देऊन कळविले की, महानगरपालिकेच्या संपूर्ण शाळेवर १७१ उर्दू शिक्षकांची आवश्यकता आहे. उर्दूचे ९ शिक्षक भरणार अशी वृत्तपत्रात जाहिरात आली. उर्वरित मराठी माध्यमचे शिक्षक भरती करणार काय? सर्व माहिती दिली असतांना उर्दूचे ९ शिक्षकच का घेण्यास येत आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : नुतन महापौर यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यात येते. व आपणाकडून विकास कामांची अपेक्षा बाळगते. माझ्या वॉर्डात मालमत्ता कर वसुलीचे काम चालू आहे. नगरसेवकांनी सहकार्य करावे म्हणून पत्र आले. सहकार्य मिळेल. गेल्या वर्षी ७०% मालमत्ता कर वसूल झाला आहे. आता जनतेपुढे जायचे कसे. परंतु २०-२५ वर्षापासून वसाहती झालेल्या असतांना मालमत्ता कर लावलेला असतांना जनतेला पूर्ण सुविधा दिल्या जात नाही. कर लावलेला आहे तो कर जनता देणार नाही. वॉर्डात पाणी येत नाही अधिकाऱ्यांना सूचना दिली असता अनधिकृत भाग आहे म्हणून स्वेच्छानिधी वापरता येत नाही. असे उत्तर मिळते. किमान स्वेच्छानिधीतून तरी विकास कामे करण्यास परवानगी द्यावी नसता आम्ही सर्व माहिला नगरसेविका आंदोलन करू.

श्री. अफसर खॉन : महानगरपालिकेच्या संपूर्ण शाळेचा मी स्वतः सर्व्हे केला. कोणत्या शाळेत किती शिक्षक व किती मुले आहेत व त्यानुसार आणखी किती शिक्षकांची कोणकोणत्या शाळेत गरज आहे याची माहिती घेतली असता एकूण १७१ शिक्षकांची आवश्यकता आहे. ९ कमी संख्येप्रमाणे १८० होतात, दिशाभूल करतात. म्हणून मी यादीसह दिनांक १४-२-२००१ रोजी पत्र देऊन कळविलेले आहे. ही शिक्षक भरती करण्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली. त्यामध्ये ९ शिक्षक फक्त उर्दू माध्यमाचे भरणार असे दिले. मुलांचे शिक्षणावर परिणाम होत आहे, शिक्षकांची आवश्यकता आहे. अधिकाऱ्यांनी मा. आयुक्तांची दिशाभूल केलेली आहे. या संदर्भात पत्र दिल्यानंतर मला नावासह यादी पुरविण्यात आली त्याप्रमाणे १६३ आहे. यापूर्वी १७१ सांगण्यात आले. एक सेवानिवृत्त झाले आहे. आता १६२ काम करतात. ८ कोटी संख्येप्रमाणे १८ पाहिजे नंतर मी मा. आयुक्त व श्री. कांबळे यांचेशी चर्चा केली आवश्यकतेनुसार एकूण ६२ शिक्षक भरती करणार म्हणून सांगितले त्यापैकी ४५ शिक्षक मराठी माध्यम व १७ शिक्षक उर्दू माध्यमचे घेणार असे आश्वासन दिले परंतु १७ ऐवजी फक्त ९ शिक्षक उर्दू माध्यमचे घेणार म्हणून वृत्तपत्रास जाहीर प्रगटन देऊन कार्यवाही होत आहे. या संदर्भात शासनाकडून सुध्दा मार्गदर्शन घेण्यात आले व शासनाने पत्र देवून

महानगपालिकेस असे कळविले की, आवश्यकतेनुसार शिक्षक भरती करण्यास हरकत नाही. असे असतांना सुध्दा जे संबंधित अधिकारी यांनी शाळेचा सर्वे न करता व १७१ शिक्षकांची आवश्यकता असतांना माहिती देऊन सुध्दा फक्त ६२ शिक्षक भरती करण्याची कार्यवाही करित आहे. अशा अधिकाऱ्यावरकार्यवाही केली पाहिजे. ६२ पेकी १७ उर्दूचे शिक्षक भरती करणार होते, का संख्या कमी केली फक्त ९ शिक्षक भरती करणार काय? १९९६ ला शासनाचे निर्णय झालेला आहे की, अल्पसंख्याकांसाठी भरती करावी व त्यांचे वेगळे निकष ठरवावे त्यानुसार आतापर्यंत कार्यवाही केली नाही. या संदर्भात ९ महिण्यापूर्वी पत्र दिले का कार्यवाही केली नाही. अल्पसंख्याकांची शिक्षक भरती प्रत्येक वेळी दिशाभूल करण्यांत येते. ३० सप्टेंबर अखेर मुलांच्या संख्येप्रमाणे व १९९६ च्या जी. आर. प्रमाणे अल्पसंख्यांसाठी निकशाप्रमाणे जितके शिक्षक आवश्यक तितके घेण्यात यावे.

मा. महापौरः स. सदस्या श्रीमती. मानकापे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

प्रकल्प संचालक : शहरातील अनधिकृत वसाहतींच्या सर्वे करून त्या अधिकृत करण्याच्या दृष्टीने आपण दिनांक ०६/०७/२००१ च्या विशेष सभेत ठराव पास केलेला असून सदर तारखेचे इतिवृत्त आजच्या बैठकीत कायम होत आहे व तसा पास झालेला ठराव शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवून शासनाने दिलेल्या मंजुरीनुसार आपल्याला त्या त्या भागातील वसाहत अधिकृत बाबत कार्यवाही करता येईल.

श्री. पार्वती मानकापे : शासन अशा वसाहतींना सुविधा देण्यास जोपर्यंत मंजुरी देत नाही तोपर्यंत कर लावू नये.

मा. महापौर : शहरातील अनधिकृत वसाहती अधिकृत करण्याचा ठराव आपण पास केलेला आहे. आजच्या बैठकीत ठराव कायम होईल. व शासनाकडे पाठविण्यात यावा. शासनाची या प्रस्तावास तात्काळ मंजुरी घेण्यासाठी प्रयत्न केले जाईल.

श्री. प्रकाश निकाळजे : महानगरपालिकेच्या बऱ्याच शाळा या स्लम भागात आहे. शिक्षक भरती करण्यास प्रशासन उत्सूक नाही असे दिसते. ज्या प्रमाणकानुसार शिक्षक भरती. करावयास पाहिजे तशी कार्यवाही होत नाही.

श्री. स. अली सलामी : बऱ्याच ठिकाणी विद्यार्थ्यांच्या संख्येप्रमाणे शिक्षक नाहीत.

मा. महापौर : शिक्षक भरती करण्यासंदर्भात महानगरपालिकेतर्फे जाहीर प्रगटन दिलेले आहे. परंतुस. सदस्य या भरती बाबत वेगवेगळे प्रश्न उपस्थित केल्यानुसार पूर्वीची दिलेली जाहीरात रद्द करून प्रशासनाने संपूर्ण महानगरपालिकेच्या शाळेचा सर्वे करून दिनांक ३०-०९-२००१ पर्यंत किती शिक्षकांची गरज आहे. आवश्यकतेनुसार तेवढया शिक्षकांची भरती करण्याची कार्यवाही करावी.

सौ. शिंदे रुख्मीणी : माझ्या वॉर्डात नागरिकांकडून ४ वर्षापूर्वी लोकवर्गणी पोटी रक्कम जमा केली ड्रेनेजचे काम करणार होते अद्याप झालेले नाही.

मा. महापौर : या सदंर्भात माझ्या दालनात चर्चा झालेली आहे. सविस्तर चर्चा झाली आहे. सर्वसाधारण सभेनंतर चर्चा करण्यासंदर्भात कालच ठरलेले आहे. संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करण्यात येतील.

सौ. लोखंडे कचराबाई : माझ्या वॉर्डात नळपट्टी मालमत्ता कर लागू केला काही भागात नळाची व्यवस्था झालेली नाही ज्या भागात दिले ते तेथे पुरेपुरे पाणी येत नाही. असे असेल तर नागरिक पाणीपट्टी भरणार नाही तसेच ड्रेनेजची स्वच्छता करण्यासाठी कर्मचारी येत नाही. वॉर्डात बऱ्याच गृहनिर्माण संस्था आहे. ड्रेनेज व इतर सुविधा दिल्या जाता नाही. रस्ते व्यवस्थित नाही तसेच संदेशनगर दुर्गामाता कॉलनी भागात रस्ते, लाईट व्यवस्थित नाही. पत्र सुध्दा मी दिले आहे. हो म्हणतात कोणीही येत नाही.

मा. महापौर : प्रत्यक्ष पाहणीसाठी मी सुध्दा उपस्थित राहिल सोमवार किंवा मंगळवारी भेट देण्यात येईल व जागेवरच निर्णय घेवू.

सौ. संगिता मैंद : दिनांक ०६-०७-२००१ च्या इतिवृत्तातील ठरावाची प्रत शासनाकडे पाठविल्यानंतर किती कालावधी लागेल आपणही पाठपुरावा करावा. ८०% अनधिकृत वसाहत आहे. ३० वर्षापूर्वीची आहे. मला काहीच काम करता येत नाही.

मा. महापौर : यासाठी मी स्वतः जातीने लक्ष देऊन मंजुरी आणण्याबाबत मी स्वतः शासनाकडे पाठपुरावा करील.

सौ. निखत अली : या अगोदरही मी मा. महापौर यांना पत्र देऊन शाळाव शिक्षणाबाबत कठोर भूमिका घेण्याबद्दल कळविले आहे. शिक्षणाधिकारी यांनी कडक प्रशासन ठेवावे. जेथे महानगरपालिकेची शाळा तेथे खाजगी शाळा उघडण्याची परवानगी देवून नये. खाजगणी शाळांत प्रवेश मिळत नाही. महानगरपालिकांच्या शाळांना सवलत देण्यात यावे. पुरेसे डेक्स, खडू, पट्ट्या सर्व साहित्य पुरवावे.

मा. महापौर : शाळा व शिक्षकांबद्दल शिक्षण अधिकारी यांना सूचना दिलेली आहे. ज्या शाळेत शिक्षक कमी आहेत तेथे जाहिरात देवून भरती करण्यात येईल. यासंदर्भात प्रशासनास सूचना दिलेल्या आहेत.

श्री. सोनवणे सुदाम : सिडको हडको भागातील दोन-तीन विषयावर र्चा करावयाची आहे, (१) तासाचा वेळ देण्यात यावा. महत्वाच्या विषयावर पाणी बाबत चर्चा करावयाची आहे.

मा. महापौर : विषयपत्रिकेवरील सर्व विषय घेतल्यानंतर १ तास सिडको संदर्भात चर्चा करण्यासाठी वेळ देण्यात येईल.

श्री. तकी हसन खॉन स. सदस्य श्री. अफसर खॉन यांनी शाळेचा सर्वे करून १७१ शिक्षकांची आवश्यकात आहे, असे पत्र प्रशासनास दिले. ९ जागा ऊर्दूच्या रिक्त आहे, म्हणजेच १८० शिखकांचे आवश्यकात आहे. नुकतीच जाहिरात दिली त्यात ९ शिक्षक उर्दू माध्यमचे भरती करणार असे दिले प्रशासनाने १८ शिक्षक कमी आता १६२ म्हणतात. अल्पसंख्यांकांना शासनाने सवलती दिल्या आहेत. त्या सर्वांना लागू आहे. फक्त ६२ शिक्षक भरती करणार म्हणून जाहिरात दिली. उर्दूचे १८ शिक्षक देणार होते. फक्त ९ शिक्षक भरती करू लागले. हे चुकीचे वाटते. शासनाने आवश्यकतेनुसार ज्या ज्या माध्यमाची शिक्षक भरती करावी. किती मुलांसाठी किती शिक्षक असावेत, जिल्हा परिषदेकडून माहिती घ्यावी. जिल्हा परिषदेस शासन जी. आर. लागू होतो. तर महानगरपालिकेस का नाही. महानगरपालिकेच्या शाळेचा सर्व्हे करावा. व त्यानुसार कार्यवाही करावी. मी स्वतः मौलाना आझाद शिक्षण संस्था व अंजुमने इशात संस्था चालवितो. शासनाने १९९६ ला

अल्पसंख्याकासाठी स्वतंत्र निर्णय घेतलेला आहे. ९६ ते २००१ पाठपुरावा केला नाही. उर्दू माध्यमचे आणखी ५० शिक्षकांची आवश्यकता आहे. १८ नसून ५० शिक्षक लागतील. शिक्षणाधिकारी यांनी नोंद घ्यावी.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांना सूचना दिलेल्या आहे. त्यांनी शाळेचा सर्व्हे करावा कोणत्या शाळेत किती मुले व किती शिक्षक आवश्यक आहे. याची माहिती घ्यावी. आपण वेगळी बेठक लावू जे शिक्षक कमी ते निश्चित करून भरती करण्यात येईल.

श्री. जयवंत ओक : ०१-०१-९५ पूर्वीच्या स्थायी झालेल्या [अनधिकृत वसाहती] यांना शासन निर्देशानुसार कायम करणार तसा ठरावा आपण पास केला आज कायम होईल खुलासा घेतला शासनाकडे पुन्हा मंजुरीसाठी पाठविण्यात येईल असे संबंधित अधिकारी यांनी सांगितले नुसता प्रस्ताव पाठवून चालणार नाही. तर महापौर व पदाधिकारी तसेच जेष्ठ नगरसवेक यांनी मा. मुख्यमंत्री यांचेशी चर्चा करून ही बाब निदर्शनास आणून द्यावी लागेल. व मंजुरी घेऊन तात्काळ अशा वसाहतीत सुविधा पुरविल्या पाहिजेत. या प्रस्तावास शासन मंजुरी होईपर्यंत अनाधिकृत वसाहतीती नगरसेवकांच्या स्वेच्छा निधी वापरू देण्याबाबत परवानगी घेण्यात यावी. त्यानुसार प्रशासनाने सुध्दा मंजुरी दिली पाहिजे तसेच वाहन चालक व संगणक प्रशिक्षक स्वेच्छा निधीतून देण्यास मंजुरी घेण्याबाबतचा प्रश्न मा. मुख्यमंत्री यांचेशी होणाऱ्या चर्चेत मांडावा. जनता महानगरपालिकेस कर भरते. या नागरिकांच्या आवश्यक ज्या गरजा आहेत जसे रस्ते, पाणी, ड्रेनेज स्वच्छता या सुविधा देणे गरजेचे आहे. आजच्या आज या गुठेवारीच्या प्रस्ताव फॅक्सद्वारे शासनाडे पाठवावा तसे आदेश संबंधित अधिकारी यांना देण्यात यावे.

मा. महापौर : अनधिकृत वसाहतीत सुविधा देण्या संदर्भात आपण ठराव पास केलेला आहे तो शासनाकडे पाठविण्यात येईल या ठरावास. तात्काळ शासन मंजुरी घेण्यासाठी प्रशासनामार्फत मा. मुख्यमंत्री यांचे भेट घेण्यासाठी वेळ घेण्यात येईल त्यानुसार मी स्वतः व पदाधिकारी, काही जेष्ठ स. सदस्य मा. मुख्यंमत्री यांचेशी चर्चा करून लवकरात लवकर निर्णय घेण्याचे सांगण्यात येईल.

श्री. अफसर खॉन : गोरगरीब मुलांना संगणक प्रशिक्षण तसेच वाहनचालक प्रशिक्षण देण्यासाठी स्वेच्छा निधीतून खर्च करण्याचा प्रस्ताव आपण पहिल्याच सभेत मंजूर केलेला होता. अद्याप संबंधित अधिकारी यांनी शासनाकडे पाठविलेला नाही असे समजते खुलासा द्यावा.

श्री. स. अली सलामी : संगणक, वाहनचालक प्रशिक्षण देण्याबाबत शासनाने बंद केले होते परंतु पुन्हा ३ महिण्यापूर्वीच सभागृहात प्रस्ताव मंजूर केला, त्यास स्विकृती मिळाली. आजपर्यंत प्रस्ताव शासनाकडे का दिला नाही. दिलेला असेल तर तसा खुलासा करावा.

श्री. देसरडा प्रशांत : शासनाची मान्यता येईल त्या अगोदर प्रशिक्षण देण्यास हरकत नसावी. आपण ठराव मंजूर केलेला आहे.

प्रकल्प संचालक : प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी संचिका मा. आयुक्तांच्या मंजुरीसाठी आहे. मा. आयुक्तांची मान्यता मिळाल्यानंतर लगेचच प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येईल.

श्री. स. अली सलामी : सोमवार पर्यंत प्रस्ताव मा. आयुक्तांची मंजुरी घेऊन फॅक्सद्वारे पाठविण्याचे आदशे करावे तोपर्यंत संगणक प्रशिक्षक सुरू करण्यास हरकत नसावी.

प्रकल्प संचालक : प्रशिक्ष केंद्रसाठी लागणारा खर्च लेखा विभागामार्फत अदा केले जाते तथापि सभगृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, स्वेच्छा निधी मधून कोणकोणती कामे व्हावीत या बाबत शासनाकडून आलेल्या नियमावलीमध्ये सुशिक्षित बेरोजगारांना प्रशिक्षण देणे बाबत नमूद केलेले नाही. सर्वसाधारण सभेने प्रशिक्षण देण्या बाबत घेतलेल्या ठरावा शासनाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येईल. व शासनाने मंजुरी दिल्याशिवाय प्रशिक्षण देणे उचित होणार नाही.

मा. महापौर : सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला ठराव तात्काळ शासनाकडे पाठविण्यात यावा.

श्री. निकाळजे प्रकाश : नियुक्त्या करतांना कार्योत्तर मंजुरी, शासनाच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येते. तसेच जनतेच्या चांगल्यासाठी, भल्यासाठी शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून हि कामे का होत नाहीत. फायद्याचे असेल तर ताबडतोब, काही अनधिकृत भरती देखीन न्यायालयाच्या व शासनाच्या मंजुरीस अधिन राहू केलेली आहे.

श्री. सोनवणे सुदाम : काही अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नत्या दिल्या होत्या त्यास शासन मंजुरी मिळाली नाही त्या संबंधी काय कार्यवाही केली खुलासा द्यावा.

मा. महापौर : मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : शासनाने महाराष्ट्रातील एकूण १४ महानगरपालिकेस स्वेच्छा निधी नियमावली कशी असावी हे ठरविलेले आहे. प्रत सव स. सदस्यांना प्राप्त झालेली आहे.

जयवंत ओक : स. सदस्य श्री. निकाळजे बोलल्याप्रमाणे या महानगरपालिकेमध्ये कर्मचाऱ्यांची भरती पदोन्नत्या देतांना शासनास कळविलेले नाही. जे क. लिपिक होते ते अधिकारी झाले. शासनाची परवानगी न घेता १४ वर्षापासून या महानगरपालिकेमध्ये असाच प्रकार चाललेला आहे. यास कोण जबाबदार?

श्री. निकाळजे प्रकाश : जनतेने त्यांना योगय तया सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून आम्हाला निवडून दिले. जनतेचाच पैसा आहे. प्रशिक्षण देण्यास हरकत नसावी.

श्री. अफसर खॉन : वेगवेगळ्या माध्यमातून जनतेकडून आपण कर जमा करतो जनतेचाच पैसा आहे प्रशिक्षण सुरू करण्यास मंजुरी द्यावी. जनतेचाच पैसा असल्याने आपण प्रशिक्षण देऊ शकतो असा निर्णय घेण्यात यावा.

श्री. जयवंत ओक : या योजनेत भ्रष्टाचाराला वा नाही. जनकल्याण योजना आहे. प्रशिक्षण द्यायचे की नाही हा सभागृहाचा निर्णय आहे.

श्री. स. अली सलामी : स्वेच्छा निधीचा वापर कसा करायचा या बाबत शासन नियमावली सादर झाल्यानंतर पुणे महानगरपालिकेस अधिकारी व सभागृहाच्या संम्मतीने नियमावली व्यतिरिक्त ५ नवीन कामाचा स्वेच्छज्ञ निधी मधून करण्याचा निर्णय घेण्यात आला जे कि प्रशासनाने असे मत व्यक्त केले की महानगरपालिकेचे जे उद्यान आहे त्या उद्यानास स्वेच्छा निधी मधून सौदर्यीकरण करण्यास मंजुरी द्यावी. हे एक उदाहरण दिले. प्रस्ताव मंजूर

करून शासनाकडे दिला व काम चालू आहे. त्याच धर्तीवर या शहरातील गरीब व होतकरू मुलांना संगणक व वाहनचालक प्रशिक्षण देण्याबाबत प्रस्ताव मंजूर केलेला आहे. शासनाची मंजुरी घेऊ शकतो परंतु तुर्त प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा प्रश्न चालू आहे. शासनाची मंजुरी येण्याच्या अगोदर अंदाजपत्रक तयार झालेले होते. या अगोदर प्रशिक्षण देतांना काही भ्रष्टाचार झालेला नाही. म्हणून प्रशिक्षण देण्यास हरकत नसावी. नागपूर महानगरपाकिलेच्या भ्रष्टाचार झालेला होता त्याबद्दल शासन निर्णय घेईल. गरीब व होतकरू मुलांना प्रशिक्षण देणे चुकीचे ठरणार नाही, ठि आहे आपण रोटरी क्लब, लायन्स क्लब यांचे मार्फत गरीब मुलांना दुसऱ्या देशात प्रशिक्षण देणार अशावेळी मान्यता देण्यास उचित होणार नाही. परंतु वॉर्डातील गरीब मुलांना संगणक व वाहनचालक प्रशिक्षण दिल्यास त्यांचा फायदा व सुविधा मिळाल्याचे समाधान होऊ शकते. व या बाबतीत सभागृहाने निर्णय घ्यावा व प्रशिक्षण देण्यास तात्काळ सुरूवात करावी. तसा आदेश देण्यात यावे.

मुख्यलेखाधिकारी : पुणे महानगरपालिकेमध्ये शासनाने दिलेल्या नियमावली व्यतिरिक्त आणखी स्वेच्छानिधीतून ४ कामास मंजुरी द्यावी. म्हणून ठराव पास करून शासनाची मंजुरी घेतलेली आहे. त्याच धरर्तीवर आपण ही जी जी कामे स्वेच्छा निधीतून करायची त्यास मंजुरी देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला जाईल परंतु शसनाचे खर्चाची बाब असल्याने शासनाचे जो पर्यंत निर्देश प्राप्त होत नाही तोपर्यंत प्रशिक्षण सुरू करता येणार नाही. आदार , खासदार निधी वापरासाठी एकच नियमावली शासनाने संपूर्ण महाराष्ट्रातील महानगरपालिकेसाठी लागू केलेली आहे. त्यामुळे शासनाच्या विरोधात निर्णय घेऊन आपण प्रशिक्षण वर्ग सुरू करू शकत नाही. शासन नियमावली नुसार आणखी कोण कोणत्या कामाचा समावेश करायचा त्याचा निर्णय सभागृहाने घेऊन तसा ठराव शासनाकडे आपण एकत्रित पाठवून मंजुरी घेऊन कार्यवाही करू शकतो. शासनाचे सुध्दा निर्देश आहे की, महानगरपालिकेस आवश्यक वाटेल त्या त्या कामाची स्वेच्छा निधीतून कामे करण्यास तसा प्रस्ताव शासनाकडे मंजूर करून पाठविल्यास शासन त्यावर विचार करेल.

श्री. किशोर तुळशीबागवाले : महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे, यामध्ये काम करीत असतांना स्वेच्छानिधी कसा व कोणत्या कामासाठी वापरायचा हा स. सदस्यांचा अधिकार आहे. शहरातील गरीब व होतकरू मुलांना वाहनचालक व संगणक प्रशिक्षण देण्याची स. सदस्यांची इच्छा प्रगट केली व पुणे महानगरपालिकेच्या धरतीवर या महानगरपालिकेस वाहनचालक व संगणक प्रशिक्षणासाठी खर्च करण्यासाठी नियमावलीत समावेश करावा व तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवून प्रशिक्षण देणेस सुरुवात करावी. शासनाकडून मंजुरी येण्यास २-३ वर्षे लागेल.

मुख्यलेखाधिकारी : स्थानिक स्वाराज्य संस्था जरी असेल तरी शासनाने महानगरपालिकेसाठी स्वेच्छा निधीतून कामे करण्याबाबत नियमावली तयार केलेली आहे त्या नियमाला धरूनच आपल्याला काम करावे लागेल. अत्यावश्यक कामे करण्यासाठी देखील या प्रस्तावास शासनाची मंजुरी आवश्यक आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : खुलासा करण्यात आला, शासनाच्या आदेशाशिवाय महानगरपालिकेचे पान हलत नाही. विविध पदे भरतांना पदोन्नती देतांना शासनाची मंजुरी घेऊन कार्यवाही केली जात नाही. २१ पर्यवेक्षकांना शासन मंजुरी नाही आदेश देतांना त्यात असे म्हटले आहे की, अनुशेष्ज्ञ त्वरित भरण्याचे सांगितले आहे. पूर्व मंजुरी घेतलेली नाही. २१ पदे भरण्यात आली त्यात जातीचा संवर्ग बदलण्यात आलेला आहे. त्यात पी.बी. गाडेकर, सुमिल जोशी, बी.के. दाभाडे यापैकी श्री. बी. के. दाभाडे हे एस. सी. (अनुसूचित जाती) संवर्गात येतात, श्री. सुनिल जोशी हे खुल्य वर्गात असतांना त्यांना अनुसूचित जमाती (एस. टी.) या संवर्गात दाखवलेले आहे. व पदोन्नती दिलेली आहे. तसेच सय्द एकबाल अहेमद हे सुध्दा खुल्या संवर्गात येत असतांना एस. टी. (अनुसूचित जमाती) या संवर्गात येतात. म्हणून दाखवले. दोन कर्मचाऱ्यांचे जातीचे प्रमाणपत्र जात पडताळणी समिती कडून रद्द होउुन आलेले आहे. असे असतांना शा ासनाचा निर्णय असतांना कार्यवाही होत नाही. व नगरसवेक यांनी जनतेच्या भल्यासाठी एखादा प्रस्ताव मांडल्यानंतर शासन मंजुरी लागते असे अधिकारी कारण दाखवितात. ज्यांचे जातीचे प्रमाणपत्र शासनाने खोटे ठरविलेले अशा कर्मचाऱ्यावर खटले भरावे. नगरसेवकांनी काही गुन्हा केल्यास खटले भरले जातात. आणि कर्मचाऱ्यांना पदोन्नती देतांना चुकीचा निकेष लावून कार्यवाही केली जाते. श्री. जोशी हे खुल्या संवर्गात असतांना एस. टी. (अनु. जमाती) या संवर्गात कसे येतात. ही सर्व कार्यवाही करण्यास कुणाचे सहकार्य लाभले अशा अधिकाऱ्यावर नियमाने कार्यवाही झाली पाहिजे. प्र. सहाय्यक आयुक्त-१ यांचे जातीचे प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडून ६ महिन्यापूर्वी रद्द होऊन आले. त्यांना न्यायालयात जाण्यास वेळ दिला. नगरसेवकांचा स्वेच्छा निधी लॅप्स न होता ही महानगरपालिका स्वायत्त संस्था आहे, जनतेचा पैसा आपण जमा करतो म्हणून शासनाच्या मंजुरीच्या अपेक्षावर वेळा जाईल व निधी लॅप्स होईल. करिता प्रशिक्षण केंद्र त्वरित चालू करण्यासाठी सर्व सभागृहाच्या संमतीन मान्यता द्यावी व कार्योत्तर मंजुरीसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठवावा.

श्री. दानवे अंबादास : स्वेच्छा निधी कसा वापरायचा या संदर्भात चर्चा चालू असून आताच जेष्ठ सदस्य श्री. निकाळजे यांनी मांडलेला कर्मचारी भरती, पदोन्नतीचा प्रश्न पण तितकाच महत्वाचा आहेत. विरोधी पक्षनेता यांनी सुध्दा त्याची भूमिका मांडली की, ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. सभागृहाने निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी झालीच पाहिजे. नागपूर महानगरपलिकेचा फार मोठा अनुभव आपल्या मागे आहे. ही महानगरपालिका शिवसेना-भाजप यांच्या ताब्यात होती व स्वेच्छा निधी वापरण्या संदर्भात तेथील सभागृहाने काही निर्णय घेतलेले होते. व खऱ्या अर्थाने या नंतर शासनाने संपूर्ण महाराष्ट्रात महानगरपालिकेतील नगरसेवकांचा स्वेच्दा निधी कसा वापरायचा याबाबत नियमावली तयार केली. स्थानिक स्वराज्य संस्था होती म्हणून तेथील नगरसेवकांनी स्वत: निर्णय घेतले व नागपूर महानगरपालिका बरखास्त केली. यात शासनाचा दुटप्पा भूमिका घेत आहे असे दिसून येते. या महानगरपालिकेस विरोधीपक्षनेते हे सत्ताधारी पक्षाचे आहे त्यांनी स्वेच्छा निधी वापरण्याबाबत योगय भूमिका मांडली त्यामुळे आपण योग्य निर्णय घेण्यास हरकत नसावी.

शासन मंजुरी देईल संगणक / वाहनचालक प्रशिक्षण केंद्र सुरू करावे. लोकशाही आघाडी सरकार जनतेच्या भल्यासाठी चुकीचा निर्णय घेत आहे. गरीब व होतकरू मुलांना स्वेच्छा निधीतून प्रशिक्षण देत होते ते शासनाने बंद केले. नागपुर महानगरपालिकेच्या मागे मागे आपल्याला जायचे नाही व नागरिकांचे प्रश्न सुटले पाहिजे व नगरसेवकांची होत असलेली मागणी याच समन्वसाधून नियमाला अधिन राहून प्रशिक्ष्ज्ञण केंद्र चालू करण्यास हरकत नसावी. व पदाधिकारी व जेष्ठ नगरसेवक यांच्या प्रयत्नाने आपण या प्रस्तावास तात्काळ शासन मंजुरी घेण्यासाठी प्रयत्न होतील अशी कार्यवाही करावी. आपल्याला जनतेचा सांभाळ करायचा सुविधा द्यायच्या हे सरकार सेना-भाजपच्या ताब्यात असलेल्या महानगरपालिकेवर चांलगे निर्णय घेत नाही. म्हणून आपण सर्वांच्या सम्मतीने नियमाला अधिन राहून निर्णय घ्यावेत.

श्री. सुदाम सोनवणे : नगरसेवकांचा स्वेच्छा निधी हा प्रत्येक नगरसेवक त्यांचा स्वेच्छा निधी वॉर्डातील नागरिकांच्या होतकरू मुलांना २५ हजार रुपयामध्ये प्रशिक्षणासाठी देत होते. स्वेच्छा निधीतून प्रशिक्षण देणे बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला. या महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते यांनी सांगितले की, महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. स्वतःच्या बळावर चालणारी ही संस्था आहे संस्थेला त्यांच्या निर्णयानुसार अधिकार वापरू दिले पाहिजे. यास मी सहमत आहे. कारण ज्या प्रभागातून सदस्य निवडून येतात तेथील सुशिक्षित बेरोजगार काही कामे नगरसेवकांमडून व्हावीत म्हणून अपेक्षा असतात. पूर्वी स्वेच्छा निधी वापरण्यास परवानगी होती आता बंद केली त्यामुळे माजी नगरसेवक सुध्दा नाराज होते. या अगोदर वॉर्डात विकास कामे सुध्दा स्वेच्छा निधीतूनझालेली आहे. ती १ वर्षापासून बंद केली. परंतु महानगरपालिकेला स्वतः चे अधिकार असल्याने तसेच सत्ताधारी पक्षाचे विरोधी पक्षनेते यांनी जे मत मांडले त्यानुसार आपण आपल्या स्वबळावर निर्णय घेतला पाहिजे व नंतर शासन मंजुरी घेतली पाहिजे. आताच काही अधिकाऱ्यांनी खुलासा केला शासनाच्या अधिन राहून प्रशिक्षण केंद्र सुरू करता येणार नाही. मंजुरी घ्यावी लागले परंतु शासनाने बऱ्याच कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्र रद्द होऊन आले. त्याबद्दल कार्यवाही करण्याचे आदेश दिले. या गोष्टीला ८ महिने होत आहे. अद्याप कुण्याही कर्मचाऱ्यांवर कार्यवाही झालेली नाही. जवळपास १४ अधिकाऱ्यांनी खोटे जात प्रमाणपत्राचा दावा करून पदोन्नतीद्वारे अधिकार पद मिळविलेले आहे. बऱ्याच कर्मचाऱ्यांचे बहवाल प्राप्त झाले. परंतु या प्रशासनाने कर्मचाऱ्यांना पाठीशी घालण्याशिवाय काही केलेले नाही. नगरसेवकांचे काही प्रस्ताव असेल तर शासन मंजुरी घ्यावी लागेल असे उत्तर अधिकाऱ्यांकडून मिळाले. जात पडताळणी समितीने अहवाल दिल्यानुसार प्रशासनाने काय कार्यवाही केली सभागृहात खुलासा व्हावा. जर शासन निर्णयानुसार स्वेच्छा निधीचा वापर करायचा व शासन निर्णयानुसार कर्मचाऱ्यांनी जातीचा दावा करून पदोन्नत्या मिळवल्या त्या बाबतीत कार्यवाही करायची नाही यावरून अधिकारी सभागृहाची दिशाभूल करीत आहे हे म्हणण्यास वावगे होणर नाही. आपल्याकडे एक श्री. शौकत यांना लाचलुचपत खात्याने पकडले होते. त्यांना कामावरून कमी केलेले नाही.

सभगृहाला माहिती दिली नाही. सभागृहाकडे समाधानासाठी त्यांना निलंबित न करता त्यांची बदली केली. ज्या कर्मचाऱ्यांचे / अधिकाऱ्यांचे / जात पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्र रद्द होऊन त्यांचा अहवाल सभागृहापुढे सादर व्हावा. सभागृहात महत्वपूर्ण चर्चा होते.

श्री. कोकाटे काशिनाथ : स्वेच्छा निधी कसा खर्च करावा या विषयावर चर्चा होत आहे चर्चा करीत असतांना सभागृहातील सत्ताधारी पक्षाचे नगरसेकांनी आघ्झाडी सरकारच्या विरोधात संभाषण केले. सामाजिक बांधिलकी मधून या सभागृहाला काही प्रश्न सोडवावयाचे असतील आपल्याला काय पाहिजे शासनाची कोणती मदत पाहिजे व तसा प्रस्ताव घेणे महत्वाचे आहे. विरोधी पक्षनेता यांनी ही स्वायत्त संस्था आहे. निर्णय घेऊ शकतात. शसनाच्या नियमावलीमध्ये बदल करून जे अत्यावश्यक कामे आहेत त्याचा समावेश करून तसा प्रस्तावास मंजुरी घेऊन शासनाकडे पाठवून कार्यवाही करण्याचे मत व्यक्त केले. आताच स. सदस्य श्री दानवे यांनी म्हटले की, भाजप-सेनेची नागपूर महानगरपालिका होती म्हणून नगरसेवकांवर खटले भरले व महानगरपालिका बरखास्त केली. परंतु तेथे स्वेच्छा निधीच्या रकमेचा गैर व्यवहार झालेला होता तेथे शाळेत किंवा भांडार विभागात ते साहित्य आलेले नसतांना दाखवण्यात आले म्हणून त्यानंतर पोलिस पुन्हा दाखल करण्यात आले होते. यासाठी कोणत्याही पक्षावर सरकारवर टिका न करता आपण काय करता याला महत्त्व द्यावे. आताच चर्चा झाली कर्मचारी भरती, पदोन्नती देण्यात आल्य शासनाची मंजुरी नाही. बोगस पदोन्नत्या कुणाच्या काळात दिल्या कोण महापौर होते. आयुक्त कोण होते. ते पाहिले पाहिजे. नुसती एकमेकांवर टिका करून सरकार बदनाम करणे बरोबर नाही. सभागृह हे नियमाने चालवले पाहिजे. महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था जरी असेल तरी शासन आपणास अनुदान देणे शासनाच्या परिपत्रकांची अंमलबाजवणी झाली पाहिजे. नियमाने कामे करण्यास निर्णय घ्यावेत.

श्री. पंडागळे रतनकुमार : महानगरपालिकेमध्ये राखीव जागा भरण्यासाठी कोणता निकष लावण्यात येतो. निवड समिती ही महत्त्वाची आहे. निवड समितीच्या अहवालावर सादर करत असते. जलतरण तलावाबाबत निवड समितीने खोटा अहवाल दिला आहे त्यावर प्रशासनाने योग्य ती दखल घ्यावी.

मा. महापौर : स. सदस्यांनी आपआपले मत मांडले आहे. प्रशासनाला सूचना करण्यात येते की, या ठरावा संदर्भात एक विशेष अधिकारी नेमून ३० दिवसाच्या आत शासनाची मंजुरी आणण्यात यावी. तसेच ज्या ज्या कर्मचारी / अधिकारी यांना पदोन्नती देऊन पदे दिली. नियमाने बरोबर आहे का? याची सविस्तर चौकशी करून कार्यवाही करावी. तसेच स. सदस्य श्री. पंडागळे यांनी जो प्रश्न जलतरण भरती संदर्भात केला त्या बाबत उपआयुक्त (म.) यांनी सविस्तर चोकशी करून नियमाने कार्यवाही करावी.

श्री. भगवान रगडे : नारेगांव येथे घन कचऱ्यापासून खत निर्मितीचा प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. सत्यम फर्टीलायझर्स खत कारखाना उभा आहे. कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट होत नाही म्हणून एक कमिटी स्थापन करण्यात आलेली होती. कमिटीने अहवाल दिल्यानंतर प्रशासनाने काय कार्यवाही केली व संपूर्ण शहराचा कचरा आणून टाकल्या जातो. व माझ्या वॉर्डातील

नागरिकांना दुर्गंधी पासून त्रास होत आहे. या बाबतीत काय निर्णय घेणार याचा खुलासा द्यावा.

श्रीमती दाणे चंद्रभागाबाई : स. सदस्य श्री. पंडागळे यांनी केलेल्या प्रश्नाचा खुलासा करावा. राखीव जागे संदर्भात प्रशासन सुध्दा काहीही कार्यवाही करीत नाही.

श्री. खुंगर सुरजितसिंग :अहवाल सादर केलेला आहे. काय कार्यवाही केली माहिती द्यावी.

मा. महापौर : स. सदस्य श्री. रगडे, श्री. खुंगर यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याचा अहवाल काल रात्री मला उशीरा प्राप्त झालेला आहे. त्याच्या प्रती पुढील सभेसाठी स. सदस्यांना वितरित करणार आहे. त्यावर सविस्तर चर्चा करून आपण निर्णय घेऊ. सध्या कुणीही स. सदस्याकडे या अहवालाची प्रत नाही.

श्री. खुंगर सुरजितसिंग : दिनांक २०/०६/२००१ च्या सर्वसाधारण सभेत अहवाल सादर करण्यात आलेला होता. अहवाल सादर केल्यानंतर सुध्दा संबंधित आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी नगरसचिव विभागाकडे पत्र देऊन अहवालाची मागणी केली. अहवालावर सह्या नाहीत असे बोलले जाते, परंतु मी स्वत: मा. महापौर, मा. आयुक्त, नगरसचिव यांना काल प्रत दिली., त्यावर सर्व समिती सदस्यांच्या सह्या आहेत.

श्री. गायकवाड राधाकृष्ण : वृत्तपत्रात आज बातमी आली की, जे स. सदस्य कमिटी मध्ये होते, त्यांच्या सह्याच अहवालावर नाही असे दिले. जे होते त्यांच्या सुध्दा सह्या आहेत. माजी महापौर डॉ. भागवत कराड यांना हा अहवाल सादर केलेला होता. व अहवाल दिल्यानंतर पत्रकारांना सुध्दा त्यांच्या प्रती देण्यात आलेल्या आहे. परंतु काही अधिकाऱ्यांच्या माध्यमातून माहिती दिली जाते की, काही स. सदस्यांच्या त्या अहवालावर सह्या नाहीत. या प्रकरणात महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. यावर सविस्तर चर्चा करायची असेल तर सर्व स. सदस्यांना एक प्रत देऊन विशेष सभा बोलावून योग्य तो महानगरपालिकेच्या हिताचा निर्णय घेतला पाहिजे. हा प्रकल्प मोठा असून या त महानगरपालिकेचे नुकसान झालेले असून हा प्रकल्प निकामी झालेला आहे. प्रभाविपणे काम होत नाही. म्हणून विशेष सभा बोलावून निर्णय घ्यावा.

मा. महापौर : याचा अहवाल मला प्राप्त झालेला आहे. स. सदस्यांना उपलब्ध करून द्यावा. आता पर्यंत काय कार्यवाही केली. अहवाल येणाऱ्या सर्वसाधारण सभेत प्रशासनाने ठेवावा.

श्री. स. अली. सलामी : हा प्रकल्प व्यवस्थित हाताळल्यास महानगरपालिकचे उत्पन्न वाढेल. करिता सविस्तर चर्चा करण्यासाठी विशेष बैठक बोलवावी, योग्य तो निर्णय घ्यावा.

मा. महापौर : हा प्रकल्प चांगला चालावा, उत्पन्न वाढवावे, याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल व आलेल्या कमिटीच्या अहवालावर प्रशासनास कार्यवाही करण्यास काय अडचण येत आहे, काय कार्यवाही करणार त्याचा अहवाला मागविला आहे. प्रशासन अहवाल सादर करेल त्यानुसार चर्चा करण्यात येईल.

डॉ. आशा बिनवडे : या शहरातील सर्व दवखान्यातून निघणारे बायोकेमीकल वेस्ट साठी इन्सीनेटर चालू करण्यात यावे. इन्सीनेटरसाठी आपण आर्थिक तरतूद ही केलेली आहे. गेल्या ११/९/२००१ च्या स्थायी समितीमध्ये या विषयावर चर्चा झाली. मा. सभापती यांनी येणाऱ्या सर्वसाधारण सभेत त्यांचा प्रस्ताव

ठेवण्याचे संबंधित अधिकारी यांना आदेशित केलेले होते. प्रस्ताव का ठेवण्यात आलेला नाही. संबंधित अधिकारी यांचेकडून खुलासा घ्यावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : बायोकेमीकल वेस्टनचा प्रस्ताव आपण एप्रिल महिण्यात सादर केलेला होता, एप्रिल मध्येच त्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. निविदा काढण्यासाठी फेर प्रस्ताव ठेवावा म्हणून कार्यवाही चालू होती. शहरातील किती हॉस्पीटल आहे, त्याचा सर्व्हे करण्यासाठी एम.आय.टी. कॉलेजचे प्राध्यापक श्री. धारवाडकर यांचेकडे सर्व्हेचे काम दिलेले आहे. सर्व्हेचे काम झालेले आहे. प्रत्यकांना त्यांनी फॉर्म दिलेले आहे. सविस्तर माहिती घेऊन २-३ दिवसात निविदा काढण्यात येणार आहे.

श्री. थोरात दत्तात्रय : सभागृहात नेहमीच अधिकृत, अनधिकृत या विषयावर चर्चा होते. महापौरांचे प्रशासनास आदेश दिले जाते परंतु नियमाने कोणती ही कार्यवाही होत नाही. दीड वर्षाचा काळ निघून गेला आता आपण स्वेच्छा निधीच्या वापरा संबंधी शासनाच्या नियमावली व्यतिरिक्त वाहनचालक व संगणक प्रशिक्षण देण्याबाबतच्या प्रस्तावा ३० दिवसाच्या आत कार्यवाही करावी असे आदेश दिले. त्याचप्रमाणे अधिकृत / अनाधिकृत जागेबाबत जे प्रश्न उद्‌भवत आहे, त्याबद्दलही १ महिन्याच्यात आत निर्णय घेण्याचे आदेश करावे. अशी मी अपेक्षा बाळगतो. अनाधिकृत वसाहतीत महानगरपालिका कोणताही निधी खर्च करीत नाही. नागरिकांच्या आरोग्याला धोका पोहचतो, तरी अधिकारी अनाधिकृत वसाहत आहे म्हणून विकास काम करता येणार नाही. म्हणून उत्तरे देतात. रस्ते अरुंद होत आहे, अपघात होतात, जनता आम्हाला विचारणा करते अनधिकृत / अधिकृतचा काय वाद आहे. माझ्या वॉर्डात महानगरपालिकेने सर्व्हे केलेला होता रस्ते करण्यात आले, नागरिक बेटरमेंट चार्जेस भरतात. माझ्या वॉर्डातील जागा ही आरक्षित होती. १९९५ च्या विकास योजनेत आरक्षण इेवण्यात आले त्यानंतर या जागेवर ७५% लोकांनी घरे बांधली व उर्वरित २५% लोकांनी महानगरपालिकेची परवानगी घेऊन घरे बांधली. असे असतांना सध्या या भागात निधी खर्च केला जात नाही व अधिकारी सांगतात अनाधिकृत वसाहत आहे. ही वसाहत अधिकृत होती म्हणूनच परवानगी दिलेली असेल. अधिकाऱ्यांनी २५% लोकांना घरे बांधण्याची परवानगी कशी दिली. परवानगी दिली याचा अर्थ तेथे सुविधा दिल्या पाहिजे. काही अधिकाऱ्यांनी स्वतःच्या पदाचा गैरवापर करून अनाधिकृत वसाहतीमध्ये निधी खर्च केलेला आहे. परंतु तेथे परवानगी दिली जाते तेथे निधी खर्च करीत नाही.

मा. महापौर : एखाद्या अनाधिकृत वसाहतीमध्ये विकास काम सध्या चालू असेल तर आपण व कोणत्याही स. सदस्यांचे निदर्शनास आणून द्यावे. योग्य ती कार्यवाही केली जाईल.

श्री. शे. ईसाक शे. जेनाद्दिन : कालच्या व आजच्या एका दैनिक वृत्तपत्रात बातमी आली त्यामध्ये एका प्रभाग समितीच्या सभापतीवर जकात वसुलीबाबत आरोप ठेवण्यात आले. कोणते सभापती होते. त्यांचे नांव जकात अधिक्षक यांनी सांगावे. चोरी निदर्शनास आली का? खुलासा द्यावा.

मा. महापौर : या संबंधी सविस्तर माहिती घेण्यात येईल.

श्री. थोरात दत्तात्रय : माझ्या प्रश्नाचा खुलासा द्यावा. संबंधित अधिकारी सभागृहात नाही. आपली परवानगी घेऊन गेलेले आहेत काय?

मा. महापौर : श्री. डी. पी. कुलकर्णी यांनी परवानगी घेतलेली आहे.

उप आयुक्त (प्र.) : सभापती बाबत मी सुध्दा बातमी वृत्तपत्रात वाचली. मा. महापौर यांनी मला सकाळीच सूचना दिल्या आताही सूचना केलेल्या आहेत, जकात अधिक्षक यांचेकडून अहवाल मी मागविलेला आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : उपआयुक्त यांनी खुलास केला. परंतु योग्य वाटत नाही, कोणता कर्मचारी / अधिकारी उपआयुक्त, मा. आयुक्त किंवा विभागाप्रमुख यांची परवानगी शिवाय वृत्तपत्रा हि माहिती पुरवू शकतात काय? अधिकारात बस ते का? त्याचा खुलासा द्यावा. मा. महापौरांना याची माहिती दिलेली होती काय?

श्री. शे. ईसाक शे. जैनाद्दिन : सभापती लावलेला आरोप सत्य आहे काय? आताच खुलासा करावा, काल दैनिक तरुण भारत व संजयवार्ता मध्ये बातमी आली व आज औरंगाबाद टाईम्स मध्ये बातमी आली. सभापतीचे नांव काय?

मा. महापौर : प्रशासनाकडे माहिती प्राप्त झालेली नाही तरी प्रशासनाने आजच्या आज माहिती घेऊन पुढील कार्यवाही करावी.

श्री. थोरात दत्तात्रय : माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यावे. गणेश कॉलनी येथील घरे अनधिकृत असतांना घरांना कर कसा लावला. लावलेला कर नियमाने बरोबर असले तर सुविधा सुध्दा देण्यात याव्यात.

करमुल्यनिर्धारण अधिकारी : गणेश कॉलनी येथील भागाच्या संदर्भात योग्य ती माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. सविस्तर माहिती नंतर देण्यात येईल. संबंधित अधिकारी यांनी स. सदस्य यांना दोन दिवसात लेखी स्वरुपात माहिती द्यावी.

सौ. चंद्रात्र सुवर्णा : महिला व बाल कल्याण समिती स्थापन होऊन ५ महिने झाले या समितीसाठी स्वतंत्र महिला व बाल कल्याण अधिकारी पद असावे म्हणून महिला व बालकल्याण समितीच्या बैठकीत चर्चा झाली आहे. या बैठकीत प्रशासन या पदाचा ठरावास सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी ठेवणार होते. तसा काही प्रस्ताव आजच्या बैठकीत आलेला आहे का? सचिव यांनी खुलासा द्यावा. प्रस्ताव आलेला नसेल तर का आलेला नाही किंवा तसा ठराव घेणार आहे काय?

मा. महापौर : येणाऱ्या सर्वसाधारण सभेत महिला व बाल कल्याण अधिकारी पद निर्मितीचा प्रस्ताव ठेवण्यात यावा.

सौ. विजया रहाटकर : या महानगरपालिकेमध्ये प्रभाग समिती स्थापन होऊन ४ महिने झाले. केवळ विकेंद्रीकरण या हेतुखाली या समित्या स्थापन केलेल्या आहे. प्रभाग समिती मार्फत योग्य रितीने कामे व्हावी म्हणून प्रशासनाने कोणती ही कार्यवाही केलेली नाही. या समित्या फक्त नावासाठी स्थापन केलेल्या आहे. नुसते पद देऊन आम्हाला काही स्वरस्य नाही. लोकांची कामे करायची आहे. कोणतेही काम या प्रभाग समितीत्या मार्फत करायचे नसेल तर आमचे राजीनामे घेऊन टाकावे. या ठिकाणी नुसते बसण्यासाठी आम्ही आलेलो नाहीत. प्रशासनाने तात्काळ या संबंधी निर्णय घ्यावा. प्रभाग समितीचे अधिकारी प्रदान करावे. लागेल तेंव्हढा कर्मचारी वर्ग देण्यात यावा. नसता आमचे राजीनामे घ्यावे. पुढील सर्वसाधारण सभेपर्यंत निर्णय व्हावा. नसता सभा होऊ देणार नाही. आम्हाला दिलेल्या गाड्या सुध्दा प्रशासनाकडे परत दिल्या जातील. ५ लाख खर्चापर्यंत अधिकारी देऊन टाकावे. सर्व अधिकार

प्रशासनाकडे असल्याने बैठका सुध्दा बोलवणे अवघ्झड झाले. तसे प्रस्ताव आतापर्यंत प्रभाग समितीकडे का आलेले नाही.

श्री. कोकाटे काशिनाथ : प्रभाग समितीच्या सभापती यांनी त्यांची खंत व्यक्त केलेलल आहे. नुसत्या प्रभाग समित्या स्थापन झाल्या परंतु कोणतेही अधिकार त्यांना दिलेले नाही. मा. महापौर यांनी या संबंधी काय कार्यवाही केली, केलेली नसेल तर ताबडतोब करावी. तसेच प्रभाग समितीसाठी अधिकारी / कर्मचारी यांची विभागणी करून कर्मचारी वर्ग द्यावयास पाहिजे ती सुध्दा कार्यवाही प्रशासनाने केलेली नाही. तशी कार्यवाही करण्यास आपण आदेश द्यावेत.

श्री. अ. कदीर मौलाना सय्यद : मागील एका आठवड्यापासून शहरामध्ये लहान मोठे व्यावसायिक यांचेत संतापाची लाट निर्माण झालेले आहे. अधिकृत/ अनाधिकृत तोडण्याची कार्यवाही होत आहे. सर्व बाबी आपल्या निदर्शनास आणून देतो व शांततेने ऐकून त्या संबंधी आपण कार्यवाही कराला अशी अपेक्षा बाळगतो. शहरात महानगरपालिकेने अधिकृत /अनधिकृत असलेली दुकाने / घरे तोडण्याचे काम एक आठवड्यापासून सुरू असून गरीब व होतकरू लोकांच्या मनामध्ये एक प्रकारणी भितीची भावना निर्माण होत आहे. सुशिक्षत बेरोजगारांना कामे मिळावी या दृष्टीने टपरी समिती स्थान केली. १९९५ ला त्यावेळचे सदस्य श्री. मुश्ताक अहेमद याच्या अध्यक्षतेखाली टपरी समिती स्थापन करण्यात आली होती. त्या समितीचे अधिकारी / पदाधिकारी सदस्य म्हणून नेमणूक केली. ज्या टपऱ्या १९९५ पूर्वीपासून अस्तित्वात आहे, अशा एकूण शहरातील ११०० टपरी दुकाने धारकांना टपरी सर्व्हेक्षण करण्यात आले. त्यापैकी २७६ टपऱ्या परवानगी नुसार दिलेल्या आहेत. उर्वरित सर्व अधिकृतरित्या बसलेल्या आहेत. आतापर्यंत लिगल केले असते तर १९९५ पासून या टपऱ्यांचे भाडे सुमारे ७.५ लाख प्रतिमाह झाले असते. परंतु काहीही केले नाही. भाड घेतले नाही. ९० लाख रुपये भाडे व्हावयास पाहिजे परंतु प्रशासनाच्या निष्काळजीपणाने ५ वर्षात ५ कोटीचे नुकसान झाले. ११०० पैकी ३२७ टपरी धारकांच्या बाबतीत परवानगी असतांना प्रशासनाने न्यायालयाची दिशाभूल करून न्यायालयाचे आदेश आहे असे सांगून टपऱ्या हटवण्याचे काम केलेले आहे. त्यांचेवर उपासमारीची वेळ आली. महानगरपालिकेच्या गलथान कारभारांमुळे हे टपरी धारक धोक्यात आलेले आहे. जे नुकसान झाले त्यास जबाबदार कोण आहे. मा. न्यायालयाचे ८ दिवसापूर्वी आदेश झाले. ९ व्या दिवशी तोडण्यात आले. महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयासमोर गुणवानी यांच्या विरुध्द न्यायालयाचे १९९५ पासून आदेश असूनही अनधिकृत इमारत सध्या उभी आहे. ८ वर्षे झाले अद्याप पाडण्यात आलेली नसून एकासाठी एक कार्यवाही केली जाते. व दुसऱ्यासाठी वेगळीच कार्यवाही केली जाते. ज्या टपरी धारकांवर अन्याय झाला त्यांचे बाबतीत प्रशासना मार्फत जरी कागदपत्रे न्यायालयात सादर केली ती चुकीच्या मार्गाने सादर केली या लोकांनी महानगरपालिकेस कर भरलेला होता. न्यायालयात जी कागदपत्र ३२७ टपऱ्याबाबत सादर केली होती त्याचा खुलासा सभागृहात करावा. गुणवानी यांची इमारत तोडण्याचे न्यायालयाचे सुमारे ८ वर्षापूवी आदेश झालेले आहे. का तोडण्यात आली नाही त्याचा पण खुलासा करावा. तसेच या लोकांवर

अन्याय झालेला असून उपासमारीची वेळ आली. त्यांना पर्यायी जागा महानगरपालिकेने उपलब्ध करून द्याव्यात.

श्री. स. अली सलामी : सिडकोचे अतिक्रमण तसेच महानगरपालिकेचे अतिक्रमण तोडण्याचे आदेश न्यायालयाचे आहे, सिडकोच्या बाबतीत सिडको अधिकाऱ्यांनी न्यायालयाची दिशाभूल करून कार्यवाही झाली हे सर्वांना माहिती आहे. समजू शकतो. परंतु महानगरपालिका प्रशासनाने टपरी संदर्भात जी खरी माहिती ती न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली नाही की, टपरी धारकांना भाडेपट्याने टपरी दिली ती अधिकृत आहे. कोटाचा आदेश आला आपण टपऱ्या काढण्याचे कार्यवाही करीत आहोत. काही टपऱ्या बाबत खालच्या न्यायालयाचे स्थगिती आदेश आहे. बरेच टपरी धारक न्यायालयात भाडेपट्ट्याचे पैसे भरत आहेत. हे न बघता टपऱ्या हटवण्याचे बेजबाबदारपणे काम महानगरपालिका प्रशासन करीत आहे. हे योग्य नाही. ज्यांचे प्रकरण न्यायालयात होते व जे स्थगित केलेले आहे. जे न्यायालयात भाडे भरतात व जे भाडेकरू अधिकृत आहे त्यांचे सुध्दा अतिक्रमण म्हणून तोडण्याचे यावे. असे आदेश न्यायालयाचे नाही जे महानगरपालिकेस भाडे भरतात त्यांचे टपरी तोडून नुकसान केलेले त्यांचे व्यवसाय बंद पाडले उपासमारी होत आहे. सिडको हडकोतील तेच प्रकरण आहे. ज्या ३५३ जागा आहे, त्या अतिक्रमणापासून मुक्त करण्या असा निर्णय असतांना सर्वच अतिक्रमण तोडण्याचे काम सिडकोचे अधिकारी करीत आहे. आताच एका सदस्याने सांगितले १९९५ ला एक इमारत पाडण्याचे आदेश न्यायालयाने दिले असतांना गुणवानी यांची इमारत पाडण्यात आली नाही. अशाच प्रकारचे बऱ्याच प्रकरणात न्यायालयाचे आदेश असतांना प्रशासन कार्यवाही करीत नाही. तत्कालीन आयुक्त श्री. बलदेवसिंग यांनी शहरातील बऱ्याच इमारतीचे बांधकाम थांबविले होते. अशी बांधकामे न होऊ देण्याबाबत काम उपाययोजना करणार याचा निर्णय घेण्यात यावा तसेच ज्यांच्या टपऱ्या काढण्यात आल्या त्यांची कुटुंबाची उपासमार होत आहे. जे भाडेकरू होते त्यांना तरी पर्यायी जागा देण्याबाबत कार्यवाही करावी. याबाबत प्रशासन काय निर्णय घेणार खुलासा द्यावा.

श्री. अफसर खान : जो न्यायालयाने निर्णय दिला त्याचे पालन करणे आवश्यक आहे, परंतु न्यायालयाचे आदेश नसतांना टपऱ्या काढण्यात आल्या अशा अधिकाऱ्यावर काय कार्यवाही करणार जे लोक ११,१२,१५ वर्षापासून आपली रोजी रोटी कमावून कुटूंब चालवित होते. त्यांचेवर उपासमारीची पाळी आली आहे. शहरामध्ये खूप काही महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा आहे. त्यांना पर्यायी जागा देण्याबाबत कार्यवाही करावी, असे आदेश प्रशासनास देण्यात यावेत अशी विनंती. दुसरे असे की, दोन तीन रस्त्याचें डांबरीकरण संदर्भात आहे, त्यापैकी चंपाचौक ते आझाद चौक या रस्त्याचे डांबरीकरण केंव्हा झालेले होते याबाबत माहिती विचारलेली होती सध्या या रस्त्यावर खूप खड्डे पडलेले आहे. परवाच्या पावसाने सर्व रस्ता खराब झालेला आहे. या कामाबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे. असे सांगितले जाते. तात्काळ या रस्त्याचे काम व्हावे. या रस्त्यावर दोन तीन दिवसापूर्वीच एक अपघात झाला. दोन व्यक्ती मृत्यूमुखी पडले. यास जबाबदार कोण आहे. तरी तात्काळ कार्यवाही व्हावी.

सौ. सुवर्णा चंद्रात्रे, श्रीमती दाणे चंद्रभागाबाई : महिला व बाल कल्याण समितीसाठी एक अधिकारी पद भरण्यात येईल असे महिला बाल कल्याण समितीच्या बैठकीत सांगितले गेले. आजच्या बैठकीत प्रस्ताव ठेवण्यात येईल असे सांगण्यात आले, का प्रस्ताव ठेवण्यात आलेला नाही.

मा. महापौर : महिला व बाल कल्याण अधिकारी पदाचा प्रस्ताव प्रशासनामार्फत पुढील बैठकीत ठेवण्यात यावा तसेच सर्व विभाग प्रमुखांना सूचना करण्यांत येतात की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २९ अ (७) (क), ५ लाखापर्यंत सर्व अंदाजपत्रक प्रभागा समिती मार्फतच मंजूर करून पुढील कार्यवाही करावी.

सौ. निखत अली : माझ्या वॉर्डात बऱ्याच ठिकाणी महानगरपालिकेच्या जागेवर घराच्या बाजूला ओटा तयार करून अधिकृतपणे होत आहे. या संदर्भात संबंधित अधिकारी यांना तक्रारी दिलेल्या आहेत. काहीही कार्यवाही केलेली नाही. तसेच वॉर्डात एका व्यक्तीने इमारतीचे दोन मजले अनाधिकृतपणे बांधलेले आहे. परवानगी फक्त एकाच मजल्याची होती त्या व्यक्तीने विना परवानगी मुख्य ड्रेनेज लाईनला ड्रेनेज लाईन जोडलेली असून ती व्यवस्थित न जोडल्याने ड्रेनेजचे घाण पाणी रस्त्यावर वाहत आहे. याबाबत सुध्दा तक्रार करून देखील कार्यवाही झालेली नाही. वॉर्डात पाणी वेळेवर येत नाही. अतिक्रमणाच्या बाबतीत दि. १९/१२/२००० रोजी पत्र देवून संबंधित विभागास कळविले. आलमारा हॉटेल ते कामाक्षी लॉज पर्यंतच्या रस्ता रुंदीकरण करण्यात यावे. रस्ता पाहणीसाठी अधिकारी आश्वासन देतात परंतु येत नाही. अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

मा. महापौर : आपण जे पत्र दिले त्या पत्राची एक प्रत माझ्याकडे द्यावी त्यानुसार संबंधित अधिकारी यांना सूचना देऊन कार्यवाहीचे आदेश देण्यांत येईल.

श्री. दानवे अंबादास : माजी महपौर डॉ. भागवत कराड यांचे प्रयत्नाने प्रभाग समिती तसेच महिला व बाल कल्याण समिती स्थापना करण्यात आली ह्या समित्या फक्त नावाला स्थापन झालेल्या आहे. प्रभाग समितीच्या सभापतीला गाड्या देण्यात आल्या परंतु कोणतेही अधिकारी देण्या आलेले नाही. नियमानुसार २९-अ(७) (क) नुसारप्रभाग समितीला ५ लाख रुपया पर्यंतचे अधिकार आहे. काही सभापती यांना बसण्यास सुध्दा जागा नाही असे समजते तीच परिस्थित महिला व बालकल्याण समती सभापतीची आहे. त्यांचेकडे गाडी दिलेली आहे. बसण्यासाठी जागा आहे. अधिकार काहीही नाही. जे नियमात बसते त्याबाबत हालचाली करण्याचे काम प्रशासनाने करावे जेणे करून बऱ्याच समस्या झोन कार्यालयात जनतेच्या सुटतील. योग्य नियमाने व नियमित कामे सुध्दा मुख्य कार्यालयात करता येतील. प्रभारी अधिकारी सुध्दा अद्याप नियुक्त केलेले नाही. अशा प्रकारचा प्रस्ताव मा. आयुक्तांकडे प्रलंबित आहे. अशी माहिती मिळाली. प्रभाग समितीचे सर्व अधिकार सभापती यांना देण्या संदर्भात जो अहवाल मा. आयुक्तांकडे आहे त्याची अंमलबजावणी करावी. जेणे करून उर्वरित ६ महिण्याच्या काळात प्रभाग समितीच्या सभापती यांना कामे करता आली पाहिजे. याचा विचार करून प्रभाग समितीचे सर्व अधिकार प्रदान करावे.

मा. महापौर : प्रभाग समितीचे अधिकार देण्याबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

श्रीमती पार्वती मानकापे : ६ महिण्यापूर्वी मी पत्र दिले अतिक्रमण काढण्यासाठी अद्यापत कार्यवाही झाली नाही परवाच दोन लोकांचा बळी गेला वेळेवर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही केल्यास प्राणहानी होणार नाही.

मा. महापौर : आपले अधिकारी / कर्मचारी यांचे एक पथक सिडको भागात अतिक्रमण काढण्यासाठी गेलेले आहे. आपण दिलेल्या पत्राची एक प्रत माझ्याकडे द्यावी. अधिकाऱ्यांना त्यानुसार सूचना करण्यांत येतील. आता विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. ४७८/१ :**

दिनांक ३०/०६/२००१, ०६/०७/२००१, १३/०८/२००१ ची विशेष सर्वसाधारण सभा तसेच दिनांक २०/०८/२००१ ची सर्वसाधारण सभा आणि दिनांक ३१/०८/२००१ व ०४/०९/२००१ च्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

मा. महापौर : विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

दिनांक ३०/०६/२००१, ०६/०७/२००१, १३/०८/२००१ ची विशेष सर्वसाधारण सभा तसेच दिनांक २०/०८/२००१ ची सर्वसाधारण सभा आणि दिनांक ३१/०८/२००१ व ०४/०९/२००१ च्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ४७९/२ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, सर्वसाधारण सभेने यापूर्वी अशासकीय ठराव क्र. २०१/१२ दिनाक ०४/२/२००० नुसार चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना रुपये ६५/- दैनिक वेतनाऐजवी रु. ९०/- प्रति दिन दैनिक वेतन देण्यात यावे म्हणून ठराव पारीत केलेला होता.

महानगरपालिकेचे सन २०००-२००१ या आर्थिक वर्षाचे महसूली उत्पन्न रु. ८७.९३ कोटी होते. यामध्ये शासकीय अनुदान रक्कम रु. ४/- कोटीचा समावेश आहे. म्हणजे महानगरपालिकेचे निव्वळ उत्पन्न रु. ८३.९३ कोटी आहे.

सन २०००-२००१ या वर्षामध्ये कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते बोनस, पाचवा वेतन आयोग थकबाकी, शिक्षकांचे चटोपाध्याय आयोग थकबाकी यावर रु. ३८.२१ कोटी खर्च झालेला आहे.

महसूली उत्पन्नाच्या तुलनेत प्रत्यक्ष अस्थापना खर्चाची टक्केवारी ४५.५२ येते. पाचवा वेतन आयोग थकबाकी वगळल्यास वार्षिक अस्थापना खर्च रु. ३५.२५ कोटी येतो. त्याची महसूली उत्पन्नाच्या तुलनेत अस्थापनावर ४२% सर्व आहे. शासनाचे संकेत आहेत की, ४२% च्या वर अस्थापना खर्च जाऊ नये, शासनाची ही बाब विचारात घेता कामगारांच्या मागणीनुसार दैनिक वेतन वाढवून देणे शक्य होणार नाही. तथापी दोन वर्षात न केलेली वाढ व महागाई निर्देशांक विचारात घेता व महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता दैनिक वेतनाचा दर रु. ६५/- ऐवजी रु. ७५/- करणेचे प्रस्तावित असून त्यामुळे रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांचे वेतनावर करण्यात येणाऱ्या एकूण खर्चात वार्षिक रु. ४१.२७ लक्ष ने वाढ होईल. याप्रमाणे स्थायी समितीसमोर दिनांक ०८/०८/२००१ रोजी

प्रस्ताव ठेवण्यात आला होता व स्थायी समितीने ठराव क्र. ४ दि. ०८/०८/२००१ नुसार उपरोक्त प्रमाणे प्रस्तावास प्रचलित दैनिक वेतन दर रु. ६५/- मध्ये रु. १५/- ची वाढ करून रु. ८०/- दैनिक वेतन अदा करण्यास मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ५१(२) नुसार मान्यता दिली आहे. करिता सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव माहितीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. पंडागळे रतनकुमार : चतुर्थ श्रेणीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कोणत्याच सवलती दिल्या जात नाही या अगोदर सर्वसाधारण सभेने ९०/- दैनिक वेतन लागू करावा म्हणून प्रस्ताव पारीत केलेला आहे. त्यानुसार सर्व वर्ग- च्या दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन रुपये ९०/- करण्यांत यावा.

मा. महापौर : मुख्यलेखधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : नुकताच मागील महिण्यात चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये पारीत झालेला आहे. तत्पूर्वी सर्वसाधारण सभेत अशासकीय प्रस्ताव सादर होऊन या कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन रुपये ९०/- देण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर झालेला होता. संघटनेची मागणी विचारात घेऊन प्रशासनामार्फत चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला असता. स्थायी समितीने दैनिक वेतन रुपये ८०/- करण्यास मान्यता दिलेली आहे. ४२% च्या वर अस्थापनेवरील खर्च जाऊ नये असे शासनाचे निर्देश आहे. सध्या वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन रुपये ६५/- देण्यात येतो १०/- ची वाढ करून प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला होता. त्यात आणखी ५/- रु. ची वाढ करून स्थायी समिती कडून रु. ८०/ करण्यात आले. इतर महानगरपालिकेत काय दैनिक वेतन दिल्या जातो याची माहिती घेतली त्यानुसार अमरावती, सोलापुर, कोल्हापुर महानगरपालिकेडून माहिती घेऊनच व या महानगरपालिकेमध्ये इतर महानगरपालिकेपेक्षा कमी दै. वेतन दिला जातो. हा विचार करूनच प्रशासनातर्फे प्रस्ताव सभागृहाच्या मंजुरी साठी ठेवण्यात आलेला होता. इतर महानगरपालिका औरंगाबाद महानगरपालिकेच्या कॅटेगरीत येत नाही. नाशिक महानगरपालिकेचे बजेट ४०० कोटीचे आहे. या महानगरपालिकेचे १०० ते १२५ पर्यंतच आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : अस्थापनेवर सध्या किती खर्च होत आहे.

मुख्यलेखाधिकारी : ४२% पर्यंत खर्च होत आहे. शासनाचे निर्देश आहे की, ४२% चे वर खर्च होऊ नये. त्याचप्रमाणे नुकत्याच पार पडलेल्या स्थायी समिती सभेत तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांच्या दैनिक / ठराविक वेतनामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. जवळपास ५ लाख रुपये वर्षाचा अतिरिक्त खर्च येणार आहे. ४२% च्या वर खर्च गेल्यास अडचण निर्माण होईल. तसेच ५ व्या वेतन आयोगाची थकबाकी सुध्दा कर्मचाऱ्यांना देण्याची मागणी आहे. वसुली कमी व खर्च जास्त यामुळे टक्केवारी वाढलेली आहे. पाचवा वेतन आयोग लाू केला तेंव्हा १३० कोटीचे बजेट होते. वसुली ८८ कोटी झाली.

श्री. पंडागळे रतनकुमार : दिनांक ०६/१०/९८ ला प्रशसनामार्फत १४०० हंगामी कामगारांचा प्रस्ताव शासनास पाठविले कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू केला तरी ३४% ते ३५% च्या वर अस्थापनेचा खर्च जाणार नाही असा प्रस्ताव प्रशासनाने शसनाकडे पाठविलेला आहे. त्याची प्रत आपल्या माहितीसाठी

उपलब्ध करून देता येईल. सन ९८ मध्ये जे कर्मचारी आकृतीबंध पुस्तक तयार करण्यात आले होते. त्यात सुध्दा एक प्रशासकीय कमिटी तयार करण्यात आलेली होती. तसेच मा. मुख्यमंत्री यांना सुध्दा प्रशासनाने त्यावेळी एक प्रशासकीय निवेदन दिलेले आहे. त्यात सुध्दा १४०० हंगामी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम केले तरी ३५% चे वर खर्च जाणर नाही म्हणून उल्लेख केलेला आहे. सन १९९८ मध्ये बजेट नुसार ३५% चे वर खर्च जाणार नाही असे दिले जाते तर तेंव्हा पासून तीन वर्षात बजेट व वसुलीत सुध्दा वाढ झालेली आहे. त्यामुळे ४२% चे वर खर्च जाऊ शकत नाही.

मुख्यलेखाधिकारी : स. सदस्यांचा मताशी मी सहमत आहे. १४०० कर्मचाऱ्यांना कायम करून अस्थापनेवरील खर्च ३५% चे वर जाणार नाही असे निवेदन प्रशासनामार्फतच शासनाकडे दिले होते. जेणे करून त्यावेळीची बजेटची वसुली गृहित धरून ती खर्चाची टक्केवारी काढलेली आहे. चालू आर्थिक वर्षात प्रशासनातर्फे हेच नमूद करण्यात आलेले आहे की, सन १९९८ पासून फक्त वसुलीमध्ये २ कोटीची वाढ झालेली आहे. आणि अस्थापनेवरील खर्च हा ८% ने वाढलेला आहे. उत्पन्न कमी व खर्च जास्त होत आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन हे द्यावेतच लागते. उत्पन्न कमी व खर्च वाढत असेल तर खर्चाच्या टक्केवारी मध्ये नक्कीच वाढ होईल.

श्री. पंडागळे रतनकुमार : सन १९९८ ला शासनाकडे जी आकडेवारी दिलेली होती ती चुकीची होती काय?

मुख्यलेखाधिकारी : सन १९९८ ला १०८ कोटीचे बजेट होते त्यापैकी ७८ कोटीच वसुली झालेली आहे. एकूण वसुलीवर खर्चाची टक्केवारी वाढली जाते. १०८ कोटीचे बजेट होते व १०८ कोटी उत्पन्न मिळेल या दृष्टीने १४०० कर्मचाऱ्यांना कायम केले तरी ३५% चे वर खर्च जाणार नाही असा निकष काढलेला होता. आता १३५ कोटीचे बजेट आहे. उत्पन्न कमी झाले तरी कर्मचाऱ्यांना वेतन द्यावेच लागते त्यामुळे अस्थापनेवरील खर्चाची टक्केवारी वाढणार आहे.

श्री. पंडागळे रतनकुमार : हंगामी कामगारांच्या वेतनामध्येच वाढ करायच्या वेळेस अस्थापनेचा खर्च वाढतो असे अधिकाऱ्यांचे नेहमीच उत्तर मिळते. सफाई कामगार हे सुध्दा इतर कायम स्वरुपी कर्मचाऱ्यांबरोबर काम करतात. त्यांच्या कामाचा मोबदला त्यांना मिळालाच पाहिजे. याचा विचार प्रशासनाने करावा.

श्री. प्रकाश निकाळजे : हंगामी कामगारांना शासनाच्या हंगामी कामगारांना शासनाच्या किमान वेतन कायद्याप्रमाणे १२५/- रु. दैनिक वेतन देण्याचे आहे. असे असतांना सुध्दा महानगरपालिकेमध्ये शासनाच्या नियमाप्रमाणे दैनिक वेतन दिला जात नसून जे कामगार स्वच्छ मन ठेऊन काम करतात, स्वत:चे आरोग्य धोक्यात टाकून इतर शहरातील जनतेचे आरोग्य कसे निरोगी राहील हा दृष्टीकोन समोर ठेवून कामे करतात त्यांचेच वेतनामध्ये वाढ करण्यास प्रशासन मान्य करीत नाही. बऱ्याच कर्मचाऱ्यांना स्वत: ची घरे नाही. घरांचे भाडे विचारात घेता बरेच कर्मचारी हे शहराच्या बाहेरच्या भागात राहतात कामगावर जा-ये करण्यासाठी महानगरपालिकेची कोणतेही वाहने नाही त्यामुळे या कर्मचाऱ्यांना पहाटे ५ वाजेपासून बस, रिक्षा , किंवा पायी चालत येऊन दुपारचे २ ते ३ वाजेपर्यंत साफसफाई काम करावे

लागते. म्हणून अशा कष्ट करणाऱ्या कामगारांना त्यांच्या कामाचा मोबदला वाढवून दिल्यास वावगे होणार नाही. तत्कालीन आयुक्त श्री. भोगे असतांना जकात वसुलीपोटी जवळपास १६ लाख रुपये दररोज मिळत हाते. सदर आयुक्त गेल्यापासून वसुलीचे प्रमाण कमी झालेले आहे. तसेच जे महसूली उत्पन्न आहे त्याची सुध्दा वसुली कमी होत आहे. अधिकारी नुसते वेगवेगळ्या विषयावर आपले लक्ष केंद्रित करत आहे. जेथे महसूल व जकात उत्पन्न मिळते तेथे अधिकाऱ्यांना वचक राहिलेला नाही. मा. महापौर यांनी आताच काही दिवसापूर्वी जकात चोरी प्रकरण पकडले त्यानुसार जकात विभागामध्ये किती चौऱ्या होत असतील याची चौकशी करणे बरजेचे आहे. यासाठी प्रशासनामार्फत एक चांगल्या प्रकारचे पथक निर्माण करावे. कृतीदल तयार करावे, जकात चोरी थांबविण्यात याची तसेच मालमत्ता करात सुध्दा जास्त वसुली झाली पाहिजे. शहरातील बऱ्याच मोठमोठ्या इमारतींना करच लावण्यात आलेला नाही. जे भरतात त्यांना कराची रक्कम वाढवून देण्यात येते. यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ट होतात. बरेच नागरिक घरांना कर लावण्यासाठी विनंती अर्ज देऊन मागणी करतात. परंतु त्यांचे घरांना कर लावण्यात हरकत नसावी. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल प्रशासनाने वसुली जास्तीत जास्त होण्यासाठी पा ाऊल उचलावे व वसुली वाढविण्याचे काम प्रशासनाच्या हातामध्ये आहे. त्यासाठी उपाययोजना करण्यात यावी. वसुली वाढेलच हा दृष्टीकोन समोर ठेवून वर्ग-४ च्या अस्थायी कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन रुपये ९०/- देण्यात यावा.

श्री. तकीहसन खान : प्रस्ताव माहितीस्तव सादर केलेला आहे. यात वाढ करणे किंवा कमी करणे नियमाने योग्य होणार नाही. मुख्यलेखाधिकारी यांनी प्रस्तावास नमूद केले आहे. खर्च जास्त व उत्पन्न कमी येत आहे. म्हणून वाढ करता येणार नाही. स्थायी समितीने जो दैनिक वेतन मंजूर केलेला आहे त्यास मान्यता द्यावी प्रस्ताव फक्त माहितीस्तव सादर केलेला आहे.

श्री. दानवे अंबादास : प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या माहितीस्तव ठेवण्यात आलेला आहे. या संदर्भातच एक प्रश्न सर्वसाधारण सभेच्या नियमाप्रमाणे उपस्थित केलेला होता. प्रशासनाकडून त्यानुसार उत्तर प्राप्त झालेले नाही. या महानगरपालिकेने प्रकाशित केलेल्या सेवा भरती नियमावलीमध्ये उल्लेखित केलेल्या पदाशिवाय अन्य कोणकोणत्या पदांना महाराष्ट्र शासनाची मान्यता आहे. व मान्यतेच्या पत्राचे आदेश क्रमांक काय व दिनांक कोणता? तसेच महाराष्ट्र शासन पदास परवानगी देईल या हेतून विविध संवर्गात कोणते अधिकारी कर्मचारी यांची त्या पदावर नियुक्ती केलेली आहे. त्या कर्मचाऱ्यांचे नांव पदासह माहिती देण्यात यावी. राज्य शासनाची परवानगी नसतांनाही कार्यरत कर्मचाऱ्यांचे जे वेतन व भत्ते दिले जातात अशा खर्चास मुख्य लेखा परिक्षक व मुख्यलेखाधिकारी यांनी काही आक्षेप घेतलेला आहे काय. घेतलेला असेल तर कुणावर घेतला त्यांचे घेतलेला नाही त्याचा सुध्दा खुलासा करावा असा प्रश्न विचारला असता प्रश्नाचे उत्तर नंतर देण्यासाठी वेळ न मागता थातूर मातूर उत्तर प्राप्त झाले. जे कामगार नियमित कामे करतात शहराची साफसफाई करतात त्यांचे दैनिक वेतनामध्ये १० रुपयेची वाढ करण्यास प्रशासन मान्य करीत नाही. सभागृहास चर्चा होऊन निर्णय घ्यावा लागतो. माझ्या प्रश्नाचे उत्तर प्रशासन देऊ शकले नाही. माझ्या

माहितीप्रमाणे कित्येक पदांना शासन मान्यता देईल या हेतूने प्रशासनाने सेवा भरती, पदोन्नती दिलेल्या आहेत, अशा वेळेस प्रशासनाला शासनाची परवानगी घेण्याची का आवश्यकता पडली नाही. या सर्व बाबींचा विचार करता सर्व साधारण कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये वाढ करण्यासाठी सभागृहात काही सभासदांनी जी मागणी केलेली आहे. ती मा. महापौर यांनी मान्य करून प्रशासनाने सुध्दा मान्य करावी हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री. तकीहसन खान : सभागृहात कोरम नाही सभा चालू आहे. आपण चर्चा करू शकतो परंतु इतिवृत्तात त्याची नोंद घेणे योग्य होणार नाही. सभा तहकूब करावी.

मा. महापौर : गणपूर्ती अभावी सभा ०५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. [वेळ १.५५ वाजता]

दुपारी १.५५ वाजता तहकूब करण्यात आलेली सभा पुन्हा २.३० वाजता सुरू करण्यात आली.

श्री. पंडागळे रतनकुमार : चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या दैनिक वेतनामध्ये वाढ करण्याच्या विषयावर चर्चा चालू आहे. शहराचा वाढता व्याप व कायमाचा व्याप लक्षात घेऊन स्थायी समितीने ८०/- दैनिक वेतन द्यावे म्हणून मंजुरी दिलेली आहे. आणखी १०/- ने वाढ करून दैनिक वेतन रुपये ९०/- देण्याची मान्यता देण्यात यावी.

मा. महापौर : चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या दैनिक वेतनामध्ये वाढ करण्याचा प्रस्ताव सादर केलेला असून प्रशासनामार्फत दैनिक वेतन रुपये ६५/- वरून १०/- ची वाढ करून दैनिक वेतन ७५/- करावा म्हणून प्रस्ताव स्थायी समितीसमोर प्रस्तावित करण्यात आलेला होता. स्थायी समितीने त्यात ५/- रुपयाची वाढ करून दैनिक वेतन रुपये ८०/- करण्यात आलेले आहे. सभागृहातील स. सभासदांच्या भावना लक्षात घेऊन महानगरपालिकेची परिस्थितीचा विचार करून चतुर्थश्रेणी कामगारांना ८०/- रुपयामध्ये आणखी ५/- रुपये ची वाढ करून दैनिक वेतन रुपये ८५/- लागू करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या प्रत्यक्ष चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेतील दैनिक वेतनावरील चतुर्थश्रेणी संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांना रुपये ८०/- प्रतिदिन दैनिक वेतन ऐवजी रुपये ८५/- येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८०/३ :**

कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा [पाणीपुरवठा ज.नि.] यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सूल जलशुध्दीकरण केंद्रास पाणी शुध्दीकरण प्रक्रियेसाठी तसेच विविध जलकुंभावर ब्लीचींग पावडरची आवश्यकता असते. १५० मे. टन ब्लीचींग पावडर खरेदी करण्याचा प्रस्ताव असून त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकारण विभागाची सन २०००-२००१ च्या दरसूचीनुसार रक्कम रु. २६,७७,५००/- एवढ्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. करिता अंदाजपत्रक रक्कम रुपये २६,७७,५००/- चे विचारार्थ व मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री. दानवे अंबादास : विषय क्र. ३ व ४ हे दोन्ही प्रस्ताव ब्लींचिंग पावडर खरेदीचे असून एकत्रित प्रस्ताव का सादर करण्यात आलेला नाही.

प्र. कार्यकारी अभियंता (पा.पु.), श्री. सी. एस. सोनी : विषय क्र. ३ व ४ यामध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी लागणारे ब्लिचींग पावडर खरेदीचा प्रस्ताव आहे. फारोळा व हर्सूल येथे जलशुध्दीकरण करण्यासाठी हे पावडर खरेदी करणार आहेत. वेगवेगळे प्रस्ताव सादर करण्यात आले परंतु याची निविदा एकत्रित काढण्याची कार्यवाही केली जाईल.

मा. महापौर : विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सूल जलशुध्दीकरण केंद्रास पाणी शुध्दीकरण प्रक्रियेसाठी व विविध जलकुंभासाठी १५० मे. टन ब्लीचींग पावडर खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २६,७७,५००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८१/४**

कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेसाठी आवश्यक असणारा वर्ष २००१-२००२ साठी ब्लीचींग पावडर खरेदीचा प्रस्ताव रुपये २५,५०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्त महोदय यांनी ३०/०८/२००१ अन्वये मा. सर्वसाधारण सभेसमोर सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे.

सदरील प्रस्तावाचा खर्च हा सन २००१-२००२ या आर्थिक वर्षा अंतर्गत [केमिकल परचेस] रसायने खरेदी या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यता येईल. तरी रक्कम रुपये २५,५०,०००/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव विचारार्थ मान्यतेस्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**संवाद :**

श्री. प्रकाश निकाळजे : विषय ३ व ४ ची एकत्रित निविदा काढून कार्यवाही करता येईल. परंतु माझ्या माहितीप्रमाणे ब्लीचींग पावडर खरेदीचा प्रस्ताव पहिल्यावेळी पाठविला असेल व नंतर दुसऱ्यावेही पुन्हः पाठविला असेल. चुकून आलेला असेल ३ महिण्यानंतर असावा.

प्र. कार्यकारी अभियंता (पा.पु.) प्रस्ताव चुकून आलेला नाही. वेगवेगळ्या संचिका आहेत, वार्ष्जिक मागणी आहे, वार्षिक खरेदीचा करार असून जशी आवश्ययकात पडेल त्यानुसार १ १/२ -२ महिण्याचा साठा करण्यात येतो. मा. आयुक्तांच्या मान्यतेनुसार कार्यवाही करण्यात येते.

मा. महापौर : संबंधित पुरवठा धारकांस बील कशा पध्दतीने अदा केले जाते.

प्र. कार्यकारी अभियंता : मागणी नुसार जेंव्हा माल पुरवठा होईल त्यानुसार टप्प्या-टप्प्याने बील अदा केले जाते.

मा. महापौर : विषय मंजूर करण्यात येतो. एकत्रित टेंडर काढून कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे जलशुध्दीकरण प्रक्रिसेसाठी ब्लीचींग पावडर खरेदी करण्याकरिता तयार करण्यांत आलेल्या र. रु. २५,५०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८२/-५**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, किरणाचावडी पोलिस चौकीसाठी शहागंज चमन येथे तात्पुरते स्वरुपाची चौकी उभारण्यासाठी मा. सर्वसाधारण सभेने ठराव क्र. ३४०/२ दि. २०/०३/२००१ अन्वये मान्यता दिलेली आहे. उक्त ठरावानुसार चमनच्या उत्तर बाजूस ४०० चौ. फुट क्षेत्रफळ केवळ तात्पुरते चौकीसाठी ठराव मंजूर झालेला आहे.

तथापि मा. पोलिस आयुक्त यांचे पत्रान्वये शहागंज चमन येथील दक्षिणेस शहर वाहतुक शाखेची चौकी व उत्तरेस किराणा चावडी पोलिस चौकी अशा दोन ठिकाणी चौकी उभारणे बाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार उत्तर व दक्षिण बाजूस एकूण ४०० चौ. फुट क्षेत्रात तात्पुरतची पोलिस चौकी उभारणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. सिध्द जगदिश : किराणा चावडी येथील चौकीची इमारत जुनी असून इतरत्र ठिकाणी पोलिस चौकी गेलेली आहे. जुन्या चौकीची इमारत तशीच उभी आहे अद्याप-पर्यंत का कार्यवाही केली नाही वा चौकीच्या इमारतीमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : जुन्या चौकीची इमारत काढण्यात यावी, ती धोकादायक आहे, रस्त्यामध्ये येते.

श्री. किशोर तुळशीबागवाले : किराणा चावडी पोलिस चौकी बदण्याच्या दृष्ठीने संबंधित विभागास महानगरपालिकेने ४०० चौ. फुट जागा दिलेली आहे. हा प्रस्ताव वेगळा आहे. पोलिस चौकी पाडण्याचा विषय वेगळा आहे.

श्री. सिध्द जगदिश : जुन्या पोलिस चौकीची इमारत २ दिवसामध्ये काढण्यात याची तसे आपण आदेश करावेत.

अति. शहर अभियंता : सदर इमारत हि सार्वजनिक बांधकाम खात्याची आहे. त्यांचेशी पत्रव्यवहार चालू असून सदर पोलिस चौकी तात्काळ काढण्यात यावी म्हणून पत्रही पाठविलेले आहे. अद्याप त्या विभागाने कार्यवाही केलेली नाही.

श्री. प्रशांत देसरडा : पोलिस चौकी कामाच्या संदर्भात संबंधित ठेकेदारास बील अदा का करण्यात आलेले नाही.

श्री. सिध्द जगदिश : प्रशासनाने संबंधित विभागास पत्र व्यवहार करून सुध्दा पोलिस चौकी काढून घेतलेली नाही आणि जो ठराव आपण पास केलेला होता त्यात या पोलिस चौकीमुहे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो म्हणून ठराव आणलेला होता. ठराव मंजूर झाल्यानंतर कार्यवाही करावी. सबंधित विभागास जागा उपलब्ध करून दिलेली आहे. बी. ॲण्ड सी. ची इमारत आहे म्हणून कार्यवाही करणार नाही काय?

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाशी पत्रव्यवहार केलेला आहे. यासाठी आपण विशेष अधिकारी नेमू व ३ दिवसात पोलिस चौकीची

इमारत काढून घेण्याची कार्यवाही करावी. कायदेशीर बाब बघून कार्यवाही व्हावी.

श्री. किशोर तुळशीबागवाले : प्रस्ताव मंजूर करावा किराणा चावडी येथील जुन्या पोलिसा चौकीची इमारत लवकरात लवकर काढण्यची कार्यवाही करावी.

सौ. विजया रहाटकर : श्रेयनगर, ज्योतीनगर या भागात चौऱ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. म्हणून नागरिकांच्या मागणीनुसार पोलिस आयुक्त यांनी एक अस्थायी (तंबु) पोलिस चौकी सुध्दा कार्यान्वित केलेली आहे. अशा चौकीत काम करतांना पोलिसांना फार त्रास होता. अनेक अडचणी निर्माण होतात. सध्या या भागात चौऱ्यांचे प्रकार चालू आहे. म्हणून मा. पोलिस आयुक्त यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे पत्रव्यवहार करून पोलिस चौकीसाठी जागेची मागणी केलेली आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

मा. महापौर : श्रेयनगर, ज्योतीनगर भागात चौऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. याचा विचार करून मा. पोलिस आयुक्त यांनी महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार करून पोलिस चौकीसाठी जागेची मागणी केलेली आहे. असे प्रभाग समिती सभापती यांनी सूचना केलेली आहे. त्यानुसार त्या भागामध्ये महानगरपालिकेची जागा असेल तर चौकीसाठी देण्याबाबत विचार व्हावा.

श्री. थोरात दत्तात्रय : फायबरच्या तयार केलेल्या चौकी खरेदीसाठी ऑर्डर दिलेल्या होत्या, काय कार्यवाही करण्यात आलेली आहे. माहिती द्यावी.

शहर अभियंता : शहागंज चमन येथे देण्यात आलेली आहे. जकात नाके आणखी वाढवावयाचे होते म्हणून मागणी केलेली होती. जागा मिळाली नाही त्यामुळे उपयोगात येत नाही. सर्वसाधारण सभेने दिनांक २०/०३/२००० च्या बैठकीत ठराव क्र. ३४०/२ नुसार किराणा चावडी पोलिस चौकी तोडून त्याबदल्यात शहागंज चमन मध्ये अस्थायी पोलिस चौकी करण्यात यावी असे ठरल्यानुसार तात्पुरते बांधायची याचा उपयोग नव्हता.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वॉर्डासाठी जवाहर नगर पोलिस स्टेशन सुध्दा दूर पडते उत्तमनगर येथे एक पोलिस चौकी असून भाड्याने घेतलेली असून त्या पोलिस चौकीस जागा सिंधी कॉलनीच्या मागे महानगरपालिकेची जागा आहे. तेथे या पोलिस चौकीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी.

मा. महापौर : ज्या ज्या भागात पोलिस विभागाकडून पत्र प्राप्त होऊन पोलिस चौकीसाठी जागेची मागणी केलेली आहे. महानगरपालिकेच्या मालकीची जागा. त्या भागात उपलब्ध असेल तर प्रशासनाने नियमाने जागा देण्याची कार्यवाही करावी. हा विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराणा चावडी पोलिस चौकीसाठी शहागंज चमन येथे ४०० चौ. फुट क्षेत्रात तात्पुरते शेड उभारण्यास सर्व साधारण सभेचा ठराव क्र. ३४०/२ दि. २०/०३/२००१ अन्वये मंजुरी दिलेली आहे. आता प्रस्तावित केल्याप्रमाणे शहागंज चमन येथे ४०० चौरस फुट क्षेत्रातच शहागंज चमन च्या दक्षिणेस शहर वाहतुक शाखेची, उत्तरेस किराणा चावडी पोलिस चौकीसाठी तात्पुरती पोलिसा चौकी उभारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८३/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई यांनी त्यांचे दिनांक ०३/०९/२००१ [प्राप्त दिनांक ११/०९/२००१] पत्रान्वये राहील निर्वाचित सदस्यांसाठी दिनांक १८ ते २० ऑक्टोंबर २००१ या कालावधीसाठी पणजी, गोवा येथे विशेष प्रशिक्षण [स्पेशलाइज्ड कोर्स] आयोजित केल्याचे कळविले असून यासाठी औरंगाबाद महानगरपालिका महिला पालिका सदस्यांमधून ३ महिला पालिका सदस्यांना या प्रशिक्षण कोर्ससाठी पाठविण्याबाबत कळविले आहे. त्यानुषंगाने प्रशिक्षणास पाठवण्यासाठी ३ महिला सदस्यांची निवड व अपेक्षित खर्च रुपये १०,०००/- ला मंजूरी देणे बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. सुदाम सोनवणे : ३ महिला पाठविण्या ऐवजी ४ महिलांना पाठवावे सोबत कर्मचारी / अधिकारी पाठवावे. तशी मान्यता देण्यात यावी.

मा. महापौर : ३ ऐवजी ४ महिला नगरसेविकांना पाठविल्यास खर्चाची बाब निर्माण होईल. मुख्य लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई यांनी ३ महिलांना प्रशिक्षण कोर्ससाठी पाठविण्याबाबत कळविले आहे. त्याऐवजी ४ महिलांना पाठविण्याची मंजुरी दिली तरी खर्चाबाबत आगाऊ रक्कम देण्याची कार्यवाही करता येईल.

मा. महापौर : या प्रशिक्षणा संबंधी नगरसचिव यांनी थोडक्यात माहिती द्यावी.

नगरसचिव : अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई यांनी त्यांचे दिनांक ०३/०९/२००१ चे पत्र प्राप्त दिनांक ११/०९/२००१ अन्वये पणजी [गोवा] येथे आयोजित केलेले विशेष प्रशिक्षणासाठी तीन [३] महिला सदस्यांची नांवे पाठविण्यास कळविले आहे. सदर प्रशिक्षणामध्ये खालील विषयावर विचार विनिमय होईल.

१) नागरीकरण व नागरी समस्या
२) घटना दुरुस्ती कायदा व स्थानिक स्वराज्य संस्था रचना इत्यादी बाबत.
३) स्थानिक स्वराज्य संस्थाचे कार्य व अधिकार
४) निवडून आलेले महिला लोक प्रतिनिधीचे अधिकार व कर्तव्य.
५) स्थानिक स्वराज्य संस्था संबंधिचे माहितीची पध्दत (म्युनिसिपल इंफरमेशन सिस्टीम)
६) निर्णय प्रक्रिया व प्रश्नांची सोडवणूक
७) नागरी सेवा कार्यपध्दती.
८) जनतेचा सहभाग.

तसेच सदर प्रशिक्षणात नगरपालिका कायद्यांची तरतुदी व त्यांची अंमलबजावणी नागरी सेवा संबंधी लोक प्रतिनिधींची भूमिका व जबाबदाऱ्या तसेच निर्णय प्रक्रिया सुधारणा करणे संवाद कौशल्य, प्रश्न सोडविण्यासंबंधी उपाय योजना करणे आणि शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमामध्ये प्रतिनिधीत्व करणे इत्यादी बाबतीत माहिती देण्यात येणार आहे.

सदर प्रशिक्षणात सहभागी महिला लोकप्रतिनिधींना प्रवास, राहणे इत्यादी व्यवस्था स्वत:ला करावी लागेल व जे लोकप्रतिनिधी हजर राहणार आहेत त्यांना सदर संस्थेकडून उपस्थिती प्रमाणपत्र देण्यांत येणार आहे. ते

घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेकडून प्रवास खर्च व अनुज्ञेय निर्वाह भत्ता देण्यांत येईल.

मा. महापौर : प्रशिक्षणासाठी ४ महिला सदस्यांना पाठविण्याची तसेच त्यांचे सोबत कर्मचारी / अधिकारी पाठविण्यास ही व त्यासाठी होणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई यांनी पणजी गोवा येथे दिनांक १८ ते २० ऑक्टोंबर २००१ रोजी आयोजित केलेल्या महिला सदस्यांना प्रशिक्षणासाठी ४ महिला सदस्य व त्यांचे सोबत कर्मचारी / अधिकारी पाठविण्यास व त्यास येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# पुरवणी विषय

**विषय क्र. ४८४/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील टि. व्ही. सेंटर चौक, हडको येथे नियोजित संभाजी महाराज यांचे पुतळ्या शेजारी "सम्राट अशोक स्तंभ" उभारणेस सविस्तर चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्यात आलेली आहे. सदर चौकात "सम्राट अशोक स्तंभ" उभारणेचे काम त्वरित होती घेऊन पूर्ण करणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सर्वसाधारण सभेसमोर सादर.

सुचक - सौ. कुसुमबाई दौलत खरात, श्री. काशिनाथ कोकाटे,
श्री. सुदाम रामदास सोनवणे

अनुमोदक - श्री. किशोर तुलशीबागवाले, श्री. संजय शिरसाठ,
श्री. पांडुरंग तायडे, श्री. भगवान रगडे,
सौ. शकुंतलाबाई इंगळे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील टि. व्ही. सेंटर चौक हडको येथील नियोजित संभाजी महाराज यांचे पुतळ्या शेजारी "सम्राट अशोक स्तंभ" उभारणेस व सदरचे काम त्वरित हाती घेऊन पूर्ण करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८५/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भवानी नगर प्रभागातील जनतेच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामार्फत महेशनगर भागात फ्युजकॉल सेंटर खाजगी इमारतीत सुरू केलेले आहे. फ्युजकॉल सेंटर स्थलांतरीत करून इमारती रिकामी करणेबाबत घर मालकाने तगादा लावला आहे. विद्युत मंडळामार्फत सदर फ्युजकॉल सेंटर येथून स्थलांतर करून उस्मानपुरा भागात सुरू करण्यात येणार आहे. परिणामी रहिवाशांची

फ्युजकॉल सेंटर अभावी अत्यंत गैरसोय होणार आहे. या भागातील विद्युत पुरवठा सुरळीत रहावा यासाठी फ्युजकॉल सेंटर या प्रभागात असणे अत्यंत जरुरी आहे.

महानगरपालिकेमार्फत जुना मोंढा भागात झोन कार्यालयासाठी इमारत उभारण्यात येत आहे. सदर इमारतीत दुकानांसाठी गाळे बांधण्यात आलेले आहेत. त्या गाळ्यापैकी काही गाळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास फ्युजकॉल सेंटरसाठी भाडे पट्ट्याने दिल्यास गाळ्यात फ्युजकॉल सेंटर सुरू करेल व ज्यामुळे येथील रहिवाशांची गैरसोय दूर होईल करिता या इमारती मधील गाळे विद्युत मंडळास फ्युजकॉल सेंटरसाठी भाडे पट्ट्याने देणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. राधाकृष्ण गायकवाड
अनुमोदक - श्री. अशरफ मोतीवाला, श्री. संजय शिरसाट

**संवाद :**

श्री. गायकवाड राधाकृष्ण : महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळे हे जनतेच्या सोयीसाठी कार्यालय उघडत आहे. त्यांचेकडून अनामत रक्कम न घेता निवासी दराने द्यावे.

मा. महापौर : वरील प्रमाणे दुरुस्तीसह मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जुना मोढा भागात झोन कार्यालयासाठी उभारण्यात येत असलेल्या इमारतीत दुकानासाठी गाळे बांधण्यात आलेले आहेत. त्या गाळ्यापैकी काही गाळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास फ्युजकॉल सेंटरसाठी अनामत रक्कम न घेता निवासी दराने भाडे आकारून भाडे पट्ट्याने देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८६/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा. आ. बसैय्ये बंधू यांच्या निधीतून व महानगरपालिकेतर्फे पैठणगेट [बौध्दवाडा] येथे नवीन सभागृह बांधून देण्यात आलेले आहे. या सभागृहास "भिमस्मृती सभागृह" किंवा "डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह" असे नांव देण्यात यावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. प्रशांत देसरडा, श्री. संजय शिरसाठ
अनुमोदक - श्री. किशोर तुलशीबागवाले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. आ. बसैय्ये बंधू यांच्या निधीतून व महानगरपालिकेतर्फे पैठणगेट [बौध्दवाडा] येथे नव्याने बांधण्यात आलेल्या सभागृहात "भिमस्मृती सभागृह" किंवा "डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८७/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, स्थानिक विकास निधी कार्यक्रमातंर्गत स्वातंत्र्य सैनिक सरकारी गृहनिर्माण संस्था, नागेश्वरवाडी परिसरामध्ये महानगरपालिकेतर्फे मा. आ. शालीग्रामजी बसैय्ये यांचे निधीतून सांस्कृतिक सभागृह बांधण्यात येत आहे. या सभागृहास "पंडित नरेंद्रजी सांस्कृतिक सभागृह" असे नांव देण्यात यावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. प्रशांत देसरडा, श्री. संजय शिरसाठ
अनुमोदक - श्री. किशोर तुलशीबागवाले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्थानिक विकास निधी कार्यक्रमांतर्गत स्वातंत्र्य सैनिक सरकारी गृहनिर्माण संस्था, नागेश्वरवाडी परिसरामध्ये महानगरपालिकेतर्फे मा. आ. शालीग्रामजी बसैय्ये यांचे निधीतून सांस्कृतिक सभागृह बांधण्यात येत आहे. या सभागृहास "पंडित नरेंद्रजी सांस्कृतिक सभागृह" असे नांव देण्यात यावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**विषय क्र. ४८८/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नागेश्वरवाडी मधील नागेश्वर मंदिराच्या मागील श्री. नागेश्वर मंदिर ते समर्थ नगरच्या निराला बाजार चौकापर्यंतच्या रस्त्यास "पंडित नरेंद्रजी मार्ग" असे नांव देण्यात यावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. प्रशांत देसरडा, श्री. किशारे तुलशीबागवाले.
अनुमोदक - श्री. संजय शिरसाठ, श्री. आनंद तांदुळवाडीकर

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नागेश्वरवाडी मधील नागेश्वर मंदिराच्या मागील श्री. नागेश्वर मंदिर ते समर्थ नगरच्या निराला बाजार चौकापर्यंतच्या रस्त्यास "पंडित नरेंद्रजी मार्ग" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८९/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सर्वसाधारण सभा दि. १९/१२/२००० चे ठराव क्रमांक १७५/८ नुसार मुंकुदवाडी वॉर्ड क्र. १२ व वॉर्ड क्र. १३ च्या सिमेवर असलेल्या वसाहतीस संत रोहिदासनगर असे नांव देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्या ऐवजी संत रविदासनगर असे नांव दुरुस्ती करण्याची मंजुरी देण्यात यावी. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक - सौ. लिलावती बाळासाहेब घायतिलक
अनुमोदक - श्री. मोतीलाल रघुनाथ जगताप

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभा दि. १९/१२/२००० चे ठराव क्रमांक १७५/८ नुसार मुंकुदवाडी वॉर्ड क्र. १२ व वॉर्ड क्र. १३ च्या सिमेवर असलेल्या वसाहतीस " संत रोहिदासनगर" असे नांव देण्यास मंजुरी देण्यात आली होती. त्या ऐवजी "संत रविदासनगर" असे नांव देण्यास व तशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ४९०/१ :**

उप संचालक नगर रचना महानगरालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहराच्या मंजूर विकास योजनेनुसार १२ मीटर (४० फुट) रुंद रस्ता पीर बाजार ते गुरुद्वारा उस्मानपुरा चोक पर्यंतचा सदरील रस्ता या वॉर्ड क्र. २५ मधील असून संबंधीत स. नगरसेवक श्री. जाबिंदा यांनी या भागातील नागरिकांच्या सुविधा करिता या रस्त्याचे रुंदीकरणाबाबत मागणी केलेली आहे.

सदरील रस्ता हा उस्मानपुरा गावठाण क्षेत्रातील एक महत्वपूर्ण रस्ता असून क्रांतीचौक उस्मानपुरा वाहतुम सर्कल पीर बाजार या नेहमीच्या वर्दळीच्या रस्त्याच्या हा भाग असून दाट वस्ती व गजबजलेल्या भागातील वाहतुकीची होणरी कोंडी अडचण दूर करण्याकरिता सदर रस्ता विकसित करणे आवश्यक आहे.

उक्त रस्ता हा क्रांतीचौक ते रेल्वेस्टशन मार्गे उस्मापुरा या रस्त्यास हॉटेल वेंदांत पीर बाजार उस्मानपुरा या पुरक रस्त्याचा भाग आहे. तसेच हॉटेल वेदांत पीर बाजार शहानुरवाडी या मंजूर विकास योजनेमधील २५ मीटर रुंद रस्ता सुध्दा महानगरपालिकेने जवळपास पूर्णपणे विकसित केला आहे.

या परिसरातील शैक्षणिक संस्था, या संस्थेचे वस्तीगृह, एकनाथ नगर या लगतचा निवासी वापराचा विकसित भाग पाहता. तसेच रेल्वेस्टशन औद्योगिक परिसर एम.आय.डी.सी. सातारा भागास शहर भाग जोडणारा एक प्रमुख रस्ता म्हणून या रस्त्यावर दुचाकी तीन चाकी व चार चाकी वाहनांची नेहमीच वर्दळ असते. करिता त्या भागातील नागरिकांना सुविधा पुरविण्योच दृष्टीने केलेली मागणी विचारार्थ घेता उक्त रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक ठरते.

सबब उपरोक्त रस्त्याचे रंदीकरणात बाधित होत असलेल्या मिळकती संपादन करण्यासाठी व भूसंपादनात लागणाऱ्या खर्चासह भूसंपादन प्रस्ताव मान्यतेस्तव सादर, सदर प्रस्तावांतर्गत साधारणतः एकूण ११३ मिळकती असून या वर्षाचा सरासरी दर रु. २०.५०० चौ. मी. [बाधित क्षेत्र व अंदाजे बांधित क्षेत्र ९०० चौ. मी. असल्याने देय वजावटीचा विचार करता ह्याचा एकत्रित विचार करता या भूसंपादन प्रस्तावास अंदाजे खर्च रक्कम रु. १,५०,००,०००/- [रु. एक कोटी पन्नास लक्ष फक्त] अपेक्षित आहे, या वर्षाचे अंदाजपत्रकातील भूसंपादनाची तरतूद रु. ६.२५ कोटी इतकी आहे. मा. जिल्हाधिकारी यांचेकडून कार्यवाही होऊन या प्रकरणी संबंधित मिळकत धारकांना निश्चित होणारा मोबदला देण्यात येईल. प्रस्ताव मान्यतेनंतर रीतसर भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात येईल.

**संवाद :**

श्री. निकाळजे प्रकाश : यापूर्वी पीरबाजार येथील रस्त्याचे सौंदर्यीकरण करण्याचे संबंधित अधिकारी यांना सुचविण्यात आलेले होते. परंतु संबंधित अधिकारी हे तिकडील भागातील प्रस्तावावर दुर्लक्ष करतात. या संबंधिख प्रस्ताव मागेच मंजूर झालेला आहे. अंदाजपत्रक ही तयार झालेले होते. अंद्याप का कार्यवाही करण्यात आलेली नाही.

श्री. स. अली मिरा सलामी : यापूर्वीच्या सभेत २-३ प्रस्ताव एक विद्युत मंडळाचे देयकाबाबत व दुसरे रस्ते विकास महामंडळास रक्कम देणे स्थगित ठेवलेले होते. तसेच जाहिरात दराबाबतच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात यावी.

मा. महापौर : येत्या सर्वसाधारण सभेत विषय पत्रिकेवर हे विषय घेण्यात येतील.

अति. शहर अभियंता : सादर केलेला प्रस्ताव हा रस्ता रुंदीकरणाचा असून त्यास मंजुरी द्यावी.

श्री. निकाळजे प्रकश : संबंधित अधिकारी हे नगररचना विभागामध्ये होते तेव्हाच पीर बाजार येथील रस्त्यावर सौंदर्यीकरण करण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला असून अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते त्या प्रस्तावास आजच मंजुरी देऊन या रस्ता रुंदीकरणाच्या प्रस्तावास सुध्दा मान्यता देण्यास हरकत नसावी.

मा. महापौर : स. सदस्य श्री. प्रकाश निकाळजे यांनी सूचना केलेल्या प्रस्तवा संबंधी शक्य तितक्या लवकर कार्यवाही करता येईल तसे प्रशासनाने प्रयत्न करावे. हा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराच्या मंजूर विकास योजनेनुसार १२ मीटर [४० फुट ] रुंद रस्ता पीर बाजार ते गुरुद्वारा उस्मानपुरा चौक पर्यंतचा सदरील रस्ता रुंदीकरणात बाधित होत असलेल्या मिळकती संपादन करण्यास व भूसंपादनास लागणाऱ्या खर्चासह भसंपादन करून या रस्त्याचे रुंदीकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९१/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झाने क्र. ३ अंतर्गत येणारा परिसर हा बराच मोठा आहे. या विभागात भवानी नगर, संजय नगर, बसय्ये नगर, रोकडीया हनुमान कॉलनी, श्रीनिकेतन कॉलनी, दादा कॉलनी, कैलासनगर, निजामगंज, लक्ष्मीशिला नगर, जिन्सी, राजा बाजार, गवळीपुरा, बायजीपुरा, इंदिरानगर, मोढा, लक्ष्मण चावडी व सुराणा नगर इत्यादी वसहतींचा समोवश होतो.

या भागात पोलिस चौक तसेच पोस्ट ऑफिस नसल्यामुळे या भागातील रहिवाशांची अत्यंत गैर सोय होत असून रहिवशांचे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून या भागता पोलिस चौकी व पोस्ट ऑफिस असणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच पोलिस चौकी व पोस्ट ऑफिस सुरू करणे बाबत रहिवाशी सारखी मागणी करत आहे.

महानगपालिकेतर्फे या भागता इामारत तयार होत असून या ईमारतीत पहिल्या मजल्यावर झोन कार्यालय होणर असून तळ मजल्यात दुकाने तयार होत आहेत. सदर दुकानांच्या गळ्यांपैकी एक गाळा पोलिस चौकीसाठी व एक गाळा पोस्ट ऑफिस साठी

सदर दोन्हीही कार्यालये लोकोपयीगी (पब्लिक सेक्टर) असल्यामुळे कुठलेही अनामत रक्क न घेता तसेच निवासी दराने भाड आकारून देणेसाठी प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. राधाकृष्ण गायकवाड,
श्री. संजय शिरसाठ, श्री. प्रशांत देसरडा,
श्री. किशोर तुलशीबागवाले.
अनुमोदक - श्री. प्रकाश निकाळजे, सौ. संगिता मैंद
सौ. ताराबाई जेजुरकर, श्री. भरत लकडे.

**संवाद :**

श्री. तकीहसनखॉन : पोलिस विभागामार्फत पोलिस चौकी करण्याची मान्यता झालेली आहे काय? या विभागाने परवानगी दिल्याशिवाय आपण पोलिस चौकी करू शकत नाही. तसेच पोस्ट ऑफिसची सुध्दा मान्यता घ्यावी लागेल.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : पोस्ट ऑफिस बद्दल विभागाकडून मागणी केलेली आहे. मान्यता देण्यास हरकत नसावी. निवासी दरानेच भाडे आकारण्यात यावे.

मा. महापौर : हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. भाडे निश्चितीसाठी प्रस्ताव भाडे कमिटीकडे पाठविण्यात अयावा निवासी भागासाठी अनुज्ञेय होणारे भाडे आकारण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभाग क्र. ३ च्या अंतर्गत येणाऱ्या भागात महापालिकेच्या तयार होत असलेल्या झोन कार्यालयाच्या इमारतीत पोलिस चौकी तसेच पोस्ट ऑफिससाठी, निवासी वापरांसाठी देय होणारे ीााड आकारून भाडेपट्ट्याने देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९२/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर हे एक थोर क्रांतिकारक व विचारवंत होऊन गेले आहे. त्यांनी समाजातील सर्व वर्गातील लोकांना एकत्रित करून भेदभाव न बाळगता त्यांनी समाजात क्रांती घडवून आणली व त्यांनी समाजात जागृती घडवून आणण्यासाठी घरादाराचाव राज्य कारभाराचा त्या करून समाजात क्रांती घडवून आणली आहे. अशा थोर क्रांतिकारक महात्माची आठवण म्हणून आकाशवाणी चौकात त्यांचा पुर्णाकृती आश्वारुढ पुतळा उभारण्यात यावा.

करिता सदरील जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा उभारणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री. भरत लकडे, श्री. प्रशांत देसरडा
अनुमोदक : श्री. संजय शिरसाठ, श्री. बाळासाहेब थोरात, अविनाश कुमावत

**संवाद :**

श्री. कोकाटे काशिनाथ : ऐनवेळचे कोणत्याही विषयीची प्रत आमच्याकडे दिलेलल नाही म्हणून आपण ऐनवेळचे कोणतेही विषय घेण्यात येऊ नये सिडकोतील दोन-तीन समस्याबाबत चर्चा करावयाची आहे. चर्चा घेण्यात यावी.

श्री. सुदाम सोनवणे : ऐनवेळचे कोणतेही विषय घेण्यात येऊ नये सिडकोतील दोन प्रश्नावर चर्चा करून निर्णय घ्यावयाचा आहे. चर्चेला सुरुवात करण्यास मान्यता द्यावी.

मा. महापौर : आकाशवाणी चौकात महात्मा बसवेश्वर यांचा तुळा बसविणेच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. सिडको संदर्भात विषय मंजूर केल्यानंतर एक तासाचा वेळ दिला जाईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आकाशवाणी चौकात थोर क्रांतिकारक महात्मा व विचारवंत जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर यांचा आश्वारूड पुतळा उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९३/४ :**

महाराष्ट्र शासनाने नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून करावयांच्या कामाकरिता मार्गदर्शक तत्वे लागू केल्यामुळे महानगरपालिकेतर्फे नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतून विविध वॉर्डामध्ये गल्ल्या तसेच कॉलनीचे नांव दर्शविणारे नामफलक लावण्याचे कामास मंजुरी दिली जात नाही. नामफलक लावल्यामुळ नागरिकांना सोयीचे होत होते. तसेच सदरील काम हे विकासाचे काम असून अशा प्रकारे कॉलन्यांची नावे दर्शविणारे फलक स्वेच्छानिधीतून लावण्याकरिता सर्व साधारण सभेच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सुचक - श्री. प्रशांत देसरडा
अनुमोदक - श्री. संजय शिरसाठ, श्री. दलबिरसिंग जबिंदा,
श्री. आनंद तांदुळवाडीकर, श्री. जयवंत ओक

**संवाद :**

श्री. कोकाटे काशिनाथ : स्वेच्दानिधी नियमावलीत याचा समावेश करण्यात यावा.

मा. महापौर : वाहन चालक व संगणक प्रशिक्षणासाठी परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव आपण यापूर्वी मंजूर केलेला आहे. स्वेच्छा निधी नियमावलीत याचा समावेश करावा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स्वेच्छा निधीमधून विविध प्रभागातून रस्त्यांचे व वसाहतींचे नामफलक स्वेच्छा निधीमधून लावण्यास व या कामाचा स्वेच्छा निधी निमावलीमध्ये समावेश करण्याची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९४/५ :**

औरंगाबाद जिल्हा क्रिकेट असोसिएशन ने अशी विनंती केली आहे की, आमच्या संघटनेला गरवारे संकुलातील क्रिकेटचे मैदान देखरेखी खाली मैदानातील सराव खेळपट्ट्या आणि सामने खेळण्यासाठी आम्हाला संधी द्यावी. जेणे करून या विभागातील

उदयोन्मुख खेळाडू याचा दर्जा सुधारण्यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येईल. आणि राज्य पातळीवर, राष्ट्रीय पातळीवर, सामाने घेण्यास येवून आपल्या भागातील विविध वयोगटातील खेळाडूंना भाग घेण्यासाठी अशा प्रकारचे सामने औरंगाबाद जिल्हा क्रिकेट संघटनेतर्फे आयोजित केले जातील. आमची संघटना महानगरपालिकेचा जास्त स्टॉपवर होणारा खर्च कमी करेल. आणि उत्तम दर्जाच्या खेळपट्ट्या खेळाडूसाठी आमच्या देखरेखी खाली उपलब्ध करून देण्यात येतील. ज्या ज्या वेळी मोठे सामने घेण्यत येतील. त्यातील होणाऱ्या उत्पन्नाचा जास्तीत जास्त नफा आपल्याकडे जमा करण्यात येईल, जेणे करून मानपाच्या उत्पन्नात साधनात भर पडेल व व्यवस्थापनेवर होणारा अधिक खर्चाचा बोजा कमी होईल.

करिता सदरील गरवारे क्रीडा संकुल जिल्हा क्रिकेट असोसिएशनला भाडेतत्वावर देण्याच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. प्रशांत देसरडा
अनुमोदक - श्री. किशोर तुलशीबागवाले, श्री. संजय शिरसाठ,
श्री. जयवंत ओक, श्री. राधाकृष्ण गायकवाड,
श्री. भरत लकडे, श्री. आनंद तांदुळवाडीकर.

**संवाद :**

श्री. सोनवणे सुदाम : ऐनवेळी विषय घेण्यची पध्दत बंद करावी. महत्वाच्या विषयावर चर्चा करायची आहे. ऐनवेळी होणाऱ्या विषयाबाबत आमचा विरोध नोंदवावा. रद्द करावे. उर्वरित ऐनवेळचे विषय पुढील सर्वसाधारण सभेत घेण्यात यावे.

श्री. देसरडा प्रशांत : गरवारे स्टेडियम आपण भाडे पट्ट्याने देणर आहोत कायमसाठी देत नाही. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल १२ कर्मचारी कामास लावून चांगल्या प्रकारे स्वच्छता होऊ शकली नाही. संबंधित विभागाकडे २ कर्मचारी देऊन देखरेख ठेवतील. स्टेडियम देऊ नका.

श्री. किशोर तुलशीबागवाले :भाडे पट्ट्यावर न देता ११ महिन्याच्या करार करून त्याप्रमाणे कार्यवाही करावी. सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती वाईट आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. देण्यास हरकत नसावी.

श्री. कोकाटे काशिनाथ : औरंगाबाद जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांनी एन-२ येथील स्टेडियम देखरेखीसाठी घेतलेले आहे. तेथे त्यांनी मोठमोठे खेळाडू तयार करावेत. गरवारे स्टेडियम दिल्यानंतर आपल्याकडे जे लहान खेळ होतात व इतर खेळासाठी स्टेडियम राहणार नाही. या स्टेडियमची व्यवस्था राहिल याची गॅरंटी नाही म्हणून स्टेडियम देण्यात येऊ नये. मॅचेससाठी एन-२ चे स्टेडियम ताब्यात घेतले तीच स्थित या स्टेडियमची होईल.

श्री. प्रशांत देसरडा : महानगरपालिका आणि जिल्हा क्रिकेट असोसिएश्न व महानगरपालिका आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशन व महानगरपालिका या स्टेडियमची देखरेख करू शकतात. दोघांचे नाहरकत घेतल्या शिवाय इतरांना देता येणार नाही. प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

श्री. सोनवणे सुदाम : एन-२ हे मैदान दिले आहे. सामान्य जनतेला फार त्रास होते. जिल्हा क्रिकेट असोसिएशन बरोबर केलेला करार रद्द करावा.

श्री. जयवंत ओक : चांगले खेळाडू तयार होत असतील तर करार पध्दतीने देण्यास हरकत नसावी ११ महिन्यासाठी करारनामा करून कार्यवाही करावी.

श्री. कोकाटे काशिनाथ :एन-२ ला जशी परिस्थिती होते तशीच अडचण येथेही होईल. कुणाला भाड पट्ट्याने देण्याची गरज पडल्यास संबंधित संघटना किंवा संस्था कुणाकडे अर्ज करणार हा प्रश्न निर्माण होईल. आम्ही आमची भूमिका मांडली आहे. आपण योग्य तो निणर्य घ्यावा.

श्री. दानवे अंबादास : महानगरपालिकेला उत्पन्न मिळेल तो भाग वेगळा आहे. परंतु जिल्हा क्रिकेट असोसिएशनला जे काही सामने भरावयाचे ते सर्व अधिकार महानगरपालिकेसच असावेत. जे सामने भरतील त्याचा उत्पन्नाचा वाटा महानगरपालिकेकडे ते जमा तरील असे प्रस्तावात आहे. हे सर्व अधिकार आपण त्यांना देणार का. निवास व्यवस्था, इतर वास्तुचा व इंडोअर क्रिडांगणाचा गैर वापर होईल मालकी व व्यवस्थापने महानगरपालिकेकउेच असावे जसे आता एन-२ चे झाले आहे. मैदान मिळणे अवघड आहे. पुणे महानगरपालिकेने महानगरपालिकेच्य्ज्ञ मालकीचे स्टेडियम ज्या पध्दतीने दिले आहे त्याच धरतीवर आपण कार्यवाही करावी. योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री. प्रशांत देसरडा : महानगरपालिकेने नियम व अटी निश्चित करावया त्यानुसार कार्यवाही करावी.

मा. महापौर : गरवारे महानगरपालिका क्रिडा संकुलातील बॅडमिंटन, टेबलटेनिस व इतर क्रिडांगणे व वास्तु सोडून फक्त क्रिकेट मैदान सरावासाठी व देखभाल दुरुस्तीसाठी देण्यास आणि या क्रिडांगणाच्या संदर्भात अंतिम निर्णय महानगरपालिकेचा राहिल महानगरपालिकेने अटी व शर्ती निश्चित करून फक्त ११ महिन्यासाठी वरील अटींसह देण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका गरवारे क्रीडा संकुलातील इतर क्रिडांगणे व वास्तु सोडून फक्त क्रिकेटचे मैदान सरावासाठी व त्याची देखभाल करण्यासाठी अटी व शर्ती निश्चित करून ११ महिन्याची औरंगाबाद जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे या क्रीडा संकुलाचे क्रिकेट मैदानासह संपूर्ण व्यवस्थापन व अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार औरंगाबाद महानगरपालिकेकडेच राहिल असे ठरले त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

सौ. बबिता कागडा : माझ्या वॉर्डात महानगरपालिकेची शाळा असून ४ वर्ग आहे. ६ वी पर्यंत वर्ग चालतात, शिक्षक २ कार्यरत आहे. जास्तीचे शिक्षक देण्यात यावे. जेणे करून मुलांचे नुकसान होणार नाही.

मा. महापौर : स. सदस्या यांनी शिक्षक देण्याबाबत जो प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात संबंधित अधिकारी यांनी त्याचे वॉर्डात जाऊन स. सदस्या यांची प्रत्यक्ष भेट घेऊन शाळेत पाहणी करून ताबडतोब शिक्षक देण्याची कार्यवाही करावी.

श्री. सुदाम सोनवेण : सिडको-हडको भागात दोन महिन्यापासून पाण्याचा प्रश्न गंभीर स्वरुपाचा झालेला असून वेळेवर पाणी येत नाही. बऱ्याच वेळा दोन-तीन दिवसाआड पाणी येते. दोन विषयांवर चर्चा करायची असून सुरवातीला पाणी प्रश्न या विषयावर चर्चा करण्यात येत आहे.

(याच वेळी स. सदस्य श्री. नंदकुमार फुलारी हे पत्रकार कक्षात जाऊन सभागृहात उडी मारण्याचा प्रयत्न करतात. एक सुरक्षा जवान त्यांना मागे ओढण्याचा प्रयत्न करतात.)

मा. महापौर : महत्वाच्या विषयावर चर्चा चालू आहे. स. सदस्य श्री. फुलारी यांनी सभागृहात त्यांचे जागेवर येऊन बसावे. सभागृहात चर्चा करून आपला प्रश्न सोडविला जाईल.

श्री. सुदाम सोनवणे : पाणी प्रश्न हा महत्वाची समस्या आहे. सिडको हडको भागात पाणी येत नाही नगरसवेक यांना जनतेला तोंड द्यावे लागते. म्हणून स. सदस्य यांनी त्यांची भावना वयक्त केलेली आहे. ते गॅलरीतून उडी मारण्याचा प्रयत करीत आहे. तशीच भावना सिडको-हडको भागातील इतर नगरसेवकांची सुध्दा झालेली आहे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

(याचवेळी स. सदस्य श्री. नंदकुमार फुलारी हे सभागृहात येऊन आसनग्रहन करतात) सिडको हडको भागात दोन-तीन दिवसाआड काही वेळा पाणी येते. जे पाणी सोडण्यात येते जास्तीचे दाबाने येत नाही. त्यामुळे जेवढे पाणी मिळावयास पाहिजे तेवढे मिळत नाही. या भागात पुरेपुर पाणी देण्यासाठी प्रशासनाने काय उपाय-योनजा आखलेल्या आहेत त्याची माहिती देण्यात यावी. दोन महिन्यामध्ये पाणीपुरवठा कमी झालेला असून कर्मचारी वर्ग सुध्दा कमी आहे. असे समजते तसेच या भागासाठी जवळपास ३० एमएलडी पाणी पुरवठा देणे आवश्यक आहे. मागील एका बैठकीत शहरातील पाणी कमी करून सिडको-हडकोसाठी भरपूर पाणी दिले जाईल असे संबंधित अधिकारी यांनी सांगितलेली होते. अद्याप सिडको भागात जास्त पाणी देण्याबाबतची उपाय योजना झालेली नाही. सविस्तर माहिती देण्यात यावी. सिडको-हडको भागासाठी ३० एम एलडी पाणी पुरवठा करावा तसेच ज्या दिवशी या भागात पाणी दिले त्याच दिवशीची बिल आकारून पाणीपट्टी वसूल करावी अशी आमची मागणी आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : सिडको-हडको भागात वेळेवर व जास्तीत जास्त पाणी मिळण्याच्या दृष्टीने एप्रिल महिन्यामध्ये त्यावेळी ते दिवस उन्हाळ्याचे होते. बऱ्याच नागरिकांनी झोन कार्यालय तसेच मुख्य कार्यालयामध्ये मोर्चे, आंदोलन करून मागणी केलेली आहे. त्यानुसार तत्कालीन मा. महापौर तसेच मा. आयुक्त यांनी सर्व वॉर्डात पाहणी करून या भागासाठी एक उप-कार्यकारी अभियंता देण्याचे मान्य करून सर्व पुरेसा कर्मचारी वर्ग देण्याचे मान्य केलेले होते. या भागात ३० एमएलडी पाणी पुरवठा करण्यात येईल. कर्मचारी वर्ग पुरेसा देण्यात येईल अशा प्रकारच्या बातम्या वृत्तपत्रात सुध्दा झळकलेल्या होत्या टँकर देण्यात येतील तसेच वाहन चालक सुध्दा देण्यात येतील अशी प्रशासनामार्फत माहिती देण्यात आलेली आहे. एप्रिल पासून आज पर्यंत सिडको-हडकोसाठी किती एमएलडी पाणी पुरवठा झालेला आहे याचा अहवाल मागविला तर सर्वकाही परिस्थिती समजून येईल. जे ३० एमएलडी पाणी पुरवठा करावयास पाहिजे होता तो आतापर्यंत कधी करण्यात आलेला नाही. सिडको-हडको भागात प्रत्येक सेक्टरमध्ये दोन दिवसाआड एकदा पाणी देण्यात येते. आणि जे पाणी पुरवठा होतो तो सुध्दा २० ते २५ मिनिटे होतो. शहराला पाणी पुरवठा होणार हा ९५ ते १०० एमएलडी होत असेल तर पाणी कुठे जाते हा प्रश्न निर्माण होतो. या संदर्भात सभागृहात बऱ्याच

वेळा प्रश्न उपस्थित झालेले आहे. अधिकारी उडवा उडवीची उत्तर देतात. नियमाने जे पाणी लागते ते येत असेल तर कर्मचारी / अधिकारी योग्य पध्दतीने काम करीत नसेल तर अशा अधिकारी / कर्मचारी यांचेवर निश्चितपणे प्रशासनाने कार्यवाही केली पाहिजे. सभागृहाने तसा निर्णय घेतला पाहिजे. गेल्या चार वर्षामध्ये गोरगरीब व मध्यमगर्वीय नागरीकांकडून आपण ७००/- रु. पाणीपट्टी घेत होतो आता १२००/- रुपये करण्यात आलेली आहे. जर शहराला ११५ एमएलडी पाणी पुरवठा होत असेल व त्यातून काही पाणी येतांना लिकिजेस होत असेल तर ७ ते ८ एमएलडी पाणी वाया जात असेल नक्षत्रवाडी व इतर गावांना पाणी बंद केल्यास व शहरासाठी १०० एमएलडी पाणी येऊ शकते ते आले तरच सिडको-हडकोसाठी ३० एमएलडी पाणी मिळू शकेल परंतु येणारे पाणी हे ९५ ते १०० एमएलडी येत असेल व त्यातून पाणी लिकिजेस होत असेल तर सिडको हडको भागासाठी ३० एमएलडी पाणी दिलेले नाही असा अर्थ निघतो. तसेच काही भागात हर्सूल तलावातून पाणी पुरवठा होत असतांना सुध्दा या भागात दोन ते तीन दिवसाआड पाणी येते याचे कारण काय? म्हणून पाणी पुरवठा विभागामध्ये संपूर्ण शहरामध्ये किती कर्मचारी कोणत्या भागात कार्यरत आहे यांचा अहवाल मागविण्यात यावा. सध्या कार्यकारी अभियंता पदाचा चार्ज इतर अधिकाऱ्यांकडे दिलेला आहे. मा. आयुक्त यांनी संबंधित अधिकारी यांचेकडून कोणकोणत्या भागात किती वेळा पाण्याचा खंड दिला त्याची सर्व माहिती घेऊन व सिडको-हडको या भागात जास्तीत जास्त किमान ३० एमएलडी पाणी पुरवठा कसा करता येईल याबाबतची उपाय योजना करण्याच्या दृष्टीने सविस्तर अहवाल मा. आयुक्त यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून मागवावा व सभागृहाच्या माहितीस्व देण्यात यावा.

श्री. फुलारी नंदकुमार : सिडको-हडको भागातील पाण्याचा प्रश्न गंभीर झालेला आहे. या भागात वर्षातील ३६५ दिवसांपैकी १८० दिवसच पाणी पुरवठा केला जातो. येथील नागरिकांचे असे म्हणणे आहे की, १८० दिवसाचे बील आकारण्यात यावे तसेच पुढील काळासाठी शहराला व सिडको-हडको भागात पाणी पुरवठा पुरेपुर होण्याच्या दृष्टीने जायकवाडी जलाशयामध्ये किती पाणी पुरवठा आहे त्याची माहिती देण्यात यावी.

सौ. विमलबाई राजपुत : माझ्या वॉर्डात एन-६ मध्ये आठवाड्यातून दोन वेळेस पाणी येते. १५ ते २० मिनिटे पाणी येते. वॉर्डातील जनतेला पाण्याच्या बाबतीत त्याचे तक्रारीला तोंड द्यावे लागते. भरपूर पाणी दिले जात नाही. म्हणून आमच्या घराकडे मोर्चे घेऊन येतात. संबंधित अधिकारी यांचेकडे दोन-तीन वेळा मी नागरिकांसह भेट घेतली तरी सुध्दा काहीही कार्यवाही केलेली नाही. कमीत कमी जनतेला दररोज ३० ते ४५ मिनिटे तरी पाणी दिले गेले पाहिजे तशी कार्यवाही करण्यात यावी.

सौ. दाणे चंद्रभागाबाई : वॉर्ड क्र. ६४ माझ्या वॉर्डमध्ये १५ महिन्यापासून पाण्याची गंभीर समस्या निर्माण झालेली असून संबंधित विभागाचे अधिकारी यांचेकडे पत्र देऊन कार्यवाही करण्याचे कळविले आहे. वॉर्डात बऱ्याच ठिकाणी पाणी आल्यानंतर मोठमोठ्या इमारत मालक विद्युत मोटारीचे पाणी इमारतीवर घेतात त्यामुळे गोरगरीब नागरिकांना कमी दाबाने तसेच पुरेपुर पाणी मिळत

नाही याबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी. नसता आम्ही महिला सदस्या महानगरपालिकेवर मोर्चा काढून निदर्शने करण्यात येतील.

श्री. जयवंत ओक : शहरासाठी तसेच सिडको-हडकोसाठी लागणाऱ्या पाणी प्रश्नावर मी चर्चा करणार आहे. १००% पाणीपट्टी भरणार लोकांना पाणी दिले जात नाही. सिडको हडको मध्ये पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. आताच काही स. सदस्यांनी आपआपल्या भावना व्यक्त केलेल्या आहे. पाण्याची समस्या प्राधान्याने सोडवावी. जायकवाडी जलाशयातून पुरेसा पाणीसाठी आहे काय? आणखी दोन महिन्यानंतर शहरातील जनतेचे पाण्यासाठी काय हाल होतील याचा विचार प्रशासनाने केलेला आहे काय? जनतेकडून पाणीपट्टी वसूल केली जाते यानंतर सर्वच शहरातील जनतेला पुरेपुर पाणी पुरवठा होणार आहे का? तशी काही उपाय योजना प्रशासनाने आखलेली आहे का? हा मुद्दा महत्वाचा आहे. त्याचा खुलासा करावा तसेच जनतेला सध्या वेळेवर पाणी पुरवठा होण्यासाठी योग्य ती उपाययोजना राबविण्यात यावी.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वॉर्डात विष्णुनगर, अरिहंतनगर मध्ये जवळपास २० ते २५ वर्षापासून रात्रीच्या वेळी २-३ वाजता पाणी येते. केंव्हा केंव्हा दिवस पाणी सोडण्यात येते. परंतु ज्यावेळी वॉर्डातील बरेच लोक कामावर जातात त्यामुळे २ ते ३ हंडे पाणी एका घराला मिळते अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. नागरिकांना पाणी मिळाले नाही तर पाणीपट्टी कोणीही देणर नाही याची प्रशासनाने नोंद घ्यावी. जनतेला पाणी घ्यावे सर्व जनता पाणीपट्टी भरतील. माझ्या वॉर्डात एक मोठी विहिरी असून ती साफसफाईसाठी मागील वर्षी मी पत्र दिलेले आहे अद्याप कार्यवाही केलेली नाही. विहिरीची साफसफाई केल्यास वॉर्डातील सर्व जनतेला टँकरद्वारे पाणी पुरवठा या विहिरीतून होऊ शकतो याबाबतीत दखल घेऊन प्रशासनाने कार्यवाही करावी तसे आदेश मा. महापौर यांनी द्यावेत.

श्री. गायकवाड राधाकृष्ण : पाणी प्रश्नावर चर्चा चालू असून सिडको-हडको भागात शहरापेक्षा निश्चितच पाणी कमी दिले जाते. फार गंभीर प्रश्न निर्माण झलेला आहे. तसेच शहरामध्ये सुध्दा पाणी वाटपाचे नियोजन नाही असे दिसून येते. वॉर्ड क्र.५८ जयभवानीनगर या भागात रात्री बे-रात्री केंव्हावी पाणी दिले जाते. या संदर्भात मी पत्र दिलेले आहे. स्मरण पत्र सुध्दा दिलेले आहे. या भागातच दत्तनगर येथे चार वाजेला पाणी दिले जात होते त्यात बदल करण्यात आलेला आहे. तसेच पाच वर्षापूर्वी या भागात सकाळी ८.३% वाजता पाणी दिले जात होते. आता दुपारी १२, १, ३ वाजता पाणी सोडले जाते. या अगोदर जे नगरसेवक होते तेंव्हा वेळेवर आम्हाला पाणी मिळत असे असे नागरिकांचे म्हणणे आहे. तरी शहरात जनतेला वेळेवर पाणी देण्यासाठी संबंधीत अधिकाऱ्यांची आपण बैठक बोलवावी त्या बैठकीत शहरातील जनतेला वेळेवर पाणी कसे देता येईल याबाबत विचार विनिमय करण्यात यावा.

श्री. तकीहसन खॉन : सभागृहात कोरम नाही.

मा. महापौर : सभागृहात कोरम नाही. कोरम नसल्यास सभा कामकाज चालवू शकते का, तसा खुलासा सचिव यांनी करावा.

नगरसचिव : एखाद्या स. सभासदांनी गणपूर्वी अभावी दोन वेळेस सभा तहकूब केल्यानंतर तिसऱ्या वेळेस गणपूर्वी नसले तरी सभेचे कामकाज चालवता येते.

मा. महापौर : आजची सभा ०५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येत आहे. [वेळ दुपारी ३.४५ वाजता]

(दुपारी ३.४५ वाजता तहकूब करण्यात आलेली सभा पुन्हा ३.५५ वाजत सुरू करण्यात आली.)

श्री. जगताप मोतीलाल : मुकूंदवाडी प्रभागात सन १९८३-८४ ला जनतेला पाणी देण्यासाठी २.१/२ लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधण्यात आलेले होते. त्यावेळेस या भागात ७ ते ८ हजार लोकसंख्या होती. त्यावेळेस ३० मिनिटे पाणी त्या भागातील जनतेला मिळत असे आता या भागात १५ ते २० हजार लोकसंख्या झालेली आहे. म्हणून या भागात १० लक्ष लिटर क्षमतेचे जलकुंभ बांधण्यात यावे अशी मागणी करण्यात येत आहे.

श्री. सुनिल वडागळे : पाण्याच्या विषयावर चर्चा चालू आहे. त्यानुसाij माझ्या वॉर्डातील प्रश्न उपस्थित करतो की, माझ्या वॉर्डात बऱ्याच भागात पाणी येत नाही. वॉर्डात पूर्वीच्या जुन्या कमी व्यासाच्या पाण्याच्या पाईप लाईन काढून टाकण्या व लोकसंख्येनुसार योग्य त्या व्यासाच्या पाईपलाईन टाकाव्या म्हणून मी संबंधित अधिकारी यांचेकडे वेळोवळी पत्र दिलेले आहे. परंतु काहीही कार्यवाही झालेली नाही. माझ्या वॉर्डात दोन ठिकाणी महानगरपालिकेच्या हद्दित असलेल्या जागेत विहिर असून सध्या नंदनवन कॉलनीच्या बाजूला एक गंगा बावडी म्हणून एक विहिरी आहे. पूर्वीचे लोक त्या विहिरीला फार मान देत असे. तेथे पूजा-पाठ चालत असे त्या विहिरीची सध्या साफसफाई नाही. जंतु झालेले आहे. त्या विहिरीत माती पडलेली आहे. तसेच आजुबाजूला पडलेली माती लोक घर कामासाठी घेऊन जात आहे. बाजूला खड्डे पडत आहे. म्हणून त्या विहिरीची साफसफाई करून संरक्षित भिंत बांधावी या विहिरीमध्ये आतापर्यंत ५ ते ६ लोकांचा बळी गेलेला आहे. दुसरी एक विहिर आहे. तेथे सुध्दा काही लोकांचा बळी गेलेला आहे. म्हणून माझी अशी मागणी आहे की, मी पत्र सुध्दा दिलेले आहे. या दोन्ही विहिरीची साफसफाई व्हावी व दोन्ही विहिरीचे पाणी मिळून नंदनवन कॉलनी, तसेच शांतीपुरा भागासाठी वापरता येईल. या दृष्टीने कार्यवाही करावी. म्हणजे या भागातील पाण्याचा प्रश्न सुटेल.

मा. महापौर : स. सदस्य श्री. सुनिल वडागळे यांनी प्रश्न उपस्थित केल्यानुसार संबंधित अधिकारी यांनी सदर भागात पाहणी करून ज्या अगोदरच्या जुन्या ३ इंची व्यासाच्या पाईपलाईन आहे त्या काढून तेथील लोकसंख्येच्या विचार करून कोणत्या व्यासाच्या पाईपलाईन टाकण्याची आवश्यकता आहे. याचा अभ्यास करून त्या भागातील पाणीप्रश्न सोडवण्याची कार्यवाही करावी. सभागृहात सिडकोच्या पाणी प्रश्नावर स. सदस्य श्री. सोनवणे, श्री. कोकाटे, श्री. फुलारी यांनी प्रश्न उपस्थित केलेले आहे. प्रशासन काय उपाययोजना करून मुबलक पाणी पुरवठा सिडको वासीयांना करू शकेल त्या संबंधी संबंधित अधिकारी यांनी सविस्तर खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) श्री. सी. एस. सोनी : सिडकोतील पाणी प्रश्ना संदर्भात जो. स. सदस्यांनी प्रश्न विचारले त्यानुसार माहिती देण्यांत येत आहे सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की जायकवाडी जलाशयामधून पाणी पुरवठा

होतो. त्यातून शहर, सिडको हडकोसाठी पाणी पुरवठा केला जातो. या जलाशयामधून सध्या शहराला ११० ते ११५ एमएलडी पाणी पुरवठा होतो. यापैकी सिडको-हडको भागात फक्त १८ ते २० एमएलडी पाणी दिले जाते. शहरची भौगोलिक परिस्थिती पाहता एक तर येणारे पाणी हे आपल्याला नक्षत्रवाडीचा संप आहे, त्याची उंची ही ६२८ मी. आणि सिडकोची ६११ मी. उंचीवर आहे. पाणी का कमी येते व त्यामध्ये काय घटना घडतात त्याची सविस्तर माहिती देण्यांत येत आहे. नक्षत्रवाडी येथील पंपाची उंची व सिडको भागची उंची यामध्ये १७ मिटरचा फरक येतो व जे पाणी येते ते १७ मीटर उंचीच्या ग्रॅव्हीटी नुसार पाणी येते. सिडकोगृह जाणरी पाईपलाईन ही १४ किलो मिटर आहे. प्रत्येक किला मीटरला १ मिटर हेड कमी होत जातो. म्हणजेच पाण्याचा दाब कमी होत जातो. कमी कमी होत फक्त ३ मीटरच्या दाबाने सिडकोला पाणी जाते. जी १४०० एमएम व्यासाची पाईप लाईन सिडकोसाठी आहे. ती सतत चालू असते. या व्यतिरिक्त क्रांतीचौक येथून ७०० एमएम व्यासाच्या पाईपलाईनद्वारे पंपींग करून सिडकोला पाणी दिले जाते. या दोन्ही पाईपलाईनद्वारे येणाऱ्या पाण्याची जुळवा जफव केली तर सिडको हडकोसाठी फक्त १८ ते २० एमएलडी पाणी दिले जाते. पाणी दिले जाते ते लोकसंख्येच्या मानाने कमी पडते. सिडको हडको भागाची लोकसंख्या तसेच जाधववाडी, सुरेवाडी, ब्रिजवाडी या परिसरातील लोकसंख्या किती याचा सर्व्हे केला असता या संपूर्ण भागाता अंदाजे २ लक्ष ८३ हजार लोक राहतात. या सर्व जनतेला पाणी द्यावयाचे झाल्यास ३० ते ३२ एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. आपण सद्या या भागासाठी ५०% पाणी देतो ही परिस्थिती जायकवाडी, नक्षत्रवाडी तसेच क्रांतीचौक, सिडको तील सर्व पंप चालू असतील त्या वेळेसची बाब आहे. फार कमी दिवस असे पंप चालतात. वर्षातील ३६५ दिवसापैकी बऱ्याच दिवस सर्वच पंप सुरळीत चालू असतात. कारण बऱ्याच वेळेस देखभाल दुरुस्तीची कामे करावी लागतात. त्यामुळे सिडको-हडको भागात जाणारे पाणी हे निश्चितच कमी जाते हे मी सुध्दा मान्य करतो. सिडको-हडको मधील ज्या पाण्याच्या टाक्या आहेत तेथे येणारे पाणी यामुळे पाण्याच्या टाकीचा संपूर्ण भाग हा पाण्याने भरला जात नाही. (टाक्याची लेवल पूर्ण होत नाही.) हे कमी मिळतो. येणारे पाणी हे कमी दाबाने येते व जो पुरवठा व्हावयास पाहिजे तो होत नाही. काही भागात पाणीच मिळत नाही याचे कारण असे की जो भाग उंचावर आहे, काही ठिकाणी कमी दाबाने किंवा पाणीच जात नसेल. यावर मात करावयाची असेल तर ती जी ६७ कोटीची पाण्याची योजना आहे, ती झाल्याशिवाय सिडको हडकोला परीपूर्ण पाणी पुरवठा करू शकत नाही. या योजनेचे १० ते १०.५० कोटीचे काम झालेले आहे. आता आर्थिक बाबींचा प्रश्न निर्माण झाला. आयुर्विमा महामंडळ तसेच हडकोकडून कर्ज घेण्याची कार्यवाही आपण करीत आहोत. या बाबतची सर्व कागदपत्रे आपण सिडकोकडे पाठविलेली असून अद्याप कर्ज मंजूर झालेले नाही. तसेच इंशरन्स कडून सुध्दा १२ कोटीचे कर्जाची मागणी केली आहे. त्यापैकी फक्त २ कोटी देणार आहे. ही योजना पूर्ण होणे महत्वाचे आहे ही योजना पूर्ण झाल्यानंतर सिडको-हडको भागातील नागरिकांना पाणी पुरवझा सुरळीत होऊ शकेल. तसेच दुसरा असा प्रश्न सदस्यांनी विचारलेला आहे की, आज

जायकवाडी जलाशयाची काय परिस्थित आहे. या वर्षी जास्त पाऊस आपल्या भागात पडलेला नसल्याने धरणाची पातळी कमी असून फक्त १४% पाणी साठा आहे. या जलाशयामधून उन्हाळ्यामध्ये सुध्दा पाणी घेण्यासाठी काही व्यत्यय येणार नाही. सध्या जेवढा पाण्याचा उपसा होतो त्यापेक्षा कमी दाबाने उन्हाळ्यामध्ये ५ ते ७% कमी पाणी उपासा होईल. पाण्याची पातळी खाली गेल्यास उपसा कमी होतो. पंपाचा हेड वाढतो. सिडकोमध्ये बऱ्याच भागात हर्सूल तलावातून पाणी दिले जाते. परंतु मागील काळात या तलावात सुध्दा ३ ते ४ फुटच पाणी साठा होता त्यामुळे जायकवाडी येथून आलेल्या पाण्यातून काही भागास पाणी पुरवठा करावा लागला त्यामुळे इतर भागात कमी प्रमाणात पाणी मिळाले असेल. सिडको व शहरातील ज्या ज्या विहिरी आहे त्या विहिरीचे देखभालदुरुस्ती करून पिण्यासाठी तसेच घर वापरासाठी कोणत्या विहिरीचे पाणी वापरू शकतो याचा सर्व्हे सुध्दा करण्यात आलेला आहे. एकूण शहरात १५८ विहिरी आहे. याचा सविस्तर अभ्यास करून ज्या विहिरीचे पाणी वापरण्यास योग्य आहे. त्या बाबतचा सुध्दा निर्णय येत्या १५ ते २० दिवसामध्ये घेण्यात येईल. ज्या भागातील सर्व्हे करायची विहिरी सुटलेली असेल त्याबाबत स. सदस्य यांनी या विभागाच्या निदर्शनास आणून द्यावे. पुढील कार्यवाहीसाठी त्या विहिरीचा सर्व्हे केला जाईल. या विहिरी व्यतिरिक्त आपल्याकडे सिडको व महानगरपालिका हद्दित एकूण ४५२ हात पंप आहेत. त्यापैकी कही पंपाची पाण्याची पातळी खोलवर गेलेली असून काही हात पंपाना पाणी आहे ते दुरुस्तीस आहे. ते दुरुस्त करून जे १२ महिने हातपंप चालू शकतील यांचा सर्व्हे करून कार्यवाही करण्यांत येईल. त्यासाठी जे स्पेअर पार्ट (साहित्य) लागेल त्यांचे सुध्दा टेंडर मागवून कार्यवाही करीत आहोत. काही भागात पाणी कमी आहे. म्हणून स. सदस्य यांनी त्यांचे वॉर्डात स्वेच्छा निधीतून हातपंप होण्यासाठी पत्र दिलेले आहे. त्यानुसार ४८ नवीन हातपंप होण्यासाठी सुध्दा टेंडर काढण्याची कार्यवाही केलेली आहे. शहराला सिडको भागासाठी व्यवस्थित पाणी पुरवठा होण्याच्या दृष्टीने प्रशासनामार्फत जी उपाय योजना करण्यांत आलेली आहे. त्याबद्दलची परिस्थिती मी आपल्या समोर सादर केलेली आहे. जेणे करून आपण शहराच्या रहिवाश्यांना पिण्यासाठी पाणी देऊ शकू. भविष्यातील संभाव्य पाणी टंचाई व त्यावरील उपाययोजना या संदर्भात कृपया स. सदस्यांनी उपाय सुचवावे अशी विनंती आहे.

श्री. सुदाम सोनवणे : स. अधिकारी श्री. सोनी साहेब यांनी जो खुलासा केला तो तंतोतंत खरा असून या महानगरपालिकेमध्ये आम्हाला येऊन ७ वर्षे झाली. बऱ्याचच वेळेस सभागृहात सिडको-हडको भागातील नागरिकांना वेळेवर व भरपूर पाणी देण्याचे संदर्भात चर्चा झाली परंतु आतापर्यंत कोणत्याच अधिकाऱ्यांची सिडको-हडको भागासाठी देण्यात येणार पाणी हे १८ त २० एमएलडी दिले जाते. असा खुलासा केलेला नाही. जो खुलासा अधिकारी यांनी केला तो खरोखर असून त्यांचे सभागृहाने अभिनंदन करावयास पाहिजे. सध्या पाणी पुरवठ्याची जी उपाया योजना राबविल्या जात आहे याच परिस्थितीत सिडको-हडको भागातील नागरिकांना यापेक्षा आणखी वाढीव पाणी पुरवठा करू शकतो का? याचा खुलासा करण्यांत यावा. पाणी पुरवठ्यात खंड पडला तर शहरात खंड देऊन सिडकोला पाणी पुरवठा करता येईल का.

प्र. कार्यकारी अभियंता (पा.पु.) श्री. सी. एस. सोनी :

यापूर्वीच मी खुलासा केला की, जायकवाडी जलाशयातून आपण १००, ११० किंवा त्यापेक्षांही जास्त एमएलडी पाणी घेण्यात येते. तेच पाणी संपूर्ण शहरामध्ये तसेच सिडको हडको मध्ये वाटप करतो. पाईपलाईनच हेड फक्त ३ मीटर असल्यामुळे १५ तास पंप चालवून सुध्दा तेवढेच पाणी मिळू शकेल. शहराला पाणी पुरवठ्यामध्ये खंड देऊन सिडको भागात पाणी देणे फायदेशीर होणार नाही. सिडकोतील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी सिडको हडको भागातील सर्व नगरसेवकांनी एमत्र येऊन प्रशासनास साथ देऊन जी योजना राबवायची त्याबाबत सहकार्य करावे. ही योजना पूर्णपणे राबविल्या गेल्यास या भागात आवश्यक लागेल तेवढे पाणी देता येईल. कारण आजची परिस्थिती अशी आहे की, मी सुध्दा काही ठिकाणी पाहणी केलेली आहे. काही वसाहती उंचावर असल्याने पाणीच मिळत नाही. त्याचे कारण असे की, जो टाकीमध्ये पाणीसाठा होतो, तो जास्तीत जास्त होत नाही. पाण्याची पातळी जास्त येत नाही म्हणून तेवढा दाबाने पाणी उंचावरील घरांना मिळत नाही.

श्री. सुदाम सोनवणे : सिडकोतील सर्व नगरसेवकांचे सहकार्य राहील. परंतु योजना पूर्ण झाल्यानंतर सुध्दा एक दिवसाआड का होईल पाणी मिळेल याची खात्री होत नाही. कारण आजची परिस्थिती अशी आहे की, आयुर्विमा महामंडळ कर्ज मंजूर करित नाही. तसेच एलआयसी कडून सुध्दा १२ कोटीची मागणी केली २ कोटीच देण्यास तयार आहे. माझे असे मत आहे, या योजनेसाठी महानगरपालिका फंडातून तसेच इतर दोन तीन मंडळाकडून तसेच एलआयसीचे असे मिळून ही योजना तात्पुरत्या स्वरुपात चालू करावी व सिडको हडकोतील जनतेचा पाणी प्रश्न सोडवावा.

प्र. कार्यकारी अभियंता (पा.पु.) श्री. सोनी सी. एस. :

या योजनेबाबत मी थोडासा अभ्यास केलेला असून सिडको पर्यंत पाणी आणण्यासाठी या योजनेचे कामास आणखी १८ ते २० कोटी रुपये लागणार आहे. या अगोदर आपण ११ कोटी रुपये खर्च केलेले आहे. या योजनेचे पाणी कुठेही टप्पा न पडता डायरेक्ट सिडको भागात येईल त्यामुळे तेथील पाणी प्रश्न सुटेल व ही योजना राबविण्यासाठी ३ वर्षाचा कालावधी लागेल. अर्ज तात्काळ मंजूर झाल्यास २ वर्षामध्ये सुध्दा ही योजना पूर्ण करता येईल.

श्री. कोकाटे काशिनाथ : सिडको-हडको च्या पाणी टंचाई बाबत संबंधित अधिकारी यांनी योग्य खुलासा केला म्हणून त्यांची प्रशंसा करण्यात आली. खरोखरच जी सत्य परिस्थिती ती त्यांनी बोलून दाखविली. ६७ कोटीची हि योजना राबवून आणखी २० कोटी रुपये खर्च केल्यास ही योजना दिड ते २ वर्षात पूर्ण करता येईल असे संबंधित अधिकारी यांनी खुलासा केलेला आहे. शासनाकडून मिळणारे अनुदान तसेच इतर विरोध अनुदान शासनाकडून मागणी करून कार्यवाही करावी तसेच जे हडको कडून कर्ज मिळण्याची कार्यवाही होत आहे. ते मंजूर होत नाही म्हणून शासनाची मदत मिंवा या प्रशासनातर्फे गॅरंटी वगैरे देण्याची गरज आहे काय? ही योजना कायम स्वरुपी करण्यासाठी त्या दृष्टीने आपण सर्वांनी एकत्र येऊन पुढील कार्यवाही करण्याची अत्यंत गरज आहे. यापूर्वी जे अधिकारी होते त्यांनी

असा खुलासा केलेला होता की, सिडको-हडको भागासाठी २५ ते २७ एमएलडी पाणी दिले जाते ते सत्य आहे काय त्याचा सुध्दा खुलासा करावा. तसेच या भागात जास्तीत जास्त पाणीपुरवठा सुरळीत कसा होईल यासाठी प्रयत्न करावे. एमआयडीसी भागातून सुध्दा पाणी घेऊ शकला असतो परंतु तशी परिस्थिती आज तेथील नाही. यापुढे निश्चितपणे येणारे पाण्याचे ऑडिट करणे नियोजन करणे हि काळाची गरज आहे. ६७ कोटीच्या योजनेसाठी आपण २० ते २५ कोटी रुपयाचा फंड कसा उभारू शकतो याबाबत प्रयत्न करावे. दोन तीन दिवसाच्या वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली की, शहरामध्ये बोल्ट पध्दतीने काही कामे करणार आहेत. पुण्यामध्ये रस्त्याची पाहणी केली आताच सांगितले गेले की, तेथे रस्त्याची पाहणी केलेली आहे. व बोल्ट पध्दतीने बरीच कामे झालेली आहे. त्याचप्रमाणे पाणी प्रश्न सोडविण्यासाठी वेगवेगळ्या संस्थाकडून आपण फंडस उभारू शकतो काय शासनाकडून काही मदत घेऊ शकतो का? हे पाहिले पाहिजे. या ठिकाणी महानगरपालिकेवर कर्ज किती म्हणून प्रश्न उपस्थित झालेला आहे. परंतु तो प्रश्न बाजूला ठेवून या शहरातील नागरिकांना जास्तीत जास्त पाणी कसे देता येईल हे पाहणे अगोदर महत्वाचे आहे. ही महानगरपालिकेची नैतिक जबाबदारी आहे. आताच दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ केलेली असून कर्जाचा विचार न करता निर्णय घेतला व पाणी प्रश्नाच्या संदर्भात महानगरपालिकेवर किती जकर्ज आहे. असे स. सदस्य यांनी सभागृहात बोलणे संयुक्तीक होणार नाही.

श्री. गायकवाड राधाकृष्ण : माझ्या वॉर्डातील पाण्याच्या वेळा बदलण्याबाबत खुलासा करावा.

प्र. कार्यकारी अभियंता (पा.पु.) : या संदर्भात मला अभ्यास करून कार्यवाही करणे शक्य असेल तर निश्चित पाण्याची वेळ बदलण्यात येईल.

श्री. जयवंत ओक : बऱ्याच स. सदस्यांनी सिडको-हडको भागासाठी पुरेपुर पाणी मिळावे म्हणून तळमळीने प्रश्न उपस्थित केले. अधिकारी यांनी खुलासा केला की, या योजनेसाठी ३ वर्षे लागतील. ही योजना राबवितांना सिडको हडको भागातील नागरिकांचा प्रश्न हा कायमचा सुटला पाहिजे. असा निर्धार आपण सर्वांनी करावा. ही योजना एक वर्षाच्या आता कशी कार्यान्वित करता येईल यासाठी प्रयत्न व्हावे. महाराष्ट्र शासन, केंद्र शासन तसेच महानगरपालिकेचा काही फंड या याजनेसाठी खर्च करून एक वर्षामध्ये कार्यवाही करावी. तसेच स. सदस्य यांनी दिलेल्या पत्रानुसार जे हातपंपाचे टेंडर काढण्यात आलेले आहे ती सुध्दा कार्यवाही आठ दिवसाच्या आत करण्यात यावी. तसेच ज्या ज्या वॉर्डात हातपंप दुरुस्तीत आहे व ज्या वॉर्डात विहिरी आहे त्यांना पाणी आहे ते पाणी पिण्यासाठी किंवा घर वापरासाठी आपण वापूर शकतो अशा सर्व विहिरीची साफसफाई करून पुढील कार्यवाही करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना द्यावेत.

श्री. अंबादास दानवे : सिडको-हडको भागात पाणी व्यवस्थितपणे देण्यासाठी ६७ कोटीची योजना राबवावी लागणार असून यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात आलेला असून राज्य शासनाने केंद्र शासनाकडे या बाबतीत मागणी केलेली असून केंद्र शासनाने. राज्य शासनाने केलेली मागणी मान्य केली असून या बाबतचे हमीपत्र मागविलेले आहे. राज्य शासनाने तेही देण्याचे मान्य केलेले आहे. केंद्र शासनाने आर्थिक मदत देण्याचे मान्य

केलेले आहे. मागे केंद्रांतील अर्थराज्यमंत्री श्री. बाळासाहेब विखे पाटील येथे आले होते. मा. खासदार चंद्रकांतजी खैरे यांनी त्यांची भेट घेतली या संदर्भात चर्चा सुध्दा केलेली आहे. आणि हुडको संख्या या बाबतीत सर्व आर्थिक मदत करण्यासाठी तयार आहे. महानगरपालिकेच्या वतीने पुढाकार घेतल्यास हा प्रश्न सोडण्यास काही अवघड जाणार नाही. अर्थराज्यमंत्री मा. श्री. विखेपाटील हे आपल्याच पक्षाचे असून आपण सर्वांनी एकत्र येऊन पुढाकार घेतल्यास लवकरच केंद्र शासनाकडून मदत होईल. यासाठी प्रशासनाने सुध्दा पुढाकर घेण्याची आवश्यकाता आहे. माझ्या माहितीप्रमाणे नोव्हेंबर मध्ये प्रशासनाकडे एक पत्र आले हाते त्याचे उत्तर गेल्या ऑगस्टमध्ये प्रशासनाने उत्तर दिले. पाठपुरावा आवश्यक आहे. आपण पुढकार घेतला तर निश्चितच अर्थसहाय्य मिळेल.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : बऱ्याच वेळेपासून पाणी प्रश्नावर चर्चा चालू आहे. वेगवेगळे प्रश्न स. सदस्यांनी उपस्थित केले. त्यानुसार संबंधित अधिकारी यांनी सविस्तर खुलासा केलेला आहे. सार्वत्रिक निवडणुका झाल्यानंतर माझ्या वॉर्डात एका दवाखान्याच्या जागेवर जलकुंभ बांधण्याचा प्रस्ताव पारीत झाला. सदर जागेचे वृष्टी व आपली बऱ्याच वेळेस चर्चा सुध्दा झालेली आहे. जागा देण्यास तयार आहे या ठिकाणी जलकुंभ उभारल्यास जवळपास २० हजार लोकांना नळ कनेक्शन मिळतील व या जलकुंभामुळे बाजूच्या ४ ते ५ वॉर्डातील नागरिकांना सुध्दा पाणी पुरवठा होऊ शकतो. या कामाबाबतची संचिका गहाळ झाल्याचे सांगण्यात येते. त्या संचिकेवर संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून पुढील कार्यवाही करण्याचे आदेश करावे.

मा. महापौर : सिडकोतील पाणीप्रश्नावर संबंधित अधिकारी यांनी सविस्तर योग्य असा खुलासा केलेला असून सिडको हडको भागातील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी सिडको हडकोतील सर्व स. सदस्य, तसेच सर्व पदाधिकारी व संबंधित पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी यांनी उद्या सकाळी ११.३० वाजता एन-७ झोन कार्यालयात उपस्थित राहावे तसेच स. सदस्य श्री. जयवंत ओक यांनीसुदा या सभेला उपस्थित राहावे मुख्य लेखा परिक्षक तसेच मुख्यलेखाधिकारी, उपआयुक्त यांनी सुध्दा सभेला उपस्थित राहावे. शहरामध्ये किती व सिडको हडको मध्ये किती व किती दिवसाआड किंवा दररोज पाणी पुरवढा देता येईल काय याबाबत उद्या सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

श्री. सुदाम सोनवणे : सिडको हडकोतील अतिक्रमणे पाडण्या बाबत न्यायालयाने जो आदेश दिला त्यानुसार कार्यवाही होत आहे. त्यामुळे तेथील जनता सध्या भयभीत झालेली आहे. जी अतिक्रमणे झाली त्यास तेथील नागरिक जबाबदार नाही असे माझे मत आहे. गेल्या विस वर्षापासून या भागात होणाऱ्या बांधकामांकडे सिडकोच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष दिल्यामुळे वाव मिळालेला आहे असे माझे मत आहे. दि. २०-१२-९९ ला सिडको हस्तांतरण करण्याबाबतचा ठराव पास झालेला होता. प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येऊन शासनाने दिनांक २६/०२/२००१ रोजी सिडकोचे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्यात यावे असे जाहीर करून महानगरपालिकेस कळविले. ठरावात जे मुद्दे मांडण्यात आले होते त्यास शासनाने सर्व मुद्द्यांना मंजुरी दिली व सिडकोतील अतिक्रमणाबाबत हस्तांरणाच्या बैठकीत कोणताही विषय नव्हता. परंतु सिडकोचे अधिकारी आज रोजी तेथील नागरिकांमध्ये

नगरसेवकांनी मागणी केल्यानुसार निर्णय घेतलेला आहे. जो ठराव झाला त्यात ११ अटी दिलेल्या होत्या त्यात कुठेही अतिक्रमणाबाबत उल्लेख केलेला नाही. ठराव पास झाला त्यावेळी स. सदस्य श्री. कोकाटे हे सभागृहात उपस्थित होते मी स्वतः महापौर होतो व आपल्या सर्वांच्या सहकार्याने आपण ज्या अटीनुसार हस्तांतरण करण्यास मंजुरी दिली त्यामुळे शासनाचा जो निर्णय आला त्यामध्ये ७ नंबरवर असे सांगितले गेले की, ... व आपण विषय असा होता सिडकोतील खुल्या जागा हस्तांतरण करण्यापूर्वी त्या जागेवर तारेचे कुंपन घालण्यात यावे. त्यानुसार शासनाने यावर जो निर्णय दिला त्यामध्ये शासनाने यावर जो निर्णय दिला त्यामध्ये असे म्हटले की, सिडकोमधील सर्व एकूण १६८ खुल्या जागा आहेत त्यापैकी सिडकोने ७३ जागांना तारकुंपन घातलेले आहे. उर्वरित जागा सिडकोने महानगरपालिकेच्या आहे. त्या स्थितीत ताब्यात घ्याव्यात व त्या जागेचे संरक्षण करावे. असा निर्णय शासनाचा आहे. दि. २६-०२-२००१ रोजी शासनाचा निर्णय आल्यानंतर या महानगरपालिकेतील मानधनावर कार्यरत असलेले वकील पॅनलवरील एक वकील यांनी न्यायालयात असे दाखल केला की, महानगरपालिकेचे म्हणणे असे आहे की, सिडकोतील ज्या २२ हजार जागेवर अतिक्रमण झालेले आहे. ते काढल्या शिवाय महानगरपालिको हस्तांतरण करणार नाही असे म्हणणे मांडले. जो जवाब दाखल केला तो त्या मानधनावरील वकीलाने कोणाच्या म्हणण्यानुसार सादर केला कुणाची परवानगी घेतली त्याचा खुलासा होणे गरजेचे आहे. न्यायालयाने जे आदेश केले ते सुध्दा आम्हाला मान्य आहे. त्या आदेशाचे आम्ही पालन करतो हे सर्व करित असतांना नागरिकांवर जर अन्याय होत असेल तर त्यांचे संरक्षणाची योग्य ती जबाबदारी सुध्दा आमच्यावर आहे. काही लोकांनी प्रसार केला की न्यायालयाच्या विरुध्द चर्चा केल्यास कन्टेंम ऑफ कोर्ट म्हणून दावा होऊ शकतो. नागरिकांच्या संरक्षणासाठी काहीही कार्यवाही झाल्यास आम्ही ती मान्य करतो. परंतु ही सर्व कार्यवाही होत असतांना सर्वसाधारण सभेने घेतलेला निर्णय व त्यानुसार शासनाने दिलेली मान्यता या व्यतिरिक्त जे पॅनलवरील वकील आहे त्यांनी महानगरपालिकेचे न्यायालयात जे म्हणणे मांडले ते कुणाच्या परवानगीने मांडले असे म्हणणे मांडण्याचा अधिकार पोहोचतो काय त्याचा खुलासा करण्यात यावा.

मा. महापौर : विधी सल्लागार यांनी सविस्तर खुलासा करावा.

विधी सल्लागार : या प्रकरणामध्ये महानगरपालिकेच्या वतीने न्यायालयात कोणत्याही प्रकारचे स्वतःहून माहिती दिलेली नाही. न्यायालयानेच एक कमिटी सिडको अतिक्रमणाच्या बाबतीत स्थापन केलेली होती. व महानगरपालिकेचे म्हणणे मांडण्यासाठी जे स. सदस्य यांनी मत व्यक्त केले कि कुणाच्या सल्ल्यानुसार माहिती दिली त्या संदर्भात जेष्ठ व विधीज्ञ श्री. नावंदर यांना न्यायालयाने संदर्भात प्रत्यक्ष चर्चा केल्यानंतर त्यांनी न्यायालयात महानगरपालिकेच्या वतीने मत मांडले

श्री. सुदाम सोनवणे : मा. आयुक्तांनी त्यांचे वैयक्तिक मत वकीलासमोर सादर केले. त्यानुसार १० तारखेला संबंधित वकीलांनी असे मत मांडले की, सिडकोमध्ये ज्या २२ हजार जागेवर अतिक्रमण झालेले आहे ते काढल्याशिवाय महानगरपालिकेचे हस्तांतरण करून घेण्यास तयार नाही. त्याची प्रत सुध्दा

माझ्याकडे आहे. एक मानधनावरील वकील सर्वसाधारण सभा तसेच शासनाचा निर्णय डावलू शकतो त्यांना अधिकार कुणी दिले असे मत मांडण्याचा अधिकार पोहचू शकतो का? त्याचा खुलासा द्यावा तेथील लोकांवर न्यायालयाच्या आदेशानुसार अन्याय होत आहे असे चित्र आहे म्हणून या सभेत असा निर्णय घेण्यात यावा की, सिडको आहे त्या परिस्थितीत महानगरपालिका हस्तांतरण करून घेण्यात तयार आहे. असे ॲफिडेव्हीट आपण महानगरपालिकेने सादर करावे.

श्री. अंबादास दानवे : स. सदस्य यांनी जो सिडको सदंर्भात प्रश्न उपस्थित केला त्या बाबतीत दि. १६ मार्च २००१ च्या शासन आदेशास स्पष्ट असे म्हटले आहे की, सिडकोमधील ज्या १६८ खुल्या जागा आहे त्यापैकी ७३ जागेवर सिडकोने तारकुंपन केलेले आहे उर्वरित जागेवर महानगरपालिकेकडे आहे त्या स्थितीतत हस्तांतरण करण्यात व तारकुंपन करून घ्यावे. असे असतांना मा. आयुक्त किंवा आयुक्तांनी सांगितल्यानुसार संबंधित वकील अशा प्रकारचे म्हणणे न्यायालयात मांडू शकते काय? अशा प्रकारची भूमिका घेता येते का हा पहिला प्रश्न? माझ्या मते सभागृहाच्या परवानगी शिवाय कुणीही आयुक्त असेल त्यांना परवानगी घेतल्या शिवाय असे मत मांडता येणार नाही. ज्या वकीलांनी न्यायालयात मत मांडले त्यांना मा. आयुक्तांनी तशी परवानगी दिली होती काय त्याचा सुध्दा खुलासा येथे करण्यात यावा. कारण तेथील जनतेच्या भावना अतिशय तीव्र झालेल्या आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : सिडकोतील अतिक्रमणाच्या संदर्भात बऱ्याच स. सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केले. न्यायालयाच्या निर्णयाबद्दल आमचे कुठलेही दुमत नाही. न्यायालयाच्या विरोधात आम्ही नाही. परंतु सिडको हडकोतील जनतेला आता सध्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सभागृहात झालेली चर्चा व झालेला निर्णय बाजूला ठेवून महानगरपालिका प्रशासनाने वेगळी भूमिका घेऊन न्यायालयात मत मांडलेले आहे. यापूर्वीचे माजी महापौर स. सदस्य श्री. सोनवणे यांनी २०-१२-९९ ला हस्तांतरण करण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर केला त्यानंतर पुन्हा त्या प्रस्तावावर चर्चा होऊन शासनाकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात आला व शासनाने शेवटी मार्च २००१ मध्ये सिडकोचे महानगरपालिकेकडे प्रस्तावानुसार ज्या अटी दिल्या होत्या त्यास मान्यता देऊन कार्याध्येश काढले. सिडकोतील जे २२ हजार अतिक्रमणे आहे ते काढल्या शिवाय महानगरपालिकेचे हस्तांतरण करणार नाही असे म्हणणे मांडणारे सांगितले. महानगरपालिकेने त्या जागेचा सर्वे केलेला आहे का? याचा अर्थ हा प्रश्न ज्या ज्या पध्दतीने महानगरपालिकेने हाताळावयास पाहिजे होता त्या पध्दतीने हाताळलेला नाही. न्यायालयात चुकीच्या पध्दतीने माहिती सादर केलेली आहे. शासनाचे स्पष्ट आदेश होते ही, एकूण जागा १६० होत्या त्यापैकी ७३ जागेवर सिडकोने तारकुंपन केले उर्वरित जागा आहे त्या स्थितीत महानगरपालिकेकडे हस्तांतरण कराव्या व त्या जागेवर सिडकोने तार कुंपन किंवा संरक्षित भिंत घालून द्याव्यात असा प्रश्न उपस्थित झालेला होता. महानगरपालिकेच्या वकीलामार्फत ज्या ठरावानुसार फक्त १६८ जागेचा प्रश्न न्यायालयात मांडावयास पाहिजे होता. आता असा निर्णय घ्यावा की सन १९९९ मध्ये जो हस्तांतरणाचा ठरावा झाला त्यात ज्या अटी होत्या व

शासनाने मंजूर केलेल्या आहेत या संदर्भात न्यायालयात ॲफिडेव्हीट सादर करून आहे. त्या स्थितीत महानगरपालिका हस्तांतरण करण्यास तयार आहे असे मत मांडावे. इतर कोणताही प्रश्न ठरावाच्या वेळी या व्यतिरिक्त उपस्थित झालेला नव्हाता म्हणून ठरावानुसार कार्यवाही करावी. तसेच प्रशासनास आदेश द्यावे. सिडकोतील जनतेच्या भावना तसेच लोकप्रतिनिधी यांच्या सुध्दा भावनेचा विचार करून कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : सिडकोने अतिक्रमण काढण्या बाबतचे आदेश न्यायालयाचे आहे. न्यायालयाचा अवमान करणे बरोबर नाही. तसेच क्रांतीचौक रस्ता रुंदीकरणाच्या संदर्भात महानगरपालिकेने का स्वत:हून भूमिका घेतली नाही. न्यायालयाने आदेश दिल्यानंतरच कार्यवाही करण्यात आली. आणखी काही अतिक्रमणे तशीच आहे. याचा अर्थ असा की महानगरपालिका किंवा सिडको न्यायालयाच्या आदेशानुसारच अतिक्रमणाचा प्रश्न सोडविणार आहे का? मध्यवर्ती नाक्याजवळ रस्त्यावर बऱ्याच लोकांनी अतिक्रमण केलेले आहे तेथे बाजूलाच स्मशानभूमी असून जाण्यासाटी रस्ता नाही. अशी अतिक्रमणे महानगरपालिका काढत नाही. जे गोरगरीब लोक आपली रोजीरोटी कमवून व्यवसाय करीत होते त्या बाबत न्यायालयात कागदपत्र दाखल करून बसस्टँड जवळील अतिक्रमण हटविण्याचे काम केले. अतिक्रमण काढल्यानंतर तेथे पुन्हा अतिक्रमण होणार नाही यासाठी महानगरपालिका काय उपाययोजना करणार आहे याची माहिती द्यावी. अशी टपरी धारकांना पर्यायी जागा देणार काय?

श्री. सुदाम सोनवणे : न्यायालयाच्या आदेशाचे आम्ही अवमान करू इच्छित नाही. एक लोकप्रतिनिधी व सदस्य म्ळणून सभागृहात चर्चा करीत आहोत या संदर्भात काल मा. विरोधी पक्ष नेते श्री. नारायण राणे तसेच मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांची एक तास बैठक झाली. मुख्यमंत्री यांनी असे आदेश दिले की, सिडकोने न्यायालयात एक ॲफिडेव्हीट सादर करून ज्या जागा जनतेला सुविधा देण्यासाठी राखीव त्या खुल्या कराव्या. १०० फुटाच्या रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यात यावी परंतु लोकांच्या रहदारांसाठी काही अडथळा नाही, असे ॲफिडेव्हीट दाखल करावे असे आदेश दिले त्यानुसार या सभागृहाने असा निर्णय घ्यावा की सार्वजनिक प्रयोजना व्यतिरिक्त जी अतिक्रमणे झाली त्याचा काही अडथळा नाही. महानगरपालिका आहे त्या स्थितीत सिडकोचे हस्तांतरण करून घेण्यास तयार आहे तसे आदेश प्रशासनास करावे. होत असलेलल चर्चा यानुसार न्यायालयाचा अवमान होत असे म्हणणे म्हणता येणार नाही कारण या सभागृहाने घेतलेल्या शासनाचा सुध्दा अवमान झालेला आहे. सिडकोतील प्रशासनाने सर्व स. सदस्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न केलेला आहे. एक महिण्यापूर्वी नगरसेवकांची एक बैठक झाली व सर्व खुल्या जागा रिकाम्या करून घ्याव्यात म्हणून बैठकीत निर्णय झाला असे जनतेच्या नजरेस सिडको प्रशासन आणून देत आहे. परंतु तशी कोणतीही बैठक झालेली नसून आपण जो ठराव पास केला त्यामध्ये सुध्दा तसा काहीही उल्लेख नाही. सिडको हडको भागात जवळपास ९०% लोक कामगार असून ज्याची अतिक्रमणे पाडली त्यांचे बाबत पर्यायी जागा देण्यात येईल अशा प्रकारची सहानुभूमी दाखवून तसा निर्णय आज आपल्याला घ्यावा लागणार आहे. सध्या सिडको प्रशासनाने १०० फुटावरील

अतिक्रमण काढले, खुल्या जागांवरील अतिक्रमण काढले, उर्वरित लहान रस्त्यावरील व लहान-लहान जी अतिक्रमणे आहे ती न काढता आहे त्या स्थितीत सिडकोचे हस्तांरण करण्यास महानगरपालिका तयार आहे अशा प्रकारचा विनंती अर्ज सिडको प्रशासनास महानगरपालिकेच्या वतीने देण्याचे आदेश करावेत.

श्री. कोकाटे काशिनाथ : खुल्या जागेवरील जे १६८ जागेवर अतिक्रमण झाले त्या संदर्भात आहे त्या स्थितीत महानगरपालिका हस्तांतरण करून घेणेस तयार आहे असे ॲफिडेव्हीट करणे गरजेचे आहे. तशा सूचना प्रशासनास देण्यात याव्यात.

मा. महापौर : सर्वसाधारण सभेने सिडको हस्तांतरणाबाबत जो ठराव पास केला त्यामध्ये सिडकोतील अतिक्रमणाबाबत कोणत्याही प्रकारची अट टाकण्यात आलेली नव्हती. सिडकोतील १६८ जागेवरील झालेली अतिक्रमणे काढून त्या जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरण कराव्या अशी महानगरपालिकेची भूमिका होती. नुकत्याच न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सिडकोतील अतिक्रमणे काढण्याबाबत कार्यवाही होत आहे. परंतु तेथील लोकांच्या भावनांचा विचार केल्यास व न्यायालयाचे आदेशास आपण हस्तक्षेप करू शकत नाही. म्हणून १६८ खुल्या जागेबाबत २ महिण्याच्या वेळेमध्ये ही अतिक्रमण काढून या जागा महानगरपालिकेकडे देण्यात याव्यात असे मत होते. न्यायालयाचा कुठल्याही प्रकारचा अवमान होणार नाही अशा पध्दतीने प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री. संजय शिरसाठ : सिडको हस्तांतरणा बाबत जेंव्हा बैठक झाली व त्यानंतर पुन्हा स्थायी समिती सभागृहामध्ये २ महिण्यानंतर पदाधिकारी समवेत मा. महापौर यांची चर्चा होऊन सिडकोने १६८ जागेवरील अतिक्रमण २ महिण्यामध्ये काढून जागा महानगरपालिकेकडे द्याव्यात म्हणून निर्णय झाला होता. उर्वरित २२ हजार अतिक्रमण झाली याचा कुठेही ठरावात उल्लेख नसतांना सिडकोच्या विरुध्द एका व्यक्तीने वाद करून प्रकरण दाखल झालेले होते. त्या महानगरपालिकेची भूमिका काय म्हणून न्यायालयाने मत घेतलेले आहे. आता प्रशासनाने न्यायालयात एक ॲफिडेव्हीट दाखल करून १६८ जागे बाबत भूमिका मांडावी व आपण आपली भूमिका न्यायालयासमोर स्पष्ट करावी ज्या वकीलांनी न्यायालयात म्हणणे मांडले ते कुणाच्या अधिकारानुसार मांडले त्याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे.

मा. महापौर : या बाबत कायदेशीर सल्ला घेऊनच कार्यवाही करण्यांत येईल.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २०-१०-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**शनिवार, दि. २०-१०-२००१ रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली. सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) स.स.श्री. प्रशांत सुभाष देसरडा
२) स.स.श्री. पांडुरंग संजय शिरसाठ
३) स.स.श्री. तुलशीबागवाले किशोर
४) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
११) स.स.श्री. शिंदे राजु रामराव
१२) स.स.श्री. कावडे रावसाहेब राणुबा
१३) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१५) स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब
१६) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१७) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१८) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
२१) स.स.सौ. लोखंडे कचराबाई उत्तमराव
२२) स.स.श्री. शकिल पटेल शे. बुढण पटेल
२१) स.स.श्रीमती डॉ. बिनवडे आशा उत्तम
२२) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२३) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२४) स.स.सौ. सुरडकर साधना गणेश
२५) स.स.श्री. रहाटकर विजया किशोर
२६) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२७) स.स. ॲड चंद्रात्रे सुवर्णा रमेश
२८) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२९) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
३०) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
३१) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३२) स.स.श्री. अय्युब खॉन सरदार खॉन
३३) स.स.डॉ. कराड भागवत किशनराव

३४) स.स.श्री. तांदुळवाडीकर आनंद विनायकराव
३५) स.स.श्री. मुमताज अली मोज्जमअली
३६) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३७) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३८) स.स.श्री. नासेर खॉन सरदारखान
३९) स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव
४०) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४१) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
४२) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४३) स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खॉन
४४) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४५) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४६) स.स.श्री. सुरगोणीवार नारायण चंद्रय्या
४७) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४८) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४९) स.स.सौ. जेजुरकर ताराबाई सुधाकर
५०) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५१) स.स.श्री. दानवे अंबादास एकनाथराव
५२) स.स.श्री. नासीर खान अ. रहेमान खान कुरैशी
५३) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५४) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५५) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५६) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
५७) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खाूंन
५८) स.स.श्री. गाजी सदोद्दिन गाजी जहीर अहेमद
५९) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
६०) स.स.सौ. नफिउन्नीसा बेगम हबीबखॉ
६१) स.स.श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दिन
६२) स.स.श्री. अफसर खान यासीन खान
६३) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६४) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
६५) स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
६६) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
६७) स.स.श्री. सिध्द जगदीश कन्हैय्यालाल
६८) स.स.सौ. कागडा बबिता सुभाष
६९) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज
२) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१२) स.स.सौ. सलमा बाना मीर मोहम्मद अली.

सभागृहातर्फे स्व. माधवराव सिंध्या यंचे दु:खद निधन झाल्याने ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**विषय क्र. ४९५/१ :**

दिनांक १२-०७-२००१ च्या विशेष सर्वसाधारण सभेचे तसेच दिनांक २०/०९/२००१ च्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**चर्चा :**

श्री. सोनवणे सुदाम : दिनांक २०-०९-२००१ च्या बैठकीत पान क्र. २४ व २५ वरील विषय क्रमांक ४८०/३, ४८१/४ नुसार जलशुध्दीकरण करण्यासाठी ब्लीचींग पावडर खरेदीचे प्रस्ताव मंजूर केलेले आहे. हर्सूल जलशुध्दीकरण केंद्रासाठी तसेच फारोळा जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणारे ब्लीचिंग पावडरचे एकत्रित टेंडर काढावे म्हणून ठरले होते माझे असे मत आहे की, शहरातील हर्सूल जलशुध्दीकरण केंद्रासाठी येणारे पावडर यावर जकात व ट्रान्सपो खर्च येणार आहेव फारोळ्यासाठी लागणारे ब्लीचींग पावडरवर जकात आकारली जाणार नाही. जकात व ट्रान्सपोर्ट खर्च येणार नाही म्हणून आपण वेगवेगळ टेंडर काढण्याची कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : स. सदस्य सुदाम सोनवणेयांनी सूचना केल्यानुसार दुरुस्ती करण्यात येते. टेंडर अशा पध्दतीने काढणार संबंधित अधिकारी यांनी खुलासा द्यावा.

प्र. कार्यकारी अभियंता (पा.पु.) : हर्सूल जलशुध्दीकरण केद्र तेसच फारोळा येथील जलशुध्दीकरण केंद्रयासाठी लागणर ब्लीचींग पावडर खरेदी करणार आहोत. जे शहरात हर्सूलसाठी येणारे ब्लीचींग पावडरला जकात आकारणी होईल फारोळ्यासाठी येणाऱ्या ब्लींचीग पावडरवर जकात आकारली जाणार नाही तसेच एकत्रित टेंडर काढल्यास पुरवठा करणारी एजन्सीज एकच ठिकाणावर माल आणून देईल. उदा. फारोळा येथे ब्लीचींग पावडर आणून टाकल्यास शहरासाठी पुन्हा फारोळ्याहून आणण्याचा ट्रान्सपोर्ट खर्च लागेल म्हणून लागेल त्यासाठी एकत्रित टेंडर न काढता वेगवेगळे टेंडर काढल्यास महानगरपालिकेच्या हिताचे होईल. एकच टेंडर मुळे एकाच ठिकाणी पुरवठा होईल वाहतुकीचा खर्च वाढेल.

डॉ. कराड भागवत : वृत्तपत्रात दोन ठिकाणी टेंडर काढल्याचे दिसून आले सर्वसाधारण सभेत एकत्र टेंडर काढण्याचा निर्णय झालेला होता.

प्र. कार्यकारी अभियंता (पा.पु.) दोन्ही ठिकाणी टाकण्यात येणारे ब्लीचींग पावडरचे अंदाजपत्रक वेगवेगळैच होते. परंतु अंदाजपत्रकास मंजुरी घेतांना दोन्ही ठकाणचे टेंडर एकत्र काढावे म्हणून मागील बैठकीत निर्णय झालेला होता मान्यता सुध्दा दोन्ही अंदाजपत्रकास वेगवेगळी मिळालेली आहे. दोन ठिकाणी टेंडर काढलेले आहे.

श्री. अंबादास दानवे : मागील सर्वसाधारण सभेत या विषयावर चर्चा होऊन एकत्रित टेंडर काढण्याचा निर्णय झालेला असतांना दोन वेगवेगळे टेंडर कसे काढण्यात आले. यासाठी सर्वसाधारण सभा सक्षम असतांना मधल्या काळात स्वत: अधिकाऱ्यांनी वेगवेगळे टेंडर काढण्याचा निर्णय कसा घेतला कुणी अधिकार दिले.

मा. आयुक्त : याबाबतचे टेंडर एकत्र असून कॉन्टीडी वेगवेगळ्या दिलेला आहेत. दर प्राप्त होतील त्यापासून पुढील कार्यवाही होईल.

सौ. जयश्री किवळेकर : दि. १२-०७-२००१ च्या इतिवृत्तातील पान क्र. ४ वर सिडको हस्तांतर बाबतच्या ठरावाच्या प्रति देण्यात येतील असे आपण रुलींग दिले अद्याप प्रती देण्यात आलेल्या नाही. सिडको हस्तांतरण साठी ज्या ११ अटी मंजूर केलेल्या होत्या त्याबाबत काय निर्णय झाला . अनेक वेळा सिडको प्रशासन व शासनाकडे बैठका झाल्या त्याची वृत्तात माहिती तसेच सविस्तर टिप्पणी सभागृहापुढे चर्चेसाठी येणे आवश्यक आहे.

उप-आयुक्त (म.) सिडको हस्तांतरणाच्या बाबतीत १९८६ च्या दिवानी अर्जाप्रमाणे व त्यानंतर आलेले अर्ज मा. उच्च न्यायालयाच्या समोर सुनावणीसाठी असल्यामुळे कायदेशीररित्या प्रकरण न्याय प्रविष्ठ असल्याने कोणताही निर्णय घेता येणार नाही. हस्तांरण करण्याबाबत खंडपीठाकडे तसे सादर करून ही खंडपीठाने हस्तांरण करण्याबाबत निर्देश दिलेले नाही. या प्रकरणामध्ये जे दिवाणी अर्ज आलेले होते. त्यानुसार आदेश प्राप्त झालेले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने कोणताही निर्णय हस्तांरणाबाबत आपल्याला घेता येणार नाही.

डॉ. भागवत कराड : सिडको हस्तांतरण बाबत निर्णयाच्या प्रती स. सदस्यांना द्यावयाचा निर्णय घेतलेला होता ते देण्यात यावे.

मा. महापौर : पुढील बैठकीपर्यंत शासनाने हस्तांतरणाबाबतच्या काढलेल्या आदेशाच्या प्रती सर्व सदस्यांना देण्यात याव्यात.

श्री. जयवंत ओक : दि. २०-०९-२००१ च्या बैठकीतील पान क्र. ७ वर आपण रुलींग दिलेले आहे अनाधिकृत वसाहतीत सुविधा देण्या संदर्भात आपण ठराव पास केलेला आहे ता शासनाकडे पाठविण्यात येईल. तो पाठविला का? व मुख्यमंत्री यांची एक शिष्टमंडळ घेऊन भेट घेवून कार्यवाही केली जाईल म्हणून आपले रुलींग आहे. परंतु एक महिना झाला निर्णय घेतल्यानुसार मुंबईला शिष्ट मंडळ गेलेले आहे का? शासनाकडे तसा पत्र व्यवहार झालेला आहे का? बत्याचा वॉर्डात १० वर्षा पासून ड्रेनेज, लाइट, रस्त्याची कामे केलेली आहे अशा भागात देखभाल दुरुस्तीची कामे शासन मंजुरी येईपर्यंत करता येतील का? प्रशासनाने खुलासा करावा.

श्री. प्रकाश निकाळजे : विषय क्र. १ मंजूर करावा व नंतर चर्चा करावी.

प्रकल्प संचालक : अनाधिकृत वसाहतीचे जे सर्वेक्षण करण्यात आलेले होते. त्या संदर्भात ठराव पास करण्यात आलेला आहे. मागील बैठकीत तो प्रस्ताव कायम झाला व मा. महापौर यांनी आदेश दिल्यानुसार सदर प्रस्ताव दिनाक २१/०९/२००१ रोजी शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. दुसरा एक प्रस्ताव नगरसेवक स्वेच्छा निधीतून वाहन चालक तसेच संगणक प्रशिक्षण देण्याबाबतचा मंजूर झालेला होता तो सुध्दा शासनाकडे पाठविलेला आहे.

श्री. अफसर खॉन : सभा संपन्न होऊन एक महिना झाला या प्रस्तावावर तात्काळ शासन मंजूर घेण्यासाठी प्रशासनामार्फत सक्षम अधिकारी नियुक्त करून कार्यवाही करावी तसे रुलींग आपण दिले असतांना आता पर्यंत फक्त शासनाकडे प्रस्ताव सादर केला एका महिण्यात प्रशासनाने शासनाकडे का पाठपुरावा केला नाही.

मा. महापौर : आपण प्रस्ताव पाठवलेला आहे. शासन मंजुरीसाठी लवकरच कार्यवाही होईल.

श्री. अफसर खॉन : आपण रुलींग दिले या प्रस्तावास मंजुरी घेण्यासाठी शासनाकडे सक्षम अधिकारी का पाठवण्यात आले नाही. नुसते ठराव पास होईल आपण आदेश करणार, कार्यवाही काहीच नाही असे असेल तर योग्य नाही. १९९४ ला शिक्षकाचे पदास शासन मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवला ७ वर्ष झाले अद्याप मंजुरी झालेली नाही पाठपुरावा केला नाही तर याही प्रस्तावाच्या बाबतीत तसे होऊ शकेल.

श्री. प्रकाश निकाळजे : मा. महापौर व सर्व पदाधिकारी तसेच जेष्ठ सदस्य यांचे एक शिष्ठमंडळ मा. मुख्यमंत्री यांची भेट घेऊन कार्यवाही करण्यात येईल म्हणून आपण निर्णय घेतलेला होता. त्याप्रमाणे वेळ निश्चित करून मुख्यमंत्री यांची भेट घेण्याचे ठरवावे व दोन्हीही प्रस्तावास मंजुरी आणण्याबाबत कार्यवाही व्हावी.

श्री. जयवंत ओक : सभागृहात ठराव येतात निर्णय होतात परंतु प्रशासनामार्फत योग्य कार्यवाही होत नाही. आताच स. सदस्य यांनी शिक्षकांचे संदर्भात प्रश्न उपस्थित केला असे किती तरी ठराव पास होऊन शासनाकडे सादर केलेले आहे. नुसते ठराव पास होण्याची अपेक्षा या सभागृहाला नाही त्याचेवर अंमलबजावणी झाली पाहिजे. यास महत्व आहे ती अपेक्षा ठेऊनच ठराव पास होतात. अनाधिकृत वसाहती मध्ये सुविधा देण्यासंदर्भात प्रस्ताव शासनाकडे पाठवला आताच खुलासा केला त्यांची नोंद असल्याबाबतची प्रत एक तासाचा आत सभागृहात सादर करावी खरी परिस्थिती समोर येईल. येथे सर्व पक्षाचे सदस्य आहे. पदाधिकाऱ्यांना काय कार्यवाही करायची ती करतील परंतु प्रशासनामार्फत काय कार्यवाही झाली याचे उत्तर सभागृहाला बरोबर द्यावे हा विषय मी चर्चेमये काढणार होतो. परंतु आता मध्येच चर्चा होत आहे. म्हणून आपल्या परवानगीने बोलत आहे. जनतेची आम्हालाविकास कामे करण्यासाठी येथे पाठवले आहे. वादविवाद, जातीवाद, ताण-तणाव किंवा राजदंड वगैरे पळवण्यासाठी नव्हे! प्रशासनाकडून विकास कामे होण्याची या सभागृहाला अपेक्षा आहे प्रशासन किती जागृत आहे. हे प्रशासनाने स्वतः दाखवून दिले पाहिजे. एखाद्याच्या घरासमोर लाईन बंद पडला तर न तक्रार करता लावला गेला पाहिजे. नगरसेवकांनीच या बाबी निदर्शनास आणून द्याव्यात ही अपेक्षा प्रशासनाने ठेऊ नये. या मताचा मी आहे. त्याच बरोबर रस्त्याची साफसफाई ड्रेनेज चोकअप, पाणी इ. सर्व सुविधा कुण्याही तक्रारीची अपेक्षा न ठेवता कामे स्वतःहुन प्रशासनाने केले पाहिजे तसेच वॉर्डातील रस्ते खराब झाले असतील तर त्याचा सर्व्हे करून ताबडतोब अंदाजपत्रक तयार झाले पाहिजे ही अपेक्षा प्रशासनाकडून सभागृहाला आहे. प्रशासना जागृत असावे वेळेवर कामे व्हावी ती केल्यास जनता प्रशासनाचे अभिनंदन करेल. जनता महानगरपालिकेस टॅक्स भरते, पाणीपट्टी भरते याचा विचार झाला पाहिजे. अनधिकृत वसाहतीतील विकास कामाचा प्रश्न बाजूला ठेवा परंतु जो भाग अनधिकृत आहे जेथे १००% लोक टॅक्स भरताता त्या भागात सुविधा का दिल्या जात नाही. अनधिकृत वसाहतीमध्ये १०-१२ वर्षापासून स्वेच्छानिधीतून कामे होत होती आता ती बंद केली ज्या भागातील लोकांचे मतदान यादीत नांव आहे अशा सर्व

जनतेला सुविधा दिल्या पाहिजे त्या देणे आमचे कर्तव्य आहे. कारण त्यांनी आम्हाला निवडून दिलेले आहे.

श्री. अफसर खॉन : उूर्द भाषेच्या शिक्षक भरती संदर्भात शासनाकडून १९९६ ला पत्र आलेले होते. त्या बाबतीत मी १९९९ ला शासनाकडे पत्र पाठविले की या पदांना मान्यता द्यावी. तीन वर्ष झाले परंतु आतापर्यंत शासनाची त्यास मान्यता आलेली नाही. प्रशासन एक पत्र पाठवले उत्तर येईल अशी अपेक्षा ठेऊन पुढील कार्यवाही होत नाही.

श्री. तकीहसन खॉन : कोणताही ठराव पास झाल्यानंतर शासन मंजुरीसाठी पाठवून शासन मंजुरी मिळाल्यानंतर सुध्दा त्याची अंमलबजावणी होईल याची खात्री नाही त्या प्रस्तावास पुन्हा शासनाकडे त्रुटी काढून पुन्हा पाठविले जाते. उदाहरण द्यावयाचे झाल्यास माझ्या वॉर्डात स्वेच्छानिधीतून संगणक प्रशिक्षण देण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर होऊन शासनाकडे पाठवला गेला शासनाने मंजुरी दिल्यानंतर नियम तयार करण्यात आले. सर्व साहित्य खरेदी केले परंतु पुन्हा काही कारणास्तव प्रस्ताव शासन मंजुरीसाठी पाठवण्यात आलेला आहे. याचा अर्थ शासनाने पहिल्यांदा दिलेल्या मंजुरीला अर्थ नाही असे सिध्द होते. संबंधित अधिकारी येथे उपस्थित आहे. शासनाने दिलेली मंजुरी व त्यानंतर ज्या त्रुटीमुळे प्रस्ताव पुन्हा शासनाकडे पाठवला या दोन्ही पत्राचाखुलासा व्हावा. जेणे करून सर्व बाब सभागृहाच्या निदर्शनास येईल. पत्र वाचून दाखवण्यात यावे. शासनाकडून मंजुरी आल्यानंतरही पुन्हा शानाकडे पाठवतात. याची तक्रार शासनाकडे करण्यात येईल व वेळ पडल्यास मा. हायकोर्टात जाण्याचीही तयारी करण्यात येईल.

डॉ. कराड भागवत : अनिधकृत वसाहतींना सुविधा देण्याबाबत प्रस्ताव शिफारशीसाठी शासनाकडे पाठविला असला तरी त्यास मंजुरी येण्यासाठी वेळ लागेल म्हणून या महानगरपालिकाचे पदाधिकारी तसेच जेष्ठ सदस्य आपणासह एक शिष्ट मंडळ मा. ना. मुख्यमंत्री यांचेशी चर्चा करून दोन्ही प्रस्तावास मंजुरीबाबत कार्यवाही करता येईल व या प्रस्तावास तात्काळ मंजुरी आणण्यात यावी.

श्री. तकीहसन खॉन : संगणक प्रशिक्षण स्वेच्छा निधीतून देण्याबाबत शासन मंजुरी आलेली असतांना कार्यवाही झालेली नाही. शासनाच्या निर्णयाची पायमल्ली होते. सभागृहात सदर निर्णय वाचून दाखववावा.

श्री. स. अली सलामी : सभागृहाने निर्णय घेतल्यानंतर त्या ठरावाची अंमलबजावणी का होत नाही असे मत सभागृहाने व्यक्त केलेले आहे. डॉ. भागवत कराड महापौर असतांना अनाधिकृत वस्त्यांना सुविधा देण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव दिला होता. शासनाने एक परिपत्रक काडून मान्यता दिली त्यानुसार शहरातील सर्वेक्षण करण्यासाठी एक कमिटी नेमण्यात आली होती. त्या कमिटीमध्ये माझे सुध्दा नांव होते. त्या बाबतीत ३ महिने झाले अद्याप पर्यंत पत्र मला मिळालेले नाही. सदर कमिटीने १५ दिवसात संपूर्ण शहरातील अनाधिकृत वसाहतीचा सर्व्हे करावा व तसा अहवाल सभागृहापुढे ठेवावा असा निर्णय झालेला होता. अद्याप काहीहीकार्यवही नाही यावर बोलण्याचा उद्देश असा की, सभागृहात निर्णय झाल्यानंतर रीतसर त्याची अंमलबजावणी होत नाही. का अंमलबजावणी होत नाही त्याचे उत्तर या सभागृहात अपेक्षित आहे. मागील बैठकीत निर्णय झाला वाहन चालक तसेच संगणक प्रशिक्षण व

अनधिकृत वस्त्यांना सुविधा देण्याबाबत प्रस्ताव पाठवून ३० दिवसाच्या आत एक सक्षम अधिकारी नेमन या प्रस्तावास शासन मंजुरी आणखी परंतु आहे ती परिस्थिती तशीच आहे. पुन्हा आज चर्चा होऊन ३० दिवसाची मुदत मागविण्यातयेत आहे. पुन्हा आज चर्चा होऊन ३० दिवसाची मुदत मागविण्यात येत आहे. पुन्हा १५ दिवस मुदत मागतील. अशा पध्दतीने ही कार्यवाही किती दिवस चालू राहणार हा प्रश्न निर्माण होते. आतापर्यंत फक्त शासनाकडे प्रस्ताव पाठविला.

मा. महापौर : अनधिकृत वसाहतींना सुविधा देण्या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. ३० दिवसात प्रशासनाने मंजुरी आणावी म्हणून तसा निर्णय आपण घेतला होता परंतु प्रशासनाला पुन्हा ३० दिवसाचा अवधी देण्यात येतो. प्रशासनाने याप्रस्तावात शासन मंजुरी आणण्यासाठी एका सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करावी व पुढील कार्यवाही व्हावी.

श्री. स. अली सलामी : कोणत्या अधिकाऱ्यांना पाठवायचे ते सभागृहानेच ठरावावे त्यानुसार तात्काळ कार्यवाही होईल. नसता कुणाची नियुक्ती करायची म्हणून प्रश्न निर्माण होईल.

मा. महापौर : अनधिकृत वसाहतीत सुविधा देण्या संदर्भात तसेच वाहन चालक व संगणक प्रशिक्षण देण्या संदर्भात शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावास ३० दिवसाच्याआत शासन आत शासन मंजुरी आणण्यासाठी मुख्यलेखाधिकारी श्री. एम.पी. खैरनार यांची नियुक्ती करण्यांत यावे. प्रशासनातर्फे त्यांना तसे पत्र द्यावे. पुढील कार्यवाही संबंधित अधिकारी यांनी एक महिन्याच्या आत करावी.

मा. आयुक्त : कोणताही प्रस्ताव एकदा मंजूर होऊनकायम झाल्यानंतर त्यावर चर्चा करणे़ योग्य होणार नाही. मागील बैठकीत पोलिस चौकी तसेच पोस्ट ऑफिस साठी महानगरपालिकाच्या इमारतीतील एक-एक गाळे देण्यात यावे म्हणून प्रस्ताव सादर झालेला आहे. यावर प्रशासनाचे कुठेलही मत घेतलेले नाही. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना निवासी दरावर गाळे देता येणार नाही. पोस्ट ऑफिसला देखील निवासी दराने देता येणार नाही. शासनाकडून मंजुरी घ्यावी लागले महानगरपालिकेचे आर्थिक नुकसार होईल. त्यामुळे प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर काम करण्यास अडचण येते. त्याचप्रमाणे गरवारे स्टेडियम भाडे तत्वावर देण्याबाबत प्रस्ताव मंजूर केला. संबंधित प्रस्ताव प्रशासनाकडे सादर व्हावयास पाहिजे. प्रस्ताव प्रशासनासमोर आलानाही. अटी व शर्ती तपासण्यात आले नाही प्रस्ताव आल्याशिवाय मत ठेवता येणार नाही. म्हणून असे प्रस्ताव मंजूर करत असतांना विचार घेण्याची आवश्यकता आहे. त्याच प्रमाणे गेल्या बैठकीत दैनिक वेतन कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन वाढीबाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या माहितीस्तव सादर करण्यात आले. त्यामध्ये ५/- रुपये वाढ केल्यामुळे प्रशासनाला पुढील कार्यवाही करण्यास अडचण निर्माण झाली. सभागृहाने कोणताही निर्णय घेतांना नियमाने घ्यावेत अशी प्रशासनाची अपेक्षा आहे. दैनिक वेतना बाबतचा प्रस्ताव सभागृहा समोर माहितीसाठी देण्यात आलेला होता. निर्णयासाठी नाही. तसेच संगणक प्रशिख देण्या संदर्भात शासनाने मंजुरी दिलेल्या प्रस्तावात संगणक उभारणी्चा खर्च स्वेच्छा निधीतून होऊ शकेल परंतु कर्मचारी वर्ग व इतर प्रशासकीय कामकाज महानगरपालिका प्रशासनास पाहावे लागेल त्यासाठी

आर्थिक परिस्थितीचा विचार होणे गरजेचे आहे. प्रशासन कामासाठी व अंलबजावणी करण्यासाठी आहे. प्रशासनाचे मत घेण्यात यावे व नंतरच निर्णय व्हावा. इतिवृत्तांतत आमचे मत घ्यावे.

श्री. स. अली मिरा सलामी : गरवारे स्टेडियम भाडे तत्वावर देण्याबाबत आपण मंजुरी दिली ठिक आहे. उत्पन्न वाढवावे म्हणून आपण निर्णय घेतला परंतु या संदर्भात आपण कोणत्या ही प्रकारची नियमावली तयार केलेली नसंताना एका खाजगी एजन्सीला आपण स्टेडियम भाडेतत्वावर देणे बरोबर होणार नाही. या प्रस्तावाला सभापती स्थायी समिती व विरोधी पक्ष नेता यांची माहानी होऊ नये म्हणून मंजुरी दिली होती.

श्री. देसरडा प्रशांत : गरवारे स्टेडियम, पोस्ट ऑफिस, एम.एस. ई. बी. ला निवासी दराने देता येत नाही. असे प्रशासनाचे मत आहे. परंतु ज्यावेळी प्रस्ताव मंजूर होतात त्यावेळी प्रशासन कोणते मत मांडत नाही प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर आम्ही जनतेला प्रस्ताव मंजूर झाल्याचे आश्वासन देतो. पुन्हा प्रस्ताव रद्द झाल्यास नगरसेवकांची बदनामी होते. सभेच्या दिवशीच देता येत नाही असे मत मांडले असते तर आग्रह केला नसता.

श्री. अफसर खॉन : गरवारे स्टेडियम बाबत महानगरपालिकाने कोणतीही नियमावली तयार केलेली नाही. असे असतांना स्टेडियम भाडे तत्वावर देणे योग्य होणार नाही. एन-२ सिडको मधील स्टेडियम त्यांनी घेतले आहे. तेथे काय अवस्था आहे हे आपल्याला सर्व माहित आहे.

श्री. देसरडा प्रशांत : महानगरपालिकेचा यात फायदा आहे म्हणून आपण ठराव ठेऊन कार्यवाही करणार होतो. महानगरपालिकेचे सध्या तेथे १२ कर्मचारी देखरेखीसाठी आहे. त्याचा वेतन व इतर खर्च महानगरपालिकेवर येत आहे. सदर कर्मचारी इतर विभागात घ्यावे. स्टेडियम जिल्हा क्रीकेट असोसिएशनकडे दिल्यास महानगरपालिकाचे २ कर्मचारी त्याचे अंतर्गत काम करतील व महानगरपालिकेस भाडे सुध्दा येईल. या दृष्टीने प्रस्ताव ठेवला होता.

श्री. किशोर तुलशीबागवाले : महानगरपालिकाची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन उत्पन्न वाढेल या दृष्टीने ११ महिन्यासाठी भाडे तत्वावर देण्याचा आपण निर्णय घेतला. कायमचे स्टेडियम द्यायचे नाही. करार संपल्यानंतर द्यायचे नसेल तर पुन्हा महानगरपालिकाच्या ताब्यात ठेवावे. सध्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणार वेतनाचा सर्व महानगरपालिकावर येत आहे. याचा विचार करता कर्मचाऱ्यांकडून इतर विभागातील कामे करून घेता येतील.

श्री. संजय शिरसाठ : प्रस्ताव मंजूर केला त्याबद्दल प्रशासनाचे दुमत नाही परंतु महानगरपालिकेच्या या स्टेडियम संदर्भात अटी शर्ती काय आहे म्हणून संबंधित जिल्हा क्रिकेट संघटनेच्या निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे व त्या संघटनेमार्फत प्रस्ताव प्रशासनाकडे यावयास पाहिजे होता असे मत व्यक्त केले आहे. म्हणून ११ महिन्याच्या करारावर देण्याबाबत निर्णय घेतला संबंधित संघटनेशी प्रशासनाने नियम व अटी संदर्भांत चर्चा करावी म्हणून तसेच प्रशासनास सूचना द्यावी.

श्री. देसरडा प्रशांत : महानगरपालिकोच १२ कर्मचारी तेथे काम करतात संबंधित जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे १२ ऐवजी फक्त २ कर्मचारी देखरेखीसाठी दिले तरी चांलेल असे मत व्यक्त केले. उर्वरित कर्मचारी आपल्याला इतर विभागामध्ये

देता येतील महानगरपालिकास उत्पन्न येईल या दृष्टीने प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवलेला होता.

श्री. अफसर खॉन : याच संघटनेने एन-२ मधील स्टेडियम घेतलेले होते. सध्या त्या स्टेडियमची देखरेख व्यवस्थित नाही त्या मैदानावर दुलीप ट्रॉपी घेण्यात आली वृततपत्रात बातम्या आल्या लाखो रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे. गरवारे स्टेडियमसाठी महानगरपालिकाने कोटीने रुपये खर्च केले नियम तयार केले नाही. यांना स्टेडियम दिल्यानंतर पुन्हा कुणीही ११ महिण्याचा करार संपल्यानंतर मागणी करतील त्यासाठी महानगरपालिकाचे कोणते ही मालमत्तेवर कुणी कब्जा करणार नाही या दृष्टीने निर्णय घ्यावा मा. आयुक्तांनी जो खुलाया केला तो बरोबर आहे.

श्री. दानवे अंबादास : मा. आयुक्त यांनी जो खुलासा केला तो अत्यंत स्पष्ट केलेला आहे यात दुमत नाही त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. या उलट प्रशासनाच्या ज्या बाजू असतात त्याकडे प्रशासनाने सुध्दा लक्ष देणे गरजेचे आहे. सध्या गरवारे स्टेडियम मध्ये काय परिस्थिती आहे. त्याचा उल्लेख मी करू इच्छितो ५ वर्षापूर्वी शहरातील पदमपाणी कॉलेजला हे स्टेडियम (फक्त मैदान) वापरण्यासाठी दिलेले होते आज या स्टेडियममध्ये यचा कॉलेजचे ऑफिस कार्यरत आहे ही बाब प्रशासनाच्या मुद्यामहून निदर्शनास आणून देतो. या गरवारे स्टेडियममध्ये सय्यद सलीम नावाचे एक कर्मचारी क्रीडा शिक्षक म्हणून कार्यरत आहे. डायरीमध्ये गरवारे स्टेडियमचे व्यवस्थापन म्हणून कोणता निकष लाऊन छपाई करण्यात आली व्यवस्थापनाचे अधिकार त्यांना कुणी दिले कुणाच्या मंजुरीने दिले आहे. तेथील हॉस्टेलच्या काचा सुध्दा फटल्यश आहेत. मा. आयुक्तांनी पाहणी करण्याची आवश्यकता आहे. या स्टेडीयमची डिजाईन अत्यंत चांगल्या प्रकारे केलेली होती. परंतु सद्य परिस्थितीत काहीही व्यवस्थित नाही म्हणून सध्या तेथील अनाधिकृत वापर कशापध्दतीने होत आहे त्याचा खुलासा आयुक्तांनी करावा नंतर काय निर्णय घ्यायचा तो घेता येईल. सर्वसाधारण सभेने घेतलेला निर्णय तसेच प्रशासनाचे मत घेऊनच नंतर निर्णय घेता येईल.

मा. महापौर : प्रशासनाने या संस्थेशी चर्चा करून अटी शर्ती बाबत माहिती देऊन प्रशासनाच्या पातळीवर निर्णय घेण्यात यावे.

श्री. तकीहसन खॉन : माझ्या वॉर्डात सर सय्यद हॉल आहे येथे व्यवस्थापन नेमण्या तआलेले आहे. माझ्या नावाने नोटिस दिले माझी केंव्हा नेमणूक झाली खुलासा द्यावा.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : पोलिस चौकी व पोस्ट ऑफिससाठी दोन गाळे निवासादराने द्यावे म्हणून देण्याचा ठरावा आपण पास केलेला आहे. वॉर्ड क्र. ५८ मध्ये झोन क्र. ३ चे बांधकाम चालू आहे. ठराव नुसार तीन गाळ्याची मागणी या इमारतीमधून केलेली आहे. पोलिस चौकी व पोस्ट ऑफिसच्या सुविधा संदर्भात जवळपास १०-१२ वॉर्डातील लोकांसाठी मिळवण्यासाठी महिलांना दूरवर जावे लागते महिलांची छेड काढली जाते म्हणून सर्वच सुविधा एक इकाणी मिळाव्या त्या दृष्टीने प्रस्ताव ठेववलेला होता. जनतेची सुध्दा मागणी आहे. पोलिस विभागकडून असे कळविण्यात आले होते की जागा मिळवून दिल्यास त्या भागात पोलिस चौकी देण्यात येईल म्हणून कळविले होते. माझ्या वॉर्डात इतर ठिकाणी कुठेही जागा नाही म्हणून या

इमारतीतील गाळ्याची मागणी केलेली आहे. जनतेची मागणी आहे या भागात रहदारी सुध्दा मोठ्या प्रमाणात आहे. जनतेला सुविधा मिळवण्यासाठी प्रस्ताव नुसार मागणी केली प्रस्ताव मंजूर सुध्दा झालेला इतिवृत्ता कायम करावे. महानगरपालिका पालिकाच्या मालकीच्या १० वर्षात बऱ्याच इमारती नुसत्या बांधून पडलेल्या आहे. लाखो रुपये खर्च झाले. वापर होत नाही. उत्पन्न मिळत नाही त्या बाबत प्रशासन काहीही कार्यवाही करत नाही व जेथे जनतेची मागणी होते तेथे जागा महानगरपालिकाच्या मालकीची असतांना मागणी केली असता नकार होत असेल तर योग्य नाही मागील इतिवृत्त कायम करावे ठराव पास झाल्यानुसार कार्यवाही व्हावी.

अग्निशमन अधिकारी : महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून मा. आयुक्त यांनी पहिल्या वेळेस फायर प्रिवेंशन मेजर घेण्यात यावे म्हणून अंमलबजावणीसाठी ठेवलेले आहे. हॉटेल, मंगल कार्यालय यांना ना हरकत प्रमाणपत्र लागू करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे वेगवेगळ्या कार्यालयाची यादी मागवलीआहे. सर सय्यद हॉल, लोटाकारंजा च्या नावाने नोटीस दिलेले व्येयक्तीक स. सदयंचे नावाने दिली नाही.

श्री. तकीहसन खॉन : संबंधित अधिकारी चुकीचा खुलासा करीत आहे. नोटीसीच्या स्थळ प्रतिवर माझे नांव व सही घेतलेली आहे. महानगरपालिकाची मालमत्ता असतांना महानगरपालिकाच नोटीस देऊन माहिती धेत आहे. माझ्या नावाने नोटीस दिली महानगरपालिकामध्ये व्यवस्थापक हे पद असते का? महानगरपालिकेच्या मालकीचे नेहरू भवन तसेच संत एकनाथ रंग मंदिर आहे. त्यांना सुध्दा नोटीसा दिल्या का? प्रत दाखवावी त्या हॉलमध्ये आपला चौकीदार नाही व्यवस्थापक कोठून आले.

मा. आयुक्त : मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी जो नोटीस दिली त्यामध्ये काही चूक नाही. महानगरपालिकेच्या प्रत्येक इमारतीला जे फायर प्रोटेक्शनची आवश्यकता आहे तेथे घेण्यात यावी. जितके मंगल कार्यालय त्या संबंधी उपाय योजना आवश्यक अशा मालमत्तेसाठी नोटीस देण्यात आली ती बरोबर आहे की नाही ते तपासावे लागेल. ती या इमारती संबंधी जो संबंधित अधिकारी आहे. त्याचेकडे जायला पाहिजे होती नोटीस चुकीने आपल्याकडे पोहचली.

श्री. रतनकुमार पंडागळे : दि. २०/०९/२००१ च्या इतिवृत्तातील पान क्र. १९ वर अस्थायी कर्मचाऱ्यांना वेतन वाढीचा प्रस्ताव ठेवलेला होता. दि. ०६/१०/१९९८ ला १०८० पदे शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेले आहे व शासनाने या पदांना मंजूरी दिल्यानंतर सुध्दा जो खर्च येईल तो महानगरपालिकाच्या आर्थिक परिस्थितीनुसार ३५% टक्क्याच्या आता येणार आहेव पाचवा वेतन आयोग लागू केल्यानंतर सुध्दा असे प्रशासनाने शासनास कळविलेले आहे. १९९८ ला जर ही परिस्थिती होती आज महानगरपालिकाची परिस्थिती कशामुळे खालावली याची सत्य माहिती मिळणे आवश्यक आहे. १९९८ चे बजेट व आता चालू बजेटमध्ये वाढ झालेली आहे त्यामुळे वसूली सुध्दा वाढलेली आहे. सकाळी साफसफाई साठी जाणाऱ्या कामगारांना ८ ते १० मि. मी. जावे लागते, रिक्षा बसने जावे लागते सकाळी काही साधने नसतात. याचा चिार प्रशासन का करीत नाही. मागील बैठकीत वेतन वाढीच्या प्रस्तावावर चर्चा होऊ ५/- रु. वाढ केलेली ती अत्यंत कमी वाढ केलेली आहे. म्हणून

सभागृहाने दैनिक वेतन ८५/- रु. देण्याचा जो निर्णय घेतला त्यास प्रशासनाने सामाजिक दृष्टीकोन समोर ठेऊन कायम राहावे व त्या कर्मचाऱ्यांना तात्काळ दैनिक वेतन लागू करावे. तो विषय कायम करावा.

श्री. संजय शिरसाठ : मा. आयुक्तांनी मागील दोन-तीन विषयावर कर्मचाऱ्यांना वेतनात वाढ करण्या संदर्भात स्थायी समितीने घेतलेल्या निर्णय फक्त सभागृहाच्या माहितीसाठी सादर झालेला होता असे मत आयुक्तांनी व्यक्त केले यावरून फेर बदल सुध्दा करण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेला नव्हता असा समज मा. आयुक्तांचा झालेला आहे. या सर्वोच्च सभागृहाने निर्णय घेतल्यानंतर प्रशासनाला काय निर्णय घ्यायचा तो अधिकार आहे परंतु स्थायी समितीच्या निर्णयानुसार ८०/- रु. दैनिक वेतन देण्याचे मान्य केले. रु. ५/- सर्वसाधारण सभेत आणखी वाढ झाली यावर प्रशासन सहमत नसेल शासनाकडे प्रस्तावा पाठविणार असेल तर यास उशीर होईल मंजुरी येण्यास २-३ वर्ष लागतील पुनहा फरक देण्यास प्रशासन नकार देईल व कामगारांवर अशा कार्यवाहीने अन्याय होईल म्हणून सथायी सिमतीने घेतलेल्या निर्णयावर का होईना ८०/- रु. प्रमाणे देण्याबाबत अंमलबजावणी प्रशासन केव्हा पासून कार्यवाही करणार.

श्री. कोकाटे काशिनाथ : अत्यंत निकडीचा प्रश्न आहे. सभा स्थगित करून चर्चा करून निर्णय घ्यावा.

मा. महापौर : सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ १.२० वाजता) तहकूब करण्यात आलेली सभा पुन्हा ०२.०० वाजता सुरू झाली.

श्री. संजय शिरसाठ : स्थायी समितीने ८०/- रु. दैनिक वेतन केलेला आहे त्याची अंमलबजावणी आजा पासूनच व्हावी तशी आपण रुलींग द्यावे.

श्री. दानवे अंबादास : नागेश्वरवाडी वॉर्डाचा नूतन सदस्य स. श्री चंद्रशेखर जैस्वाल यांचा या सभागृहातर्फे सत्कार करण्यात यावा.

याच वेळी नूतन सदस्य श्री. चंद्रशेखर जैस्वाल यांचा मा. महापौर, प्रशासनाच्या वतीने मा. आयुक्त यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात येते.

श्री. अफसर खॉन : उपमहापौरांचे पद रिक्त आहे. केंव्हा निवडणूक घेणार तारीख निश्चित करावी.

मा. महापौर : विषय क्र. १ आपण कायम करत आहोत मागील बैठकीत अस्थायी कामगारांना वेतन वाढ करावी म्हणून स्थायी समितीने मंजूर केलेला ठराव सर्वसाधारण सभेत सादर केलेला होता. त्या प्रस्तावावर चर्चा होऊन ८०/- रु. वरून ८५/- रु. करण्याचा आपण निर्णय घेतलेला होता. महानगरपालिकाची आर्थिक परिस्थिती विचारात घ्रेऊन व सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन स्थायी समितीने ८०/- रु. दैनिक वेतन देण्याचा मान्य केलेला प्रस्ताव कायम करण्यात येतो व पुढील वर्षी महानगरपालिकाची आर्थिक परिस्थिती सुधारल्यास या पेक्षा आणखी दैनिक वेतनात वाढ करण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी व दैनिक वेतनात वाढ करण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी व दैनिक वेतन रुपये ८०/- देण्या संदर्भात प्रशासनाने आज पासूनच कार्यवाही करावी. कामगारांचा विचार करून व सभागृहाची भावना लक्षात घेऊन पगार वाढ करण्यात यावी.

**ठराव :**

सर्वसाधारण सभा दिनांक २०/०९/२००१ ठराव क्र. ४७९/२ मध्ये स्थायी समितीने मंजुरी दिल्याप्रमाणे रोजंदारीवरील कर्मचाऱ्यांना रु. ८०/- प्रति दिवस अदा करण्यास आणि पुढील वर्षी महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारल्यास दैनिक वेतनवाढविण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वरील दुरुस्तीसह दिनांक २०/०९/२००१ च्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ४९६/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या हद्दित रस्त्याच्या कडेला दुभाजकामध्ये महानगरपालिकेच्या जागेत असलेल्या जाहिरात फलक धारकांकडून किंवा एजन्सीकडून खाजगी जागेवर १.१४ प्रति चौ. मी. प्रतिमहा व महापालिका जागेवर १.२६ प्रति चौ. मी. प्रतिमहा सदरील दर अत्यंत कमी आहे. महानगरपालिका हद्दित आत असलेल्या सिडको प्रशासनाने सिडको भागात निविदा मागविल्या आहेत. त्याच धर्तीवर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेच्या जागेवर, रस्त्याच्या कडेला रस्ता दुभाजकामध्ये महानगरपालिकेच्या जागेवर जाहिरात फलक, ॲड पोल, रस्ता दुभाजकामध्ये लावलेल्या ग्रीलवरील चौकोनी ३X४ आकाराच्या लोखंडी फ्रेमवर इत्यादी लावण्याची परवानी जाहीर निविदा काढून देणे योग्य होईल. करिता जहीर निविदा अपेक्षित आधारभूत दर खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | जाहिरात फलक आधारभूत रक्कम (आकार २०X१० फुट) | २,३००/- रु. प्रति जाहिरात |
| २ | ॲड पोलसाठी आधारभूत रक्कम | ३००/- प्रति ॲड पोल प्रति वर्ष |
| ३ | रस्त्याच्या दुभाजकामध्ये आधारभूत | ३००/- -//- |
| ४ | विद्युत पोलवर आधारभूत रक्कम (आकार २.५X३ फुट) | ३००/- -//- |
| ५ | रस्त्याच्या दुभाजकामधील चौकोनी २X३ आकाराची लोखंडी ग्रीलवरील | प्रति वर्ष |

उपरोक्त दर खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मागविण्यात येतील.

१) जाहिरात क्षेत्रात नोंदणी असणाऱ्या जाहिरात संस्थेस अथवा व्यक्तीस प्राधान्य देण्यात येईल.

२) जाहिरात फलकासाठी अनामत रक्कम रु. १,००,०००/- (एम लाख रु.) व रस्त्याच्या कडेला ॲडपोल, रस्ता दुभाजकामधील विद्युत पोलवरील ग्रीलवरील चौकोनी प्लेट इ. करिता २५,०००/- (पंचवीस हजार) प्रत्येक बिनण्याची डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात (राष्ट्रीय बँकेचा) उप-आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे नांवे काढून निविदे सोबत जोडा व तसेच निविदेच्या पाकीटावर डिमांड ड्राफ्टच्या क्रमांक बँकेचे नांव, रक्कम याचा उल्लेख करावा. त्याशिवाय आपली निविदा स्विकारली जाणार नाही.

३) जाहिरात संस्थेला व व्यक्तीना कमीत कमी ...५०. जाहिरात फलकासाठी नोंदणी करावी लागेल. तसेच रस्त्याच्या कडेचे व रस्ता दुभाजकामधील ॲडपोल

करिता कमीत कमी २०० प्रत्येकी फलकांसाची नोंदणी करावी लागेल. यापेक्षा कमी नोंदणी केलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

४) महानरपालिका प्रशासनाला जेंव्हा जेंव्हा जाहिरात फलक व ॲडपोलवर जाहिरात करण्यासाठी आवश्यक भासल्यास जाहिरात संस्ाितर्फे पुरविण्यात यावे व याबाबत कोणताही मोबदला देण्यात येणार नाही. मात्र ही संस्था प्रत्येक प्रकारानुसार दहा इतकी मर्यादित स्वरुपात राहील. काही जाहिरात तात्पुरत्या स्वरुपाच्या असल्यास व विशेष प्रसंगी असल्यास अल्पावधीत करता विना मोबदला द्यावे लागेल.

५) रस्त्याच्या दुतर्फा व लगत येणाऱ्या चौकात मनपाच्या जागेवर जाहिरात फलक लावता येईल.

६) फलक रस्त्यास समांतर लावावे लागेल.

७) वाहतुकीस कोणत्याही प्रकारचा अडथळा होणार नाही अशा प्रकारे जाहिरात फलक लावण्यात यावेत. तसेच दुकान व घराच्या प्रवेशाद्वारसमोर जाहिरात फलक लावता येणार नाही.

८) जाहिरात संस्थेकडून कोणत्याही परिस्थितीत रहदारीस अडथळा येता कामा नये. वाहतुक शाखा, व पोलिस मुख्यालयाकडून आलेल्या सूनांचहीही अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. तसेच जाहिरात फलक उभारणेपूर्वी पोलिस मुख्यालय तथा वाहतुक नियंत्रण कार्यालयामार्फत ना हरकत प्रमाणपत्र द्यावे व त्याची प्रत महानगरपालिका कार्यालयास सादर करावी.

९) रस्त्याच्या डांबरी भागाच्या पृष्ठ भागापासून जाहिरातीच्या खालच्या भागाचे अंतर कमीत कमी ९ फुट राहील.

१०) चौकाच्या मध्यापासून कमीत कमी ५० फुट अंतर असेल या करता महानगरपालिका जाहिरात धोरणांचा अवलंब करावा (या करिता वाहतुक नियमाचे पूर्णपणे पालन करण्यात यावे.)

११) रस्ता रुंदीकरणाच्या वेळी सदर जाहिरात फलक हटवावे लागतील व त्याचा खर्च जाहिरात संस्थेस करावा लागेल.

१२) महानगरपालिकेने दिलेल्या अटी व नियमांचे पालन योग्य प्रकारे होत नाही असे आढळून आल्यास लावण्यात आलेले जाहिरात फलक कोणत्याही प्रकारची पूर्ण सूचना न देता जप्त करण्यात येतील.

१३) जाहिरात फलकामध्ये वाहन चालकास किंवा पादचाऱ्यास अडथळा निर्माण

१४) महानगरपालिकेने मंजूर केलेल्या डिझाईन (साईज) वैयक्तिक कोणताही अतिरिकत बदल करू नये. याकरिता महानगरपालिकेतर्फे विशेष परवानगी घेणे आवश्यक आहे.

१५) वाहतुक नियमास संभ्रम निर्माण करणाऱ्या जाहिरात काढून टाकण्यात येईल व त्याकरिता दंड आकारण्यात येईल.

१६) थांबा, पहा, धोका इ. शब्द प्रयोग जाहिरातीत करता येणार नाही.

१७) अनामत रक्कम रु. १,००,०००/- जाहिरात फलकासाठी व २५००/- (पंचवीस हजार) रस्त्याच्या कडेचे व दुभाजकामधील ॲडपोलसाठी ही रक्कम महानगरपालिकेकउे कार्यादेश मिळाल्यापासून करार संपेपर्यंत अनामत रक्कम म्हणून बिनव्याजी राहील. कालावधीत आपणाकडून काही नुकसान झाल्यास या अनामत रक्कमेतून त्याची भरपाई करून घेतली जाईल.

१८) अश्लील जाहिरात अथवा उत्तेजक जाहिराती किंवा कुणाची मानहानी होईल अशी जाहिरात करता येणार नाही.

१९) दर महिन्याला आपलया जाहिरात संस्थेद्वारे करण्यात आलेली जाहिरातीतची माहिती लेखी स्वरुपात महानगरपालिकेस द्यावी लागले. लेखी स्वरुपात माहिती सादर न केल्यास जाहिरात फलक प्रतिमहा १०००/- रु. व रस्त्याच्या कडेचे व दुभाजकामधील ॲडपोल करिता प्रतिमहा ५००/ रु. दंड आकारण्यात येईल व या दंडाची रक्कम अनामत रक्कमेतून वसूल करण्यात येईल.

२०) जाहिरात फलकाची उभारणी करतांना किंवा लावतांना किंवा लावल्यानंतर होणाऱ्या मालमत्ता व जिवित हानीस मनपा प्रशासन जाबाबदार राहणार नाही. याची संपूर्ण जबाबदारी नियुक्त एजन्सीवर राहील.

२१) यापूर्वी ज्या जाहिरात संस्थेस व व्यक्तीस जाहिरात फलक लावण्याची परवानगी देण्यात आलेली होती. आजपर्यंतची थकबाकी रक्कम भरलेली नाही, त्यांनी थकित रक्कम भरणा करून बेबाकी प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

२२) महानगरपालिका प्रशासनाने एक किंवा अनेक व्यक्तीस व संस्थेस निविदेतील सर्वाधिक दरानुसार काम विभागून देण्याचा अधिकार राखून ठेवलेले आहे.

२३) जाहिरात फलक ॲडपोलचे काम विभागून दिलेल्या व्यक्तीस व संस्थेवर मनपाचे नियंत्रण राहिल. तसेच समप्रमाणात विभागणी करण्याचे अधिकार मनपाने राखनू ठेवलेले आहेत.

२४) रस्ता दुभाजकामध्ये ॲडपोल फलक उभारतांना दोन विद्युत खांबामध्ये दोन्हीकडे समान अंतर ठेवून केवळ एकच जाहिरात फलक उभारता येईल.

२५) महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या आधारभूत रककमेपेक्षा कमी दर असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. ज्या जाहिरात संस्थेस व व्यक्तींची निविदा स्विकारण्यात येईल. संपूर्ण रक्कम निविदा अंतिम झाल्यापासून एक महिण्याच्या आत ५०% दोन आठवड्यात २५% एक महिण्यास पूर्ण भरावी लागेल. अन्यथा करार रद्द केला जाईल.

२६) ज्या जाहिरात संस्थेची व्यक्तीची निविदा ०१/०४/२००१ पासून स्विकारली जाईल. त्याची दरवर्षी ३१ मार्चपूर्वी मनपा कार्यालयाकडून नुतनीकरण करावे. तसेच नुतनीकरणाच्या वेळी निविदेतील रक्कम अधिक दहा टक्के भरून नवीन परवाना महानगरपालिकेकडून घ्यावा. या बाबतची संपूर्ण जबाबादारी संस्था वव्यक्तीची राही. ३१ मार्च पूर्वी रक्कम न भरल्यास पुढील परवाना देण्यात येणार नाही. तसेच साहित्य जप्त करण्यात येईल. तो करार फक्त तीन वर्षासाठी राहील व करार तीन वर्षानंतर कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द होईल. जर कराराचे पहिल्या व दुसऱ्या वर्षी नुतनीकरण व न केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. नुतनीकराचे अधिकार महानगरपालिका प्रशासनाने राखनू ठेवलेले आहेत.

२७) मनपा प्रशासनामार्फत देण्यात येणाऱ्या सूचनांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

२८) जाहिरात करतांना जाहिरात फलक, ॲडपोलच्या उजव्या बाजूस महानगरपालिकेने दिलेल्या परवानगी क्रमांक, वर्षे टाकणे बंधनकार राहिल.

२९) कोणत्याही खाजगी, सार्वजनिक मालमत्ताचे नुकसान जाहिरात फलक, ॲडपोलमुळे झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी एजन्सी धारकांवर राहील व त्यावर होणारा खर्च एजन्सीस द्यावी लागेल.

३०) केंव्हाही एक महिण्याची पूर्ण सूचना देऊन काही किंवा पूर्ण फलक किंवा संपूर्ण कंत्राट रद्द करणेबाबतचे अधिकार मनपा प्रशासनाचे राहिल.

३१) लेखी करारनामा करून द्यावा लागेल.

उपरोक्त अटी व शर्तीच्या अधिन राहून जाहिरात फलक, ॲडपोलची जाहिर निविदा काढणेबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. महापौर : या प्रस्तावासंबंधी प्रशासनामार्फत माहिती प्राप्त झालेली आहे. सचिव वाचून दाखवितील.

नगरसचिव : औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे, जाहिरात, होर्डींग भाड्याने देणे बाबत सध्याची प्रचलित पध्दत बंद करून मुंबई, ठाणे, पुणे या ठिकाणी महानगरपालिकेने ज्याप्रमाणे जाहिरात बोर्ड देण्याची पध्दत अवलंबिली आहे. त्याचप्रमाणे येथे देखील कन्सलटंट नेमून त्यांचे द्वारे अटी व शर्ती आणि दर व जागा निश्चिती ठरवून घेवून नंतर टेंडर मागविण्यात यावे. करिता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

श्री. दलबिरसिंग जबिंदा : तत्कालीन आयुक्त यांचे कार्यालयात हा प्रस्ताव सभागृहाच्या मंजुरीसाठी आलेला होता. त्या अगोदरचे आयुक्त श्री. बलदेवसिंग यांचे कार्यालयात सुध्दा प्रस्ताव आलेला होता. प्रत्येक आयुक्तंच्या काळात एक वेळेस प्रस्ताव सादर होतो. आहे याचे कारण काय अद्याप पर्यंत मागील निर्णय नुसार टेंडर का काढलेले नाही. त्यांचा खुलासा करावा.

श्री. सुरजितसिंग खुंगर : प्रशासनाला जाणीव करून देण्यासाठी ०६/०८/२००० मध्ये पहिल्यांदा मी पत्र दिलेले होते. उशीरा का होईना प्रशासनाने हा प्रस्ताव सादर केला त्याबद्दल प्रशासनाला धन्यवाद देतो. जे की, या प्रस्तावानुसार महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळणार आहे. सध्या महानगरपालिची आर्थिक परिस्थिती चांगली नाही व आपणा सर्वांचे महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढविता येईल याचे प्रयत्न केले जाते. व उत्पन्न वाढले नाही तर कोणतेही विकास कामे होणार नाही याची सर्वांना जाणीव आहे. विभाग हे स्वतःच्या बळावर चांगले कार्य करण्याची अपेक्षा ठेवतो. या प्रस्तावानुसार आपण सर्व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याचा दृष्टीकोन समोर ठेवून कार्यवाही करीत आहोत हे दिसून येते. या मागे काय झाले याचा विचार न करता चर्चा करणे बरोबर होणार नाही. या अगोदर खूप कमी दराने होर्डींग लावण्यात येत होते. कोणत्याही प्रकारचे प्रशासनाचे नियोजन न्हवते व प्रशासनाचे नियाजन असावे म्हणून मी बऱ्याच वेळा पत्र ही दिलेले आहे. शासनाकडे सुध्दा या संबंधिची मागणी केलेली होती. त्यानुसार शासनाने जे निर्देश दिले व त्यासंबंधीची मागील बैठकीत सभागृहास जी चर्चा झाली त्यामुळे प्रशासनाने हा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर केलेला आहे. स्थानिक लोकांना याचा ठेका मिळावा म्हणून प्रश्न उपस्थित करण्याची शक्यता आहे. परंतु महानगरपालिकेचा ज्यामध्ये फायदा आहे जे

की, इतर महानगरालिकेमध्ये ज्या पध्दतीने कार्यवाही झालेली आहे, होत आहे. त्यानुसार या महानगरपालिकेने करावी व या महानगरपालिकेने ही इतर महानगरपालिकेप्रमाणे चांगल्या प्रकारचे कार्य व मोठ्या प्रमाणात उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू केली म्हणून सर्वांनाच आनंद आहे. आता सध्या या महानगरपालिकेस २ ते २.५० लक्ष उत्पन्न मिळते. या प्रस्तावानुसार कमीत कमी ५० लक्ष ते १ कोटी रुपयापर्यंत उत्पन्न मिळू शकेल व येणारा पैसा हा विकास कामासाठीच खर्च करण्यात येणार आहे. याबाबतची कार्यवाही २००१-२००२ अशी सुरू करण्यात येईल म्हणून दिले. परंतु यातील अर्धा कार्यकाळ निघून गेलेला असून कार्यवाही करण्यास अडच्ण निर्माण होईल म्हणून येत्या १ एप्रिल २००२ पासून ही कार्यवाही अंमलात आणण्याची कार्यवाही करावी अशी मागणी करतो. १ एप्रिल पर्यंत इतर महानगरपालिकेची आणखी आवश्यक ती माहिती मागवून पुढील कार्यवाही करण्यात यावी जेणे करून प्रशासनास काम करणे सोयीस्कर होईल.

श्री. स. अली मिरा सलामी : या प्रस्तावास अनुशंगाने व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने स. सदस्य श्री. सुरजीतसिंग खुंगर यांनी वेळोवेळी प्रशासनास जाणीव करून उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केलेले आहे. बऱ्याच वेळा सभागृहात सुध्दा चर्चा झालेली होती. व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढत असेल तर चांगलेच आहे. यात शंका नाही. प्रस्ताव कोणी सादर केला तसे दिलेले नाही. व प्रस्तावात दिलेले दर हे कोणी निश्चित केले. जाहिरात फलक आधारभूत २०X१० फुटासाठी २३००/- प्रति वर्ष रस्ता दुभाजकामध्ये ३००/- रुपये प्रति ॲडपोलसाठी नमूद केले. दिलेले दर कसे निश्चित केले कृपया याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखाधिकारी : आताच या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रशासनामार्फत दिलेली पुरवणी टिप्पणी सचिव यांनी वाचून दाखविलेली आहे हे जे दर दिले आहे हे दर आपणांस मंजूर करावयाचे नाही. होर्डींगच्या बाबतीत आपण मुंबई, पुणे महानगरपालिकेच्या धरतीवर सर्व्हेचे काम होती घ्यावे लागणार आहे. कन्सलटन्ट नेमून आपण सर्व्हे करणार आहोत. आपल्याकडे विविध ठिकाणी मोक्याच्या जागा आहेत. क्रांतीचौक, निराला बाजार प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे दर येतील. त्यामुळे शहराचे सौंदर्यीकरण सुध्दा त्यामध्ये येईल. म्हणून कन्सलटंन्ट नेमून कार्यवाही करावयाची आहे. सादर केलेले दर सद्यस्थितीत आपल्याला मंजूर करावयाचे नाही.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : होर्डींगचे दर निश्चित करण्याच्या बाबतीत प्रस्ताव सादर झालेला आहे. या शहरातील काही स्थानिक एजन्सीज काम करतात त्यांचेकडे ५० ते १०० कामगार नेहमी असतात नुकताच सिडको हडको तील अतिक्रमणामुळे तरुणावर बेकारी व उपासमारीची वेळ आलेली आहे. सरकार नौकरी देत नाही, विविध कंपन्यामध्ये सुध्दा कामे मिळत नाही ज्या स्थानिक एजन्सीज आहे. त्यांनी आतापर्यंत येथील स्थानिक लोकांनाच रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. त्यावरच त्यांचे घरदार, संसार चालतो. म्हणून स्थानिक एजन्सीला हा ठेका देण्यात यावा अशी अट टेंडरमध्ये असावी. दुसरी बाब अशी काही एजन्सीने होर्डींगचे काम मिळेल म्हणून काही

बँकाकडून कर्ज उपलब्ध करून घेतलेले आहे. कंपनीशी ॲग्रीमेंट झालेले आहे. व आपण स्थानिक एजन्सीला हा ठेका दिला नाही तर त्यांचेवर अन्याय होणार आहे. इतर बाहेरील लोकांना हा ठेका देणे योग्य नाही. बाहेरचे लोक यायचे, राज्य करायचे योग्य नाही. म्हणून सेंचे काम करून घ्यावे दर काढून घ्यावा. व मार्चनंतर यांची कार्यवाही झाल्यास आणखीच उत्तम जे की स्थानिक लोकांना याची माहिती होईल. स्थानिक लोकांनाच या प्रस्तावानुसार फायदा व्हावा जेणेकरून गरीब बेरोजगार कामगारांना काम मिळेल व त्यांचेवर अन्याय होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

श्री. संजय शिरसाठ : गेल्या सहा महिण्यापासून या संदर्भात सभागृहात चर्चा होते. प्रशासनामार्फत त्यानुसार प्रस्ताव सादर केलेला असून सर्व प्रथम सन्माननीय सदस्य श्री. खुंगर यांचे अभिनंदन त्यांनी होर्डींग बाबत व महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने एक चांगल्या प्रकारची कार्यवाही करण्याची सुरुवात केली. चांगल्या प्रकारे प्रशासनाकडे व शासनाकडे पाठपुरावा केला शहराचा सर्वे करून त्यांनी व्हीडीओ कॅसेट सुध्दा केलेली आहे. व तसा प्रस्ताव आज आपल्यासमोर मंजुरीसाठी सादर झालेला आहे. या अगोदर ज्या लोकांना आपण होर्डींग्ज भाड्याने दिले त्या दरामध्ये खूप तफावत होती. त्यामुळे महानगरपालिकेस येणारे उत्पन्न योग्य प्रकारे झालेले नाही. म्हणून सर्वसाधारण सभेत चर्चा झाली की, आता या बाबतीत टेंडर काढले गेले पाहिजे. त्यानुसार सक्षम अधिकारी सिउको प्रशासनाकडे गेले. सिडकोचे होर्डींगच्या बाबत काय रेट आहे याची माहिती घेतली व सिडकोचे जे दर आहेत त्याची मुळ नक्कल केली आहे. त्याच अटी टाकल्या आहेत. दोन महिने सभागृहास चर्चा झाल्यानंतर सुध्दा काहीच निष्पन्न झाले नाही. या प्रस्तावास प्रशासनाने आता दुरुस्ती केली आहे. माझे मत आहे आपल्या कार्यवाहीमुळे व महिण्याचे पैसे भरून घ्यावे. आतापेक्षा ३ पट जास्त भरून घ्यावे. रुलींग देतांना अधिकाऱ्यांनी काय कार्यवाही करावयाची ते सांगावे. त्यांना अधिकार देण्यात यावे. सर्वेक्षणासाठी सुमारे ५-६ लक्ष खर्च अपेक्षित वाटते. अहवाल २ महिण्यात प्राप्त झाल्यानंतर जो अपेक्षित दर येईल यासंबंधी स्थानिक लोकांना प्रथमतः प्राधान्याने बोलवावे. त्यांना मान्य असेल तर निविदा काढू नये.

श्री. स. अली मिरा सलामी : आताच मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा केला की, अगोदर सर्वेचे काम करणार असून त्यानंतर दर निश्चित करावयोच आहे. प्रस्तावानुसार दर निश्चित करावे मुंबई पुणे ठोणे महानगरपालिकेकडे काय दर आहे अहवाल मागवावा त्या नुसार पुन्हा तडजोड करून काय दर ठेवायचे ते प्रशासनाने ठरवावे. त्यानुसार पुढील कार्यवाही करावी. सभागृहनेता व इतरांनी सांगितले की, निविदा काढू नये किती टक्के वाढवून घेवू शकतो हे आपसात बसून ठरवून दर निश्चित करून घ्यावे. कमेटीचा अहवाल येईल. स्थानिक लोकही या धंद्याशी निगडित आहेत. महानगरपालिकाचे यात नुकसान होऊ नये व कोणत्या ठिकाणी बोर्ड लावण्यासाठी योग्य आहे कुठे योग्य नाही याची सविस्तर माहिती घेऊनच कार्यवाही करावी.

श्री. प्रकाश निकाळजे : स. सदस्य श्री. खुंगर यांनी महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने या प्रस्ताव आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. त्यांचे सभागृहातर्फे

अभिनंदन करतो. सिडको व महानगरपालिकेची जेथे हद्द आहे त्या ठिकाणी सिडकोने ज्या बोर्डसाठी २३००/- रुपये ्रति वर्षाला दर आकारणी केलेली आहे त्याच बोर्डच्या बाजूला महानगरपालिकेच्या हद्दित असलेल्या त्याच आकारच्या बोर्डला फक्त २६६/- रुपये प्रति वर्षाला दर आकारणी होते. यात तीन पट वाढ करून सुध्दा सिडकोच्या दराने रक्कम वसूल होत नाही. आताच चर्चा झाली की, मार्च नंतर टेंडर काढावे परंतु या अगोदर कोणत्याही प्रकारचे ॲग्रीमेंट किंवा टैंडर झालेले नाही. आहे त्या दराच्या तीन पट दर लावण्यात आलेलेल आहे. ते सुध्दा सभागृहाच्या मंजुरीने कार्यवाही केलेली आहे. प्रत्येक संस्थेचे हित जोपासण्यासाठी व त्यानुसार महानगरपालिकेचे नुकसान होत असेल तर तशी चर्चा करणे योग्य होणार नाही कारण या सभागृहाने महानगरपालिकेचा फायदा काय आहे हे पाहावे. नसता नुकसानच होत गेल्यास उद्या कर्मचाऱ्यांचे वेतन देणे शक्य होणार नाही. अशी परिस्थिती येऊ नये. उत्पन्न वाढवावयाचे निविदा का नाही खैरात का वाटावयाची आताच आर्थिक बाबीचा प्रश्न निर्माण झाला कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये ५/- रुपयाने दैनिक वेतनामध्ये वाढ करू शकलो नाही. म्हणून महानगरपालिकेचा जेथे फायदा होईल या दृष्टीने १५ दिवसाच्या आत शॅार्ट टेंडर नोटीस काढून कार्यवाही करावी. स्थानिक लोकांना हे काम मिळावे ही सर्वांचीच अपेक्षा आहे परंतु ते सुध्दा टेंडर घेतांना स्पर्धेत असले पाहिजे. विचार करता येईल. १ महिण्यात निविदा काढाण्यात यावी.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : स्थानिक एजन्सीने बँकाकडून कर्ज घेतलेले आहे. टेंडर देतांना स्थोनिक एजन्सीजचा विचार व्हावा बेरोजगांराना कामे मिळती. या ठिकाणी मी कुणाची बाजू घेऊन चर्चा करत नाही. तसा विचार सभागृहाने करू नये. महानगरपालिकेचा सुध्दा फायदा व्हावा याकडे सुध्दा लक्ष देणे गरजेचे आहे. ज्यांनी कर्ज घेतलेले आहे त्याचे घरावर उद्या जप्ती येईल. हा मुद्दा सुध्दा विचारात घेणे गरजेचे आहे. १५ वर्षापासून या एजन्सीज महानगरपालिकेची सेवा करित आहे. म्हणून उर्वरित या वर्षातील ४ ते ५ महिने वाढवून देऊन एप्रिलपासून नवीन पध्दतीने कार्यवाही करावी. महानगरपालिकाचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने विचार केल्यास शहरामध्ये बऱ्याच राज्यातील राजस्थान, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश व इतर राज्यातून लोक व्यवसायासाठी आलेले आहेत. हातगाडीवाले आहेत. त्यांना सुध्दा दररोजचे १०००/- रुपये निव्वळ नफा मिळत नाही. परंतु जे लहान लहान वडापाव १,२ हजार रुपये निव्वळ नफा कमवितात त्यांचेकडून काही भाडे वसूल करणार नाही का? ते करावयास पाहिजे. कारण हे लोक महाराष्ट्रामध्ये पैसे कमवितात व त्यांचे गाडीवर त्याचे त्या त्या प्रांतातील भाषेत बोर्ड लावलेले असतात. म्हणून बोलण्याचा मुद्दा असा की, बाहेरील लोक येथे येऊन व्यवसाय करतात पैसे कमवितात व त्याचे मुळगावी पैसा पाठवितात म्हणून अशा लोकांकडून कर वसूल केला पाहिजे व त्याचे गाड्यावर, स्टॅालवर जे नांव टाकण्यात येतात ते सक्तीने मराठी भाषेत त्यांनी लिहिले पाहिजे अशी कार्यवाही करण्यात यावी यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ निश्चित होईल.

श्री. अफसरखॅान : या अगोदर सुध्दा एजन्सी निश्चित करून टेंडर काढण्यास आलेले होते. परंतु त्यावेळचे दर आताचे दरामध्ये फार फरक येतो. मागील दराप्रमाणे

महानगरपालिकेस म्हणावे तसे उत्पन्न मिळाले नाही. म्हणून टेंडर काढून एजन्सी फिक्स करावी. जेणे करून महानगरपालिकेचा यात फायदा होईल त्यादृष्टीने टेंडर काढून कार्यवाही व्हावी. कुण्याही एजन्सीने बँकेकडून कर्ज घेतले असेल ते महानगरपालिकेच्या भरवश्यावर घेतलेले नाही. फिक्स दर नकोत निविदा काढून द्यावे.

श्री. पंडागळे रतनकुमार : होर्डीगच्या बाबतीत तत्कालीन आयुक्त श्री. बलदेवसिंग यांचे कार्यकाळापासून कार्यवाही चालू आहे अद्याप टेंडर काढलेले नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे यात नुकसान झालेले आहे. म्हणून आता जाहीर टेंडर काढून त्याप्रमाणे कार्यवाही करावी जेणे करून महानगरपालिकेचा काय फायदा होईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

मुख्यलेखाधिकारी : जी जाहिरात आपण देणार आहात त्याची प्रक्रिया ही दोन टप्प्यात राहील पहिली जाहिरात फक्त कन्सलटंन्ट नेमण्यासाठी, त्यानंतर दोन महिने सर्वेसाठी लागणार आहे. किती जागा, कोणत्या ठिकाणी आहेत, कोणत्या ठिकाणी जाहिरात असावी, बोर्ड कसे लावता येईल, या बाबतीत संपूर्ण सर्वे करावा लागणार असून ठाणे महानगरपालिकेच्या धरतीवर आपण कार्यवाही करणार आहोत. व संपूर्ण सर्वेचे काम पूर्ण झाल्यानंतर महानगरपालिकेस किती उत्पन्न मिळेल याचा अंदाज घेतला जाईल व त्याची संपूर्ण तपासणी करून दुसरी जाहिरात देऊन जे की, शहरात या ठिकाणी जागा आहे जाहिरात बोर्ड लावण्यासाठी देणार आहे अशा प्रकारची जाहिरात देऊन कार्यवाही होईल आज ठराव मंजूर झाल्यानंतर कन्सलटंट नेमण्यासाठी सोमवारी जाहिरात देऊन कार्यवाही होईल. त्यासाठी १५ दिवस लागतील त्यानंतर सर्वेसाठी २ महिणे लागतील. सर्वे झाल्यानंतर टेंडर काढावे लागेल व एजेन्सी निश्चित करण्यासाठी १ महिण्याचा कालावधी द्यावा लागणार आहे. किती जागा उपलब्ध आहे. त्या सर्वच जागाचे दर निश्चित केले जाईल व अमुक अमुक एजन्सीला प्राधान्य द्यायचे या दृष्टीकोनातून कार्यवाही होणार नाही. ही कार्यवाही करण्यासाठी ४ महिने लागतील.

श्री. प्रकाश निकाळजे : आताच लेखाधिकारी यांनी खुलासा केला की, संपूर्ण जागेचा सर्वे करावा लागणार आहे. आणखी कोठे जागा उपलब्ध होतील याची माहिती घ्यावी लागेल. या अगोदर जे १५ ते २० हजार बोर्ड भाडे दराने लावण्यासाठी दिलेले आहे. त्यांची नोंद महानगरपालिकेकडे नाही काय माहिती द्यावी त्यावर काय कार्यवाही करणार.

मुख्यलेखाधिकारी : महानगरपालिकेने बोर्ड लावण्याची जी परवानगी दिलेली आहे. ती मर्यादित स्वरुपात दिलेली आहे. सर्वे करतांना महानगरपालिकेच्या मालकीच्या तसेच इतर काही जागेवर बोर्ड लावता येतील काय याची सुध्दा नोंदी घेतल्या जातील व त्यादृष्टीने कार्यवाही करावी लागणार आहे. आता सध्याच्या परिस्थितीत आपण वैयक्तिक त्या त्या लोकांच्या मागणीनुसार बोर्ड लावण्याची परवानगी देतो. यानंतर कोणत्या भागासाठी कितीवर असावे याची संपूर्ण माहिती संबंधित कन्सलटंन्ट देणार आहे व त्यानुसार दर निश्चित करणार आहोत. सर्वेनुसार बोर्ड लावण्याच्या जागेच्या संखेत वाढ होऊ शकेल.

श्री. प्रकाश निकाळजे : महानगरपालिकेपासून एकाच रस्त्याचा विचार केल्यास जवळपास १०००/- हून अधिक बोर्ड लागवण्या आलेले आहे त्याची पोंद महानगरपालिकेकडे नाही काय नसेल तर मागील बैठकीत या सभागृहाने आहे त्या दरात तीन पट करून २६६/- ऐवजी ७०० ते ८०० रुपये वसूल करण्यात आले ते नोंदी नसतांना कशा पध्दतीने वसूल केलेले आहे.

मुख्यलेखाधिकारी : ज्यांना आपण भाडेपट्ट्याने दिलेले आहे त्यांचेकडून तीन पट वसूल करीत आहोत. सर्वेमध्ये आहे त्या जागेच्या व्यतिरिक्त आणखी कोणत्या जागेवर बोर्ड लावता येतील काय याची सर्वेमध्ये सर्व माहिती घेतली जाईल व त्यानुसार महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यास आणखी भर पडेल. म्हणून कन्सलटंन्ट नेमण्याची आवश्यकता आहे.

श्री. सुरजितसिंग खुंगर : या अगोदर संपूर्ण शहरातील होर्डींगचे व्हिडीओ कॅसेट केलेली आहे. किती बोर्ड आहे कोणत्या ठिकाणी जागा रिकाम्या आहेत. याची माहिती घेतलेली आहे. त्याची कॅसेट सुध्दा प्रशासनाकडे मागणीनुसार पुरविण्यात येईल.

श्री. प्रशांत देसरडा : होर्डींग प्रमाणेच इतर काही वेगवेगळ्या प्रोजेक्टला एजन्सीज निश्चित केलेल्या होत्या. नळ सर्वेक्षणाचे काम ज्या एजेन्सीजला दिले होते त्याच एजन्सीजला टेंडर काम देण्यात आलेले होते. परंतु सदर प्रकरणातील संचिका कोठे आहे अद्याप ठावठिकाणा नाही. त्यासाठी ज्या एजन्सीज होर्डींग सर्व्हेक्षणाचे काम देण्यात आले तर त्याच एजन्सीजचे टेंडर भरून आल्यानंतर काम देण्यात येऊ नये. प्रत्येक वेळी नवीन आयुक्त येतात वेगवेगळे विचार मांडण्यात येते. सध्याचे आयुक्त चांगल्या विचाराचे असून ताबडतोब टेंडर काढून कार्यवाही व्हावी.

श्री. तकीहसन खॉन : इंडियन शेड कॉंग्रेस आय आर सी रिपोर्टची माहिती घेतल्यास होर्डींग बाबत कोणत्या अटी व शर्ती पूर्ण करणे गरजेचे आहे हे समजून येईल जे की, कोणत्या पध्दतीने जाहिरात फलक, कोठे कोणत्या रस्त्यावर, किती अंतरावर इ. सर्व मार्गदर्शन मिळू शकेल.

श्री. प्रकाश निकाळजे : शहरात किती होर्डींग लावलेल्या आहेत. किती होर्डींगचे भाडे वसूल करण्यात येते. येणारे उत्पन्न किती माहिती देण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी : महानगरपालिकेच्या जागेवर एकूण ३४२ होर्डींग लावलेल्या आहेत. खाजगी जागेवर एकूण १५ होर्डींग लावलेल्या आहेत. क्युओक्स २७५ आहेत. दुभाजकामधील पोल २७७ आहेत. रस्त्याच्या बाजूला असलेले होर्डींगचे पोल ४८ असून दिशादर्शक ६० आहेत. असे एकूण ९६५ ठिकाणी होर्डींगचे लावण्याची परवानगी दिलेली आहे.

श्री. अफसरखॉन : स. सदस्य श्री. सुरजितसिंग खुंगर यांनी संणूर्ण शहराचा सर्वे करून शहरातील महानगरपालिका हद्दित असलेले बोर्डची व्हिडीओ कॅसेट रेकॉर्डींग केलेली आहे. आमच्या माहितीप्रमाणे ७९००/- बोर्ड आहेत या ठिकाणी फक्त ९६५ बोर्डला परवानगी असल्याची माहिती दिली जावे. तर ७ हजार बोर्ड अनाधिकृत होतात. रेकॉर्डींग केलेली कॅसेट या सभागृहात एक विशेष सभेच आयोजन करून सर्वक्षण पाहु शकतील.

मा. आयुक्त : शहरात ज्याही होर्डींग आहेत त्याची २० ते २५% चे वर आपल्याकडे नोंद नाही यात शंका नाही. एका होर्डींग पासून संबंधित व्यक्तीने २,६०,२६५/- भरल्यानंतर संबंधित व्यक्तीचे त्या जाहिरातीमधून किती उत्पन्न मिळत असेल

याचा विचार कुणी करत नाही तो करावयास पाहिजे. कोणत्याही व्यापारामध्ये १५ ते २०% चे दर नफा होत नाही. ज्यांचेकडून आपण २६६/- रुपये वसूल करतो असे होर्डींग धारक याच्या बदल्यात ७०००/- , ८०००/- घेत असेल तर यात महानगरपालिकाचे नुकसान होते कोणी कसेही फलक लावले आहेत. सध्या शहरातील होर्डींग कशा पध्दतीने लावण्यात आलेल्या आहेत याची कल्पना आपणा सर्वांना आहे. कोठेही व्यवस्थित होर्डींग लावलेल्या दिसणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र आहे समोर लावल्यामुळे रिसर्च सेंटर दिसत नाही. चौराहा दिसत नाही. म्हणून जे बोर्ड लावलेले आहे ते नियोजन बध्द नाही. जे की, कायद्याच्या चौकटीत येत नाही. म्हणून याची योग्य ती कार्यवाही करण्यासाठी आपल्याला थोडा आणखी वेळ लागेल परंतु सर्व काम नियोजनानुसार करण्यात येईल. सध्या अशी परिस्थिती आहे की, लोक कुठेही बोर्ड लावतात. व परवानगीसाठी महानगरपालिकेकउे येतात आपले कर्मचारी सुध्दा परवानगी देऊन टाकतात एका बोर्डच्या पाठीमागे दुसरा बोर्ड लावण्याची कार्यवाही होते. हे बरोबर नाही. हे करीत असतांना शहराचे सुशोभिकरण कसे जास्तीत जास्त होईल याकडे सुध्दा पाहणे गरजेचे आहे. म्हणून या कामासाठी आपणा सर्वांच्या संमतीने चांगले कन्सलटंट नेमून सर्वेची कार्यवाही करून घेऊन नंतर पुढील कार्यवाही केल्यास जवळपास ६० ते ८० लाखापैखा कमी उत्पन्न महानगरपालिकेस मिळणार नाही येथे उत्पन्नाचा प्रश्नही विचारात घेण्यासारखा असून शहरचे सुशोभिकरण सुध्दा त्याच बरोबर झाले पाहिजे. हे सुध्दा महत्वाचे आहे. म्हणून सर्व कार्यवाहीसाठी ३ ते ४ महिने आणखी आहे. १ एप्रिल २००१ पासून या प्रस्तावानुसार कार्यवाही करण्यात येईल.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : मा. आयुक्तांनी जो खुलासा केला त्यास आमची सहमती आहे. कोणत्याही प्रकारचे दुमत नाही.नाही. मुख्यलेखाधिकारी यांनी खुलासा केला की यासाठी ४ महिण्याचा अवधी लागेल. आमचा मुद्दा असा की जे उर्वरित ६ महिने बाकी आहे या एजन्सी धारकांकडून सहा महिण्याचे तीन पट रक्कम भरून घ्याची आणि संपूर्ण सर्वे करून स्थानिक बेरोजगारांना कामे मिळतील अशी अपेक्षा करतो. स्थानिक एजन्सीसशी चर्चा करावी.

डॉ. भागवत कराड : होर्डींग बाबत जवळपास दीड वर्षापासून कार्यवाही चालू असून अद्याप जाहिरात देऊन पुढील कार्यवाही केलेली नाही. आताच मा. आयुक्तांनी सांगितल्याप्रमाणे जे की, नुसते उत्पन्न न पाहता शहराचे सुशोभिकरण सुध्दा होणे महत्वाचे आहे. महानगरपालिकेचा जास्तीत जातस्त फायदा ज्यामध्ये आहे त्यानुसार कार्यवाही व्हावी. व स्थानिक एजन्सीला प्राधान्य देता येत असेल तर त्या प्रमाणे सुध्दा कार्यवाही करण्यासाठी प्रशासराने प्रयत्न करावे. त्याचप्रमाणे शहरात मोठमोठ्या इमारतीवर सुध्दा होर्डींग लावण्यात आलेली आहे. त्याबद्दलची माहिती प्रस्तावामध्ये नमूद केलेली नाही. तशी प्रस्तावात दुरुस्ती करून कार्यवाही करावी.

मा. महापौर : सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन मी प्रशासनाला असे सुचवितो की, ३१ मार्च २००२ पर्यंत दरापेक्षा तीपट वाढ करून कर भरून घ्यावे आणि जी एजन्सी आपणा सर्वेसाठी नेमण्यात येणार आहे लवकरात लवकर सर्वेचे काम करण्यात यावे. सभागृहाने स्थानिक एजन्सीजला हे काम देण्याबाबत मत व्यक्त केलेले आहे. त्यानुसार स्थानिक एजन्सीजचा यचामध्ये सा

सहभाग होऊ शकेल याबाबत प्रशासनाने ठरवावे. नियमाने कार्यवाही करावी. सद्या महानगरपालिकेतील कार्यरत असलेल्या एजन्सीला चर्चेस बोलावून वाटघाटी करण्यात यावे. त्यांनी आपले अटी शर्ती व दर मान्य न केल्या निविदा काढण्यात यावी. जो प्रस्ताव नगर सचिव यांनी वाचून दाखवला त्या दुरुस्तीसह मंजुरी देण्यात येत आहे. येणारे टेंडर व त्यास मंजुरी व नवीन दराप्रमाणे १ एप्रिलपासूनप्रशासनाने कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

श्री. पंडागळे रतनकुमार : यामध्ये महिलासाठी काही राखीव म्हणून दिलेले आहे काय आपल्या नियमामध्ये काय आहे. खुलासा घ्यावा.

मुख्यलेखाधिकारी : महिलांसाठी आरक्षण फक्त ज्या दुकाना वगैरे आहे त्यामध्ये, जाहिरात (होर्डींग) वगैरे नाही.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व प्रशासनाने सदर प्रस्तावास पुरक महिती दिल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे जाहिरात (होर्डींग) भाड्याने देणे बाबत सध्याची प्रचलित पध्दत रद्द करून मुंबई, ठाणे, पुणे या ठिकाणी महानगरपालिकेस ज्याप्रमाणे जाहिरात फलक देण्याची पध्दती अवलंबलेली आहे त्याचप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेत देखील कन्सलटंट नेमून त्यांचेद्वारे अटी, शर्ती, आणि दर व जागा निश्चिती ठरवून घेऊन नंतर निविदा मागविण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जाहिरात दरामध्ये ३१ मार्च २००२ पर्यंत विद्यमान दरात तीन पट वाढ करून ते भरून घेण्यास आणि स्थानिक एजन्सीचा यामध्ये कसा सहभाग होऊ शकेल याबाबत प्रशासनाने योगय ती कार्यवाही करण्यास व विद्यमान जाहिरात एजन्सीला चर्चेस बोलावून त्यांनी आपले अटी, शती व दर मान्य केल्यास त्यांचा विचार करण्यास तसेच नविन दर १ एप्रिल २००२ पासून आकारणी करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९७/३ :**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक/पासुस/२०००/प्र.क्र.२३/का१४७४(२) मंत्रालय मुंबई, दि. २३/०२/२००१ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेने प्रत्येक वर्षी रु. १.५० कोटी याप्रमाणे ३ वर्षात रु. ४.५० कोटी रस्ते विकास महामंडळास उपलब्ध करून द्यावे. म्हणून शासनाने निर्णय घेतलेल्या आहे. सदरचा निर्णय घेतांना शासनाने नमूद केले आहे की प्रस्तावित रस्त्याची व पुलाची कामे की औरंगाबाद शहरातील विकास आराखड्यातील असल्याने ही कामे हाती घेवून पूर्ण करणेची प्राथमिक जबाबदारी प्रामुख्याने औरंगाबाद महानगरपालिकेची आहे तथापी या प्रकल्पात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्तयाचाही समोवश आहे.

सदर प्रकल्प कालबध कार्यक्रम असून पूर्ण करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिका मराठवाडा वैधानिक मंडळ, नगर विकास विभाग तसेच औरंगाबाद शहरातील विधानसभा विधान परिषद / संसद सदसय यांच्याकडून निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

शहराच्या निर्णयातील मुद्दा क्र. ५ (अ) प्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेने प्रत्येक वर्षी रु. १.५० कोटी याप्रमाणे तीन वर्षात रु. ४.५० कोटी निधी उपलब्ध करून द्यावा असा निर्णय दिलेला आहे. त्यानुसार औरंगाबाद महानगरपानिकेने महाराष्ट्र राज्य रस्ते

विकास महामंडळास शहर व परिसरातील रस्ते विकसित करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला प्रति वर्ष रु. १.५० कोटी प्रमाणे तीन वर्षात रु. ४.५० कोटी निधी उपलब्ध करून देण्यास्तव महानगरपालिकेचा सन २००१-२००२ च्या सुधारित अंदाजपत्रकात तरतूद करणे तसेच पुढील दोन वर्षासाठी प्रति वर्ष रु. १.५० कोटी तरतूद अर्थसंकल्पात करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा. महापौर : अति. शहर अभियंता यांनी या प्रस्तावानुसार सविस्तर माहिती सभागृहाला द्यावी.

अति. शहर अभियंता : प्रत्येक वर्षी रस्ते विकास महामंडळास महानगरपालिकेने १.५० कोटी रुपये द्यायचे असा शासनाचा निर्णय झालेला आहे. एकूण ४.५० कोटी रुपये तीन वर्षात द्यावयाचे आहे २००१-२००२ या वर्षामध्ये महानगरपालिकेला रस्ते विकास महामंडळास १.५० कोटी रुपये द्यायचे आहे. त्या मध्ये रस्त्याचे काम होणार असून यामध्ये उड्डाण पुलाचे सुध्दा कामे आहे. यात महावीर चौक, क्रांतीचौक, मोंढानाका व सेव्हन हिल तसेच जळगांव टी पॉईंट असे पाच उड्डाण पुल होणार आहे तसेच दोन रेल्वे उड्डाण पुल आहे. एक शिवाजीनगर तसेच दुसरा संग्रामनगर येथे होणार आहे. या कामामध्ये एक सबवे बांधावयाचा असून महानगरपालिकेसमोर हे काम होणार आहे तसेच सेंट फ्रांसीस शाळेजवळ एक पादचारी यांचेसाठी एक पुलाचे काम होणार आहे. तसेच मध्यवर्ती बसस्थानक रस्त्यावर पादचाऱ्यासाठी एक रस्ता करावयाचा आहे. नागेश्वरवाडी येथील पुलाचे सुध्दा काम करायचे असून नेहमीसाठी त्या पुलाच्या बाजूलाच एक वाहतुक बेट तयार करायचे आहे. तसेच रस्त्याची कामे करण्याचा सुध्दा समावेश आहे. त्यामध्ये रेल्वेस्टशेन महावीर चौक, हर्सूल टी पॉईंट, हॉटेल अमरप्रीत ते बीड रस्ता, सेव्हनहिल ते शिवाजीनगर, जळगांव टी पॉईंट ते हर्सूल टी पॉईंट, सिडको एन-४ वळण रस्ता, जळगांव रस्ता ते कीराडपुरा, चेलीपुरा, वरद चौक ते लक्ष्मणचावडी, चिकलठाणा वळण रस्ता इ. कामाचा समोवश आहे. या कामासाठी मार्च अगोदर १.५० कोटी रुपये रस्ते विकास महामंडळाकडे महानगरपालिकेने द्यायचे आहे. त्या विभागाचे वारंवार पत्रव्यवहार आपल्याकडे चालू आहे. निविदा वगैरे काढण्याची प्रक्रिया सुरू करण्यांत आलेली आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : १.५० कोटी रुपये रस्ते विकास महामंडळास देण्यासाठी महानगरपालिकेची तशी परिस्थिती आहे का?

श्री. कोकाटे काशिनाथ : शहराचा वाढता व्याप व लोकसंख्येच्या प्रमाणात शहरातील विकास कामे करण्याचा विचार केल्यास आर्थिक परिस्थितीनुसार मुख्य रस्त्याचा विकास करणे महानगरपालिकेस शक्य वाटत नाही. त्यांची सुधारणा करण्यासाठी व १००% पैसा खर्च करण्यासाठी सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नाही. म्हणून रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून शहराची विकासासाठी महानगरपालिका या कामासाठी काही सहभाग असावा करिता फक्त १.५० कोटी रुपयाची मागणी केलेली आहे. म्हणून बजेट मध्ये जरी प्रोव्हीजन केलेली नसेल तरी शासकीय अनुदानातून तसेच

बजेटमध्ये रस्तेसाठी ठेवलेल्या रक्कमेमधून १.५० कोटी रुपये देण्यांत यावे व जास्तीत जास्त रस्ते या कामामध्ये कसे सामावून घेता येतील याकडे लक्षक द्यावे. यामध्ये पंचायत समिती चंपा मस्जीद ते नवाबपुरा, सेंट्फ्रान्सी जालना रोडकडे जे रस्ता जातो याचा समावेश करावा.

श्री. निकाळजे प्रकाश : क्रांतीचौकात सुध्दा रस्त्याचे काम करणार परंतु तेथे शिवाजी महाराज यांचा पुतळा आहे. या ठिकाणी कशा पध्दतीचे काम करता येईल. काय पर्यायी व्यवस्था राहील याचा विचार व्हावा.

श्री. प्रशांत देसरडा : रस्ते विकास महामंडळामार्फत शहरातील रस्त्याचा विकास करण्याचे काम होती घेण्यात येणार आहे. त्यात महानगरपालिकेकडे सुध्दा आर्थिक बाबतीत सहभाग राहणार आहे. तत्कालीन महापौर डॉ. भागवत कराड यांचे कार्यकाळात या रस्त्याचे व उड्डाण पुलाचे सर्वेक्षण झालेले होते. त्यांनी सर्वेक्षणासाठी कमेटी आणलेली होती. या योजनेमार्फत जे ही कामे होतील त्यांचे कार्यक्रम तसेच ज्याही सम रस्ते विकास महामंडळाकडे होतील त्यामध्ये मा. आयुक्त तसेच महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी यांचा समोवश असावा तशा सूचना रस्ते विकास महामंडळास देण्यात याव्यात.

डॉ. भागवत कराड : या शहराच्या विकासासाठी १६७ कोटी रुपये मंजूर केलेल आहे. जेणे करून शहरातील व शहरा बाहेरील रस्ते उड्डाण पुल तसेच रेल्वे उड्डा पुल केल्यानंतर या शहराचे चित्र बदलेल यात शंका नाही. हे सर्व करिता असतांना या शहरामध्ये जे भुयारी मार्ग असतील उड्डाण पुल असतील रस्त्याची वेगवेगळी कामे असतील या संदर्भात मागे बैठक झालेली होती. व त्यानंतर यास मंजुरी मिळालेली आहे. महानगरपालिकेचा सहभाग म्हणून १.५० कोटी ुरपये शासनाने दिलेल्या रकमेमधून या कामासाठी देण्यास काहीही कुणाची हरकत नसावी असे माझे मत आहे. गेल्या वर्षी आपण रेल्वेस्टेशन ते दिल्लीगेट यासाठी ९० लक्ष रुपये तसेच अमरप्रीत हॉटेल ते शहनुरमीयाँ दर्गा पर्यंतच्या रस्त्याचे काम करण्यासाठी ७० लक्ष रुपये बजेटमध्ये तरतूद केलेली होती. परंतु त्याचवेळी शासनाचे पत्र आले की, रस्त्याच्या बाबतीत रस्ते विकास महामंडळामार्फत विकास होणार आहे व हा खर्च शहरातील रस्त्यासाठीच खर्च होणार आहे. १.५० कोटी रुपये देण्याबाबत चांगला निर्णय या सभागृहास व्हावा. तसेच आताच सभापती यांनी सांगितल्याप्रमाणे रस्ते विकास महामंडळाने ज्या ज्या वेळी या कामाचे उद्घाटन होतील जे कार्यक्रम होतील. त्यावेळी महानगरपालिकेचे पदाधिकारी यांचा समावेश करावयास पाहिजे. मागील वेळेस दोन ते तीन ठिकाणी कार्यक्रम करण्यांत आले परंतु पदाधिकाऱ्यांना बोलाविण्यात आलेले नाही. म्हणून तसे प्रशासनाने पत्राचे संबंधित विभागास कळवावे.

श्री. दानवे अंबादास : रस्ते विकास महामंडळा मार्फत शहरातील व शहराबाहेरील प्रमुख रस्त्याच्या विकासासाठी १६७.८० कोटी रुपये खर्चास मंजुरी मिळालेली आहे. त्यामध्ये महानगरपालिकेचा सहभाग म्हणून प्रतिवर्षाला १.५० कोटी असे तीन वर्षाचे एकूण ४.५० कोटी रुपये रस्ते विकास महामंडळास द्यायचे म्हणून तसा प्रस्ताव सादर केलेला आहे. दिनांक २३ फेब्रुवारी २००१ ला शासनाचे नियोजन विभागाकडून शहर व परिसरातील रस्ते विकास योजना म्हणून एक परिपत्रक आलेले आहे. यामध्ये असा उल्लेख आहे की, विधानसभा सदस्य, विधान परिषद सदस्य, संसद सदस्य तसेच

महानगरपालिका व मराठवाडा वैधानिक विकास मंडळ याविभागाकडून हा निधी जमा करण्यात यावा असे दिले आहे. शहरामध्ये विधान परिषद व विधान सभा सदस्य फक्त दोन आहे. आणि संसद सदस्य म्हणून खा. चंद्रकांतजी खैरे आहेत विधान परिषद व विधान सभा सदस्य मिळून ८० लक्ष तर संसद सदस्याकडून ५० लक्ष रुपये तीन वर्षात तसेच वैधानिक विकास महामंडळाकडून प्रति वर्षी ३ कोटी रुपये तसच महानगरपालिकेकडून प्रतिवर्षी १.५० कोटी द्यावे असे शासनाच्याआदेशात नमूद केलेले आहे. १६ फेब्रुवारी २००१ मध्ये हा जी. आर. काढल्यापासून आतापर्यंत कुणीही रक्कम जमा केलेली नाही. कारण विधानसभा व विधान परिषद सदस्य व संसद सदस्य यांचा निधी आतापर्यंत संपलेला सुध्दा असेल आणि वैधानिक विकास मंडळाने सुध्दा हा निधी जमा करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे व पथकर वसुलीचे अधिकार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास राहील असे या जी.आर. मध्ये नमूद केलेले आहे. यासाठी महानगरपालिकेने हे सुध्दा लक्षात ठेवले पाहिजे की, सेव्हन हिल येथील उड्डाण पुलाचे उद्‌घाटन जेंव्हा झाले त्यावेही महानगरपालिकेचे महापौर यांना भाषण सुध्दा करू दिलेले नव्हते. म्हणून प्रशासनाने या सर्व गोष्टीची दखल घेण्याची आवश्यकता आहे. यामध्ये महानगरपालिकेचे आयुक्त आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता असे दोन स्थानिक सदस्य लोकल म्हणून जी. आर. मध्ये उल्लेख केलेला आहे. १.५० कोटी रुपये सध्याच्या परिस्थितीत महानगरपालिका देऊ शकेल काय, दिले तर शहराचाच विकास होईल. परंतु आर्थिक बाबीबाबत खुलासा सुध्दा प्रशासनाकडून होणे गरजेचे आहे. तसेच बाबा पेट्रोल पंप येथे महावीर चौक आहे, क्रांतीचौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा असून उड्डाण पुल झाल्यास याची अवस्था काय राहणार आहे याचा सुध्दा विचार होणे गरजेचे आहे. कामासाठी महानगरपालिका काय निर्णय घेणार आहे. त्यासाठी महानगरपालिकेचा सक्रीय सहभाग असला पाहिजे या कामामध्ये महानगरपालिकेचा पैसा जाणार असून रस्ते विकास महामंडळ विभागाकडून महानगरालिकेचे आयुक्त तसेच महापौर व पदाधिकारी यांना मान सन्मान मिळावयास पाहिजे याची दखल घेणे गरजेचे आहे. सन्मान मिळत नसेल तर अयोग्य आहे. या शहराचे स्थानिक मंत्री ना. राजेंद्रजी दर्डा यांनी वृत्तपत्रात अशी बातमी छापून आणली की माझ्या प्रयत्नामुळे शहराच्या विकासासाठी १६७ कोटी रुपये मंजूर झाले. परंतु डॉ. भागवत कराड हे महापौर असतांना त्यांनी रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून दिल्लीतील केंद्र शासनाची जी संस्था आहे. या संस्थेद्वारे रस्ते व उड्डाण पुलाचे सर्वेक्षण केले. डॉ. कराड हे महापौर असतांनाच या संस्थेचे अधिकारी श्री. रेड्डी म्हणून येथे आलेले होते. त्यांनी सर्वेक्षणाचे काम केले व त्यामुळे या कामात महानगरपालिकेचा सुध्दा प्रयत्न आहे हे जाणून घेण्याची आवश्यकता आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : या प्रस्तावानुसार रस्ते विकास महामंडळास १.५० कोटी रुपये महानगरपालिकेने देण्याबाबतचा प्रस्ताव सादर झालेला असून ज्या ज्या वेळी या कामा बाबतचे कार्यक्रम हाती घेतले जातील त्यामध्ये या महानगरपालिकेचे महापौर व जे कुणी प्रतिनिधीत्व करीत असतील त्यांचा रस्ते विकास महामंडळाणे संबंधित अधिकारी यांनी समावेश करावयास

पाहिजे तसा ठराव पास करतांना उल्लेख करावा. संबंधित विभागाने महानगरपालिकेस विश्वासात घेणे गरजेचे आहेच परंतु या योजनेत समावेश केलेल्या कोणत्याही लोकप्रतिनिधिने अद्याप पेसे दिलेले नसले तरी लगेचच हे काम चालू होणार नाही. म्हणून येणाऱ्या पुढील वर्षीच्या निधीतून का होईना या विकासासाठी पैसा जमा करणे गरजेचे आहे. अद्याप काम सुरू झाले नाही. निधी देत नाही असे म्हणणे चुकीचे आहे. आता नुकतेच सेव्हनहिल येथील कामास सुरुवात झालेली आहे. म्हणून इतर पुढील कामासाठी निश्चितच निधी जमा होऊ शकेल. या शहराचे मा. ना. श्री. राजेंद्रजी दर्डा हे आमदार असून राज्यमंत्री आहे. त्यांचे मतदान संघासाठी त्यांनी जे काम केलेले आहे.ज्या योजना आणलेल्या आहे त्यात त्यांचा सहभाग निश्चित आहे असे म्हणणे वावगे होणार नाही. आणि नागपुर नंतर औरंगाबाद शहरासाठी जास्तीत जास्त रक्कम म्हणजे १६७ कोटीची मंजूरी रस्ते विकास महामंडळा मार्फत करण्याची मान्यता मिळालेली आहे. म्हणून या शासनाचे तसेच मा. ना. राजेंद्रजी दर्डा यांचे या सभागृहाच्या वतीने अभिनंदन केले पाहिजे. अशी मी विनंती करतो.

श्री. दानवे अंबादास : सदर योजना ही तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. नितीन गडकरी तसेच पालकमंत्री श्री चंद्रकांतची खैरे यांनी तयार केलेली होती. सध्याच्या सरकारमध्ये या जिल्ह्याचे स्थानिक आमदार व वित्तमंत्री श्री. राजेंद्र दर्डा यांचेकडे वित्त खात्याचा कार्यभार असतांना महानगरपालिकेला १.५० कोटी रुपये देण्याची का गरज पडत आहे.

सौ. विजया रहाटकर : यापूर्वी रस्ते विकास महामंडळामार्फत अमरप्रीत हॉटेल ते बीड बायपास रस्त्याच्या विकास करण्याच्या दृष्टीने टेंडर काढण्या आलेले होते. त्याची काय कार्यवाही आतापर्यत झालेली आहे. खुलासा द्यावा. सदर रसता महानगरपालिका हद्दित येत असून त्या टेंडरची संबंधित विभागाकडे महानगरपालिकेने काही विचारणा केलेली आहे.

अति. शहर अभियंता : ही स्कीम महानगरपालिकेने तयार केली नाही. या रस्त्याचे टेंडर काढण्यात आलेले होते. एजन्सी निश्चित केलेली होती त्या कामाच्या बाबतीत सध्या न्यायालयाचे स्थगिती आदेश आहे सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

मा. महापौर : या संबंधी आपण न्यायालयात इंटरनेटवर होऊ शकतो.

श्री. कोकाटे काशिनाथ : निविदा निघाल्यानंतर प्रकरण न्यायप्रविष्ट झालेले असेल व सदर रस्ता हा निविदा काढतांना रस्त्याची बाधित होणारी सर्व जागा महानगरपालिकेची आहे का हे पाहिले गलेले नाही का? कारण जेंव्हा कोणत्याही कामाची निविदा निघते तेंव्हा ती जागा आपल्या ताब्यात असली पाहिजे. असताच खुलासा केल्याप्रमाणे या कामाबाबत एजन्सी निश्चित झालेली आहे त्या एजन्सीजला कामाचा कालावधी सुध्दा दिलेला असेल व कालावधी संपल्यानंतर संबंधित एजन्सीजला अतिरिक्त रक्कम देण्याचा प्रश्न येथे उपस्थित होणार आहे का याचा खुलासा द्यावा. कदाचित त्याच एजन्सीजेन संबंधित मिळकत धारकांना प्रकरण न्यायप्रविष्ट करावे म्हणून सांगितलेले असेल अशी शंका निर्माण होते. न्यायालयात कोण गेलेले आहे. एजन्सीचे नांव तसे या रस्त्यावर या अगोदर काम केलेल आहे का? माझ्या माहितीप्रमाणे या रस्त्याच्या कामाच्या संदर्भात कुणी प्रकरण न्यायप्रविष्ट

केलेले असेल तर संबंधित एजन्सीजला महानगरपालिकेला अतिरिक्त रक्कम द्यावी लागेल.

मा. महापौर : शासनाची स्कीम आहे. रस्ते विकास महामंडळाचे या रस्त्याचे कामाचे टेंडर काढलेले होते. संबंधित गुत्तेदार हे काम होत नाही म्हणून न्यायालयात गेलेले आहे. टेंडर कॉल करण्याचे काम संबंधित विभागाचे आहे. या प्रकरणामध्ये महानगरपानिकेने स्वतः मत मांडावे व वाटाघाटीने हे प्रकरण निकाली काढावे. शहरातील रस्त्याच्या विकासाच्या बाबतीत जे कुणी न्यायालयात गेलेले असतील त्यांचेशी चर्चा करून अशा प्रकरणांत तडजोड करून प्रकरण निकाली काढावे. तशी प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री. दानवे अंबादास : शासनाने मागील वर्षी मंत्री मंडळाच्या बैठकीत १० कोटीचे अनुदान देण्याचे मान्य केले हाते. त्यापैकी ४ कोटी कॅश स्वरुपात महानगरपालिकेकडे आलेलले आहे. ३ कोटी क्रांतीचौकी जालना रोडसाइी देण्यात आलेले आहे. उर्वरित ३ कोटी रुपये शासनाने संबंधित विभागाकडे वळती करून द्यावे म्हणून तसे रुलींग आपण द्यावे.

मुख्यलेखाधिकारी : नियोजन विभगामार्फत काढलेल्या शासनाच्या जी. आर. नुसार रस्ते विकास महामंडळास महानगरपालिकेने तीन वर्षात ४.५० कोटी रुपये द्यावे म्हणून आदेशित केलेले आहे. आतच स. सदस्य श्री. दानवे यांनी सूचना मांडली की, शासनाकडून महानगरपालिकेत ७ कोटी रुपये येणे बाकी आहे. शासनाने यामध्ये असा निर्णय घेतलेला आहे की, नगरविकास विभागाने प्रतिवर्ष ५ कोटी असे ६० कोटी रुपये १२ वर्षात रस्ते विकास महामंडळास द्यावे. राज्य शासनाने महानगरपालिका जे मागील पाच वर्षाचे प्रमाणे दरवर्षी महानगरपालिकेस १० कोटी रुपये देण्यात येतील. जे १० कोटी रुपये देण्यात येतील. जे १० कोटी पैकीच ५ कोटी रुपये रस्ते विकास महामंडळास द्यावे लागणार आहे. शासन स्तरावर ते परस्पर निधी दिला जाईल. व महानगरपालिका फंडातून प्रति वर्षी रुपये १.५० कोटी द्यावयाचे आहे. या चालू आर्थिक वर्षात आपणास फक्त ५ कोटीच रुपये प्राप्त होणार आहे. शासनाने दिलेले अनुदानातून हे आपण देऊ शकत नाही कारण १.५० कोटी रुपयाचे रककम हीं शहराच्या विकासासाठी द्यावयाची आहे. ती महानगरपालिका फंडातून द्यावी लागणार आहे. सद्य स्थितीत सर्वच हेड मधील बजेट संपलेले आहे. लेखा शिर्षकामध्ये थोड्याशा रकमा शिल्लक असतील त्या वळती करून घ्याव लागतील काही मोठे प्रोजेक्ट आहे जे की, ३१ मार्च पर्यंत ते पूर्ण होऊ शकणार नाही. त्यामधून काही रकमा घ्याव्या लागतील वेळ पडल्यास रक्कम कमी पडल्यास नगरसेवक स्वेच्छानिधीतून सुध्दा काही रक्कम वळती करावी लागेल. शासन १६७ कोटीमध्ये ८० कोटी रुपये प्रामुख्याने नगरविकास विभाग सन्माननीय आमदार, खासदार यांचे फंडातून व उर्वरित रक्कम ही कर्ज रुपाने जमा करणार आहेत. प्रामुख्याने याचा फायदा हा शहराच्या विकासाठी होत आहे. नगरसेवकांचा निधी सुध्दा शहराच्या सौंदर्यीकरणाच्या कामासाठीच लागणार आहे. सर्व तरतूद करून प्रस्ताव पारीत झाल्यानंतर रस्ते विकास महामंडळास रक्कम देतांना सर्व बाबींचा विचार करून कार्यवाही केली जाईल.

मा. महापौर : या विषयावर चर्चा होत असतांना आताच काही स. सदस्यांनी सूचना केल्या की, या महानगरपालिकेतील सर्व पदाधिकारी आयुक्त यांना मान सन्मान

मिळाला पाहिजे या बाबतीत प्रशासनाने दखल घ्यावी विषय सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक/पासूस /२०००/ प्र.क्र.२३/का-१४७४(२) दिनांक २३/०२/२००१ नुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला प्रतिवर्ष रु. १.५० कोटी प्रमाणे तीन वर्षात रु. ४.५० कोटी निधी उपलब्ध करून देण्यास, तसेच महानगरपालिकेच्या सन २००१-०२ च्या सुधारित अंदाजपत्रकास व पुढील (२) दोन वर्षासाठी प्रतिवर्षी रु. १.५० कोटी तरतूद करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९८/४ :**

औरंगाबाद ते जायकवाडी पाणी पुरवठ्याच्या विज देयकापोटी पा. विज नियामक आयोग यांच्या निर्देशानुसार व मा. सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ४५१/१ दि. १८/०७/२००१ अन्वये महाराष्ट्र राज्य विद्युत मंहामंडळ यांना र. रुपये ५०.०० लक्ष भरीव रक्कम [ substantial Amountly] म्हणून भरणा करण्यात आली आहे.

मा. सचिव, महाराष्ट्र राज्य विज नियामक आयोग यांनी पत्र क्र. /एम.ई.आर.सी./ केस क्र. ०४-२००१/९३८ दिनांक २४ जुले २००१ अन्वये पुन्हा कळविले आहे की, दिनांक १६ जुलै २००१ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये महानगरपालिकेकडे पाणीपुरवठा विद्युत देयक कोटी असलेल्या थकबाकी मधून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना थकबाकीच्या १०.२०% रक्कम भरणा करण्यांत यावी व तसे मा. महाराष्ट्र राज्य विज नियामक मंडळास कळविण्यात यावे असे निर्देश दिले आहेत.

सध्या महानगरपालिकेत पाणी पुरवठा विद्युत देयकापोटी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांची माहे मार्च २००१ पर्यंत जवळपास र. रु. ११६ कोटी एवढी थकबाकी आहे. त्यानुसार मा. विज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार थकबाकीच्या १०.२०% रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना भरणा करावयाची झाल्यास र. रु. १० कोटी ते २० कोटी दरम्यान रक्कम भरणा करावी लागेल.

करिता मा. विज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार वरील दर्शविल्यापैकी रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांना भरणा करणे बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या योग्य त्या निर्णयास्तव सादर.

**संवाद :**

मा. महापौर : या प्रस्तावावर प्रशासनाने थोडक्यात माहिती द्यावी.

मुख्यलेखाधिकारी : मा. विज नियामक मंडळाकडे महानगरपालिका जायकवाडी ते औरंगाबाद पाणी पुरवठ्यावरील थकीत बीलाच्या संदर्भाने महानगरपालिका अप्रोच झालेली आहे पाणी पुरवठ्याचे विज बील हे कृषी दराने देण्या तयावे म्हणून महानगरपालिकेची ही प्रमुख मागणी आहे. याची याचिका महानगरपालिकेने विज नियामक मंडळाकडे सादर केलेली आहे. तथापी विज नियामक मंडळाने प्रथम सुनावणीच्या वेळीच असे सांगितले आहे की, महानगरपालिकेने भरीव रक्कम विज मंडळाकडे भरणा करावी त्यानंतरच यावर सुनावणी करण्यांत येईल. त्या दृष्टीकोनातू महानगरपालिकेचे ५० लक्ष रुपये राज्य विज नियामक आयोगाकडे जमा केलेले आहे. परंतु ही रक्कम

भरीव रक्कम होत नाही म्हणून विज नियामक आयोगाने सचिव यांनी महानगरपालिकेस असे कळविले आहे की, थकीत रक्कमेच्या साधारणत: ३३% रक्कम ही भरीव रक्कम होते. आज महानगरपालिकेकडे विज बिलापोटी ११६ कोटी बाकी आहे. म्हणून आपल्याला साधारणत: १० ते २० कोटी ुरपये भरणा करावे लागतील तरच आपण सादर केलेल्या याचिकेवर सुनावणी होईल. या त्या दृष्टीने प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मंजुरीस्ताव प्रशासनाने ठेवलेला आहे.

डॉ. कराड भागवत : आताच लेखाधिकारी यांनी खुलासा केल्याप्रमाणे १० ते २० कोटी रुपये महानगरपालिको भरू शकते का? तशी परिस्थिती महानगरपालिकेची आहे का खुलासा द्यावा.

मुख्य लेखाधिकारी : या बाबतीत कुठेतरी तडजोड करावी लागणार आहे. यासाठीच प्रस्ताव सादर केलेला आहे.

श्री. संजय शिरसाठ : या वर्षीचे १३५ कोटीचे बजेट ठेववण्यात आलेले होते. प्रत्यक्षात ८० कोटीचे मिळते. त्यामध्ये अस्थापनावरील खर्च, विद्युत बिलाबाबतचा खर्च, पाणी पुरवठ्यावर झालेला खर्च तसेच शहरासाठी द्यावी लागणारी विविध सुविधा त्यासाठी लागणारा खर्च किती याची माहिती द्यावी व वसुलीतून हा खर्च जाऊन शिल्लक राहिलेल्या रककमेतून विज नियामक आयोगास रक्कम देण्यांत यावी आणि किती रक्कम आपण देऊ शकतो याचा सुध्दा खुलासा व्हावा.

श्री. प्रशांत देसरडा : मा. उर्जामंत्री तसेच विज मंडळाचे संबंधित अधिकारी यांनी महानगरपालिकेस विज नियामक मंडळान अपील करायचे सुचविल ाहेते त्यानुसार अपली करण्यात आलेले आहे. या विषयावर योग्य तोडगा काढण्यासाठी मा. महापौर तसेच सर्व पदाधिकारी यांनीमा. ना. मुख्यमंत्री यांचेशी चर्चा करण्यासाठी वेळ निश्चित करावी. चर्चा केल्यानंतर संबंधित विज नियामक मंडळास मा. मुख्यमंत्री चर्चा करतील योगय तो मार्ग निघेल. जे की आज महानगरपालिका एवढी रक्कम एकदम भरणा करू शकणार नाही या संबंधीचे प्रकरण तडजोडक करून निपटारा होत असेल तर तशी मा. मुख्यमंत्री यांचेशी चर्चा करून तसेच उर्जामंत्री यांचेशीही चर्चा करून प्रकरण निकाली काढण्याबाबत कार्यवाही व्हावी.

श्री. जयवंत ओक : डॉ. भागवत कराड महापौर असतांना एम.एस.ई.बी. ने महानगरपालिकेस नोटीस दिली होती त्यानुसार बरेच स. सदस्य मा. महापौर सहीत संबंधित कार्यालयासमारे आमरण उपोषणास बसले होते. सुरुवातीपासूनच २ कोटी रुपये भरणा केले असते तर महानगरपालिकेवर एवढा मोठा आर्थिक बोजा पडला नसता. घरातील लाईटचे बील भरले नाही तर तोडण्यात येते. महानगरपालिका ही विकासाची कामे करते व ही कामे करत असतांना विजेचा वापर होतो. मालमत्ता कर व पाणीपट्टी नागरिकांनी महानगरपालिकेस वेळेवर भली नाही तर मालमत्ता जप्त केल्या जातात. तो दृष्टीकोन समारे ठेवून एम.एस.ई.बी. ला सध्या भरणा होत असलेल्या रक्कमेपेक्षा जास्त रक्कम भरणा करण्याचा निर्णय घेण्यात यावा. सविस्तर चर्चा करून निर्णय व्हावा ही रक्कम भरल्यानंतर तडजोड होऊन ११६ कोटी रुपयाचा प्रश्न सुटत असेल व कृषी दराने विज आकरणी होत असेल तर ही रक्कम भरण्याबाबत योग्य तो निर्णय सर्वांच्या विचाराने घेण्यात यावा. या

बाबतीत स्थानिक आमदार, खसदार तसेच प्रशासन यांनी वरिष्ठाकडे चर्चा करून तडजोड करावी. अशी अपेक्षा करतो. पुन्हा वादविवाद वाढतील रक्म वाढतच जाईल. गेल्या चार वर्षात १० कोटीचे ११६ कोओी झाले आणखी ५ वर्षात २०० कोटी होणार याचा विचार होता योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

डॉ. भागवत कराड : मागच्या बॉडी पासून नियमित महानगरालिकेने बील एम.एस.ई.बी. ला भरावे म्हणून विज मंडळाचे पत्र येतात. शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी जो विजेचा वापर होतो तो सर्वात जास्त असून ग्रामीण भागाता विज वापर होता व सदर विज बील हे व्यावसायिक दराने न आकारतां ग्रामीण भागात येत असल्यने कृषी दराने विज बिल आकारणी करावी ही प्रमुख मागणी विज मंडळाकडे महानगरपालिकेची आहे. ती मागणी पूर्ण होण्यासाठी वारंवार या महानगरपालिकेचे पदाधिकारी मी स्वतः मा. मुख्यमंत्री, तसेच संबंधित उर्जा राज्यमंत्री यांचेशी भेट घेतली जे या शहराचे पालकमंत्री होत त्यांची भेट घेतली. परंतु कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. आहे ती परिस्थिती तशीच आहे. उलट असा सल्ला देण्यात आला की, महानगरपालिकेने विज नियामक आयोगाकडे जावे व कार्यवाही करावी त्या अनुषंगाने या सभागृहात सुध्दा चर्चा झाली व बातम्यासुध्दा छापून आलेल्या होत्या व म्हणून आपण एक ठराव घेऊन सक्षम अधिकारी म्हणून श्री. कांबळे उपआयुक्त (प्र.) यांची हे प्रकरण विज नियामक मंडळाकडे देण्यासाठी नियुक्ती केली. व या संदर्भात माझी मा. आयुक्त साहेबांशी चर्चा झाली त्यांचे असे म्हणणे आहे की, हे प्रकरण विज नियामक मंडळाकडे जायला नको होते. त्यामुळे आज १० ते २० कोटी रुपये भरण्याची सूचना त्या विभागाकडून महानगरपालिकेकेस मिळाली व विज नियामक विभागाकडे आपण प्रकरण दाखल केले नसते तर महानगरपालिकेची विज बंद करण्यात येईल असे विज मंडळाच्याच अधिकांनी महानगरपालिकेस पत्र दिलेले होते. म्हणून आता महानगरपालिका ही दोन्ही बाजूने आर्थिक संकटात आलेली आहे. म्हणून सध्या आपण भरत असलेल्या ७५ लक्ष रुपयापेक्षा आणखी किती रक्कम भरू शकतो. याबाबत निर्णय व्हावा. परंतु जी ९० कोटी रुपये भरण्याचे निर्देश दिले ते महानगरपालिकेस सध्या तरी भरणे शक्य होणार नाही या शहराचे पालकमंत्री तसेच उर्जामंत्री श्री. दर्डा साहेब यांना पुन्हा सर्व पदाधिकाऱ्यांनी जाऊन भेटावे व चर्चा करून हे प्रकरण निकाली काढावे.

मा. महापौर : सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता या प्रस्तावासंबंधी लवकरात लवकर शासनाकडे या संबंधी चर्चा करून निर्णय घेण्यांत येईल.

श्री. प्रकाश निकाळजे : शासनाची या अगोदर या प्रश्नासंबंधी कोटीत आणखी वाढच होत जाईल त्यासाठी जे सध्या रक्कम भरत आहोत त्यामध्ये वाढ करून आणखी रक्कम भरावी तसा निर्णय घेण्यात यावा.

श्री. प्रशांत देसरडा : मागील बैठकीत या विषयावर चर्चा झालेली असून जे पाण्याचे मीटर रिडिंग आहेत ते दुरुस्तीला आहे त्यात बिघाड असल्यामुळे एकूण येणाऱ्या बिलाच जवळपास १० ते १५% बील जास्तीची येते. असे असेल तर त्याची कार्यवाही आतापर्यंत का केलेली नाही. झालेली असेल तर खुलासा घ्यावा. नसता मीटर नादुरुस्तीमुळे बील वाढवून येऊन रक्कम वाढतच राहील.

डॉ. कराड भागवत : शहरामध्ये महानगरपालिका ज्या ज्या ठिकाणी विजेचा वापर करते व ते बिल कमी येण्यासाठी वेगवेगळी उपकरणे आता निघालेली आहे त्या संधी मी महापौर असतांना काही एजेन्सी धारकांनी माझी भेट घेतली होती. त्यानंतर मी मा. आयुक्तांशी त्यांना चर्चा करावयास सांगितले होते. शहरासाठी पाणी पुरवठा करणारे जे पंप नियमित चालू असतात व त्यासाठी येणारी विज बील हे कमी करता येईल काय हे सुध्दा तपासणी करून कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

श्री. स. अली सलामी : प्रत्येक वेळेस एम.एस.ई.बी.ची थकीत रक्क्म भरण्याबाबत सभागृहात चर्चा होते. परंतु काही ठोस निर्णय घेतल्या जात नाही. या अगोदर असे ठरले की, विज नियामक मंडळाकडे प्रकरण द्यावे. प्रकरण दाखल झाल्यानंतर कोणत्याही प्रकारची सुनावणी न होता प्रकरण परत पाठविण्यात आलेले आहे. संबंधित विज नियामक मंडळाने ठामपणे असे सूचना केली की, अगोदर बील भरावे नंतर सुनावणी होईल. दुसरीकडे एक बाबतीत महानगरपालिकेकडून निष्काळजीपणा होत आहे. जो की, महानगरपालिकेचे जे अधिकारी आहे त्यांना महानगरपालिका वापरत असलेले विजेच्या प्रत्येक युनीट मागे किती बील आकारले जात आहे याची माहिती नाही. व सभागृहात या बाबत मी मागच्या वेळी सूचना सुध्दा केलेली होती परंतु कार्यवाही झालेली दिसून येत नाही जे ११६/- कोटी थकबाकी आहे ती कधी पासूनची आहे यामध्ये एकूण बील किती थकबाकीवर किती व्याज आकारले जात आहे व प्रत्येक वर्षी एका युनीट मागे किती रुपये विज आकारणी केली. तसेच प्रत्येक वर्षी किमान १० वर्षापासून कोणत्या वर्षी किती रुपये युनीटची विज बिल आकारणी होत आहे याची सविस्तर व सत्य माहिती सभागृहासमारे आली पाहिजे व ती घेणे गरजेचे आहे. व वॉर्डात विजेचा पुरवठा नाही म्हणून कोणतीही कामे होत नाही. विज मंडळाची विज आपण वापरत आहोत त्याचे बील देणे गरजेचे आहे विनामुल्य विज वापरणे अयोग्य होईल. एका इमारतीमध्ये एक वॉचमन राहतात. त्यांनी १० दुकान धारकांना लाईट दिली व प्रत्येक दुकान धारकाकडून ३००/- रुपये दरमहा वसूल करीत आहे. असा प्रकार किती ठिकाणी असेल ते सांगणे सुध्दा कठीण आहे. या इमारतीमध्ये शाळा होणार आहे लाईट मीटरची आवश्यकात नाही. तशी सूचना सुध्दा मी केलेली असतांना कार्यवाही होत नाही. विना परवानगी ते वॉचमन तेथे राहतात मालमत्ता अधिकारी यांचेकडून कोणती परवानगी त्या वॉचमनला तेथे राहण्याची दिलेली नाही झोन अधिकारी यांनी दिलेली आहे. १० वर्षापासून तेथे वॉचमनकी करीत आहेत. त्यांना पगार मिळते तसेच महानगरपालिकेच्या लाईट मिटरवर दुकानधारकांकडून पैसे मिळवीत आहे अशा परिस्थितीवर महानगरपालिका मात करणार की नाही. जेथे लाईटची आवश्यकता नाही तेथे लाईट लावण्यात येत आहे. जेथे आवश्यकात आहे तेथे बंद पडलेले लाईट पुन्हा लावण्यात येत नाही. कुठेतरी नियोजनबध्द कामे केले पाहिजे. नसता सर्वच लाईट बद ठेवावी या प्रकरणाच्या बाबतीत सक्षम अधिकारी म्हणून मा. आयुक्त तसेच सर्व पदाधिकारी यांनी मा. मुख्यमंत्री यांचेशी चर्चा करावी तडजोड करून ठराविक रक्कम भरण्याचे मान्य करावे व किती रक्कम माफ करता येईल या बाबत निर्णय करावा. विखे पाटील याचं साखर

कारखान्याचे विज बिल ३२५ कोटी माफ केलेले आहे. महानगरपालिकेकडे असलेले विज बिल हे शहरातील जनतेला पाणीपुरवठा करण्यासाठीच या विजचा वापर झालेला आहे. शासनास माफ करण्यास भाग पाडावे. सर्व पदाधिकारी यांनी शासनाकडे मागणी करावी आज ११६/६ कोटी रुपये आहे. काही दिवसांनी २०० कोटी होऊ शकतील ६ वर्षापूर्वी ४५ कोटी थकबाकी होती प्रत्येक वर्षी होणारे व्याज हे सर्व मिळून आज ११६ कोटी झालेले आहे. येणाऱ्या बिलामध्ये पुढील काही काळात रक्कम ही कमी होणारी नाही. प्रत्येक वर्षी वाढतच जाणार असून या बाबतीत तडजोड करून हे प्रकरण निकाली काढावे रस्ते व इतर विकास कामावरील खर्च कमी करावा अशी कामे उशीर झालेली चालतील परंतु वि बंद केल्यासा शहरात अंधार होईल जनता महानगरपालिकेस दोषी ठरवतील. शहराच्या विकासासाठी आमदार, खासदार निधीतून रक्कम देत आहेत. असे असेल तर शासन दरबारी जाऊन पुढील वर्षात विज मंडळाचे थकीत बील आमदार, खासदार निधीतून भरण्याची शासनाची मान्यता आणावी या प्रकरणात शासनाशी योग्य ती चर्चा करून तात्काळ कार्यवाही व्हावी अशी अपेक्षा करतो.

मा. महापौर : या विषयाच्या संदर्भात शासन दरबारी चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा. महापौर व सर्व पदाधिकारी यांनी मा. मुख्यमंत्री व मा. उर्जामंत्री यांची भेट घेवून एम.एस.ई.बी. ची महानगरपालिकेकडे असलेल्या थकीत विज देयकाच्या बाबतीत चर्चा करून त्यावर तोडगा काढावा असे ठरले. व सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ४९९/५**

कार्यकारी अभियंता (पा.पु. व ज.नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरात विविध ठिकाणी नवीन जलनिस:रण वाहिनी टाकणे तसेच जलनिस:रण वाहिनीचे देखभाव दुरुस्ती, कामांतर्गत मेनहोल वर टाकणे करिता गोल कव्हर्स व खुल्या गटारी / नाल्यावर टाकणे करिता आयताकृती कव्हर्स आवश्यक असून अशा कर्व्सचा पुरवठा करणे बाबत गोल व आयताकृती एस.एफ.आर.सी कव्हर्ससाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये ३४,३३,६००/- तयार केलेले आहे. ह्या करिता १९९९-२००० चे मंजूर पुरवठा दर विचारात घेण्यात आलेले आहेत. पुरवठा करिताचे दर हे ("डी"फॉर्मनुसार मागविण्यात येतील.)

या अंदाजपत्रकात गोलाकार कव्हर्स (फ्रेमसहीत) आयताकृती मोठे कव्हर्स (फ्रेम विरहीत) व आयताकृती लाहान कव्हर्स (फ्रेम विरहित) असे हेवी ड्युटी मेडीयम ड्युटी प्रकारच्या कव्हर्सचा समावेश असून कव्हर्सची एकत्रित खरेदी करावयाची आहे.

तरी एकत्रित अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३४,३३,६००/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

डॉ. कराड भागवत : डी फॉर्मनुसार असे दिले आहे. माहिती देण्यांत यावी प्रस्तावानुसार जे काही घेणार आहोत. टेस्ट घेणार आहे का आयएसआय मार्क आहे का?

मुख्यलेखाधिकारी : डी फॉर्म हे साहित्य पुरवठा करण्यासाठी टेंडरमध्ये वापरण्यात येतील ज्या प्रमाणे आपण ए-१, बी-१, असे वापरतो त्याप्रमाणे डी फॉर्म वापरण्यात येते. जेवढा पुरवठा होतो तो डी फॉर्म नुसार होतो.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी माजी महापौर डॉ. कराड यांनी सूचना केल्याप्रमाणे या प्रस्तावाबाबत कार्यवाही करावी लवकरात लवकर टेंडर काढावे. मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात विविध ठिकाणी नविन जलनिसःरण वाहिनी टाकणेस व जलनिसःसरण वाहिनीचे देखभाल व दुरुस्ती कामांतर्गत मेनहोल वर टाकणे करिता गोल कव्हर्स व खुल्या गटारी / नाल्यावर टाकणे करिता आयताकृती कव्हर्स पुरवठा करणे, गोल व आयताकृती एस.एफ.आर.सी कव्हर्ससाठी रक्कम रुपये ३४,३३,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री. सुदाम सोनवणे : आता पुरवणी विषय पत्रिका न घेता जनरल चर्चेला सुरुवात करावी कारणपुरवणी विषयी पत्रिका घेतल्यानंतर उशीर होतो या सभागृहात सदस्य संख्या कमी होते. याचा विचार करून चर्चेला सुरुवात करावी.

मा. महापौर : पुरवणी विषय पत्रिकेला मंजुरी घेतल्यानंतर जनरल चर्चेला सुरुवात करण्यात येईल. ऐनवेळी काही प्रशासनामार्फत प्रस्ताव सादर झालेले आहे. ते मंजूर करण्यासंदर्भात चर्चा करणे आवश्यक आहे. नगरसचिव यांनी पुरवणी विषय क्र.१ वाचून दाखववावा.

श्री. थोरात दत्तात्रय : ऐनवेळी जे प्रस्ताव येतात ते आम्हाला माहित नसतात यापुढे त्याची प्रत सर्वाना देण्याची दखल प्रशासनाने घ्यावी.

मा. महापौर : ठिक आहे. यापुढे प्रशासनाचे ऐनवेळी जे विषय येतील याची प्रत सदस्यांना सभागृहास वाटप पाहिजे. अशी सूचना देण्यात येते.

**विषय क्र. ५००/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांचे स्मरणपत्र दिनांक १७/०९/२००१ (प्राप्त दि. २४/०९/२००१) पत्रा अन्वये महिला निर्वाचित सदस्यांसाठी व महिला कर्मचाऱ्यांसाठी दिनांक ०४ ऑक्टोंबर ते ०६ ऑक्टोंबर २००१ या कालावधी मध्ये सुरत (गुजरात) येथे विशेष प्रशिक्षण शिबीर (स्पेशलाईज्ड कोर्स) आयोजित करण्यांत आले होते. सदरील प्रशिक्षणाकरिता औरंगाबाद महानगरपालिकेतील चार महिला सदस्या (१) स.स. समिती. साजेदा बेगम, (२) श्रीमती सलमा बानो (३) श्रीमती कचराबाई लोखंड, (४) श्रीमती निर्मलाबाई कांबळे व एक महिला कर्मचारी व त्यांचेसोबत १ कर्मचारी यांना मा. महापौर व मा. आयुक्तांचे मंजुरीनुसार पाठविण्यात आले होते.

सदरील प्रशिक्षण दौऱ्यासाठी झालेल्या खर्च जसे प्रशिक्षण शुल्क, प्रवास खर्च, निर्वाह भत्ता, निवास व इतर प्रसंगानुरुप अनुज्ञेय खर्च व प्रशिक्षण घेणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांचे स्मरणपत्र दिनांक १७/०९/२००१ (प्राप्त दि. २४/०९/२००१) पत्रान्वये महिला निर्वाचित सदस्यांसाठी व महिला कर्मचाऱ्यांसाठी दिनांक ०४ ऑक्टोंबर ते ०६ ऑक्टोंबर २००१ या कालावधी मध्ये सुरत (गुजरात) येथे विशेष प्रशिक्षण शिबीरास गेलेल्या चार महिला सदस्या व त्यांचे सोबत केलेल्या एक महिला कर्मचारी व एक कर्मचारी यांच्या दौऱ्यासाठी झालेल्या प्रशिक्षण प्रशिक्षण शुल्क, प्रवास खर्च, निर्वाह भत्ता, निवास व इतर प्रसंगानुरुप आलेल्या खर्चास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्र. ५०१/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) व सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ७० व ७४ अन्वये प्रथमच महिला व बाल कल्याण समितीची स्थापना झालेली आहेव माहे मे २००१ मध्ये वरील अधिनियमाच्या कलम ३०(३) अन्वये सभापती, उप-सभापती यांची निवड होऊन महिला व बाल कल्याण समिती कार्यान्वित झालेली आहे.

महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग नगर विकास विभाग व शासनाचे इतर विभागाकडून महिला व बाल कल्याण समितीकडे द्यावयाचे कार्यक्रम ठरविण्यात आलेले आहेत त्यानुसार महिला व बाल कल्याण समिती आपले काम करीत आहे. सदर समितीचा कालावधी हा एक वर्षाचा असून या कालमर्यादेत महिला व बाल कल्याण समितीसाठी असलेले कार्यक्रम राबविण्यासाठी महिला व बाल कल्याण समितीला पुर्णतः अधिकार प्राप्त होणे आवश्यक आहे.

वरील अधिनियमाचे कलम ३०(६) अन्वये समितीचे कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधिन असेल अशी तरतूद आहे. तसेच कोणतेही अधिकार किंवा कर्तव्य समितीकडे सोपवितांना महानगरपालिकाने अशा समितीचा निर्णय अंतिम असेल निर्देश दिला असेल तर असे कामकाज महानगरपालिकाकडून कायम केले जाण्याच्या अधिन राहणार नाही अशीही तरतूद आहे.

तरी विनंती करण्यात येत की, शासन महिला व बाल विकास विभाग, नगर विकास विभाग, आणि इतर महाराष्ट्र शासनाच्या विविध खात्याकडे महिला व बाल कल्याण व विकासाबाबत आणि असे सर्व प्रस्ताव जे प्रशासनामार्फत महिला व बाल कल्याण समितीपुढे सादर करण्यात आलेले आहे व पुढे सादर करण्यात येतील अशा सर्व बाबतीत महिला व बाल कल्याण समितीचा निर्णय अंतिम असेल असे महानगरपालिकाने अधिकार प्रदान करण्यासाठी सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेस मंजुरीस्तव ठेवण्यात येत आहे.

सुचक - १) सौ. चंद्रभागाबाई भगीरथ दाणे,
२) श्रीमती जयश्री सारंग किवळेकर,
३) सौ. निखत परवीन ईजाज अली.
अनुमोदक - १) सौ. साजेदा बेगम विखार अहमद,
२) सौ. शाहिन जफर महेमुद जफर

३) सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश
४) सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे

**चर्चा.**

मा. महापौर : नगर सचिव यांनी प्रस्ताव संबंधित थोडक्यात माहिती द्यावी. आतापर्यंत मंजूर झालेले प्रस्ताव प्राप्त झाले ते देखील सभागृहापुढे वाचून दाखविण्यात यावे.

नगरसचिव : महिला व बाल कल्याण समितीला मुंबई प्रांतिक महानगरालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(७) अन्वये अधिकार प्रदान करण्या संदर्भात प्रस्ताव सादर झालेला आहे. पूर्ण सूचना देऊन सभागृहात वितरीत करण्यात आलेला आहे. वरील अधिनियमाच्या कला ३०(६) अनये सदर समितीचे कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधिन असेल अशी तरतूद आहे परिच्छत २ मध्ये महानगरपालिकेस आपले अधिकार व कर्तव्य समितीस सोपविता येतील व असे करतांना अशा समितीचा निर्णय अंतिम असेल असा निर्देश दिला असेल तर या संबंधीचे कामकाज महानगरपालिकेकडून कायम केले जाण्याच्या अधिन राहणार नाही. अशी तरतूद आहे. आता पर्यंत महिला व बाल कल्याण समितीने काही प्रस्ताव मंजूर केलेले आहे ते प्रस्ताव आलेले असून त्यास कृपया मंजुरी द्यावी. समितीला अधिकार प्रदान करण्याबाबतचा हा प्रस्ताव मांडलेला आहे. महिला व बाल कल्याण समितीने मंजूर केलेले प्रस्ताव सभागृहाच्या माहितीसाठी व मंजुरीसाठी वाचून दाखविण्यात येत आहे.

**१) महिला व मुलींसाठी रोगनिदान शिबीर आयोजन करणे.**

महिला व मुलींसाठी रोगनिदान शिबीर या योजनेत महिला आरोग्य तपासणी शिबीरात महिला व वयात आलेल्या मुलींची आरोग्य तपासणी करणे.

दुसऱ्या शिबीरात ० ते १० वर्ष वयोगटातील मुलींची तपासणी करणे, या दोन्ही शिबीरासाठी प्रत्येक रु. पन्नास हजार रुपयाची तरतूद करण्यात येते. पहिल्या शिबीरात ४० वर्षनंतरच्या महिलांसाठी दंतरोग, नेत्ररोग, वयाच्या ४० वर्षानंतर आलेल्या समस्या अशा रोगाबाबत विशेष भर देण्यात यावा.

१) पहिल्या चार महिन्यात १ शिबीर व दुसऱ्या चार महिन्यात एक शिबीर आयोजित करावे.
   या शिबीरात फक्त वैद्यकीय सल्ला न देता शिबीराच्या एकूण खर्चा पैकी ९०% खर्च औषधोपचारर खर्च करण्यात यावा.
२) शिबीराचे आयोजन करण्यासाठी आरोग्य विभाग व स्वंयसेवी संस्थाचे सहकार्य घ्यावे.
   दि. २६ जून २००१ रोजी संपन्न बैठकीत मान्यता देण्यात आली प्रस्ताव मंजुरीस्ताव सादर .
   रुपये १ लक्ष तरतूद.

**२) बालवाडी शिबीराचे प्रशिक्षण**

**नियम व निकष :**

१) विहित नमुन्यात अर्ज असावा.

२) लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील कुटूंबातील असावा.
३) विधवा / परितक्त्या असतील तर पुरावा आवश्यक आहे.
४) लाभार्थी मनपा हद्दितील रहिवाशी असणे आवश्यक आहे.
५) लाभार्थी १८ ते ४० वर्ष वयोगटातील असावे.
६) लाभार्थी मागासवर्गीय असेल तर जातीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
७) सदर प्रशिक्षणासाठी एस.एस.सी. पास / नापास असेण आवश्यक आहे.
८) तहसिलदार यांचेकडून घेतलेल्या उत्पन्नाच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत्र आवश्यक आहे.

सहा महिण्याच्या प्रशिक्षणासाठी रु. १ लक्ष खर्च येणार आहे यासाठी ५०% अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. ५०% शुल्क लाभार्थीने संस्थेकडे जमा करावी.

महिला बाल कल्याण समिती सभा दि. २६/०६/२००१ रोजी संपन्न झालेल्या बैठीकत मंजूर केलेल्या प्रस्तावास मान्यता मिळावी.

**३) माता व बालसंगोपन प्रशिक्षण**

प्रशिक्षणासाठी ५०% अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. १८ ते ४० वयोगटातील महिला खालील नियमानुसार पात्र असतील तर त्या महिला अर्ज करू वयोगटातील महिला खालील नियमानुसार पात्र असतील तर त्या महिला अर्ज करू शकतील.

**नियम व अटी :**

१) अर्जदार स्थानिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकापैकी किंवा दारिद्र्य रेषेखालील कुटूंबापैकी असावा.
२) अर्जदार १० वी उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण असावा.
३) अर्जदार विधवा / परितक्ता असल्यास पुरवा नोंदवावा.
४) सदर योजना शाळा सोडलेल्या मुलींसाठी असल्यामुळे शाळा सोडल्याचा दाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.
५) तहसिलदार यांच्या घेतलेल्या उत्पन्नाचे प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी.
६) मागासवर्गीय असल्यास जातीच्या दाखल्याची सत्यप्रत जोडावी.

६ महिन्याच्या अभ्यासक्रमासाठी रु. १ लक्ष खर्च येणार आहे. महिला व बाल कल्याण समिती सभा दि. २६/०६/२००१ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मंजूर केल्ल्या ठरावानुसार प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

उद्दिष्ट्ये - ५० महिला.

**४) नगर सेविकांचे प्रशिक्षण**

१) स. नगरसेवकांचे हक्क / कर्तव्य जबाबदाऱ्या मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी कल्याणकारी योजनांची माहिती बाबत किमानतील दिवसांचे प्रशिक्षण आयोजित करणे तसेच इतर महानगरपालिका भेटी देणे प्रस्तावित आहे.

प्रशिक्षण : खुलताबाद अथवा पैठण येथे आयोजित करणे आहे.

दि. २६/०६/२००१ रोजी संपन्न महिला व बाल कल्याण समितीत मंजूर प्रस्तावानुसार व नगरसेविकांचे हक्क, कर्तव्य जबाबदाऱ्या, कायद्यातील

तरतूदी कल्याणकारी योजना इतर महानगरपालिकांना समितीच्या भेटी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली प्रशिक्षणासाठी लागणारा खर्च महापालिका फंडातून करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.
तरतूद रु. ३ लक्ष.

५) **व्यावसायिक प्रशिक्षण**

महिलांना स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने सुमारे ५०० महिलांना प्रशिक्षण देणे दि. २६/०६/२००१ संपन्न बैठकीत प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

**नियम व अटी :**

१) महिला औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील असावी.
२) विधवा, परित्यकत्यांना, अपंग महिलांना प्राधान्य असेल.
३) महिला दारिद्र्य रेष्झेखालील कुटूंबातील असावी.
४) प्रशिक्षण शुल्य संदर्भात १०% लाभार्थी सहभाग घेण्यात यावा. व ९०% महानगरपालिकेतर्फे अनुदान उपलब्ध करून द्यावे प्रशिक्षण शासनमान्य संस्थेतून देण्यात येईल.

**व्यवसाय :-**

ब्युटी पार्लर, मशरूम निर्मिती, हस्तकला, कापडी पट्ट्या, फाईल कव्हर्स, पाकीटे, रेग्झीन पर्स बनविणे, पुठ्ठाकाम फिनाईल, खडू, बॉलपेन, रिफीलींग स्क्रीन प्रिटींग मेहंदी, रांगोळी, संगणक, टाकाऊ वस्तुपासून टिकाऊ वस्तू तयार करणे इ. क्षेत्रात प्रशिक्षण देण्यात येईल. तरतूद रु. ५ लक्ष ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.
दि. १३ जुलै २००१ च्या बैठकीत ठराव क्र. ७/१ नुसार.

६) **बाल कामगार कल्याण योजना :**

अ] रस्त्यावर भटकणारी, शाळा सोडलेली, हॉटेल, गॅरेज, बीफ शॉप, स्लॉटर हाऊस मध्ये काम करणारी बुट पॉलिश करणाऱ्या बालकांसाठी (मुले व मुली) कमी श्रमांचे लघु उद्योगांचे विनामुल्य प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे.
ब] **त्या बालकांसाठी व्यवसाय :-** (१) स्क्रीन प्रिटींग (२) फुले बनविणे (३) पाकिटे, (४) फाईल टॅग्ज, फाईल कव्हर्स बनविणे, शुभेच्छा पत्र इत्यादी.
क] प्रशिक्षण कालावधीत त्यांचे उत्पन्न बुडेल या बाबींचा विचार करून त्यांना रु. ५०/- प्रति दिन निर्वाह भत्ता देण्यात यावा.
क] बालकामगारांचे सर्वेक्षण अपेक्षित आहे.

लाभार्थींचा वयोगट १८ वर्षाच्या आतील असेल. त्यासाठी ३ लक्षची तरतूद असावी असा प्रस्ताव प्रशासनातर्फे ठेवण्यात आला होता.

**निर्णय :**

१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रस्त्यावर भटकणारी, शाळा सोडेलेली हॉटेल, गॅरेज, बीफ शॉप, स्लॉटर हाऊस मध्ये काम करणारी बुट पॉलिश करणाऱ्या स्क्रीन प्रिटींग, फले बनविण, पाकिटे, टॅग्ज, फाईल कव्हर्स, ग्रीटींग कार्ड इत्यादी प्रशिक्षण देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली तसेच.

२) प्रशिक्षण कालावधीत लाभार्थींना देण्यात येणारा निर्वाह भत्ता रद्द करून त्या ऐवजी लाभार्थींना कच्चा माल खरेदीसाठी अनुदान देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

या योजनेसाठी ३ लक्ष ऐवजी ५ लक्ष ची तरतूद करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे. सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**७) ९०% अनुदान तत्वावर शिवणयंत्र वाटप**

(१०% लाभार्थींना सहभाग या प्रस्तावा करिता रु. २ लक्ष तरतूद ठेवण्यात आली आहे.)

**नियम व अटी :**

१) साधारणत: प्रति प्रभागातून एक लाभार्थींची निवड करण्यात येईल.
२) महिला आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील असावी.
३) किमान १ वर्षे कालावधीचे शासनमान्य शिवणकामाचे प्रशिक्षण यशस्वीरित्या उत्तीण केल्याबद्दल शासकीय प्रमाणपत्राची सत्यप्रत असावी.
४) विहित नमुन्यातील अर्ज (रु. २/-) मागासवर्गीय असल्यास जातीचे पमाणपत्र अथवा शाळा सोडण्याच्या दाखल्याची सत्यप्रत, छायाचित्र, रहिवाशी प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक राहील.
५) एका कुटूंबात एकाच महिलेस एकदाच वस्तु स्वरुपात मदत करण्यात येईल. दि. १३/०७/२००१ रोजी भरलेल्या महिला व बाल कल्याण समितीमध्ये "शिवण यंत्र वाटप" प्रस्ताव मान्य झाला आहे. सर्व जाती धर्माच्या विद्यार्थीनींना सदर योजनेचा नियमाप्रमाणे लाभ घेता येईल.

सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे बाबत मार्गदर्शन व्हावे.

**८) अनाथ-निराधार मुलां/मुलींना दत्तक घेणाऱ्या पालकांना प्रोत्साहनपर अनुदान**

**निकष, नियम व अटी :**

१) मुल शासनमान्य संस्थेतुनच घेतले असले पाहिजे.
२) विहित नमुन्यातील अर्जा सोबत दत्तक घेण्याबद्दल न्यायालयाचे आदेश असावेत.
३) स्थानिक रहिवाशी प्रमाणपत्र व छायाचित्र सादर करणे अर्जदारास बंधनकारक राहिल.
४) मुलांना दत्तक घेणाऱ्या पालकास रु. १०,०००/- प्रोत्साहपर अनुदान देण्यात येईल.
५) जे बालक दत्तक द्यावयाचे असेल ते १८ वर्षा खालील असावे.

६) अर्जदार आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटाकातील असावा. नसता तहसिलदारांकडून घेतलेला दाखला जोडावा.
७) दत्तक घेणाऱ्या पालकांची निवड करण्यासाठी समिती नेमण्यात येणार आहे.
८) एकाच कुटूंबाला दत्तक मुलांच्या नांवे रुपये १०,०००/- एफ. डी. स्वरुपात अनुदान द्यावे.

एफ.डी. ची रक्कम दत्तक मुलाच्या १८ वर्षानंतर त्याला मिळेल. एफ. डी. च्या कालावधीत दत्तक मुले हयात राहिले नाही तर सदर रक्कम मुलाच्या आईला मिळेल आणि आई हयात राहिली नाही तर मुलांच्या वडीलांना ही रक्कम मिळेल अशी नामनिर्देशन करण्याची अट राहील.

सदर प्रस्तावास दिनांक २६/०६/२००१ च्या महिला बालकल्याण सभेस सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे.

## ९) विद्यार्थीनींसाठी सुविधा (सायकल वाटप)

**नियम व अटी :**
१) इ. ७ वी ते महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्या कमकुवत कुटूंबातील विद्यार्थीनी असाव्यात.
२) अर्जदार औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील रहिवाशी असावी.
३) लाभार्थींचा सहभाग १०% घेवून ९०% अनुदान महानगरपालिकेतर्फे उपलब्ध असेल.
४) विद्यार्थीनींना शाळा / महाविद्यालयात शिकत असल्याबाब मुख्यध्यापक / प्राचार्याकडून घेतलेले शिक्षण घेत असल्याबाबत प्रमाणपत्र छायाचित्र व विहित नमुन्यातील अर्ज व रहिवाशी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
५) एका कुटूंबातील एकाच मुलीस एकाच लाभ देण्यात येईल.

**निर्णय :**
१) प्रत्येक वॉर्डातून दोन सायकली वाटप करण्यात याव्यात.
२) यात १०% लाभार्थींचा सहभाग व ९०% महानगरपालिकेमार्फत अनुदान या पध्दतीने कार्यवाही करावी तरतूद ३ लक्ष अशी आहे.
३) यासाठी संबंधित लाभार्थीयाना तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला सादर करावा लागणार आहे.
४) सर्व जाती धर्माच्या मुलींचा सहभाग राहणार आहे.

सदर प्रस्ताव दि. १३/०७/२००१ रोजी संपन्न झालेल्या महिला व बाल कल्याण समितीने मंजूर केलेले आहे त्यात सर्वसाधारण सभेने मंजूरी द्यावी अशी महिला व बालकल्याण समितीची मागणी आहे. व यानंतर मंजूर होणार प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस अधिन राहणार नाही असे अधिकार प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव आहे.

श्री. प्रशांत देसरडा : ज्या महिला साक्षर नाही त्यांना साक्षर करण्याची कार्यवाही महिला व बाल कल्याण समितीमार्फत करण्यात यावी.

मा. महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येतात. महिलांना साक्षर करण्या संदर्भात नियमाने संबंधित अधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी.

सौ. दाणे चंद्रभागाबाई, श्रीमती जयश्री किवळेकर :

प्रस्ताव मंजूर केल्याबद्दल मा. महापौर सभागृहाचे महिला व बाल कल्याण समितीतर्फे अभिनंदन करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(६) नुसार महिला व बाल कल्याण समिती यांनी महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, नगरविकास विभाग, शासनाने इतर विभागाकडून महानगरपालिका प्रशासनाकडून सादर होणारे सर्व प्रस्तावांवर घेतलेला निर्णय अंतिम असेल, असे कामकाज महानगरपालिकेकडून कायम करण्याच्या अधिन राहणार नाही असे अधिकार प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच सभागृहात वर नमूद केलेले अ.क्र. १ ते ९ व या व्यतिरिक्त आजपर्यंत महिला व बाल कल्याण समितीने मंजूर केलेले विविध प्रस्तावासही सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०२/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ०८ एम.आय.डी.सी. चिकलठाणा येथील धुत हॉस्पिटल समोरील चौकास "सम्राट अशोक स्तंभ" उभारून शहर सौंदर्यात भर टाकून औरंगाबाद महानगरपालिकाचे नांव लौकिक करावे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. राजु रामराव शिंदे
अनुमोदक - १) श्री. डॉ. भागवत कराड
२) श्री. माणिक साळवे
३) श्री. भगवान घडामोडे
४) श्री. रतनकुमार पंडागळे
५) श्री. प्रशांत देसरडा.

**संवाद :**

मा. महापौर : प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ०८ एम.आय.डी.सी. चिकलठाणा येथील धुत हॉस्पिटल समोरील चौकास "सम्राट अशोक स्तंभ" उभारण्या सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०३/३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्व्हे नं. ५१/४ गारखेडा येथे जय दुर्गा हाऊसिंग सोसायटी असून या सोसायटीच्या पूर्वेस ९० फुटाच्या डि.पी.रोड (३० मीटर) महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात फार पूर्वी पासून दर्शविलेला आहे. पूर्वी या भागात कमी वस्ती होती आता लोकवस्ती खूपच वाढलेली असून शिवाजीनगर कडून सिडको एन-३, एन-४, छत्रपती नगर, गजानन महाराज मंदिराकडे येणारी वाहने व लोकांचा लोंढा मोठा आहे. आता त्यांना सुतगिरणी मार्गे यावे लागते. तसेच ६ चौरस कि.मी. च्या क्षेत्रात मुख्य रस्त्यावरून आतील वस्तीकडे जायला एकही जोड रस्ता नाही. म्हणून सुत गिरणी, जानकी रेस्टॉरंट, शिवाजी नगर मार्गे रेल्वे पटरीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरून जय दुर्गा हाऊसिंग सोसायटीकडे येणारा विकास रस्ता ३० मीटर तयार करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक - सौ. कचराबाई लोखंडे
अनुमोदक - श्री. आनंद तांदुळवाडीकर,
श्री. राधाकृष्ण गायकवाड

**संवाद :**

मा. महापौर : नियमाने कार्यवाही करण्यात यावी प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्व्हे नं. ५१/४ गारखेडा, सुत गिरणी, जानकी रेस्टॉरंट शिवाजी नगर मार्गे रेल्वे पटरीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरून जय दुर्गा हाऊसिंग सोसायटीकडे येणारा विकास रस्ता ३० मीटर रुंद विकास रस्त्याचे भूसंपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०४/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. १६ मधील जय दुर्गा हाऊसिंग सोसायटी अंतर्गत ड्रेनेज लाईन नसल्यामुळे येथील रहिवाशांची अत्यंत गैरसोय होत असून ड्रेनेज लाईन त्वरित टाकणेबाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक - सौ. कचराबाई लोखंडे
अनुमोदक - श्री. आनंद तांदुळवाडीकर,
श्री. राधाकृष्ण गायकवाड

**संवाद :**

मा. महापौर : प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र. १६ मधील जय दुर्गा हाऊसिंग सोसायटी अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे बाबतच्या प्रस्तावात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०५/५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नारेगांव प्रभागातील वोखार्ड कंपनी ते नारेगांव या मुख्य रस्त्यावरील रेडियट ॲग्रो प्रा. लि. कंपनी परिसरात चौक असून या चौकास "जय भवानी चौक" असे नांव देणे बाबत या भागातील नागरिकांनी मागणी केलेली आहे. नागरिकांची मागणी विचारात घेता या चौकास "जय भवानी चौक" असे नांव देणे व सदर चोकाचे सौंदर्यीकरण तथा सुशोभिकरण करण्यात यावे. जेणे करून या रस्त्यावर वाहतुक सरळीत होईल तसेच अपघात टळतील. प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. भाऊसाहेब वाघ
अनुमोदक - श्री. भरत लकडे, श्री. अंबादास दानवे,
श्री. किशोर तुलशीबागवाले.

**संवाद :**

श्री. काशिनाथ कोकाटे : प्रस्तावाचे सुचक सभागृहात उपस्थित नाही.
मा. महापौर : प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावाचे सुचक सभागृहात उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५०६/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र. १६ मधील सर्व्हे नं. ५१/४ अंतर्गत जय दुर्गा हाऊसिंग सोसायटीच्या पूर्वेस महानगरपालिकेची खुली जागा असून जागेस महानगरपालिकेने तार कुंपन केलेले आहे. येथील रहिवाशांना स्मशान भूमी नसून सदर खुल्या जागेवर स्मशान भूमी विकसित करणे बाबत रहिवाशी सारखी मागणी करत आहेत. रहिवाशांची स्मशान भूमी अभावी होत असलेली गैरसाय विचारात घेता या जागेवर स्मशान भूमी तयार करणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक - सौ. कचराबाई लोखंडे
अनुमोदक - श्री. आनंद तांदुळवाडीकर,
श्री. राधाकृष्ण गायकवाड

**संवाद :**

मा. महापौर : प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. १६ मधील सर्व्हे नं. ५१/४ अंतर्गत जय दुर्गा हाऊसिंग सोसायटीच्या पूर्वेस महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर रहिवाशांच्या मागणी नुसारस्मशान विकसित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०७/७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र. ३६ मधील कोहीनुर कॉलनी येथे महानगरपालिकातर्फे बांधण्यात आलेल्या बहुउद्देशीय हॉल यास "कोहिनूर बहुउद्देशीय हॉल" असे नामकरण करण्यात यावे. याचे करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमारे मंजुरीस्ताव सादर.

सुचक - सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखॉन
अनुमोदक - सौ. साजेदा बेगम, श्री. मधूकर सावंत

**संवाद :**

मा. महापौर : प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र. ३६ मधील कोहीनुर कॉलनी येथे महानगरपालिकातर्फे बांधण्यात आलेल्या बहुउद्देशीय हॉल यास "कोहिनूर बहुउद्देशीय हॉल" असे नामकरण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०८/८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, जीवक नगर (पारधीपुरा) येथे मुख्य रस्त्याच्या बाजूस माझ्या स्वेच्छा निधीतून सांची स्तुप "प्रवेशद्वार" ची प्रतिकृती आर.सी.सी स्टकचर मध्ये उभारण्यात यावे व यासाठी माझ्या स्वेच्छानिधीतून रुपये पंच्याहत्तर हजार ते एक लाखापर्यंत खर्च करून बांधण्यात यावे. जेणे करून सदर प्रवेशद्वार ऐतिहासिक शहरास भेट देणाऱ्या पर्यटकास व सम्राट अशोक यांची आठवण म्हणून प्रेरणादायी ठरावे म्हणून प्रवेशद्वार उभारण्यास मंजुरी मिळण्याकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्ताव सादर.

सुचक - सौ. चंद्रभागाबाई दाणे
अनुमोदक - श्री. माणिक साळवे, श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दिन

**संवाद :**

मा. महापौर : प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जीवक नगर (पारधीपुरा) येथे मुख्य रस्त्याच्या बाजूस माझ्या स्वेच्छा निधीतून सांची स्तुप "प्रवेशद्वार" ची प्रतिकृती आर.सी.सी स्टकचर मध्ये उभारण्यास व त्यासाठी लागणारा सर्व खर्च स. नगरसेविका सौ. चंद्रभागाबाई दाणे यांच्या स्वेच्छानिधीतून करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०९/९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मराठवाड्याचे झुंजार व पोलादी पुरुष दलित मित्र, स्वातंत्र्य सेनानी नव बौध्दांना अंध्दमध्ये पासून मुक्ती देणार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार संपूर्ण मराठवाड्यात घराघरात पोहोचविणारे व विशेष म्हणजे

"जयभिम" घोषणा वाक्य समाजात निर्माण करणारे दलितांचे नेते, मराठवाडा मुक्ती आंदोलनात प्रखरतेने भाग घेणारे सेनानी भाऊसाहेब मोरे यांचा पुतळा सर्व समाजाला प्रेरणादायी आठवण म्हणून विध्दार्थ उद्यानासमोरील सौंदर्यीकरण बैटात महानगरपालिका औरंगाबाद लिहिलेल्या जागेवर थ्रीसेट विद्युत खांबाखाली उभारण्यात यावा करिता सर्वसाधारण सभेत ठराव मंजुरीस्तव सादर.

सुचक - सौ. चंद्रभागाबाई दाणे

अनुमोदक - श्री. माणिक साळवे, श्री. शेख ईसाक शेख जैनोद्दिन

**संवाद :**

श्री. दानवे अंबादास : प्रस्तावानुसार याच चौकास स्व. बाळासाहेब पवार यांचे नांव देण्यात आलेले असे माझे मत आहे. आणि पुतळा उभारण्याचा सुध्दा निर्णय आपण घेतलेला आहे. हा चौक तोच आहे का? याचा प्रशासनाकडून खुलासा होणे गरजेचे आहे.

मा. आयुक्त : सभागृहात नगरसेवकांनी जे प्रस्ताव सादर केलेले आहे त्याबाबतीत सभागृहाने प्रशासनाचे कोणतेही मत घेतलेले नाही व ठराव मंजूर करीत आहोत. माझी सभागृहाला अशी विनंती आहे कोणत्याही प्रस्तावावर प्रशासनाचे मत घेतल्यानंतरच प्रस्ताव मंजूर करावे. जेणे करून प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर प्रशासन त्यास मान्यता देत नसतील तर त्यानंतर वादविवाद व सभागृहाचा सन्मान इ. बाबी उपस्थित होतात. योग्य पध्दती लावल्यास काम करणे सोयीस्कर होईल. आताच एका सदस्यांनी प्रशासनाचे मत घेण्याचे सुचविले. प्रपोजल आमच्या समोर येईल तपासणी होईल. त्यानंतर येणाऱ्या सर्वसाधारण सभेत मिहती देता येईल. त्यानुसार कार्यवाही होईल. प्रशासनाला मत देता येणार नाही. इतर महानगरपालिकेमध्ये नगरसेवकांचे प्रस्ताव आल्यानंतर मा. महापौर ते प्रस्ताव ॲक्सेप्ट करतात आणि पुढील तीन महिण्यामध्ये रितसर प्रस्ताव तपासून सभागृहासमोर मंजुरीसाठी ठेवले जातात. त्यानुसार आपण सुध्दा विचार करावा जेणे करून योग्य पध्दतीने प्रशासन काम करेल.

श्री. प्रकाश निकाळजे : सात दिवसापूर्वी हे प्रस्ताव दिलेले आहे तपासणी करून ठेवावयास पाहिजे होते.

मा. आयुक्त : तीन दिवसापूर्वी पर्यंत प्रस्ताव देण्यात येतात. ३ दिवसाची सूचना देवून पुरवणी विषय पत्रिका काढण्यात येते.

श्री. जयवंत ओक : मा. आयुक्त यांनी जे मत व्यक्त केले ते एकाच ठरावाच्या बाबतीत नसून इतर सर्व नगरसेवकांच्या ठरावा संबंधी आहे. परंतु ही पध्दत १४ वर्षापासून चालू आहे. म्हणून अशा प्रस्तावावर सभागृहाने निर्णय घेतला पाहिजे. व प्रस्तावानुसार नियमाने कार्यवाही करता येते किवां येत नाही हे प्रशासनाने तपासणी केली पाहिजे काम करता येत नसेल तर ज्या सदस्यांनी प्रस्ताव ठेवला त्यांना तसेच पत्राने प्रशासनाने कळविणे योग्य होईल.

श्री. सुदाम सोनवणे : या चौकाचे जेष्ठ कार्यकर्ते बाळासाहेब पवार असे नामकरण करणे आहे.

डॉ. भागवत कराड : मी सुध्दा या अगोदर महापौर म्हणून कामे केलेले आहे. बरेच स. सदस्य प्रस्ताव तयार करतात सुचक, अनुमोदक म्हणून सह्या घेतात व मा.

महापौर यांची सही घेतल्यानंतर प्रस्ताव सभागृहात मंजुरीसाठी येतात. परंतु प्रस्ताव ठेवतांना बजेट, जागा आहे का याचा काहीही विचार न करता प्रस्ताव आणण्यात येतात. ते प्रस्ताव मंजूर होतात वृत्तपत्रात बातमी येते. व संबंधित नगरसेवक वॉर्डातील जनतेला सांगताता प्रस्ताव मंजूर झाला परंतु प्रशासनास काम करण्यास अडचण येते. व कोणतेच काम वेळेवर होत नाही. म्हणून स. सदस्यसांनी प्रस्ताव ठेवतांना मा. महापौरांची सही झाल्यानंतर सदर प्रस्ताव ज्या ज्या विभागाकडे पाठवून योग्य सविस्तर माहिती घेऊनच प्रस्ताव सभागृहाच्या मंजुरीसाठी ठेवण्यात यावे जेणे करून प्रशासनास सुध्दा कामे करण्यास अडचण येणार नाही. ही १४ वर्षाची परंपरा आहे.

मा. महापौर : प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५१०/१० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, त्रिवेणीनगर येथील अमानउल्ला मोतीवाला हॉलच्या पाठीमागे समाज मंदिर बांधण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्रीमती. सलमा बानो मिर मोहम्मद अली.
अनुमोदक - श्री. किशोर तुलशीबागवाले,
श्रीमती साजेदा बेगम विखार अहमद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे त्रिवेणीनगर येथील अमानउल्ला मोतीवाला हॉलच्या पाठीमागे समाज मंदिर बांधण्यास सवानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५११/११ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरात लोकसंख्या जास्त वाढल्यामुळे मोटार गाड्यांचाही संख्या दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे व पदचाऱ्यांना आपला जीव मुठीत धरून रस्ता पार करावा लागतो करिता खालील ठिकाणी भुयारी मार्ग बनवावे.

१) सेव्हन हिल २) मोंढा नाका
३) सिध्दार्थ गार्डन समोर ४) क्रांती चौक

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्ताव सादर.

सुचक - श्रीमती सलमा बानो मिर मोहम्मद अली.
अनुमोदक - श्री. किशारे तुलीशीबागवाले,
श्रीमती साजेदा बेगम विखार अहमद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खालील ठिकाणी भुयारी मार्ग तयार करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) सेव्हन हिल २) मोंढा नाका
३) सिध्दार्थ गार्डन समोर ४) क्रांती चौक

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१२/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सुरत महानगरपालिकेच्या धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेतील महिला व पुरुष शिपाई व कर्मचाऱ्यांना गणेवशाची सक्ती करावी गणवेश घातला नाही त्या रोजी त्यांच्यावर दंड लावून वसूल करावा करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्ताव सादर.

सुचक - श्रीमती सलमा बानो मिर मोहम्मद अली.
अनुमोदक - श्री. किशोर तुलीशीबागवाले,
साजेदा बेगम विखार अहमद

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील महिला व पुरुष शिपाई व कर्मचाऱ्यांना गणेवशाची सक्ती करण्यांस व गणवेश न घातल्यास त्यांचेवर दंड लाऊन वसूल करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१३/१३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरातील खडकेश्वर प्रभागात महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्या पासून ते छत्रपती शाहु महाराज यांच्यापुतळ्या पर्यंतच्या रस्त्यास दोन्ही बाजूला फुटपाथ बांधण्यात यावे. तसेच छत्रपती शाहु महाराज पुतळ्यापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्या पर्यंत असलेल्या रस्त्यावरही दोन्ही बाजूस फुटपाथ बांधण्यात यावे. ज्यामुळे रस्ते स्वच्छ व चांगले राहतील व रस्त्याचे सौंदर्यात भर पडेल तसेच नागरिकांना येण्या जाण्यास सुलभता होईल. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. जयवंत ओक
अनुमोदक - श्री. चंद्रशेखर जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खडकेश्वर प्रभागात महात्मा ज्योतिबा फुले पुतळ्या पासून ते छत्रपती शाहु महाराज यांच्यापुतळ्या पर्यंतच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूने तसेच छत्रपती शाहु महाराज पुतळ्यापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्या पर्यंत असलेल्या रस्त्यावरही दोन्ही बाजूस फुटपाथ बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१४/१४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका व औरंगाबाद जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने "नगरसेवक क्रिकेट चषक स्पर्धा" घेण्यात याव्यात या स्पर्धेसाठी प्रत्येक नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून एक हजार रुपये देण्यात यावे. या स्पर्धेतून प्रत्येक वॉर्डातून क्रिकेट खेळांडूना वाव मिळेल. तसेच नगरसेवक क्रिकेट चषक स्पर्धा आयोजित केल्यामुळे महानगरपालिकेचा देखील गौरव होईल करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्ताव सादर.

सुचक - श्री. जयवंत ओक
अनुमोदक - श्री. चंद्रशेखर जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका व औरंगाबाद जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने "नगरसेवक क्रिकेट चषक स्पर्धा" घेण्यात याव्या व प्रत्येक नगरसेवकांच्या स्वेच्छानिधीतून एक हजार रुपये देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१५/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये माहे मे २००१ पासून प्रथमच महिला व बालकल्याण समिती कार्यान्वित झालेली आहे. महिला व बालकल्याण समिती अंतर्गत येणारे उपक्रम राबविण्यासाठी व घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र अशी विभागाची निर्मिती केलेली नाही किंवा स्वतंत्र अधिकारी नेमण्यात आलेला नाही. महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी महिला व बाल कल्याण समिती अस्तित्वात आली अशा ठिकाणी या कामासाठी स्वतंत्र अधिकारी नेमण्यात आलेले आहेत. सबब महिला व बालकल्याण समितीचे उपक्रम राबविण्यासाठी आणि घेतलेल्या ठरावांची अंमलबजावणी करण्यासाठी या महानगरपालिकेमध्ये महिला व बाल कल्याण विकास अधिकारी हे पद निर्माण करण्यात यावे.

या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षक्षिक अर्हता एम.ए. समाजशास्त्र, एम.एस. डब्ल्यु व स्थानिक अनुभव विचारात घेवून महिला व बाल कल्याण अधिकारी यांची नियुती करण्यात यावी कार्यालयीन अधिक्षकच्या वेतनश्रेणीत.

करिता महिला व बाल कल्याण विकास अधिकारी हे पद निर्मितीचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. चंद्रभागाबाई दाणे
अनुमोदक - श्री. श्रीमती जयश्री किवळेकर

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे महिला व बाल कल्याण समितीचे कामकाजासाठी महिला व बालकल्याण अधिकारी हे पद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर प्रस्तावित शैक्षणिक अर्हता, अनुभव व वेतनश्रेणीत निर्माण करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१६/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या असलेल्या जागा व रस्ते यांची माहिती दर्शविणारा बोर्ड फलक महानगरपालिकेच्या जागेवर वा रस्त्यांवर लावण्यात यावा. सदरील फलकावर जागेची थोड्यात माहिती व नकाशा लावण्यात यावी. सदरील जागेवर अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम होणार नाही यासाठी नोटीस लावण्यात यावी. सदरील जागा विकत घेऊ नये, त्यावर बांधकाम करू नये म्हणून इशारा देण्यात यावा, त्यामुळे महानगरपालिकेचे जागांचे हस्तांतरण होणार नाही. तसेच त्यावर अनधिकृत बांधकामही होणार नाही. सदरील जागेचे क्षेत्रही नकाशावर दर्शविण्यात यावे. त्यावर मालमत्ता अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांनी महिन्यातून एकदा जागेवर भेट देऊन आयुक्तांचा मालमत्ता व्यवस्थित असल्याचे अहवाल द्यावे. तसेच महापालिकेचे रस्तेही त्याचप्रमाणे फलक लावून त्यांची लांबी, रुंदी दर्शविण्यात यावी. रस्त्यावर अतिक्रमण होऊ नये म्हणून रस्त्यांची रुंदी लांबी दर्शविण्यात यावी. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. जयवंत ओक
अनुमोदक - श्री. चंद्रशेखर जैस्वाल

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या असलेल्या जागा, रस्ते यांची माहिती दर्शविणारा (बोर्ड) महानगरपालिकेच्या जागेत वा रस्त्यांवर लावून सदरील फलकावर जागेची थोड्यात व नकाशा नावण्यात यावी. सदरील जागेवर अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम होणार नाही यासाठी नोटीस लावून जागेवर बांधकाम करू नये. व विकत घेऊ नये, म्हणून इशारा देण्यास व सदरील जागेचे क्षेत्रही नकाशावर दर्शविण्यात यावे. तसेच सदरील जागेवर मालमत्ता अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांनी महिन्यातून एकदा भेट देऊन जागा सुरक्षित असल्याचा अहवाल मा. आयुक्तांना सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१७/१७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहरात सुमारे ५०० ते ६०० डॉक्टर्सची हॉस्पिटल व कन्सलटींग रुम्स आहेत. त्या ठिकाणी रुग्णांना औषधोपचार केल्यावर वापरलेल्या सिरीज व निडलस ह्या कचरा कुंडीत फेकल्या जातात. कचरा कुंडीतील ह्या वस्तू प्लॉस्टिक पेपर व भंगार गोळा करणारे निवडून परत उत्पदकास विकण्याची शक्यता असून त्यामुळे जनतेच्या आरोग्यास धोका आहे. अशा वस्तू कचरा कुंडीत न टाकण्याचे बंधन सर्वांवर करण्यात यावे. तसेच सदरील सिरिज निडलस नष्ट करण्याचे काम सेवाभावी संस्थांना द्यावे. शिव उद्योग या संस्थेस हे काम देण्यात यावे. पुणे शहरात सध्या शिव उद्योग हा प्रयोग करित असून तो यशस्वी होत आहे. त्यामुळे शिव उद्योग या संस्थेकडे नोकरीसाठी येणाऱ्या बेरोजगांराना रोजगार मिळेल. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्ताव सादर.

सुचक - श्री. जयवंत ओक
अनुमोदक - श्री. चंद्रशेखर जैस्वाल

**चर्चा :**

डॉ. भागवत कराड : बायो मेडिकल वेस्ट संबंधी खाजगी तत्वावर बोल्ट पध्दतीने आपण टेंडर काढणार होतो नारेंगाव तसेच बेगमपुरा स्मशानभूमी येथे जागा सुध्दा निश्चित केलेली आहे. आतापर्यंत टेंडर काढलेले नाही सविस्तर माहिती संबंधित अधिकारी यांनी सभागृहास द्यावी. यामध्ये इंडियन मेडिकल असोशियन चे डॉक्टर महानगरपालिकेचे डॉक्टर तसेच अधिकारी यांचे समवेत मी बैठक सुध्दा घेतलेली होती.

मा. महापौर : मी महापौर झाल्यानंतर या प्रोजेक्टसाठी नाशिक महानगरपालिकेतून माहिती आणलेली आहे. माजी महापौर डॉ. भागवत कराड यांनी या प्रोजेक्टसाठी जागा सुध्दा आरक्षित केलेली होती. सर्व डॉक्टरांची बैठक बोलावून कार्यवाही करावी म्हणून आदेश दिले होते. परंतु कोणतीही कार्यवाही झालेली नाही. आता नाशिक महानगरपालिकेतून सर्व माहिती आणलेली आहे. व या प्रोजेक्टसाठी लवकरच टेंडर काढून पुढील कार्यवाही लवकरच करण्यात येणार आहे. याबाबत संबंधित अधिकारी खुलासा करतील.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : बायो मेडिकल वेस्ट डिस्पोजल हा प्रकल्प महानगरपालिकेस डिसेंबरच्या आत सुरू करण्याच्या दृष्टीने पूव तयारी म्हणून माजी महापौर डॉ. भागवत कराड यांची अध्यक्षतेखाली आपण सर्व डॉक्टरांच्या समवेत बैठक बोलावली होती. वकिती बायो मेडिकल वेस्ट जागा होऊ शकेल याची माहिती घेतली व एम. आय. टी. कॉलेजचे श्री. धारवाडकर म्हणून प्राध्यापक आहे त्यांचेकडे या प्रकल्पाचे काम दिलेले होते. सोमवारी सर्व माहिती ते सादर करणार आहे. मा. महापौर मी स्वतः नाशिक येथे जाऊन माहिती घेतलेली असून मुंबईहून सुध्दा माहिती घेतलेली आहे. येत्या पंधरा दिवसाच्या आत या प्रकल्पा संबंधीच्या निविदा काढणार आहोत.

श्री. दानवे अंबादास : संबंधित अधिकारी यांना हा प्रकल्पा राबविण्यासाठी सांगतात परंतु होत नाही अशी शंका निर्माण होते. कित्येक वर्षापासून चालू आहे. कदाचित डॉक्टरांना वेळ नसेल म्हणा परंतु हा प्रकल्प होण आवश्यक असून शहरातील नागरीकांच्या आरोग्याचा सुध्दा प्रश्न आहे. बऱ्याच मोठमोठ्या शहरामध्ये हा प्रकल्प राबविल्या जातो. व हे प्रकल्प अतिशय आदर्श प्रकल्प आहेत. या प्रकल्पापासून महानगरपालिकेस आर्थिक फायदा पण आहे. सर्व तयारी झालेली असतांना आरोग्य अधिकारी दुर्लक्ष करतात व त्यांचे दुर्लक्षामुळेच हा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही. माझ्या माहिती प्रमाणे श्री बारवाल साहेब हे माजी महापौर असतांना तेंव्हा पासून या प्रकल्पाबाबत वेळोवेळी बैठका होतात. तरी सुध्दा टाळाटाळ होते. आताच सांगितल्याप्रमाणे १५ दिवसांत टेंडर काढण्यात येईल असे अधिकारी यांनी सांगितलेले आहे. सविस्तर खुलासा देण्यात यावा.

डॉ. भागवत कराड : या संदर्भात आपणांस अगोदर धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. डॉक्टरांची बैठक बोलवावी लागले तसा हा प्रकल्प पूर्ण होणार नाही. मा. आयुक्तांनी खुलासा करावा.

मा. आयुक्त : आरोग्य वैद्यकीय अधिकारी कोणत्या उद्देशाने बोलले. मला विश्वास वाटत नाही.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : याचा डाटा मला सोमवारी मिळणार असून २ ते ३ प्लॅन्अ सुध्दा बघून आलेलो आहोत. त्याचे डिजाईन काय आहे. काय अपेक्षित आहे

हे आपल्या डाटानुसार फिड करायचे आहे. त्यानंतर बोल्ट पध्दतीने टेंडर काढावे लागणार आहे. यासाठी १५ दिवस लागणार आहे.

डॉ. भागवत कराड : या एका हॉस्पिटलसाठी किती चार्ज लावणार, कशा पध्दतीने हाताळणार यासाठी एक बैठक बोलावणे आवश्यक आहे. हे ठरविले आहे का?

आरोग्य वैद्य. अधिकारी : दर निश्चित करण्यासाठी नाशिक महानगरपालिकेतून माहिती आणलेली आहे. त्यानुसार प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

डॉ. भागवत कराड : मी महापौर असतांना या संबंधी टाऊन हॉल येथे शहरातील सर्व डॉक्टर, महानगरपालिकेचे डॉक्टर तसेच संबंधीत अधिकारी यांचे समवते बैठक बोलावली होती. आपण या बैठकीला उपस्थित नव्हते. त्यावेळीच नाशिक महानगरपालिकेतून माहिती आणलेली होती. आता पय्रंत का कार्यवाही झाली नाही.

आरोग्य वैद्य. अधिकारी : डाटा प्राप्त न झाल्यामुळे उशीर होत आहे.

श्री. प्रशांत देसरडा : संबंधित अधिकारी यांनी अगोदर स. सदस्य श्री. भागवत कराड यांचे म्हणणे ऐकूण घ्यावे नंतर सविस्तर खुलासा करावा.

श्री. दानवे अंबादास : प्रत्येक वर्षी हा विषय चर्चेला येतो. अतिशय महत्वाचा व महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल या दृष्टीकोनातून हा प्रकल्प तात्काळ राबविण्याची आवश्यकता आहे. मा. आयुक्तांनी जातीने लक्ष देऊन संबंधित अधिकारी यांना १५ दिवसाच्या आता कार्यवाहीचे आदेश द्यावेत. तसे आदेश आपण प्रशासनास द्यावेत. नसता संबंधित आरोग्य अधिकारी यांचेवर काय कार्यवाही करायची याचे अधिकारी सर्वसाधारण सभेला आहे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : नाशिक महानगरपालिकेने हा प्रकल्प ६ महिण्यात पूर्ण केलेला आहे. आपल्याही प्रशासनाने महिण्यात हा प्रकल्प पूर्ण करावा. तसे आदेश आपण करावे.

मा. आयुक्त : या प्रकल्पा बाबत मला अभ्यास नाही हा प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. जितका उशीर होईल तेवढे आरोग्यास धोका होईल. लवकरात लवकर करण्यात येईल.

मा. महापौर : हा प्रकल्प लवकरात लवकर चालू होण्या बाबत संबंधित अधिकारी यांनी कार्यवाही करावी. डिसेंबर २००१ पर्यंत हा प्रकल्प चालू करावा त्यानुषंगाने तात्काळ कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे बायो मेडिकल वेस्ट डीस्पोजल हा प्रकल्प पूर्ण करून डिसेंबर २००१ पर्यंत हा प्रकल्प कार्यान्वित होणेच्या संदर्भात प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी. असे सर्वानुमते ठरले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५१८/१८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, नागेश्वरवाडी प्रभागातील सारस्वत बॅकेसमोर मोठा चौक असून या रस्त्यास निराला बाजार, औरंगपुरा, मिलकॉर्नर नारळीबाग या भागा मधून प्रमुख सार्वजनिक रस्ते येऊन मिळतात. या वस्त्यावर आहोरात्र वाहनांची

वर्दळ असते. सदर चोकाची सुशोभिकरण तथा सौंदर्यीकरण महानगरपालिकेमार्फत अद्याप करण्यांत आलेले नाही. सदर चौकाचे सौंदर्यीकरण व सुशोभिकरण करणे, बाबत या भागातील रहिवाशी सारखी मागणी करत आहेत. सदर चोकाचे परिसरातील खुल्या जागेचा योग्यरित्या विकास झाल्यास शहरातील अन्य चौकांप्रमाणे हा चौक देखील आकर्षक व सुंद दिसे`ल. या परिसराचा रहिवाशांचे मागणी नुसार विकास होऊन हा परिसर शोभिवंत दिसेल व शहराचे सौंदर्यात भर पडेल. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचरार्थ सादर.

सुचक - श्री. जयवंत ओक
अनुमोदक - श्री. चंद्रशेखर जैस्वाल

**चर्चा :**

डॉ. भागवत कराड : या रस्त्यावर मोठा चौक नाही. पुल होणार असेल तर कोठे होणार, कोणत्या जागेवर होणार.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

अति. शहर अभियंता : नागेश्वरवाडीच्या या चौक शेजारी पुलाचे काम रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे. व पुलाचे कामात या चौकाचे कामाचा सुध्दा समावेश होतो. तेथील आजुबाजूच्या रस्त्यात सुधारणा होईल त्यानंतरच चौकाचे काम करता येईल.

मा. महापौर : प्रस्तावानुसार हा चौक रस्ते विकास महामंडळाचे योजनेमध्ये घेतलेला आहे. बाजुलाच असलेल्या पुलाचे काम होणार आहे. निराला बाजार व अप्सरा सिनेमाकडून येणाऱ्या रस्त्यात हा चौक येतो. थोडासा वळन रस्ता करून या चौकाचे काम करावे लागणार आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार नागेश्वरवाडी प्रभागातील सारस्वत बँके समोरील चौकाचे सुशोभिकरण व सौंदर्यीकरण करून विकास करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१९/१९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील जेवढी घरे येतात त्या सर्व घरांना घर क्रमांक देण्यात यावेत. घरांना घर क्रमांक नसल्यामुळे लोकांना, मतदान यादी नवीन तयार करतांना कराची पावती देतांना, टपाल कर्मचारी पत्र देतांना यांना संपूर्ण पत्ता घर नं. नसल्याने खूप त्रास होतो. जेणे करून औरंगाबादच्या रहिवाशांना त्यांच्या घरांना त्यांना घर क्रमांक देणे फार अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे या कामात शासनाची देखील फार चांगली मदत होईल. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्ताव सादर.

सुचक - श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन
अनुमोदक - श्री. सलिम पटेल समशेर पटेल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दित जेवढी घरे येतात. त्या सर्व मिळकतींना घर क्र. देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२०/२० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सर्वसाधारण सभा दि. २०/०४/२००१ रोजी मंजूर झालेला ठराव क्र. ३६५/६ विद्यापीठ गेटपासून पूर्वेस खाम नदी पर्यंत असलेल्या वस्तीकडे जाणारा रस्ता नॉन डिपी २५ फुट रुदं रस्ता नं. भू.क्र. ३०५,३०६ व २८७ च्या दक्षिणेकडील सर्वे नं. २ व ३ मधील जयसिंगपुरा येथील ६० चौ. मी. जागा संपादन करण्याचा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्ताव सादर.

सुचक - श्री. रतनकुमार पंडागळे
अनुमोदक - श्री. प्रकाश निकाळजे.
श्री. सुरजितसिंग खुंगर
श्री. आनंद तांदुळवाडीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्व साधारण ठराव क्र. ३६५/६ दि. २०/०४/२००१ रोजी विद्यापीठ गेटपासून पूर्वेस खाम नदी पर्यंत असलेल्या वस्तीकडे जाणारा रस्ता नॉन डिपी २५ फुट रुदं रस्ता नं. भू.क्र. ३०५,३०६ व २८७ च्या दक्षिणेकडील जयसिंगपुरा येथील सर्वे नं. २ व ३ मधील ६० चौ. मी. जागा संपादन करण्याचा मंजूर झालेला ठराव रद्द करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# ***ऐनवेळचे विषय***

**विषय क्र. ५२१/१ :**

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी सेवा भरती नियमात कलम ४ मध्ये नमूद केले आहे की, पदोन्नतीने नियुक्त करत असतांना जेष्ठता गुणोत्तर हे तत्व विचारात घेतले जाईल अशी तरतूद असून सदरील तरतूद परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या सर्व पदांना लागू राहील अशी तरतूद आहे.

रिट याचिका क्रमांक ५१५६/८८ व ५०४५/९७ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०३/०८/२००१ रोजी निर्णय दिला की, कनिष्ठ अभियंता मधून उप अभियंता व उप अभियंता मधून कार्यकारी अभियंता या पदावर सेवा भरती नियमानुसार व पात्र कर्मचाऱ्यांमधून सन १९८९ पासून पदोन्नती देण्यात यावी व सदरील कार्यवाही निकाला पासून दोन महिण्याच्या आत निर्णय घ्याव असे आदेशित केले होते. त्या अनुषंगाने उप अभियंता व कार्यकारी अभियंता या पदावर पात्र कर्मचाऱ्यांची निवड करतांना कार्यकारी अभियंता या पदास परिशिष्ट "अ" मधील रकाना क्र. ४ मध्ये पदोन्नती गुणवत्तेनुसार अशी

तरतूद असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. शासनाकडे सामान्य प्रशासन विभागाने निर्देशानुसार पदोन्नती करिता जेष्ठता व गुणवत्ता हा सर्वसाधारण नियम आहे व तो सर्वानांच लागू पडतो. त्यामुळे सेवा भरती नियमात कलम ४ मध्ये व परिशिष्ट "अ" मधील पदोन्नतीचया सर्व पक्षांना पदोन्नती देतांना जेष्ठता व गुणवत्ता अशी दुरुस्ती करण्यास मान्यता मिळावी म्हणून मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे दिवानी अर्ज सादर केला. सदरील दिवानी अर्ज क्र. ६२१०/२००१ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १७/१०/२००१ रोजी निर्णय दिला की, महानगरपालिकेस आवश्यक वाटत असेल तर सेवा भरती नियमात आवश्यक ती दुरुस्ती करून शासनाची मान्यता घेण्यात यावी.

करिता औरंगाबाद महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी सेवा भरती नियमातील कलम ४ मध्ये पदोन्नतीने नियुक्ती करत असतांना जेष्ठता गुणोत्तर या ऐवजी जेष्ठता व गुणवत्ता अशी दुरुस्ती करणे तसेच परिशिष्ट "अ" मधील रकाना ४ मध्ये पदोन्नतीने भरावयाच्या सर्व पदांना "जेष्ठता व गुणवत्ता" या तत्वावर पदोन्नती अशी दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

सौ. विजया रहाटकर : आताच ऐनवेळी प्रस्ताव सादर झालेला आहे. त्यामध्ये अधिकारी / कर्मचारी सेवा भरती नियमात कलम ४ मध्ये काही दुरुस्त्या सुचविण्यात आलेल्या आहे, यात आणखी काही दुरुस्त्या सूचविण्यात येत आहे. परिशिष्ट "अ" मध्ये अनु. क्र. १३ मध्ये जो रकाना तीन आहे त्यामध्ये एक कॉलम दिलेला आहे की मान्यता प्राप्त संस्थेमधून उपअभियंता पदाची व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण. यात दुरुस्ती करण्यात यावी की, मान्यता प्राप्त संस्थेमूधन उप अभियंत्यांची शासन नियमानुसार विहित कालावधीमध्ये व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण तसेच अनुक्रमांक १४ मध्ये रकाना क्र. ३ जो उप अभियंतासाठी दिलेला आहे यामध्ये अशी दुरुस्ती करावी की, ज्या ज्या अर्हता आपण दिलेल्या आहेत त्या प्रत्येक ठिकाणी मान्यता प्राप्त संस्थेकडून कनिष्ठ अभियंत्याची शासन नियमानुसार व्यावसायिक परीक्षा विहित कालावधी मध्ये पूर्ण हि दुरुस्ती करण्यात यावी. याच ठरावाप्रमाणे या अगोदर शासनाकडे जे प्रस्ताव गेलेले आहे. त्याची सुध्दा प्रशासनाने जातीने लक्ष देऊन कार्यवाही करावी.

श्री. निकाळजे प्रकाश : जी नियमावली तयार केली त्यामध्ये टंकलेखनाची चुक झालेली आहे. गुणवत्ता ऐवजी गुणोत्तर झालेले आहे शब्दाचा अर्थ या ठिकाणी बदलेला आहे, त्या नुसार प्रशासनाने कार्यवाही करावी.

डॉ. भागवत कराड : दुरुस्ती करण्यांत यावी व प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे जेष्ठता गुणोत्तर या ऐवजी जेष्ठता व गुणवत्ता अशी दुरुस्ती करण्यात यावी.

श्री. पंडागळे रतनकुमार : प्रशासनाकडून प्रस्ताव आलेला आहे. जशाच्या तसा मंजूर करण्यांत यावा.

मा. महापौर : प्रशासनातर्फे माहिती देण्यात यावी.

उप आयुक्त (म.) श्री. रामटेके व सी.एम.डी. सोनवणे विरुध्द श्री. पानझडे यांचे प्रकरणामध्ये दोन वेगवेगळ्या याचिका मा. उच्च न्यायालयात सादर झालेल्या होत्या या प्रकरणाचा निकाल लागल्यानंतर नव्याने निवड समिती तयार करून त्यांचे समोर कनिष्ठ अभियंता वरून उपअभियंता व उपअभियंता वरून ते कार्यकारी अभियंता या पदाच्या पदोन्नतीच्या बाबतीतली प्रकरणे

समिती समोर ठेवावी व त्याप्रमाणे पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करावी असे निर्देश दिलेले आहे. या समितीमध्ये उप आयुक्त (अ.) उपआयुक्त (प्र.) मुख्यलेखा परिक्षक यांचा समोव होता क. अभियंता वरून उपअभियंता पदाची पदोन्नती देतांना जी यादी पाहिली गेली त्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या त्रुटी आढळून आलेल्या नाही पंरतु उपअभियंता या पदावरदून पदोन्नतीद्वारे कार्यकारी अभियंता पदाच्या संदर्भात जे सेवा भरती नियमात कलम ४ मध्ये पदोन्नतीने नियुक्त करत असतांना सेवा जेष्ठता व गुणवत्ता असे असणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिका सेवा भरती नियमात जेष्ठता व गुणोत्तर (रेशो) अशी तरतूद आहे. यात चूक अशी झाली की, जेष्ठता गुणोत्तर या ऐवजी जेष्ठता व गुणवत्ता असे असणे आवश्यक आहे, म्हणून सिव्हिल अर्जाच्या माध्यमातून न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले त्यानुसार न्यायालयाचे आपण शासनाकडे मूळ पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत मागवून घेतली व मूळ प्रत पाहिल्यानंतर मा. उच्च न्यायालयाने वरील प्रकारचे डायरेक्शन दिलेले आहे की, पदोन्नती देतांना नियमात ज्या त्रुटी दिसून येत आहे त्या बाबतित महानगरपालिकेस जर आवश्यक वाटत असेल तर नियमात सुधारणा करून शासनाची त्यास मान्यता घ्यावी असे दिले आहे. निर्णय आपण यासाठी घेत आहोत की, महानगरपालिकेतील सर्वच कर्मचाऱ्यांना याचा फायदा होईल. सर्वांना न्या मिळेल व पदोन्नती देतांना जेष्ठता व गुणवत्ता याचा अवलंब सर्व शासकीय कार्यालय व इतर सर्व महानगरपालिकेमध्ये लागू आहे हा प्रस्ताव मंजूर करून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवावयाचा असून मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार तीन महिण्याच्या आत हि प्रोसीजर पूर्ण करावी व त्यापुढे वेळ दिला जाणार नाही म्हणून सुचविले आहे म्हणून ऐनवेळी प्रस्ताव सादर केलेला आहे. स्विकृतीसह मंजुरी मिळावी.

श्री. अफसर खॉन : या प्रस्तावामध्ये चर्चा करण्याची आवश्यकता नाही दुरुस्ती करायची आहे. स्विकृतीसह प्रस्तावास मंजुरी देण्यात यावी.

मा. आयुक्त : कोणतीही नोकर भरती करतांना आपण दोन मार्ग अवलंबून आपण भरती करतो एक पदोन्नतीद्वारे व दुसरे नामनिर्देशाद्वारे जेंव्हा नामनिर्देशनाद्वारे भरती होते जेंव्हा गुणवत्ता बघितली जाते. जेंव्हा पदोन्नती दिली जाते तेंव्हा जेष्ठता व गुणवत्ता बघितली जाते. सेवा भरती नियमावली मध्ये सर्व काही घोळ झालेला असून प्रमोशन व नामनिर्देशन भरती करण्यासाठी नियमावलीमध्ये त्यावेळी जे कोणी होते, त्यांनी या नियमात घोळ केलेला आहे. जे न्यायालयात गेले ती वेगळी बाबत आहे माझा प्रश्न असा आहे की, सेवा भरती नियमामध्ये ८ ते १० संवर्गाच्या बाबतीत दर्शविले आहे की, पदोन्नती फक्त गुणवत्तेवरच देण्यात यावी या नियमावलीमध्ये पदोन्नतीवर भरती करतांना सुध्दा फक्त गुणवत्तेचा विचार म्हणून दिलेले आहे. काही पदाच्या बाबतीत पदोन्नतीसाठी जेष्ठता गुणोत्तर असे दिले जेष्ठता व गुणवत्ता असे असणे आवश्यक आहे. म्हणून महानगरपालिकेने न्यायालयास या संबंधी सिव्हील अप्लीकेशन दाखल केलेला होता. त्यानुसार न्यायालयाने असे सुचविले की, पदोन्नती देतांना जेष्ठता व गुणवत्तेचा विचार व्हावा व नामनिर्देशनद्वारे भरती करतांना फक्त गुणवत्तेचा विचार म्हणून निर्देश दिले. आणि हे नियम सर्व ठिकाणी सर्वसाधारपणे लागू आहेत.

श्री. सुदाम सोनवणे : नियमावलीमध्ये गुणवत्ता ऐवजी गुणोत्तर झाले या बाबतीत प्रशासनाचे निदर्शनास आजपर्यंत का आले नाही यात दोषी काणे? पदोन्तीच्या संदर्भात काही प्रस्ताव शासन मंजुरीसाठी गेलेले आहेत काय? त्या कर्मचाऱ्यांना सुध्दा या दुरुस्तीचा फायदा व्हावा. कुणावरही अन्याय होऊ नये. याची दक्षता प्रशासनाने घ्यावी व पुढील कार्यवाही करावी प्रस्ताव स्विकृतीसह मंजूर करावा.

मा. महापौर : प्रस्ताव स्विकृतीसह मंजूर करण्यात येत आहे.

श्री. कोकाटे काशिनाथ : ड्रेनेज व विद्युत विभागासाठी एक स्वतंत्र कार्यकारी अभियंता पद निर्माण करून शासन मंजुरीसाठी पाठविण्यात आलेले होते. त्यास मंजुरी आलेली असून या दोन्ही विभागाचे कामे सुरळीत होण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही व्हावी.

श्री. दानवे अंबादास : या प्रस्तावानुसार अंमलबजावणी कधी पासून करणार जर हा प्रस्ताव आज मंजूर होतो तर आज पासून अंमलबजावणी करण्यांत यावी.

मा. आयुक्त : मा. न्यायालयाने निर्देश केल्यानुसार १९८९ पासून पुढे त्यासाठी समिती निवडली आहे. त्या सर्वांना हा नियम लागू होईल.

श्री. कोकाटे काशिनाथ : अंमलबजावणी आजपासून करण्याची किंवा काय याचा विचार होऊ नये कारण नियमावली आपण तयार केलेली असून फक्त त्यामध्ये दुरुस्ती या प्रस्तावानुसार करीत आहे. दुरुस्ती करावी सर्वांना याचा फायदा व्हावा.

सौ. विजया रहाटकर : या प्रस्तावानुसार मी दुरुस्ती करण्याबाबत जी सूचना केली त्याचा खुलासा व्हावा.

उप-आयुक्त (म.) जी. दुरुस्ती करण्याची स. सदस्या सौ. रहाटकर यांनी जी दुरुस्ती सुचविली आहे ती या स्टेजला स्विकारता येणार नाही. कनिष्ठ अभियंता ते उपअभियंता व उपअभियंता या पदावरून कार्यकारी अभियंता होत असतांना ज्या व्यावसायिक परीक्षा असताता त्या परीक्षा उर्तीर्ण होणे त्यांना आत्यावश्यक या व्यवसायिक परीक्षा कधी उत्तीर्ण कराव्यात याबाबत शासनाचा जी.आर. आहे जेथे शासनाचा जी. आर. आहे तेथेदुरुस्ती करण्याचा अधिकार पोहचत नाही. या व्यवसायिक परीक्षा कोणत्याही असोत त्या बी.ॲण्ड सी चे असोत की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या असोत की, सिंचन विभागाचे असोत या सर्वांसाठी व्यावसायिक परीक्षा आहे. त्या सर्वांसाठी शासन निर्णय (जी. आर.) आहे. त्यामुळे एका आर्गीनाझेय बद्दल दुरुस्ती करता येणार नाही.

मा. महापौर : स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाकडे सामान्य प्रशासन विभागाने निर्देशानुसार पदोन्नती करिता जेष्ठता व गुणवत्ता हा सर्वसाधारण नियम असून तो सर्वानांच लागू आहे. औरंगाबाद महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी सेवा भरती नियमानुसार कार्यकारी अभियंता या पदास परिशिष्ठ "अ" मधील रकाना क्र. ४ मध्ये पदोन्नतीने नियुक्त करण्यासाठी "पदोन्नती गुणवत्तेनुसार" तसेच सदर सेवा भरती नियमातील कलम ४ मध्ये जेष्ठता गुणोत्तर अशी तरतूद आहे. त्या ऐवजी पदोन्नती जेष्ठता व गुणवत्ता नुसार अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदर सेवा भरती नियमातील परिशिष्ट "अ" मधील रकाना ४ मध्ये पदोन्नतीने भरावयाच्या सर्व पदांना "जेष्ठता व

गुणवत्ता" या तत्वावर पदोन्नती अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत येते. तेसच सेवा भरती नियमात, नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करून दुरुस्ती करण्यास्तव अंतिमरित्या प्रस्ताव शासनास सादर करण्याचे अधिकार आयुकत महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यांत सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२२/२**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, भूकंप पुनर्वसन कार्यक्रमांतर्गत कंत्राटी पध्दतीवर नेमणू करण्यांत आलेल्या कनिष्ठ अभियंत्यांना कायमस्वरुपी महानगरपालिकमध्ये सामावून घेण्यासाठी नगर विकास विभाग पत्र क्र. संकीर्ण-१०/२००१/१५९४/प.क्र.-९९/नवि-२७ दिनांक २७/०९/२००१ अन्वये (१) श्री. शशिकांत सर्वोत्तम पाटील (२) श्री. गोविंद प्रल्हादराव पाटे, (३) श्री. संजय लक्ष्मण चामले यांना कनिष्ठ अभियंता पदावर नेमणूक देणे बाबत सूचित केले आहे.

तसेच नगर विकास विभागाचे पत्र क्र. संकीर्ण-१०/२००१/५८४/प.क्र.-९९/नवि-२७ दिनांक ०९/१०/२००१ अन्वये कळविण्यात आले की, महानगरपालिकेच्या कनिष्ठ अभियंता पदानिर्मितीच्या प्रस्तावास (एकूण ६ पदे) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र. ए.एम.सी/१६९३/७२९/प्र.क्र.-६८/९३/भाग-२/नवि-२४ दिनांक ०९/१०/२००१ अन्वये मंजुरी दिली आहे. त्यामुळे दि. २७/९/२००१ रोजी दिलेल्या पत्रातील ३ (तीन) कनिष्ठ अभियंता सोबत आणखी चार असे एकूण सात उमेदवारांना कनिष्ठ अभियंता पदावर नियुक्ती देण्याबाबत कार्यवाही करावी असे उक्त पत्रात नमूद केले आहे. तथापि शासनाने शासन निर्णय क्र. एएमसी/१६९३/७२९/प्र.क्र.-६८/९३/भाग-२/नवि-२४ मंत्रालय, मुंबई दिनांक १०/१०/२००१ नुसार ६ कनिष्ठ अभियंताची पदेनिर्माण करण्यास मान्यता दिली आहे. तसेच वरील प्रमाणे सात कनिष्ठ अभियंताची नांवे पाठवलेली आहे व त्यांना नियुक्ती देण्याचे आदेशित केलेले आहे.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पूर्वी मंजूर असलेल्याक कनिष्ठ अभियंता पदापैकी दोन पदे रिक्त आहेत. सदर पदे महानगरपालिकेच्या सेवा भरती नियमानुसार व मागासवर्गा कक्ष विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी सुचित केल्याप्रमाणे पदोन्नतीने भरावयाचे आहे असे शासनास यापूर्वीच कळविण्यात आलेले होते.

तसेच वरीलप्रमाणे नव्याने मंजूर झालेल्या ६ पदापैकी महानगरपालिकेच्या सेवा भरती नियमानुसार ५०% सरळ सेवेने व ५०% पदोन्नतीने भरण्यसची तरतूद असल्याने ३ पदे सरळ सेवा भरतीने व ३ पदे पदोन्नतीने भरणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने दिनांक २७/०९/२००१ रोजी दिलेल्या पत्रानुसारची ३ कनिष्ठ अभियंता यांनाच नियुक्ती देणे शक्य असून दि. ०९/१०/२००१ च्या पत्रानुसार दिलेल्या ४ कनिष्ठ अभियंता बद्दल शासनाकडून मार्गदर्शन मागितले आहे.

करिता भूकंप पुर्नवसन कार्यक्रमांतर्गत कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्यां आलेल्या कनिष्ठ अभियंता (१) श्री. शशिकांत सर्वोत्तम पाटील (२) श्री. संजय लक्ष्मण चामले (३) श्री. गोविंद प्रल्हादराव पाटे, यांना महानगरपालिकेमध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर नेमणूक देण्यात येत आहे.

करिता प्रस्ताव माहितीस्वत व अवलोकनास्तव सादर.

**चर्चा :**

श्री. सुदाम सोनवणे : शासनाचे पत्र प्राप्त झाले. तीन कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता या पदावर सामावून घेण्याबाबत नावासहित आदेशकाढले. महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असून महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे शासनाने नावासहित जे आदेश काढले ते महानगरपालिकेच्या नियमात बसते का? खुलासा करावा सदर कर्मचारी हे भूकंपग्रस्त आहे असे प्रस्तावात दिले आहे. या तीन लोकांनाच का घ्यावे. अशी भरती करतांना वृत्तपत्रात जाहिरात देऊन भूकंपग्रस्त उमेदवाराची निवड करावी मुलाखतीस १०० उमेदवार येतील या उमेदवारांना सुध्दा मुलाखतीसाठी बोलावे ते पात्र ठरल्यास त्यांना घेण्यात यावे.

श्री. स. अली सलामी : सर्व महाराष्ट्रात शासनाने असे पत्र लिहिले आहे. पेपरला जाहिरात देवून उमेदवार मागवावे जो प्रस्ताव सादर झाला त्यामध्ये शासनाने तीन वैयक्तिक उमेदवारांची नावासहित आदेश काढून कनिष्ठ अभियंता या पदावर समावेश करून घेण्यात कळविणे आहे. कारण सदर कर्मचारी यांनी भूकंपग्रस्त भागात भूकंपच्च्या वेळी कार्य केलेले आहे. ज्यावेळी भूकंप झाला त्यावेही बऱ्याच लोकांनी मदतीचा हात केला म्हणून सर्वच लोकांना शासन नोकरी देणार आहे का? तीन लोकांना वैयक्तिक नावे देऊन शासनाने जे आदेश काढले व त्यानुसार प्रस्ताव ऐनवेळी मंजुरीसाठी आणाला गेला ते या महानगरपालिकेच्या नियमावलीमध्ये बसत नाही. याच महानगरपालिकेमध्ये जे कर्मचारी क अभियंता पदावर १०-१२ वर्षापासून काम करतात त्यांचा विचार न करता वेगळी कार्यवाही करणे योग्य नाही. अनेक वेळी कमी केलेले कर्मचारी महानगरपालिकेसमारे उपोषणास बसले तरी सुध्दा त्यांना कामावर घेण्यात आले नाही. प्रस्ताव ऐनवेळी ठेऊन कितपत योग्य आहे. याची थोडक्यात माहिती द्यावी. क. अभियंता पदावर कार्यरत होते.

डॉ. भागवत कराड : या महानगरपालिकमध्ये ११ कर्मचारी १ १/२ वर्ष काम केल्यानंतर तत्कालीन आयुक्त यांनी त्यांना कामावरून कमी केले. त्यांना पुन्हा कामावर घ्यावे. म्हणून या सभागृहात चर्चा झाली होती. मा. आयुक्त पण त्या बैठकीला उपस्थित होते. सदर कर्मचारी यांनी उपोषण सुध्दा केलेले होते. परंतु अद्याप त्या कर्मचाऱ्यांना कामावर घेण्यात आलेले नाही. आता सध्या शासनाने सर्व खात्यात नविन नोकर भरती बंद केलेली आहे. व प्रस्तावानुसार ज्या तीन उमेदवाराची शासनाने नावासहित आदेश काढले व त्यांना क अभियंता म्हणून समावेश करणे योग्य होणार नाही. कारण महानगरपालिकेच्या नियमाने कार्यवाही करणे योग्य होईल जे की, ज्या जागा भूकंपग्रस्तासाठी राखीव आहे. तशी वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावे. त्यानुसार जे पात्र व हुशार कर्मचारी या पदावर भरती करावे, हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

उप आयुक्त (म.) लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यात १९९३ ला जो भूकंप झाला त्यावेळेस जवळपास जवळपास ८०० क. अभियंता पदाच्या श्रेणीतील कर्मचारी यांची शासनाने कंत्राटी पदध्दतीने नेमणूक केलेली होती. ९३ पासून ते कंत्राटी पध्दतीने काम करित होते. शासनाने त्यांना ज्या वेळी या पदाच्या जागा रिक्त होतील त्या त्या वेळी या कर्मचाऱ्यामधून भरती करण्यांत येईल असे कळविलेले आहे. क अभियंता पदाच्या श्रेणीमध्ये असलेले या कर्मचाऱ्यामधून

नियुक्त्या केलेल्या आहे. उर्वरित आता फक्त १२८ कर्मचारी बाकी असून त्यांना महामंडळ महानगरपालिका, सिडको अशा विविध कार्यालयात सामावून घेण्याचा निर्णय झाला व १९९७ मध्ये ६ कनिष्ठ अभियंता निर्मिती करण्या संदर्भात शासनाकडे या महानगरपालिकेने प्रस्ताव पाठविला होता त्यास मंजुरी देवून ६ कनिष्ठ अभियंताची पदे मंजूर करण्यांत आली. महानगरपालिका सेवा भरती नियमाप्रमाणे ५०% पदोन्नतीने व ५०% सरळ सेवा भरती तरतूद आहे, त्यानुसार तीन कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्यात यावे असे शासनाचे आदेश आहे. हा शासन निर्णय आहे. १० ऑक्टोंबर २००१ रोजी बैठक झाली त्यावेळी मा. मुख्यमंत्री मुख्य सचिव ही होते. महानगरपालिकेलाच नाही तर इतर हि महानगरपालिकेस नागपूर, मुंबई, ठाणे इत्यादी अभियंते नियुक्त आले. नागपुर महानगरपालिकेस ३४ कर्मचारी दिले. म्हाडा, सिडको कार्यालयात काही कर्मचारी दिले. व आपल्याकडे फक्त ३ कर्मचारी सामावून घ्यावे म्हणून निर्देश दिलेले आहे. एकूण ७ कर्मचारी घ्यावे म्हणून दिले हाते. परंतु मंजूर ६ जागेपैकी ३ जागेचा सरळ सेवा भरती प्रमाणे देण्यात आले. उर्वरित ५०% सरळ सेवा भरती न करता पदोन्नतीद्वारे आपल्याला भरती करावी लागेल. व ५०% जागेत शासनाने दिलेल्या तीन कर्मचाऱ्यांची नावानुसार नियुक्तीची कार्यवाही करायची आहे.

मा. महापौर : शासनाचा जो निर्णय आलेला आहे तो बंधनकारक आहे का? नियम काय आहे ते सचिव यांनी वाचून दाखवावे.

नगरसचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१(१), (२) व ३ या अनुसरून पोट कलम(४) मध्ये पुढील प्रमाणे तरतूद आहे. (४) पोट कलम(३) अन्वये, राज्य शासन काणतेही आदेश देण्यात येईल त्या बाबतीत, अशा आदेशाचे पालन करणे हे प्रत्येक पालिका सदस्यांचे व महानगरपालिकेचे व संबंधित इतर कोणत्याही प्राधिकाऱ्यांचे किंवा अधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल.

श्री. सुदाम सोनवणे : शासनाने आदेश आपणास बंधनकारक आहे. यासी सभागृह सहमत आहे परंतु शासनाने तीन लोकांचे नावासहित आदेश केले. हे या महानगरपालिकेच्या नियमात बसणार नाही. या तीन लोकांना सेवेत सामावून घेतल्यास वर्षाचा खर्च सहा लाख रुपये येणार आहे. आताच एक प्रस्तावावर चर्चा झाली आपण आपल्याकडे कार्यरत असलेल्या वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन रुपये ५/- वाढविण्यास प्रशासन तयार नाहीत. सभा तहकूब करावी लागते. सदर ज्या तीन लोकांची नांव आली ते उमेदवार आपलेच आहे. त्यांनी भूकंपग्रस्त दाखवली हे सभागृहास मान्य आहे. परंतु याच तीन लोकांना सेवेत सामावेश सरळ भरतीने करता येणार नाही त्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन भूकंपग्रस्तासाठी तीन जागा राखीव ठेवून मुलाखती घ्याव्यात त्या मुलाखतीत या तीनही लोकांना बोलवावे ते पात्र ठरत असेल तर माहानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे त्यांना घेण्यात यावे पूर्वी ८-८, १०-१० वर्षे कनिष्ठ अभियंता म्हणून काम केलेले लोक आहेत प्रथम त्यांचा विचार व्हावा.

श्री. स. अली सलामी : आताच जे नगरसचिव यांनी नियम वाचून दाखविले ते सेवा भरती नियमात येते का? शासन वैयक्तिक नावे देऊन नोकर भरतीमध्ये निर्देश देणे योग्य नाही. काही आरक्षित जागेसाठीच शासन निर्देश देणे योग्यनाही. काही

आरक्षित जागेसाठीच शासन निर्देश का देते इतर सर्व भरती शासनच का करीत नाही. जे शासनाने डायरेक्शन दिले ते सेवा भरती नियमास लागू होते. का त्याचा खुलासा देण्यात यावा नसता जे १० ते १२ वर्षापासून आपल्याकडे कर्मचारी काम करतात त्यांना कायम करावे. शासनाने दिलेले आदेशानुसार सदर कर्मचाऱ्यांना नंतर विचार करण्यांत येईल असा निर्णय घेण्यात अधिकार या सभागृहाला आहे.

श्री. दानवे अंबादास : शासनाने आदेश काढून तीन क. अभियंता पदावर नावासहित नमूद करून आदेश काढले क अभियंता या पदावर नियुक्ती करतांना पध्दत काय असावी म्हणून नियमावलीमध्ये स्पष्ट दिले आहे की, नामनिर्देशनाद्वारे व पदोन्ननीद्वारे नियुक्तीचे गुणोत्तर ५०% ५०%, (२) दुय्यम अवेक्षक, सर्वे अस, इमारत निरिक्षक, तांत्रिक सहाय्यक, विद्युत तंत्र पर्यवेक्षक या सेवेमधून पदोन्नतीद्वारे नियुक्त (३) मान्यता प्राप्त संस्था, औरंगाबाद महानगरपालिका यांचेकडून विहित घेतल्या जाणाऱ्या व्यावसायिक उत्तीर्ण परीक्षा जे नियम आपण तयार केले यास शासनाने मान्यता दिलेली आहे. म्हणून शासनाच्या नियम ४५१(१) ला घाबरण्याची आवश्यकाता नाही. सेवाभरती नियमानुसार कार्यवाही व्हावी. सदर तीनही कर्मचाऱ्यांना मुलाखतीसाठी बोलवावे. पात्र ठरल्यास त्यांना घेण्यात यावे.

श्री. जयवंत ओक : प्रस्तावानुसार स. सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केले शासनाने तीन कर्मचात्यांन सामावून घेण्याबाबत सुचविले आहे. यास विरोध होत आहे. जर या कर्मचाऱ्यांना घेतले नाही तर शासन काय कार्यवाही करणार असे काही डायरेक्शन आलेले आहे का? इतर महानगरपालिकेमध्ये कार्यवाही झाली असेल तर यांना घ्यावे लागेल. मा. आयुक्तांनी या संदर्भात सविस्तर खुलासा करावा शासनाचे आदेश आपल्याला बंधनकारक आहे का? नोकर भरती बंद करा म्हणून शासन आदेश काढतात. दुसऱ्या बाजूने अमुक अमुक व्यक्तींना भरती करावे म्हणून आदेश काढतात हे योग्य होणार नाही.

मा. आयुक्त : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमानुसार महाराष्ट्र शासनाने कोणता आदेश काढल्यानंतर महानगरपालिका सदस्य, महासभा, म्हणजे सभागृह महानगरपालिकेचे कोणतेही अधिकारी तसेच कोणतेही पदाधिकारी यांना बंधनकारक आहे. सभागृहाने जरी काही निर्णय घेतला तरी अधिकारी म्हणून माझेवर बंधनकारक आहे नियमावलीनुसार आपण ५०% भरती ही पदोन्नतीद्वारे होते तर ५०% भरती ही नामनिर्देशनाद्वारे केली जाते. नामनिर्देशासाठी जे तीन पदे रिक्त होती ती शासनाने दिलेल्या निर्देशानुसार तीन कर्मचाऱ्यांचा समावेश होत आहे. उर्वरित आणखी ४ पदावर पदोन्नतीद्वारे भरती करण्यासाठी पुन्हा शासनाकडे पाठविण्यात येणार आहे व याही पदावर शासनाने वैयक्तिक कुणाचे नावाने आदेश काढून तसे आदेश केले तर त्यानुसारच भरती करावी लागेल कायद्याची जी तरतूद आहे ते नियम समोर ठेवून या सभागृहाने निर्णय घ्यावा.

श्री. निकाळजे प्रकाश : आताच आयुक्तांनी खुलासा केला की, शासनाचे आदेश महानगरपालिकेस बंधनकारक आहे त्यास हे सभागृह सहमत आहे. शासनाचे आदेशाचा आदर हे सभागृह ठेवत आहे. आताच चर्चा झाली सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खालावलेली आहे. या तीन कर्मचाऱ्यांना वर्षाचा खर्च ६ लाखरुपये आहे. म्हणून हा प्रस्ताव मंजूर

करण्यात येईल परंतु शासनाने या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारे पर्यंत या ६ लाख रुपये महानगरपालिकेस द्यावे असा ठराव घ्यावा या अटीवर मंजूर करावा. कारण या अगोदर ११ कनिष्ठ अभियंता पदावर कर्मचारी कार्यरत होते. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही त्या कर्मचाऱ्यांचे वेतन महानगरपालिका देऊ शकत नाही. म्हणून त्यांना कामावरून कमी केलेले होते सदर कर्मचारी कामावरून कमी केल्यामुळे उपोषणास बसले. व त्यानुसार एक ठराव घेऊन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला त्यास मंजुरी आलेली नाही या कर्मचाऱ्यांना सेवेत घ्यावे ते भूकंपग्रस्त आहे. त्यांचे संसार उध्वस्त झाले. हा दृष्टीकोन शासनाच्या चांगला आहे. त्यास सभागृह सहमत आहे. भूकंपाच्या वेळी सर्व देशातून व आपल्या महानगरपालिकेमार्फत सुध्दा एक मानवतेचा दृष्टीकोन समोर ठेवून मदत केलेली आहे. मानवी दृष्टीकोन समोर ठेवून या कर्मचाऱ्याना सामावून घेण्या सहमत आहेत. परंतु सेवा भरती नियमानुसार कार्यवाही सुध्दा होणे गरजेचे आहे. शासनाचे आदेश पाळणे महत्वाचे आहे. म्हणून शासनाकडे एक पत्र पाठवून या जागेवर भूकंपग्रस्तच उमेदवार भरण्यात येईल परंतु महानगरपालिकेच्या सेवा भरती नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. म्हणून कळवावी. तशी परवानगी मागवावी व ६ महिण्यासाठी ही पदे भरण्यात यावी. ६ महिण्यात भूकंपग्रस्तांना बोला.

श्री. संजय शिरसाठ : शासनाचे निर्णय महानगरपालिकेस बंधनकारक आहे असे नियमावलीमध्ये तरतूद आहे. परंतु शासनाने काढलेले सर्वच आदेश हे बरोबर असतील हे सांगता येणार नाही. कारण अनेक शासनाच्या निर्णयाविरुध्द लोक न्यायालात गलेले आहे. व न्यायालयाच्या निर्देशानुसार शासनाचे नियम बदलले गेलेले आहे. तीन लोकांना सेवेत सामावून घ्यावे म्हणून शासनाने आदेश काढले सदर कर्मचारी हे मुख्यमंत्री यांचे मतदार संघातील आहे भूकंप हा किल्लारीला झालेला आहे. काम किल्लारीमध्ये केलेले आहे व रहिवासी लातूर जिल्ह्यामधील आहे ज्यांनी भूकंपामध्ये काम केलेले आहे त्या काही लोकांना मागे सुध्दा महापौर निवडणुकीच्या वेळी अशाच प्रकारचे आदेश आलेले होते. त्याची अंमलबाजवणी केलेली नाही म्हणून अशा आदेशाची अंमलबजावणी केल्यास या सर्वसाधारण सभेला काहीही अर्थ राहणार नाही. या संदर्भात महानगरपालिकेच्या वतीने न्यायालयात एक अपिल करावे की शासन सर्व महानगरपालिकेचे नियम मोडीत काढत आहे. शासनाच्या अशा निर्देशानुसार सर्वसाधारण सभेला महत्व राहणार नाही म्हणून न्याय द्यावा अशी मागणी करावी. तोपर्यंत पदे भरू नये.

डॉ. कराड भागवत : हि ३ नांवे कुठली आहेत. मुलाखती घेण्यात यावे. घेण्यात येऊ नये असा निर्णय घ्यावा.

श्री. कोकाटे काशिनाथ : शासनाने परिपत्रक काढल्यानुसार तीन कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता पदावर महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यात यावे असे निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रस्ताव विचारार्थ सभागृहाच्या मंजुरीसाठी आलेला आहे. अशा प्रकारचे शासनाचे वैयक्तीक स्वरुपाचे आदेश येत असतील महानगरपालिका तसा निर्णय घेत असेल तर या अगोदर नोकर भरती तसेच कामगार भरती बाबत जे जे प्रस्ताव शासन मंजुरीसाठी

पाठविले आहे. त्यास मान्यता द्यावी असे शासनास कळवावे. जे की, शासनाचे अशा आदेशाची अंमलबजावणी करायचा हे सभगृह निर्णय घेत असेल तर आपल्या महानगपालिकेने पाठविलेले इतर सर्व ठरावास शासनाने मान्यता द्यावी. म्हणून मागणी करावी. महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था शासनाच्या अंतर्गत चालते म्हणून शासनाकडून जास्तीत जास्त काय मिळविता येईल हे पाहणे गरजेचे आहे. व महानगरपालिकेच्या हिताचे निर्णय व्हावेत अशी अपेक्षा करतो.

श्री. पंडागळे रतनकुमार : शासनाने आदेश पारीत केलेले आहे. प्रस्तवात नमूद केलेले आहे. त्यावर सभागृहात बऱ्याच वेळेपासनू चर्चा चालू आहे. शासनाकडे अनेक महत्वाचे पदाचे प्रस्ताव मंजुरीसाठी गेलेले आहे. शासनाने आदेशकाढून नावासहित कळविले हे आदेश महानगरपालिकेस बंधनकारक आहे. यामध्ये शंका निर्माण होत आहे. जे अत्यावश्यक सेवा असलेले प्रस्ताव शासन दरबारी आहे शासन याकडे लक्ष देत नाही. सन १९९८ ला शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. अद्याप मंजुरी नाही. आणि आर्थिक बाबींच्या प्रश्न पुढे आणून टाळाटाळ करण्याचा प्रयत्न होत आहे. म्हणून या कर्मचाऱ्यांसाठी ६ लाख रुपये वर्षाचे द्यावे लागणार आहे त्यासाठी जो पर्यंत महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारत नाही तो पर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

श्री. थोरात दत्तात्रय : तत्कालीन आयुक्त यांचे काळामध्ये काही अभियंत्याना कामावरून कमी केलेले आहे. तीन लोकांना त्यांना सामावून घेतल्यास वर्षामध्ये ६ लाख रुपये खर्च येणार आहे या अगोदर जे कनिठ अभियंता होते महानगरपालिकेवर आर्थिक बाजा पडत आहे. म्हणून त्यांना कामावरून कमी केलेले आहे. म्हणून या प्रस्तावानुसार नावासहित आलेल्या कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता या पदावर समावेश केल्यास लोकासमोर महानगरपालिकेची प्रतिमा वाईट होईल याचा सुध्दा विचार करणे गरजेचे आहे. ज्यानी महानगरपालिकेची सेवा केली त्यांनाच घेण्यात यावे नसता हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.

डॉ. कराड भागवत : शासनाने जे आदेश पारीत केले. सदर निर्णय हा मुख्यमंत्री किंवा सचिव यापैकी कुणाच्या पातळीवर हा निर्णय झालेला आहे.

उपआयुक्त (म.) : शासन निर्णय हे कॅबिनेट चा निर्णय आहे.

मा. महापौर : हा प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात येत आहे. ऐनवेळी प्रशासन व नगरसेवकांचे प्रस्ताव आलेले आहे. सचिव वाचून दाखवतील.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ५२३/३ :**

मौजे कोकणवाडी येथील महानगरपालिकेची शाळा जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये भरते सदर जिल्हा परिषदेने महानगरपालिकेची शाळा, स्थलांतर करणे बाबत कळविले आहे. त्यानुसार सदर भागात महानगरपालिकेच्या शाळेसाठी जागा संपादन करणे बाबत त्या प्रभागाचे स. नगरसेवक यांनी मागणी केल्यवरून त्याच प्रभागातील

न.भू.क्र.१८२३५/१ क्षेत्र ९१०.९ चो. मी. जमीन शाळेसाठी संपादन करणे प्रकरण सादर करण्यांत आले.

उपरोक्त मिळकत रितसर भूसंपादन करणेसाठी भूसंपादन प्रस्ताव दिनांक २०/०३/२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेतील विषय क्र. ३४२/४ नुसार ठराव मंजूर झाला. परंतु भूसंपादन कार्यवाहीस विलंब लागेल म्हणून खाजगी वाटाघाटीने उपरोक्त मिळकत संपादन करणे बाबत. प्रकरण सादर करण्यात आले. त्यानुसार प्रकरण मा. स्थायी समिती समोर दि. ११/०७/२००१ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र. २४/१३ नुसार ठराव मंजूर झालेला आहे.

तथापि उपरोक्त मिळकतीचा भसंपादन प्रस्तव सर्वसाधारण सभेसमोर व स्थायी समिती समोर ठेवतांना न.भू.क्र. १८२३५/१ ऐवजी न. भू. क्र. १८३२५/१ असे नजर चुकीने झाले आहे.

दरम्यान त्या प्रभागातील मोची समाजाच्या नागरिकांनी मा. विभागीय आयुक्त यांना उपरोक्त मिळकत न.भू.क्र.१८२३५/१ महानगरपालिकेने संपादन करू नये असे अक्षेप अर्ज केला.

तथापि मिळकत धारकाने चालू वर्षाचे पि.आर. कार्ड व टोच नकाशा दाखल केले असून पि.आर. कार्ड प्रमाणे श्री. हर्षवर्धन गौतमचंद जैन याची मालकी दाखवली आहे. तथापी मोची समाजाचा अक्षेप असल्याने जागा ताब्यात घेणे पूर्वी सदरील आक्षेप निकाली काढून संबंधित भूखंडाची नगर भूमापन कार्यालयामार्फत मोजणी करून भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही करण्यात येईल. या अटीवर दिनांक २०/०३/२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र. ३४२/४ तसेच दिनांक ११/०७/२००१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र. २०/१३ वरील मंजूर ठरावात न.भू.क्र. १८३२५/१ ऐवजी न.भू.क्र. १८२३५/१ अशी दुरुस्ती मान्यता झाल्यास उपरोक्त स्थायी समिती ठरावात नमूद केल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करता येईल. करिता वरील प्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३४२/४ दिनांक २०/०३/२००१ आणि स्थायी समिती ठराव क्र. २४/१३ दिनांक ११/०७/२००१ अन्वये मौजे कोकणवाडी येथील महानगरपालिका शाळेकरिता आवश्यक असलेली न.भू.क्र. १८३२५/१ ऐवजी न.भू.क्र. १८२३५/१ ची जागा संपादन करण्याच्या दुरुस्ती प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या दुरुस्तीप्रमाणे स्थायी समितीच्या ठरावात नमूद केल्यानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२४/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या वॉर्डातील मो. पहाडसिंगपुरा ते निपटनिरंजन महाराज परिसरात ड्रेनेज लाईन नसून तेथील रहिवाश्यांनी महानगरपालिकेचे सर्व कर भरलेले आहे. परंतु त्यांना अद्याप सुविधा देण्यात आलेले नाही. त्यामुळे रहिवाशांना फार त्रास होत आहे. ड्रेनेज लाईन नसल्याने विशषेत: स्त्रीयांना फार त्रास होत आहे.

तरी माझ्या वॉर्डात पहाडसिंगपुरा ते निपटनिरंजन महाराज परिसर पर्यंत ड्रेनेज लाईन टाकण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक - सौ. साजेदा बेगम
अनुमोदक - श्री. किशोर तुलशीबागवाले, सौ. सलमा बानो,
श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोहल्ला पहाडसिंगपुरा ते निपटनिरंजन महाराज परिसरात पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणेचे काम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२५/५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मुकुंदवाडी वॉर्ड क्र. १३ येथे १९८४ ला जो जलकुंभ बांधला आहे. तो आताच्या लोकसंख्याच्या तुलनेत खूपच अपुरा पडतो. करिता येथे कमीत कमी १० लाख मी. लिटरचा नविन जलकुंभ शासनाच्या निधीतून बांधण्यात यावा करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. मोतीलाल जगताप
अनुमोदक - श्री. काशिनाथ कोकाटे, श्री. सुरजितसिंग खुंगर

**संवाद :**

मा. महापौर : प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. १३ मुकूंदवाडी येथे नविन १० लाख मी. लिटरचा जलकुंभ बांधण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२६/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र. १७ येथील गजानन महाराज मंदिर ते सुतगिरणी कडे जाणाऱ्या रोडवर जवाहर नगर पोलिस स्टेशनकडे वळणाऱ्या वळणाला चौकाला "मोहंमद एकबाल चौक" असे नांव देण्यात यावे. असे या भागातील नागरिकांची मागणी विचारात घेता "मोहमंद एकबाल चौक" असे नांव देणे कारण की पुढे थोड्याच अंतरावर वली मामू दर्गा असून त्या वलीम मामुचे नांव मो. एकबाल होते.

सुचक - श्री. शेख शकील पटेल शेख बुढण पटेल.
अनुमोदक - श्री. किशोर तुलषीबागवाले,
श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली.

**संवाद :**

मा. महापौर : एक प्रस्ताव स. सदस्य श्री. शे. शकील पटेल यांनी ठेवलेला आहे परंतु सूचक सभागृहात उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

सदरील प्रस्तावाचे सूचक प्रस्तावाच्या वेळी सभागृहात उपस्थित नसल्यामुहे प्रस्ताव स्थगित ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

**चर्चा :**

श्री. शे. ईसाक शे. जैनाद्दिन : गेल्या वर्षी याच सभागृहात माझे अभिनंदन करण्यांत आले होते. महानगरपालिकेची जागा महानगरपालिकेच्या नाववर नाही. याबाबत मी उपाय योजना सुचविली होती. प्रश्न उपस्थित केला होता. त्यानंतर प्रशासनातर्फे कार्यवाही करण्यांत आली व बरेच भूखंड हे महानगपालिकेच्या नावावर झालेले आहे. औरंगाबाद टाइम्स कॉलनीमधील महानगरपालिकेच्या तीन खुल्या जागेच्या विकासा बाबत मी पत्र दिले होते. त्यानुसार अंदाजपत्रक झाले, टेंडर निघाले व वर्क ऑर्डर सुध्दा झाली व यास ५ महिने झाले परंतु आद्याप त्या ठिकाणी काम सुरू करण्यात आलेले नाही. का काम सुरू केलेले नाही. दुसरा मुद्दा असा की, या भागात काही गुंड प्रवृत्तीचे लोक असून काही दैनिक वृत्तमानपत्राचे लोकांनी त्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे. आपले अधिकारी त्यांचे दबावाला बळी पडतात महानगरपालिकेचे अधिकारी हे महानगरपालिकेचा पगार घेतात महानगरपालिकेचे काम करित नाही. गुंड प्रवृत्तीच्या लोकांच्या सांगण्यानुसार काम करतात. मी मुद्दा उचलला म्हणून या गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी कालच्या वृत्तमानपत्रामध्ये माझी बदनामी केलेली आहे.

श्री. संजय शिरसाठ : स. सदस्यांची बदनामी केली काय बदनामी केली त्याचा सुध्दा खुलासा होण गरजेचे आहे.

श्री. शे. ईसाक शे. जैनाद्दिन : माजी महापौर डॉ. भागवत कराड यांचे कारकिर्दीत एक प्रस्ताव पास झाला. एवढे काम झाले उर्वरित एवढे बाकी आहे. सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतर कार्यवाही होऊ शकत नाही का? होत नसेल तर या सभेला काही अर्थ नाही आमदार बसैय्ये बंधू यांचे निधीतून बांधण्यात आलेल्या सभागृहात सभापती यांचे कार्यालय स्थलांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव होता एजन्सी निश्चित झाली. परंतु कार्यालय स्थलांतर होत नाही. का होत नाही यासाठी कुणी तरी विरोध करीत आहे. या ठिकाणी शादीखाना आहे, महानगरपालिकेची तीन मजलइ इमारत आहे. सदरील शादीखान्यापासून महानगरपालिकेस गेल्या पाच वर्षात किती उत्पन्न मिळाले याची माहिती घेण्यात यावी व या जागेवर काम का सुरू करण्यात आले नाही याचा संबंधित अधिकारी यांचेकडून खुलासा घ्यावा.

श्री. शे. मुनाफ शे. यासीन : सदरील शादीखान्याची लाईटची व इतर दुरुस्तीची कामे करण्या संदर्भात मा. आयुक्तांना ६ महिण्यापसून तगादा लावत आहे. अद्याप काग्रवाही होत नाही. या शादीखान्याचे बाजूला बसैय्ये बंधून यांचे निधीतून इमारत झालेली आहे. ६ महिण्यामध्ये जवळपास ४ महिने शादीखाना बंद आहे. या शादीखान्यामध्ये मुस्लीम समाजाचे सर्व लग्नसमारंभाचे कार्यक्रम पार पाडल्या जातात. शादीखाना बंद करून तेथे सभापती व झोन कार्यालय स्थलांतरित करणे योग्य होणार नाही.

श्री. शे. ईसाक शे. जैनाद्दिन : पाच वर्षापासून शादीखान्याची इमारत उभी आहे. पाच वर्षापासूनचे उत्पन्न कुठे आहे. किती उत्पन्न शादीखान्याचे झाले याची माहिती देण्याची यावी.

श्री. सुदाम सोनवणे : आताच स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्या बाबत महानगरपालिकेने जी भूमिका बजावयास पाहिजे होती ती बजावलेली नाही. त्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केलेली आहे. महानगरपालिकेच्या जागांना तार कुंपन किंवा संरक्षित भिंत असावे संपादित केलेल्या त्या जागा महानगरपालिकेच्या नावावर नाही म्हणून एक सभापती पदाचे पातळीवरील एक सदस्य प्रशासनाकडे वेळोवेळी या संबंधी काग्रवाही व्हावी म्हणून मागणी करीत आहे. व आपल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागा या संरक्षित राहिल्या पाहिजे असे त्यांनी मत व्यक्त केले आहे. परंतु अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. महानगरपालिकेच्या जागेच्या संदर्भात स. सदस्य यांनी मुद्दा उपस्थितीत केला म्हणून त्याची वृत्तपत्रात बदनामी कारक बातम्या छापल्या गेल्या असे त्यांनी काय बदनामी झाली कशामुळे झाली. कोणत्या वृत्तपत्रात बातमी आलेली आहे. त्यांचा सुध्दा खुलासा सभागृहाला झाला पाहिजे. महानगरपालिकेच्या हिताचे काही प्रश्न स. सदस्य मांडत असतील व त्यामुळे वृत्तपत्रात त्या सदस्यांच्या विरोधात बदनामी कारक बातम्या छापणे योग्य होणार नाही.

श्री. शे. ईसाक शे. जैनाद्दिन : औरंगाबाद टाईम्स म्हणून जे दैनिक वृत्तपत्र आहे यामध्ये माझ या बाबतीत बदनामी कारक बातमी छापलेली आहे. ज्यांनी महानगरपालिकेच्या जागेवर घराच्या मागे उद्यान करून अतिक्रमण केलेले आहे याबाबतीत मुद्दा उपस्थित केला व त्यामुळे कार्यवाही होईल या दृष्टीने त्यांनी माझी वृत्तपत्रात बदनामी केलेली आहे. म्हणून जे कुणी महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण करीत असतील तात्काळ काढण्याचे काम महानगरपालिकेचे अधिकारी यांचे आहे. या प्रकरणामध्ये जे कुणी अधिकारी येत असतील त्यांचेवर तात्काळ कार्यवाही करावी. नसता मी महानगरपालिकेसमारे उपोषणास बसणार आहे. ही महानगरपालिकेची मालमत्ता आहे त्यांचे सरंक्षण करेण हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. मी स्वतः च्या हितासाठी हा प्रश्न मांडलेला नाही. म्हणून योग्य ती दखल वेळीच घेण्यात यावी.

श्री. दानवे अंबादास : प्रभाग समितीचे सभापती श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन तसेच स. सदस्य श्री. सलमी पटेल यांचे बाबतीत कालच्या औरंगाबाद टाईम्स उूर्द या दैनिक वृत्तपत्रात एक बदनामीकारक बातमी छापून आलेली आहे. जर एखाद्या सदस्य महानगरपालिकेच्या हिताचा प्रश्न सभागृहात उपस्थित करीत असेल व त्याबाबतीत त्या सदस्यांची बदनामी व्हावी म्हणून दैनिक वृत्तपत्रात खोट्या बातम्या छापून सदस्यांची बदनामी होत आहे. वैयक्तिक आरोप होतात. संपदकांनी चौकशी केली पाहिजे. बदनामी केली त्यांचा मी निषेध व्यक्त करतो.

श्री. शे. मुनाफ शे. यासीन : हा विषय सभागृहाबाहेरचा आहे चर्चा करणे योग्य होणार नाही.

सौ. साजेदा बेगम : माझ्या वॉर्डात एका कामाचे उद्घाटन करण्यांत आले या कार्यक्रमाला मला बोलविण्यात आलेले नाही. व तशी माहिती सुध्दा दिलेली नाही. काम

सुरू केले होते. काही काम झालेले आहे काम चालू असतांना बदं करण्यांत आले. का काम बंद केले त्याचा खुलासा देण्यांत यावा. पाया खोदल्यानंतर काम थांबवले त्यात माझी बदनामी होत आहे. मुलांना दुखापत झाली मी मलमपट्टी केली. कोणी मेले तर कोण जबाबदार राहिल. माझ्या वॉर्डात कामाची माहिती मला दिली नाही. काम सुरू करतांना मला बोलावले नाही व आता कामही बंद केले का बंद केले. याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : स. सदस्य सौ. साजेदा बेगम यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबतीत संबंधित अधिकारी आज उपस्थित नाही. तरी सुध्दा संबंधित अधिकारी यांनी स. सदस्य यांना सविस्तर स्वरुपात त्यांचे वॉर्डातील कामाची माहिती द्यावी कोणते काम होते का बंद केले. तसेच ज्या ज्या वॉर्डात उद्‌घाटनाचें कार्यक्रम घेतले जातात त्या कार्यक्रमांचा संबंधित वॉर्डाचे नगरसेवक यांना पूर्व सूचना सव दिली पाहिजे. सर्व सदस्यांचा मान सन्मान ठेवणे आवश्यक आहे.

श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन : सदर जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे त्यावर अतिक्रमण केलेले आहे. अधिकाऱ्यांचे निदर्शनास ही बाब आणून दिलेली असतांना तसेच मा. आयुक्तांना सुध्दा पत्र देऊन सूचना केलेली आहे. तरी सुध्दा कार्यवाही झालेली नाही. सदर जागेची किंमत हि २ कोटी रुपये असेल. सदर ठिकाणी सभापती यांचे कार्यालय व झोन कार्यालय ८ का स्थंलातरीत झाले नाही तसेच ४ वर्षापासूनचे शादीखान्याचे उत्पन्न किती आले याची सविस्तर माहिती देण्यांत यावी.

मा. महापौर : स. सदस्य श्री. शे. ईसाक शे. जैनोद्दिन यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याची सविस्तर माहिती लेखी स्वरुपात स. सदस्य यांना देण्यांत यावी.

श्री. सुदाम सोनवणे : एका महत्वाच्या विषयावर चर्चा करायची असून आता बऱ्याच वेळपासून सभा चालू आहे. ही सभा तहकूब करून दोन तीन दिवसामध्ये पुन्हा सभेचे आयोजन करावे. तीन महिण्यापूर्वी एका सर्वसाधारण सभेत मेगासिटी प्रोजेक्ट बाबत आम्ही एक प्रश्न उपस्थित केला होता की, या मेगासिंटी प्रोजेक्टमध्ये तत्कालीन आयुक्त व त्यावेहाचे उपसंचालक नगररचना यांनी फार मोठा भ्रष्टाचार करून या प्रोजेक्टला मंजुरी दिलेली आहे. या शहरामध्ये त्याची चर्चा पण आहे व त्याचे पुरावे सुध्दा माझ्याकडे आहेत. मा. आयुक्त श्री. जहागिरदार यांनी या प्रोजेक्टमध्ये २० ते २२ लक्ष रुपयाचा भ्रष्टाचार केलेला आहे. व यास श्री. पाठक उप संचालक यांनी सुध्दा १० ते १२ लक्ष रुपये घेऊन या प्रकरणास मंजुरी देण्याबाबत सहकार्य केलेले आहे. जे १४ ते १६ प्रोजेक्ट मंजूर केलेले आहे. त्याबाबतची सविस्तर माहिती आपण सांगाला तेंव्हा उपलब्ध करून देण्याची माझी तयारी आहे. कुणाकडून किती पैसे घेतले याची सुध्दा माहिती उपलब्ध आहे.

श्री. दानवे अंबादास : तत्कालीन महापौर डॉ. भागवत कराड यांनी मेगासिटी प्रोजेक्ट बाबत या सभागृहात चर्चा झाल्यानंतर सविस्तर चौकशी करून अहवाल १ महिण्याच्या आत चौकशी अहवाल सादर करावा म्हणून रुलींग केलेले होते. उपआयुक्त (म.) तसेच तांत्रिक कक्ष प्रमुख हे या चौकशी समितीत आहे. अहवालानुसार माझ्या माहितीप्रमाणे मा. आयुक्त यांनी काही क. अभियंत्यावर नोटीस देऊन कार्यवाही केली आहे. परंतु अशा प्रकारचा अहवाल हा सर्वसाधारण सभेमध्ये सादर करावयास पाहिजे होता. तसे न

होता जे की आताच स. सदस्य यांनी सांगितल्याप्रमाणे या प्रकरणामध्ये आयुक्त पातळीवरील अधिकारी सुध्दा अडकलेले आहे. म्हणून या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होऊन कार्यवाही झाली पाहिजे. त्यासाठी एक विशेष सभा बोलवावी चर्चा करून निर्णय घेता येतील.

मा. महापौर : मेगासिटी प्रोजेक्टच्या बाबतीत सविस्तर चर्चा करण्यासाठी विशेष सभा बोलाविण्यात येईल.

या बरोबरच "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | महापौर, |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका, औरंगाबाद |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २०-११-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**मंगळवार, दि. २०-११-२००१ रोजी मा. महापौर श्री. विकास जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे" सभागृहात सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरुवात झाली. सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
२) स.स.श्री. शिरसाठ पांडुरंग संजय
३) स.स.श्री. तुलशीबागवाले किशोर
४) स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७) स.स.श्री. शे. इलियास किरमाणी शे. उमर
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
११) स.स.श्री. शिंदे राजु रामराव
१२) स.स.श्री. कावडे रावसाहेब राणुबा
१३) स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१४) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१५) स.स.सौ. शिंदे रुख्मीणी राधाकिसन
१६) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१७) स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
१८) स.स.श्री. शे. शकिल पटेल शे. बुढण पटेल
१९) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
२०) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२१) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२२) स.स.सौ. साधना गणेश सुरडकर
२३) स.स.श्री. विजया किशोर रहाटकर
२४) स.स.श्री. सावंत मधूकर दामोधर
२५) स.स. ॲड सुवर्णा रमेश चंद्रात्रे
२६) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२७) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
२८) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
२९) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३०) स.स.श्री. डॉ. कराड भागवत किशनराव
३१) स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३२) स.स.श्रीमती रशिदा बेगम गफ्फार यारखान
३३) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब

३४) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३५) स.स.श्री. थोरात दत्तात्रय रामराव
३६) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
३७) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
३८) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
३९) स.स.श्री. तायडे पांडूरंग यशवंतराव
४०) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४१) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४२) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४३) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
४४) स.स.श्री. अब्दुल कदीर मौलाना सय्यद
४५) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
४६) स.स.श्री. अशरफ युनूस मोतीवाला
४७) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४८) स.स.सौ. संगिता बाळु मैंद
४९) स.स.श्री. अंबादास एकनाथराव दानवे
५०) स.स.श्री. नासीर खान अ. रहेमान खान कुरैशी
५१) स.स.श्री. श्रीमती शाहीन जफर महमूद जफर
५२) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५३) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगिरथ
५४) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
५५) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
५६) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खाून
५७) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
५८) स.स.सौ. सुलताना बेगम चांदखाँ
५९) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६०) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
६१) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
६२) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६३) स.स.श्री. स. अली सलामी स. मीरा सलामी
६४) स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज
६५) स.स.सौ. निखत परवीन ईजाज अली.

## स्विकृत सदस्य

१) स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण
२) स.स.श्री. घडमोडे भगवान देविदास
३) स.स.श्री. खुंगर सुरजितसिंग तिलकराज
४) स.स.श्री. धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग

मा. महापौर : सभागृहात अगोदर १ तास चर्चेसाठी देण्यात येत आहे. त्यानंतर विषयपत्रिका मंजूर करण्यांत येईल. सभागृहातर्फे माजी मंत्री स्व. उत्तमराव पाटील यांचे दुखःद निधन झाल्याने ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.

**संवाद :**

श्री. दानवे अंबादास : आठ दिवसापूर्वी महाराष्ट्राचे लोकशाही आघाडीचे सरकारने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ चा गैरवापर करून मुंबई महानगरपालिका बरखास्त करण्याचा निर्णय घेतलेला आहे. महानगरपालिका बरखास्त करण्याची वाटचाल लोकशाही आघाडीच्या सरकारचे चालू आहे. लोकप्रतिनिधीच्या अधिकारावर शासनाची फार मोठी गदा येत आहे. कलम ४५१ नुसार कोणत्याही परिस्थितीत शासनाने मुंबई महानगरपालिका बरखास्त होता कामा नये. सर्व काही कारणे ही प्रशासनाच्या संबंधित असते त्यावल नियंत्रण हे महाराष्ट्र सरकारचे असतेच. ज्या समितीने अहवालातून महानगरपालिका बरखास्त करण्याची शिफारस केलेली आहे त्या समितीचा व महाराष्ट्र सरकारचा या सभागृहाने निषेध करावा.

श्री. कुमावत अविनाश : यास माझे अनुमोदन आहे.

श्री. किशोर तुळशीबागवाले : मुंबई महानगरपालिकेत भ्रष्टाचार झाल्याची माहिती सरकारकडे गेल्यावर योग्य चौकशीसाठी शासनाने समिती नेमलेली होती. या भ्रष्टाचारात काही नगरसेवक, कर्मचारी / अधिकारी गुंतलेले आहे. जी समिती नेमण्यात आली होती त्या समितीने शासनाकडे अहवाल सादर केलेला आहे. अद्यापपर्यंत महानगरपालिका बरखास्त केलेली नाही. फक्त समितीने तसा रिपोर्ट केलेला आहे. आणि त्या महानगरपालिकेचा मुद्दा येथे उपस्थित करून योग्य होणार नाही. आपल्याला या महानगरपालिकेचा विकास करायचा आहे या महानगरपालिकाच्या हिताचे प्रश्न मांडावे. त्यावर त्यावर चर्चा करावी. शासनाच्या विरोधात या ठिकाणी संभाषण करणे योग्य होणार नाही. निषेध करण्याची गरज नाही. यास आम्ही पाठींबा देणार नाही.

श्री. सुदाम सोनवणे : स. सदस्य श्री. दानवे यांनी प्रस्तावित केले त्या माझे अनुमोदन आहे. शासनाने नेमलेल्या समितीने मुंबई महानगरपालिकेत झालेल्या भ्रष्टाचाराची खरी माहिती जाणून न घेता, महानगरपालिका बरखास्त करण्याचा अहवाल देणे योग्य नाही. समितीने खरी परिस्थिती जाणून घेतलेली नाही. फक्त सरकार एका राजकीय सुडापोटी मुंबई महानगरपालिका बरखास्त करण्याची कार्यवाही करीत आहे. आताच चर्चा झाली शासन महानगरपालिका बरखास्त करण्याची कार्यवाही करीत आहे. म्हणून निषेध करण्यांत यावा. ते योग्य आहे. निषेध झालाच पाहिजे. शासन कोणते व कोणाचे आहे याचा विचार आम्ही करीत नाही. परंतु मुंबई तसेच औरंगाबाद महानगरपालिक या सर्वच महानगरपालिका एकअंगी आहेत. आज मुंबई महानगरपालिकेवर वेळ येईल. उद्या या महानगरपालिकेवर वेळ येऊ शकते. असे होता कामा नये. या लोकशाही आघाडी सरकारमध्ये मोठमोठे भ्रष्टाचार होत आहे. परवाच एक बातमी ेकण्यात आली की, स्वत: मुख्यमंत्री यांनी एका ठेकेदाराला पैसेची मागणी केली. म्हणून

महानगरपालिकार बरखास्त होण्या अगोदर हे लोकशाही आघाडी चे सरकारच बरखास्त झाले पाहिजे. अशी माझी मागणी आहे.

श्री. किशोर तुलशीबागवाले : मुंबई महानगरपालिका व औरंगाबाद महानगरपालिकेचा काही संबंध नाही. शासन त्यांचे पातळीवर निर्णय घेतील या सभागृहामध्ये चर्चा करणे योग्य होणार नाही. आपण या महानगरपालिकेच्या हिताचे प्रश्न मांडावे. त्यावर चर्चा करावी.

मा. महापौर : या विषयावर कुणीही चर्चा करू नये. दुसऱ्या विषयावर चर्चा करावी. तो विषय आता संपलेला आहे.

श्री. तायडे पांडुरंग : शासनाने आव्हान केलेले आहे. मुंबई महानगरपालिका बरखास्त केलेली नाही. या महानगरपालिकेचे नागरिकांच्या संदर्भात काय प्रश्न असतील त्यावरच या सभागृहाने चर्चा करावी अशी विनंती आहे. दुसऱ्या महानगरपालिकेचे प्रश्न उपस्थित करणे योगय होणार नाही. शासनावर टिका करणे योग्य नाही. उलट लोकशाही आघाडीच्या सरकारने महापौरांना राज्यमंत्र्याचा दर्जा देऊन अतिशय मुलभूत स्वरुपाचे अधिकार दिलेले आहे. म्हणून या शासनाचा निषेध करणे योग्य नाही. अभिनंदन केले पाहिजे.

श्री. तकी हसन खॉन : मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भाने या महानगरपालिकेची चर्चा करण्यात आली. सदर महानगरपालिकेत भ्रष्टाचाराच्या माध्यमातून काही चुका झाल्या असतील त्यासंबंधी या महानगरपालिकेमध्ये चर्चा करणे कितपत योग्य आहे. मुंबई महानगरपालिका बरखास्त होत आहे. याचा विचार या महानगरपालिकेने करणे योग्य नाही. महानगरपालिका बरखास्त झाल्यानंतर न्यायालयीन प्रकरण होऊन न्यायालयात दाद मागण्याची जबाबदारी ही त्या महानगरपालिकेची राहील. या सभागृहाचे चर्चा करणे बरोबर नाही. उलट तया महानगरपालिकेमध्ये ज्या चुका झाल्या त्या या महानगरपालिकेमध्ये होऊ नये याची दक्षता घेतली पाहिजे.

मा. महापौर : त्या विषयावर कोणीही चर्चा करू नये. दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्री. भाऊसाहेब ताठे : सिडको-हडको तील पाण्याच्या प्रश्नावर चर्चा करायची आहे. सिडको हडको भागात पाण्याचा प्रश्न फार गंभीर बनलेला आहे. वेळेवर पाणी देण्यात येत नाही.

श्री. स. अली. सलामी : इतर चर्चा सुरू होण्यापूर्वी नियमानुसार स. सदस्यांनी जे १५ दिवसापूर्वी प्रश्न दिलेले आहे. त्याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. त्यावर अगोदर चर्चा व्हावी. नंतर इतर प्रश्नावर चर्चा करावी. नियमाचे प्रश्नावर अगोदर चर्चा करणे बरोबर आहे. आपण जेष्ठ सदस्य आहात आपणास सर्व माहिती आहे.

मा. महापौर : चर्चा अगोदर घेण्यात येईल. त्यानंतर प्रश्नावर चर्चा करता येईल. चर्चा करावी. प्रश्नासाठी अर्धा तासाचा वेळ देण्यात येईल. आपण दिलेले प्रश्न विषयपत्रिकेवर आलेले आहे. त्यासाठी अर्धातासाचा वेळ चर्चेसाठी देण्यात येईल आता दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्री. ताठे भाऊसाहेब : सिडको हडकोतील जनतेला २ महिण्यापासून एक दिवसाआड पाणी देण्यात येते. तेही पुरेसे नाही. या संदर्भात आपण संबंधित अधिकारी व या भागातील नगरसेवक यांचे समवेत बैठक घेऊन ८ ते १० दिवसाच्या आत मुबलक पाणी देण्या संदर्भात अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या होत्या परंतु अद्याप पाणीपुरवठा सुरळीत व जास्तीचा झालेला नसून महानगरपालिकेच्या

संबंधित अधिकाऱ्यांनी ताबडतोब कार्यवाही करावी नसता या भागातील जनता महानगरपालिकेवर मोर्चा, आंदोलने काढतील व महानगरपालिका प्रशासनास काम करण्यांस अडचण निर्माण होईल. याचा गांभीर्याने विचार व्हावा.

श्रीमती जयश्री किवळेकर : सिडको हडकोतील पाणीप्रश्नावर या सभागृहात नेहमीच चर्चा होते परंतु काहीही निष्पन्न होत नाही. या भागातील नगरसेवक सतत १० महिण्यापसून प्रश्न उपस्थित करीत आहे. कार्यवाही काही होत नाही. ४ महिण्यापासून एक दिवसाअड पाणी येते तेही भरपूर नसून फक्त ३० मिनिटे पाणी येते. त्यामुळे येथील जनतेची पाण्यासाठी खूप आरेड होत आहे. पाणीपट्टी वसुली बघितली तर सिडको हडको भागातील वसुली जास्त आहे. व येथील जनतेला पाणीपट्टी वेळेवर भरूनही पाणी मुबलक मिळत नाही. वेळोवेळी प्रश्न उपस्थित केल्यानंतर त्या अनुषंगाने प्रशासनाच्या माध्यमातून आतापर्यंत काय प्रयत्न झाले याचा खुलासा करण्यांत यावा.

सौ. खरात कुसुमताई : सर्वांना प्रथमतः दिपावलीच्या शुभेचछा माझ्या माहितीप्रमाणे जुन्या शहरामध्ये दररोज पाणी देण्यांत येते. परंतु फक्त सिडको हडको भागातील (नविन शहरातील) जनतेलाच एक दिवसाआड दोन दिवसाआड पाणी का देण्यांत येते. सर्वच जनता सारखीच पाणीपट्टी भरते. म्हणून यापुढे सिडको हडकोतील जनता फक्त १५ दिवसाची पाणीपट्टी भरेल व तेवढीच पाणीपट्टी आकारण्यात यावी. अशी मी सूचना करते.

श्री. तायडे पांडुरंग : माझ्या वतीने सर्वाना प्रथमतः दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा सिडको हडकोतील पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत आहे. दिवसाआड पाणी देऊन जास्तीचे पाणी येण्यास काहीही फरक पडलेला नसून अधिकाऱ्या समवेत झालेल्या बैठकीत आपण या भागातील नागरिकांना ५० मिनिटे पाणी देण्याचे आश्वासन दिले हाते. परंतु रद्यस्थितीत ३५ मिनिटे पाणी येते. ते पुरेपुर होत नाही. दिवाळीच्या दिवशी माझ्या वॉर्डात नव्हते. संबंधित अधिकारी श्री. कलीम अख्तर साहेब यांनी वळीच परिस्थित हाताळून वॉर्डात पाणी सोडले व अशा कार्यक्षम अधिकाऱ्यांची बदली झाली अशी माहिती मला मिळाली. त्यांना सिडको हडको भागातील सर्व परिस्थिती व सर्व भाग माहित आहे, म्हणून या भागातील पाण्याचे सावट दूर होईपर्यंत त्यांची बदली होऊ नये. अशी माझी विनंती आहे. वॉर्डातील जनतेला वेळेवर व दररोज पाणी मिळावे अशी आमची मागणी आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वॉर्डात पिण्याच्या पाण्यात घाण पाणी येते. नागरिकांनी दिवाळीच्या शुभेच्छा (घाण पाण्याची भरलेली काचेची बाटली स. सदस्या मा. महापौर यांना दाखवतात, काही वेळाने मा. महापौर यांचे डायसजवळ बाटल्या ठेवतात.) घाण पाणी पिऊन शुभेच्छा द्याव्या लागतात. दोन वर्ष झाले आतापर्यंत प्रभागात कोणतेही विकास कामे केलेली नाही. दिवाळीच्या दोन दिवस अगोदर नागरिकांनी झोन अधिकारी व मला घेराव घातला होता फक्त मारण्याचे बाकी ठेवले होते. वॉर्डात पाणी येत नाही. आले तर घाण पाणी येते. याबाबत सोनवणे साहेब यांना कळविल्यास कार्यवाही होत नाही. मा. महापौर, मा. आयुक्त यांना बोलल्यास वरिष्ठाकडे का तक्रार करतात, असे अधिकारी आम्हाला जवाब विचारतात नागरिकांनी आम्हाला कशासाठी निवडून दिले, ते घरी बसण्यासाठी नव्हे, जनतेची कामे व्हावयास पाहिजे.

अधिकारी असे बोलत असतील तर योग्य नाही. वॉर्डात चेंबर मधून ड्रेनेजचे घाण पाणी वाहते, सोनवणे साहेब असतांनाच या ड्रेनेज लाईन बदलण्यासची कार्यवाही होणार होती. अद्याप झालेली नाही, विचारणा केली असता बजेट संपलेले आहे. असे सांगण्यात आले. चेंबरचा प्रश्न दर आठ दिवसाला उद्‌भवतो संबंधित कनिष्ठ अभियंता श्री. विटेकर साहेबांना ५-६ वेळेस याबाबत सूचना केल्या कार्यवाही होत नाही. या पाण्यामुळे हपसा, नळाच्या पाण्याचा सुध्दा वास येतो. विहिरीतून बाहेरून पाणी आणावे लागते. कारणवॉर्डात येणारे पाणी हे फक्त १० मिनिटे येते त्यातून ०५ मिनिटे चांगले पाणी येते तर ०५ मिनिटे घाण पाणी येते. पाण्याची वसुली ही सर्वात जास्त माझ्या वॉर्डात होते. व पाणी सर्वात कमी वेळ दिल्या जाते.

सौ. राजपुत विमलबाई : माझ्या वॉर्डात १५ मिनिटाच्यावर पाणी येत नाही. वेळेवर पाणी दिले नाही तर जनता पाणीपट्टी भरणार नाही असे वॉर्डातील जनतेने मत व्यक्त केले आहे. सणाच्या दिवशी सुध्दा वॉर्डातील जनतेला पाणी मिळत नाही अशी परिस्थिती असेल तर योग्य नाही. पाण्याची वेळ बरोबर नाही. रा९ी ९,१०,११ वाजता पाणी येते. मजूर भरपूर द्यावे तरच जनता पाणीपट्टी भरेल.

सौ. जयश्री कुलकर्णी : एन-७ मध्ये आपल्या अध्यक्षतेखाली एक बैठक संपन्न झाली त्या बैठकीत आपण असे आश्वासन दिले की, सिडको-हडको भागात भरपूर पाणी देण्यासाठी १० दिवस ट्रायल घेऊन व एक दिवसाआड ६० मिनिटे जास्त दाबाने पाणी देऊ अद्याप ट्रायल घेण्याची कार्यवाही झालेली नाही असे वाटते. प्रशासनाने खुलासा करावा. सिडको हडकोला दररोज १ तास पाणी मिळावयास पाहिजे. रात्री बेरात्री लोक आमच्याकडे पाण्याच्या तक्रारी घेऊन येतात. पाण्यासाठी पहाटे ५.३० वाजता आम्हाला पाण्याच्या टाकीकडे जावे लागते. हि फार खेदाची बाब आहे. जे पाणी येते ते वेळेवर येत नाही विकास कामे तर नाही परंतु जनतेला पाणी तरी वेळेवर द्यावे अशी विनंती आहे.

सौ. पवार मंदाबाई : रामनगर, विठ्ठलनगर भागात वेळेवर पाणी सोडले जात नाही, एक दिवसाआड पाणी येते, रात्री १२.०० वाजता १.०० वाजता पाणी येते. लोक झोपलेले असताता पाणी वाया जाते त्यासाठी वेळेवर व जास्तीचे पाणी सोडावे पाणी सोडण्याबाबत नियाजन करण्यांत यावे तसे प्रशासनाला आदेश करावे.

सौ. जयश्री मोरे : एक बैठक घेऊन त्या बैठकीत आपण असे आश्वासन दिले होते की, १०-१५ दिवस आपण ट्रायल घेऊन जुने शहर व नविन शहरासाठी पाण्याचा प्रश्न सोडविण्यात येईल असे सांगितले होते. जुन्या शहरामध्ये दररोज भरपूर पाणी दिले जाते. फक्त हडको सिडकोसाठी एक दिवसाआड पाणी का दिले जाते. दिवाळीच्या दिवशी पाण्याच्या बाबतीत नागरिकांना काय त्रास झाला याची जाणीव आपल्याला नाही. जे सूचना इतर सदस्यांनी मांडल्या त्याच सूचना माझ्या सुध्दा आहे. पाण्याची वेळ पण वाढवून द्यावी. कमी वेळ पाणी येते शहराचे पाणी कमी करावे, सिडको हडकोला देण्यांत यावे. सिडको हडकोची जनता अन्याय सहन करणार नाही. याची नोंद व्हावी प्रशासनाने याबाबत खुलासा करावा व पुढील कार्यवाही सुरू करावी.

श्री. रगडे भगवान : प्रत्येक बैठकीत पाण्यावर चर्चा होते. प्रत्येक स. सदस्य वेगवेगळे प्रश्न मांडतात काही वॉर्डात पाणी वेळेवर येत नाही. १२ वाजता ३ वाजता येते. काही वॉर्डात घाण पाणी येते. तर काही वॉर्डात जास्त वेळ पाणी येत नाही. असे विविध प्रश्न पुन्हा निर्माण होतात परंतु प्रशासनाच्या माध्यमातून योग्य ती काग्रवाही होत नाही. नुसता चर्चेमध्ये वेळ जातो. सर्वसाधारण सभा ही महिण्यातून एकदा होते. विकास कामावर चर्चा व्हावयास पाहिजे. तसे न होता इतर विषयावर चर्चा हाते व सभा संपते पाण्याचा प्रश्न नेहमीच सभागृहासमोर उद्‌भवतो त्यासाठी योग्य तो काय निर्णय घ्यायचा तो घेण्यात यावा यासाठी एक विशेष समिती नेमावी जेणे करून पाण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. त्या समितीच्या देखरेखीवरून प्रशासनाने कार्यवाही करावी.

सौ. निखत अली : वॉर्ड क्र. ६६ मध्ये ड्रेनेजचे नेहमीच घाण पाणी वाहते. या संदर्भात मागील एका प्रभाग समितीच्या बैठकीत मी चर्चा सुध्दा केलेली होती. अधिकारी यांना प्रत्यक्ष ड्रेनेज दाखवले जाते. थोड्या दिवसासाठी दुरुस्त होते. पुन्हा आहे तीच परिस्थिती होते. पिण्याच्या पाण्यामध्ये ड्रेनेजचे पाणी जाते. जेंव्हा पाणी उपसा करून रस्त्यावर टाकले जाते तेंव्हा दुर्गंधी येते. व रस्त्यावरील आम नागरिकांना चालणे कठीण होते. आठ दिवसातून ३ दिवस ड्रेनेजेचे पाणी वाहते. ज्याची परिस्थिती चांगली आहे. असे लोक मुख्य जलवाहिनीतून पाणी घेतात. गरिबांना पाणी मिळत नाही टँकरचे पाणी मागविले तरी ते पुरत नाही. याबाबत मी ऑगस्ट पासून तक्रार करीत आहे. या कामाबाबतचे अंदाजपत्रक तयार आहे. आयुक्तांची सही बाकी आहे. असे विचारणा केल्यास वेगवेगळी कारण सांगितले जातात.

मा. महापौर : आताच स. सदस्या सौ. निखत अली यांनी ड्रेनेजच्या बाबतीत जो प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात संबंधित अधिकारी यांनी दोन दिवसात कार्यवाही करावी नसता तशी माहिती स. सदस्या यांनी मला पुन्हा द्यावी.

श्री. खुंगर सुरजितसिंग : आताच स. सदस्य श्री. रगडे यांनी प्रश्न उपस्थित केल्याप्रमाणे पाणी प्रश्नावर प्रत्येक वेळेस चर्चा होते चर्चा न होण्यासाठी सॉलीड डिसीजन घ्यावे. पाण्याच्या बाबतीत वेगळी बैठक बोलवावी. जो निर्णय घ्यायचा तो एकदम घेऊन टाकावा पाण्याचा प्रश्न सर्वच भा गता गंभीर झालेला आहे. सिडको हडको भागात जास्त प्रमाणात आहे. त्यासाठी आज योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

मा. महापौर : सिडको हडकोसाठी जी योजना येणार आहे त्यासाठी प्रशासनाने आतापर्यंत काय पाठपुरावा केलेला आहे. खुलासा द्यावा शासनाचे काय पत्रव्यवहार झालेले आहे. त्याची सुध्दा माहिती देण्यांत यावी.

प्र. कार्यकारी अभियंता (पा.पु.) सिडको हडको मध्ये पाण्याची का टंचाई येते याबाबत २ महिण्यापूर्वीच्या बैठकीत सविस्तर माहिती मी सभागृहासमोर ठेवेली होती. या भागास पाणी देण्यासाठी व्यवस्था व बंधने काय आहेत याची सर्व माहिती दिलेली होती. सिडको हडको भागास जास्त पाणी देण्यासाठी एक ६७ कोटीची योजनेची कार्यवाही चालू आहे. जेंव्हा ही योजना पूर्ण होईल त्या वेळेसच नक्षत्रवाडी मागे स्वतंत्र्य जलवाहिनीची विभागणी नंतरच भरपूर पाणी देऊ शकतो. ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत राबविल्या जात आहे. महानगरपालिकेस आठ कोटी रुपये मिळालेले आहे. आठ कोटीचे सद्यः स्थितीत काम केलेले आहे. पैश्या अभावी हि योजना थांबलेली

आहे. हि योजना तात्काळ राबवण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी कर्ज मंजूर करण्यासाठी पाठपुरावा होत आहे. सर्व कागदपत्राची जोडणी करून पुढील कार्यवाही चालू आहे. कर्ज जो पर्यंत मंजूर होत नाही तोपर्यंत या योजनेचे काम आपण पूर्ण करू शकत नाही.

श्री. कुमावत अविनाश : ५ वर्ष कर्ज मंजूर न झाल्यास ही योजना तशीच ठेवणार काय?

श्री. रगडे भगवान : ३ वर्षानंतर ही बॉडी बरखास्त होईल त्यानंतर कर्ज मंजूर होऊन ही योजना पाठवल्या जाणार काय? व वर्ष सपंल्यानंतर कार्यवाही होणार असे वाटते. यासाठी शासनाची गॅरंटी लागणार आहे.

प्र. कार्यकारी अभियंता (पा.पु.) सर्व कागदपत्र देवून हुडकोकडे कर्जासाठी आपण पाठपुरावा करीत आहोत. शासनाची हमी लागले कर्ज मंजुरीच्या वेळी शासनाकडे जाऊ.

मा. महापौर : या योजनेच्या संदर्भात व इतर जे काही प्रश्न महानगरपालिकेचे असतील या संदर्भात मी स्वतः व सर्व पदाधिकारी यांचे समवेत सर्वजन मंत्रालयात जाऊन मा. मंत्री महोदय तसेच सचिव पातळीवरील प्रस्तावाच्या बाबतीत सचिवांना भेट देऊन कार्यवाही बाबत चर्चा करण्यांत येईल.

श्री. दानवे अंबादास : माझ्या माहितीप्रमाणे हुडकोकडे ६७ कोटी योजनेचा प्रस्तावच पाठविलेला नाही. पाठविला होता परंतु त्यांचे, अटी शर्तीची पूर्तता करण्यासाठी महानगरपालिकेस सूचना केलेल्या आहे, त्यास ९ महिने झाले, त्यावेळी कार्यकारी अभियंता श्री. सोनवणे होते. या ९ महिण्याच्या कालावधीत प्रस्ताव पुन्हा पाठविला नाही तसेच पुढील महिण्यात हुडकोशी संबंधित असलेले मा. श्री. सुरेशकुमार हे या शहरामध्ये येणार आहे. त्यांचेशी या योजनेबाबत आपण चर्चा करू शकतो.

प्र. कार्यकारी अभियंता (पा.पु.) : हुडकोकडे कर्ज मंजुरीसाठी मी स्वतः प्रस्ताव पाठविलेला असून सर्व कागदपत्राची पूर्तता करून कार्यवाही केलेली आहे.

मा. महापौर : उप-महापौर पदाची निवडणूक होणार आहे. येत्या २ तारखेनंतर सर्व पदाधिकाऱ्या समवेत मुंबई जाऊन मा. मुख्यमंत्री तसेच सचिव पातळीवरील जे प्रस्ताव असतील त्यावर चर्चा करून निकाली काढण्याबाबत पाठपुरावा केला जाईल.

श्री. भगवान घडामोडे : जवळपास १ तासापासून पाणी प्रश्नावर सभागृहात चर्चा चालू आहे, सिडको हडको भागातील नगरसेवकांनी आपआपल्या प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या आहे. दिवाळीच्या सणाच्या दिवशी आपण स्व्तः पाण्याच्या टाकीवर पाहणी करावयास गेलात यावरून आपण कर्तव्यदक्ष महापौर म्हणून गणना होते उलट पाण्याची समस्या योग्य तऱ्हेने हाताळण्यासाइी महापौरांना पाण्याच्या टाकीवर जागे लागते. या पेक्षा सुदरे दुर्दैवे नाही असाही अर्थ निघतो. आपले अधिकारी कर्तव्य दक्ष नाही का जेणे करून आपल्याला पाण्याच्या टाकीवर जाऊन पाणही करावी लागली. ६७ कोटीची योजना होणार केंव्हा होणार भाग वेगळा परंतु आज पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. दिवाळीच्या सणाला जनतेला पाणी मिळाले नाही. सिडको हडकोसाठी किती एम.एल.डी पाणी द्यावयास पाहिजे. पाणी कशा पध्दतीने वाटप करता येईल हे पहाणे गरजेचे आहे. किती नळ कनेक्शन अधिकतृ आहे. त्यानुसार किती पाणी द्यावयास पाहिजे. सिडको-हडकोची वसुली योजना राबविण्यासाठी लोक्रपतिनिधी यांचे प्रयत्न आवश्यक असावे परंतु प्रशासनाच्या

कामकाजामध्ये लोकप्रतिनिधीने ढवळाढवळ करू नये असे माझे मत आहे. बऱ्याच वेळा प्रशासन ही प्रशासकीय बाब आहे. म्हणून कामास विलंब होतो असे चित्र आहे. त्यासाठी लोकप्रतिनिधी व प्रशासन या दोघांनी बरोबर असावे तरच विकास कामास मदत होईल असे चित्र आहे. सद्यः स्थितीत सिडको हडको भागास पाणी प्रश्न निर्माण झालेला असून एक दिवसाआड पाणी येते तेही भरपूर नाही यावर आताच लगेच काय उपाय योजना करणार या बाबत खुलासा व्हावा. आताच स. सदस्या सौ. मानकापे यांनी घाण पाण्याची बाटली भरून आणली. या पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले तर ती सर्व जबाबदारी या महानगरपालिकेची व सभागृहाची राहील. याबाबत तात्काळ कार्यवाही व्हावी. स. सदस्या यांनी मा. आयुक्त यांना फोन केला याबाबत वरिष्ठाकडे का तक्रार करता म्हणून कुणी अधिकारी माघारी जबाब विचार असेल तर त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करावी. अधिकाऱ्यांना नगरसेवक खाजगी कामे सांगत नाही. प्रशासकीय कामा बाबती बोलतात. पाण्याच्या संदर्भात अधिकारी / कर्मचारी यांनी कर्तव्य दक्ष राहिले पाहिजे. सिडको हडकोच्या बाबतीत काय जो निर्णय घ्यायचा तो आजच घेण्यात यावा. याबाबत योग्य खुलासा व्हावा. यानंतर पुढील चर्चेला सुरुवात करावी.

श्रीमती पार्वती मानकापे : आयुक्तांना फोन केल्यास तक्रार ऐकून घेतात. अधिकारी फोन घेत नाही त्याबद्दल निषेध करते.

श्री. कावडे साहेबराव : एम तासापासून पाणी प्रश्नावर चर्चा चालू असून शहरासाठी व नविन शहरासाठी किती पाणी येते याची सर्व कल्पना अधिकारी यांना आहे. पाणी मुबलक येते परंतु या पाण्याची चोरी मोठ्या प्रमाणात होते. याची सर्व जाणीव अधिकाऱ्यांना असून सुध्दा मौने बाळगळले जाते. योग्य कार्यवाही होत नाही काही नगरसेवकांना सुध्दा सर्व माहिती आहे. परंतु सभागृहात ते ठामपणे बोलू शकत नाही. याची काळजी प्रशासनानेच घ्यावी काही भागात आज सुध्दा २४ तास पाणी मिळते. या शहरामध्ये बरेच लोकांना २४ तास पाणी मिळते. प्रतयेक वॉर्डात २४ तास पाणी मिळणारे नागरीक आहे. माझ्या वॉर्डात सुध्दा आहे. ज्यांचा महानगरपालिकेकडे रेकॉर्ड नाही अशा हॉटेल धारकांना २४ तास पाणी दिले जाते. काही लोकांना ४-४ तास सलग पाणी मिळते तर काही लोकांना अर्धातास पाणी दिल्या जाते तेही एक दिवसाआड अनधिकृत नळ कनेकशन भरपूर आहे. ५००/- रुपये दिले तर संध्याकाळ पर्यंत आपले अधिकारी पाणी देतात.

मा. महापौर : अनधिकृत नळ कनेक्शन बाबतीत संबंधित अधिकारी यांनी दखल घ्यावी. संबंधितावर नियमाने कार्यवाही करावी.

श्री. कावडे रावसाहेब : अनधिकृत नळ कनेक्शन तर आहेच परंतु बऱ्याच लोकांना २४ तास पाणी दिले जाते. प्रत्यक्ष माझ्या बरोबर यावे. मी दाखवून देऊ शकतो. ४-४ तास सतत पाणी दिले जाते काहींना अर्धातास पाणी दिले जात नाही. याबाबत नियोजन करावे.

श्री. ताठे भाऊसाहेब : सिडको हडकोला एक दिवसाआड पाणी दिले जाते त्याप्रमाणे जुन्या शहराला सुध्दा द्यावे.

श्री. तकीहसन खान : सिडकोमुळे शहराचे पाणी कमी करून नुकसान करणे योग्य नाही. सिडकोमुळे शहराचे नुकसान झालेले आहे. पाणी जास्त दराने खरेदी केले

जाते. बील आकारणी कमी दराने होत आहे. पाण्यावर येणारा खर्च हा जास्तीचा असून जो तोटा सहन करावा लागतो तो भरणा करण्यासाठी जुन्या शहरातील जनता मालमत्ता कर भरते पाणीपट्टी भरते दोन-दोन माध्यमातून वसुली होते. सिडको मध्ये फक्त पाणीपट्टीच वसूल होते म्हणून शहरातील नागरिकांकडून वसूल होणारा कर विचारात घेता एक दिवसाआड पाणी देणे बरोबर होणार नाही. सिडकोला पापणी पुरवठा करण्याची जबाबदारी ही सिडको प्रशासनाची होती. परंतु शहराचे पाण्यातून सिडकोला पाणी पुरवठा करण्याची जाबादारी महानगरपालिकेने घेतली. वसुली कमी व शहराचे पाणी कमी करून सिडकोला देणे योग्य नाही. सिडकोसाठी वेगही उपाययोजना करावी. जी योजना आपणावर त्यासाठी मंजुरी घेण्यासाठी केंद्र शासनाकडे सिडको प्रशासनाने प्रयत्न करावे. पाणीपट्टी वसुली व पाणी पुरवठ्यावर येणारा खर्च यात फार मोठी तफावत आहे. खर्च जास्त होत आहे. वसुली कमी. जी तुअ येत आहे ती भरून काढण्यासाठी जुन्या शहरातील जनतेच्या मालमत्तेच्या करातून भरणा करावी लागत आहे. म्हणून येथील जनतेला एक दिवसाआड पाणी देऊन सिडकोला जास्त पाणी देणे बरोबर होणार नाही. ही अन्याय कारक मागणी आहे. सिडको ही नियोजन प्राधिकरण आहे. सिडको प्रशासनाने याचा पाठपुरावा करावा.

श्री. कोकाटे काशिनाथ : पाणी प्रश्नावर विविध प्रश्न स. सदस्यांनी उपस्थित केले. दिवाळीच्या दिवशी पाण्याचे बाबतीत काय परिस्थिती होती याची आठवण आपणासमोर तसेच प्रशासनाच्या संबंधित सर्वच अधिकाऱ्यांना करून दिली आहे. सिडकोला एक दिवसाआड पाणी दिले जाते त्याप्रमाणे जुन्या शहराला द्यावे हा मुद्दा मांडणे चुकीचे ठरेल कारण संपूर्ण शहराला पाणी पुरवझा करण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेची आहे. सिडकोच्या भागाला पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेने १९८४ मध्ये स्विकारली ती जाबाबदारी महानगरपालिकेस पार पाडणे आवश्यक आहे. यात भेदभाव करता कामा नये. सर्वांना पाणी द्यावे. दिवसाआड पाणी द्यावे असा आग्रह कुणाचा असू नये जायकवाडी वरून जे पाणी येते ते ११० एम.एल.डी. येते. जुने व निवन शहर मिळून १ लक्ष नळ कनेक्शन आहेत यातील ६८ ते ७० हजार नळ कनेक्शन जुन्या शहरामध्ये आहे. सर्व आकडेवारी माहिती असतांना पाण्याचे नियोजन  होत नाही. आताच स. सदस्य श्री. घडामोडे यांनी सूचना केल्याप्रमाणे जे की, प्रत्येक बैठकीत पाणी प्रश्नावर चर्चा न करता पाण्याच्या नियोजनाच्या बाबतीत निर्णय घ्यावा. पाण्याचे सन प्रमाणत वाटप करणार आहे की नाही हा खुलासा प्रशासनाकडून अपेक्षित आहे. सम प्रमाणात पाणी द्यावे. काही भागत ४० मिनिटे येईल काही भागात १ दिवसाआडयेईल. परंतु जास्तीचे दिले जाईल. याला महत्व न देता सम प्रमाणात पाणी द्यावे. जे पाणीपट्टी भरतात अशांना पाणी देण्याची गरज आहे. मागील बेइकीत प्र. अधिकारी यांनी सिडको हडकोसाठी ६७ कोटीची योजना येईपर्यंत सिडको हडकोसाठी एक दिवसाआड पाणी दिल्या जाईल अशा पध्दतीचाखुलासा केलेला आहे. सत्य परिस्थिती त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली होती. तरी सुध्दा आजच्या परिस्थितीत येणाऱ्या पाण्यामधून सिडको हडकोसाठी ३५ ते ३८ एम.एल.डी पाणी पुरवठा करू शकतो असा अभिप्राय तत्कालीन कार्यकारी अभियंता यांचा आहे. ३५ ते ३८

एम.एल.डी पाणी आज सिडको हडकोसाठी दिले तर तेथील पाणीप्रश्न सुटेल यात शंका नाही. ६७ कोटीची योजना राबविण्याकरिता हुडकोकडून जे कर्ज मंजुरीसाठी कागदपत्रांची पूर्तता करून कार्यवाही चालू आहे. त्या संदर्भात या सभागृहाला लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून काय जी मदत करायची ती करण्यात येईल. ती योजना होईल तेंव्हा होईल परंतु आजच्या परिस्थितीत येणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन करण्याची आवश्यकता आहे. ६७ कोटीच्या कोटीच्या योजनेचा खुलासा नंतर करावा अगोदर आहे त्या परिस्थितीत सिडको हडकोसाठी ३५ ते ३८ एम.एल.डी. पाणी कसे देता येईल. याबाबतचा खुलासा व्हावा. अशी अपेक्षा आहे.

श्री. जगताप मोतीलाल : सिडको हडकोतील पाणी प्रश्ना संदर्भात सर्वच सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केले. महापौर पदाचा स्किार केल्यापासून या भागातील पाणी प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने आपण स्वतः दोन तीन वेहा बैठका सुध्दा घेतलेल्या आहे. परंतु आतापर्यंत त्यात यश आलेले नाही. बैठकीत असे ठरले होते की, प्रत्येक वॉर्डात २ ते ३ हातपंप बसविण्याची कार्यवाही करण्यांत येईल असे आश्वासन दिले हाते. अद्याप कार्यवाही नाही. सिडको हडकोसाठी व्यवस्थित पाणी देण्यासाठी नियोजन करावे. शहरासाठी भरपूर व दररोज पाणी दिले जाते. सिडको हडकोच्या जनतेवरच का अन्याय होतो तो होऊ नये त्यांना न्याय मिळाला पाहिजे. आणि जे हातपपं घेणार होतो त्याची कार्यवाही ताबडतोब करावी.

श्री. तकीहसन खान : सिडको हडकोत पाणी पुरवठा होत नाही. यात दुरुस्ती काय करता येईल या संदर्भात चर्चा करणे योग्य होईल यावर चर्चा होत असतांना जुन्या शहराचा संदर्भ समोर ठेवून चर्चा होत आहे. जुन्या शहरात भरपूर पाणी मिळते येथील जतना फार सुखी आहे असे म्हणता येणार नाही. शहरात सुध्दा पाण्याची फार मोठी समस्या निर्माण झालेली आहे. लेबरकॉलनी भागात पाणी कमी प्रमाणात दिले जाते. तसेच दलालवाडी भागात सुध्दा पाण्याची टंचाई आहे. सतत विद्युत पुरवठा खंडीत होणे हे खरे कारण पाणी टंचाईस लागू पडते. कारण विद्युत पुरवठा खंडित झाल्यानंतर जो पाणी पुरवठ्याच्या साठ्यामध्ये कमी प्रमाण होत आहे व पाण्याची टंचाई जाणवत आहे त्यासाठी विद्युत पुरवठा ज्या पध्दतीने पुरविला जातो. त्या पध्दतीमध्ये बदल करून सतत विद्युत पुरवठा राहील. यासाठी उपाय योजना करण्यात यावी. आपणा सर्वांना माहित नसेल, ४ दिवसापूर्वी फारोळ्याहून पाणी टाकण्याचे काम सुरू होते. सदर पंप पहाटे ४ वाजता सुरू होतात. त्यानंतर विद्युत पुरवठा १२ तास खंडीत झाल्या नंतर शहराला वेळेवर पाणी पुरवठा होत नाही. पाणी प्रश्नाबाबतची जी नेमकी समस्या आहे ती न सोडविता वेगवेगळे दुसरेच प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. सिडकोला पाणी पुरवठा होत नाही म्हणून शहरातील पाण्याचा संदर्भ घेऊन शहरातील पाणी सिडकोला देण्याबाबत चर्चा करणे योग्य नसून पाण्याचा प्रश्न जुन्या शहरात सुध्दा आहे. या भागातील जनता सुध्दा समाधानी नाहीत. सर्वच नागरिक आपले आहे. सर्वानां पाणी मिळावे या दृष्टीकोनातून योग्य तो काय मार्ग काढता येईल यावर चर्चा व्हावी. ६७ कोटी ची योजना मंजुर झाल्यास सगळीकडेच पाण्याचा प्रश्न सुटेल यात शंका नाही, योग्य मार्ग काढवा. विनाकारण चर्चा करून सभागृहाचा वेळ वाया घालवू नये.

सौ. दाणे चंद्रभागाबाई :माझ्या वॉर्डात नेहरू पॅलेस येथे एक विहिर असून त्या विहिरीला भरपूर पाणी आहे. घरगुती वापरासाठी संपूर्ण वॉर्डास पाणी पुरवू शकेल. परंतु सद्य परिस्थितीत ज्या विहिरीवर लोकांनी विद्युत मोटार (इलेक्ट्रीक) टाकून पाणी काढले जाते हॉटेलवाले पाण्याचा वापर करतात. या संर्दीर्भात संबंधित अधिकाऱ्यांना पंचनामा करण्याबाबत सूचना केलेल्या होत्या. सदर संचिका चर्चेला आहे. अधिकारी वेळीच कार्यवाही करीत नाही याचा अर्थ तयांचे हप्ते बांधलेले आहे काय अशी शंका निर्माण होते. या विहिरीच्या पाण्याचा वापर घरगुती वापरसाठी झाल्यास पिण्यासाठी जायकवाडीच्या पाण्याचा वापर करता येईल. या दृष्टीकोनातून अधिकाऱ्यांना कार्यवाही करण्याबाबत सूचना केलेल्या होत्या. ती सुध्दा कार्यवाही झालेली नाही.

मा. महापौर : स. सदस्या सौ. दाणे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचा खुलासा करण्यांत यावा.

प्र. कार्यकारी अभियंता (पा.पु.) :हि विहिर नेहरू पॅलेस येथे असून या विहिरीवरून हॉटेलवाले त्यांचे पंप टाकून पाणी घेऊन जातात या विहिरीतील गाळ काढण्यासाठी व इतर काम करण्यासाठी अंदाजपत्रक तयार केलेले आहे. जर या विहिरीचे पाणी वापरण्या योग्य असेल तर तशी कार्यवाही करून महानगरपालिकेचे पंप या विहिरीवर बसवून पुढील कार्यवाही करण्यांत येणार आहे. किमान घरगुती वापरासाठी हे पाणी वापरला आले तर तेथील भागातील काही प्रमाणात पाण्याचा प्रश्न सुटेल.

श्री. प्रकाश निकाळजे : विहिरीचे पाणी हॉटेलवालेनेत असतील व ते पाणी दूषित असेल, पिण्यास योग्य नसेल व यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकत असेल तर ही सुध्दा जबाबदारी महानगरपालिकेची आहे. वेळीच कार्यवाही व्हावी. पाणी देण्याचे बंद करावे.

श्रीमती पार्वती मानकापे : माझ्या वॉर्डात सुध्दा विहिर आहे. त्यातील गाळ वगैरे काढून दुरुस्त केल्यास वॉर्डातील जनतेला वापरण्या योग्य पाणी मिळेल.

मा. महापौर : संबंधित अधिकारी यांनी विहिरीची पाहणी करून सदर विहिरीचे पाणी वापरण्यास योग्य आहे काय याची तपासणी करून पुढील कार्यवाही करावी.

श्री. सुदाम सोनवणे : पाणीप्रश्न या गंभीर विषयावर चर्चा होत आहे. गेल्या मार्च पसून सिडको हडकोमध्ये पाण्याची टंचाई जास्त प्रमाणात जाणवत आहे. उन्हाळ्यात सुध्दा येथील जनतेला पाणी टंचाईला तोंड द्यावे लागले या संदर्भात सिडको हडकोचे नगरसेवकांनी वेळोवेळी सभागृहात प्रश्न उपस्थित केले व यासाठी स्वतंत्र बैठक घेऊन. कार्यवाही करू त्यानुसार आपल्या अध्यक्षतेखाली सर्व सिडको हडकोतील नगरसेवका समवते बैठक झाली. त्या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की, पाणी पुरवठा व्यवस्थित होण्यासाठी ट्रायल पध्दतीने एक दिवसाआड पाणी देऊन जास्त प्रमाणात देता येते काय हि योजना सक्सेस होते काय यासाठी आपण निर्णय घेतला यास नगरसेवक मान्यता देत नव्हते. नंतर मान्यता दिली. त्यानुसार या पध्दतीने सुध्दा सिडको हडकोतील जनतेला एक दिवसाआड पाणी देऊन पुरेपुर पाणी दिले जाते नाही. जे नियोजन केले ते सफल झालेले नाही. उन्हाळ्यामध्ये दजी परिस्थिती होती हीच आज सुध्दा या भागात आहे. काही प्रमाणात पाण्याचा प्रश्न सुटलेला आहे. ट्रायल बेसीसवर ज्याप्रमाणे सिडको हडकोसाठी योजना राबविण्यात येते त्याप्रमाणे शहरामध्ये सुध्दा ट्रायल बेसीसवर कार्यवाही

करण्यात येईल असे आपण बैठकीत आश्वासन दिले होते. शहरासाठी कमी प्रमाणात पाणी सोडावे असा आमचा उद्देश नाही. शहराचे नागरिक आमचे दुश्मन आहे असा ही प्रश्न नाही. तसेच महानगरपालिको सिडकोला पाणी पुरवठा करून फार उपकार होतो असाही प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न कुणी करू नये. सिडको हडकोला पाणी पुरवठा करण्याचे काम हे महानगरपालिकाचे आहे. सिडको भागातील नागरिकांचा तो हक्क आहे. कुणाच्या मनात गैरसमज असेल तो त्यांनी काढून टाकवा. कुणीही कुणावर उपकार करीत नाही. सिडको हडकोला पाणी द्यायचे नसेल तर तसा ठराव करावा आम्हाला मान्य आहे. परंतु उपकाराची भाषा कुणी करू नये. सिडकोमध्ये २९ हजार मालमत्ता असून तेवढीच नळांची संख्या आहे. मालमत्ता तसेच नळाची संख्या हि सारखीच असून कुठेही तफावत दिसून येणार नाही. परंतु शहरामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येते पाण्याची चोरी जुन्या शहरात जास्त होते. सिडकोच्या झोनची पाणी पुरवठ्याची वसुली ही नंबर १ वर आहे. असे असतांना सुध्दा या भागातील लोकांना पाणी एक दिवसाआड मिळते. तेही भरपूर नाही या बैठीकत चर्चेअंती आपण काय निर्णय घेणार, काय करणार आहात याच्याशी सिडको हडकोतील नगरसेवकांना घेणे देणे नाही. फक्त उद्यापासून सिडको हडको भागातील जनतेला सुरळीत व नेहमी प्रमाण जेवढा वेह पाणी दिल्या जात होते ते दररोज देण्यात यावे. पाणी पुरवठा सुरळीत व्हावा एवढीच आमची मागणी आहे. नसता आम्ही सर्व नागरीकासमवेत आंदोलनाची तयारी केलेली आहे व आंदोलनात मध्ये काय प्रकार घडेल हे आम्ही प्रशासनाला सांगू शकत नाही. दुर्दैवाची बाब आहे. सांगावे वाटते की, जो भाग एका विशिष्ट समाजाचा आहे त्या भागात दिवाळीच्या दिवशी सुध्दा पाणी दिले नाही. मी पाण्याच्या संदर्भात आपल्या बरोबर फोनवर चर्चा केली. त्या वेळेस विद्युत पुरवठा करणारे ट्रान्सफार्मर जळालेले होते. हे संबंधित अधिकाऱ्यांना माहिती असतांना सुध्दा दिवाळीच्या दिवशी सनाला पाणी द्यावे लागणार याची काळजी अधिकाऱ्यांनी घेतलेली नाही. ज्या अधिकाऱ्यांकडे सिडकोचा पाणी पुरवठ्याची दिवाळीच्या कालावधी मध्ये चार्ज दिलेला होता. हिंदुच्या सणाचे वेळी पाण्याच्या बाबतीत तात्काळ केलेली नाही अशा अधिकाऱ्यांवर कडक कार्यवाही झाली पाहिजे. दिवाळीच्या दिवशी ११ वाजता पाणी सोडण्यात आले व त्यासाठी महापौरांना प्रत्यक्ष जाऊन कार्यवाही करावी लागली तसेच मा. आयुक्तांना माहिती देऊन कार्यवाही करावी लागते हे बरोबर नाही. आपले अधिकारी काय करतात हा असा प्रश्न निर्माण होतो. व दिवाळीच्या दिवशी जे अधिकारी सिडको हडकोतील पाणी पुरवठा करण्यासाठी कार्यरत होते अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी अधिकारी कोण होते याचा विचार न करता कार्यवाही करावी. जी ६७ कोटीची योजना राबविणार आहात आता सध्या आर्थिक बाबींमुळे ही योजना बंद आहे. त्यासाठी प्रत्येक हेड मधून २ ते ३ कोटी रक्कमा काढून ही योजना राबविण्याची कार्यवाही सुरू करावी ४ ते ५ वर्ष महानगरपालिकाचे फंड जमा करावे तयातून काम चालू ठेवावे. जेणे करून भविष्यात सर्वच भागातील पाणी प्रश्न सुटण्यास मदत होईल.

डॉ. भागवत कराड : सध्या पाण्याचा प्रश्न फार गंभीर झालेला असून मागील वॉर्डापासून या विषयावर नेहमी चर्चा होते सिडको हडको भागात जास्त प्रमाणात पाणी

टंचाई जाणवत आहे हे आपणा सर्वांना माहित आहेतच. या शहरातील एकूण १३० एमएलडी पाणी मिळते. परंतु मध्येच विद्युत पुरवठा बंद झाल्यास येणारे पाणी कमी येते व सर्वांना पाणी वाटप करणे शक्य होत नाही. विशेष्ज्ञतः सणाचे वेळी असे झाल्यास हा प्रश्न आणखी भेडसावतो ती परिस्थिती यावेळी दिवाळीच्या दिवशी झालेली आहे. शहरामध्ये ज्या ठिकाणी पाण्याचा साठा आहे विहिरी असतील, हातपंप असतील त्यांची सोय करण्याची आवश्यकता आहे. विशेषत सिडको भागात करण्याची आवश्यकात आहे त्याबाबतीत कार्यवाही करण्यात यावी. सिडको हडको भागात सम प्रमाणापेक्षा कमी पाणी दिले जाते मी महापौर असतांना जास्तीचे पाणी देण्याबाबतचा निर्णय घेतलेला होता परंतु तशी कार्यवाही आता पर्यंत झालेली नाही. म्हणून पाणी साठा करण्याबाबत कार्यवाही करावी. जास्तीत जास्त पाणी देण्याची कार्यवाही व्हावी. यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष देण्याची गरज आहे. जी. ६७ कोटीची  योजना राबविणार आहे. त्यासाठी पत्रव्यवहारात वेळ जात आहे. म्हणून एका सक्षम अधिकाऱ्यांची या योजनेची कार्यवाही करण्यासाठी नियुक्ती करावी जेणे करून तात्काळ कार्यवाही होईल. जेंव्हा ही योजना मंजूर होईल तेंव्हा आपआपसात वाद न करता सर्वांनी एकत्र येऊन मा. मंत्री महोदय यांचेशी भेट घेऊन वरिष्ठ पातळी वरील सर्व कार्यवाही पूर्ण होईल ही योजना तात्काळ कशी राबविता येईल यासाठी प्रयत्न करण्यात यावे पाणी प्रश्न सुरळीत कसा करता येईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे. ६७ कोटी योजनेची कार्यवाही करण्यासाठी एका सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करावी जेणे करून हि योजना तात्काळ राबविता येईल.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : दिवाळीच्या सणाच्या दिवशी आपण स्वतः पाण्याच्या टाकीवर जाऊन पाणी पुरवठ्या बाबत परिस्थिती हाताळली त्याबद्दल सर्वप्रथम आपले अभिनंदन करतो. सिडको हडको भागात पाणी पुरवठा कमी होतो याचा अर्थ शहरात जास्त प्रमाणात पाणी दिले जाते असा नाही. कोटल कॉलनी मधील पाण्याच्या टाकीमधून माझ्या वॉर्डात पाणी पुरवठा होतो तो अत्यंत कमी होतो. म्हणून माझ्या वॉर्डात विधी महाविद्यालय जवळ पाण्याच्या टाकीमधून माझ्या वॉर्डात पाणी पुरवठा होतो तो अत्यंत कमी होतो. म्हणून माझ्या वॉर्डात विधी महाविद्यालय जवळ एक पाण्याची टाकी बांधण्याचा निर्णय तत्कालीन महापौर डॉ. कराड साहेब असतांना घेण्यात आलेला होतो तसा प्रस्ताव आपण मंजूर केलेला आहे या जलकुंभामुळे आजुबाजूच्या वॉर्डातील जनतेचा पाण्याचा प्रश्न सुटेल. मी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत तात्काळ कार्यवाही करण्योच आदेशित करावे. मागणी मान्य करावी.

श्री. प्रकाश निकाळजे : पाणी प्रश्नाबाबत सर्वच सदस्यांनी पोटतिडकीने वेगवेगळे प्रश्न उपस्थित केलेले असून पाणी प्रश्न हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. पाणी प्रश्न सुटण्यासाठी शहरासाठी ज्या विहिरी आहेत त्या महानगरपालिकेकडे ताब्यात घेण्यात याव्यात शहरामध्ये प्रत्येक वॉर्डात नगरसेवकाच्या स्वेच्छानिधीतून हातपंप केलेले आहे. सद्यस्थितीत  हे हातपंप बदं आहे जवळपास २ ते ३ हजार हात पंप असून फक्त कागदपत्रावर त्यांची नोंद आहे. प्रत्यक्ष या हातपंपाचा पिण्याच्या पाण्यासाठी उपयोग होत नसेल तर उपयोग नाही याची गांभीर्याने प्रशासनाने दखल घेतली पाहिजे. पाणी प्रश्न

सुटण्यास मदत होईल. हात पंपावर लाखो रुपये खर्च केलेले आहे. प्रशासनाने पाण्याचे बाबतीत नियोजन करावे. तसेच जुन्या शहराचे पाणी सिडकोला द्यावे पाणी कमी करावे असा भेदभाव करणे योग्य होणार नाही. सर्वांना पाण्याची आवश्यकात आहे. तेथे वस्ती आहे तेथील सर्वांना पाणी दिले पाहिजे चांगले प्रश्न उपस्थित करावे असंतोष निर्माण करण्याचा प्रयत्न होऊ नये. म्हणून प्रशासनास अशी विनंती करतो. की, शहरातील ज्या विहिरी आहे जे नहर आहे त्याची सुधारणा करावी. गारखेडा भागात नाल्याच्या बाजूला नहर वाहतात ते पाणी पिण्यास योग्य आहे. विद्युत मोटार न लावता या नहरातून ५ फुट वर पाणी वाहते. ते पाणी वापरासाठी घेण्याची कार्यवाही व्हावी. अशा प्रकारे पाणी पंपींग करून घेण्याची आवश्यकता नाही. नेहरू पॅलेस मध्ये एक मोठी विहिर आहे. सदर विहिरीचे पाणी पिण्यास युक्त आहे असे सांगण्यात आले. पिण्यास योग्य नसेल तर औषध फवारणी करून ते पाणी पिण्यासठी उपयोग घेता येईल तशी कार्यवाही करावी. ज्या त्या भागाता जास्तीत जास्त पाणी कसे उपलब्ध करता येईल हे प्रशासनाने बघावे त्या बाबतीत नियोजन करून पुढील कार्यवाही करावी.

मा. महापौर : पाणी प्रश्ना बाबत स. सदस्यांनी जे जे प्रश्न उपस्थित केले. त्याबाबतीत मा. आयुक्त यांनी सविस्तर खुलासा करावा.

मा. आयुक्त : जवळपास दीड तासापासून सभागृहात पाणी प्रश्नावर चर्चा चालू असून शहरामध्ये विशेषतः सिडको हडको भागात पाण्याची टंचाई जास्त प्रमाणात आहे. या संदर्भात स. सदस्यांनी आपआपल्या भावना सविस्तर पणे व्यक्त केलेल्या आहे. पाण्याची अडचण सोडवण्याठी मागील ३ ते ४ वर्षापासून प्रशासनाच्या माध्यमातून प्रयत्न चालू आहे. परंतु जेवढे यश मिळावयास पाहिजे होते तेवढे मिळालेले नाही. पाणी प्रश्न सोडवण्यासाठी काही बाबींचा आपल्याला विचार करणे आवश्यक आहे. जे की, पाणीपट्टी वसुलीचे बजेट काय आहे? पाण्याच्या खर्चावर महानगरपालिकाचे ३० ते ३२ कोटी रुपये खर्च होतात वसुली फक्त १० कोटीची होते २० कोटी रुपये इतर कराचे जमा झालेल्या रक्कमेतून खर्च होतात. तरी सुध्दा पाण्याचा प्रश्न अद्याप पूर्णपणे सुटलेला नाही. आणखी २ वर्ष पूर्ण नियोजन करण्यासाठी लागतील. शहराची लोकसंख्या १० लाखापर्यंत पोहचली असून जे नॉर्मल आहे त्याप्रमाणे महानगरपालिकाकडे यंत्रणा नाही. म्हणजे जी यंत्रणा राबवायची होती ती ५ वर्षापूर्वीच राबवावयास पाहिजे होती. ती आज राबविण्यास प्रयत्न होत आहे यास उशीर झालेला आहे. म्हणून ही परिस्थिती आज आलेली आहे आपण लोकसंख्येस होणारी वाढ ही कमी होत नाही ती वाढतच जात आहे. जनगणनेचे काम झाले. राज्यत सर्व भागात लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. हे सांगण्याची गरज नाही. ६७ कोटीच्या योजनेच्या संदर्भात बोलावयाचे झाल्यास एलआयसी अर्ज देणार, इतर मार्गाने कर्ज उपलब्ध होईल, शासन अनुदान मिळणार परंतु जे अपेक्षित होते ती कार्यवाही पूर्ण झालेली नाही. फक्त एलआयसीकडून आपल्याला २ कोटी रुपये मिळणार आहे. शासनाकडून येणारे अनुदान बाकी आहे. आता यापुढे एलआयसीने कर्ज देण्याचे अमान्य केलेल आहे. तयानंतर हडको कडून कर्ज घेण्याचे आपण ठरविल्यानुसार हडकोकडे प्रस्ताव दिला त्याचे अटी शर्ती बाबत

मोठ्या प्रमाणात प्रश्नावली आली त्याची माहिती महानगरपालिकाने सविस्तर दिली त्यानंतर ५० वर्षात महानगरपालिकाची परिस्थिती काय होईल या प्रश्नावर सुध्दा हाडकोला महानगरपालिका प्रशासनाने उत्तर दिलेले आहे. महानगरपालिका परतफेड कसे करेल हे सुध्दा हडकोच्या संस्थेकडून पाहिले जाते. पुंडलिकनगर वासीयांसाठी सुध्दा एक योजना राबविण्यात येत असून या योजनेचे ९ ते १० कोटीचे काम सुरू आहे. या दोन्हीही योजनेत १० कोटीचा खर्च झालेला आहे. ही योजना राबवण्यिाची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकारणावर होती. त्यांना या सभागृहाने एक ठराव पारीत करून २ कोटी रुपये देण्याची हमी दिली होती ती हमी सुध्दा पूर्ण करू शकलो नाही. आतापर्यंत फक्त १० लाख रुयपे दिलेले आहे ज्या ठेकेदाराला काम दिले हाते तया ठेकेदाराला त्याचे बील देण्यासाठी जीवन प्राधिकारणाकडे पेसा नाही. म्हणून या विभागाकडून आणखी दिड कोटी रुपयाची मागणी होत आहे. जे की, ठेकेदाराला त्याचे बील जीवन प्राधिकरणा विभागाकडून दिले जाईल संबंधित विभागचे मुख्य अभियंता यांना मी मागील एका बैठकीस बोलविले होते. जेवढा पैसा खर्च झाला त्याचा उपयोग आपल्याला कसा करता येईल या दृष्टीने संबंधित अधिकारी यांना चर्चेसाठी मी बोलाविले होते त्यांनी असा खुलासा केला की, सिडकोसाठी वेगळी पाईन लाइनद्वारे महानगरपालिकाने ६ ते ७ कोटी रुपये खर्च केल्यास परस्पर सिडको हडकोसाठी जास्तीचा पाणी पुरवठा करता येईल. सध्या पाण्याची परिस्थिती अशी आहे की, शहराला पाणी दिल्या नंतर सिडकोला दिले जाते. या पेक्षा जास्त दाबाने पाणीपुरवठा वरील प्रमाणे ६ ते ७ कोटी रुपये खर्च केल्यास देता येईल. म्हणून ५ ते ७ कोटीला आपण मंजुरी द्यावी सिडकोसाठी स्वतंत्र योजना केली जाईल. **दुसरा** प्रश्न असा की, योग्य प्रकारे पाण्याचे वाटप झाले तर काही प्रमाणात सिडकोसाठी जास्तीचे पाणी देता येईल. यात शंका नाही. एक योजना आपण ट्रायल पध्दतीवर राबवण्यिाचा प्रयत्न केला होता. वेळेत बदल करून एक दिवसाआड जास्तीचे पाणी देण्याबाबतचे ते नियोजन होते ती सफल झाले नाही हे आजच्या परिस्थितीवरून दिसून येते. त्यात आपल्याला सुधारणा करून पुन्हा सिडकोच्या नगरसेवकांबरोबर चर्चा करून योजनेबाबत अंतिम नियोजन करण्याचा निर्णय घेता येईल. ज्या भागासाठी पाण्याचा साझ केला जातो. त्या भागातील लोकसंख्या जसजशी बाढत जाईल त्याप्रमाणे पाणी पुरवठाा करण्याची जी पध्दत आहे त्यात काही सुधारणा करता येते का? ते पाहिले जाईल. त्यातच पाणी पुरवझ करतेवळेस ज्या अडचणी येतात त्या तात्काळ दुर करण्याचाप्रयत्न प्रशासनाकडून होईल जी आज जास्त प्रमाणत निर्माण होते ती होणार नाही तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकारण यांना दिड कोटी रुपये देण्याचा निर्णय आपल्याला घ्यावा लागणारच आहे. **तिसरा** प्रश्न असा आहे या बाबतीत आपण सर्वांना माहिती आहे. शहरामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची चोरी होत आहे. लोक विद्युत मोटारीने उपसा करून जास्तीचे पाणी घेतात. याबाबत महानगरपालिका कडक भूमिका घ्यावी लागणार आहे. तसेच शहरामध्ये मोठ्या प्रमाणात बांधकामे चालू असून त्यासाठी पिाण्याच्या पाण्याचा वापर होतो. महानगरपालिका पाणी बांधकामासाठी देते ते पाणी द्यायचे की नाही याबाबतीत निर्णय घ्यावा लागेल बांधकामासाठी पाण्याची

व्यवस्था लोकांनी वेगळी केली पाहिजे पिण्याचे पाणी वापरणे योग्य नाही. **चौथा** मुद्दा सदस्यांनी उपस्थित केलेला आहे की, विधी महाविद्यालय जवळ जलकुंभ बांधण्या बाबतची त्यासाठी शासनाकडे ८ कोटीची ही योजना पाठविलेली आहे. त्याच वेळ लागेल तसेच हातपंपाबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे. हातपंप बसविण्याचे टेंडर आपण काढलेले आहे. तसेच जे जुने हातपंप आहे ते दुरुस्त करण्याबाबतचे टेंडर बाबत सुध्दा कार्यवाही झालेली आहे. तातडीने या कामाची कार्यवाही करता येईल. **पाचवा** मुद्दा असा की, शहरातील विहिरीचा सर्वे आपण केलेला आहे. अशा विहिरीचे पाणी आपल्याला सध्या पिण्यासाठी वापरता येणार नाही. या विहिरीचे पाणी बांधकामासाठी व इतर वापरासाठी उपयोगात घेता येईल ही कार्यवाही लवकरच होईल. या अगोदरच याबाबतीत कार्यवाही झाली असली तर पिण्याच्या पाण्याचा एवढा प्रश्न निर्माण झाला नसता. **सहावा** प्रश्न असा की, शहरामध्ये २० ते २५ हजार अनाधिकृत नळाची संख्या असेल ती कशी झाली केंव्हा झाली कोणी करावयास लावली यात न जाता सदर नळ धारकांना एक ठराविक वेळ देऊन एक रक्कम नजराना (प्रिमिअर) रक्कम घेवून नळ कनेक्शन अधिकृत करण्याबाबत जाहिर प्रगटन दिले जाईल जे अधिकृत करतील त्याचे अधिकृत केले जाईल ज्यांनी ठराविक वेळेत अधिकृत केले नाही तर अशा नळ धारकांना त्यापुढे दुप्पट फिस आकारून नियमानुसार पुढील कार्यवाही करता येईल. अशा नळांचा सर्व्हे करून तात्काळ कार्यवाही करता येईल. आता आपणा समोर वेगवेगळे चार महत्वाचे प्रश्न आहे. दिड कोटी रुपये महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाला वाटप करण्या बाबतचे नियोजन कसे करता येईल याबाबत कार्यवाही करावी लागेल आणि चौथा मुद्दा असा की, शहरामध्ये काही भागात २४ तास पणी दिले जाते त्याचा शोध घेवून कार्यवाही होईल. पुढील बैठकीपूर्वी या भागातील सर्व सदस्या समवेत महापौर यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेऊन चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री. संजय शिरसाठ : कोणत्याही प्रश्नावर उत्तर देतांना उद्यापासून आपण काय निर्णय घेणार आहोत याचा खुलासा अधिकाऱ्यांकडून होत नाही. आताच खुलासा करण्यात आला की, ३० ते ३२ कोटी रुपये पाण्यावर खर्च होतात. पाण्याची वसुली फक्त १० कोटी होते. इतर २० ते २२ कोटी रुपये इतर करामधील खर्च करावे लागतात. वसुली होत नाही यास जबाबदार कोण आहे नागरिक, पदाधिकारी जबाबदार नाही अधिकारी जबाबदार आहे. दीड वर्षापासून आम्ही सदस्य आहोत प्रत्येक आयुक्त आल्यानंतर वसुली लक्ष देणार असे ठासून सांगातात गेल्या वेळेस १०००/- पाणीपट्टी होती ती २०० रुपये वाढवली. यामुळे ८ कोटीची वसुली ही १० कोटीवर गेलेली आहे आणि वसुली होत असतांना ८ कोटीचे १० कोटी केली असे सांगितले जाते पाणीपट्टीत जी २००/- रु. ने वाढ केली ती वाढ प्रशासनाने गृहित घरलेली नाही फक्त ८ कोटीवरून १ कोटी वसूल झाले म्हणजे पाणीपट्टीत वसुलीत २ कोटीची जास्त वसुली झाली असे म्हणता येणार नाही. हा विचार प्रशासनाने करावा. शहरामध्ये बऱ्याच भागता अनाधिकृत नळ कनेक्शन आहेत उलट हे लोक मोटारीने पाणी घेतात. महानगरपालिकाकउे एक पैसा ही भरत नाही व जे नियमित पाणीपट्टी भरतात त्यांना दररोज पाणी मिळत

नाही. अशी परिस्थिती आहे. आपले अधिकारी माहिती मिळाल्यावर सदर ठिकाणी जातात परंतु लोकांचा जमाव मारहाणीवर येतो म्हणून अधिकाऱ्यांना परत यावे लागते. ही परिस्थिती संबंधित झोन अधिकाऱ्यांनी मा. आयुक्तांकडे बैठक होते त्यावेळी विशद केली पाहिजे. व त्यानुसार झोन अधिकाऱ्यांना विशेष असे अधिकार मा. आयुक्तांनी दिले पाहिजे की की, वसुलीत जास्त वाढ होऊ शकते. वसुलीसाठी तहसीलदार दर्जाचे अधिकारी होणार होते. दिड वर्षापासून ते पद खाली आहे. अद्याप कार्यवाही नाही. पाणीपट्टी ची १० कोटीची वसुली होते. यापेक्षा जास्त व्हावयास पाहिजे. शहरामध्ये पुंडलिकनगर भागात सर्रासपणे मोटारीद्वारे पाणी घेतले जाते. खालच्या मजल्यावरील लोकांना पाणी मिळत नाही दुसऱ्या तिसऱ्या मजल्यावरील लोकांना कसे पाणी जाते हा माझा प्रश्न आहे. शहरामध्ये १३०० हॉटेलस धारकांना महानगरपालिकाने परवानगी दिली आहे. आणि हॉटेलस् नळ कनेक्शन फक्त ६०० आहेत उर्वरित इतर हॉटेलवाले कोठून पाणी घेतात याचा शोध घेणे प्रशासनाचे कर्तव्य आहे. आज कोणत्याही हॉटेल मध्ये आपण गेल्यास पाण्याची टंचाई दिसून येत नाही. अशा अवैद्य पध्दतीने पाणी घेणाऱ्यावर प्रशासन उद्यापासून कार्यवाही सुरू करणार आहे का? ६७ कोटीची योजना आणखी ५ वर्षानंतर होत असेल तर त्याचा खर्च १३० कोटीवर जाईल. याचाही विचार होणे गरजेचे आहे. म्हणून सर्व नागरिकांना पाणी मिळण्याबाबत प्रशासनाने नियोजन करावे. अनाधिकृत नळ कनेक्शन शोधून काढून अशांवर कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी नागरिकांना एक वेळेस संधी द्यावी लागेल. मोटारी संदर्भात विशेष पथक नेमून त्या बाबत काग्रवाही करण्यात येईल.

श्री. स. अली मिरा सलामी : दिड तासापासून पाणी प्रश्नावर चर्चा चालू आहे. काही सदस्यांनी दूषित पाण्याचा प्रश्न मांडला ही परिस्थिती जुन्या शहरामध्ये जास्त प्रमाणात होते. बऱ्याच ठिकाणी ड्रेनेज लाईन व पाण्याची लाईन जवळ जवळ टाकेलेल्या आहेत. दूषित पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. जे की, तक्रार केल्यानंतर दुसऱ्याच दिवशीपर्यंत त्याचे निवारण व्हावयास पाहिजे. परंतु तीन महिन्याच्या तक्रारीचे आजपर्यंत निवारण होत नाही. तरी प्रशासनाने जनतेचे आरोग्य चांगले राहण्यासाठी दूषित पाण्याबाबतच्या प्रश्नावर तात्काळ कार्यवाही करणे गरजेचे आहे. अनाधिकृत नळ कनेक्शन शोधण्यासाठी एक पथक नेमणार अशी माहिती मिळाली. परंतु आपण अर्थसंकल्पामध्ये अभय योजना राबविणार होतो त्या बाबतीत अंमलबजावणी केलेली नाही याचा अर्थ सर्वसाधारण सभेच्या निर्णयास काही अर्थ नाही. अर्थसंकल्पामध्ये ठळक वैशिष्ट्येमध्ये क्र. २ वर दिले आहे की, महानगरपालिका क्षेत्रात ज्या नागरिकांनी अनाधिकृत नळ कनेक्शन घेतलेले असतील अशा नागरिकांना आव्हान करून त्यांनी घेतलेले अनाधिकृत नळ कनेक्शन विहित कालावधीत विहित रक्कम आकारून सदर नळ कायदेशीर करून घेणार यापासून महानगरपालिकास मोठ्या प्रमाणात उत्पन्न होणार आहे. यावरून आपण घेतलेला निर्णयाची अंमलबजावणी का केलेली नाही. प्रत्येक वेळस नवीन आयुक्त येतील नवीन निर्णय घेतील हे योगय होणार

नाही. अभय योजना मंजूर होऊन महिण्याचा कालावधी झाला अद्याप कार्यवाही का केली नाही त्याचा खुलासा व्हावा.

श्री. तायडे पांडुरंग : सिडको हडको भागातील काही भागात मोठ्या साईजच्या पाईपलाईन टाकलेल्या असतांना त्या भागात सुध्दा पाण्याची टंचाई जाणवले. माझ्या वॉर्डातील नागरिकांची अशी मागणी आहे की, एक दिवसाआड पाणी देत असल्याने फक्त १५ दिवसाचे म्हणजेच ६ महिण्याची पाणीपट्टी येथील नागरिक देतील.

श्री. सुदाम सोनवणे : वेगवेगळ प्रश्न स. सदस्यांनी पाणी प्रश्नाबाबत उपस्थित केले प्रशासनाच्या वतीने मा. आयुक्त यांनी खुलासा केला परंतु सिडको हडकोच्या नागरिकांचा पाणी पुरवठा दररोज देणार, भरपूर पाणी देणार की, नाही, की एक दिवसाआड पाणी देणार याचा स्पष्ट खुलासा केलेला नाही. अनाधिकृत नळ कनेक्शचा सर्व्हे करावा लागणार आहे. असा खुलासा आयुक्तांनी केला परंतु डॉ. कराड हे महापौर असतांना अनाधिकृत नळ कनेक्शच्या सर्व्हे करण्याबाबतचा ठराव पास केला त्या संबंधीचे टेंडर सुध्दा काढण्यात आलेले होते. परंतु पुढील कार्यवाही का थांबली आता पुन्हा ठराव घ्यायचा सर्व्हे करणार म्हणजे वेळ वाया जाणार म्हणून पहिल्याच ठरावानुसार मा. आयुक्तांनी जातीने लक्ष देऊन महानगरपालिकेकडे असलेल्या पोलिस कुमक मार्फत अनाधिकृत नळ कनेक्शनचा सर्व्हे करावा. आजची परिस्थिती अशी आहे की, काही भागात उदा. क्रांतीचौक पासून सिडकोकडे जाणाऱ्या पाईप लाईनवर डायरेक्ट नळ कनेक्शन दिलेले आहे. २४ तास पाणी चालू राहते. खोकडपुरा राधामोहन कॉलनी भागात तसेच काही पंचतारांकित हॉटेल यांना २४ तास पाणी दिल्या जाते. ते बंद करावे यामुळे सिडकोत जाणाऱ्या जाण्यामध्ये वाढ होईल. मागे मी अशी तक्रर केली होती की, हॉटेल ताज मध्ये तीन कनेक्शन आहोत रेकॉर्डवर २ आहे. एक ६ इंची तर दुसरे दोन कनेक्शन ४ इंची आहे. या संदर्भात कार्यवाही करण्याची तक्रार होती अद्याप कार्यवाही केलेली नाही. हॉटेल धारकांना महानगरपालिकाने पाणी हा महानगरपालिका काही व्यवसाय नाही. अगोदर जनतेला पाणी दिले पाहिजे त्यातून शिल्लक राहिलेल्या पाण्यातून हॉटेल धारकांना पाणी दिल्यास योग्य होऊ शकेल तसे ज्या अधिकाऱ्यांनी दिवाळीच्या दिवशी सिडको हडकोला पाणी पुरवठा करण्यासाठी दक्षता घेतली नाही अशा अधिकाऱ्यांवर कार्यवाही व्हावी. या भागात पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी प्रशासन कार्यवाही करणार आहे. याचा खुलासा करावा.

मा. महापौर : शहरात किती अनाधिकृत नळ कनेक्शन आहे. अधिकृत किती आहे याचा शोध घेणे गरजेचे आहे. तत्पूर्वी प्रशासनाच्या निदर्शनास आणून देतो की, बरेच नागरिक नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी येतात परंतु आपले कर्मचारी, अधिकारी हे १० वर्षाचा मागील चार्ज लावला जाणार असे सांगतात म्हणून संबंधित व्यक्ती नळ कनेक्शन अधिकृत न करताच निघून जातात. त्यामुळे महानगरपालिकाचे नुकसान होत आहे. मा. आयुक्तांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. यासाठी अगोदरच शोध मोहिम न राबविता प्रशासनाच्या माध्यमातून वृत्तपत्रात एक जाहिर प्रगटन देऊन ठराविक वेळ देण्यात यावा त्या वेळात अनाधिकृत नळ धारकांनी नळ कनेक्शन अधिकृत केले पाहिजे. जे कुणी अधिकृत करणार नाही त्यांचेवर नियमाने कार्यवाही

करता येईल. जे अर्थसंकल्पामध्ये ठळक वैशिष्ट्ये मध्ये दिले आहे. त्याबाबतीत प्रशासन जाहिर प्रगटन देऊन कार्यवाही करेल व तसा प्रस्ताव सभागृहाच्या मंजुरीसाठी पुढील बैठकीत आणण्यात येईल.

श्री. स. अली मिरा सलामी : अर्थ संकल्पामध्ये अभय योजना राबविण्याचे ठरले हाते. ८ महिने झाले अद्याप प्रस्ताव का आलेला नाही आजच का आणण्याची आवश्यकता पडत आहे. यास जबाबदार कोण आहे.

मा. महापौर : आश्वासन देत नाही पुढील सभेत प्रस्ताव ठेवावयास प्रशासनास सूचना करीत आहे. सभागृहाच्या निर्णयानुसार आपण पुढील कार्यवाही करणार आहोत.

कार्यकारी अभियंता (पा.पु.) आताच मा. महापौर यांना खुलासा केल्याप्रमाणे अनाधिकृत नळ कनेक्शन करून अधिकृत करण्यासाठी जनतेला आव्हान करून कार्यवाही केल्यास सोपे राहिल. केंव्हा पासून अनाधिकृ.त आहे याचा विचार न करता त्यांचेकडून एक वर्षाची पाणीपट्टी वसूल केल्यास यामुळे बरेच लोक अनाधिकृत नळ कनेकशन अधिकृत करण्यास पुढे येतील. जो अनाधिकृत नळ कनेक्शनमुळे नुकसान होत आहे ते पुढे भविष्यात होणार नाही. ८-१० वर्षापासून नळ कनेक्शन आहे त्याचा दंड आकारणी केल्यास कुणीही अधिकृत करण्यास पुढे येत नाही.

शिरसाठ संजय : मागणी १३ महिन्यामध्ये १४ आयुक्त बदलले अद्याप याबाबत कार्यवाही का झाली नाही.

डॉ. भागवत कराड : अनाधिकृत नळ कनेक्शनचे सर्व्हे बाबत टेंडर काढण्यात आलेले होते. २ ते ३ ठेकेदारांनी निविदा भरल्या होत्या. त्यास सर्वात कमी दराची निविदा प्लंबर असोसिएशने भरली होती. त्यांनी काम केले नाही. प्लंबर असोसिएशन काम करण्यात तयार नसेल तर पुन्हा टेंडर काढण्यात येऊन पुढील कार्यवाही करावी.

श्री. प्रकाश निकाळजे : चर्चा करण्यासाठी एक तासाचा वेळ दिलेला होता. तासाच्या वर चर्चा झालेली आहे योग्य निर्णय घेऊन विषय पत्रिकेला सुरुवात करावी.

श्री. काशिनाथ कोकाटे : पाणी वाटपाच्या बाबतीत जुने शहर व सिडकोमध्ये कमी जास्त पाणी द्यावे असा भेदभाव करणे योग्य होणार नाही. प्रशासनाच्या वतीने आताच आयुक्तांनी खुलासा केलेला आहे. आजच्या परिस्थिती सिडको व हडको भागात सुरळीत पाणी पुरवठा करण्यासाठी प्रशासन काय उपाययोजना करणार आहे त्याचा खुलासा व्हावा. समप्रमाणात पाणी देणार के नाही या प्रश्नाला वेगळी दिशा देण्यात आली. ६७ कोटीच्या योजने संदर्भाने खुलासा करतांना ८ कोटी रुपये खर्च केले तर परस्प्र सिडकोला पाणी येईल व तसा प्रस्ताव येणार आहे. असे आयुक्तांनी भूमिका मांडली ती कितपत योग्य आहे. त्यास आमची सर्वाना पाठींना बाहे. अर्थसंकल्पात नळ सर्व्हेक्षण करण्यासठी अभय योजना राबविण्यात येईल असे दिले. आतापर्यत काय कार्यवाही केली नाही. आता पुन्हा ठरावा आणण्याची गरज काय अगोदर झालेल्या ठरावानुसार कार्यवाही व्हावी कि ती प्रिमीयम घ्ययाचे ठरले होते. मागील मिनिटस, काढावे ठराव कशा पध्दतीने मंजूर झालेल्या आहे. त्यानुसार अंमलबजावणी करावी पुन्हा ठराव आणण्याची आवश्यकता नाही.

मा. आयुक्त : अभय योजनेच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेल्या आहे. पुढील बैठकीत तसा प्रस्ताव प्रशासन ठेवेल. आतापर्यत प्रशासनाने प्रस्ताव सभागृहाच्या

मंजुरीसाठी आणलेला नाही. सिडको हडको भागात पाणी वेळेवर व जास्तीत जास्त कसे देता येईल याबाबत नियोजन करण्यासाठी सिडको हडको भागात पाणी वेळेवर व जास्तीत जास्त कसे देता येईल याबाबत नियोजन करण्यासाठी सिडको हडको भागातील सर्व सदस्यां समवेत पुढील बैठकीपर्यंत एक बैठक घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री. कोकाटे काशिनाथ : शहरातील अनाधिकृत नळ शोधावे. शहरासाठी येणाऱ्याच पाण्याचे नियोजन करावे जेणे करून सिडको हडकोला जास्तीत जास्त पाणी दिले जाईल. सध्या सिडको मध्ये एक दिवसाआड दिले ाजते. त्या नागरिकांकाकडून अर्धी पाणीपट्टी आकारणार काय?

मा. महापौर : सिडको हडको मध्ये सुरळीत पाणी पुरवठा होण्यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा.

श्रीमती जयश्री किवळेकर : सिडको हडको ५ एमएलडी पाणी जास्त देणार होते. त्याबाबत काय झाले खुलासा द्यावा.

सौ. लोखंडे कचराबाई : माझ्या वॉर्डात गल्ली नंबर १ ते १० पाण्याची समस्या आहे. पाच गल्ल्या पर्यंत पाणी येते पुढे २ ते ३ घरांना पाणी येते त्यापुढे आणखी कमी प्रमाणात पाणी जाते. गजानन नगर मध्ये सुध्दा तीच परिस्थित आहे. माझे निवासस्थान असलेल्या गजानन कॉलनी भागात पाण्याची सर्व सुविधा असतांना पाणी सोडण्यात येत नाही. तेथील जाताना पाणीपट्टी भरतात तसेच पुंडलिकनगरच्या काही भागात पाणी पुरवठा होत नाही. दररोज सकाळी वॉडा्रतील जनता टँकरद्वारे येणाऱ्या पाण्याकडे धावपळ करतात. पाणी दिले जाईल व वाढवून दिले जाईल असे आश्वासन झोन अधिकारी यांनी दिले होते. अद्याप कार्यवाही झालेली नाही.

मा. महापौर : पाण्यचा प्रश्न संपूर्ण शहराचा आहे. संबंधित अधिकारी यांचेकडे अतिकरत चार्ज आहे. सक्षम अधिकारी नाही. ते नेमण्या बाबत कार्यवाही केली जाईल.

श्री. सुदाम सोनवणे : एक दिवसाआड पाणी देण्याची योजना चांगली आहे. ती यापेक्षा आणखी पाण्याची आवश्यकाता आहे. त्या बाबत नियोजन करावे. दिवाळीच्या दिवशी जे अधिकारी कार्यरत होते. त्यांचेवर नियमाने कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासनाने अगोदर कार्यवाही केलेली आहे. जे पाणी पुरवठ्यासाठी अतिरिक्त अधिकारी म्हणून चार्ज दिलेला आहे ते कामात कमी पडत असेल तर प्रशासनाने सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्त करावी व सिडको हडको भागात जे १ दिवसाआड पाणी देण्याची पध्दत सुरू केली ते पाणी पुरवठा सुरळीत कसा करता येईल याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे आता प्रश्नावर चर्चा करण्यात येणार आहे.

श्री. जयवंत ओक : पाणी प्रश्नावर मला बोलू द्यावे. दिवाळीच्या दिवशी जनतेला पाणी मिळाले नाही अधिकाऱ्यांना सूचना करूनही कार्यवाही होत नाही. आताच प्रश्न उपस्थित केल्यानुसार समर्थनगर येथील जलकुंभ बाबत कार्यवाही व्हावी. सिडको हडकोला एक दिवसाआड पाणी देण्याबाबत आपल्या समवेत व सर्व सिडको हडकोच्या नगरसेवकांना विश्वासत घेऊन निर्णय घेतलेला आहे. आपला मान ठेवून तेथील नगरसेवकांनी मान्यता दिली. मग त्या नागरिकांना एक दिवसाआड का होईना भरपूर पाणी देणार नाही का. यात आपली बदनामी होईल निर्णय घेतल्यानुसार अधिकारी तशी कार्यवाही का करीत नाही. हा माझा प्रश्न आहे. ज्युबलीपार्क व इतर टाक्यामध्ये ५ ते ५ ड्ड

मीटर पाणी भरण्या शिवाय पाणी सोडल्या गेले पाहिजे. सद्य परिस्थितीत १ ते दिड मीटर टाकीत भरल्यावर पाणी सोडले जाते त्यामुळे पाण्याचा दाब कमी असतो व लवकरच पाणी जाते. यासाठी पुंडलिकनगरची योजना तसचे समर्थनगर मधील जलकुंभाचा प्रश्न सोडल्यास पाण्याची टंचाई थोड्याफार प्रमाणात दूर होईल ती जनता ९० ते १००% पाणीपट्टी भरते अशा जनतेला महानगरपालिका साधे पाणी पुरवू शकत नाही. खेदाची बाब आहे. मा. आयुक्त जेवढ्या तळमळीने बोलतात तेवढ्या तळमळीने प्रशासनाची बाजू धरून इतर अधिकारी योग्य ती काय्रवाही करीत नाही. विविध प्रकारच्या जयंती तसेच महोत्सव, दिवाळी, रमजाने होऊन गेले आजापर्यंत पाण्याची व्यवस्था प्रशासन करू शकले नाही. आज पाण्याचा मुद्दा उपस्थित झाला या प्रमाणेच शहरातील साफसफाई सुध्दा वेळेवर झाली पाहिजे. प्रशासनाने जबाबदारीने कामे केली पाहिजे जे अधिकारी वेळीच कार्यवाही करीत नसेल अशा अधिकाऱ्यांवर प्रशासनाने काय्रवाही केली पाहिजे. म्हणून ४ ते ५ दिवसात सिडकोला पाणी देण्याबाबत कसे नियोजन करता येईल. त्याबाबत बैठक घेऊन कार्यवाही करावी.

सौ. साधना सुरडकर : काही भागात २२ तास पाणी येते तर काही भागात अजिबात पाणी येत नाही. यासाठी मीटर सिस्टीम लागू केल्यास पाणी वाया जाणार नाही व ज्या भागात पाणी जात नाही त्या नागरिकांना पाणी मिळेल व पाण्याचा वापर मर्यादित होईल. असे माझे मत आहे. मिटर सिस्टीम लागू करण्यात यावी.

श्री. गणेश तांबे : १४ ऑक्टोंबरला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्याचे अनावरण करणार होते. काही कारणास्तव करू शकलो नाही. आता केंव्हा उद्‌घाटन करणार आहोत, माहिती द्यावी.

श्री. प्रकाश निकाळजे : त्या ठिकाणी सौंदर्यीकरण करावयोच बाकी होते तसेच या पुतळ्याच्या जवळच हायमास्ट दिवा बसविण्याची कार्यवाही करावयाची होती. म्हणून करिता हे उद्‌घाटनाचे काम थांबलेले आहे. या बाबतीत प्रशासनाला सूचन सुध्दा दिलेल्या होत्या आता पुन्हा सूचना करव्यात. तात्काळ कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : सदर ठिकाणी सुशोभिकरणाचे काम लवकरात लवकर प्रशासनाने करावे निर्णय घेतल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

श्री. गणेश तांबे : केव्हा होणार याचा वेळ निश्चित करावा. या संबंधी शासनाने काही निर्देश घालून दिलेले होते. व त्यानुसार सर्वसाधारण सभेन`इराव पारीत केला ७५ लाख रुपयाची चालू आर्थिक अर्थसंकल्पात तरूद केली होती त्यानुसार प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली त्या ठिकाणी पोलिस चौकी तसेच वॉचमन निवासस्थान करून दिले पाहिजे असे शासनाचे निर्देश होते त्यानुसार काय कार्यवाही केली. किमान २६ जानेवारीपर्यंत पुतळ्याचे अनावरण व्हावे अशी अपेक्षा आहे. काल परवा काही गुड प्रवृत्तीच्या लोकांनी जी कापडामध्ये पुतळा झाकून ठेवलेला होता तो कपडा कातरीने ओढून काढून डॉ. बाबासाहेबांचा त्या ठिकाणी अवमान केलेला आहे. डॉ. बाबासाहेबांच्या विषयी हा एक जिव्हाळ्याचा प्रश्न होता. संबंधित लोकांवर महानगरपालिका प्रशासन काय कार्यवाही करणार आहे. केली असेल तर खुलासा करावा.

डॉ. भागवत कराड : या महानगरपालिकास सध्या स्थिर आयुक्त लाभलेले असून चांगल्या प्रकारे कामे चालू आहे. काही दिवसापूर्वी मा. आयुक्तांना निनावी फोनवर धमकी देण्यात येऊन त्यामुळे आयुक्तांना पोलिस संरक्षण घ्यावे लागेल. तसेच दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी आपल्या सुध्दा गाडीची काच काढण्यात आली. असे प्रकार महानगरपालिकेच्या अंतर्गत होत आहे. त्यासाठी सर्व सदस्यांनी मा. आयुक्तांना कामात सहकार्य करण्याची गरज आहे. जो प्रकार घडला त्याबद्दल या सभागृहाच्या वतीने निषेध नोंदवावा.

श्री. इलियास किरमानी : संगणक प्रशिक्षण तसेच वाहनचालक प्रशिक्षण बाबत काय कार्यवाही प्रशासनाच्या वतीने करण्यात आली खुलासा करावा तसेच महानगरपालिका आवारात स. सदस्य तसेच पदाधिकारी यांचे वाहन आणण्याचे बंद केले ही वाहने रस्त्यावर लावावी लागतात महानगरपालिकाने पदाधिकारी तसेच सदस्य यांचेवर शंका घेणे योग्य होणार नाही. म्हणून आजपासून महानगरपालिका आवारात पदाधिकारी व सदस्यांची वाहने उभी करू द्यावी.

मा. महापौर : मा. आयुक्त या बाबतीत योग्य निर्णय घेतील आता विषयपत्रिकेवर दिलेल्या प्रश्नावर चर्चा करावी. प्रश्नाबाबत सचिव यांनी नियम वाचून दाखववावे.

नगरसचिव : महानगरपालिकेच्या सभेतील प्रश्नाबाबत सभा कामकाज नियमावलीतील "जादा नियमामध्ये" खालील प्रमाणे तरतूद आहे. मा. सभागृहाच्या माहितीस्तव सदरील तरतूद वाचून दाखवण्यात येत आहे.

**नियम क्रमांक :**

९७ सभेच्या सुरुवातीला, सभापतीला प्रश्न चिचारण्याबाबत पूर्वसूचना दिलेली आहे. त्या सभासदांना, प्रश्नांच्या यादीतील अनुक्रमानुसार प्रश्न विचारण्यास सांगतील.

९८ असा आदेश मिळालेल्या सभासदाने आपल्या जागेवरून उठावे आणि त्याची इच्छा असल्यास, त्यांच्या नावावर असलेल्या आणि एकापेक्षा अनेक प्रश्न असतील, तर प्रश्नाच्या ते यादीत ज्या अनुक्रमाने असतील त्या अनुक्रमाने आपले प्रश्न विचारावेत.

९९ प्रश्न विचारण्याची ज्याने पूर्वसूचना पाठविली आहे. परंतु ज्या वेळी नांव सभापती पुकारतील, त्यावेळी तो सभासद उपस्थित नसेल तर तो प्रश्न , लेखी अधिकारपत्र असलेला दुसरा कोणताही सभासद विचारू शकेल मात्र प्रश्न विचारण्यापूर्वी असे लेखी अधिकारपत्र नगरसचिव यांचेकडे आले असले पाहिजे. तथापि पूर्वसूचना दिलेल्या सभासदाने अथवा लेखी अधिकारपत्र दिलेल्या सभासदाने प्रश्न विचारला नाही अथवा पूर्वसूचना देणारा सभासद सभाध्याक्षांनी पुकारले असता उपस्थित नसेल, तर तो प्रश्न वगळण्यात आला. असे समजण्यात येईल.

१०० <u>महापौर यांनी खालील प्रकारचे प्रश्न विचारू देऊ नयेत.</u>

१) फार लांबलचक असलेला प्रश्न

२) विवेचन, निष्कर्ष, हेत्वारोप, चेष्टा, अथवा उपहासात्मक विधान ज्यात आहे असा प्रश्न.

३) ज्याची चर्चा होऊन गेली आहे, त्याबद्दल अथवा अधिच्या तीन महिण्यात ज्याचे उत्तर दिले गेले आहे असा प्रश्न.

४) एखाद्या समितीचा जे महानगरपालिकेपुढे ठेवण्यात आलेले नाही अशा कामकाजाबाबत असलेला प्रश्न.

५) जो प्रश्न बेअब्रुकारक, अपमानास्पद अथवा इतर कारणास्तव आक्षेपार्ह आहे, असा प्रश्न जर सभेमध्ये असा प्रश्न प्रत्यक्ष विचारला गेला तर त्याच वेळी सभेची संमती घेऊन तो प्रश्न अथवा त्या प्रश्नातील आक्षेपार्ह भाग सभेच्या वृत्तांतून काढून टाकण्याचा सभापतींना अधिकार आहे.

६) प्रश्न विचाररणाऱ्या सभासदाचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या स्वतःच्या अथवा त्याच्या भागीदाराद्वारे भाग किवा हितसंबंध आहे. अशा बाबींसबंधी अथवा ज्या बाबतीत त्याचा पक्षकाराचा, मुख्याचा किंवा इतर व्यक्तिीच्या वतीने व्यावसायिकदृष्ट्या हितसंबंध आहे, अशा बाबीसंबंधी प्रश्न.

७) ज्या कथनाच्या खरेपणा बद्दलची जबाबदारी प्रश्न विचारणार सभासद द्यावयास तयार नाही, असे कथन असलेला प्रश्न.

८) कोणत्या तरी वृत्तपत्रातूर आलेले लिखन बरोबर आहे किंवा कसे असा प्रश्न.

९) ज्या प्रश्नाचे उत्तर महानगरपालिका किंवा तिच्या विविध समित्यांचे गुपित वृत्तांत पाहिले असता मिळू शकेल असा प्रश्न.

१०१) नियम क्र. ९६ अन्वये तयार केलेल्या यादीत ज्या प्रश्नांचा समावेश आहे त्या सर्व प्रश्नांना लेखी उत्तरे दिले गेले आहे, तिच्याबाबत जास्त स्पष्टीकरण करून घेण्या करिता, कोणताही सभासद विचारू शकेल. परंतु महापौराच्या मते ज्या उपप्रशाचे नियमांनी घातलेल्या बंधनाचा भंग होत आहे, तो ते फेटाळून लावतील. उपप्रश्नाचे उत्तर तोंडी देता येईल.

१०४) पूर्वसूचना मिळाल्याशिवाय आलेल्या पुरवणी प्रश्नाचे उत्तर देण्याचे महापालिका आयुक्त नाकारू शकतील. असे झाल्यास पुढील सर्वसाधारण सभेत योग्य ती पूर्वसूचना देऊन असा प्रश्न नवीन प्रश्नांच्या रुपाने विचारता येईल.

१०५) तोंडी अथवा लेखी संपूर्णपणे उत्तर देण्यात आलेला प्रश्न पुन्हा विचारता येणार नाही.

१०७) प्रत्येक सभेत कामकाजाला सुरुवात होण्यापूर्वी, प्रश्नोत्तरांकरिता अर्ध्या तासाहून जास्त वेळ दिला जाणार नाही. या अर्ध्या तसात ज्या प्रश्नांची उत्तरे मिळू शकली नसतील ते प्रश्न पुढील सभेकरिता शिल्लक ठेवण्यात येतील.

१०८) सभेच्या वृत्तांतामध्ये प्रश्न आणि उत्तरे यांची नोंद नगरसचिव करतील.

# *प्रश्नोत्तरे*

प्रश्नसमुह क्रमांक -१
(मा. प्रशांत देसरडा (दि. ३१-१०-२००१))

**प्रश्न क्रमांक - १ :**

दिनांक १८-०७-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र. ४६३/११ अन्वये महानगरपालिकाचे सुराणानगर मधील व्यायाम शाळेचा भाडेपट्टा रद्द करणे बाबत मंजुरी मिळालेली आहे. सदरील व्यायाम शाळेसंबंधी मालमत्ता विभागाने काय कार्यवाही केली? व्यायाम शाळेचा हॉल

रिकामा केलेला आहे का? व भाडेपट्टा रद्द केलेला आहे का? व सदरील संस्थेने व्यायाम शाळा चालविण्याकरिता करारनामा केलेला आहे का? व केलेला नसेल तर याला जबाबदार कोण?

तसेच यासंबंधी मी पत्र व्यवहार केलेला आहे. परंतु यासंबंधी माहिती पाठविण्यात आलेली नाही, त्याचे कारण काय? याचा लेखी खुलासा येणाऱ्या सर्वसाधारण स्भेत करण्यात यावा.

**उत्तर :** दि. १८-१०-२००१ रोजी सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर झालेल्या ठरावानुसार विधी विभागचे मत मागविण्यात येवून भाडे न भरल्यामुळे व करारनामा न केल्यामुळे व्यायाम शाळेस सिल करण्यात आले आहे. व्यायाम शाळा रिकामी करण्यात आली नाही. भाडेपट्टा करण्यात आला नाही. करारनामा करण्यात आला नाही. म्हणून रद्द करण्यात आला नाही. भाड समिती बैठकीत विलंब केल्याबद्दल जबाबदारी निश्चित करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे.

करिता सुराणानगर व्यायाम शाळेच्या भाडेपट्टा बाबत अहवाल माहितीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. प्रकाश निकाळजे : सचिव यांनी वाचून दाखविलेले नियम नियमावलीमध्ये आहे. प्रशासन सर्वच काम नियमाने करतात का? पत्र देऊन ४ महिने झाले अद्याप तया पत्राचे उत्तर मिळाले नाही. नियमाप्रमाणे तीन दिवसामध्ये उत्तर मिळाले नाही. नियमाप्रमाणे तीन दिवसामध्ये उत्तर द्यावयास पाहिजे.

नगरसचिव : नियम क्र. ४४ नुसार स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबतच्या नियमाचा खुलासा केलेला आहे. विचारलेल्या प्रश्ना व्यतिरिक्त व प्रस्तावा व्यतिरिक्त सभागृहात चर्चा करावी अशी कोठेही तरतूद नाही यामध्ये जास्त चर्चा न होता अर्धा तास प्रश्नावर चर्चा करण्यासाठी योग्य होऊ शकेल एक आठवड्यापूर्वी नगरसचिव यांचेकडे प्रश्न देऊन उत्तराची मागणी केलेली असेल तर प्रशासन त्या प्रश्नाचे उत्तर देईल व लेखी उत्तर देण्यात येईल. जर उत्तर दिले गेले नाही तर पुढील सभेच्या वेळी त्याचे उत्तर मिळेल आणि ज्या प्रश्नाचे उत्तर प्रशासन त्या वेळता देऊ शकले नाही अशा प्रश्नाची उत्तरे सभागृहात मिळतील. परंतु अशा प्रश्नावर जास्त वेळ चर्चा न करता जे प्रस्ताव सादर होतात त्यावर चर्चा करून निर्णय घेणे योग्य होईल.

श्री. प्रशांत देसरडा : प्रश्न उत्तराची सुरुवात नविन पध्दतीने घेण्यात येत आहे. नवन पायंडा पाडण्यात आलेला आहे जेणे करून सभागृहात चर्चा करून योग्य निर्णय घेता येईल. त्याबद्दल मा. महापौर तसेच मा. आयुक्त, मा. नगरसचिव यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. माझ्या वॉर्डात एक व्यायाम शाळा होती ही शाळा ठराव पापास झाल्यानुसार सर्व नागरिकांसाठी खुली करण्यांत यावी असा मी प्रश्न विचारलेला होता. याबाबत प्रशासनाने कार्यवाही केली असे मला लेखी कळविलेले आहे. ही व्यायाम शाळा नागरिकांसाठी आता खुली केलेली आहे असे मला उत्तर दिलेले आहे.

मा. महापौर : प्रश्न क्रमांक २ वर चर्चा करावी.

प्रश्नसमुह क्रमांक -२
(मा. सय्यद अली मिरा सलामी (दि. ०३-११-२००१))

**प्रश्न क्रमांक - २:**

गेल्या चार वर्षात म.न.पा. च्या सर्वसाधारण सभेत ३०/७०, ४०/६० प्रमाणे विकसित करण्याकरिता भखंडाचे प्रस्ताव पारीत करण्यात आले व संबंधितांना विकास करण्यासाठी देण्यात आले होते. म.न.पा. च्या वाट्याला येणाऱ्या इमारती आपल्या ताब्यात घेण्यात आल्या आहे काय? ताब्यात न घेतल्यास त्याची सविस्तर माहिती कारणासहित देण्यात यावी.

**उदा.** एस.बी.कॉलजेच्या लागून सिटी बस स्टँडजवळ निराला बाजार रोड येथील इमारत पूर्णत: २ वर्ष पूर्ण झालेली आहे. त्याच प्रमाणे इतर इमारती.

**उत्तर :**

आपण दिलेल्या उदाहरणानुसार चार ठिकाणी म.न.पा. ने विकास परवान्या दिलेल्या आहेत. त्यापुढील प्रमाणे आहेत.

१ मालखरे बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स शिनेरी नगर, गारखेडा.
२ अर्चना बिल्डर्स गारखेडा
३ जय टॉवर्स पद्मपुरा.
४ श्री. पाहुळकर शारदाश्रम कॉलनी.

ह्या विकास परवानग्या समावेश आरक्षण योजना ह्या शासनाच्या १९९४ च्या निर्देशन नुसार देण्यात आलेल्या आहेत. त्यावेळी केलेल्या करारनाम्यानुसार अर्जदार २५ टक्के बांधकाम विना मोबदला म.न.पा. स देणारा आहे. म.न.पा साठी बांधकामास येणारे बांधकाम मा. शहर अभियंता यांच्या देखरेखीखाली व त्यांचे (स्पेसीफिकेशन) नुसार करून घ्ग्रेऊन ताब्यात घ्यावयाचे आहे. तसेच कामांचे पूर्णत्वाचे पमाणपत्र दिल्यानंतर ताब्यात घ्यावयाची आहे. अद्याप ह्या विभागाने संबंधित इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. तसेच अ.क्र. (१) व (४) चे अर्जदरांनी सुधारित बांधकाम प्रस्ताव दिलेले आहेत करिता माहितीस्ताव सादर.

**संवाद :**

श्री. स. अली सलामी : आतापर्यंत लेखी स्वरुपात प्रश्न विचारून लेखी उत्तर देण्याची कार्यवाही होत आलेली आहे. वेळेवर उत्तर दिले जात नाही म्हणून नियमानुसार सभागृहामध्ये प्रश्न ठेवून माहिती घेण्याची नवीन पध्दतीला सुरुवात झालेली आहे. त्याबद्दल स.स.श्री. प्रशांत देसरडा यांनी मा. नगरसचिव मा. महापौर, तसेच प्रशासनाचे अभिनंद सुध्दा केलेल आहे. यास मी अनुमोदन देत आहे. या अगोदर जे प्रश्न विचारण्यात आलेले आहे. त्यास ३ ते ३ महिने झाले अद्याप त्या प्रश्नाचे उत्तरे दिलेली नाही. आताच झ ालेल्या चर्चेनुसार मा. आयुक्तांनी खुलासा केला. सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही असे मा. आयुक्तांनी मत व्यक्त केले. दुसऱ्या बाजूने मा. आयुक्तांनी जकात वसुली वाढविण्यावर भर दिलेला आहे. वृत्तपत्रात तशा बातम्या प्रसिध्द होत आहे. सत्कार होत आहे चांगली बाब आहे. याच बरोबर मालमत्ता वसुली वाढविण्यासाठी सुध्दा नितांत गरज आहे. जनतेची मालमत्ता ही महानगरपालिकाची मालमत्ता आहे असा उद्देश समोर ठेवून मालमत्ता कर वसूल करण्यावर प्रशासनाने भर दिला पाहिजे. महानगरपालिकेचे बऱ्याच बिल्डरांना ७०-३०, ७५-२५ या प्रमाणानुसार काही जमीन विकास करण्यासाठी दिलेली आहे. इमारती पूर्ण झालेल्या असून

महानगरपालिकाचा जो हिस्सा होता तो अद्याप दिलेला नाही. यात महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे. याबद्दल स. सदस्य श्री. खुंगर यांनी प्रश्न देऊन माहिती विचारलेली होती. ४ महिन्यानंतर उत्तर प्राप्त झाले. अद्याप कार्यवाही केली नाही. म्हणून त्याबद्दल उत्तर प्रशासनाने दिलेले आहे.इमारतीचे बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र महानगरपालिकाचे दिल्या शिवाय पुढील कार्यवाही संबंधित इमारत मालकास करता येत नाही परंतु जयटॉवर्स, उलकानगरीतील मालखरे तसेच गारखेड्यातील देशपांडे व औरंगपुरा येथील श्री. पाडाळकर या बिल्डरांनी महानगरपालिकाच्या जागेवर दुकान केंद्र व इतर बांधकाम करून सदर दुकाने विक्री केलेल आहे. जो २५%, ३०% महानगरपालिकाचा हिस्सा होता तो कोणत्या बाजूने देणार याचा काहीही ताळमेळ नाही. ज्या पध्दतीने महानगरपालिकाने करार केलेला आहे तेंव्हा बांधकाम सुरू झाले त्यानुसार महानगरपालिकाचे संबंधित अधिकारी यांनी योग्य ती नियमानुसार कार्यवाही का केलेली नाही व ज्या बिल्डरांनी व्यवसाय करणाच्या दृष्टीने जी दुकाने होती ती सर्व दुकाने विक्री केलेली आहे. तसेच करारनुसार इमारत बांधकाम केलेले नसेल तर अशा बिल्डरांवर काय कार्यवाही होणार आहे. याचा खुलासा देण्यात यावा. अद्याप पर्यंत कार्यवाही केलेली नाही अशी माहिती मिळालेली आहे. कार्यवाही झ ालेली नसेल तर किती दिवसात होणार आहे. याचा सुध्दा योग्य तो खुलासा करण्यात यावा. तसेच शहरा अंतर्गत आरक्षित जे भूखंड आहेत ते विकास साठी काही लोकांना देण्यात आलेले होते. ६०% जागेवर संबंधित व्यक्तीने विकास करावा व ४०% जागा महानगरपालिकेस परवानगी देण्याच्या अटीवर सोडावी. यानुसार महानगरपालिकेचा जो उद्देश होता तो सफल झालेला आहे का संबंधी लोकांनी ६०% पेक्षा जास्त म्हणजेच महानगरपालिकेस सोडलेल्या जागेवर बांधकाम केलेले आहे का याची सुध्दा माहिती देण्यात यावी. माझ्या माहितीप्रमाणे महानगरपालिकेस देण्यात येणाऱ्या जागेवर सुध्दा या लोकांनी बांधकाम केलेले आहे. महानगरपालिकाची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही त्या दृष्टीकोनातून अशा विषयावर या बैठकीत चर्चा करणे गरजेचे आहे. परवानगी शिवाय जास्त जागेवर बांधकाम झाली आहे. काय याकडे महानगरपालिकाने लक्ष देणे गरजेचे आहे. जे की, महानगरपालिकाचे यात नुकसान होणार नाही. या चर्चानुसार जो प्रश्न मी विचारलेला होता त्याचे उत्तर बरोबर आलेले नाही. तसेच दुसरा एक प्रश्न घेऊन शहरातील किती लोकांना परवानगी दिली त्याचे उत्तर ४ महिन्यानंतर आले. आरक्षित भूखंडावर नगररचना विभागाकडून परवानगी देण्यात आलेली आहे अशीही काही प्रकरणे आहे याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करणार तसेच काही ठिकाणच्या इमारतीस परवानगी वेगळी व बांधकाम वेगळे झालेले आहे. अंडरग्राऊंडमध्ये परवानगी घेतांना पार्कींग तसेच बाथरूम दाखवले व सध्या अशा इमारतीत व्यवसाय करण्याच्या दृष्टीने दुकाने काढलेली आहे. व व्यवसाय होत आहे. अशा इमारत धारकांना बांधकामाचे पमाणपप कसे देण्यात आले यावर यासंबंधी मी अभ्यास करून पुढील बैठकीत प्रश्न उपस्थित करणार आहे.

(दि. ०१-०८-२००१)

**प्रश्न क्रमांक - ३:**

विषय :- बांधकाम परवानगी बाबत माहिती मिळणे, पत्र देण्यात आले होते. अद्याप माहिती देण्यात आलेली नाही. सदरील खुलासा करण्यात यावा.

**उत्तर :** या पत्रासोबत सदर बांधकाम तथा रेखांकन परवानगीची माहिती (झेरॉक्स प्रत) देण्यात येत आहे.

**संवाद :**

श्री. स. अली सलामी : या प्रश्नाचे उत्तर मिळाले आहे. अभ्यास करून चर्चा केली जाईल.

श्री. देसरडा प्रशांत : ज्या ठिकाणी १००% आरक्षण आहे अशा जागावर संबंधित मालकाने २५% जागेवर महानगरपालिकेस विकास करून द्यावयाचा अशा प्रकारचे चार प्रस्ताव आता पर्यंत मंजूर केलेले आहे. गारखेडा येथे दोन तसेच जयहिंद कॉलनी, पद्मपुरा इ. भागात हि कार्यवाही केलेली आहे. १००% बांधकाम झालेले आहे. महानगरपालिकेस हस्तांतर होणाऱ्या जागेवर प्रत्यक्ष इमारतीचे बांधका झाले आहे का? या प्रश्नाचे उत्तर असे मिहाले की, वरील पैकी अनु. क्र. १ ते ३ हे १००% बांधकाम पूर्ण झालेले असून अनु.क्र. ४ ते ९५% बांधकाम झालेले आहे. जवळपास १००% बांधकाम झालेले असून २५% हिस्सा महानगरपालिकेस मिळणार होता व सदर बांधकाम होऊन ६ महिने झाले. याचा अर्थ ६ महिन्याचे येणारे जवळपास ५० लाख रुपयाचे महानगरपालिकाचे यात अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे नुकसान झालेले आहे. नियमानुसार संबंधित बिल्डरांना बांधकामाचे प्रमाणपत्र दिल्या शिवाय सदर दुकाने ते विक्री करू शकत नाही असे असतांना सुध्दा दुकाने बिल्डरांनी कशी विक्री केली याची कसून चौकशी करण्यात यावी तसेच झ ालेले बांधकाम याची गुणवत्ता कशी आहे याची सुध्दा तपासणी करणे गरजेचे आहे. व जी २५% हिस्सा मालमत्ता महानगरपालिकेस येणर होती कोणत्या स्थितीत येणार आहे. केंव्हा हस्तांतरण करणार जेणे करून भाडे तत्वावर देऊन महानगरपालिकाचे उत्पन्न वाढेल सविस्तर आताचा खुलासा व्हावा.

श्री. खुंगर सुरजितसिंग : आताच सचिव यांनी प्रश्नाबाबतचे नियम वाचून दाखवले, एक प्रश्न विचारण्यात आलेला होता त्याचे उत्तर ४ महिन्यानंतर मिळाले. नियमानुसार का उत्तर तात्काळ देण्यात आलेले नाही. जे उत्तर प्राप्त झाले ते अत्यंत दिशाभूल करणारे आहे. एका बाजूला महानगरपालिकाची आर्थिक परिस्थिती चांगली नाही असे सांगितले जाते त्यासाठी वेगवेगळ्या पध्दतीचा अवलंब करणे गरजेचे आहे त्या संदर्भात चर्चा करावी सभा उशीरापर्यंत चालली तरी चालेल. योग्य निर्णय व्हावेत जो पर्यंत महानगरपालिकाकडे आर्थिक बह नाही तो पर्यंत विकास कामे करता येणे शक्य नाही याची जाणीव सर्वांना आहे. ज्या बिल्डरांना जागा विकास करण्यासाठी दिल्या त्यातील महानगरपालिकेचा येणारा हिस्सा संबंधित बिल्डरांनी न देता त्या जागेवरील दुकाने विक्री केल्या महानगरपालिका आपल्या हिश्याच्या जागा दुकाने का विक्री करित नाही. जेणे करून महानगरपालिकाचे उत्पन्न वाढेल. आताच स. सदस्य श्री. देसरडा यांनी सूचना केली की, ५० लक्ष रुपयाचे नुकसान झाले माझ्या माहितीप्रमाणे २ कोटी नुकसान महानगरपालिकाचे

झालेले आहे. बांधका पूर्णत्वाचे प्रमाणपत्र दिले नाही तर दुकाने कशी विक्री केली. ५० लक्ष रुपये गृहित धरल्यास व त्यावर येणारे व्याज गृहित धरल्यास यात महानगरपालिकेचे फार मोठै नुकसान होत आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने एक कमिटी गठीत करावी त्या कमेटीने देखरेख करावी जेणे करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल. व यापुढे महानगरपालिकेचा खर्च कमीत कमी कसा केला जाऊ शकतो याकडे सुध्दा लक्ष देणे गरजेचे आहे. याबाबतीत किती दिवसात कार्यवाही होईल याचावेळ निश्चित करून तसे रुलींग आपण द्यावे.

श्री. अंबादास दानवे : महानगरपालिकेने आरक्षित भूखंड ३०-७० किंवा ४०-६० या प्रमाणे विकसित करण्यासठी दिलेले असून बऱ्याच इमारत मालकांनी जवळपास सर्वच जागा वरील दुकाने विक्री किंवा भाडे तत्वावर दिलेल्या आहे इमारतीचे संबंधित मालकांनी महानगरपालिकेकडून प्रमाणपत्र न घेता ही दुकाने विक्री करणे हे कायद्यानुसार दखलपात्र गुन्हा होऊ शकतो. तसेच महानगरपालिकेच्या नगररचना विभागचे ते अधिकारी आहे याचे या प्रकरणाकडे संपूर्ण दुर्लक्ष आहे हे स्पष्ट दिसून येते. व ठरल्याप्रमाणे महानगरपालिकेस संबंधित बिल्डरांनी हिस्सा दिलेला नसेल व तेथील दुकाने विक्री केलेली असेल तर अशा बिल्डरांवर काय कार्यवाही होणार आहे असा माझा या प्रश्नाला लागून उपप्रश्न मी केलेला आहे. खुलासा द्यावा.

डॉ. भागवत कराड : ठराव पास करून ७०-३० प्रमाणे जागा विकसित करण्यासठी महानगरपालिकाने परवानगी दिली. काही बिल्डरांनी बांधकाम पूर्णात्वाचे प्रमाणपत्राची विनंती अर्ज देऊन मागणी केलेली आहे. त्यानुसार प्रशासनाकडून कार्यवाही झालेली नाही. यात प्रशासनाचाही दोष्ज्ञ असू शकतो याची तपासणी करण्याची आवश्यकात आहे. आता विलंब न लावता ज्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले आहे महानगरपालिकेचा जो टक्केवारी नुसार हिस्सा येणार आहे तो ताब्यात घ्यावे २ ते ४ ठिकाणी वर्षानुवर्षापासून बांधकाम होऊन झालेले आहे. ते ताब्यात घेवून तात्काळ कार्यवाही व्हावी जे की, महानगरपालिकेचे उत्पन्न वाढण्यात मदत होईल.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : ७०-३० प्रमाणे ज्या बिल्डरांना जागा विकसित करण्यास दिली होती काही बिल्डरांनी प्रमाणपत्रासाठी महानगरपालिकेकडे अर्ज केलेले आहे. कार्यवाही केलेली नाही. तसेच काही बिल्डरांनी १०%-१५% जास्तीचे बांधकाम केलेले आढळून आल्यास त्यांचेवर दंड आकारणी करून नियमित केले जाते.

मा. महापौर : प्रशासनामार्फत खुलासा करण्यात यावा.

श्री. प्रकाश निकाळजे : किती जागेबाबत असे ठराव मंजूर झाले किती जागेवर बांधकाम पूर्ण झाले एकाच अधिकाऱ्यांकडे ही कामे असतील तर त्यांना एक सहाय्यक द्यावेत काम वेळेवर होईल.

सहा. संचालक नगररचना :शासनाच्या निर्देशानुसार महानगरपालिका किंवा नगरपरिषेदच्या आरक्षित जागांवर महापालिकेची किंवा नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती चांगली नसेल अशा महापालिकेने किंवा नगरपरिष्ज्ञदेने अशा जागांवर संबंधित मालकाने स्वखर्चाने एफएसआय नुसार महानगरपालिकेस २५% जागेवर बांधकाम करून ती मालमत्ता देऊ शकेल असे निर्देश शासनाचे आहे. यापूर्वी महानगरपालिकेने काही बिल्डरांना अशा पध्दतीने

कार्यवाहिसाठी जागा दिलेल्या आहे. यापैकी दोन जागेचे बांधकाम प्रमाणपत्राबाबत रिवाईज प्रपोजल आलेले आहे. चारही बांधकामाचे भोगवटा प्रमाणपत्र नाही. बांधकाम परवानगीनुसार जागेवर बांधकाम झाले. त्याची पाहणी करून महानगरपालिचा जो हिस्सा घ्यावयाचा आहे तो बांधकाम होऊन पूर्ण झालेला असेल त्या संबंधीची योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. संबंधित काही बिल्डरांनी जागा महानगरपालिकेने ताब्यात घेण्याबाबत अर्ज दिलेले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

मा. आयुक्त : महानगरपालिकाची आर्थिक परिस्थिती बळकट करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयावर चर्चा चालू आहे. शासन निर्देशानुसार कार्यवाही केली. अशा जागा विकसित करण्यासाठी देतांना महानगरपालिकेस कोणत्या जागेवर २५% विकास करून दिला जाईल हे दाखविले नाही. तेंव्हा जागा देतांना योग्य वाटले परंतु आज आडचण निर्माण होत आहे. परवानगी दिली ॲग्रीमेंट केले असे प्रकार दोन प्रकरणामध्ये झालेले ते सोडून इतर ज्या जागा विकसित करण्यासाठी दिलेल्या त्याची कार्यवाही संबंधित विभागान असे प्रकार दोन प्रकरणामध्ये झालेले ते सोडून इतर ज्या जागा विकसित करण्यासाठी दिलेल्या त्याची कार्यवाही संबंधित विभागाने तात्काळ करावी. नगररचना विभागाच्या नियमाने एफएसआय बरोबर सोडला नसेल. झालेले बांधकाम हे तोडावे लागेल व तया नंतर ॲग्रीमेंट मध्ये काय ठरले त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

मा. महापौर : अशा प्रकारचे जे प्रस्ताव प्रशासनासमोर येतील त्या बाबतीत मागे ज्या चुका झाल्या त्या आता पुढे होऊ देऊ नये करारनाम्यामध्ये ठरल्याप्रमाणे कोणती दुकाने महानगरपालिकेस संबंधित मालक देणार याची करारास नोंद असावी.

श्री. खुंगर सुरजितसिंग : २५% हिस्सा प्रमाणे महानगरपालिकेची मालमत्ता किती दिवसात ताब्यात घेणार तसा खुलासा व्हावा.

मा. महापौर : अशा जागेवर विकास झाला असेल २५% प्रमाणे ठरल्याप्रमाणे बांधकाम पूर्ण झाले असेल अशा महानगरपालिकाच्या हिस्स्याच्या दुकाने (जागा) ताब्यात घेण्या बाबत तात्काळ कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : किती वेळ लागेल हे सांगता येणार नाही कारण किती लोकांनी नोटीस दिली. कुणी न्यायालयात गेले तर ई. सर्व बाबी तपासणी करून घेऊन तातडीने कार्यवाही करण्यात येईल.

श्री. कोकाटे काशिनार्थ : ज्यांना जागा विकसित करण्यासाठी दिल्या त्या बिल्डरांनी तो प्रकल्प पूर्ण केलेला नसेल तर अशा बिल्डरांना दुसरे परवानगी देण्यात येऊ नये त्यांचेकडून अगोदरचे काम पूर्ण करून घ्यावे.

प्रश्नसमुह क्रमांक -३
(मा. चंद्रशेखर जैस्वाल दि. ०५-११-२००१)

**प्रश्न क्रमांक : ४**

महानगरपालिकेने सध्या वर्ग-२, वर्ग-३, व वर्ग-४ संवर्गामधील एकूण किती व कोणकोणते अधिकारी तथा कर्मचारी निलंबित आहेत. त्यांना कोणकोणत्या कारणामुळे निलंबित करण्यात आले. असे अधिकारी तथा

कर्मचारी केंव्हा पासून निलंबित आहेत. निलंबित कर्मचाऱ्यापैकी एकूण किती कर्मचाऱ्यांना ५०% वेतन अदाई करण्यात येते. एकूण किती कर्मचाऱ्यांना ७५% मासिक वेतन अदाई करण्यात येते. निलंबित कर्मचाऱ्यांपैकी एकूण किती कर्मचाऱ्यांना काहीच मासिक वेतन अदाई करण्यात येत नाही.

मुंबई प्रातिक म.न.पा. अधिनियमाचे कलम ५६ मधील तरतूदी नुसार निलंबित कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव मंजुरीसाठी सभागृहासमोर प्रशासनामार्फत ठेवण्यता आलेले आहेत काय? असल्यास असे निलंबित कर्मचाऱ्यांचे एकूण किती प्रस्ताव सभागृहासमोर ठेवण्यात आले. सभागृहामध्ये मंजुरीनंतर एकूण किती कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्यात आले. उर्वरित निलंबित कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्यात आले. उर्वरित निलंबित कर्मचाऱ्यांना पुन्हा पूर्ववत कामावर केंव्हा घेणार आहात? वर्षानुवर्ष पासूनया अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित ठेवण्याची कारणे काय? निलंबित कर्मचाऱ्यांचे वेतनावर आता पर्यंत महापालिकेने एकूण किती रक्कम खर्च केला. या बाबत विहित आकडेवारीसह व अभिप्रायासह सविस्तर अहवाल सभागृहात सादर करण्यात यावा.

**उत्तर :** **सहाय्यक आयुक्त -१**

महानगररपालिकेचे सध्यावर्ग-२ मधील एकही अधिकारी निलंबित नाही. वर्ग-३ मधील ११ कर्मचारी तर वर्ग-४ मधील आस्थापना-१ शाखेकडून निलंबित करण्यात आलेला एक कर्मचारी असे एकूण १२ (बारा) कर्मचारी निलंबित आहेत. निलंबित कर्मचाऱ्याची नांव निलंबनाचे कारण व निलंबन तारिख खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पद | निलंबनाची तारीख | निलंबनाचे कारण |
|---|---|---|---|---|
| | सर्वश्री | | | |
| १ | ना. हि. तेली | व.क्षे. कर्मचारी | ०७-११-९० | वि.क्र.७ आर्थिक अफरातफर, |
| २ | एम. स. साजेद | नाका कारकून | २१-०८-९५ | जकात विभागातील आर्थिक गैरव्यवहार |
| ३ | भरत देवकर | ईमारत निरिक्षक | २४-०६-९७ | लाख स्विकारतांना पकडण्यात आल्यामुळे |
| ४ | के.जी. बन्सीले | अन्न निरि. से. नि. | २३-०३-९६ | --//-- |
| ५ | अ. नजीर | शिपाई | ०७-०२-९८ | --//-- |
| ६ | आर. एस. राचतवार | ईमारत निरिक्षक | ०५-०६-९९ | --//-- |
| ७ | म. रफिक | कनिष्ठ लिपिक | १७-११-९९ | --//-- |
| ८ | बी. के. रगडे | वरिष्ठ लिपिक | ३१-०४-२००० | मालमत्ता विभागातील गैरव्यवहार |
| ९ | जे.डी. थोरात | ईमारत निरिक्षक | १८-११-२००० | लाच स्विकारतांना पकडण्यात आल्यामुळे |
| १० | एस. सी गारोडी | ईमारत निरिक्षक | १८-११-२००० | --//-- |
| ११ | जे. एस. बोधानकर | कनिष्ठ लिपिक | १६-०७-२००१ | वि.क्र.४ मधील आर्थिक गैरव्यवहार |
| १२ | एस. बी. संगेवार | ईमारत निरिक्षक | ०८/१०/२००१ | अनधिकृत बांधकामे |

उक्त निलंबित १२ कर्मचाऱ्यापैकी ०४ कर्मचाऱ्यांना ५०% व ०७ कर्मचाऱ्यांना ७५% इतके मासिक वेतन अदा करण्यात येत आहे. एक कर्मचारी श्री. के. जी. बन्सीले हे सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांना मासिक वेतन अदा करण्यात येत नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५६(१) (ब) अन्वये, परिवहन व्यवस्थापक किंवा कलम ४५ अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनेच निलंबन व त्यांसबंधीची कारणे मा. आयुक्तांनी ताबडतोब महानगरपालिकेस कळविले पाहिजे अशी तरतूद आहे. सद्य स्थितीत उक्त अधिकाऱ्यांमधून कुणीही निलंबित नसल्यामुळे तसे प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आलेले नाहीत उक्त निलंबित कर्मचाऱ्यांबाबत तशी कार्यवाही करण्यात आलेले नाही.

सभागृहाच्या मंजुरीनंतर एकाही कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्यात आलेले नाही.

निलंबित कर्मचाऱ्यांच्या प्रकरणात खाते चौकशीचा / मा. न्यायालयाचा अंतिम निर्णय झाल्यानंतर, होणाऱ्या निर्णय नुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सद्यस्थितीत निलंबित असलेल्या कर्मचाऱ्यांची निलंबन तारीख व निलंबनाचे कारण याबाबतची माहिती प्रश्न क्र. ०१ च्या उत्तारात देण्यात आली आहेत.

याबाबतची आकडेवारी लेखा विभागातून उपलब्ध करून घेऊन ती माहिती पुढील सभेमध्ये सादर करण्यात येईल.

**सहाय्यक आयुक्त-२**

**वर्ग-४ संवर्गातील निलंबित कर्मचाऱ्यां बाबत माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | निलंबनाचा दिनांक | निलंबनाचे कारण | चौकशी अधिकारी | देत असलेल्या निलंबन भत्ता प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुनमचंद रतनलाल चावरीया | स्विपर झो.क्र.३ | ३१-०३-९५ | पोलिस कार्यवाही अटक | - | ७५% |
| २ | जाधव दिलीप पंडित | वॉचमन वि.क्र.५ | ०४-०७-२००० | --//-- | श्री. डी. बी. लोखंडे कामगार अधिकारी | ५०% |
| ३ | सुरेश नारायण पाटील | लाईनमन (पा.पु.) झोन क्र.४ | १५-०९-२००१ | कामात गैरशिस्त गैरवर्तणूक | श्री. बी.ए. वाहुळ प्रभारी विभागीय अधिकारी | ५०% |
| ४ | एस.एल बर्फे | गाळणी परिस्वारक जायकवाडी | २५-०९-२००१ | कामात गैरशिस्त गैरवर्तणूक | श्री. डी. ए. गिरी मालमत्ता अधिकारी | ५०% |
| ५ | सिध्दार्थ दाभाडे | शिपाई कर आकारणी विभाग | ११-१०-२००१ | कार्यालयीन वेळेत वरिष्ठास मारहाण गैरशिस्त | श्री. डी.बी. लोखंडे कामगार अधिकारी | ५०% |

**संवाद :**

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : १५ दिवसापूर्वी प्रश्न विचारलेला होता अद्याप व्यवस्थित उत्तर मिळालेले नाही. प्रश्न वेगळा विचारलेला हाता उत्तर वेगळे सादर केले. पहिल्या प्रश्नामाध्ये वर्ग-२ चे एक ही कर्मचारी निलंबित नाही असे दिले. वर्ग-३ मधील ११ तर वर्ग-४ मधील १ कर्मचारी निलंबित आहे. या कम्रचाऱ्यांना घरी राहून ५०%, ७५%, वेतन दिले जाते प्रश्ना मागील माझा उद्देश असा की, जे कर्मचारी निलंबित केले त्यांना कामावर घ्यावे. सध्या त्यांना देण्यात येणारे वेतनाचा उपायोग होईल व काम सुध्दा होतील. ७५%, ५०% वेतन देऊन महानगरपालिकाचे नुकसान करून घेऊ नये. जे उत्तर प्राप्त झाले ते समाधान कारक नाही. तसेच प्रश्न क्र. २ चे उत्र सुध्दा व्यवस्थित दिलेले नाही.

उप- आयुक्त (म.) : एकूण वर्ग-३ चे ११ कर्मचारी व वर्ग-४ चे एक कर्मचारी असे एकूण १२ कर्मचारी निलंबित आहे. या कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या प्रकरणावरून निलंबन झालेले आहे. यामधील माहिती सादर केल्यानुसार ७ कर्मचारी लाचलुचतप प्रकरणात होते त्या कारणामुळे निलंबित केलेले आहे. वेगवेगळे गुन्ह या कर्मचाऱ्यांमधील संगेकर इमारत निरिक्षक यांना दि. ०८/१०/२००१ रोजी अनाधिकृत बांधकामाच्या कारणाने निलंबित करण्यात आलेले आहे. दोषारोपपत्र दाखल केलेले आहे.

श्री. पंडागळे रतनकुमार : निलंबित कर्मचाऱ्यांना किती कालवधी पर्यंत निलंबित ठेवता येते. ६ महिन्याच्या वर त्यांना निलंबित ठेवता येत नाही. अशी तरतूद आहे असे माझे मत आहे.

उप-आयुक्त (म.) : ६ महिन्याच्या आत कार्यवाही झाली पाहिजे असे नियमात आहे.

श्री. सुदाम सोनवणे : प्रश्न विचारण्याचा उद्देश एकच होता की, निलंबित कर्मचारी किती त्यांना कामावर न घेण्याची कारणे काय? जे उत्तर दिले समाधान कारक नाही. सदर निलंबित कर्मचारी यांना घरी बसून ५०%, ७५% पगार दिला जातो व त्यांचेकडून कामे घेतली जात नाही यात महानगरपालिकेचे नुकसान होते आहे. कामे वेळेवर होत नाही. नाका कारकून श्री. साजेद यांनी कामावर घेण्याबाबत वेळोवेळी महानगरपालिकाकडे जवळपास २००-३० पत्र देऊन मागणी केली अद्याप कामावर घेतले नाही व त्याचे पत्राला प्रशासनाने काहीच उत्तर हि दिले नाही. यावरून प्रशासनातील अधिकारी / कर्मचारी यांची काम करण्याची किती क्षमता आहे हे दिसून येते. काही कर्मचाऱ्यांना कामावर कसे घेण्यात आले एक तर त्यांना कामावर घ्यावे नसता त्यांना कामावरून कमी करावे.

श्री. देसरडा प्रशांत : ज्या कर्मचाऱ्यांना ४८ तासाच्या वर पोलिस कोठडी झाली अशा कर्मचाऱ्यांना निमाने निलंबित करता येते बरेच कर्मचारी घरी बसून त्यांना ५०%, ७५% वेतन दिले जाते व हे कर्मचारी २४ ताच्या आत पोलिस कोठडीतून मुक्त झालेले आहे. अशांना सुध्दा निलंबित ठेऊन ५०%, ७५% घर बसल्या वेतन देणे योग्य आहे का? आताच काही दिवसापूर्वी एका प्रकरणात एका कर्मचाऱ्यांना निलंबित न करता त्याची बदली करण्यात आली त्यांना निलंबित का केले नाही. एकतर कर्मचाऱ्यांना घरी पाठवावे नसता त्यांना कामावर घेऊन चौकशी चालू ठेवावी.

मा. दानवे अंबादास : पोलिस विभागाचा तसा रिपोर्ट आल्यावर निलंबनाची कार्यवाही होते त्यानंतर स्थायी समितीने निर्णय घेतल्यानंतर अशा कर्मचाऱ्यांना कामावर घेता येते का?

मा. आयुक्त : महानगरपालिकेत एकूण ३५०० कर्मचारी आहे. सर्वसाधारपणे जे कर्मचारी दोषी असतांना नियमाने कार्यवाही करावी लागते. निलंबित कर्मचाऱ्यांच्या बाबतीत चौकशी चालू आहे ती कशी करायची असते त्याची सुध्दा नियम आहे. प्रश्न फक्त निलंबित करण्याचा निर्माण होत नाही जी पदे संविधानिक आहे. अशा पदावरील कम्रचाऱ्यांच्या बाबतीत ६ महिन्यात कार्यवाही न झाल्यास महानगरपालिकेसमोर ठेवावे लागते. संविधानिक पद नसेल तर कोणत्या आधारे केले, पोलिस विभागाचा कोणताही रिपोर्ट नसतांना कर्मचाऱ्यांना निलंबन केले तर भविष्यात न्यायालयीन प्रकरण झाल्यास प्रशासनास अडचणनिर्माण होते. कोणत्या नियमाच्या आधारे निलंबन केले याची सुध्दा विचारणा होऊ शकते. पोलिस विभागाचा रिपोर्ट आल्यानुसार व सदर कम्रचारी ४८ तासाच्या आत सुटका झालेली असली तरी निलंबित करावे लागते. ज्यांना प्रत्यक्षलाच घेतांना पकडले. त्यांचे दोषारोप दाखल होतात. रिपोर्ट सादर झाल्यानंतर अशा कर्मचाऱ्यांना नियमानुसार न्यायालयीन प्रकरणे जास्त होते. त्यामुळे विभागीय चौकशी करता येत नाही. विभागीय चौकशीचे जी प्रकरणे आहे त्याबाबत आताच सूचना दिलेल्या असून ३ महिन्यात चौकशी करून आर्थिक बाबीमध्ये गुंतलेले नाही असे निष्पन्न झाल्यास अशा कर्मचाऱ्यांना कामावर घेता येईल. तो पर्यंत त्यांना नियमानुसार ५०% वेतन द्यावेच लागेल.

श्री. मीर हिदायत अली : १९९२-९३ मध्ये काही कर्मचाऱ्यांनी अफरातफर केलेली होती अशा कर्मचाऱ्यांवर प्रशासनाने अद्याप का कार्यवाही केली नाही.

मा. आयुक्त : एका कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवला असता त्यास मान्यता देण्यात आली नाही. स्थायी समितीने बडतर्फीचा निर्णय घेतला नाही.

श्री. देसरडा प्रशांत : प्रस्ताव ठेवतांना शेवटची कार्यवाही न करता प्रस्ताव सादर केलेला होता. यामुळे स्थायी समितीने त्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. संपूर्ण चौकशी करून बडतर्फ करण्याचा प्रस्ताव ठेवावा स्थायी समिती योग्य निर्णय घेण्यास सक्षम आहे.

**प्रश्न क्रमांक - ५** महानगरपालिकेच्या विविध विभागांमधील विविध विकास कामांच्या एकूण किती निविदा मा. आयुक्तांनी पुन्हा मागविल्या. विकास कामांचा निवदा पुन्हा मागविण्योच कारण काय? अशा विकास कामांची प्रत्येकी एकूण किती निविदा पत्रके प्राप्त झाली होती. प्राप्त निविदा पत्रकांपैकी त्या त्या विकास कामांचे गुत्तेदरांनी निविदा पत्रकात नमूद केलेले दर अंदाज पत्रकीय दरापेक्षा जास्त किती होते. अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी किती होते. निविदा पुन्हा मागविल्यानंतर मा. आयुक्तांनी त्या कामाचे कोणत्या दराचे दरपत्रकास मंजुरी दिली. कोणकोणत्या विकास कामांच्या निवदा मा. आयुक्तांचे आदेशानुसार पुनहा मागविण्यात आल्या. याबाबत विकास कामाचे नांव, अंदाजपत्रकीय रक्कम, भागाचे नांव. इ. बाबत विहित आकडेवारीसह सविस्तर माहिती सभागृहात सादर करण्यात यावी.

**उत्तर :** **मुख्यलेखाधिकारी :** स.स.श्री. चंद्रशेखर जैस्वाल यांनी विविध कामाच्या निवदा बाबत विचारलेली माहिती संबंधित विभाग प्रमुखांकडून प्राप्त होऊ शकेल, करिता माहितीस्तव
कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा जलनिस:सारण)

**फेर निविदा मागविण्यात आलेल्या कामाची माहिती.**

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदेतील रक्कम | पहिल्या वेळी प्राप्त निविदा | सर्वात कमी दर | फेर निविदा मागविण्याचे कारण | दुसऱ्या वेळेस प्राप्त निविदा | सर्वात कमी दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिल्कमिल कॉ. सुकडी कारखाना ते जिनियण इंग्लीश शाळेपर्यंतच्या भागात १०० ते १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिणी टाकणे | १,९७,३५३/- | २ | ४.१०% जास्त | दर जास्तीचे असल्यामुळे | ३ | अं.प.दर | ५% कमी या दराने मान्यता देण्यात आली २% दाखल करण्याचे पत्र ठेकेदारास देण्यात आले |
| २. | सादातनगर येथे १०० व १५०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिणी टाकणे. | ३,६७,१७६/- | २ | ४% जास्त | दर जास्तीचे असल्यामुळे | ३ | अं.प.दर | ५% कमी या दराने मान्यता देण्यात आली. २% दाखल करण्याचे पत्र ठेकेदारास देण्यात आले |
| ३. | रेंगटीपुरा भागात १०० व १५०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिणी टाकणे. | १,६७,२८५/- | २ | १५% जास्त | --//-- | १ | २% जास्त | संचिका कार्यवाही अंतर्गत. |
| ४. | जिन्सी मुख्य रस्त्यात २५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणे | ३,३४,२५२/- | २ | १५% जास्त | --//-- | १ | ५% जास्त | ठेकेदारास दरपृथ:करण दाखल करण्याचे पत्र देण्यात आले. |
| ५. | रेंगटीपुरा गवळीपुरा जिन्सी रोड येथील १५० व २५० मी.मी. आर. सी. सी. पाईप अपुर्टींग करणे | ९२,५९०/- | २ | ०.०२% कमी | स्पर्धात्मक दर असल्यामुळे | ३ | २.०२% कमी | २.०२% कमी दराची निविदा स्किारण्यात आली. |
| ६. | चौराह येथे रामचंद्र तेलभांडार लगतच्या गल्लीत २२५ मी.मी. व्यासाची जलनि:सारण वाहिनी टाकणे. | ५२,२७४/- | ३ | ०.०१% कमी | --//-- | २ | २% कमी | २% कमी दराची निविदा स्विकारण्यात आली. |
| ७. | देखभाल दुरुस्ती पा.पु. योजना जायकवाडी नक्षत्रवाडी पंपगृह येथील मेन पॉलन दुरुस्ती करणे. | २,२०,७२३/- | ३ | अं.प. दरोन निविदा नव्हते | अ.अप. दराची निविदा ५% दर कमी करून मंजूर केली. त्यामुळे सदर गुत्तेदार काम करण्यास तयार नव्हते. | ३ | १५% कमी | दर कमी करण्यास गुत्तेदारास विचारणा त्यानुसार सदर गुत्तेदारास १०% जास्त दराने करण्यास तयार आहे. निविदा मंजूर बाबत कार्यवाही चालू आहे. |

**अतिरिक्त शहर अभियंता :**

**सन २००१-२००२ या आर्थिक वर्षात फेरनिविदा मागविण्यात आलेल्या कामाबाबतची माहिती.**

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदेतील रक्कम | पहिल्या वेळी प्राप्त झालेले दर | फेर निविदा मागविण्याचे कारण | फेर निविदा मागविल्यानंतर प्राप्त झालेले दर | फेर निविदा नंतर मा. आयुक्तांनी मंजूर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सब्जीमंडी येथे श्री. नुर मोहंमद यांच्या घरापासून शिवाजी हायस्कूल रस्त्यावरील अरुंद गल्लीमध्ये आर.सी.सी. प्रीकास्ट पॅनल टाकणे | १,३६,२५०=०० | प्राप्त चार निविदाधारकांचे कागदपत्राची पूर्तता न केल्याने एकही निविदापत्रक उघडण्यात आले नाही. | निविदापत्रके न उघडल्यामुळे फेरनिविदा मागविण्यात आल्या | सध्या फेर निविदा मागविल्या आहेत अद्याप निविदापत्रके प्राप्त झाली नाहीत. | |
| २. | जाधवमंडी व लक्कड मंडानाईकवाडा अंतर्गत नाल्यामध्ये कॉंक्रिट करणे. | १,४०,५७७=०० | २% कमी दर | एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे फेर निविदा मागविण्यात आल्या | -//- | |
| ३. | प्रशासकीय इमारत टप्पा क्र. ३ साठी लिफ्ट बसविणे. | १०,२५,००=०० | फक्त एकच निविदा प्राप्त झाली. कागदपत्राची पूर्तता न केल्यामुळे निविदा पत्रक उघडण्यात आले नाही. | निविदापत्रके न उघडल्यामुळे फेर निविदा मागविण्यात आल्या. | -//- | |
| ४. | न्यु श्रेयनगर सर्वे नं. ४३ सी.टी.ए. नं. १५८५१ भाग अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे | १,०१,४१२=०० | ३% जास्त दर | स्पर्धात्मक दर नसल्याने फेर निविदा मागविण्यता आल्या | १५% जास्त दराची निविदा प्राप्त झाली आहे. परंतु दराचे वाटाघाटी अंती सदरील काम संबंधित कंत्राटदार ५% कमी दराने करून देण्यास तयार आहे. | मा. आयुक्त यांची अद्याप सदरील दरास मान्यता प्राप्त झालेली नाही. संचिका निविदा मंजुरीच्या प्रक्रियेत आहे. |

**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद**
**यांत्रिकी विभाग**
**फेरनिविदा बाबतची माहिती**

| अ. क्र. | कामाचे नांव स्वरुप | अंदाजपत्रकीय रक्कम | प्रथम निविदेतील दर | फेर निविदेतील दर | फेर निविदेचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १. | ॲम्बेसिडर फार सर्व मॉडेलासाठी स्पेअरपाठी पुरवठा करणे. | २.०० लाख | -- | प्राईजपेक्षा २३% ने जास्त सी.एम.एस.टी / सि.एस.टी ट्रान्सपोर्टेशन जकात | एकच निविदा प्राप्त झाली होती निविदा धारकांनी इनकम टॅक्स, बेबाकी प्रमाणपत्र न जोडल्यामुळे निविदा उघडण्यात आली नाही त्यामुळे फेरनिविदा मागविण्यात आली. परत एकच निविदा आली व निविदा मंजूर झाली आहे. |
| २. | ॲम्बेसिडर कार सर्व दुरुस्तीची | १.०० लाख | -- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% ने कमी | |
| ३. | मारुती ८०० मारुती व्हॅन / जीप्सी/ इस्टीमसाठी स्पेअरपार्ट पुरवठा करणे व दुरुस्ती करणे | २.०० लाख | - | वाटाघाटी नंतरचे दर स्पेअरपार्ट पुरवठा कंपनी प्राईज लिफ्ट पेक्षा १०% ने जास्त जॉबवर्कसाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% ने कमी. | एकच निविदा प्राप्त परंतु इनकम टॅक्स बेबाकी प्रमाणपत्राची प्रत मुदती बाहेरची असल्यामुळे निविदा उघडली नाही. करिता निविदा मागविण्यात आली फेर निविदेत एक निविदा प्राप्त झाली असून वाटाघाटीनंतर मंजुरीसाठी पाठविण्यात आली आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | मंहिद्रा ॲन्ड महिंद्रा जीपच्याविविध मॉडेलसाठी स्पेअरपार्ट पुरवठा करणे व दुरुस्ती करणे बाबत. | २.०० लाख | -- | प्राप्त दर कंपनी प्राईज लिस्ट १२% | एकच निविदा प्राप्त परंतु दोन पाकिटे पध्दतन अंमलात न आणल्यामुळे उघडली नाही करिता फरे निविदा मागविण्यात आली. फरे निविदेत दोन निविदा प्राप्त असून वाटाघाटीसाठी संचिका प्राप्त आहे. |
| ५. | विविध प्रकारच्या वाहनांना लागणाऱ्या बॅटरीचा पुरवठा करणे. | २.०० | -- | एम.आर.पी. प्राईज लिस्ट पेक्षा १% ने कमी | एकच प्रकारच्या बॅटरी तीन ते चार दर प्राप्त मुहे दराची तुलना करता येत नव्हती करिता फेर निविदा मागविण्यात आली. फेर निविदेत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्यापैकी एक एनकम टॅक्स, बेबाकी प्रमाणपत्रामुळे उघडण्यात आली नाही व दुसरी निविदेस अंतिम मंजुरी मिळालेली नाही. |
| ६. | सर्व प्रकारच्या वाहनांना लागणारे ट्युब टायर खरेदी करणे बाबत. | ८.०० | -- | -- | एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. पैकी एक निविदा इनकम टॅक्स प्रमाणपत्र नसल्यामुहे उघडण्यात आली. स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासठी फेर निविदा काढण्यात आली व फेर निविदा एकच निवदा प्राप्त झाली असून आयुक्त यांनी वाटाघाटीसाठी बोलावून दरपत्रके गोळा करण्याबाबत सूचना दिली आहे. |

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम रु. | प्रथम वेळी प्राप्त झालेले दर | फेर निविदा मागविण्याचे कारणे | फेर निविदा नंतर प्राप्त झालेले दर | मा. आयुक्त यांनी मंजूर दिलेले दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मो. किराडपुरा (स्लम) येथे जुना आर.सी.सी. पुल तोडून नविन पुल तयार करणे. | ६४,६२०/- | अ.प. दरापेक्षा ४.३% जास्त अं.प. दरापेक्षा ४.८% जास्त दराने | स्पर्धात्मक दर प्राप्त न झाल्यामुळे | १) अं.प. दरापेक्षा २% कमी. २) अं.प. दरापेक्षा १% कमी. | अं.प. दरापेक्षा २% कमी दराने. | -- |
| २. | मो. फुलेनगर हर्सूल येथे (स्लम) येथे दगडी गटार बांधणे | ५७५२७/- | अं.प. दरापेक्षा | स्पर्धात्मक दर प्राप्त झालेले नाही. | फेर निविदाची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. | | एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत तथा २ नि. मध्ये योगय प्रक्रिया न आल्यामुळे फेर निविदा प्राप्त झाली. |
| ३ | चिकलठाणा (स्लम) उर्वरित सिमेंट रस्ते | ५,५६,४०९/- | एकूण ४ नि. प्राप्त झाल्या. १) अ.प. दरापेक्षा ३% जास्त. २) अ.प. दरापेक्षा २% जास्त. ३) अ.प. दरापेक्षा ०.२५% जास्त. ४) नि. योग्य पध्दतीने सादर केलेली नाही. | स्पर्धातम दर प्राप्त झालेले नाही. | फेर नि. प्रक्रिया अद्याप पूर्ण झाली नाही. | -- | -- |
| ४ | काश्मिरनगर कांचनवाडी येथे अर्धा मो. गटार बांधणे | ६४,०२७३/- | एकूण प्राप्त २ निविदा १) अ.प. दरान २) अ.प. दरापेक्षा २% कमी दराने | स्पर्धातम दर प्राप्त झालेले नाही. | फेर नि. निश्चीत प्रक्रिया पूर्ण झाली नाही. | | |

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | प्राप्त निविदा | फेर निविदा मागविण्याचे कारणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | जिन्सी प्रा.शाळा विविध दुरुस्ती व रंगकाम | ५३,३६०=०० | १) एस.ए.नवाब २४% कमी (२) संतोश पाटील १७ १/२% कमी (३) योगेश अग्रवाल ३२% कमी (४) गुलाम अझहर २७.७८% कमी (५) मिर्झा एकबाल अली ३१.७८६% कमी (६) महेश कालणी २७.१८% कमी (७) कुलवंतसिंग १८% कमी (८) स. समीरोदिन ३५.०७% कमी **फेरनिविदा** १) श्री. असलम पटेल १५.८५% कमी २) राणा कर्न्टक्शन निविदा ३) एम.सी. गोठेकर १०% कमी दराने | ३७.७ कमी दराची निविदा होती त्याचे दर विश्लेषण मागविले असतांना दाखल केलेल्या बाबनिहाय दर विश्लेषण असमाधानकारक असल्याने. | १५.८५% कमी दराची निविदा मान्यता प्राप्त झालेली आहे. |
| २. | लोटा कारंजा मटन मार्केट तोडून व्यापार संकूल बांधणे | १६,१३,५८०=०० | (१) शमीन कमाल १६.५१% कमी (२) एस. एम. रज्जाक १०.५% जास्त (३) सुजात अली हश्मी ८% जास्त. **फेरनिविदा** १) मो. सिराजोदिन सिद्दीकी ४.१३% कमी २) परफेक्ट कन्ट्रक्शन निविदा उघडण्यात आली नाही. | श्री.शमीम कमाल यांची १६.५१% कमी दराची निविदा स्वीकार केलेली ह्रेती परंतु सदर गुत्तेदरांनी काम करण्यास नकार दिल्याने गुत्तेदारास काळ्या यादीत टाकून अनामत रक्कम जप्त करण्यात आली आहे. | प्रकरणे स्थायी समितीमध्ये विचारार्थ |

**प्रश्न क्र. ६ :-** महानगरपालिका अस्थापनेवरील विधी सल्लागार हे पद किती वर्षापासून रिक्त आहे. विधी विभागाचे कामकाज कोणत्या कोणत्या पदावरील अधिकाऱ्यामार्फत पूर्ण करून घेण्यात येते. विधी सल्लागार यांची नियुक्ती आता पर्यंत का करण्यात आली नाही. विधी सल्लागार हे पद केंव्हा भरणार आहोत? हे पद कोणत्या पध्दतीने भरणार आहात? विधी सल्लगार हे पद वर्षानुवर्षा पासून रिक्त ठेवणे बाबत प्रशासनाचा हेतू काय? अत्यंत महत्वाचा विधी विभाग विधी सल्लागारा अभावी अजून किती वर्ष अपेक्षित राहणार? या बाबत सविस्तर माहिती आपले अभिप्रायासह सभगृहास सादर करण्यात यावी.

**उत्तर :** १) विधी सल्लागार हे पद सन १९९८ पासून रिक्त आहे. (२) विधी विभागाचे कामकाज हे विधी सहाय्यक यांच्या मार्फत त्यांना अतिरिक्त कार्यभार देऊन पार पाडण्यात येणे (३) विधी सल्लागार हे पद भरणे बाबत कार्यवाही सन १९९८ मध्येच प्रस्तावति करण्यात आलेली आहे. त्यावेळी वृत्तपत्रात जाहिरात देऊन पात्र उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आले. सदर अर्जांची छाननी करून सेवा भरती नियमातील तरतूदीनुसार पात्र उमेदवारांना मुलाखतीस बोलवण्यात आले. सदर उमेदवारांची मुलाखती घेण्यात आली. सर्वसाधारण मुल्यमापनानुसार व गुणवत्तेनुसार उमेदवारांचे एकूण मुल्यमापन केले असता विधी सल्लागार पदाचे कामाचे स्वरुप पाहता व या पदासाठी सक्षम उमेवादवार सध्याच्या तरतुदीनुसार उपलब्ध या वर्ग-१ च्या संवर्गातील दिसून आलेले नाही.

या सर्व बाबीचा सर्वांगीन विचार करण्यात येऊन विधी सल्लागाराची नेमणू करण्याबाबत सेवा भरती नियमात दर्शविलेल्या अटी व तरतुदी अपुऱ्या असल्यामुळे वयाची अट ४० वर्षापर्यंत वाढवून व अनुभवाची अट ७ वषापर्यंत वाढविण्यासाठी सेवा भरती नियमात दुरुस्ती करण्याचे ठरल्याने तसा दुरुस्तीचा प्रस्ताव दिनांक १८/०२/१९९९ रोजीच्या सर्वसाधारण सभेत सादर करण्यात आला व त्यास मंजुरीही प्राप्त झाली. (विषय क्र.२३२/३)

त्यानुसार वृत्तपत्रात जाहीर सूचना देण्यात येऊन आक्षेप सूचना मागविण्यात आल्या. मुदीतीत एकही आक्षेप सूचना प्राप्त झालेली नसल्याने तसा प्रस्ताव शासनाकडे दिनांक ३१-०७-१९९९ अन्वये पाठविण्यात आलेला आहे. त्या अद्याप पावेतो शासनाकडून मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरीही शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून सदर पद भरणेबाबत पुन्हा सदर पद भरणेबाबत पुन्हा कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली. प्रकरण कार्यवाही अंतर्गत असतांना महानगरपालिकेच्या निवडणुकीची आचारसंहिता व तद्नंतर शासनाने पद भरण्यावर लावलेली बंदी यामुळे सदर पद भरण्यात आलेली नाही. पद भरण्यात परवानगी देणेचा प्रस्ताव सन २००० मध्ये शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. त्या अद्याप पावेतो मान्याता प्राप्त झालेली नाही, त्यात शासनाकडून मान्यता प्राप्त होताच सदर पद तातडीने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**संवाद :**

श्री. चंद्रशेखर जैस्वाल : विधी सल्लागार पद भरण्याबाबत माहिती विचारली ३ उत्तर समाधान कारक नाही. या पदाची जागा रिक्त आहे. एकदा शासनाची मंजुरी घेतली पुन्हा मंजुरी घेण्याची का आवश्यकता पडत आहे.

उप-आयुक्त (म.) विधी सल्लागार पदासाठी जी आर्हता होती त्या या सभागृहाने नियमात बदल केलेल व तसा ठराव पारीत केला प्रस्ताव शासन मंजुरीसाठी पाठवला आहे. शासन अद्याप मान्यता दिली.

मा. आयुक्त : या पदावर भरती करण्यासंदर्भात सभागृहाने सेवाभरती नियमावलीत जे बदल केले त्या ठरावास शासनाने अद्याप मान्यता दिली नाही. तसेच आता पदे भरण्यास शासनाची बंदी आहे. आणि हे पद भरण्यासाठी शासनाची पदवानगी घ्यावी लागेल. त्यानुसारच कार्यवाही होईल.

(समुहक्रमांक-४)

**प्रश्न क्रमांक ७ :** मिसरवाडी हा भाग स्लम म्हणून घोषित करण्यात आलेला आहे का? घोषित झाला असल्यास केंव्हा घोषित झाले त्यांच्या राजपत्राचा दिनांक काय आहे. मिसरवाडी घोषित केली नसल्याने का घोषित झाली नाही. प्रशासनाने त्यांचे पत्र क्र. प्रकल्प ०६/२००१ दिनांक ०५/०९/२००१ अनुसार त्वरित सर्व्हे करण्यांत येईल व घोषित करण्याकरिता संचिका सादर करण्यात येईल. असे कळविण्यांत आले आहे. सर्व्हेक्षण पूर्ण झाले आहे का? केंव्हा पूर्ण झाले. झाले नसल्यास त्यांचे काय कारणे आहेत.

**उत्तर :** १) मिसारवाडी हा भाग स्लम म्हणून घोषित करण्यांत आलेला नाही.
२) राजपत्रात प्रसिध्दीचा प्रश्न उद्भवत नाही.
३) मिसरवाडी वसाहतीचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

**संवाद :**

श्री. रगडे भगवान : प्रश्न दिल्यानुसार प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली माहिती द्यावी.

प्रकल्प संचालक : मिसारवाडी हा भाग स्लम घोषित करावा असा ठरावा पास झालेला होता. हा नोडेव्हलपमेंट झोन मध्ये येत असल्याने स्लम घोषित नाही. दरम्यान अनाधिकृत वसाहतीचे सर्व्हेक्षणात मिसारवाडीचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे.

श्री. रगडे भगवान : १५००० लोकसंख्या मिसारवाडी भागात येतात या लोकांना विविध समस्यांना मुकावे लागत आहे. सर्वसाधारण सभेने ठराव घेतल्यानंतर प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली. हा भाग स्लम घोषित करण्या संदर्भात मी शासनाकडे मागणी केली, त्याची प्रत आयुक्तांना दिलेली होती. अद्याप कार्यवाही केलेली नाही.

प्रकल्प संचालक : मिसारवाडी हा भाग स्लम घोषित नाही. प्रशासनाचे मत न घेता अशासकीय प्रस्ताव सभगृहात मंजूर झालेला आहे. या संबंधी नगररचना विभागाकडून माहिती घेतली असता हा भाग नोडेव्हलपमेंट झोनमध्ये असल्याने स्लम घोषित नाही. १९७१ च्या कायद्यानुसार राजपत्रात घेण्यासाठी व स्लम घोषित केल्यास आक्षेप मागवावे लागते कुणाचा आक्षेप नसेल तर राजपत्रात त्यांची नोंद होते. व तो भाग स्लम घोषित होतो.

मा. महापौर : यासंबंधी नियमाने कार्यवाही करण्यात यावी.

श्री. रगडे भगवान : मला जे उत्तर प्राप्त झाले ते असे की, मिसरवाडी हा भाग स्लम घोषित नाही. घोषित झाला असल्यास केंव्हा घोषित झाला त्याबद्दल उत्तर दिले. लागू नाही, मिसरवाडी घोषित नसल्यास का घोषित नाही व प्रशासनाने त्यांचे पत्र क्र. प्रकल्प /६/२००१ दि.०५/३/२००१ यानुसार सर्व्हे करण्यांत येईल व घोषित करण्याकरिता संचिका सादर केली जाईल असे कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार सर्व्हेक्षणाचे काम केलेले आहे असे उत्तर दिले.

मा. महापौर : महानगरपालिका शासन निर्देशानुसार अनधिकृत वसाहतींचा सर्व्हे झालेला आहे. शासनाकडे तसा रिपोर्ट पाठवून मंजुरी घेतल्यानंतर नियमाने पुढील कार्यवाही करता येईल.

**प्रश्न क्रमांक -८ :** सर्वसाधारण सभा ठराव क्र. ८०/६ दि. ३०/९/२००० रोजी मिसारवाडी येथे अस्तित्वातील झोपडपट्टीवरील आरक्षण उठविणे व हि वस्ती स्लम म्हणून घोषित करणे ठराव मंजूर झालेला आहे. त्यावर काय कार्यवाही झली नसल्यास त्याचे काय कारणे आहे.

**उत्तर :** औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द १९९१ नुसार मिसारवाडी हि वस्ती आरक्षणामध्ये व ना विकास क्षेत्रामध्ये येते. स्लम घोषित करण्यासाठी मिसरवाडीच्या कोणत्या भागांत झोपडपट्टी वस्ती आहे तसेच त्याच्या सिमा हद्दि व व्याप् क्षेत्र किती आहे हे प्रथम कायम करणे आवश्यक आहे. त्याकरिता आवश्यका तो सर्व्हे प्रकल्प विभागाकडून होईल व त्यांच्या सर्व्हेक्षणानुसार देणाऱ्या क्षेत्र व सिमा लक्षात घेऊन विकास योजनेनुसार नाविकास क्षेत्र व आरक्षणे वगळून निवासी क्षेत्राचे वापरास्तव आवश्यक ती करिकोळ फेरबदलाची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिव नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये करावी लागेल. प्रथमतः सदर घोष्झित करावयाच्या मिसरवाडी स्लमचा हद्दि व क्षेत्र कायम होणे आवश्यक आहे. यानंतर प्रशासकीय मान्यता घेऊन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**संवाद :**

श्री. रगडे भगवान : प्रश्न क्र. २ च्या बाबतीत नगररचना विभागाकडून कार्यवाही होते असे उत्तर दिलेले आहे ते कितपत योग्य आहे. ठराव क्र. ८०/६ नुसार मिसारवाडी येथे अस्तित्वातील झोपडपट्टीवरील आरक्षण उठविणे व ही वस्ती स्लम म्हणून घोषित करणे बाबत ठराव पास केला. या बाबतचा कार्यवाही नगररचना विभागाकडून होते असे उत्तर मिळाले.

प्रकल्प संचालक : या भागातील जागेचे मोजमाप करावे लागेल. ते रितसर होण्यासाठी नगररचना विभागामार्फत कार्यवाही होते स्लम घोषित करण्यासाठी पुन्हा शासनाची मंजुरी घ्यावी लागेल त्याशिवाय सुविधा देता येत नाही. मिसारवाडी भागाची ३९५४ लोकसंख्या असल्याबाबत गुंठेवारीत सर्व्हेमध्ये नोंद घेऊन शासनाकडे पाठवले ाहे. हा भाग नोडेव्हलपमेंट झोनमध्ये येत असल्याने स्लम घोषित करण्या संदर्भात नगररचना विभागामार्फत कार्यवाही होणे गरजेचे आहे.

श्री. काशिनाथ कोकाटे : पुढील सभेत नगररचना विभागामार्फत तसा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करावा. योग्य निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करता येईल.

प्रकल्प संचालक : आता सध्या नगररचना विभागाकडून तसा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवणे गरजेचे आहे. हा भाग नो डेव्हलपमेंट झोन मध्ये येतो असे या विभागाकडून संचिकेवर रिमार्क केलेला आहे.

श्री. रगडे भगवान : हा प्रश्न या विभागाशी ंसबंधित नाही. प्रकल्प विभागाशी संबंधिअ हे. असे उत्तर नगररचना विभागाकडून सुध्दा आलेले आहे. दिड वर्षापासून मी नेहमी हा प्रश्न उपस्थित करित आहे. केंव्हा कार्यवाही करणार व या शहराचा विकास करण्यासाठी असे प्रश्न सोडवणे गरजेचे आहे. आराखड्या मधून आरक्षण उठवण्याबाबत ठराव मंजूर केला स्लम घोषित करण्या बाबतचा ठराव घेतला वृत्तपत्रात बातम्या झळकल्या आता कार्यवाही करायचे सोडून अधिकारी एकमेकावर काम टाकून देत आहे. व सभागृहाचा वेळ वाया घालत आहे. हे योग्य नाही.

मा. महापौर : हा भाग स्लम घोषित करणे् व दुसऱ्या प्रश्नामधून असे विचारण्यात आले की, ह्या भागातील आरक्षण उठविणे बाबत प्रस्ताव मंजूर झालेला. ताबडतोब शासनाकडून कार्यवाही करण्यासाठी उठविणे बाबत प्रस्ताव मंजूर झालेला ताबडतोब शासनाकडे पाठविण्यात यावा.

श्री. रगडे भगवान : प्रस्ताव मंजूर होऊन एक दिड वर्ष झाले अद्याप का कार्यवाही झाली नाही. शासनाकडून काग्रवाही करण्यासठी एका अधिकाऱ्याची नियुकती करण्यांत यावी.

मा. महापौर : मागे काय झाले का कार्यवाही झाली नाही याचे उत्तर मी देऊ शकणार नाही. मिसारवाडीचा प्रश्न लवकरात लवकर? महिण्याच्या आता कसा सोडविता येईल यासाठी आपण सर्वच उत्पन्न करून कार्यवाही केली जाईल. नगररचना विभागाने तसा. प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावा तसेच मिसारवाडी येथील जागेची हद्द निश्चित करण्यासाठी प्रकल्प संचालक यांनी कार्यवाही करावी व तसा प्रस्ताव पुढील सर्वसाधारण सभेत सादर करावा.

त्यावेळी सभा १५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते (वेळ ३.३० वाजात सभेला सुरुवात ४.१० वाजता)

(समुहक्रमांक-५)
अंबादास दानवे : (दि. ६/११/२००१)

**प्रश्न क्रमांक ९ :** (क) महानगरपालिकेच्या सेवाभरती नियमामध्ये दुरुस्ती किंवा बदल करतांना अधिकारी, कर्मचारी, कामगार यांचे आक्षेप किंवा म्हणणे नियमाप्रमाणे मागवावे लागतात काय?

**उत्तर :** महानगरपालिकेच्या सेवा भरती नियमामध्ये दुरुस्ती किंवा बदल करतांना अधिकारी / कर्मचारी / कामगार व इतरांचे आक्षेप मागवावे लागतात. (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६०)

**प्रश्न क्रमांक ९ :** (ख) आतापर्यंत सेवाभरती नियमावलीमध्ये कोणती व कशी दुरुस्ती किंवा बदल केलेले आहेत? यास सर्वसाधारण सभा मान्यता घेतलेली आहे काय? असल्यास कोणत्या सभेत? दिनांक व ठराव क्रमांक उल्लेखीत करावा.

**उत्तर :** सेवा भरती नियमात खालील प्रमाणे दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | पदांचे नांव | दुरुस्ती | सर्वसाधारण सभेचा ठराव व दिनांक |
|---|---|---|---|
| १ | उप आयुक्त | नेमणूकीच्या पात्रतेमध्ये दुरुस्ती | ठराव क्र. ११४/२ दि. १७/१०/९९ |
| २ | कार्यकारी अभियंता | अनुभवाच्या अर्हतेमध्ये दुरुस्ती | ठराव क्र. ३ दि. १८/०२/९९ |
| ३ | विधी सल्लागार | अर्हतेमध्ये वयाची व अनुभवाची अट वाढविणे | ठराव क्र. २३२/३ दि. १८/०२/९९ |
| ४ | सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी | जेष्ठता गुणोत्तर ऐवजी जेष्ठत व गुणवत्ता अशी दुरुस्ती | ठराव क्र. ५२१/१ दि. २०/१०/२००१ |

**प्रश्न क्रमांक ९ :** (ग) इ.स. १९९७ मध्ये कार्यकारी अभियंता हे पद निर्माण करून भरतांना १० वर्ष अनुभवाऐवजी ७ वर्षे अनुभव अशा पकारच्या अर्हतेत दुरुस्ती किंवा बदल केला गेला होता काय? सदर दुरुस्ती करतांना कर्मचारी, अधिकारी, कामगार यांचे आक्षेप व सूचना मागविण्यांत आल्या होते काय? मागविले असल्यास कोणतया पत्रानुसार १ पत्राची सत्यप्रत देण्यात यावी? सूचना किंवा अक्षेप सदर पद भरतांना मागविलेले नसल्यास, त्या सेवा भरती नियमातील दुरुस्तीस किंवा बदलास वैधता आहे काय? असल्यास कोणत्या नियमाने? नसल्यास, तया सेवा भरती नियमातील दुरुस्ती करता येते काय? अक्षेप व सूचना न मागविता निर्णयाची अंमलबजावणी करणारे सक्षम अधिकारी कोण आहेत? अक्षेप व सूचना न मागविता सेवा भरती नियमातील निर्णयाची अंमलबजावणी करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्याने आपल्या अधिकाराचा गैरवापर केला आहे काय? या गैरवापरामुळे अन्य अधिकारी, कर्मचारी व कामगारावर अन्याय झालेला आहे काय?

**उत्तर :** सन १९९७ मध्ये कार्यकारी अभियंता या पदावर पदोन्नतीसाठी उप अभियंता या संवर्गात स्थापत्या अभियांत्रिकी मधील पदवी आणि उप अभियंता म्हणून पाच वर्षाचा अनुभव किंवा स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदविका आणि उप अभियंता म्हणून किमान सात वर्षाचा अनुभव अशी अर्हता दर्शविणारी दुरुस्ती करणेबाबतचा प्रस्तावास दि. १९/०६/९५ रोजीच्या सर्वसाधारण सभेने विषय क्र. ३ अन्वये मंजुरी दिलेली आहे. सदर विषय मंजूर झाल्यास अधिकारी / कर्मचारी / कामगारांचे अक्षेप सूचना मागविल्या नव्हत्या परंतु सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाकडून वरील मुद्दावर माहिती मागविली

असता सेवा भरती नियमात दुरुस्ती करण्याबाबत समितीचे गठण करण्यात आलेले आहे. समितीच्यास अहवालांनतर हरकती / सूचना मागविण्याबाबत कार्यवाही करण्यांत येणार होती समितीचा निर्णय अप्राप्त असल्याने प्रकरण सद्य:स्थितीत प्रलंबित आहे.

**प्रश्न क्रमांक -१०** (दि. १७/११/२००१) : औरंगाबाद महानगरपालिका हद्दित एकूण किती व कोणत्या ठिकाणावर कोणकोणते पेट्रोल व डिझेल पंप आहेत? सर्व पंप धारकांनी अधिकृतपणे महानगरपालिकेची परवानगी घेतलेली आहे काय? असल्यास कधी परवानगी क्रमांक दिनांक व इ.स. सह उल्लेखित करावा. म.प्रा. व न. र. अध्िानियम १९६६ "व विकास नियंत्रण नियमावली महानगरपालिका औरंगाबाद १९८२०" यास अधिकन राहून सद्य सिथतीतील पंप कार्यरत आहे काय? विकास नियंत्रण नियमावलीतील सद बाबींसाठी कोणकोणत्या तरतुदी आहेत खुलासा करावा. सदर तरतुदीचे पालन केलेल नसल्यास आपण काय कार्यवाही करणार आहोत? किती कालावधीत कार्यवाही कराल सविस्तर अभिप्रायासह खुलासा करावा.

**उत्तर :** सहाय्यक संचालक नगर रचना :

शहरातील पेट्रोल पंप डिझेल पंप हे बऱ्याच वर्षापूर्वीचे असून अत्यंत जुने आहेत. त्यामुळे आपणांस पाहिजे असलेली माहिती अभिलेख तपासून व प्राप्त करून घेऊन द्यावी लागेल. त्यामुळे सदरील कामास बराच वेळ लागणार आहे.

करिता सदरील माहिती प्राप्त करून २० दिवसात देण्यात येईल करिता आपले प्रश्नाचे उत्तरी कळविण्यात येत आहे.

<u>उप आयुक्त (म.) (अग्निशमन अधिकारी) :</u>

औरंगाबाद महानगरपालिका हद्दित व एम्,आय.डी.सी. एरियात एकूण २६ पेट्रोल व डिझेल पप आहेत. त्यासाठी मुंबई प्रांतिम महानगरपालिको अधिनियम ३७६, व बांधकाम विकास नियंत्रण नियमावली क्र. ६,२,६ १ / ६,५,६,१ अन्वये, पेट्रोल व डिझेल पंपसाठी "अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र" घेणे आवश्यक आहे व तसे बंधनकारक करण्यांत आलेले आहे. पेट्रोल व डिझेल पंप धारकांनी "अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र" घेणेसाठी सर्व संबंधितांना दि. ०४-१०-२००१ व १२-११-२००१ रोजी, अशा दोन नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत यानंतरही संबंधितांनी याबाबत काही पूर्तता न केल्यास तिसरी नोटीस पाठविण्यात येईल व पूर्तता न करणा४या पंप धारकांचा परवाना रद्द करणेंसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे शिफारस करण्यांत येईल (२६ पेट्रोल व डिझेल पंप खालीलप्रमाणे.)

(१) चुन्नीलाला आसाराम ॲड कू. अदालत रोड, औरंगाबाद (२) सतीश मोटर्स, अदालत रोड, औरंगाबाद (३) एन. ए. प्रिन्टर बाबा पेट्रोल पंप औरंगाबाद (४) हिंद, सुदर, क्रांती चौक, औरंगाबाद (५) राज ॲटोमोबाईल जालना रोड, औरंगाबाद (६) कैलास मोटार्स, जालना रोड, औरंगाबाद (७) गुरुनानक ॲटोमोबाईल्स, जालना रोड, औरंगाबाद (८) भवानी पेट्रोलपंप, एपीआय कॉर्नर, जालना रोड, औरंगाबाद (९) सरदारसिंग पेट्रोलपंप,

जालना रोड, औरंगाबाद (१०) को.को. हर्सूल, हर्सूल, औरंगाबाद (११) सुपर ॲटोमोबाईल्स, चिकलठाणा, औरंगाबाद (१२) जे. आर. राणा, पडेगाव औरंगाबाद (१३) गिरिजा समर्थ, शरणापुर फाटा, औरंगाबाद (१४) अशोक ब्रदर्स, शरणापुर फाटा, औरंगाबाद (१५) एन. ए. प्रिंटर, शहगंज, औरंगाबाद (१६) एन.ए. प्रिंटर दिल्लीगेट, औरंगाबाद (१७) युनिफ ऑटोमोबाईल्स, उस्मानुपरा, औरंगाबाद (१८) सी.टी.पी. रेल्वे स्टेशन, औरंगाबाद (१९) ए.पी. पटेल, शहगंज, औरंगाबाद (२०) शिवदत्त ॲटोमोबाईल्स, झाल्टा, औरंगाबाद (२१) सुपर ॲटोमोबाईल्स, बाळापुर, औरंगाबाद (२२) साई ॲटो सर्कीट, वाळुज, औरंगाबाद (२३) अरिहंत ॲटो केअर, तीसगांव औरंगाबाद (२४) राजपुत ॲन्ड संन्स पंढरपुर, औरगाबाद (२५) प्रशांत ॲटोमोबाईल्स, पंढरपुर, औरंगाबाद (२६) कैलास एजन्सी, सुंदरवाडी, औरंगाबाद.

करिता आपल्या माहितीस्तव सादर.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी**

मा. नगरसेवक श्री. अंबादासरावजी दानवे यांनी सर्वसाधारण सभेसाठी विचारलेल्या प्रश्न क्र. २ बाबत आपणांस कळविण्यात येते की, हा विषय आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे अक्षतेला नाही. आरोग्य वै.कीय अधिकाऱ्याकडून पेट्रोल व डिझेल पंपाना कुठलेही परवाने देण्यात येत नाही व म.प्रा.व.न.र अधिनियम १९६६ व विकास नियंत्रण नियमावली मनपा १९८२ या बाबतची कार्यवाही सहाय्यक नगररचना विभागाकडून होते.

(प्रश्न समुह क्रमांक -६)
मा. जबिंदा दलबिरसिंग (दि. ०८/११/२००१)

**प्रश्न क्र.११ :** विषय :- माहे ऑक्टोबर २००१ च्या सर्वसाधारण सभेसाठी विचारलेल्या प्रश्नाचा योग्य खुलासा न मिळाल्य बाबत संदर्भ : पत्र दि. १६/१०/२००१ माहे ऑक्टोंबर २००१ च्या सर्वसाधारण सभेसाठी विचारलेल्या प्रश्नांचे मोघम उत्तर देण्यात आले.

दिनांक १९/०४/१९८३ रोजी नगरपरिषदेने घतलेल्या ठरावानुसार म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्याचे ठरले होते. परंतु दिनांक १९/०२/१९८६ च्या १०६६ ठरावानुसार १९८६ पर्यंत रेखांकनातील मोकळी जागा १५% ठेवण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसलयाने स्पष्ट होते. अशा परिस्थितीत १९८३ पासून रेखांकनातील मोकळी जागा १५% ठेवायची महानगरपालिकेची कारवाई चूक ठरते. असे वाटते त्याबद्दल स्पष्टपणे खुलासा करण्यांत यावा मला दिलेल्या उत्तरामध्ये दि. २१/१२/१९८२ च्या शासनाच्या पत्राप्रमाणे १५% जागा सोडण्यास सुरुवात करण्यात आली असे कळवले आहे. शासनाच्या त्या पत्राची अवलोकन करतांना स्पष्ट होते की महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ ची कारवाई करणे शासनाला अपेक्षित होते ती कारवाई करण्यासाठी शासनाकडे १९८६ साली ठराव क्र. १०६६ अन्वये पाठविण्यात आली त्यात शासनाने १९९२ साली १०% ठेवण्यात १५% ऐवजी मान्यता दिली मग महानगरपालिकेने दिनांक २१/१२/१९८२ च्या पत्रा प्रमाणे कारवाई केली व १५% जागा सोडण्यास सुरुवात केली. हि कारवाई पूर्णपणे

दिशाभूल करणारी आहे. येत्या सर्व साधारण सभेपूर्वी मला खुलासा द्यावा हि विनंती.

**उत्तर :** **सहाय्यक संचालक, नगररचना :**

महानगरपालिका औरंगाबाद अस्तित्वात येण्यापूर्वी सदर शहर "अ" पर्ग नगर परिषद म्हणून अस्तित्वात होते. "अ" वर्ग औरंगाबाद नगरपालिका करिता विकास योजना व विकास नियंत्रण नियमावली शासन अधिसूचना क्र. टि.पी.एस. ३०७३/४२५९/डब्ल्यु-२ दिनांक ०४/०१/१९७५ रोजी मंजूर झाली असून ती दिनांक १ मार्च १९७५ रोजी अंमलात आली होती. सदर "अ" वर्ग नगरपालिका करिता त्यावेळी उपलब्ध विकास योजना नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. १४.२ नुसार रेखाकनामध्ये (निवासी) एकूण क्षेत्राच्या १०% इतकी खुली जागा सोडण्यात येत होती.

शासन अधिसूचना क्र. ए.एम.सी/१०८२/२०७८/(आय)/युडी-२१ दिनांक ०३/१२/१९८२ पासून औरंगाबाद महानगरपालिका अस्तित्वात आली. शासन अधिसूचना क्र. टि.पी.एस/३६७८/८१४/बी-यु.डी.-५ दिनांक १६ जुलै १९८० अन्ये महानगरपालिका क्षेत्राकरिता विकास नियंत्रण नियमावली प्रमाण्िात केली. तसेच शासनाचे मोमेरेंडम क्र. टीपीएस-३०८२/४७२३(ऐ)/युडी-५ दि. २१/१२/८२ नुसार शासनाने महाराष्ट्र प्रा. व न. र. अधिनियम १९६६ कलम १५४ अन्वये महानगरपालिका क्षोत्राकरिता शासनाने वर नमूद केल्याप्रमाणे १६/०७/८० रोजी प्रमाणित केलेली विकास नियंत्रण नियमावली २१/१२/८२ पासून लागू करण्याबाबत तसेच सदर नियंत्रण नियमावली विकास योजनेत समाविष्ट करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्याबाबत शासनाने निर्देशन दिले. सदर नियंत्रण नियमावली नुसार निवासी वापर रेखांकनामध्ये नियम क्र. १३/०३/१ नुसार १५% इतकी खुली जागा सोडण्याचे निर्देश आहेत. सबब महानगरपालिका रिता असलेली विकास नियंत्रण नियमावली ही शासनाचे २१/१२/८२ चे कलम १५४ चे निर्देशनानुसार दिनांक २१/१२/८२ पासून महानगरपालिका औरंगाबाद क्षेत्राकरिता लागू झाली असल्यामुळे १९८३ पासून रेखांकनातील खुली जागा १५% ठेवण्याची महानगरपालिकेची कार्यवाही ही नियमानुसार आहे.

वर नमूद केलेल्या शासनाच्या निर्देशाप्रमाणे महानगरपालिका औरंगाबाद ठराव क्र. २१ दिनांक १९/०४/८३ अन्वये विकास नियंत्रण नियमावली करिता उकत अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये कार्यवाही करण्याबाबत निश्चित केले. तसेच ठराव क्र. १०६६ दिनांक १९/०२/८६ अन्वये विकास नियंत्रण नियमावलीला मान्यतेकरिता उक्त अधिनियमाचे कलम ३७ अन्वय मान्यता`दऊन शासनाकडे प्रस्ताव सादर करणे बाबत मंजुरी देण्यात आली.

शासन अधिसूचना क्र.टी.पी.एस/३०८०/४५४/सी.आर.५९/८८/युडी-१२ दिनांक १५/१०/१९९१ अन्वये औरंगाबाद वाढील क्षेत्राकरिता शासनाने विकास योजना व विकास नियंत्रण नियमावली मंजूर केली. ज्यामधील विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र.१३-३-१ अन्वये निवासी स्वरुपातील रेखांकनाकरिता एकूण क्षेत्राच्या १०% इतकी खुली जागा प्रस्तावित करण्यात येते.

शासनाने अधिसूचना क्र. टी.पी.एस.३०९१/१८३३/सीआर-१९५/युडी-१२ दिनांक १७/०२/१९९२ अन्वये वाढीव क्षेत्राकरिता दिनांक १५/१०/९१ पासून मंजूर केलेली विकास नियंत्रण नियमावली मुह हद्दि करिता अंमलात आणण्याबाबत विकास नियंत्रण नियमावलीचा कलम ३७ अन्वये अंतिम मंजुरी दिली.

सबब दिनांक १९/१२/१९८२ चे पूवी लागू असलेल्या "अ" वर्ग नगरपालिका विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे रेखाकनामध्ये १०% खुली जागा सोडण्या येत होती, त्यानंतर शासनाने दिनांक २१/१२/८२ पासून कलम १५४ नुसार दिलेल्या निर्देशाप्रमाणे महानगरपालिका क्षेत्राकरिता शासनाने प्रमाणित केलेल्या विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे रेखाकनामध्ये १५% खुली जागा प्रस्तावित करण्यात येत होती. तेथे असे नमूद करण्यांत येते म.प्रा.व न. र. अधिनियम १९६६ चे कलम १५४ खाली शासनाने विकास नियंत्रण नियमावली २१/१२/८२ पासून अंमलात आणण्याचे निर्देश दिल्यामुळे कलम ३७ खालील कार्यवाही उशीरा झाली असली तरी महानगरपालिका क्षेत्राकरिता विकास नियंत्रण नियमावली २१/१२/८२ पासून अंमलात असल्यामुळे रेखाकंनामधील १५% खुली जागा ठेवणे हे शासन निर्देश्यानुसार व नियमानुसार आहे. वाढील क्षेत्राकरिता दिनांक १५/१०/१९९१ रोजी व मुळ हद्दिकरिता दिनांक १७/२/१९९२ रोजी शासनाने मंजूर केलेल्या विकास नियंत्रण नियमावली नुसार निवासी रेखाकनामध्ये एकूण क्षेत्राच्या १०% इतकी खुली जागा ठेवली जाते.

**संवाद :**

श्री. गायकवाड राधाकृष्ण : सत्यम फर्टीलायझरच्या बाबतीत या सभागृहात चर्चा होऊन एक चौकशी समिती नेमण्यात आलेली होती या समितीमध्ये स. सदस्य श्री. खुंगर, श्री. रगडे , श्री. निकाळजे तसेच श्री. कावडे व माझा समावेश होता. तसेच महानगरपालिकेचे अधिकारी यांचा सुध्दा समावेश केलेला आहे. समितीने २-३ वेळेस सदर प्रकल्पाला भेट दिल्यानंतर ज्या बाबी आढळून आल्या त्या बाबतीत तसा अहवाल समितीने सभागृहाला सादर केलेला असून त्याच्या प्रती सर्वांना देण्यात आलेल्या असून सत्यम फर्टीलायझरला दिला होता. तो उद्देश या ठिकाणी साध्य झालेला नाही. सध्या किती जागा वापरात येत आहे. ॲग्रीमेंट नुसार किती जागा दिली होती. याची सविस्तर माहिती अहवालात दिली आहे. आमाचा रिपोर्ट जर संशयाला वाव देणारा असेल तर या सभागृहाला विनंती की, प्रत्यक्ष मा. आयुक्त समवेत त्या प्रकल्पाला संदस्यांनी भेट द्यावी. वस्तुस्थिती काय आहे समजून येईल. कुणाचे तरी दबाव आहे अशी माहिती मिळाली महानगरपालिकेच्या आयुक्तांकडून तरी ही अपेक्षा मुळीच नाही. कारण आयुक्त आल्यापासून चांगल्या कामांना गती गेल्या ३-४ महिण्यापासून मिळालेली आहे. आमचा अहवाल चुकीचा असेल तर तसे आम्हाला कळवावे. अहवाल बरोबर असेल तर संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी.

सौ. साजेदा बेगम : माझ्या वॉर्डात कब्रस्तनचे काम सुरू केले पुन्हा बंद करण्यात आले यास कोण जाबाबदार?

मा. महापौर : यासंबंधी नंतर खुलासा देण्यात येईल.

श्री. कावडे साहेबराव : कमिटीतील आम्ही सर्व सदस्य व पदाधिकारी यांचे समवेत या प्रकल्नाची पाहणी केली. बऱ्याच वेळा आम्ही चर्चा केली व या प्रकल्पाची जी मुळ संचिका आहे, ती आम्हाला देण्यात आलेली नाही. जे करारनामा झाला त्यामध्ये नावात बदल आहे. यासंबंधी सत्य माहिती दिसून आली. महानगरपालिकेची परवानगी न घेता महाराष्ट्र डिस्लरीजचे पाणी कचऱ्यामध्ये सोडले तो कचरा उचलून टाकावयास पाहिजे होता. आज त्यात डिस्टलरीजचे पाणी सोडल्याने चिकलठाणा तसेच इतर भागातील विहिरींना या पाण्याचा निचरा होत असून ते पिण्याचे पाणी होते ते पिण्यास योग्य राहिलेले नाही. सभागृहात वारंवार चर्चा होऊन सत्यम फर्टीलायझरचा करारनामा रद्द करावा अशी मागणी झालेली आहे. नवीन आले काही तरी तडजोड करतील अशी अपेक्षा होती काही कार्यवाही झालेली नाही. नविन टेंडर काढले ते सुध्दा वेगळे केलेल आहे. किती रक्कम द्यायची. टनावर कचरा उचलण्यासाठी दिल्यावर माप कसे काढणार त्यात दगड, विटा येतात, टनावर माफ जास्त होईल. पूर्णच कचरा उचलावयाचा असा ठेका द्यावयास पाहिजे तसेच टेंडर काढावयास पाहिजे.

श्री. सुदाम सोनवणे : सत्यम फर्टीलाझरला १९८६ ला या सभागृहाच्या मान्यतेने महानगरपालिकेच्या माध्यमातून कचऱ्या पासून खत निर्माण करण्याचा प्रकल्प एका खाजगी संस्थेला देण्यात आला. प्रकल्पातून संबंधित व्यक्तीने फार मोठा भ्रष्टाचार केलेला, तशी चर्चा या सभागृहात झालेली होती व एक कमेटी स्थापन करून त्या कमिटीने अहवाल सादर केलेला आहे. यास दिड ते दोन महिने झाले. प्रोजेक्ट एका व्यक्तीला व ॲग्रीमेंट दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर दिलेले होते. हे सुध्दा रिपोर्ट मध्ये सादर करण्यांत आलेले आहे. तसेच या संस्थेशी महानगरपालिकेने केलेले ॲग्रीमेंट रद्द करावे असे सुध्दा अहवालात समितीने शिफारस केलेली आहे. कारण खत निर्मिती करतांना ज्या पध्दतीने काम करावयचे त्या पध्दतीने होत नाही. संबंधित व्यक्तीने आयकर खात्यामध्ये लाखो रुपयाचे उत्पन्न दाखवले व तसा इन्कम टॅक्स सुध्दा भरलेला आहे. मला हा प्रकल्प करार मान्यानुसार तोट्यात आहे अशी खोटी माहिती सादर करून महानगरपालिकेचे यात संबंधीत व्यक्ती नुकसान करीत आहे. कमिटीने अहवाल सादर केला त्या नुसार कार्यवाही करून संबंधिताचे ॲग्रीमेंट रद्द करावे.

श्री. पंडागळे रतनकुमार : अहवाल देऊन ३ महिने झाले अद्याप का कार्यवाही झाली नाही.

श्री. गायकवाड राधाकृष्ण : कमिटीने जेव्हा स्थळ पाहणी केली तेंव्हा डॉ. देशपांडे हे सुध्दा आमच्या बरोबर होते संबंधित मालक यांनी कचरा साठवून ठेवून पाणी सोडून खत निर्माण न करता हे परस्पर कचरा तेथे टाकल्यानंतर लागेच ट्रॅक्टरमध्ये भरून शेतावर नेऊन टाकल्या जात होता तो कचरा त्यांनी डायरेक्ट विकलेला होता. असे प्रत्यक्ष समितीच्या नजरेस आले आताचा स. सदस्य यांनी सूचना केल्याप्रमाणे संबंधिताने डिस्ट्रीलरीजचे घाण पाणी महानगरपालिकेच्या विना परवानगीने कचऱ्यामध्ये सोडले. यापूसन आजुबाजूच्या परिसरातील लोकांना त्रास होतो तसेच मांडकी व इतर १०-१५ गावांना या कचऱ्या पासून त्रास होतो व संबंधित गावचे लो महानगरपालिकेवर मोर्चा सुध्दा आणण्याच्या तयातरी आहे बऱ्याच वेळा कचऱ्यांची गंजी पेटवून दिली जाते प्रदूषण होते. बरेच नागरिक त्रस्त झाले

व त्यांनी तसेच निवेदन सुध्दा मला दिलेले आहे. या सर्व बाबींचा विचार करून संबंधिताने करार पध्दतीने हा प्रकल्प राबविला नाही म्हणून त्यांचेवर पॅनल्टी लावावी व केलेल्या करार त्वरित रद्द करावा. अशी सर्वांचीच मागणी आहे. समितीने सुध्दा तसा अहवाल दिलेले आहे.

श्री. स. अली सलामी : कमिटीने संस्थेच्या विरोधात अहवाल दिला. महानगरपालिकेने केलेल ॲग्रीमेट रद्द करावे.

श्री. रगडे भगवान : हा प्रकल्प माझ्या वॉर्डात असून सर्वांत जास्त त्रास माझ्या वॉर्डातील नागरिक व इतर परिसरातील नागरिकांना आहे. कमिटीने दि.२२/०५/२००१ ला अहवाल सादर केला. संबंधित सत्यम फर्टीलायझरने महानगरपालिकेस कसे सुचविले काय घोळ केला, महानगरपालिकेचा यात काय फायदा झाला हे सर्व त्या अहवालात दिलेले आहे. संपूर्ण शहराचा कचरा या ठिकाणी जमा होतो. त्यात बरोबर डिस्ट्रीलरीजचे पाणी कचऱ्यावर सोडले जाते. त्यामुळे आणखी दुर्गंधी सुटलेली असून कचऱ्यावर पाणी सोडण्याबाबत महानगरपालिकेची परवानगी घेतलेली नाही. जया कंपनीने घाण पाणी दिले त्या कंपनीवर सुध्दा कार्यवाही झाली पाहिजे. या दुर्गंधीमुळे वॉर्डातील बऱ्याच लोकांना काविळ, गॅस्ट्रा यासारखे आजार होत आहे आणखी आरोग्य धोक्यात येण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. बऱ्याच वेळा कचरा पेटवून दिलाजातो तो सतत ८-१० दिवस जळतो सर्वच वॉर्डात धूर होऊन वातावरण दूषित होते. जनतरा जास्त दिवस त्रस सहन करणार नाही. याची दखल घेण्यात यावी. कचऱ्यावर जी औषधी फवारणी रियची ती होत नाही. ५ एकर जमीन त्या व्यक्तींला दिली. त्याचे ताब्यात सध्या ५ हेक्टर म्हणजेच १२.५ एकर जमीन आहे. सदर मालक या जमीनीवर अन्न, धान्य पिकवीत आहे. याची माहिती अधिकाऱ्यांना नसावी का? करारनाम्यानुसार किती जमीन दिली व प्रकल्प किती जागेत राबविला जातो याची चौकशी होणे गरजेचे आहे. जो करार झाला तो चुकीच्या पध्दतीने केला व संबंधित संस्थेने कराराचे कोणतेही पालन केले नाही यात महानगरपालिकेचा फायदा न होता नुकसान झाले यास कोण जबाबदार आहे. या प्रकल्पासाठी शासन ५० लक्ष रुपये देणार आहे. ते त्या संबंधी मालकाला देऊ नये. तसा ठराव घेण्यात यावा. सविस्तर माहिती अहवाल दिली आहे. सचिव यांचे कडून वाचून घेऊन सभागृहाला कमिटीच्या भावना कळवाव्या तसेच मी माझे वैयक्तिक निवेदन ही महानगरपालिकेकडे दिलेले आहे. या प्रकल्पामुळे माझ्या वॉडॅाचा विकास थांबून आहे. पूर्व भागात विमानतळ, सिडको बसस्थानक, तसेच रेल्वे स्थानक असून महत्वाचे स्थळ असून याचा विकास होत नाही. या कारखान्याच्या शेजारी देवगिरी कामगारांच्या कर्मचाऱ्यांची सोसायटी असून लाखो रुपये खर्च करून ही सोसायटी तयार केलेली आहे. या सोसायटीच्या रहिवाशांना यापासून त्रास होत आहे. या कचऱ्यामुळे धूर वास, दुर्गंधी, माशा यामुळे घाण वास येतो व हे कामगार या वसाहतीत राहू शकत नाही त्यांना बेघर होण्याची वेळ आलेली ती केवळ या व्यवस्थापनाच्या दुर्लक्षामुळे होत आहे. याच ठिकाणी मृत जनावरे टाकली जातात यामुळे मांसाहारी पक्षी तेथे जमा होतात व या भागातून विमान जातात. देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री यातून जातात. एखाद्या वेळेस पक्षामुळे विमानाचा अपघात झाल्यास महानगरपालिकेची बदनामी होईल या शहराची

बदनामी होईल याची जाणीव ठेवून कमिटीने दिलेला अहवालानुसार कार्यवाही व्हावी. व केलेला करार रद्द करण्यांत यावा.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : कमिटीने अहवालानुसार संबंधित संस्थेवर दंडात्मक कार्यवाही करून करार रद्द करावा अशी शिफारस केली. त्यानुसार कमिटीन अहवालावर करार रद्द करण्याचा निर्णय घेतला तसा अधिकार कमिटीला आहे का? खुलासा करावा.

मा. आयुक्त : कमिटीचे स्वरुप काय होते त्याची तपाणी करावी लागेल कमिटी फॅक्ट फेन्डींग असेल तर दंडात्मक कार्यवाहीची शिफारस करता येणार नाही. कायद्या नुसार संबंधित संस्थे बरोबर ॲग्रीमेंट झालेले पार्टी म्हणून महानगरपालिका त्यात गुंतलेले आहे. करारानुसार कार्यवाही होत नसेल तर नियमाने कार्यवाही करता येईल करार वगैर रद्द करण्याबाबत विधी सल्लागार यांचा सल्ला घेऊन कार्यवाही करावी लागेल.

श्री. कावडे साहेबराव : आरोग्य वैद्यकीय अधिकारी आमच्या बरोबर होते. त्यांनी अहवाल दाखविला नाही. ॲग्रीमेंटची प्रत दाखवली नाही ठराव एक मंजूर झाला व ॲग्रीमेंटमध्ये दुसऱ्या नावाचा उल्लेख करून करारनामा केला तो आम्हाला दाखविण्यात यावा.

श्री. दानवे अंबोदास : सदर संस्थेने पाणी बाहेरून घेतले असेल, व कचऱ्यासाठी पाणी आवश्यक आहे. महानगरपालिकेने पाणी पुरविले का? हा प्रश्न आहे. अटीशर्ती मध्ये महानगरपालिकेने पाणी पुरवठा करणे आवश्कय आहे. असा मुद्दा असेल व ९-१० लाख रुपये खर्च करून महानगरपालिका पाणी पुरवठा करू शकले नाही. म्हणून संबंधिताने बाहेरून पाण्ी घेतले हे चुक ठरते की बरोबर या बाबतचा योग्य निर्णय प्रशासनानेच घेतलेला बरा. कचऱ्यासाठी पाणी लागते तर कचरा सडतो तेंव्हा खत होऊ शकते. जो अहवाल समितीने दिला तो अहवाल मा. आयुक्त मा. महापौर यांचेकडे जाईल त्यानुसार प्रशासन निर्णय घेईल. याउलट जो करार झाला त्यात महानगरपालिका सुध्दा कमी पडलेली असेल. करार हा दोन्ही पार्टीला बंधनकारक असतो. त्यामुळे एका बाजूने मत मांडून करार तोडू शकत नाही. योग्य ती मध्यस्थी होऊनच करार रद्द करार येतो. कारण हा प्रकल्प या शहरात असणे आवश्यक आहे. उद्या या शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावणे सुध्दा महत्त्वाचे आहे. यात महानगरपालिकेचा काही फार मोठा फायदा होणार नाही टोकाची भूमिका घेऊन कार्यवाही करणे योग्य होणार नाही. महानगरपालिकेच्या बरोबर चर्चा झाली. तयाचे काय चुका होतात त्या समजावून सांगणे गरजेचे आहे. दुरुस्ती होऊन कार्यवाही होत असेल तर त्या चुका दुरुस्ती करून घेतल्या पाहिजे. चुका दुरुस्त करण्यास तयार नसेल तर कायद्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री. गायकवाड राधाकृष्ण : कमिटीने अहवाल सादर केल्यानंतर एका पक्षाच्या सदस्यांनी या संस्थेची बाजू मांडणे योग्य होणार नाही. त्या ठिकाणी पाणी नसेल म्हणून बाहेरून पाणी घेतले असेल असा संवादातून उल्लेख आला परंतु ज्यावेही कमिटीचे सदस्य पाहणीसाठी गेला होता जून -जुलैच्या महिना असेल त्या ठिकाणची जी विहिर आहे ती अर्धा भाग पाण्याने भरलेला होता याचा अर्थ पाणी मुबलक होते. डिस्टीलरीजचे या पाण्यामुळे खत निर्माण होण्या मदत होईल हा उद्देश होता परंतु त्या पाण्यामध्ये अल्कोहोल असल्यामुळे तो

कचरा पेटतो व त्यामुहे धूर व दुर्गंधी सुटते. महानगरपालिकेचे करार नाम्यानुसार सर्व सुविधा दिलेल्या आहे या शहरात सत्यम फर्टीलायझरच्या नावाने मोठमोठे उद्योगधंदे या मालकाचे आहेत सत्यम फर्टिलायझरच्या नावाखाली या संस्थेचा जकात सुध्दा वसूल केलेला नाही. फार मोठा फायदा या संस्थेस झालेला आहे. या मालमकास फार मोठे उत्पन्न होते. व तसा इन्कम टॅक्स सुध्दा या व्यक्तीने भरलेला आहे. जागेवर मोठमोठी मशिनरी आहे. परंतु बंद अवस्थेत दिसते. शहरातून कुचरा गेल्यानंतर तेथून टॅक्ट्रर मध्ये कचरा भरून ५००/- रुपये एक ट्रक्टर प्रमाणे शेतकऱ्यांना तो विकाला जातो. ५००/- रुपये एक ट्रक्टर प्रमाणे शहराचा दररोजचा किती कचरा व तो संस्था चालक किती पैसा कमवितो व त्यानुसार महानगरपालिकेकडे त्यांनी किती पैसा भरणा केला हे महत्वाचे आहे. हाच प्रकल्प महानगरपालिकेने राबविला तर फार मोठा फायदा होऊ शकतो यासाठी एक वेगळा विभाग निर्माण करावा असे माझे मत आहे. ज्या ध्येय धोरण व कायदा महानगरपालिकेस होईल या दृष्टीने हा प्रकल्प दिलेला आहे. त्याचे योग्य नियोजन होत नसल्याने महानगरपालिकेचे नुकसान होत आहे. या बाबत प्रशासनाने सतर्क राहून कार्यवाही करावी.

श्री. संजय शिरसाठ : मा. महापौर, मा. आयुक्त यांनी प्रकल्पाला भेट द्यावी व अहवाल सभागृहात ठेवावा.

श्री. सुदाम सोनवणे : कमिटीने अहवाल दिलेला आह तो प्रकल्प बंद व्हावा असा आमचा उद्देश नाही परंतु करारनामा करून त्याचे पालन न केल्याने व या प्रकल्पापासून संबंधी सत्यम फर्टीलायझर मालकाने लाखो रुपये कमविल तसा ४ ते ५ लाख रुपये इन्कम टॅक्स भरलेला आहे. व महानगरपालिकेस उत्पन्न दाखवील नाही. अशी दिशाभूल केली जात आहे. कचऱ्याची विल्हेवाट चांगली होउुन खत चांगले मिळावे हा उद्देश या प्रकल्पामागे आहे. परंतु तसे न होता डायरेक्ट कचरा विकला जात आहे. खत चांगले मिळावे म्हणून १९९६ पासन हा प्रकल्प दिला जो उद्देश समोर ठेऊन कार्यवाही केली तो सफल झालेला नाही. तया व्यक्तीला महानगरपालिका प्रशासनाने समज द्यावी. नसता करार पध्दतीने कार्यवाही होत नसल्यास नियमाने त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री. रतनकुमार पंडागळे : समितीने अहवाल महापौरांना सादर केलेला आहे. समितीमध्ये जबाबदार अधिकारी यांचा समावेश होता. त्यामुळे करार रद्द करण्याचा निर्णय प्रशासन घेऊ शकते.

मा. महापौर : मागच्या सर्वसाधारण सभेत या संबंधिचा अहवाल सभागृहात वाटप करण्यात आलेला होता. डॉ. कराड महापौर होते त्यांना अहवाल सादर केला होता. काहींच्या तक्रारी विचारात घेऊन सभेत चर्चा झाल्यानुसार कमिटी गठीत केलेल्या समितीने पुरेपुर चौकशी करून अहवाल दिलेला आहे. हा अहवाल प्रशासनासमारे ठेवून प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा सचिव यांनी उद्याच प्रशासनाकडे अहवाल द्यावा.

सौ. साजेदा बेगम : माझ्या वॉर्डात कब्रस्थानसाठी संरक्षित भिंतीचे काम करिता पाया खोदकाम सुरू केले होते. काम अर्धवट आहे. सध्या त्या खड्यामध्ये लहान मुले पडतात काम का बंद केले. खुलासा व्हावा.

शहर अभियंता : कब्रस्तानाचे कुंपन भिंतीचे काम असून पूर्वी ते मोजमापे व हद्द निश्चित करण्यासाठी थांबून होते. त्याचा प्रश्न सुटला असून आता सुरू केले सर्व माहिती वक्फ बोडातून घेतलेली आहे. बॉन्ड्री निश्चित करून घेतली त्यानंतर काम सुरू केले. पुढे गुत्तेदाराने हे काम केले नाही म्हणून त्या गुत्तेदरास दंडात्मक कार्यवाही केलेली आहे. विहित मुदतीत त्यांनी काम केले नाही तर योग्य ती नियमाने कार्यवाही करण्यांत येऊन ठेका रद्द करण्याची कार्यवाही देखील करण्यात येईल.

मा. महापौर : आता विषय क्र. १ वर चर्चा करावी.

**विषय क्र. ५२७/१**

दिनांक २०/१०/२००१ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृतत कायम करणे.

**संवाद :**

श्री. प्रशांत देसरडा : इतिवृत्ततील पान क्र. ७ वर अनाधिकृत वसाहतींना सुविधा देण्या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. त्या प्रस्तावास तात्काळ मंजुरी आणण्यासाठी एका सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती त्या संदर्भात सविस्तर खुलासा करावा.

मा. महापौर : ज्या अधिकाऱ्याची या कामासाठी नियुक्त केली ते अधिकारी आज उपस्थित नाही.

श्री. थोरात दत्तात्रय : वॉर्डात अनाधिकृत वस्ती असून ड्रेनेज तसेच पाणी प्रश्न नेहमी उद्भवतात प्रत्येक वेळेस प्रश्न सर्वसाधारण सभेत उपस्थित करावा लागतो. अनाधिकृत वसाहतींना सुविधा देण्या संदर्भात प्रस्ताव शासनाकडे पाठविला अधिकाऱ्याची नियुक्ती केली काय कार्यवाही झाली त्याचे उत्तर देण्यासाठी अधिकारी या सभागृहात नाही दोन वर्षापर्यंत वॉर्डात काहीही विकास काम झाले नाही.

मा. महापौर : संबंधी अधिकारी नाही. सुविधा देण्याच्या प्रस्तावास मुंबईहून शासन मंजुरी घेतली जाईल.

श्री. तकी हसन खॉन : कोरम नाही सभा तहकूब करावी नसता चर्चेची नोंद इतिवृत्तात घेणे कायद्यानुसार बरोबर नाही.

मा. महापौरः सभा ०५ मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (सभा ४.५० वा तहकूब पुन्हा तहकूब सभा ५.०० सुरू)

श्रीमती जयश्री किवळेकर : इतिवृत्तांतील पान क्र. ५० वर ठराव क्रमांक ५१५/११ मध्ये दुरुस्ती करावी महिला बालकल्याण अधिकारी पद भरतांना एम.ए. समाजशास्त्र पदवी एवढीच शैक्षणिक अर्हता ठेवावी व जबाबदार पदावरील १० वर्षाचा अनुभव शिथील करून महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यामधून हे पद भरण्यात यावे अशी दुरुस्ती करावी.

मा. महापौर : दुरुस्त करण्यातयावी विषय क्र. १ दुरुस्तीसह कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी.

**ठराव**

सर्वसाधारण सभा इतिवृत्त दिनांक २०/१०/२००० विषय क्र. ५१५/१५ मधील महिला व बालकल्याण अधिकारी हे पद भरतांना फक्त एम.ए. समाजशास्त्र एवढीच शैक्षणिक अर्हता ठेवण्यात व जबाबदार पदावरील १० वर्षाचा अनुभव ही अटघ शिथील करून

महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यामधून हे पर भरणे या दुरुस्तीसह दिनांक २०/१०/२००१ च्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२८/२**

औरंगाबाद प्रारुप विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ८७ "प्राथमिक शाळा" व आरक्षण क्र. ८८ खेळोच मैदान या प्रस्तावाने न.भू.क्र. २०७२२ मालाजीपुरा हि बाधित असून मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये खरेदी सूचना दिली असता शासनाने उक्त खरेदी सूचना कायम केल्यावरून प्रकरणांत मा. आयुक्तांची मंजुरी घेऊन भूसंपादन प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर खरेदी सूचना मुदत संपल्यापूर्वी प्रस्ताव सादर करण्यांत आला होता. (दि. २०/०३/२००१) रोजीच्या सर्व सधारण सभा दि. २०/०३/२००१ सर्वसाधरण सभेमध्ये सभागृहात आलेल्या चर्चेनुसार च्या उक्त भूसंपादन प्रस्ताव स्थगित ठेवून या आरक्षणाखालील जमिनीच्या संदर्भात प्रशासनातर्फे सखोल माहिती यावी असे सर्वानुमते ठरले वैधानिक कार्यवाही व्हावी.

उपसंचालक नगर रचना महानगरपालिका, औरंगाबाद यांनी पुनश्च प्रस्ताव सादर केला की, दिनांक २०/०३/२००१ च्या सर्वसाधारण सभेत सभागृहात झाले त्या चर्चेनुसार या आरक्षणाखालील बाधित मिळकत न.भू.क्र. २०७२२ क्षेत्र ३५,०० चौरस फुट (३२५२.८० चौ.मी.) जागेच्या संदर्भात नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद यांना जा.क्र./मनपा/नरवि/भसं/६०५/२००१ दि. १९/०४/२००१ नुसार मालकी हक्काबाबत विचारणा केल्यावरून त्यांनी उक्त मिळकतीचे पी.आर.कार्ड सत्यप्रती या कार्यालयास दिले आहे. पी. आर. कार्डनुसार सदर मिळकत ही. श्री. नंदलाल गुणवाणी व इतर या खाजगी व्यक्तीचे मालकी हक्कात दर्शविलेली आहे.

श्री. नंदलाल गुणवाणी यांनी त्यांचे वरील क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४६ अन्वये खरेदी सूचना दिल्यावरून शासनाने ती कायम केली आहे. तथापी अर्जदराच्या मिळकतीसह उक्त प्रस्तावाने बाधित क्षेत्र आरक्षण (क्र.८७८०.४१ हेक्टर व आरक्षण क्र. ८८१०.३८ हेक्टर) संपादन करण्यास व त्यासाइी लागणारा खर्च अंदाजे ३ कोटी येईल. करिता भसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर.

**चर्चा :**

श्री. आनंद तांदुळवाडीकर : माझ्या वॉर्डात कुठेही विकास करण्यासाठी जागा नाही करिता हा प्रस्ताव मंजुर करावा.

सौ. साधाना सुरडकर : आरक्षित जागा घेण्याची आवश्यकता आहे का, जागा कुणाची आहे तसेच सध्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही तर जागा भूसंपादन करू शकतो का? जागेचे पी.आर. कार्ड खरेदीखत तपासले का? मालकी हक्क कोणाचा आहे. यापासून महानगरपालिकेला आर्थिक लाभ होतो का? याची सर्व तपासणी करणे गरजेचे आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : जागा घेण्यास महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली आहे काय?

मा. महापौर : नगररचना विभागाने खुलासा करावा.

सहाय्यक संचालक (न. र.) नगर भूमापन क्र.२०७२२ यामध्ये आरक्षण क्र. ८७ व आरक्षण क्र. ८८ आहे. सदर जमीन कालमकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना

अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये शासनास पर्चेस नोटीस बजावली होती. सदर नोटीस शासनाने कायम केलेले आहे. शासनाने नोटीस कायम केल्यापासून १ वर्षच्या आत ही जागा भूसंपादन करण्याची कार्यवाही करणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे. विकास योजनेमधील आरक्षणा खालील जमीनी भूसंपादन करणे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. यावर विचार होऊन आरक्षण भूसंपादन करणे आवश्यक आहे.

श्री. प्रकाश निकाळजे : या शहरामध्ये जवळपास ८०० बोगस पी.आर. कार्ड लोकांनी करून घेतलेले आहे. पिर बाजार येथे एकाच जागेवर १७ लोकांचे पी. आर. कार्ड होते. प्रस्तावानुसार या जागेचा मालकी हक्क कोणाचा आहे. त्याची तपासणी करावी. महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार व्हावा. पी. आर. कार्ड तपासणी करावे.

मा. आयुक्त : तत्कालीन आयुक्त यांनी हा प्रस्ताव सादर केलेला होता. सभागृहात काही सदस्यांच्या मनात शंका निर्माण झाली. पी. आर. कार्ड मालकी हक्क तपाणी केली पाहिजे. यासी मी ही सहमत आहे. तपासणी केल्या नंतरच या प्रस्तावार विचार व्हावा आर्थिक परिस्थितीच्या बाबती सर्व माहिती सभागृहात ठेवलेली आहे. त्याचा विचार करून या प्रस्तावावर निर्णय घ्यावा.

श्री. दानवे अंबादास : या अगोदर२०/०३/२००१ च्या बैठकीत हा प्रस्ताव सादर झालेला होता. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाचे कलम ४० अ नुसार अधिसूचित क्षेत्रातील जागा भूसंपादन करणे आवश्यक आहे व ते दायीत्व ठरते. ठरलेल्या कालावधीत भूसंपादन न केल्यास आरक्षण व्यपगत होईल.

सहाय्यक संचालक (न.र.) शासनाने नोटीस कायम केल्यानंतर १ वर्षाच्या आत ही जागा भूसंपादन करणे आवश्यक आहे. जागा अशाच पध्दतीने सोडत गेल्यास विकास योजना आराखडा तयार करून काहीच उपयोग होणार नाही.

श्री. प्रकाश निकाळजे : पी. आर. कार्ड तपासणी करावे मागे एकाच जागेचे १७ लोकांच्या नांवावर बोगस पी. आर. काडे होते. तपासणी करून कार्यवाही व्हावी.

श्री. प्रशांत देसरडा : चौकशी करून कार्यवाही व्हावी.

सा. संचालक नगररचना : कालमर्यादेत हे प्रकरण असल्यामुळे त्वरित निर्णय घ्यावा. भूसंपादनाच्या नियमानुसार अहवाल प्राप्त झाल्यानंतर मालमत्तेसंबंधी महानगरपालिका सिव्हिल कोर्टात रक्कम जमा करून सिव्हिल कोर्टास त्यावर निर्णय घेता येईल. मालकी हक्का बाबत भूसंपादन अधिकारी यांनी निवाडा घोषित करतांना ते मालकीहक्क तपासणी करतात. भसंपादन कायद्यानुसार जमीन आपल्याकडे येऊ शकते.

श्री. पंडागळे रतनकुमार : सध्या महानगरपालिकेकडे पैसा नाही. पुढील सभेत प्रस्ताव ठेवावा. विचार विनियम होऊन निर्णय घेण्यात यावा. सभागृहात पी. आर. कार्ड बद्दल शंका निर्माण केलेली आहे. त्याची तपासणी होणे गरजेचे आहे.

श्री. आनंद तांदुळवाडीकर : आरक्षण रद्द झाले तर विकास योजनेस अर्थ राहणार नाही मुळ मालकास रक्कम मिळेल म्हणून प्रस्ताव मंजूर करावा.

सहाय्यक संचालक (न.र.) भूसंपादनाची पूर्ण कार्यवाहीसाठी कमीत कमी २ वर्ष लागतील आजच पूर्ण रक्कम महानगरपालिकेने द्यायची नाही.

श्री. स. अली सलामी : सविस्तर माहिती सादर करावी पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करावा.

मा. महापौर : पी. आर. कार्ड तपासणी करून पुढील सभेत प्रस्तात आणण्यात यावा.

श्री. दानवे अंबादास : पुढील बैठकीत ठेवता येते का? परत ३ महिने वाट पाहावी लागेल.

सहाय्यक संचालक (न.र.) अर्जदराने विकास कामासाठी परवानगी मागविल्यास ती थांबवून ठेवता येणार नाही याचा सुध्दा विचार व्हावा.

श्री. संजय शिरसाठ : कायद्याच्या चौकटीत बसत असेल तर मंजूर करावे. तसे रुलींग द्यावे.

श्री. दानवे अंबादास : या प्रस्तावाबाबत प्रशासनाची भूमिका काय आहे. नियमाने मंजूर करावे. नियमात येत नसेल तर रद्द करावे.

श्री. स. अली सलामी :. शहरातील संपूर्ण रस्ते रुंदीकरणाचे बाकी आहे ती कामे अगोदर करावी नंतर जागा भूसंपादन करून विकास करावा.

श्री. दानवे अंबादास : स. सदस्य श्री. सलिम यांच्या वॉर्डात १.५० कोटी रुपये खर्च केले अद्याप एकही दुकान विक्री झाले नाही. अनाधिकृत नळ कनेक्शन किती आहे याकडे प्रशासन लक्ष देते का?

श्री. तकी हसन खॉन : डी. पी. रोड करायचे बाकी आहे त्या बाबतीत प्रस्ताव आणावे जनतेच्या विकासासाठी रस्त्याची कामे करणे अगोदर आवश्यक वाटते.

श्री. दानवे अंबादास : हा प्रस्ताव प्रशासकीय आलेला आहे. नियमाने मंजुरी द्यावी.

श्री. स. अली सलामी : पूर्ण कब्रस्तानची जागा अजबनगरमध्ये हडप केलेली आहे. कोणात्या सदस्यांनी सभागृहात दादागिरी करू नये.

मा. महापौर : कुणी सदस्यांनी आरोप प्रत्यारोप करू नये हा प्रशासकीय प्रस्ताव आहे दोन वर्षानंतर रक्कम द्यावी लागणार आहे. जागा घेतली नाही तर आरक्षणातून वगळला जाईल. सर्व कागदपत्राची तपासणी करावी हा प्रस्ताव दुसऱ्यांदा आपल्यासमोर येत आहे.

श्री. पंडागळे रतनकुमार : विकास कामासाठी पैसा नाही जागा घेण्यासाठी कोठून पैसा येणार याचा प्रशासनाने खुलासा द्यावा.

श्री. सुदाम सोनवणे : संबंधित जमीन मालकास आज रक्कम देण्याची गरज नाही. जागा संपादन केली नाही तर आरक्षणातून वगळली जाईल यात महानगरपालिकेचे नुकसान होणार आहे. याचा विचार करून हा प्रस्ताव मंजूर करावा.

मा. महापौर : कायदेशीर बाबी तपासन प्रस्ताव भूसंपादनासाठी पाठविण्यात यावा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद प्रारुप विकास योजनेनुसार आरक्षण क्र. ८७ "प्राथमिक शाळा व आरक्षण क्र. ८८ खेळाचे मैदान" या प्रस्तावाने आरक्षित असलेल्या मालजीपुरा न.भू.क्र.२०७२२ चे मिळकतधारक यांनी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये शासनास दिलेल्या खरेदी सुचनेनुसार औरंगाबाद प्रारुप विकास योजनेतील आरक्षण क्र. ८७ (०.४१ हेक्टर) व आरक्षण क्र. ८८ (०.३८ हेक्टर) चे क्षेत्र अर्जदाराच्या मिळकतीसह संपादन करण्यास आणि आरक्षित क्षेत्र संपादनासाठी लागणाऱ्या अंदाजे तीन कोटीच्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. संपादित करावयाच्या जागेबाबत मंजुरी देण्यांत येते. संपादित करावयाच्या जागेबाबत कायेदशीर बाबी तपासल्या नंतर सदर प्रस्ताव भसंपादनासाठी पाठविण्यांत यावा. असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२९/३**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेची सद्याची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट असून माहे ऑक्टोबर अखेर महानगरपालिकेस खालील प्रमाणे रकमा विविध लेखाशिर्षा अंतर्गत देणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांचे विद्युत देयक रक्कम | रु. १२६.०० कोटी |
| २ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणी खरेदी देयक रक्कम | रु. ५५.४० कोटी |
| ३ | नगररचना विभागाचे कर्ज | रु. ५५.४० कोटी |
| ४ | म्हाडा कार्यालयाकडून घेतलेले कर्ज | रु. ००.०३ कोटी |
| ५ | हडको कार्यालयाकडून घेतलेले कर्ज | रु. ००.१५ कोटी |
| ६ | एलआयसीकडून घेतलेले कर्ज | रु. ५.८५ कोटी |
| ७ | खुल्या बाजारातून घतलेले कर्ज | रु. २०.८० कोटी |
| ८ | हमी शुल्क | रु. ००.३८ कोटी |
| ९ | पोलिस दल पगार व भत्ते | रु. ००.४७ कोटी |
| १० | महाराष्ट्र राज्य रस्ते विकस महामंडळ | रु. ०४.५० कोटी |
| ११ | पाचवा वेतन आयोग थकबाकी | रु. ०१.५० कोटी |
| | **एकूण** | **रु. २१५.११ कोटी** |

सन २००१-२००२ चे वार्षिक अंदाजपत्रक रु. १३५.५६ कोटी
माहे ऑक्टोबर पर्यंतची प्रत्यक्ष रु. ४७.६७ कोटी
माहे ऑक्टोंबर पर्यंतचा प्रत्यक्ष खर्च रु. ४९.६५ कोटी.

मानगरपालिकेचे सद्याची आवक ही मासिक रु. ६.८१ कोटीची असून आवक च्या प्रमाणात प्रतिमहा खर्च रु. ७.०९ कोटी इतका आहे. महानगरपालिकेची उत्पन्नाची बाजू विचारात घेतली तर नागरिकांकडे कर व पाणीपट्टी संदर्भान खालील प्रमाणे थकबाकी आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मालमत्ता कर | रु. ३६.४२ कोटी |
| २ | पाणीपट्टी | रु. १२.२७ कोटी |
| ३ | दुकान भाडे व इमारत भाडे | रु. ००.२१ कोटी |
| ४ | शासनाकडे प्रलंबित असलेले अनुदान | - |
| अ | रस्ता दुरुस्ती अनुदान | रु. ०१.०० कोटी |
| ब | कुटूंब कल्याण व माताबाल संगोपन | रु. ०३.२९ कोटी |
| क | नागरी हिवताप योजना अनुदान | रु. ०२.८७ कोटी |
| ड | शालेय इमारत भाडे अनुदान | रु. ००.८० कोटी |
| | **एकूण** | **रु. ५६.८६ कोटी** |

शासनाने दरवर्षी औरंगाबाद महानगरपालिकेस रु. १० कोटी विशेष अनुदान देण्यांत येईल म्हणून निर्णय जाहिर केला होता. त्याअनुषंगाने अंदाजपत्रकामध्ये शासनाकडून रु. १० कोटीचे उत्पन्न अनुदान स्वरुपात अपेक्षित केलेल होते. परंतु शासनाने त्यांचे पत्र क्र. जी.ईएन १०२०००/९८३/प्र.क्र.५५/२०००/नगरविकास २४ दिनांक २७ जुलै २००१ नुसार महानगरपालिकेस कळविले आहे की, चालू आर्थिक वर्षात या महानगरपालिकेस फक्त रु. ६

कोटीचेच अनुदान देय राहील. त्यामुळे अंदाजपत्रकात सुमारे रु. ४ कोटीची तुट निर्माण होणार आहे. दहाव्या वित्त आयोगाची ही पंचवार्षिक मुदत संपल्यामुळे रु. ७० लाखाचे अनुदान महानगरपालिकेस प्राप्त होणार नाही. सद्या परिस्थितीतील वसुलीचे प्रमाण विचारात घेता चालू आर्थिक वर्षात ३५ ते ४० कोटीची अर्थसंकल्पात तुट निर्माण होऊ शकले.

उपरोक्त बाबींची विचार करता आता नवीन कामे होती घेण्याबद्दल अडचण निर्माण झाली आहे. करिता या बाबतीत मा. स्थायी समितीने व मा. सर्वसाधारण सभेने मार्गदर्शन करावे.

**संवाद :**

श्री. सुदाम सोनवणे : महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थिती बाबत प्रशासनाने प्रस्ताव ठेवलेला आहे. यावर सखोल चर्चा होऊन योग्य तो निर्ण घेणे गरजचे आहे. यामध्ये देणेवारी व आनेवारी बघितली तर देणेवारी जास्त आहे ही परिस्थिती का निर्माण झाली. याचा विचार होणे आवश्यक आहे. एखादे कामा संदर्भात पत्र दिले तर आर्थिक अडचण येते म्हणून उत्तर येईल हीच परिस्थिती कायम राहिली तर या वर्षातील आणखी ४-५ महिने बाकी आहे या कालावधीत एका नव्या पैशाचे काम होणार नाही. जकात, पाणीपट्टी तसेच मालमत्ता व इतर माध्यमातून जास्तीत जास्त वसुली कशी वाढविता येईल या बाबत अभ्यास करून प्रशासनाने प्रयत्न करावे.

श्री. प्रकाश निकाळजे : वसुली करण्याबाबत प्रशासन काय प्रयत्न करणार त्याचा खुलासा द्यावा त्या नुसार चर्चा करता येईल. प्रशासनास अर्थसंकल्पातील रक्कम कमी करायची का?

श्री. शिरसाठ संजय : माहे ऑक्टोंबर पर्यंत प्रत्यखात वसुली ४७-६७ कोटी दाखवली. प्रशासनाचा खर्च ४९.६५ कोटी दाखवला जे जास्तीचा १.९८ कोटी रुपये प्रशासनाने कोठून आणले जेणे करून वसुलीतूनच खर्च होऊ शकतो.

सौ. साधना सुरडकर : महानगरपालिकेकडे २१५ कोटीचे कर्ज आहे तसा प्रस्ताव प्रशासनाने सादर कला ज्यावेळी कर्ज घेण्यात येते त्यावेळी परतफेडीचा विचार होता. ज्या योजनेसाठी कर्ज प्राप्त केले त्या परतफेडीच्या योजना प्रशासनाने विचारात घेतल्या. नव्हत्या का? नियोजन शुन्य कर्ज तो पैसा कुठे खर्च झ ाला त्या योजनेच्या माध्यमातून येणारे उत्पन्नातून थकबाकी का भरली नाही. कर्ज घेत राहिले थकबाकी जास्त होत गेली व प्रशासनाचे नियोजन शुन्य असल्याचे या थकबाकी वरून दिसून येते. ऑक्टोबर २००१ अखेर एकूण जमा ४७.५६ कोटी खर्च ४९.६५ कोटी तर २ कोटी रुपये कोठून खर्च केले हा प्रश्न निर्माण होतो. १३५ कोटीचा अर्थसंकल्पा मंजूर केला ८४ कोटीच उत्पन्न बजेट नुसार १ ते २% वसुली कमी झाली याबाबतीत समजून घेता येईल परंतु बजेटच्या ३० ते ३५% वसुली कमी होते तर १३५ कोटीचे अर्थसंकल्प ठेवून अर्थ नाही जेव्हढी वसुली होईल तेव्हढाच अर्थसंकल्प ठेवावा २१५ कोटीचे कर्ज प्रशासनाने इतक्या दिवस का लपवून ठेवले जे की आज ते सभागृहासमोर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती दाखवण्याच्या दृष्टीने सादर केले. कर्ज घेतले परंतु त्या योजना प्रभावीपणे राबविल्या गेल्य नाही. पाचवा वेतन आयोगापोटी १.५० कोटी वाटते ते काही दिवसासाठी थांबवले असते तर लहान मोठी विकास कामे झाली असती. परंतु प्रशासनाकडे नियोजन नाही त्यामुळे वसुलीवर प्रशासनाचा भर नसून वसुली

वाढवण्यावर प्रशासनाने भर द्यावा जेणे करून उत्पन्न वाढेल जे अधिकारी यात दोषी असेल तर त्यांचेवर नियमाने कार्यवाही झाली पाहिजे असे माझे मत आहे. यास प्रशासनच जाबादार आहे हे विसरून चालणार नाही.

श्री. प्रशांत देसरडा : मागील जोा अर्थसंकल्प ठेवण्यात आलेल्या होता तो फुगवून ठेवलेला होता. अंदाजपत्रक फुगवून इेवण्याचे कारण काय? तेव्हढी वसुलइ का केली जात नाही, याचा जाब प्रशासनाकडे विचारावा या वर्षीच्या अर्थसंकल्पात सुध्दा पूर्ण वसुली हो तनाही असा अंदाजप आलेला आहे. जकात वसुलीवर मा. आयुक्तांनी भर दिला त्यास मा महापौर साथ देत आहे. चांगली बाब आहे जी चूक मागील उद्दिष्टामध्ये झाली ती जकातीचे उद्दिष्ट ठेवतांना होत आहे असे माझे मत आहे. जी आकडेवारी जकातीची दिली जाते ती अत्यंत चुकीची आहे. कारण सध्या दररोज जकातीत ३ लाखाची वाढ झाली व त्या अधिकाऱ्यांचा सत्कारसुध्दा केलेला आहे हि वसुली ऐन दिवाळीच्या काळात होत आहे. मागील वर्षीचा विचार केल्यास यावर्षी नोव्हेंबर मध्ये जास्त वसुली होते असे दाखविले जात आहे. परंतु अधिकचा महिना आल्याने यावर्षी दिवाठी नोंव्हंबर मध्ये आलेली होती मागील वर्षाची दिवाळी ही ऑक्टोबर मध्ये होती. म्हणून मागील वर्षीच्या महिण्यात व या वर्षीच्या महिण्याचा विचार करून यावर्षी जास्त वसुली होत आहे असे मत मांडता येणार नाही. मागील दिवाळीच्या वेळेस जजकातीत २,२८,७७,५८७/- रुपये मिळाले होते. आणि या वर्षीच्या दिवाळीच्या काळात २,६४,६९,३९९ रुपये जकात वसुली झालेली होती. यामध्ये जास्त तफावत नसून फक्त ३५ लक्ष रुपये जकात जास्त झालेली आहे असे दिसून येते जकात वसुलीच्या प्रकरणात दंडात्मक कार्यवाही होत आहे. नियमान वसुली करणे आवश्यक आहे यात शंका नाही परंतु यापुढे जकातीचे जे उद्दिष्ट अपेक्षित आहे. तेवढेच अर्थसंकल्पात ठेवावे व मालमत्ता वसुलीच्या संदर्भात सुध्दा काही लोकांना नोटीसा दिल्या त्यानुसार वसुली करण्यावर भर द्यावा व जे लोक भरणार नाही. त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करून जाहिरातीचा खर्च सुध्दा वसूल करावा.

श्री. गायकवाडा राधाकृष्ण : महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. वृत्तपत्रात बातम्यायेतात त्या कुठेतरी नगरसेवकांचे नांव येते व सर्वसामान्य जनता असा विचार करते की, नगरसेवकांमुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती ढासलेली आहे ते कितपत सत्य आहे. अर्थसंकल्प मंजुरीसाठी ठेवल्यानंतर प्रतयेक सदस्य बोलतात बजेट फुगवून ठेवलेले आहे. त्यावेळी अधिकारी समाधान कारक उत्तर देऊन ती बैठक संपते. प्रस्तावामध्ये उत्पन्नापेक्षा १.९८ कोटी खर्च जास्तीचा दाखविलेला असून अस्थापनेवर कसा खर्च होता त्याचा काहीही उल्लेख या प्रस्तावामध्ये सविस्तर दिलेला नाही. कायम स्वरुपी / रोजंदारी कर्मचारी किती त्यांचे पगारावर खर्च होती त्याचा उल्लेख करणे गरजेचे आहे. आस्थापना वरील खर्चाचा सविस्तर उल्लेख असावा तसेच प्रत्येक वेळेस अर्थसंकल्प अस्थापनेवरील खर्च लावण्यसासाठी अर्थसंकल्प फुगवून दाखविला जातो. कोण कोणते मार्ग अवलंबून उत्पन्न वाढविता येई याचा प्रशासनाने विचार करावा जकातीचे उत्पन्न वाढवावे. तसेच न्यायालयात किती केसेस आहे. बऱ्याच दिवसापासून काही प्रकरणे प्रलंबित आहे. यास जबाबदार कोण तडजोड करून निर्णय

व्हावेत मालमत्ता कर बरोबर लावलेला नाही एका व्यक्तीला १ हजार तर त्याच घराच्या बाजूला ५००/- लावण्यात आलेला आहे यामुळे जे मालमत्ता कर भरणारे असतात ते भरत नाही व प्रकरण न्यायप्रविष्ट होते. शहरात अनधिकृत नळकनेक्शन किती त्याची चौकशी करावी त्यांना अधिकृत करावेत जेणे करून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवण्यास मदत होईल या शहराचे नांव आशिया खंडात आहे. नगरसेवकामुळे महानगरपालिका डबघाईला आलेली नाही. यात अधिकारी जबाबदार असून वर्षानुवर्षापासून एकच ठिकाणी अधिकारी काम करतात माझे कुणीही काही करीत नाही असा समज समोर ठेवून अधिकारी उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने चांगली सेवा करीत नाही. या परिस्थितीत दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही झाली पाहिजे. व सविस्तर जाहिर खुलासा प्रशासनाने करावा अशी अपेक्षा करतो.

श्री. स. अली सलामी : महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही वृत्तपत्रात बातम्या येतात. व तसा प्रस्ताव आज सदर झालेला आहे एकूण २१५ कोटी कर्ज महानगरपालिकेवर असून देणे आहे. सभागृहाचे योगय मार्गदर्शनासाठी प्रस्ताव प्रशासनाने ठेवलेले आहे, असे वाटते. प्रस्तावातील आकडेवारी पाहिली असता वषानुवर्षाचे कर्ज हे थांबलेले आहे. १९९६ च्या अर्थसंकल्पात व चालू वर्षाच्या २००१-२००२ च्या अर्थसंकल्पात सुध्दा मा. आयुक्त यांचे मनागत व्यक्त केलेले आहे. त्यात असा उललेख केलेला आहे. हा अर्थसंकल्पा सादर करतांना मला मनापासून आनंद होत आहे. महानगरपालिकेवर लाखो रुपये कर्ज असतांना असा उल्लेख करणे बरोबर आहे अर्थसंकल्पामध्ये जी ठळक वैशिष्ट्य दिली त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यासाठी ७५ लक्ष रु. तरतूद होती आतापर्यंत १० लक्ष रु. खर्च झाले त्यातून ६५ लक्ष रु. बचत झाली तसेच सिडकोमध्ये सभागृह बांधणार म्हणून ५० लाख ठेवण्यात आलेले होते. ते खर्च झाले नाही. तसेच वृत्तपत्रात बातम्या येतात जकातीत वाढ झाली. दररोजची ३ लक्ष वाढ गृहित धरण्यास महिण्यात १ कोटी तर वर्षाचे १२ कोटी रुपये होतात. जकातीत झालेली वाढ व अर्थ संकल्पानुसार थांबून असलेल्या कामाची रक्कम ही एकूण १५ कोटी होते. हा पैसा विकास कामासाठी खर्च करता येऊ शकेल, तसेच अनाधिकृत वसाहतींना मालमत्ता कर लावून ४-५ कोटी रुपये वसूल होऊ शकतात. यापुढे ठळक वैशिष्ट्या मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ती कामे झाली पाहिजे नसता अर्थसंकल्पात ठळक वैशिष्ट्य ठेऊ नये व सभागृहाची दिशाभूल करू नये. या अगोदर ज्या पध्दतीने कामकाज चालत आले त्याप्रमाणे चालावे नसता एक कुलूप आणून महानगरपालिकेस लावावी या मताचा मी आहे.

श्री. सुदाम सोनवणे : महानगरपालिकेवर देणेदारी २१५ कोटी आहे यावर्षीचे आजपर्यंतची वसुली ५६.८६ कोटी आहे देणेदारीची रक्कम जास्त असून त्यास दिवसेंदिवस वाढत होत आहे. हि देणेदारी मागील ५-१० वर्षापूर्वीची आहे. एकदम परतफेड होणे शक्य नाही. वसुली वाढविण्यावर भर द्यावा झोन अंतर्गत महानगरपालिकेच्या जागेवर व्यापारी संकूल उभारावे जे झालेले आहे ते दुकाने देण्यात यावी तसेच जकात, मालमत्ता व पाणीपट्टी वसुलीवर भर द्यावा. मागील सर्व थकबाकी वसूल करावी त्याशिवाय पर्याय नाही. कामासाठी कर्मचारी कमी पडतात वसुली होत नाही, सिडको-हडको मध्ये

आपले कर्मचारी अतिक्रमण हटविण्यासाठी देण्यात आलेले आहे. त्यांना वसुलीसाठी द्यावे जकातीत वाढ होत आहे, त्या बद्दल अभिनंदन परंतु यापेक्षा आणखी काही उपाययोजना करून जास्तीत जास्त वसुली कशी करता येईल याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. जे कर्मचारी योग्य पध्दतीने सेवा करीत नसेल त्याचेवर कार्यवाही व्हावी. ३ वर्षापासून खाजगीकरणाचा प्रश्न प्रलंबित आहे अंमलबजावणी करावी जेणे करून जास्तीत जास्त उत्पन्न वाढेल विकास काम करता येतील. तसेच ज्या ज्या ठिकाणी व्यापारी संकूल काढले ते ताबडतोब सुरू करावे. यात महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्यावर भर पडेल.

श्री. थोरात दत्तात्रय : उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने शहागंज भाजी मार्केट मधील सध्या १०० दुकाने रिकामी आहेत महानगरपालिकेला सध्या या दुकानापासून काहीही उत्पन्न मिळकत नाही. एवढी मोठी मालमत्ता असतांना कार्यवाही होत नाही. काही दुकानदारांनी दुकाने महानगरपालिकेच्या ताब्यात दिलेली नाही हा मुद्दा मी सर्व साधारण सभेत उपस्थित केलेल्या होता दुकाने हस्तांतर करण्यासाठी कार्यवाही चालू आहे. असे उत्तर देण्यात आले होत परंतु ही काय्रवाही किती दिवसात पूर्ण होणार याचा स्पष्ट खुलासा व्हावा.

श्री. प्रकाश निकाळजे : विविध प्रकारचे महानगरपालिकेस कर्ज द्यावयाचे असून कर्जाची परतफेड करून शहराची विकास कामे करायची आहे थोडे फार पथ्य या महानगरपालिका प्रशासनास पाळावे लागेल. महानगरपालिकेस शासनाकडून खूप मोठ्या प्रमाणात रक्कम येणे बाकी आहे. प्रशासनाच्या निष्काळजी पणामुळे तसेच शासनाच्या काही अडचणीमुळे या २ कामा शासनाचे पडून आहे. शाळेचे जे अनुदान मिळते त्याचा पाठपुरावा वेळीच शासनाकडे केल्यास महानगरपालिकेच्या तिजोरीतून पैसा खर्च होणार नाही तसेच लॅब्रीसाठी शासनाकडून अनुदान येते. त्याचप्रमाणे म्हाडासाठी अनुदान मिळते. मागील वर्षी स. अधिकारी श्री. सिकंदर अली यांनी प्रशासनाचया वतीने प्रयत्न करून अनुदान प्राप्त केले होते. त्यानंतर दुसऱ्याच्या प्रस्ताव सादर केला किंवा काय याबद्दल माहिती नाही तसेच केंद्र शासनाकडून सुध्दा कत्तल खान्याच्या विकासाठी अनुसरून मिळते त्यासंबंधी कार्यवाही करण्यास हे प्रशासन असमर्थ होत आहे शासन दिवाळखोरीत आहे. कर्मचाऱ्यांचे पगार कमी करावे लागणार सुट्ट्याच्या वेतन दिले जाणार नाही ते कमी करण्यात आले असे शासनाने जाहिर केलेले आहे. या शहराच्या विकासासाठी कर्मचाऱ्यांच्या सेवेतून (वेतनातून) रक्कम कपात करता येते का याचा विचार मा. आयुक्तांनी करावा तसे स्टेशनरी खरेदी केलल जाते त्यावर आळा घालणे जरुरीचे आहे तत्कालीन आयुक्त श्री. भोगे साहेब यांनी या बाबत १००% वरून २५-३०% स्टेशरीचा खर्च आणला होता तसेच शहरात रात्रंदिवस लाईट चालू असतात त्यामुळे लाईट बील जास्त येते. याबाबतीत दिवसा लाईट चालू राहणार नाही याची काळजी घेणे जरुरीचे आहे लातुरला एक प्रोजेक्ट तयारकरून सौर उर्जेवर स्ट्रीट लाईट चालते आहे त्यामुळे विजेची बचत होऊन जास्त तोटा सहन करावा लागत नाही. त्याप्रमाणे या शहरासाठी प्रयत्न व्हावे. त्यामुळे विजेचे बील कमी येईल. रेडलिस्ट एन-१ वगैरे जे टेंडर काढतांना एकत्र दिले तर त्यामुळे सुध्दा फायदा आहे काटकसर कशी करता येईल हे प्रशासनाने बघावे यत

महानगरपालिकेचा फायदा होईल. उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने शहरात एकूण १,३५,००० मालमत्ता असून नळाची संख्या फक्त २२०१२ आहे. मालमत्तेच्या तुलनेत नळाची संख्या फार कमी असून महानगरपालिकेकडे पोलिस फोर्स आहे. उद्यापासून प्रत्येक झोनमध्ये वेळ ठरवून नळाची तपासणी करावी चौकशी केल्यास कमीत कमी २००-३०० नळ कनेकशन अधिकृत करणारे नागरिक एकाच झोनमध्ये अनाधिकृत मिळतील. जेणे करून महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊ शकेल. बरेच रहिवाशी मालमत्तेचा कर लावावा म्हणून मागणी करतात परंतु प्रशासनाकडून ती सुध्दा कार्यवाही वेळेवर होत नाही. त्या नागरिकांना १०-१० चकरा माराव्या लागतात. यात सुध्दा भ्रष्टाचार होतो. त्यामुळे वेळ वाया जातो यात महानगरपालिकेचे नुकसान होते याचा गांभीर्याने मा. आयुक्तंनी विचार करणे गरजेचे आहे. वेळीच कर्मचारी / अधिकारी जनतेची कामे करीत नसतील अशा कर्मचाऱ्यांवर कडक कार्यवाही होणे आवश्यक आहे. कर, जास्त लागल्या गेल्यास तो सुध्दा कमी करण्यास कम्रचाऱ्यांकडून कार्यवाही करण्यास दिरंगाई होते. याचा अर्थ महानगरपालिकेचे जाणून बुजून उत्पन्न कमी करण्याचा हा प्रकार आहे. शहरात मोठमोठ्या इमारती त्यांना महानगरपालिकेने परवानगी दिली इमारती होऊन ५-६ वर्षे झाले संबंधितांनी महानगरपालिकेकडे कर लावण्यासंबंधी अर्ज दिले परंतु अद्याप कर लावण्यात आलेला नाही. यास जबाबदार कोण? ओपन जागेचा टॅक्स लागलेला आहे. परंतु इमारत झाल्यानंतर कमर्शियल टॅक्स लागेला नाही. शहरामध्ये जवळपास २०,००० हजार दुकाने आहे या दुकान दाराकडे नळ कनेक्शन नक्कीच असू शकते त्याचा सुध्दा शोध घेणे आवश्यक आहे. ज्या हॉटेलस् यांचा महानगरपालिका परवानगी देते. त्यांचेकडील नळ कनेक्शनचा शोध घ्यावा व हॉटेलस् पाणीपट्टी दरात वाढ करावी जेणे करून उत्पन्न वाढण्यास मदत होईल. व प्रत्येकाला मालमत्ता कर तसेच नळपट्टी दरवर्षी भरण्याची सक्ती घालावी यासाठी आयुक्तांना कठोर पावले उचलावी. प्रशासन कार्यवाही करतांना नगरसेवकांनी सुध्दा नागरिक किवा प्रशासनाची एक तर्फी भूमिका घेऊन कामाग अडथळा आणू नये. नागरिकांसाठी करावयाची विकास कामे व प्रशासन नियमाने करीत असलेली काय्रवाही या दोन्ही बाजू बरोबर घेऊन सदस्यांनी चालावे. खर्चात काटकसर तसेच नळ कनेक्शन मोहिम व थकबाकी असलेली वसुलीवर भर देणे आवश्यक आहे. या सर्व बाबी विचारात घेतल्यास प्रश्या ासनास उत्पन्न वाढविण्यास नक्कीच मदत होईल यात शंका नाही.

श्री. अंबादास दानवे : महानगरपालिकाची आर्थिक परिस्थिती जाणून घेण्यासाठी तसा प्रस्ताव मा. आयुक्तांनी सादर केलेला आहे. राज्य शासनाची सुध्दा आर्थिक परिस्थिती चांगली नाही. म्हणून घाबरण्याचे कारण नाही प्रशासनाने १३५ कोटीचा अर्थसंकल्प ठेवला होता. जेवढा अर्थसंकल्प मंजूर केला जातो तेवढी वसुली कोणत्याही विभागाची / खात्याची होत नाही हा आजपर्यंतचा अनुभ्झव आहे. परंतु जास्त तफावत सुध्दा येणे योग्य होणार नाही. मा. आयुक्त हे महसूली उत्पन्न वाढविण्यावर भर देत आहे. तरी सुध्दा वसुली कमी व प्रशासनाचा आस्थापनेवरील खर्च जासत झाला आहे. अशी स्थिती का निर्माण झाली यावर विचार विनिमय करणे आवश्यक आहे वसुली कशी

व कोणत्या पध्दती अवलंबून करायची या सर्व गोष्टी प्रशासनाच्या हातात आहे. व महानगरपालिकावर कर्ज झाले आता उत्पन्न कमी होते व विकास कमो करण्यास पैसा शिल्लक नाही यास प्रशासनच जबाबदार आहे. विद्युत बील थकबाकी पोटी १२६ कोटी दाखवले आपले अधिकारी मीटरची रिडींग तपासणी करतात का? केंव्हा केली कुणी केली त्याची वेळ काय याची माहिती घेणे आवश्यक आहे. माझ्या माहिती प्रमाणे विद्युत मीटरमध्ये दोष असून ५०% जास्त वीज बील मिटर रिडींग दोष असल्याने वाढवून देण्यात येते व यामुळे दर महिण्याला येणारे बील व वाढत जाणारी दर महिण्याची थकबाकी यामुळे येणारे बील व वाढत जाणारी दर महिण्याची थकबाकी यामुळे विद्युत बील थकबाकी १२६ कोटी पर्यंत पोहचली आहे शहरामध्ये आजची परिस्थिती पाहिल्यास बऱ्याच ठिकाणी दिवसा लाईट चालू राहतात संबंधित विभागचे कर्मचारी यांचे याकडे लक्ष नसावे का? लाईट बील कमी येण्यासाठी लोडींग मशीन बसविण्याचा ठराव घेतला नंतर अधिकाऱ्यांनी असा खुलासा केला की त्यास एम.एस.ई.बी. ची परवानगी घ्यावी लागते. शासनाचे अध्यादेश असतांना अधिकारी कार्यवाही करण्यास पुढे येत नाही. लोडींग मीटर बसविले असते तर दर महिन्याला येणारे बील कमी आले असते व महानगरपालिकाचा त्यात फायदा झाला असता. मालमत्ता कराच्या संदर्भात १३०० ते १४०० प्रकरणे न्याय प्रविष्ठ आहे. ज्या इमारतींना महानगरपालिकाने परवानगी दिली त्या इमारतींना टॅक्स लागलेला नाही. संबंधित विभागातील कर्मचारी काय कामे करतात. असा प्रश्न निर्माण होते बऱ्याच नागरिकांनी लेखी पत्र देऊन कर लावण्या बाबत मागणी केलेली त्यावर विचार होऊन कर आकारणी व्हावी. उत्पन्न वाढण्यात मदत होईल. आज वृत्तपत्रात जाहिर प्रगटन आले ज्याकडे १० हजारच्यावर थकबाकी आहे असे ३०४ लोकांची नांवे आहेव निवासी दर आकारणी होते असे दिलेले आहे. ज्या या थकबाकी दारांनी थकबाकी भली नाही तर जाहिरातीचा होणारा खर्च महानगरपालिकेच्या अंगावर पडेल यासाठी प्रशासनाने थकबाकी दारावर कडक काग्रवाही करणे गरजेचे असून असे केले तर उत्पन्न वाढवणे सोपे होईल महानगरपालिकेच्या ज्या ज्या शहरात मालमत्ता आहे समाज मंदिर, हॉल, शादीखाना यांचे उत्पन्न किती येते आतापर्यंत किती आले त्याचे रेकॉर्ड कोणता विभाग ठेवतो. याची सुध्दा काळजी घेतली व योग्य नियोजन केले. तर उत्पन्न मिळू शकते. महानगरपालिकाच्या मालकीचे गरवारे स्टेडियम आहे. तेथे विविध कार्यक्रम चालू असतात त्याचे रेकॉर्ड कोण ठेवतात याचा विचार व्हावा. मागील बैठकीत चर्चा आल्यानुसार मा. आयुक्त यांच्या आदेशाप्रमाणे मा. महापौर यांच्या प्रयत्नाने आरोग्य विभागाचा एक प्रस्ताव उत्पन्न वाढवण्याचे दृष्टीने सादर झालेला आहे. हा प्रस्तवानुसार तात्काळ अंमलबजावणी केल्यास फार मोठे उत्पन्न महानगरपालिकेस येणार आहे. जकात चुकवून काही गाड्या शहरात येतात. आपले कर्मचारी कार्यरत असतांना ती गाडी जकात चुकवून मध्ये कशी येऊ शकते कर्मचाऱ्यांचाचा दोष असून शकतो. गाडीमध्ये येते व १०% वसुल केले जकातीत वाढ झाली अशा बातम्या झळकत आहे. जकात चुकवून येते असेल त्यांचेवर गुन्हा दाखल करावा. १०% वसूल केले म्हणजे त्यामुळे जकातीत फारशी वाढ होत असे म्हणता येणार नाही. गेल्या वर्षीच्या

तुलनेत या वर्षी १.२२ कोटी जास्त वसूल झाले नैसर्गिक वाढीनुसार १०.५५% वसुली झालेली आहे. फार फार गरुड झेप मारलेली नाही. जे अधिक्षक आज गाड्या पकडतात दंडा पोटी १०% वसूल करीत आहे हेच पूर्वी जकात विभागामध्ये निरिक्षक म्हणून काम करीत होते. त्यावेळी का गाड्या अडवून दंड वसूल करून उत्पन्न वाढवले नाी. याचा अर्थ या कर्म्चाऱ्यांनी यापूर्वी दुर्लक्ष केले. एन-१ निविदेमुळे ४-५ लाखाचा फायदा झाला परंतु या वर्षी आता विकास कामे होणार नाही असे या प्रस्तवावावरून दिसून येते. अधिकाऱ्यांना वेतन व प्रशासकीय खर्च लावण्यासाठी १३५ कोटीचे बजेट मंजूर करून घेतले व प्रशासनाचा खर्च ४५-५०% होत आहे. जेवढा खर्च होतो त्या प्रमाणात कर्मचारी आहे. त्यानुसारच वसुली सुध्दा व्हावयास पाहिजे. परंतु तसे झालेले दिसून येत नाही. विकास कामे करावीच लागतील. वसुली साठी मा. आयुक्ताबरोबर हे सभागृह राहिल परंतु विकास कामे करावीच लागेल. जनतेनी आम्हाला कशासाठी निवडून दिले याचा विचार प्रशासनाने केला नाही का? महसूली उत्पन्न वाढवावे. महानगरपालिकाच्या फंडातून व इतर विविध मार्गाने पैठण गेट, शाईनगर, तसेच जवाहर कॉलनी कामात महानगरपालिकेच्या मालकीची दुकान केंद्र कार्यान्वित आहे. लाखो रुपये खर्च झाले. अद्याप उद्घाटन नाही यास कोण जबाबदार आहे. तात्काळ दुकाने चालू करावी उत्पन्न वाढवण्यास मदत होईल. या बाबतीत प्रशासनाने कठोर पावले उचलावी जेणे करून विकास कामे करता येईल.

श्री. गायकवाड राधाकृष्ण : कायम स्वरुपी / रोजंदारी वरील कर्मचारी यांचेवर किती खर्च होतो त्याची सविस्तर माहिती प्रस्ताव द्यावयास पाहिजे होती.

श्री. रतनकुमार पंडागळे : बेटरमेंट चार्जेस किती आकारला जातो याचाखुलासा व्हावा.

मा. आयुक्त : विकास कामे करता येणार नाही असा प्रस्ताव नाही. नविन कामात अडचण निर्माण होईल. नवीन काम करता येणार नाही असे सुध्दा लिहिले नाही दोन-तीन बाबींवर आपणास कठोार निर्णय घ्यावे लागणार सभागृहाची मंजुरी असावी. आतापर्यंत ५० कोटी वसूली बाकी आहे. ५० कोटीवर ५ कोटी दरवर्षी इन्ट्रेस मिळू शकाते. बऱ्याच नागरिकांना मालमत्ता कर भरलेला नाही. ज्यांच्याकडे थकीत रक्कम आहे अशा रक्कमेवर व्याजासहित रक्कम वसूल करावी अशी कायद्यात तरतूद आहे. ती कार्यवाही करण्याबाबत आपल्याला निर्णय घ्यावा लागेल व संबंधीतावर कठोर कार्यवाही करून वसुली करावी लागेल. बेटरमेंट चार्जेस बाबत असे की कोणतेही रेखांकन मंजूर करावयोच असेल तर अंतर्गत विकासाची कामे पूर्ण झाल्यानंतरच ५% सुपर विझन चार्जेस घेण्यात यावे. रस्ते खुली जागा हस्तांतर नंतरच मंजुरी देता येते. १००% बेटरमंट चार्जेस भरल्यानंतरच बांधकाम परवानगी देता येते. ५०% आता व ५०% बांधकामाच्या वेळी कायद्यात तरतूद नाही. तसेच बँक गॅरेंटीची ही कायद्यात तरतुद नाही. ते बंद केले. मेगा सिटी प्रोजेक्ट मध्ये बँक गॅरंटी धेतली त्यामुळे आणखी ८०-९० लाख मिळाले असते. वेळेवर अंकुश नाही यात काही कायदा झालेला नाही. ज्या मालमत्तेला कर लावण्यात आलेला नाही तो लावावा लागेल. मागील वसुलीवर भर देता येईल. पाणी पट्टीत वसुली झालेली नाही. ती मागील वसुली होणे गरजेचे आहे. देणेवारीमध्ये महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळास या वर्षाचे १ ट्ट कोटी

रुपये देणे आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकारण पाणी खरेदी देयक रक्कम ८० लाख रुपये तसेच एक.आय.सी. कडून घेतलेले कर्जाचा १० महिन्यापासून एकही पैसा भरलेला नाही नगररचना विभागाचे ८० लक्ष म्हाडाचे ७४ लक्ष तसेच हडकोचे ३.४ लक्ष रु. यावर्षी परतफेड करावी लागणार आहे. तसेच खुल्या बाजारातून घेतलेले कर्जाची १.३६ लाख देणे असून हमी शुल्क पोटी ८ लक्ष देणे आहे. शहरातील नवीन अनाधिकृत वस्त्यामध्ये तसेच स्लम भागात नवीन दलित वस्ती, झोपड पट्टीतील विकसाची कामे, रस्ते, ड्रेनेज इत्यादी कामे घ्यावे लागतील. मात्र समाज मंदिर, हॉल, अशी कामे घेता येणार नाही.

श्री. शिरसाठ संजय : १५ दिवसापूर्वी सिटी क्लब चौकात हायमास्ट दिवा बसवला. निश्चित केलेल्या जागेवर बसविलेला आहे का? चौकात नाही माझ्या वॉर्डात एक हायमास्ट दिवा बसवण्याचा ठराव झाला.

अतिरिक्त शहर अभियंता : १ १/२ वर्षापूर्वी ऑर्डर दिलेली होती. यावर्षी नविन एक टि हायमास्ट घेतलेला नाही तसा निर्णय सर्वसाधारण सभेने घेतलेला आहे. मागे जे टेंडर काढले होते ते फायनल झाले आहे. त्यामध्ये सिटी क्लब येथील हायमास्टचा समावेश होता.

श्री. अंबादास दानवे : ओपन स्पेस वर हायमास्ट दिवास बसविण्यात आलेला ती जागा सार्वजनिक वापराची जागा आहे का? तेथे दिवा कसा लागवण्यात आला. बाजूस जामा मस्जिद आहे. तेथे उजेड व्हावा या हेतून लावण्यात आलेला अशी शंका येते. त्याठिकाणी लोक येतात जातात का?

श्री. प्रशांत देसरडा : एखाद्या ठिकाणी ड्रेनेजचे काम करायचे यासाठी टेक्नीकल बाबी बघून कार्यवाही होते हायमस्ट दिवा लावतांना टेक्नीकल बाबी तपासून लावण्यात आलेला नाही का? ठरलेल्या जागेवरच लावलेला आहे खुलासा करावा.

श्री. शिरसाठ संजय : ज्या ठिकाणी जास्त वर्दळ असते अशा ठिकाणी हायमस्ट दिवा लावणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी संध्याकाळी ७.०० वाजेच्या नंतर कुणी जात नाही अशा ठिकाणी हायमस्ट लावलेले आहेत हायमस्ट पासून हजारो रुपये लाईट बील येते. जकातीतील ३५ कर्मचारी कमी केले तरी उत्पन्न तेच आहे. इजर वसुली झालेली नाही.

श्री. अंबादास दानवे : त्या जागेवर तार कुंपन ऐवजी संरक्षित भित बांधण्यात आली. त्याची आवश्यकात नाही. २.७५ लक्ष खर्च करण्यात आले त्याची आवश्यकता आहे का?

अतिरिक्त शहर अभियंता : हे काम १ १/२ वर्षापूर्वी मंजूर झालेले असून या कामाचे साहित्य यापूर्वीच आलेले आहे माझ्या कारकीर्दीत काहीही झालेले नाही.

श्री. संजय शिरसाठ : काम करण्याची परवानगी कोणी दिली. १ १/२ वर्षापूर्वी मंजूर झालेले काम आज होत आहे. मा. आयुक्तांनी परवानगी आहे का? असेल तर कोकणवाडी येथील हायमस्ट दिव्याचे काम का थांबवून ठेवले. मा. आयुक्त यांनी परवानगी दिलेली नाही का?

श्री. तकीहसन खॉन : सिटी क्लब चौकात तीन रस्ते जोडतात त्यामुळे हायमस्ट लावण्यासाठी मध्यभागी जागा नव्हती संरक्षित भिंतीचे काम बाबतचे वर्क ऑर्डर अगोदर झालेले असून हायमस्ट दिवा नंतर बसविण्यात आलेला आहे. यास स्थायी समिती सभागृहाने मान्यता दिलेली आहे. महानगरपालिकेची जमीन आहे म्हणून कुंपन भिंत बांधलेली आहे. अन्यथा त्या ठिकाणी

अतिक्रमण झाले असते, हा व्ही.आय.पी. रोड आहे. ३ रस्ते मिळकतात यास प्रशासन जाबादार आहे असे म्हणता येणार नाही. स्थायी समिती सुध्दा जबाबदार आहे त्यावेळी १० लक्षचे पॉवर स्थायी समिती सुध्दा जबाबदार आहे त्यावेळी १० लक्षचे पॉवर स्थायी समितीला होते. आपणही तेवढेच जितके प्रशासन जबाबदार आहे.

श्री. सिरसाठ संजय : नुकताच बसवलेल्या हायमस्टला मंजुरी होते तर माझ्या वॉर्डातील हायमस्ट बसवण्याबाबत ठरावात प्रशासनाने मंजुरी द्यावी लागेल तसेच नवीन कामांना सुध्दा मंजुरी द्यावी लागेल.

श्री. अंबादास दानवे : बाबा पेट्रोल पंप ते क्रांती चौक रस्ता वर फार मोठी वर्दळ आहे. त्यासाठी बाबा पेट्रोल पंप चौकास हायमस्ट दिवा बसवण्यात यावा.

मा. महापौर : इतर विषयावर चर्चा करणे बरोबर नाही. प्रस्तावानुसार चर्चा करावी.

श्री. तकीहसन खॉन : गांधी पुतळा माझ्या वॉर्डात आहे तेथे हायमस्ट आवश्यकात आहे परंतु यापुढे खर्चात कपात करायची या दृष्टीकोनातून प्रस्ताव सादर झालेला मोठ-मोठे खेळ, पुल थांबवावे. यापसून महानगरपालिकेत काही फायदा नाही. दिवस दिवस उत्पन्न कसे वाढेल यावर भर द्यावा मागे काय झाले याचा विचार करू नये.

मा. आयुक्त : हायमस्ट न लावण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. यापूर्वी जे जे २० फुटाचे लहान रस्ते आहे तेथे सुध्दा सोडीयम व्हेपर दिवे लावण्यात आलेले आहे. अशा रस्त्यास ट्युब लाईटची आवश्यकता आहे. आवश्यकता नसतांना सोडीयम व्हेपर दिवा लाऊन महानगरपालिकेस लाईट बोलणे दुप्पट वाढ होते. महानगरपालिके पासून दिल्लीगेट पर्यंत रस्त्याच्या बाजूला ३ सोडीयम व्हेपर दिवा लावण्याची आवश्ययकात नाही. जेथे गरज नसतांना तेथे जास्त दिवे लावण्यात आले तेथे जास्त सोडियम व्हेपर लावले ते कमी करू गरज नसतांना लावलेले आहे. याबद्दल सभागृहाला कडक भूमिका घ्यावी लागेल.

श्री. तकीहसन खॉन : सोडियम व्हेपर खरेदी बंद करावी, मरक्युरीची आवश्यकात नाही, ट्युब जळाले तर ३०-४० रुपयाचला येते सोडियम व्हेपर ६०० ते ९०० ला येते.

श्री. सोनवणे सुदाम : ज्या लहान गल्ल्यामध्ये सोडियम व्हेपर दिव्याची आवश्यकता नाही ते आज काढावे प्रशासनाच्या मतास हे सभगृह मंजुरी देण्यास तयार आहे. आपलेच कर्मचारी द्यावे प्रत्येक झोनला २ कर्मचारी नियुक्त करून कार्यवाही करावी. रस्त्याच्या बाजूलरा दोन-दोन सोडियम व्हेपर दिव्याची आवश्यकता नाही विजेची बचत व येणाऱ्या बिलात कपात कशी होईल याचा विचार करून कार्यवाही करावी.

मा. महापौर : महानगरपालिकांना बाहेरील कर्ज स्वरुपात २१५ कोटी रुपये देणे आहे तसा प्रस्ताव आपल्या समोर आलेला आहे. थकीत कर्ज मागील काही वर्षापासूनचे आहे. सभागृहात सदस्यांनी चांगली मुद्दे उपस्थित करून उत्पन्न कसे वाढवता येईल याबद्दल चर्चा केली. नगररचना विभागाने रिकाम्या जागेचे बेटरमेंट चार्जेस वाढववे. मोठ्या प्रमाणात ले-आऊट मंजूर होता बऱ्याच नागरिकांच्याबांधकामास परवानगी मिळत नाही. म्हणून तक्रारी आहे नागरिकांना त्रास होतो व सदर नागरिक शेवटी इमारत निरिक्षक यांना हाताशी धरून अनधिकृत बांधकाम केले जाते. यात महानगरपालिकेचे नुकसान होते. अशा प्रकारचे बांधकामास प्रोत्साहान देणाऱ्या इमारत

निरिक्षक वर सुध्दा प्रशासनाने कार्यवाही केली पाहिजे. त्यासाठी एक खिडकी सेवा या पध्दतीची अवलंब झाल्यास वेळ वाया जाणार नाही. महानगरपालिकेचे उत्पन्न वाढण्यास सुध्दा मदत होईल प्रिमीयम मिळत नाही. म्हणून अधिकारी / कर्मचारी वेळेवर कामे करीत नाही. पाणीपुरवठा विभागास अधिकारी समोर बसायला खुर्च्या नाही. आज जकातीचे चांगले उत्पन्न मिळकत. अपेक्षित उत्पन्न सुध्दा मिळेल त्यासाठी प्रयत्न करावे. मालमत्ता कर हे देखील महत्वाचे साधन आहे. मालमत्तेच्या करा संबंधी बरीच प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. लोक मालमत्ता कर भरत नाही वेळेवर कामे व्हावी यादृष्टीने उपआयुक्त दर्जाचे अधिकारी यांची नेमणूक करावी जेणे करून महसूली उत्पन्नात जास्तीत जास्त वाढ होईल. नवीन इमारतीचे काम होत आलेले आहे. विविध प्रकरणे निकाली लागण्यासाठी महानगरपालिकेचे स्वतंत्र न्यायालयात उघडण्याबाबत प्रयत्न व्हावेत.

श्री. पंडागळे रतनकुमार : प्रत्येक झोन मध्ये लोक न्यायालय भरावे तडजोड करून प्रकरणे निकाली काढावी. बरेच लोक टॅक्स भरतील.

मा. महापौर : मालमत्ता करासंबंधीचे प्रश्न झोन वाईज कसे सोडवता येतील या संबंधी कार्यवाही व्हावी कर भरण्यासाठी एक एक झोन वाईज वेगळे काऊंटर असावे. उत्पन्न कसे वाढवता येईल ते पहावे. आताच स. सदस्य श्री. सुदाम सोनवणे यांनी सांगितल्या प्रमाणे शॉपिंग सेटर बांधण्यत यावे. जे जे शॉपिंग सेंटर बांधून पूर्ण झाली ते सुरू करावे. जळगांव नगर परिषदेच्या धरतीवर याही महानगरपालिकेस शॉपिंग सेंटर मधून उत्पन्न झाले पाहिजे बोट (बीओटी) पध्दतीने दुकान केंद्रे विकसित करावे तसेच होर्डीगच्यामाध्यमातून सुध्दा जास्तीत जास्त उत्पन्न यावर्षीपासून होईल त्या बाबत कार्यवाही सुरू करावी. बऱ्याच शॉपिंग सेंटरचे भाडे वसूल होत नाही. डिपॉझिट घेऊन करारनामा होत नाही. त्यामुळे उत्पन्न घटते. शहरात अनाधिकृत नळकनेक्शन किती ते अधिकृत करून उत्पन्नात कशी वाढ होऊ शकेल याबद्दल प्रयत्न असावेत जे की पाणी पुरवठ्यात जी तुट येते ती भरून कशी काढता येईल यावर भर द्यावा. महानगरपालिकेस मालकीचे हॉल किती या बाबत माहिती विचारली असता ह्याचे उत्तर मला मिळाले नाही. जे हॉल, मंगल कार्यालय तसेच शाळेमध्ये होणारे विविध कार्यक्रम येणारे भाडे यावर दुर्लक्ष होता कामा नये. भाडेपट्ट्याने दिल्यास भाडेपट्टा मिळेल देखभाल दुरुस्ती होईल. आर्थिक परिस्थिती सुधारण्यास यापासून भर पडेल. जे करार पध्दतीने दिलेले आहे ते भाडे पट्टयाने द्यावे याबाबत फेर विचार व्हावा तसेच बायोमेडीकल वेस्टचा प्रकल्प आपण हाती घेतला जे की, हॉस्पीटल वगैरे यांना रॉयटली लावणार त्यापासून सुध्दा चांगले उत्पन्न मिळेल तसेच मालमत्ता धारकाला अग्निशमन दलाचे घ्यावयाचे ना हरकत प्रमाणपत्र यापासून उत्पन्नात भर पडेल तसेच विद्युत बील कमी येण्यासाठी लोडींग मीटर मशीन बसवावे. ज्या अडचणी येणारा त्या एम.एस.ई.बी. कडून सोडवून घ्याव्यात. काही मीटर विद्युत प्रवाह बंद असला तरी चालू असतात रिडींग व्यवस्थि येत नाही. ५०% लाईट बंद असतांना जास्तीचे बिल येते टीमर लावण्यास यावे. बिलात कपात व्हावी जेणे करून लाईट बील कमी येईल. नवीन महत्वाच्या कामांना प्रशासनाने मंजुरी दिली पाहिजे. त्यात पाणी पुरवठा, ड्रेनेज इत्यादी ही कामे येतील उत्पन्न वाढविण्यासाठी

प्रशासनाने जे प्रयत्न राहतील तयात हे सभागृह अडचण निर्माण करणार नाही. उलट सहकार्यच करेल प्रस्ताव सर्वानुमत मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सद्य परिस्थितीत वसुलीचे प्रमाण विचारात घेता चालू आर्थि वर्षात ३५ ते ४० कोटीची अर्थसंकल्पात निर्माण होणारी तूट भरून काढणे करिता तसेच नविन कामे होती घेण्याबाबत निर्माण होणाऱ्या अडचणी करिता प्रशासनास खालील प्रमाणे निर्देश देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) मालमत्ता कर वसुली संदर्भात प्रत्येक झोन मध्ये एक या प्रमाणे वेगळे (स्पेशल) काऊंटर करावे.

२) जळगांव नगरपरिषदेच्या धरतीवर शॉपिंग सेंटर (दुकान केंद्र) बोट (बी.आ.टी) पध्ध्दतीने विकसित करून व सद्य स्थितीत मधून तयार असलेले शॉपिंग सेंटर सुरू करावे व डिपॉझिट शिवाय करारनामा करू नये तसेच होर्डींगच्या माध्यमातून सुध्दा जास्तीत जास्त उत्पन्न मिळेल याबाबत कार्यवाही करावी.

३) शहरात खूप मोठ्या प्रमाणात असलेले अनधिकृत नळ कनेकशन लवकरात लवकर अधिकृत करून घ्यावे जेणे करून उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

४) महानगरपालिकाच्या मालकीचे हॉल, मंगल कार्यालय, तसेच शाळेमध्ये होणारे विविध कार्यक्रमांपासून मिळणारे भाडे यावर दुर्लख न करता योग्य भाडेपट्टा मिळेल याबाबत लक्ष ठेवावे.

५) बायोमेडिकल वेस्ट चा प्रकल्प लागू करावा ज्यामुळे रॉयल्टी वाढून उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

६) मालमत्ता धारकाला अग्निशमन दलाचे घ्यावयाचे ना हरकत प्रमाणपत्र यापसून उत्पन्नात भर पडण्यास मदत होईल.

७) विद्युत बील कमी येण्याबाब प्रशासनाने मंजुरी द्यावी जसे पाणी पुरवठा, ड्रेनेज इत्यादीची कामे त्यात सभागृह अडचण निर्माण करणार नाही.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३०/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, जिल्हा क्रीडा अधिकारी त्या सदस्य सचिव/विभागीय क्रीडा संकूल समिती औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र क्र. जिक्रीअ/ विक्रीस/ २००१/ ३५४ दिनांक १३/११/२००१ अन्वळे कळविलेले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या नविन क्रीडा धोरणानुसार महसूल विभागाच्या मुख्यलयी विभागीय क्रीडा संकूल उभारणी महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. विविका-१०९६/प्र.क्र.-२८१ क्रियुसे-१/ मुंबई-३२ दिनांक १६ नोव्हेंबर १९९८ अन्वये निर्णय घेतलेला असून शासन निर्णयानुसार विभागीय क्रीडा संकूल कार्यकारी समिती गठीत करण्यात आली आहे.

चिकलठाणा एम.आय.डी.सी. भागात औरंगाबाद महानगरपालिकेचे गरवारे क्रीडा संकूल असून त्याचे एकूण क्षेत्र २७ एकर असून त्यापैकी सुमारे १३.६ एकर इतके क्षेत्र रिकामेच आहे.

वरील दिनांक १३/११/२००१ च्या पत्राद्वारे जिल्हा क्रीडा अधिकारी तथा सदस्य सचिव विभागीय क्रीडा संकूल समिती यांनी औरंगाबाद येथे विभागीय क्रीडा संकूल औरंगाबाद महानगरपालिकेच्या गरवारे स्टेडियम येथील जागेवर महानगरपालिको व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यामाने उभारणे बाबत महानगरपालिकेची संमती मागितली आहे.

तरी सदर प्रकरणी सविस्तर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. देसरडा प्रशांत : कमिटीमध्ये मा. महापौर यांचा समावेश करण्यांत यावा. मालकी हक्क आपलेच राहवायास पाहिजे.

मा. महापौर : गरवारे प्रशासनासह महानगरपालिका प्रशासनाने याबाबत चर्चा करावी. या संकलास महानगरपलिका गरवारे विभागीय क्रीडा संकूल संबोधण्यात यावे कार्यकारी समितीत महानगरपालिकेचे महापौर, आयुक्त व संबंधित कार्यकारी अभियंता यांचा समावेश असावा. प्रस्ताव मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाच्या नवीन क्रीडा धोरणानुसार महानगरपालिका गरवारे क्रीडा संकलाच्या जागवेर महानगरपालिका व महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त विद्यमाने विभागीय क्रीडा संकलू उभारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे या संकूलाच्या कार्यकारी समितीत महापौर, महानगरपालिका आयुक्त व संबंधित कार्यकारी अभियंता यांचा समावेश करण्यास आणि या क्रीडा संकुलास औरंगाबाद महानगरपालिका गरवारे विभागीय क्रीडा संकलू असे संबोधण्यास ही सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्र. ५३१/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र. ६४ लक्ष्मीमाता मंदिर ते समद किराणा पर्यंतचा रस्ता ३० वर्षापासून वॉर्डातील सर्व नागरिक वापरतात व सदर रस्त्यावर १९८८ ते १९९५ दरम्यान दोन ते तीन वेळा खडी टाकून पिंचिंग केलेली आहे. परंतु सध्या रस्ता फारच खराब व अंधाराचा फायदा घेऊन नागरिक लघवी करतात त्यामुळे नमाज पढण्यासाठी व मंदिर दर्शनासाठी वॉर्डातील नागरिकांना एकमेव रस्ता असल्याने सदर रस्त्यावर काम करतांना औरंगाबाद मिल व्यवस्थापन अडथळा निर्माण करते. करिता सदर रस्ता महानगरपालिकेने तयार करणेसाठी औरंगाबाद टेक्स टाईल मिल कडून सदर रस्त्याची जागा अंदाजे २० फुटीच्या रुंदीची व ३०० ते ४०० फुट लांबी असलेल्या रस्त्यासाठी भूसंपादन करणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्रीमती चंद्रभागाबाई दाणे
अनुमोदक - श्री. गणेश तांबे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ६४ मधील लक्ष्मी माता मंदिर ते समद किराणा पर्यतचा अंदाज २० फुटीच्या रुंदीची व ३००-४०० फुट लाीं असलेल्या रस्त्यासाठी व

नागरिकांचय वापरासाठी औरंगाबाद टेक्सटाईल कडून जागा भूसंपादन करणेस भूसंपादनाच्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३२/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरासाठी वाढीव हद्दिसाठी मंजूर झालेल्या विकास योजनेनुसार पडेगांव लगत छावणी हद्दिला लागून मौजे जयसिंगपुरा व भावसिंगपुरा हद्दितून नियोजित ४५ मीटर रुंद विकास योजना रस्ता जात असून या रस्त्याखाली येणाऱ्या जमिनीत स.न. ९,२३,२४,२५,२६ जयसिंगपुरा व स.न. ४८,५२,४९,६९,२०,२७ भावसिंगपुरा येथे १९८५ पासून दाट लोकवस्ती झालेली आहे. तसेच या नियोजित रस्त्याच्या पश्चिमेस व दक्षिणेस १५ मी, २४ मी, व ३० मी, मुंबइ रोड व रुदींचे अनेक रस्ते विकास योजनेत प्रस्तावित केलेले आहेत, व पडेगांव एम.एस.ई.बी. ते स्लाटर हाऊस हा अस्तित्वातील डांबरीरस्ता आहे. रस्त्याच्या पूर्वेला छावणी भाग असल्याने त्यातील रस्ते याला जोडलेले नाही व या भागात रस्त्याच्या जागेत दाट लोकवस्ती झाल्याने आणि आता या भागत ४५ मीटर रस्त्याची गरज नसल्यामुळे हा श्रता ४५ मीटर रस्त्याची गरज नसल्यामुळे हा रस्ता ४५ मीटर ऐवजी १५ मीटर रुंद करणे व तसेच विकास योजनेत महाराष्ट्र प्रोदेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेबरदलाची कार्यवाही पूर्ण करून प्रस्ताव शासनास सादर करण्यासाठी मा. आयुक्त, महानगरपालिका यांनी अधिकारी प्रदान करणे आणि सर्वसाधारण सभा दि. २०/०६/२००१ ठराव क्र. ४२२/५ अन्वये ४५ मीटर रुंद रस्त्यासठी भूसंपादन करणेचा प्रस्ताव रद्द करणे व १५ मीटर रुंद रस्त्यासाठी शासनाने कलम ३७ अन्वये बदल मंजूर केल्यानंतर किंवा शासनास तसा प्रस्ताव पाठविल्यानंतर भूसंपादनाची कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्री. ठकूजी रामसिंग वाणी
अनुमोदक - श्रीमती चंद्रभागाबाई दाणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरासाठी वाढीव हद्दिसाठी मंजूर झालेल्या विकास योजनेनुसार पडेगांव लगत छावणी हद्दिला लागून मौजे जयसिंगपुरा व भावसिंगपुरा हद्दितून नियोजित ४५ मीटर रुंद विकास योजना रस्ता जात असून या रस्त्याच्या पूर्वेला छावणी भाग असल्याने त्यातील रस्ते याला जोडलेली नाही व या भागास रस्त्याच्या जागेत दाट लोकवस्ती झाल्याने आणि आता या भागात ४५ मीटर रस्त्याची गरज नसल्यामुळे हा रस्ता ४५ मीटर ऐवजी १५ मीटर रुंद करणेस महाराष्ट्र प्रोदेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये किरकोळ फेबरदलाची कार्यवाही करण्यास व त्यासंबंधी सर्व कायदेशीर बाबी पूर्ण करून प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास मा. आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. त्याच प्रमाणे सर्वसाधारण सभा दि. २०/०६/२००१ ठराव क्र. ४२२/५ अन्वये ४५ मीटर रुंद रस्त्यासाठी भूसंपादन करण्याचा पारित केलेला प्रस्ताव रद्द करणे व १५ मीटर रुंद रस्त्यासाठी शासनाने कलम ३७ अन्वये शासनाने मंजुरी दिल्यानंतर शासनास पाठविल्यानंतर भूसंपादनाची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३३/३ :**

दि. २०/१०/२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता की, नगर विकास विभागने त्यांचेकडील पत्र क्र. संकींण/ १०/ २००१/ १५९४/प्रक्र-९९ नांव-२७ दि. २७/०९/२००१ अन्वये, भूकंप पूर्नवसन कार्यक्रमांतर्गत कंत्राटी पध्दतीवर नेमणूक करण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंता, (१) श्री. शशिकांत सर्वात्तम पाटील (२) श्री. गोविंद प्रल्हादराव पाटे (३) श्री. संजय लक्ष्मण चामले यांना औरंगाबाद महानगरपालिकेकमध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर नेमणू देणे बाबत सूचित केल्यावरून, उक्त तिघांना कनिष्ठ अभियंता या पदावर नेमणूक देण्यात येत आहे.

सदर प्रस्तावावर मा. सर्वसाधारण सभेमध्ये चर्च होऊन सर्वसाधारण सभेने सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवला होता. मा. सर्वसाधारण सभेने प्रस्ताव स्थगित ठेवण्याचा घेतलेला निर्णय मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांना जा.क्र./मनपा/मआ/२००१/आस्था-१/२८८१ दि. २४/१०/२००१ नुसार अवगत करण्यात आला होता व याबाबत उचित आदेश मागविण्यात आलेले होते. त्यानुषंगाने नगरविकास विभागाने त्यांचेकडील पत्र क्र.एएमसी/१६९३/७२९/प्र.क्र.-६८/९३/मान-२/नवि-२४ दि. ०७/११/२००१ नुसार या कार्यालयास कळविलेले आहे की, सम क्रमांकाच्या दि. १० ऑक्टोंबर २००१ च्या शासन निर्णयानुसार कळविलेल्या ७ कनिष्ठ अभियंत्यापैकी खालील ३ कनिष्ठ अभियंताची नियुक्ती करून त्या विषयीचा प्रस्ताव महानगरपालिका सर्वसाधारण सभेत मान्यतेसाठी सादर करावा.

१) श्री. शिशिकांत सर्वोत्तम पाटील
२) श्री. गोविंद प्रल्हादराव पाटे
३) श्री. संजय लक्ष्मणराव चामले

नगर विकास विभागाच्या दि. ०७/११/२००१ च्या पत्राच्या अनुषंगाने उक्त ३ उमेदवारांना कार्यालयीन आदेश क्र./मनपा/आस्था-१/२००१/२९९८ दि. १२/११/२००१ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेने कनिष्ठ अभियंता या पदावर वेतनश्रेणी रु. ५५००-१७५-९००० व त्यावर मिळणाऱ्या अनुज्ञेय भत्यावर एक वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी नियुक्ती देण्यात आलेली आहे.

करिता नगर विकास विभागाच्या दि.१० ऑक्टोंबर २००१ च्या शासन निर्णयानुसार व ०७/११/२००१ च्या पत्रानुसार नियुक्त करण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंत्याच्या नियुक्तीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री. सुदाम सोनवणे : मागील बैठकीत हा प्रस्ता ठेवलेला होता त्यास विरोध करण्यात आलेला होता. मुलाखती घेऊन भूकंप ग्रस्तंनाच सेवेत समावेश करावा अशी विनंती केली. वावनिशी घेता येणार नाही. अशी सूचना केली असता शासनाचे आदेश असल्यने त्यांचे आदेश काढावे लागतील असे मत आयुक्तांनी व्यक्त केले व आदेश काढून पुन्हा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवला शासनाने काढलेल्या नावानिशी आदेशा नुसार संबंधित लोकांना सामावून घेणे आपल्यावर बंधनकारक नाही. महाराष्ट्रात असे १८४ लोक आहे. नावासह घेवू नये. मुलाखतीला बोलावून निवड करावी.

श्री. शिरसाठ संजय : जे ओदश काढले ते रद्द करावे नियमाला धरून नाही नावानिशी आध्यादेश काढणे ही सुध्दा शासनाने चुक केलेली आहे.

श्री. प्रशांत देसरडा : मागच्या बैठकीत प्रस्ताव होता स्थगित ठेवला. सभागृहाने स्थगिती दिल्या नंतर सुध्दा शासनाच्या निर्णयाच्या अधीन राहून ३ कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता या पदावर भरती केले. त्यांना घेणे बंधनकारक होते का? शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित होता विराध दर्शवून नामंजूर करावा मुलाखती घ्याव्यात.

श्री. तकीहसन खॉन : शासनाचे आदेश आहे त्याची अंमलबजावणी मुंबई प्रांतिम महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ (४) नुसार करणे आवश्यक आहे. प्रस्ताव सभागृहाच्या मान्यतेसाठी आलेला नामंजूर करणे योग्य होणार नाही शासनाने केलेले कोणतेही आदेशाचे पालन करणे नगरसेवक अधिकारी यांना बंधनकारक आहे. शासनाच्या विरोधात गेले तर आमच्यावर कार्यवाही होऊ शकते.

श्री. सुदाम सोनवणे : शासनाच्या आदेशाचे पालन करतो परंतु वैयक्तिक नांव देऊन सेवेत घेणे योग्य होणार नाही. ठिक आहे संबंधित लोकांनी भूकंप काळात काम केले परंतु शासनाचे आदेश लागू करता येणार नाही. जाहिरात देऊन अर्ज मागवावे मुलाखती घ्याव्यात या उमेदवारांना सुध्दा बोलवावे ज्यांनी भूकंपग्रसत काळात काम केले अशा उमेदवाराची निवड व्हावी त्यास कोणाचा हि विरोध राणार नाही. प्रस्ताव रद्द करावा.

श्री. दानवे अंबादास : मागील बैठकीत प्रस्ताव होता आपण स्थगित ठेवला पुन्हा शासनाचे मार्गदर्शन घेऊन तीन लोकांच्या ऑर्डर काढून मंजुरीसाठी प्रस्ताव आणलेला आहे जी नियम तयार केले त्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे. प्रस्ता नियमावलीत बसत नाही. शासनाने आदेश काढाले असले तरी घाबरण्याचे कारण नाही. भरती करायची असेल तर नियमावलीत गुणवत्ता वगैरे यात बदल करता येतो परंतु नावानिशी सेवेत समावेश करणे हे नियमात येत नाही. प्रस्ताव रद्द करण्यात यावा आदेश दिले असले तरी ते रद्द करावे उद्याच करावे.

श्री. गायकवाड राधाकृष्ण : मागील बैठकीत प्रस्ताव नामंजूर केला होता पुन्हा प्रस्ताव आणण्याची आवश्यकता नाही. शासनाने यापूर्वीही अनेक भूकंपग्रस्त काळात काम केलेल्या उमेदवारांची नावानिशी अध्यादेशकाढून विविध महानगरपालिका महामंडळ मध्ये नियुक्तीसाठी आदेश केलेले आहे. त्या प्रमाणे आपल्याकडे ३ कर्मचारी भरती करावे तसे आदेश दिले एका बाजूने शासनाने नोकर भरती बंद केली दुसऱ्या बाजूने नावानिशी अध्यादेश काढून भरती करावी असे दिले जाते हे धोरण शासनाचे बरोबर नसून नियमात बसत नाही. अशी माहिती मिळाली की लातूरचे कुणी तरी मुख्यमंत्र्याचे गावचे व्यक्ती भुकंपग्रस्तात काम केलेल्या प्रत्येकाकडून पैसा जमा करतात व ज्यांनी पैसे दिले त्याची नावे वेगवेगळ्या विभागात शासनाच्या आदेशानुसार पाठविली जात आहे. शासनाने एकूण १८४ लोकांची विविध विभागात नावे पाठवली आहे हा प्रस्ताव रद्द करावा. एकास ३ किंवा एकास-४ या प्रमाणात मुलाखतीसाठी उमेदवाराची मागणी करावी व भूकंपग्रस्त भागात काम केलेल्या पैकीच जे मुलाखतीत गुणवत्तेद्वारे नियुक्त होतील अशाच ३ लोकांची नियुक्ती व्हावी शासनाची आदेश नियमात नाही आमची नियमावली वेगळी केलेली आहे त्या प्रमाणे कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : मागील काळात काही अस्थायी कनिष्ठ अभियंता पदावर कर्मचारी होते या पदाची आवश्यकता नाही म्हणून काढून टाकले त्यानंतर ते कर्मचारी उपोषणास बसले त्यांना आश्वासन देऊन त्यांचे उपोषण सोडण्यात आले होते. नवीन पदे मंजूर करून शासनाकडे पाठवले शासनाने ३ पदांना मंजुरी देऊन नावासहित आदेशकाढले त्यानुसार प्रस्ताव आलेला आहे. सभागृहाची भावना लक्षात घेऊन सूचना केल्याप्रमाणे हा प्रस्ताव रद्द करण्यातयेत आहे. त्याचे नियुक्ती आदेश रद्द करावे.

श्री. तकीहसन खॉन : सभागृहात सदस्य संख्या कमी आहे. ही सभा नेहमी नेहमी तहकूब झालेली आहे सदस्यांचे कमी उपस्थितीत शासनाच्या अध्यादेश नुसार असा निर्णय घेणे योग्य होणार नाही याचा विचार करण्यात यावा. यास माझा अक्षेप आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शासनाचे आदेशाप्रमाणे प्रशासनातर्फे नियुक्त करण्यात आलेल्या तीन कनिष्ठ अभियंत्याच्या नियुक्तीचा आदेशा रद्द करण्यास बहुमताने मंजुरी देण्यात येते.

**विषय : ५३४/२**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,

१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत कलम ६६(४२)६८, ३१९, ४६८ आणि २९३ अन्वये.

२) पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ भारत सरकार पर्यावरण आणि वन मंत्रालय यांच्या अधिसूचना दिनांक २० जुलै १९९८ व सुधारणा दिनांक २ जून २००० खाली बायो मेडिकल वेस्ट (जैविक कचरा) नियम (व्यवस्थापन व हाताळणी) १९९८ प्रमाणे.

३) महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक २०, एप्रिल २००० अन्वये.

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय निमशासकीय खाजगी स्वंयसेवी / धर्मादाय संस्था किंवा व्यक्ती ज्या जैविक कचरा (बायो मेडिकल वेस्ट) निर्माण करतात अशा सर्व संस्था म्हणजे सर्व प्रकारचे वैद्यकीय व्यवसायिक रुग्णालय, दवाखाने, रक्तपेढ्या, पॅथॉलाजी प्रयोग शाळा, विज्ञान वैद्यकीय, पशु विद्यालय व महाविद्यालय, संशोधन संस्था, कत्तलखाने, पशु वैद्यकीय रुग्णालय, दवाखाना, मोठे, तबेले कुकुटपालन केंद्र, दुग्ध व्यवसाय केंद्र, इत्यादी सर्व धारकांना म्हणजेच नियमानुसार "ॲक्युपायर" असे संबोधण्यात आलेले सर्व ॲक्युपायर यांची जैविक कचऱ्याची विहित शास्त्रीय पध्दतीने व रील कायद्यानुसार विल्हेवाट लावण्याची जबाबदारी व बंधनकारक आहे.

औरंगाबाद महानगरपालिका हद्दितील सर्व नागरिकांच्या आरोग्य दृष्ट्या अनेक दुर्धर रोगांचा प्रादुर्भाव टाळणेसाठी जैविक कचरा विल्हेवाट योग्य पध्दतीने करणेसाठी महानगरपालिका जैविक कचरा विल्हेवाट इ. प्रकल्प (इन्सीनेटर) खाजगी तत्वार (Blild operate, lease & Transfer) (BOLT) या पध्दतीने कार्यान्विवत करीत आहे. यासाठी कायद्यातील तरतुदीनुसार सर्व

ॲक्युपायर करिता सदरील प्रकल्पासाठी आवश्यका जागा मनपाने राखीव केली आहे.

सर्व ॲक्युपाय यांनी सदर प्रकल्पाचे आजीवन सभासदत्व शुल्क रु. ३००/- (रुपये तिनशे फक्त) मनपा कर्यालयात जमा करून सभासद होणे बंधनकारक आहे. जे ॲक्युपायर सभासदत्व होणार नाही त्यांचे जैविक कचऱ्याची विल्हेवाट कायद्यातील तरतुदीनुसार व्यक्तिगतरित्या त्यांच्या मालकीच्या जागेत करावी लागेल व कायद्यानुसार सर्व ॲक्युपायर हे शिक्षेस व दंडास पात्र राहतील.

| | | |
|---|---|---|
| १ | १ ते ५० खाटा असलेले सर्व रुग्णालय दररोज दर खाट रु. ३.५० (५ खाटा पर्यंत कमीत कमी दर महा रु.५००/-) | |
| २ | ५१ ते २०० खाटा पर्यंत | दररोज दर खाट रु. ३.०० |
| ३ | २०१ ते ५०० खाटापर्यंत | दररोज दर खाट रु. २.५० |
| ४ | ५०१ ते अधिक | दररोज दर खाट रु. २.०० |
| | (वरील शुल्क रुग्णालयातील उपलब्ध खाटीच्या संख्येवर ठरविले जाईल रुग्ण भरतीवर अवलंबून नाही.) | |
| ५ | सल्ला कक्ष | दरमहा रु. २००.०० |
| ६ | दवाखाना (सर्व चिकित्सा पध्दतीचे) | दरमहा रु. ३००.०० |
| ७ | दंत शल्य चिकित्सक | दरमहा रु. ५००.०० |
| ८ | पॅथॉलॉज प्रयोग शाळाने पढ / रक्तपेढी / दुग्धपेढी, अव्यय प्रत्यारोपन केंद्रे | दरमहा रु. ५००.०० |
| ९ | गुरांचे दवाखाने, रुग्णालय, कृत्रिम केद्र, कत्तलखाने, कुकुट पालन, दुग्ध व्यावयासिक (डेअरी) | दरमहा रु. ५००.०० |
| १० | सर्व विज्ञान विद्यालय, महाविद्यालय, संशोधन केंद्र, ज्या ठिकाणी जनावारांचा उपयोग करण्यात येते. | दरमहा रु. २००.०० |
| ११ | इतर सर्व ॲक्युपायर | दरमहा रु. २००.०० |

जे ॲक्युपायर सभासदत्व होणार नाही त्यांच्या संस्थेतील जैविक कचरा गोळा करण्याची जाबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही. शिवाय कायद्यातील नियमानुसार शिक्षेस व दंडास पात्र असतील. या व्यतिरिक्त नियमानुसार प्रत्येक ॲक्युपायरने त्यांचे ॲथॉराईजेशन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ औरंगाबादकडून घेणे आवश्यक आहे.

वरील प्रस्तावित दरास सर्व साधारण सभेची मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. महापौर : हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे. प्रशासनामार्फत तात्काळ अंमलबजावणी व्हावी. आताच चर्चा झाल्याप्रमाणे या प्रस्तावानुसार महानगरपालिकेच्या उत्पन्नात चांगल्या प्रकारे वाढ होऊ शकते. प्रस्तावानुसार सर्व जैविक कचरा जमा होणाऱ्या संस्थांना दवाखाना जे कुणी असेल त्यांना कळवावे तांत्रिक बाबी बघून कार्यवाही करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमपाणे जैविक कचरा निर्माण करणाऱ्या म्हणजे सर्व प्रकारचे वैद्यकीय व्यवसायिक व्यवसायिक रुग्णालय, दवाखाने, रक्तपेढ्या, पॅथॉलाजी प्रयोग शाळा, विज्ञान वैद्यकीय, पशु विद्यालय व महाविद्यालय, संशोधन संस्था, कत्तलखाने, पशु वैद्यकीय रुग्णालय, दवाखाना, मोठे, तबेले कुकुटपालन केंद्र, दुग्ध व्यवसाय केंद्र, इ. धारकांकडून "ॲक्युपायर" म्हणजेच जैविक कचऱ्याची विहित शास्त्रीय पध्दतीने व प्रस्तावातील अ.क्र. १ ते ३ प्रमाणे विल्हेवाट लावणे बंधनकारक व जबाबदारी असल्याने औरंगाबाद महानगरपालिकातील वरील सर्व धारकांकडून साठवून ठेवलेला जैविक कचरा, ॲक्युपायर कडून नियमितपणे स्विकारून खाजगी तत्वावर (Blild operate, lease & Transfer) (BOLT) या पध्दतीने कार्यान्विवत करण्यास खालील अटी व शर्तीसह सेवाशुल्क आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १ | १ ते ५० खाटा असलेले सर्व रुग्णालय दररोज दर खाट रु. ३.५० (५ खाटा पर्यंत कमीत कमी दर महा रु.५००/-) | |
| २ | ५१ ते २०० खाटा पर्यंत | दररोज दर खाट रु. ३.०० |
| ३ | २०१ ते ५०० खाटापर्यंत | दररोज दर खाट रु. २.५० |
| ४ | ५०१ ते अधिक<br>(वरील शुल्क रुग्णालयातील उपलब्ध खाटीच्या संख्येवर ठरविले जाईल रुग्ण भरतीवर अवलंबून नाही.) | दररोज दर खाट रु. २.०० |
| ५ | सल्ला कक्ष | दरमहा रु. २००.०० |
| ६ | दवाखाना (सर्व चिकित्सा पध्दतीचे) | दरमहा रु. ३००.०० |
| ७ | दंत शल्य चिकित्सक | दरमहा रु. ५००.०० |
| ८ | पॅथॉलॉज प्रयोग शाळाने पढ / रक्तपेढी / दुग्धपेढी, अव्यय प्रत्यारोपन केंद्रे | दरमहा रु. ५००.०० |
| ९ | गुरांचे दवाखाने, रुग्णालय, कृत्रिम केंद्र, कत्तलखाने, कुकुट पालन, दुग्ध व्यावयासिकय (डेअरी) | दरमहा रु. ५००.०० |
| १० | सर्व विज्ञान विद्यालय, महाविद्यालय, संशोधन केंद्र, ज्या ठिकाणी जनावारांचा उपयोग करण्यात येते. | दरमहा रु. २००.०० |
| ११ | इतर सर्व ॲक्युपायर | दरमहा रु. २००.०० |

**<u>अटी व शर्ती</u>**

१) ॲक्युपायर यांनी सदर प्रकल्पाचे आजीवन सभासदत्व शुल्क रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) महानगरपालिका कार्यालयात जमा करून सभासद होणे बंधनकारक राहिल.

२) जे ॲक्युपायर आजीवन सदस्यत्व स्विकारणार नाहीत त्यांना जैविक कचऱ्याची विल्हेवाट कायद्यातील तरतुदीनुसार व्यक्तिगत रित्या स्वतः चे मालकीच्या जागेत करावी लागेल.

३) जे ॲक्यूपायरने सदस्यत्व स्किारणार नाहीत त्यांच्या संस्थेतील जैविक कचरा गोळा करण्यासाठी जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही.

४) प्रत्येक ॲक्युपायरने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचेकडून ॲथॉराईजेशन होणे आवश्यक आहे.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३५/३ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, शहरातील साफसफाई व स्वच्छतेचा व्याप वाढला असून सुंदर व स्वच्छ औरंगाबाद ठेवणेसाठी स्वच्छता व साफ सफाई करण्या करता औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दित झोन क्रमांक ६ मध्ये प्रयोगिक तत्वावर स्वच्छता व साफ सफाई करण्यासाठी म्हणून खाजगी संस्था बिसरकारी संघटना (एनजीओ) कामगार सहकारी संघटना व नोंदणी कृत कॉन्ट्रक्टदार किंवा भागीदार यांच्या पैकी एकाद्वारे झोन क्रमांक ६ ची संपूर्णतः साफ-सफाई स्वच्छता व त्यावर देखरेख करणेसाठी एक वर्षाच्या कालावधी करता खाजगीकरण करणे योग्य राहील. अशा प्रकारचे खाजगी करणामुळे झोन क्रमांक ६ मधील मनपाचे कर्मचारी यांच्यावर कोणतीही परिणाम होणार नाही. ते कर्मचारी इतर भागात विभागाले जावून काम करतील. त्यासाठी अटी व शर्तीनुसार जसे नागपुर व अमरावती महापालिकेने तसेच सिडको प्रशासनाने साफसफाई व स्वच्छता बाबत खाजगीकरण करून योजना राबवली आहे. त्याच पध्दतीवर महानगरपालिका औरंगाबाद झोन क्रमांक ६ साठी खाजगी तत्वावर साफ सफाई, स्वच्छता व त्यावर देखरेख करण्यासाठी मंजुरी देऊन जाहिर निविदा काढण्यास मंजुरी द्यावी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री. प्रकाश निकाळजे : या प्रस्तावास माझा विरोध आहे. तत्कालीन आयुक्त भोगे साहेब असतांना रोड, गटारी मोजल्या त्यानुसार १ कर्मचारी किती काम करू शकतो. त्यानुसार दिल्लीगेट रस्त्याची स्वच्छाता प्रयोगिक तत्वावर देण्यात आलेली होती. ती योजना सफल झाली नाही. २-२ दिवस कचरा रस्त्यावर तसाच पडून राहत असे. आता ही तेवढेच कर्मचारी साफसफाई करातात. खाजगी करण करू नये आपल्याच कर्मचाऱ्यांकडून जास्तीत जास्त काम घ्यावे. त्याचेवर उपासमारीची वेळ येता कामा नये. जकातीचे खाजगीकरण करावे या प्रस्तावास आम्ही विरोध करीत आहे तशी नोंद व्हावी.

श्री. शिरसाट संजय : स्वच्छतेच्या बाबतीत मा. आयुक्त चांगल्या पध्दतीने प्रयोग करू इच्छितात हा विषय नवीन नाही मागच्यावेळेस सांगितले गेले की, प्रत्येक दिवशी सर्व झोन मधील बरेचे कर्मचारी स्वच्छता करणार गैरहजर असतात ही सत्य परिस्थिती आहे का? कर्मचारी गैरहजर राहतात त्यामुळे स्वच्छाता होत नाही व कर्मचारी कमी आहे अशी तक्रारी येतात झोन क्र. ६ मधील सर्व कर्मचारी इतर झोन मध्ये दिल्यास आणखी स्वच्छतेचे काम व्यवस्थित होईल एक वर्षासाठी करार करावा योजना सफल झाली नाही तर पुन्हा रद्द करावा जे कर्मचारी आहे त्यांना कमी करू नये दुसऱ्या विभागात द्यावे.

श्री. रतनकुमार पंडागळे : गोर गरीबांना प्रश्न आहे. खाजगीकरण करू नये. झोन क्र. १ मध्ये फक्त १२५ कामगार साफसफाई करतात. इतर महाराष्ट्रातील महानगरपालिकेचा विचार न करता आपल्या महापालिकेमध्ये रोजंदारी कर्मचारी जास्त आहे. त्यांची उपासमार होऊ देऊ नये या बाबत विचार व्हावा.

श्री. प्रकाश निकाळजे : भोगे साहेब असतांना स्वच्छतेचे खाजगीकरण करण्यात आले हाते. शेवटी कायम स्वरुपी कर्मचाऱ्यांकडून स्वच्छतेचे काम चांगले होत असे दिसून आहे. पैसा नाही म्हणता खाजगीकरण करून टेंडर काढून यात महापालिकेवर खर्चाचा बोजा होईल आपल्याच कर्मचाऱ्यांकडून राजंदारी दर वाढवून जास्तीचे काम घ्यावे.

मा. महापौर : प्रशासकीय प्रस्ताव आहे. प्रशासनाची भूमिका काय आहे खुलासा करावा.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : स्वच्छ औरंगाबाद सुंदर औरंगाबाद सुरत पॅटर्न या धरतीवर ही कार्यवाही आपण करीत आहोत. या अगोदर सुरत पॅटर्न योजना राबवली होते. भागे साहेबांच्या काळात ही योजना राबवली होती आता माहिती व अनुभव आलेला आहे. साफसफाईसाठी नवीन कर्मचारी लागणार आहे. झोन क्र. ६ प्रायोगिक तत्वावर दिल्यानंतर इतर झोनचा सुध्दा विचार होईल शहराची स्वच्छता राहणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य असून सुरत पॅटर्न धरतीवर अमरावती शहर स्वच्छ दिसून येते ही योजना यशस्वी झालेली आहे. झोन क्र. ६ चा व्याप वाढलेला आहे. त्यामुळे कर्मचारी लागतात व झोन क्र. ३ मध्ये सुध्दा लहान ५ फुटाच्या गल्ल्यामध्ये सध्या साफ सफाई दरवेळेला होत नाही. त्यामुळे झाने क्र. ६ चे खाजगीकरण केल्यास व ही योजना प्रोयागिक तत्वावर देणार आहोत हे कर्मचारी इतर झोन मध्ये दिले जातील.

श्री. भरत लकडे : झोन क्र. ६ ऐवजी झोन क्र. ३ चे खाजगीकरण करण्यात यावे.

मा. महापौर : शासनाने नोकर भरतीवर बंदी आणली आहे. कामगार संख्या तीच असून शहराचा व्याप वाढलेला आहे. कामगार कमी पडतात. कामार कमी करणार नाही इतर झोन मध्ये पाठविणार आहोत.

श्री. पंडागळे रतनकुमार : शहराचा व्याप वाढलेला असून आवश्यकतेनुसार कर्मचारी भरती केले. या कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा शासनाकडे प्रस्ताव पाठवला का? खुलासा द्यावा.

श्री. तांबे गणेश : नवीन कामगार भरतीसाठी शासनाची परवागी मागवली का? हा प्रस्ताव रद्द करावा. कर्मचाऱ्यावर अन्याय होऊ नये जे काम करीत नसतील त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

मा. महापौर : प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे. नगरसेवकांचे काही ऐनवेळचे प्रस्ताव आहे. यानंतर ते प्रस्ताव घेण्यात येतील.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव बाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार तुर्त प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ५३६/४**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महिला व बाल कल्यण समिती मार्फत सर्व महिला सदस्यांचा (एकूण-२७) अभ्यास दौरा म्हैसूर, बंगलोर व हैद्राबाद महानगरपालिका येथे डिसेंबर महिन्यात आयोजित करणेस मा. सभापती महिला व बाल कल्याण समिती यांनी मंजुरी दिली आहे.

तद्अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेतील सर्व महिला सदस्यांचा अभ्यास दौरा हैद्राबाद, म्हैसूर व बंगलोर या ठिकाणी आयोजित करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रवास, निवास, भोजन इ. मंजुरीस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे सादर.

सुचक - १) सौ. चंद्रभागाबाई दाणे
२) सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
३) श्रीमती. शाहिन जफर महेमुद जफर

अनुमोदक - १) श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
२) सौ. निखत परवीन एजाज अली.
३) सौ. चंद्रात्रे सुवर्णा उमेश
४) सौ. कचराबाई उत्तम लोखंडे
५) सौ. विमलबाई राजपुत
दिनांक - २०/११/०१

**संवाद :**
मा. महापौर : या बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव :**
प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्व महिला सदस्यांना (एकूण २७) म्हैसूर, बंगलोर, व हैद्राबाद येथील महानगरपालिकेच्या कामकाजाची माहिती घेण्यासाठी अभ्यास दौरा करण्यासंबंधी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३७/५**
अग्रवाल सभा औरंगाबादच्या वतीने सत्य, अहिंसा व समाजवादाचे प्रणेते महाराज श्री. अग्रेसन यांचे नांव शहरातील चौकास देऊन अग्रवाल समाजाच्या भावनांचा विचार करून योग्य निर्णय घेण्याची विनंती केलेली आहे. त्यास अनुसरून प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, जालना रोडवरील हॉटेल ॲम्बेसेडर समोरील टी पॉईंट चौकास "महाराजा अग्रेसन चौक" असे नाव द्यावे व तेथून अग्रेसन भवनाकडे जाणाऱ्या रस्त्याला "महाराजा अग्रेसन पथ" असे नांव देण्यात यावे. त्याच प्रमाणे सदरील चोकास सुशोभिकरण करण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक - श्री. प्रशांत देसरडा
अनुमोदक - श्री. संजय सिरसाठ, श्री. जगदीश सिध्द
दिनांक - २०/११/०१

**ठराव :**
प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जालना रोडवरील हॉटेल ॲम्बेसेडर समोरील टी पॉईंट चौकास "महाराजा अग्रेसन चौक" असे नाव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच तेथून अग्रेसन भवनाकडे जाणाऱ्या रस्त्याला "महाराजा अग्रेसन पथ" असे नांव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात यते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३८/६ :**
प्रस्ताव सादर करण्यातयेतो की, मुकुंदवाडी महानगरपालिका हद्दितील सर्वे नं. ९०/२ हा सिडको प्रशासनाने डी नोट फाईड केलेला असून या मधून सिडकोने ९ मिटरचा डांबरी रस्ता तयार केलेला आहे हा रस्ता जनतेच्या हिताचा असून या भागातील सर्व नागरिक या रस्त्याचा उपयोग होत असून हा रस्ता कायम वर्दळीचा झालेला आहे. त्यामुळे सदर रस्ता कायम ठेवून उर्वरित जागेत अतिक्रमण होवू नये. यासाठी गार्डन अथवा शॉपिंग कॉम्पलेक्स बांधण्यात यावे.
करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. मोतीलाल जगताप
अनुमोदक : श्री. भगवान घडामोडे
दिनांक : १९/११/२००१

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे स.नं. ९०/२ मुकुंदवाडी येथील सिडकोने डिनोटीफाईड केलेल्या भागातील ९ मी. रुंद रस्ता कायम ठेवून उर्वरित जागेत उद्यान किंवा दुकान केंद्राचे बांधकाम करण्यास सर्वनुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३९/६ :**

माझ्या वॉर्डातील रहिवासी श्री. अन्वर नईम उर्फ अन्नु काका हे सामाजिक कार्यकर्ते होते गोर गरिबाच्या मदतीस ले सर्वांत पुढे असत त्यांनी कधी ही गोर गरीबांना मदत करण्याच्या कामात जात धर्म बघितलेला नाही.

तरी त्यांना सामाजिक श्रध्दांजली म्हणून राम मंदिर ते आझाद चौक मधील असलेल्या चौकास "अन्नु कामा चौक" असे नांव देण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक - श्रीमती सुलताना बेगम चाँदखॉ
अनुमोदक - श्री. सय्यद अली सलामी
सौ. निखत परवीन ईजाज अली.

**संवाद :**

मा. महापौर : सुचक उपस्थित नसल्याने प्रस्ताव स्थगित ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावाचे सुचक सभागृहात उपस्थित नसल्याने तूर्त प्रस्ताव स्थगित ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

या बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २७-११-२००१ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

**मंगळवार, दि. २७/११/२००१ रोजी महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदे मातरम्" या गिताने श्री. जैन विकास रतनलाल महापौर यांचे अध्यक्षतेखाली सुरु झाली. या सभेस महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

१) स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
२) स.स.श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
३) स.स.श्री. तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
४) स.स.श्री. वाणी ठकूजी रामसिंग
५) स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६) स.स.सौ. साजेदा बेगम विखर अहेमद
७) स.स.श्री. इलियास किरमाणी शे. उमर
८) स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९) स.स.सौ. इंगळे शकुंतला सांडुजी
१०) स.स.श्री. रगडे भगवान दगडूजी
११) स.स.श्री. शिंदे राजु रामराव
१२) स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१३) स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४) स.स.सौ. पवार मंदा प्रभाकर
१५) स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब
१६) स.स.श्री. जगताप मोतिलाल रघुनाथ
१७) स.स.सौ. शिंदे रुख्मीनी राधाकिसन
१८) स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१९) स.स.सौ. लोखंडे कचराबाई उत्तमराव
२०) स.स.श्री. शे. शकील पटेल शे. बुढण पटेल
२१) स.स.श्रीमती डॉ. आशा उत्तम बिनवडे
२२) स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२३) स.स.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण
२४) स.स.सौ. सुरडकर साधना गणेश
२५) स.स.श्री. रहाटकर विजया किशोर
२६) स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२७) स.स.सौ. चंद्रात्रे सुवर्णा रमेश
२८) स.स.श्री. जबिंदा दलबिरसिंग रणजितसिंग
२९) स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
३०) स.स.श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव
३१) स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३२) स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल
३३) स.स.डॉ. कराड भागवत किसनराव

३४) स.स.श्री. तांदुळवाडीकर आनंद विनायक
३५) स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यारखान
३६) स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३७) स.स.श्री. मुमताच अली मुअज्जमअली
३८) स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
३९) स.स.श्री. थोरात दत्तात्रय उर्फ बाळासाहेब रामराव
४०) स.स.श्री. सोनवणे सुदाम रामदास
४१) स.स.सौ. खरात कुसुमबाई दौलत
४२) स.स.श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४३) स.स.सौ. नुसरतबानो फिरोजखान
४४) स.स.श्री. तायडे पांडुरंग यशवंतराव
४५) स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४६) स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४७) स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४८) स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
४९) स.स.श्री. सुरगोणिवार नारायण चंद्रय्या
५०) स.स.सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग
५१) स.स.श्री. अ. कदिर मौलाना सय्यद
५२) स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजुरकर
५३) स.स.श्री. अशरफ मोतीवाला
५४) स.स.श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम
५५) स.स.सौ. मैंद संगिता बाळु
५६) स.स.श्री. दानवे अंबादास एकनाथराव
५७) स.स.श्री. नासीर खान अ. रहेमान खान
५८) स.स.श्रीमती शाहिन जफर महमुद जफर
५९) स.स.श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
६०) स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगीरथ
६१) स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
६२) स.स.श्री. स. सलीम स. युसूफ
६३) स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसन खान
६४) स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
६५) स.स.श्रीमती नफिसुन्निसा बेगम हबीबखाँ
६६) स.स.श्री. अफसर खॉन यासीन खॉन
६७) स.स.सौ. सुलताना बेगम चाँद खॉ
६८) स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
६९) स.स.श्री. शे. मुनाफ शे. यासीन
७०) स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
७१) स.स.श्री. कैसरखॉन बद्रोद्दिन खान
७२) स.स.श्री. जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
७३) स.स.श्री. अली सलामी स. मीरा सलामी
७४) स.स.श्री. तनवाणी किसनचंद लेखराज
७५) स.स.सौ. निखत परविन ईजाज अली.

(७६) स.स.श्री. कच्छवाह सुभाष लक्ष्मीनारायण - स्विकृत सदस्य
(७७) भगवान घडामोडे
(७८) सुरजितिंसग खुंगर
(७९) धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग

**विषय क्र. ५४०/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९(५) अन्वये उप-महापौर पदावर निवड करणे बाबत.

**संवाद :**

नगरसचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे ककलम १९ (५) च्या तरतूदीनुसार उप-महापौर पदाची कोणतीही नैमित्तीक जागा रिकामी झाल्यानंतर सोयीस्करपणे शक्य तितक्या लवकर अशी रिकामी झालेली जागी भरणासाठी आपल्या पालिका सदस्यांपैकी एकाची निवड केली पाहिजे. आणि अशा रितीने निवडून आलेल्या प्रत्येक उप-महापौराने ज्या व्यक्तीच्या जागी त्याची नेमणूक झाली असेल त्या व्यक्तीस ती जागा रिकामी झाली नसतील तर जितक्या अवधीपर्यंत पद धारणा करण्याचा हक्क प्राप्त झाला असता तितक्याच अवधीपर्यंत पद धारणा केली पाहिजे अशी तरतूद आहे.

मा. पिठासीन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (५) अन्वये उप महापौर पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक १७-११-२००१ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा का कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४,४५, व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोष्ज्ञित करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक १९-११-२००१ ते २३-११-२००१ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक २३-११-२००१ रोजी सायंकाळी ५=०० वाजेपर्यंत उप-महापौर पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झाली आहेत.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | उमेदवाराचे नांव |
|---|---|---|
| १ | ७५ | श्री. शे. मुनाफ शे. यासिन |
| २ | ०८ | श्री. शिंदे राजु रामराव |
| ३ | २७ | श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे |
| ४ | ०७ | श्री. रगडे भगवान दगडूजी |

वरील प्रमाणे उप-महापौर पदासाठी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्राचे छाननीचे सभा कामकाज नियमावलीच्या नियम क्र. ४४, व ४७ अन्वये आता करण्यात येत आहे.

मा. पिठासन अधिकारी : उप-महापौर पदासाठी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्रांची छाननी पूर्ण झाली असून खालीलप्रमाणे नामनिर्देशन पत्र वैद्य ठरविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव |
|---|---|
| १ | श्री. शे. मुनाफ शे. यासिन |
| २ | श्री. शिंदे राजु रामराव |
| ३ | श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे |
| ४ | श्री. रगडे भगवान दगडूजी |

मा. पिठासन अधिकारी : मा. पिठासीन अधिकारी : वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना आपला स्वाक्षरी केलेल्या अर्ज आपले सूचक व अनुमोदक यांच्या संमतीने परत घेता येईल.

सभेत सूचक किंवा अनुमोदक यापैकी एखादा उपस्थित नसेल तर इच्छुकाला या दोहोंपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे त्याच्या संमतीने ३० मिनिटांच्या अवधित म्हणजेच दुपारी १२:३० वाजेपर्यंत आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना उप-महापौदर पदासाठी आपली उमेदवादारी परत घ्यावयाची असेल त्यांना दुपारी १२:३० वाजेपर्यंत आताच सांगितल्या प्रमाणे आपले नांव परत घेता येईल. मात्र या वेळेत नंतर उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

मा. पिठासीन अधिकारी : उप-महापौर पदासाठी उमेदवारांपैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव |
|---|---|
| १ | श्री. शे. मुनाफ शे. यासिन |

आता उप-महापौर निवडणूकीसाठी खालीलप्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव |
|---|---|
| १ | श्री. शिंदे राजु रामराव |
| २ | श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे |
| ३ | श्री. रगडे भगवान दगडूजी |

मा. पिठासीन अधिकारी : मतदाना बाबत गोपनियता पाळता यावी म्हणून मत पत्रिकेच्या स्थळ प्रतिवर अनुक्रमांक राहिल. मात्र मतपत्रिकेवर अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सर मिसळ करण्यात येईल तसेच स्थळ प्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही, त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल.

मतपत्रिका १=०० तासात तयार होतील व मतदानाला सुमारे दुपारी १=३० वाजता सुरुवात होईल. तरी मतपत्रिका तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी / अधिकारी यांनी दुपारी १=३० वाजेपर्यंत मतपत्रिका तयार करून घ्यावी व त्यानंतर नगरसचिव यांना सर्व स. सदस्यांच्या

माहितीसाठी नमुना मतपत्रिका सभागृहात फलकावर लावण्याची व्यवस्था करावी.

मा. पिठासीन अधिकारी : मतपेटी जवळ नियुक्त केलेले मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहास दाखवून द्यावे व मतपेटटीला कुलूप लावून ती चावी माझेकडे आणून द्यावी व मतपेटी मोहोर बंद करून घ्यावी (पिठासीन अधिकारी स्वतः च्या सहीने मतपेटी मोहोरबंद करून घेतील.) सभा कामाकाज नियमावलीचे नियम क्र. ५१ अन्वये मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वतः उपस्थित राहण्याची इच्छ नसेल तर त्यांनी मतमोजणी पाहण्या करिता एखाद्या सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून पाठविता येईल. त्यासाठी मतदान सुरू होण्यापूर्वी म्हणजेचे आज त्यांनी त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे. तसेच मत मोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स. सभासदांनी कृपया गर्दी करू नये.

नगरसचिव : उप-महापौर पदासाठी उभे असलेल्यांची नांव वाचून दाखविली.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव |
|---|---|
| १ | श्री. शिंदे राजु रामराव |
| २ | श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव |
| ३ | श्री. रगडे भगवान दगडूजी |

१) मतदानास प्रत्यक्ष सुरुवात करतांना प्रभाग निहाय स. सदस्यांनी नांवे पुकारण्यात येतील.
२) महानगरपालिके तर्फे पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे.
३) सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना या पिठासीन अधिकारी यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल.
४) नियम क्र. ५० प्रमाणे प्रत्येक सदस्यांना एक मत देण्याचा अधिकार आहे. मतदान करतेवेळी प्रत्येक सभासद मत पत्रिकेच्या उजव्या बाजूला ज्या इच्छुकाला मते द्यावयाची असतील त्यांच्या नांवा समोर गुणाकाराची (x) फुली करावी.

श्री. अविनाश कुमावत : नियमावली बदल करणे बाबत मी वेळोवेळी सूचना करित आहे. याबाबत आता पर्यंत प्रशासनाने काय कार्यवाही केली प्रशासनाने अद्यापही कार्यवाही केलेली नाही म्हणून मी निषेध नोंदवितो. विधी विभागामार्फत प्रक्रिया चालू आहे.

नगरसचिव : विधी विभागा मार्फत प्रक्रिया चालू आहे.

५) सभा कामकाज नियमावलीच्या नियम क्र. ४५ (जे) मधील तरतूदीनुसार खालील परिस्थितीत मतपत्रिका अवैद्य समजली जाईल.
   १. जर मत पत्रिकेवर सभासदाने आपले नांव किंवा शब्द लिहिला असेल अथवा ती ओळखता यईल अशा रीतीने तिच्यावर काही खूण केलेली असेल अथवा....

२. जी छिद्रांकित (परफोटोरेटेड) नसेल अथवा...
३. जीच्यावर मत नोंदविले नसेल अथवा जी संदिग्धतेमुळे निरुपयोगी आहे.

मा. पिठासीन अधिकारी : नमूना मतपत्रिका फलकावर चिकटविण्यांत आलेली आहे.

आता मतदानाला सुरुवात होत आहे. प्रभागनिहाय स. सभासदांची नांव पुकारण्यांत येतील सभाकामकाज नियमावलीचे नियम क्र. (फ) च्या अनुषंगाने मतदानासाठी १ तासाचा कलावधी देण्यांत येत असून सभागृहातील घड्याळाप्रमाणे आता २:०४ वाजले असून मतदान ३:०४ वाजता संपेल, सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र. ४५ (जी) प्रमाणे मतदानाची वेळ संपल्यानंतर उपमहापौर पदासाठी मतदान करता येणार नाही. कृपया याची सर्व स. सदस्यांनी नोंद घ्यावी व मतदान शांततेत व सुरळतीपणे पारपाडण्यांत सहकार्य करावे अशी सर्वांना विनंती आहे. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियम क्रमांक ४५ च्या तरतूदीप्रमाणे कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा-नस-२००१८४८/दिनांक २१/११/२००१ अन्वये अधिकारी व कर्मचारी यांची केलेली नियुक्ती कायम करण्यांत येत असून सदर आदेशाद्वारे ज्यांना ज्यांना जी कामे नेमूण देण्यात आलेली आहेत त्याची ती कामे जबाबदारी पार पाडावीत.

**संवाद**

श्री. जयवंत ओक : भाऊसाहेब वाघ यांना पायाचा त्रास असल्याने प्रथमतः त्यांना मतदानासाठी नांव पुकारावे.

श्री. नंदकुमार घोडेले : ज्या ज्या सदस्यांचे प्रथम मतदान करण्याचे अर्ज आलेले असतील त्यांचे नांव पुकारावे.

मा. महापौर : ठिक आहे. जनसंपर्क अधिकारी यांनी मतदानासाठी वॉर्ड निहाय नांव पुकारावी.

जनसंपर्क अधिकारी : प्रभाग क्र. ८२,१० यांचे नांव मतदान करणेसाठी पुकारण्यात आले व स. सदस्यांनी मतदानात भाग घेऊन मतदान केले.

श्री. प्रकाश निकाळजे : ही प्रक्रिया बेकायदेशीर आहे. नियम मराठी व हिंदीतून समजून सांगावे ते सांगतांना आम्हाला समजले नाही. वेळ मागितला होता. एक तास थांबावे विनंती केली असता. विनंती मान्य केली नाही. आमची सामाजिक प्रक्रिया व्यवस्थित ठेवण्याचा उद्देश होता. भारिप बहुजन महासंघ, रिपाई गाडे गट संयुक्तिकरिता येऊन आमचे जेष्ठ व गुरुद्वारा बोर्डाचे अध्यक्ष आम्ही सर्वांनी सामंजस्यते युती केली होती. सेना-भाजप यांनी अभिवचन दिली होते. गेस्ट हाऊसला मिटींग झाली. महाराष्ट्रात नवीन चित्र उभे राहण्याची अपेक्षा होती. चारही पक्षाचे नेते गेस्ट हाऊसला भेटेल. तडजोड झाली. उप-महापौर जाहीर केले.

भा.ज.पा. ने आमचा विश्वासघात केला. त्यामुळे आम्हास अतिशय दुःख होते आहे. कारण आम्हास दिलेले शब्द भाजपाने पाळलेले नाही. एका दलित नगर सेवकास उप-महापौर पद देण्यास नकार देऊन भाजपाने आपल्यातील मनुवादी प्रवृत्ती स्पष्ट केल्याचे सांगितले. याबाबत सभागृहात धिक्कार करून या निवडणूकीवर बहिष्कार टाकीत असल्याचे नमूद करून स. सदस्य निकाळजे सह. स. सदस्य श्री. रतनकुमार पंडागळे, माणिक

साळवे, दलबिरसिंग जबिंदा, गणेश तांबे, व सौ. चंद्रभागाबाई दाणे हे सभागृह सोडून गेले (वेळ दुपारी २=१० वाजता).

श्री. डॉ. भागवत कराड : स. सदस्य, श्री. निकाळजे सभागृह सोडून गेले व पक्षा बाबत या सभगृहात चर्चा केली, तेंव्हा भा.ज.पा. ने त्यांना कणतेही आश्वासन दिलेले नव्हते. तरीही भारिप बहुजन महासंघ व रिपाई (गाडे) गटास प्रभाग समिती आणि शिक्षण समितीचे सभापती पद देण्याची तयारी भाजपने केली होती. शेवटेचे उप-महापौर पद आहे. भारिप बहुजन महासंघास देवू शकतो.

श्री. किशोर तुलशीबागवाले सभागृहात निवडणूकीच्या विषया व्यतिरिक्त पक्षांबाबत चर्चा करून वेळ वाया घालवू नये. याच्या लोकशाही आघाडी तर्फे आम्ही निषेध करतो व सभागृहातून सभात्याग करतो असे सांगून सर्व आघाडीचे स. सदस्यांनी ठिक २=१५ वाजता सभागृह सोडले व पुन्हा दोन मिनिटांनी सभागृहात सर्वांनी प्रवेश केला.

जनसंपर्क अधिकारी : प्रभाग क्र. ८,९,१०,११ च्या सदस्यांचे नांव पुकारले त्यामुळे स. सदस्यांनी मतदानात भाग घेऊन मतदान केले व वॉर्ड क्रमांक १४ चे स. सदस्यांनी त्यांच्या लेखी विनंतीनुसार मा. महापौर यांनी सूचना केल्यानुसार मुख्य लेखाधिकारी यांनी सहकार्य केले तर वॉर्ड क्र. १५ चे स. सदस्य यांनी मतदानात भाग घेतला व वॉर्ड क्र. १६ च्या स. सदस्यांच्या लेखी विनंती वरून मा. महापौर यांचे सूचने वरून प्रभारी विधी सल्लागार यांनी मतदानासाठी सहकार्य केले. त्याचप्रमाणे त्याच प्रमाणे वॉर्ड क्र. १८ चे. स. सदस्यांनी मदानात भाग घेतला व वॉर्ड क्र. १९ चे स. सदस्य यांच्या लेखी विनंती वरूनमा. महापौर यांच्या सूचने प्रमाणे उप अभियंता, (ड्रेनेज) श्री. खन्ना यांनी सहकार्य केले तर वॉर्ड क्र. २०, २१, २२, २३, २४, २८, ३२, ३३, ३४, १, ३५, ३९, ८३, ४२, ५५, ४३, ४४, ५२, ४७, ४५, ४८, ४९, ५०, ५१, ५३, ५४, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६३, ६५, ६६, ६७, ६९, ७०, ७२, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९, ८१, व ४, ५, ६, ७, १२, १३, १७, ३८ यांनी मतदानात सहभाग नोंदविला तर वॉर्ड क्र. ३१ चे स. सदस्य व पिठासन अधिकारी यांनी स. सदस्य श्री. भरत लकडे यांना पिठासन अधिकारी म्हणून पाचारण केले व ते उठून आल्यानंतर मा. पिठासन अधिकारी यांनी पिठासन अधिकारी पदी स. सदस्य श्री. भरत लकडे यांना आसनावर बसविले व मतदान केले त्यानंतर वॉर्ड क्र. ३,३६,४६, व ६२ चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर वॉर्ड क्र. ७३ चे स. सदस्य यांच्या लेखी विनंती वरून मा. महापौर यांच्या सूचने वरून लेखापाल यांनी मतदानासाठी सहकार्य केले आणि त्यानंतर पिठासन अधिकारी पदी स. सदस्य, श्री. विकास जैन पुन्हा असनावर स्थानापन्न झाले.

मा. पिठासन अधिकारी : ज्या वॉर्डातील स. सदस्यांनी वेळेच्या आतं मतदानात भाग घेतलेला नाही. त्यांचे नांव जनसंपर्क अधिकारी यांनी पुन्हा पुकारावे.

जनसंपर्क अधिकारी : ज्या प्रभागातील स. सदस्यांनी मतदानासाठी आपला सहभाग नोंदविला नाही त्यांचे नांव पुन्हा दोन दोन वेळेस पुकारले.

मा. पिठासीन अधिकारी : आता ३:०४ वाजले असून मतदान संपले आहे. असे मी घोषित करतो. मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका देवू नयेत. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी.

उमेदवारांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीलाच मतमोजणी पाहण्याचीपरवानगी आहे. इतर स. सदस्यांनी मत मोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करू नये व सभागृहात शांतता ठेवून निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यास सहकार्य करावे ही विनंती.

मा. पिठासीन अधिकारी : मतमोजणीचे काम पूर्ण झाले आहे.

एकूण मतदान - ७०
अवैद्य मते - -
वैद्य मते ७०

उमेदवारांना पडलेली मते खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | पडलेली मते |
|---|---|---|
| १ | श्री. शिंदे राजु रामराव | ४४ |
| २ | श्री. निकाळजे प्रकाश भाऊराव | २५ |
| ३ | श्री. रगडे भगवान दगडूजी | ०१ |
| | **एकूण** | **७०** |

मतमोजणीच्या निकाला वरून मी असे घोषित करतो की, उप-महापौर पदासाठी श्री. राजु रामराव शिंदे यांची निवड झाली असून मी त्यांचे अभिनंदन करतो.

| अ.क्र. | विजयी उमेदवाराचे नांव |
|---|---|
| १ | श्री. शिंदे राजु रामराव |

या नंतर नव निर्वाचित उप-महापौर यांनी आपले मनोगत व्यक्त करून सर्वांचे आभार मानाले.

या बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
महापौर,
महानगरपालिका, औरंगाबाद